**'टिळक महाराष्ट्र विद्यापिठ पुणे'**

समाजविज्ञान शाखेतील समाजशास्त्र विषयाच्या 'विद्यावाचस्पती आचार्य' (पीएच.डी.) पदवीसाठी सादर

केलेला संशोधन अहवाल

विषय

# ''चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी माना जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन''


**-: संशोधिका:-**

**सौ. लता धनराज मेश्राम**

सहायक शिक्षिका

एम.ए.(समाजशास्त्र) बी.एड्.

मु. पो. वडसी

ता. चिमूर जि. चंद्रपूर

**-: मार्गदर्शक:-**

**प्रा.डॉ. बी.एम.कऱ्हाडे**

समाजशास्त्र विभाग प्रमुख

कर्मवीर दादासाहेब देवतळे

महाविद्यालय, चामोर्शी

जि. गडचिरोली


**डिसेंबर - २०१३**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सौ. लता धनराज मेश्राम यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गुलटेकडी पुणे च्या समाजविज्ञान विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती आचार्य (पीएच.डी) पदवीकरीता तयार केलेला प्रबंध **"चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी माना जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन"** माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे.

संशोधनकर्तीने प्रस्तुत संशोधन स्वतः संकलित केलेल्या अनूभवाधिष्टित माहितीवर आधारित असून टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे च्या 'विद्यावाचस्पती आचार्य' (पीएच.डी) या पदवीकरीता सादर करण्याच्या दृष्टीने तो परिपूर्ण आहे. यापूर्वी हा शोधप्रबंध किंवा या शोधप्रबंधाचा कुठलाही भाग भारतातील वा भारताबाहेरील कुठल्याही विद्यापीठाला कोणतीही पदवी प्राप्त करण्यासाठी सादर केलेला नाही.

चामोर्शी

दिनांक : / /

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. बी.एम. कऱ्हाडे**
एम.ए.(समाजशास्त्र) पीएच.डी.
कर्मवीर दादासाहेब देवतळे
महाविद्यालय,
चामोर्शी जि. गडचिरोली

# प्रतिज्ञापत्र

मी **सौ. लता धनराज मेश्राम** असे जाहीर करते की, समाजविज्ञान शाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती आचार्य' (पीएच.डी) करिता टिळक महाराष्ट्र विद्यापिठ पुणे येथे सादर करण्यात येत असलेला प्रस्तुत शोधप्रबंध **"चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी माना जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन"** मी स्वत: संशोधनात्मक अध्ययन करून तयार केलेला असून यापूर्वी हा शोधप्रबंध किंवा या शोधप्रबंधाचा कुठलाही भाग मी भारतातील वा भारताबाहेरील कुठल्याही विद्यापीठाला कोणतीही पदवी प्राप्त करण्यासाठी सादर केलेला नाही.

वडसी

दिनांक : / /

**संशोधनकर्ती**

**सौ. लता धनराज मेश्राम**
एम.ए.(समाजशास्त्र) बी.एड्.
मु.पोष्ट. वडसी, ता. चिमूर
जिल्हा चंद्रपूर

# ऋणनिर्देश

कधीही शाळेत न गेलेले माझे वडील श्री. अर्जुन रामटेके व इयत्ता ४ थी शिकलेली माझी आई सौ. शकुंतला ज्यांनी शिक्षणाची कास धरून आम्हा भावंडांना उच्च व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी गाव सोडले व शहरात मिळेल ते कष्ट करून वेळोवेळी अर्धपोटी राहून शिक्षणाची शिदोरी आम्हाला बांधून दिली ज्यामुळे आज आम्ही तिन्ही भावंड उच्च शिक्षित होऊन आर्थिक व सामाजिक रित्या सक्षम झालोत व सन्मानाने जीवन जगू लागलो. अशा माझ्या आदरणीय आई—वडीलांच्या चरणी माझा साष्टांग नमस्कार.

त्याचप्रमाणे मला उच्च शिक्षण देऊन संशोधनासाठी प्रेरित करून संशोधनाच्या कार्यात मला संशोधनासाठी सर्वतोपरी मदत करणारे ज्यांच्यामुळे मी स्वत:चे शिक्षण, संशोधनाचे कठीण कार्य पूर्ण करू शकली असे माझे आदरणीय पती श्री. धनराज शि. मेश्राम यांचे मी प्रथमत:च ऋण व्यक्त करीत आहे. पुरूषप्रधान संस्कृतीत पत्नीला शिक्षण देऊन सन्मानाचा दर्जा देणाऱ्या माझ्या पतीचे ऋण मी आयुष्यभर फेडू शकत नाही. म्हणून मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छिते.

संशोधनाचे कार्य करण्याचे ठरविल्यावर कुठे जावे व कुठून सुरूवात करावी हा मोठा प्रश्न पुढे असतांना माझे आदरणीय गुरूवर्य प्रा. डॉ. बाबू एम. कऱ्हाडे यांनी लहान मुलाला बोट धरून जसे वडील चालायला शिकवितात त्याचप्रमाणे त्यांनी मला संशोधनाच्या वाटेवर चालायला शिकविले. त्यांचा वेळ फार मोलाचा ते सतत त्यांच्या लिखाणात गर्क असतात अशावेळी त्यांनी मला त्यांचा वेळोवेळी मोलाचा वेळ दिला. मी निव्वळ शिक्षणातील आदिवासींचे स्थान शोधात असतांना त्यांनी मला आदिवासींच्या संपूर्ण जीवनाची ओळख करून दिली व संपूर्ण माना आदिवासी जमातीवरच संशोधन करण्यासाठी प्रेरित केले. त्यांच्यामुळेच मी एका मोठ्या प्रमाणात उपेक्षित असलेल्या व माझ्याच सभोवती असणाऱ्या माना आदिवासी जमातीचे एवढे सूक्ष्म व सविस्तर अध्ययन करू शकली. प्रसंगी अतिशय कठोरपणे त्यांनी मला चुका दाखवून दिल्या तर कधी अगदी हळूवार मोरपिसासारखे संशोधन पद्धती सारख्या रूक्ष विषयावरच्या संकल्पनांवर मार्गदर्शन केले. 'गुरूर्ब्रम्हा:, गुरूर्विष्णु:, गुरूर्देवो महेश्वरा:' या सुभाषिताप्रमाणेच गुरूशिवाय ज्ञानाचा मार्ग नाही, अशापद्धतीने त्यांनी संशोधनासाठी माझ्या मनाला संस्कारित केले. मला लहाणपणापासूनच साहित्याचे वेड त्यामुळे कथा, कविता लिहीता लिहीता साहित्याची भाषाच वारंवार माझ्या लेखनात यायची. अशावेळी प्रमाण व वैज्ञानिक भाषा वापरण्यासाठीही त्यांनी

वेळोवेळी मला मार्गदर्शन केले. त्यांचे ऋण मी स्वत: लहान गरीब व उपेक्षित मुलांना अध्यापनाचे कार्य करून थोड्या प्रमाणात का होईना फेडण्याचा प्रयत्न करीत आहे. व आयुष्यभर करीत राहीन. तरीही गुरू शिष्याचे हे ऋणानुबंध मी त्यांच्या ऋणातच राहून कायम ठेवावे अशीही माझी ईच्छा आहे.

माझे गुरूवर्य आदरणीय डॉ. कुलगुरू टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, ज्यांनी मला संशोधनासाठी त्यांच्या विद्यापीठात संधी उपलब्ध करून दिली, साडेनऊशे किमीचे अंतर पार करून विद्यापीठात जाऊन सर्व बाबी पूर्ण करण्याचा माझा त्रास कमी करण्यासाठी वेळोवेळी मला फोनवरून व पत्रव्यवहाराद्वारे मार्गदर्शन करणारे, संशोधनाविषयी विविध सूचना देणारे माझे आदरणीय गुरूवर्य डॉ. विशाल जाधव समाजशास्त्र विभागप्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे तसेच डॉ. पाटील मॅडम, डॉ. जगन्नाथ कऱ्हाडे (टि.एम.व्ही, पुणे) या सर्वांनी मला वेळोवेळी मदत केली या सर्वांची मी ऋणी आहे.

माणूस हा सामाजिक प्राणी आहे आणि सामाजिक संशोधनाचे कार्य ही तो एकटेपणाने करू शकत नाही. खरे म्हणजे कोणतेच कार्य मनुष्य एकटेपणाने पूर्ण व यशस्वी करू शकत नाही. त्यामुळे त्याच्या यशाचे श्रेय हे त्याच्या कार्यात त्याला मदत करणाऱ्या सर्वांचेच असते. माझ्या या संशोधन कार्यात मला वेळोवेळी मदत करणारी माझी मैत्रीण डॉ. जयश्री बारई (सौ. गिरडकर) नागपूर, माझे सहकारी शिक्षक डॉ. गोकूलदास कामडी राजगड, माझे काका आदरणीय, प्रा. डॉ. बी.जी.रामटेके अमरावती विद्यापीठ, प्रा. डॉ. प्रा. पाटील वानखेडे अध्यापक विद्यालय नागपूर, श्री धनराज पाटील सामाजिक कार्यकर्ता नागपूर, श्री कैलास उरकुडे मु.अ. वडसी, व माझे सर्व सहकारी शिक्षक, मला संशोधन कार्यासाठी विभागाकडून मान्यता मिळवून देणारे मा. गटाशिक्षणाधिकारी पं.स.चिमूर, मा. श्री. डी.जी.मेश्राम, शिक्षण विस्तार अधिकारी, मा. श्री धनपाल फटींग शिक्षण विस्तार अधिकारी, श्री धोनमोडे केंद्रप्रमुख व पंचायत समिती कार्यालयातील मदत करणारे सर्व सहायक यांचेही मी मनापासून ऋण व्यक्त करते.

माना आदिवासी हया विषयावर जेव्हा मी २००८ मध्ये संशोधन कार्य सुरू करण्याचा विचार केला तेव्हा माना या जमातीविषयी मी कुठेही वाचलेले नव्हते. त्यामुळे संशोधनाची सुरूवातच कुठुन करावी हीच मोठी समस्या माझ्यापुढे होती. अशावेळी मला मोलाचे सहकार्य करणारे श्री ताराचंद दडमल चिमूर, श्री भास्कर वाकडे वरोरा, प्रा. श्री. ज्ञानेश्वर नागदेवते, नेरी त्याचप्रमाणे डॉ. रमेश गजभे माजी राज्यमंत्री, मा.प्रा. रामराव नन्नावरे, श्री वासुदेव धारणे अध्यक्ष

माना जमात मंडळ मुंबई या सर्वांची मी ऋणी आहे. त्याचप्रमाणे माझ्या सदर संशोधनात मोलाची मदत करणारे श्री. चंदनसिंह रोटेले अध्यक्ष आठवले कॉलेज चिमूर यांचेही ऋण व्यक्त करू इच्छिते. डॉ. फुलझेले सावली, प्रा. आनंद मोहोड रा. तु.म. महाविद्यालय चिमूर, यांच्याकडूनही मला संशोधनाची प्रेरणा मिळाली त्या सर्वांची मी मन:पूर्वक आभारी आहे.

प्रुफ तपासण्याचे किचकट काम मी स्वत: व माझे पती श्री. धनराज शि. मेश्राम यांनी पूर्ण केले. तसेच अक्षर जुळविण्याचे कार्य तसेच प्रिंटिंग व बाईडींगचे कार्य 'साईनेट' रेशिमबाग नागपूर यांनी अगदी मर्यादित वेळात पूर्ण केले त्याबद्दल मी त्यांचीही आभारी आहे. प्रा. एल.सी. उजेडे ज्ञानेश महाविद्यालय नवरगाव यांनी आपला मोलाचा वेळ देउन इंग्रजी भाषांतर करण्यासाठी मदत केली. त्यांचे ऋण मी फेडू शकत नाही. त्यांचीही मी मन:पूर्वक आभारी आहे.

शोधप्रबंधासाठी ग्रंथालयाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ—पुणे, कै. भाऊसहेब कोलते ग्रंथालय नागपूर विद्यापीठ नागपूर, जिल्हा शासकीय ग्रंथालय, चंद्रपूर, आठवले समाजकार्य महाविद्यालय, चिमूर, सिद्धार्थ वाचनालय नेरी, शासकिय ग्रंथालय चिमूर, कर्मवीर महाविद्यालय चामोर्शी, इत्यादी ग्रंथालयातील ग्रंथांचा मला संशोधनात उपयोग घेता आला त्यामुळे मी त्या सर्व संस्थांची ऋणी आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महाविद्यालय चिमूर येथील ग्रंथालयाचा सर्वाधिक उपयोग मला झाला. त्यासाठी सर्व नियम बाजूला ठेवून मला संशोधन कार्यासाठी ग्रंथ उपलब्ध करूण देणारे मा.श्री. बाळकृष्ण झिंगरे ग्रंथपाल व प्राचार्य रा.तु.म. महाविद्यालय चिमूर यांचे ऋण मी कधीच फेडू शकणार नाही. त्यामुळे आयुष्यभरासाठी त्यांची ऋणी आहे. त्यासोबतच ज्या ज्या सहकाऱ्यांनी मला त्यांच्या जवळील ग्रंथाचा संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करण्यासाठी त्यांचे ग्रंथ उपलब्ध करून दिले त्या सर्व सहकाऱ्यांची व ज्यांच्या ग्रंथाचा मला संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग झाला त्या सर्व थोर—मोठया ग्रंथकारांची मी आभारी आहे.

संशोधन क्षेत्रातील प्रशासकिय अधिकारी कर्मचारी, पंचायत राज व्यवस्थेतील पदाधिकारी स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी व आदिवासी विकास कामाचे प्रकल्प अधिकारी ज्यांनी मला वेळोवेळी आवश्यक ती माहिति पुरविली त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानते.

संशोधनासाठी ज्यांचे सहकार्य सर्वात जास्त मोलाचे ठरले व ज्यांचा वेळ त्यांच्या पोटाच्या भाकरीसाठी सर्वाधिक महत्त्वपूर्ण असूनसुद्धा त्यांनी आपला अमुल्य वेळ काढून मला लांबलचक मुलाखत अनुसूची भरण्यासाठी वेळ दिला, माझ्या संशोधनाला महत्त्व दिले अशा सर्व चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासी जमातीतील लोकांचे व उत्तरदात्यांचे ऋण व्यक्त करणे मी माझे

कर्तव्य समजते. कारण त्यांच्या सहकार्याशिवाय माझे संशोधन कधीच पूर्ण होऊ शकले नसते. त्याची मी आयुष्यभर ऋणी राहीन.

अनवधनाने ज्यांचे नामोल्लेख करता आले नाही परंतु प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष ज्यांनी मला मोलाचे सहकार्य केले त्या सर्वांची मी आभारी आहे. या संशोधनात संशोधन कार्य करण्यासाठी सतत पाच वर्ष कुटुंबाचा सुद्धा वेळ बांधून ठेवावा लागला. या कामात मला मोलाचे सहकार्य करणारी माझी मुले खुशबू, प्रिया व चिराग यांची मी आभारी आहे. त्याचप्रमाणे घरकामाात व मुलांना सांभाळण्यात ज्यांनी मला सहकार्य केले ते माझे आदरणीय सासु—सासरे यांचीही मी ऋणी आहे.

चंद्रपूर, गडचिरोली हे महाराष्ट्रातील दुर्गम, ग्रामीण व मागासलेले जिल्हे, जिथे वनसंपत्ती, खनिज संपत्ती अधिक असूनसुद्धा तेथे दैन्य व दारिद्रयही अधिक अशा ठिकाणी १९७२ च्या दुष्काळात जिथे वडीलांचे सर्वच नुकसान झाले, कुक्कुस मिरचीची चटणी खाऊन दिवस काढावे लागले अशा दुष्काळात जन्माला आलेली मी संशोधनाच्या या खडतर वाटेवर तशाच हिंमतेने व ताकदीने चालत राहीली. मात्र हे संशोधन कार्य कितपत यशस्वी झाले हे सांगण्याचा व ठरविण्याचा सर्वस्वी अधिकार परिक्षकांचा आहे व त्यांच्यावरच तो सोपविला आहे. मात्र या अध्ययनामुळे अपेक्षित माना आदिवासींच्या समाजजीवनाचे चित्र सर्वासमोर स्पष्ट होईल व त्यांची ओळख सर्वांना होईल अशी मनापासून सदिच्छा मी व्यक्त करते.

दि.

संशोधिका
सौ. लता धनराज मेश्राम
M.A. B.Ed.
मु.पो. वडसी
त.चिमूर जि. चंद्रपूर

# अनुक्रमणिका


| विभाग | प्रकरण | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| विभाग १ | | शिर्षक | I |
| | | प्रमाणपत्र | I I |
| | | प्रतिज्ञापत्र | I I I |
| | | ऋणनिर्देश | IV |
| | | अनुक्रमणिका | VIII |
| विभाग २ | प्रकरण १ ले | चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी माना जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन | १ –५६ |
| | | १.१ प्रस्तावना,कार्यात्मक व्याख्या. | १ |
| | | १.२ आदिवासी साहित्याचा अध्ययन आढावा | ३४ |
| | प्रकरण २ रे | अध्ययन क्षेत्राची परिचयात्मक रुपरेखा | ५७–९० |
| | प्रकरण ३ रे | संशोधन पध्दती | ९१–१३७ |
| विभाग ३ | प्रकरण ४ थे | नमुना वर्णन, वैवाहिक, कौटुंबिक, शैक्षणिक व धार्मिक संरचना व परिवर्तन | १३८–२२९ |
| | | ४.१नमुना निवड उत्तरदात्यांची सामान्य माहिती | १३८ |
| | | ४.२विवाह व्यवस्था आणि परिर्वतन व कौटुंबिक संरचना आणि परिवर्तन | १५७ |
| | | ४.३ शैक्षणिक व धार्मिक व्यवस्था आणि परिवर्तन : | १९२ |
| | प्रकरण ५ वे | आर्थिक संरचना व परिवर्तन, शासकिय योजना व त्याचे माना | २३०–३२५ |

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | | आदिवासींसाठी फायदे | |
| | | ५.१ आर्थिक संरचना व परिवर्तन | २३० |
| | | ५.२ शासकिय योजना व माना आदिवासींसाठी त्याचे फायदे (मूल्यांकन) | २९६ |
| | प्रकरण ६ वे | सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय सद्यास्थिती व परिर्वतन आणि ऐतिहासिक जागृती आणि समस्या | ३२६–४४० |
| | | ६.१ सामाजिक स्थिती, संघटना, संघर्ष व परिवर्तन | ३२६ |
| | | ६.२ सांस्कृतिक सद्यस्थिती व परिवर्तन | ३५६ |
| | | ६.३ राजकीय संरचना व परिवर्तन | ३७८ |
| | | ६.४ ऐतिहासिक जागृती | ४१२ |
| | | ६.५ समस्या : वास्तव्य, आधुनिकीकरण, डि.एन.ए चाचणी व कायदेविषयक | ४२१ |
| विभाग ४ | प्रकरण ७ वे | सारांश व निष्कर्ष | ४४१–५०२ |
| | | ७.१ सारांश | ४४१ |
| | | ७.२ निष्कर्ष | ४६१ |
| विभाग ५ | परिशिष्टे | मुलाखत अनुसूची | ५०३ |
| | | संदर्भ ग्रंथ सूची | ५२३ |
| | | जनगणना पत्रक महाराष्ट्र शासन एप्रिल २०१०. | |

# प्रकरण १ ले

# चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी माना जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन

## १.१ प्रस्तावनाः—

भारत हा लोकशाही राज्यपध्दती असलेला देश आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'भारतीय राज्यघटनेला' म्हणजेच संविधानाला प्रमाण मानून भारताची प्रगती पथावर घोडदौड सुरु आहे. 'शायनिंग इंडिया' हे भारतीयांचे स्वप्न आहे. एकविसाव्या शतकात सर्व जग संगणकमय बनत असतांना भारत देशही मागे नाही. आधुनिकीकरण आणि तंत्रज्ञान या दोन्ही पायांवर भारताचा विकास सुरु आहे. म्हणूनच भारतात हरीतक्रांती, धवलक्रांती, नीलक्रांती, पीतक्रांती आणि मोबाईलक्रांती मोठया प्रमाणात घडून आलेली दिसते. भारत हा मुख्यतः शेतीप्रधान देश आहे. प्रा.व्ही.बी.पाटील यांच्या मते, ''पहिल्या पंचवार्शिक योजनेची सुरुवात झाली. तेव्हा म्हणजे १९५१ मध्ये भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ८२.७% लोक ग्रामीण समाजात म्हणजे खेडेगावात वास्तव्य करणारे होते.''[१)]

आजही इथली ७०% जनता शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे भारताचे तसे पाहता दोन विभागात विभाजन ठळक झाल्याचे दिसते. एक म्हणजे 'शहरी' भाग व दुसरा ग्रामीण किंवा खेडे विभाग. डॉ. विरेन्द्रनाथ सिंह यांच्या मते, ''मानव' समाजाच्या विकासात समाजाचे मुख्यतः तीन स्तर समोर येतात. I. जनजातीय स्तर, II. ग्रामीण स्तर III. नगरीय स्तर. हे तीनही स्तर समाजात राहून तीन प्रकारच्या समाजाचे प्रतिनिधीत्व करतात.''[२)]

पुढे डॉ. विरेन्द्रसिंहाच्या मते, ''भारत गावांचा (खेडयांचा) देश आहे. संपूर्ण भारतीय जीवनावर कोणत्या ना कोणत्या रुपात ग्रामीण संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. या देशातील प्रमुख समस्या सुध्दा सरळ गावांशी जुडलेल्या आहेत. तरीसुध्दा भारतीय संस्कृती तिच्या मूळरुपात खेडेगावांतूनच जीवंत आहे.''[३)]

खरे म्हणजे वाढत्या लोकसंख्येबरोबर खेडयातील शेतीवरचा भार वाढतच चालला आहे व कामधंद्यासाठी खेडयातील लोकांचे लोंढेच्या लोंढे शहराकडे स्थलांतरीत होत आहेत. भारतात विविध जाती, धर्म व पंथाचे लोक मोठया गुण्यागोविंदाने नांदतात असे शाळांमधून लहान मुलांना सांगितले जाते.

परंतु वरवर पाहता अखंड दिसणारा भारत देश मात्र अंतर्गत दृष्टया पाहिला तर जाती, धर्माच्या व्यवस्थेने पोखरलेला आढळतो. आधुनिकीकरणाने तर त्यात आणखी 'वर्गवारीची' भर घातलेली आढळते. त्यामुळे पुन्हा भारत देश हा दोन विभागांत प्रामुख्याने विभागलेला दिसतो. त्यातला एक म्हणजे व्यापारी वर्ग, राजकारणी,अधिकारी, कारखानदार, आणि मोठे शेतमालक, हाच वर्ग एकीकडे विकासप्रक्रीयेत सामील झालेला दिसतो. कारण भारताची संपूर्ण अर्थव्यवस्थाच त्यांच्या हातात असल्याचे निदर्शनास येते. त्यांच्याकडे पाहीले तर भारत देश खरोखरच विकसित होत आहे असे वाटते. परंतु नाण्याची दुसरी बाजू पाहिली तर गरीब, मजूर वर्ग आणि जंगलापहाडात, गावांत, खेडयापाडयांत, दुर्गम भागात राहणारा, विकासापासून कितीतरी दूर असणारा, 'आदिवासी' वर्ग आहे. एकीकडे मॉल संस्कृती म्हणून कपडे आणि अन्नाला पायाखाली तुडविणारा श्रीमंत वर्ग तर दुसरीकडे कपडे आणि अन्नासाठी वणवण भटकणारा मागासलेला गरीब वर्ग. डॉ.शरदचंद्र गोखले यांच्या मते, ''एकीकडे लक्षावधी माणसे उपाशी आहेत तर दुसरीकडे अब्जावधी रुपयांचा चुराडा अणुबॉम्ब आणि इतर भयानक संहार करणारी क्षेपणास्त्रे तयार करण्यात खर्च होते आहेत.''[४)]

पुढे डॉ.शरदचंद्र गोखले यांच्या मते, ''दर पाच माणसांसाठी एक माणूस पराकोटीच्या गरीबीत किंवा हलाखीच्या स्थितीत राहतो आहे. या देशामध्ये दोन शतकोटी लोक दरर्वी ५०० डॉलर्स उत्पन्नाच्या खाली किंवा दारिद्रय रेषेखाली जगत आहेत.''[५)]

एकाच देशात समाजाचे असे तुकडे का पडलेले दिसतात? स्वातंत्र्यासाठी सर्व देशवासीयांनी समान लढा दिला. मग स्वातत्र्याचा उपयोग सर्वांना समान का

मिळत नाही? भारतीय संविधानात सर्वांना समान न्याय, समता, बंधुता, समान अधिकार व समान संधी असतांना भारतात ही कमालीची विषमता का आढळते? दिवसें दिवस ही दरी अधिकाअधिक रुंदावल्याचे का आढळते? श्रीमती सुशीला ओडवायर यांच्या मते, ''वर्तमान परिस्थितीत जाणवणारे हे तणाव, संघर्ष व समस्या ही सामाजिक संशोधनातील आव्हाने आहेत.''[६)]

याच आधारावर असे अनेक प्रश्न मनाला भेडसावत असतांना आसपास असा आदिवासी समाज आढळला की जो गावांत दुर्गम खेडयांत राहतो. परंतु तरी त्याला विकास म्हणजे काय? हे समजलेले आहे असे वाटत नाही. स्वतःच्या अस्तित्वासाठी त्यांना न्यायालयात कित्येक वर्ष न्याय मिळविण्यासाठी भांडावे लागले. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत शतकभर जास्तच दूर असलेला हा आदिवासी 'माना' समाज व त्याच्या सामाजिक, आर्थिक समस्यांनी संशोधिकेचे लक्ष वेधून घेतले. वि.ज. गोडबोले यांच्या मते, ''समस्या या देशापुढे आव्हान उभे करतात.''[७)]

ज्याप्रमाणे शरीराचे सर्व अवयव सुदृढ असले तरच शरीर सुदृढ असते. त्यातील एखादा जरी अवयव अविकसित राहीला म्हणजे शरीराला अपंगत्व येते. त्याचप्रमाणे देशातील सर्व स्तरावर समाज विकसीत असला पाहीजे. एखादा समाज, एखादा घटक या विकासप्रक्रीयेत मागे पडला असेल तर त्याची यथासांग मिमांसा करुन त्याची कारणे शोधून त्याचे, 'सूक्ष्म अध्ययन' करणे जेणेकरुन त्याला विकासप्रक्रीयेत कसे आणता येईल. याची पुढे सांगोपांग चर्चा घडून येईल व तशी कृती जबाबदार व्यक्ती, संस्था, शासन यांच्याकडून घडली जाईल या उद्देशाने माना जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्याचा संशोधिकेने मानस बांधला.

डॉ. गोविंद गारे व श्री उत्तमराव सोणवणे यांच्या मते, ''शासकीय कल्याणकारी योजनांच्या अनुषंगाने अलिकडील काळात वृत्तपत्रांतून आदिवासींना खूपच प्रसिध्दी मिळाली आहे. त्यामुळे सर्वसाधारण जनमाणसाची आदिवासी संबंधाने उत्सुकता

पालवली गेली आहे, लोकांची जिज्ञासा वाढली आहे.''[८] हेही एक कारण 'माना' आदिवासी समाजाच्या अध्ययनामागे संशोधिकेचे आहे.

कोणत्याही समाजाचे अध्ययन करतांना वरुन दिसणारे त्याचे बाहयांग आणि अंतर्गत संरचना यामध्ये तफावत आहे का? हयाचे अध्ययन अत्यावश्यक आहे. कारण बरेचदा अंगावरचे कपडे जरी आधुनिक असले तरी लोक मात्र जुन्या रुढी व परंपरांना चिटकून असतात. यालाच ऑगबर्न यांचा सांस्कृतीक पाश्चायनाचा सिद्धांत म्हणतात. या आधारावर 'माना' समाजातही हा संस्कृतीक पाश्चायनाचा नियम लागु होतो का? याचाही विचार संशोधिकेला प्रकर्षाने जाणवला.

भारतावर वारंवार परकीय आक्रमणे झालीत आणि भारतीय समाजाने प्रत्येक वेळी नवीन नवीन चालिरिती अवलंबिल्या. परंतु त्या सर्व बाहरुपाने होत्या की त्यामुळे अंतर्गत संरचनेतही कोणते बदल झालेत? इतरांचे अनुकरण करतांना आदिवासी माना समाजाने हा बदल कितपत स्विकारला? त्यामुळे त्यांच्यात कोणते बदल झालेत? संपूर्ण समाजांतील घटकांची विकासाची गती समान आहे का? नसली तर त्यांची कारणे कोणती? अंगावरचा पारंपारिक पेहराव बदलतांना त्यांचे आचार व विचारही आधुनिक बनलेत का? नसले तर त्याची कारणे कोणती? असा अर्धवट व दिखावू विकास हा त्यांच्या परंपरेला, त्यांच्या संस्कृतीला तारक आहे की मारक आहे? या आधुनिकीकरण्याच्या प्रक्रियेत आदिवासी माना समाज व त्यांची संस्कृती स्थिर आहे की भरकटत चालली आहे? सद्य:स्थितीत माना समाज विकास प्रक्रियेच्या कोणत्या टप्यावर आहे आणि शासनाने त्यांच्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या की ज्यामुळे आदिवासी म्हणवणारा माना समाज विकसित होऊन इतर वर्गाच्या खांद्याला खांदा लावून चालेल? समस्या आणि प्रश्नचिन्हावर उभा असलेला माना समाज आदिवासी का मानण्यात येतो? याला कोणते कारण आहे? याला संपूर्ण सखोल आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचे संशोधिकेने ठरविले व तसा प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. सदर संशोधनात वापरण्यात आलेल्या विविध शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या व त्यांचे विवरण संशोधिकेने पुढीलप्रमाणे केलेले आहे—

**भारतीय समाजः—**

र.ज.लोटे यांच्या मते, ''समाज म्हणजे समूहात राहणाऱ्या व्यक्तींच्या सामाजिक संबंधाची व्यवस्था होय.'' [९]

गुरुनाथ नाडगोंडे यांच्या मते, ''समाज एक प्रकारची व्यवस्था असते व समाजाचे भाग एकमेकांशी निगडीत व एकमेकांवर अवलंबून असतात. या व्यवस्थेमुळेच समाजात स्थैर्य व सुसंगती टिकून असते.'' [१०]

आदिवासी समाज प्रामुख्याने जंगलापहाडांत, दुर्गम खेडयांत, व ग्रामीण भागात वास्तव्याला आहे. शहरी भागात कामासाठी गेलेला अगदी थोडया प्रमाणात आदिवासी समाज दिसतो. डॉ.विरेन्द्रसिंह यांच्या मते, ''लारी नेल्सन म्हणतात ग्रामीण समाज मुख्यत: कृषी व्यवसायाशी जुळलेला आहे. कृषी एक पारीवारीक व्यवसाय आहे.''[११] त्यामुळे ग्रामीण भागात राहणारा आदिवासी प्रामुख्याने कृषी व्यवसायात गुंतलेला आढळतो.

भारतीय समाजात फार पूर्वी सिंधू संस्कृती होती. त्यावेळी भारतात जाती आणि धर्म यासारखी कोणतीही संस्था अस्तित्वात असल्याचे पुरावे आढळत नाहीत. त्यावेळच्या सापडलेल्या अवशेषांवरुन सिंधू संस्कृतीचे लोक निसर्गाचे पूजक होते आणि अत्यंत शांतपणे जीवन व्यतीत करत होते असेच लक्षात येते. डॉ.शैलजा देवगावकर यांच्या मते,''आदिवासी निसर्गपुजक आहेत.''[१२] त्यामुळे सिंधू संस्कृतीचे लोक आणि आदिवासींत साम्य आढळते. त्यावेळी सिंधू संस्कृतीत कोणतीही भेदभावाची संरचना भारतीय समाजात नसावी. म्हणूनच त्यांचे जीवन शांत होते असे वाटते. परंतु नंतर आर्य आले. त्यांनी भारतावर प्रभुत्व मिळवले. इथली संस्कृती हळूहळू बदलायला लागली. आर्यांनी वेद निर्माण केले. वेदांपासून वर्णांची निर्मिती झाली आणि वर्णानंतर जातींची निर्मीती झाली. त्यामुळे गावांची संरचना बदलली. उच्चवर्णीय व नीचवर्णीय असा वर्ग तयार झाला. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशी संरचना तयार झाली. परंतु पूर्वीपासूनच भारतात असलेली आदिम जमात मात्र या चारही वर्णांमध्ये मिसळली

नाही. त्यांनी त्यांची अस्मिता, त्यांची संस्कृती व परंपरा जोपासल्या. ते आर्यापासून दूर, त्याच्या वस्त्यांपासून दूर जंगला पहाडात दुर्गम भागात राहू लागले. उत्तर भारतात गंगा—यमुना नदयांच्या सुपिक प्रदेशात आर्यांच्या वसाहती वाढल्या. तेव्हा ही आदिवासी जमात पूर्वेकडील डोंगराळ भागात व दक्षिणेकडील जंगलांच्या आश्रयाने वास्तव्यास आली. काही आदिवासी खेडयांच्या आश्रयाने राहण्यास आले व ग्रामीण झाले. परंतु त्यांची गावेही दुर्गम जंगली भागातच आहेत. तर काही आदिवासी मात्र अजूनपर्यंत जंगलापहाडात भटके जीवन घालवतांना आढळतात. वर्ण व्यवस्थेच्या अलिप्त असलेला आदिवासी वर्ग वेगळा ओळखून का येतो? त्यांची राहणी वेगळी, परंपरा, रुढी, चालिरीती यांनी त्यांचे वेगळेपण ओळखले जाते. त्यांचे हे वेगळेपण अभ्यासले जाणे यात अभिप्रेत आहे. शहरी भागात कामासाठी गेलेला आदिवासी ही शहरी झगमगाटापासून वेगळाच ओळखायला येतो. त्याच्यातला लाजाळूपणा किंवा समूहात राहूनही अलिप्त परंपरा जोपासतांना तो आढळतो. भारतीय समाजाची खरीखुरी परंपरा व रुढी या अनुसूचित जमातीत आढळून येतात का? हयाचे अध्ययन करणे आवश्यक आहे. आदिवासींचे आधुनिक भारतीय समाजात स्थान याचेही अध्ययन करणे आवश्यक आहे.

खरे पाहता भारतीय समाज व्यवस्था अत्यंत गुंतागुंतीची व क्लिष्ट आहे. इथे अनेक धर्म, धर्मात अनेक जाती, पंथ अनेक जातीपंथात पुन्हाउपजाती व त्यांतही वेगवेगळे आर्थिक व वैचारिक गट शिवाय प्रत्येक गटांत देवांवरुन, कुळांवरुन, गोत्रांवरुन, आणखी उपगट त्यामुळे भारतीय समाजरचना अनेक सूक्ष्म गटांत विभागली गेलेली आहे. आदिवासी जमातीतही उपजमाती आणि उपजमाती गटांत देवकांवरुन पुन्हा वेगवेगळया गटांत विभागणी झालेली आढळते. त्यामुळे आदिवासी जमातीचे अध्ययन करतांना वेगवेगळया उपगटांनाही सूक्ष्मणे तपासणे — अभ्यासणे आवश्यक ठरते.

**आधुनिकीकरणः—**

''कार्ल मार्क्स यांच्या मते, आधुनिकता म्हणजे वस्तूकरण होय. मॅक्स वेबर यांच्या मते, आधुनिकता म्हणजे बुध्दिप्रामान्यवाद किंवा तार्किकता होय. एमिल दयुरखेम यांच्या मते, आधुनिकता म्हणजे विभेदीकरण किंवा स्तरीकरण होय. गार्ग सिमेल यांच्या मते, आधुनिकता म्हणजे शहरी जीवन व पैसा अर्थव्यवस्था होय''.[१३)]

पाश्चात्तीकरण या संकल्पनेच्या मानाने आधुनिकीकरणासाठी संकल्पना व्यापक आहे. वरील व्याख्या पाहता आधुनिकीकरणात समाजातील भौतिक आणि अभौतिक संस्कृतीचा विकास आणि परिवर्तन, बदल अपेक्षित आहे. आधुनिकीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर अपेक्षित बदल झाल्यास या स्थितीला आधुनिकता असे म्हणता येईल. त्यामुळे आधुनिकीकरणाला पाश्चात्तीकरण व जागतीकीकरणाचा विस्तारलेली विकसित संज्ञा म्हणता येईल. आधुनिकतेतून आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेची, गतीची व स्थितीची संकल्पना स्पष्ट होते.

आधुनिकीकरणातून निर्माण झालेल्या आधुनिकतेची विविध वैशिष्टये आहेत. डॉ.दु.का.संत यांच्या मते, ''आधुनिक युग हे संशोधनाचे युग आहे.''[१४)]

आधुनिकीकरणाने औद्योगिकरणाला चालना मिळाली आहे. किंवा औदयोगिकरणामुळेच आधुनिकीकरणाला चालना मिळाली. दोन्ही क्रिया एकमेकांवर अवलंबून किंवा परस्परावलंबी आहेत. श्रीमती सुशीला ओडवायर यांच्या मते, ''औद्योगिकरणामुळे आर्थिक समस्या, कौटुंबिक विघटन, गलिच्छ वस्त्या, निवासाचे प्रश्न, रहदारी यासारख्या नागरी समस्या निर्माण झाल्यामुळे भारतीय समाज जीवनात विसंगती व तणाव निर्माण झाले आहेत.''[१५)] याचाच अर्थ औद्योगिकरणाच्या म्हणजेच आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने अनेक समस्यांनाही जन्म दिला आहे.

आदिवासी समाजातील भौतिक परिवर्तन ही आधुनिकीकरणाची देन असली तरी त्यांच्या अभौतिक संस्कृतीत गोंधळ निर्माण झाल्याचे दिसते.

**परिवर्तनः—**

परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. जुन्याची कात टाकून नवीन धारण करतांना कोणत्याही वस्तूमध्ये काही बदल होत असतात. हे बदल कमी प्रमाणात किंवा जास्त प्रमाणात होत असतात. काही बदल त्वरीत होतांना दिसतात. तर काही बदल आढळून यायला बराच कालावधी जायला लागतो. म्हणजे या बदलांची गती वेगवेगळी असते व त्यानुसार त्या वस्तुमध्ये कालांतराने परिवर्तन झालेले दिसते.

मानव हा सामाजिक प्राणी असल्याकारणाने व तोही निसर्गाचा एक भाग असल्यामुळे निसर्गाचे नियम मानवाला लागू पडतात. त्याचप्रमाणे मानवाच्या शारीरिक मानसिक बदलांसोबत किंवा त्या बदलांमुळे मानवाचा आचार, विचार व त्याच्या सामाजिक संस्थांमध्ये सुध्दा बदल होतांना आढळतात. यालाच आपण परिवर्तन असे म्हणतो. हे परिवर्तन उर्ध्वगामी दिशेने होतांना दिसते. परंतु ते प्रत्येक वेळी तसे असेलच असे नाही. आधुनिकीकरणामुळे व पाश्चात्तीकरणामुळे भारतीय समजांमध्ये सुध्दा विविध स्तरांवरुन परिवर्तन होतांना आपल्याला दिसते. परंतु भारतीय संस्कृती व पाश्चात्य संस्कृतीत मोठा फरक असल्यामुळे होणारे परिवर्तन हे भारतीय समाजाला पोषक आहे की विकृती निर्माण करणारे आहे यासाठी वेगळे संशोधन करण्याची गरज आहे. परंतु सध्याच्या परिस्थीतीत मात्र परिवर्तन भारतीय समाजाच्या सर्व स्तरांतून होतांना दिसते. त्याची सुरुवात भौतिक वस्तूंपासून झालेली आपल्याला आढळते. मानवाने आपल्या सुखसोयीसाठी व विविध गरजा भागविण्यासाठी आपल्या मेंदूचा पुरेपूर उपयोग करुन भौतिक क्षत्रांत मोठी क्रांती व प्रगती घडवून आणली. त्यामुळे मानसिक बदल घडायला लागले. विचारांत कुठे प्रगल्भता तर कुठे विकृती जन्माला यायला लागली. त्याचे परिणाम माणसाच्या आचारात दिसायला लागले. सध्या ज्याला प्रगत समाज आपण म्हणतो त्यात या दोन्ही प्रकारचे परिवर्तन आपल्याला दिसते.

सदर संशोधन माना आदिवासी संबंधाने असल्याकारणाने माना आदिवासींबाबत भौतिक, मानसिक व शारीरिक बाबतीत जे परिवर्तन दिसून येत आहे.

त्याची मिमांशा करणे गरजेचे ठरते. काही ठिकाणी आदिवासीत परिवर्तन दिसते तर काही ठिकाणी अजिबात स्थिती बदलली नसल्याचे जाणवते. याचे कारण म्हणजे संपूर्ण भारतीय प्रथा व परंपरांचा भारतीय माणसाच्या मनावर असलेला वर्षानुवर्षाचा पगडा होय. ज्यामुळे भौतिक परिवर्तन आणि आचार–विचारांतले परिवर्तन यात ताळमेळ साधतांना दिसत नाही. ज्या धार्मिक क्रिया आदिवासी माना समाज करतो त्या क्रिया समोरच्या व्यक्तीला सांगतांना तो संकोचतांना दिसतो. ज्या प्रथांना तो पार पाडतो त्यांना स्विकृती देतांना घाबरतो. किंवा त्याला ते आधुनिक विचारांच्या विरुध्द वाटते. त्यामुळे परिवर्तनाची गती आचार व विचारांत समानता नसल्याचे जाणवते.

भारतीय परिवर्तनाच्या संदर्भात प्रा.माणिक माने म्हणतात, ''आदिवासींचा विकासासाठी आदिवासी विकास महामंडळ, रस्ते बांधणी, उदयोगधंदयांना प्रोत्साहन, वाहतुकीच्या व दळणवळणाच्या साधनांचा प्रसार, जंगलतोड, आदिवासींना संरक्षण देण्यासाठी केलेले विविध कायदे इ. कारणांमुळे आदिवासी समाजामध्ये हे परिवर्तन होत आहे.''[१६)]

परिवर्तनाच्या संदर्भात डॉ.बी.एच. मेहता यांचे म्हणणे महत्वपूर्ण आहे. ते म्हणतात,''आदिवासी किंवा मूळनिवासी अतिशय दुर्गम भागात शांतपणे त्यांचे जीवन जगत होते. परंतु सैनिकांना त्यांच्या ठिकाणांचा शोध लागल्याने त्यांच्या दुर्गम भागात संपर्काची साधने पाहोचू शकली. राजांना त्यांच्या भागांत विविध बदल घडवून आणल्याने त्यांच्या भौतिक क्षेत्राच्या विकासाला शहर व ग्रामीण भागाइतकेच महत्व प्राप्त झाले आणि एकसमूदायरुपाने राहणारे आदिवासी वेगवेगळया गटांत विभागल्या गेले.''[१७)]

आदिवासी समाजात जरी परिवर्तन होतांना दिसले तरी प्रगत समाजाच्या मानाने ते अत्यल्प प्रमाणातच आढळत असल्याचे बऱ्याच संशोधकांचे मत आहे. याचे कारण आदिवासी ज्या भागात राहतात तो वास्तव्याला भूभाग सर्वसाधारणपणे दुर्गम आहे. काही विचारवंत तर आदिवासींचा विकास व्हावा असे बोलतात परंतु त्यांच्यातील परिवर्तनाला विरोध करतांना आढळतात. आदिवासी संस्कृतीत परिवर्तन न होता विकास

साधला गेला पाहिजे असे त्यांचे मत आहे. परंतु संस्कृती ही आचारांसोबतच विचारांची क्रिया असते. त्यामुळे कुचकामी किंवा अनावश्यक असलेल्या रुढी परंपरांमध्ये परिवर्तन होणे अतिशय गरजेचे आहे असे संशोधिकेला वाटते.

## आदिवासींचे वास्तव्यः—

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५० मध्ये भारतातील आदिवासींची स्वतंत्र ओळख करण्यात येऊन त्यांचा 'अनुसूचीत जमातीं'च्या यादीत समावेश करण्यात आला. त्यावेळी २१२ जनजातीय समुदायांची ओळख झाली. सध्या भारतीय राज्यघटनेनुसार ५५० आदिवासी समुहांचा अनुसूचित जमातींच्या यादीत समावेश आहे.'' [१८)]

डॉ.बी.एम.गुहा यांनी शारीरिक गुणधर्म या आधारावर भारतीय आदिवासींचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केलेले आहे. १) उत्तर व ईशान्य क्षेत्रात राहणारे आदिवासी २) मध्यक्षेत्रात राहणारे आदिवासी ३) दक्षिण क्षेत्रात राहणारे आदिवासी.'' [१९)]

''महाराष्ट्रात राहणारे आदिवासी मध्यक्षेत्रात राहणाऱ्या आदिवासींच्या गटात मोडतात. या क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासींच्या शारीरिक गुणधर्मावरुन त्यांना प्रोटो ऑस्ट्रेलाईड वंशाचे लोक म्हणतात. या लोकांचा रंग काळा, डोके लांब व केस कुरळे असतात. भुज, मुंडा, चुराव, हो, भुईया, गोंड, बैगा, कोडा, चेंचू, कोरवा, भिल्ल हे आदिवासी लोक या मध्यक्षेत्रात राहणारे आहेत.' [२०)]

हे सर्व गुणधर्म सर्वसाधारणपणे आढळणारे 'माना' जमातींचे लोकही मध्यक्षेत्रातच आढळतात. परंतु त्यांना अनुसूचित जमातीचा दर्जा ८मार्च२००६ ला प्राप्त झाला. त्यामुळे श्री.गुहा यांच्या लिखाणात (किंवा बऱ्याच आदिवासींचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांच्या ग्रंथात) माना जमातीचा उल्लेख मिळत नाही. किंवा असला तरी तो गोंडांची उपजमात किंवा नामसदृश्य जमातीत आढळतो. माना जमात ही सर्वसाधारणपणे चंद्रपुर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ व नागपुर जिल्हयांत विखुरलेली आढळते.

"According to 2001 census the population of S.T.in the country was 8.43 crore i.e. 8.2% of the total population and in Maharashtra total population was 9,68,78,627 and population of S.T.was 85,772,76 i.e.8.9%" [21)]

''महाराष्ट्रात आदिवासींची संख्या ८.९% आहे. २००४ च्या लोकसभेसाठीच्या निवडणुकीत अनुसूचित जमातींची राखीव संख्या ४१ होती. एकूण ४२३''.[२२]

प्रा.वक्काणीजींच्या मते, ''चंद्रपुर जिलेमें' सन १९३४ इ.मे एक लाख चौदहहजार नौ सौ उन्तालीस वनवासी लोग थे। तेलंगणासे लगे हुये चंद्रपूर जिले के कुछ प्रदेश में तेलगू संस्कृती की छाप है। गोण्डवाना तथा आदिवासी संस्कृती की विशेषताएँ चंद्रपूर, नागपूर तथा भण्डारा जिले में दृष्टीगोचर होती है।''[२३]

यावरुन चंद्रपूर जिल्हयात व गडचिरोली जिल्हयात आदिवासी समूह मोठया प्रमाणात वास्तव्यास होता. व आहे हेच लक्षात येते. याची कारणे ही थोडक्यात पुढीलप्रमाणे विषद करता येतील. श्री वक्काणीजी (१९९५) यांच्या मते, ''विदर्भ में अठ्ठासी लाख एकड भुमी में जंगल है। अधिकतर जंगल चंद्रपूर, नागपूर, भंडारा, अमरावती और यवतमाल जिले में व्याप्त है।''[२४]

याचाच अर्थ वनवासीसाठी म्हणजेच आदिवासींना राहण्यासाठी नैसर्गिक वातावरण चंद्रपूर जिल्हयात आहे असे आपल्या लक्षात येते. जेथे अजूनर्यत विकास पोहोचायचा आहे अशा भागात आदिवासींची संख्या अधिक आहे. याचाच अर्थ असा का? की आदिवासी आहेत तेथे विकास नाही किंवा विकास आहे तेथे आदिवासी नाही? असे का?

लोकमत वातरिंगचे संपादक गजानन जानभोर यांच्या मते, ''चंद्रपुर जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्र ११,४४३ वर्ग किमी. आहे आणि एकूण लोकसंख्येशी अनुसूचीत जमातींची लोकसंख्या टक्केवारी १९.७०टक्के आहे. (जनगणना

२००१नुसार) त्यातही जिल्हयात शहरी भागात ४६,१२४ व ग्रामीण भागात ३,०३,१२४ एकूण अनुसूचित जमतीची लोकसंख्या आढळते. यावरुन चंद्रपूर जिल्हयात ग्रामीण भागात आदिवासी समाज मोठया संख्येने असल्याचे आढळते. एवढेच नव्हे तर त्यांच्यातील नैसर्गिक प्रवृत्ती त्यांना शहराकडे जाण्यापासून रोखते किंवा विकास त्यांच्यापर्यंत कितपत पोहोचला याचे चित्र स्पष्ट होण्यासाठी मदत होते.

**अनुसूचित जमातः—**

गोकुळदास मेश्राम यांच्या मते, 'भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३६६ चे खंड २४ व २५ मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या व्याख्या दिलेल्या आहेत. १९(२) अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) या संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुच्छेद ३४२ अन्वये ज्यांना अनुसूचित जमाती म्हणुन मानण्यात आले आहे अशा जमाती किंवा जमातीचे समूह अथवा अशा जमातीचे किंवा जमातीच्या समूहाचे भाग अथवा अशा जमातींमधील किंवा जमातींच्या समुहातील गट असा आहे. (अनुच्छेद ३६६ खंड २५) भारतीय घटनेमध्ये (Scheduled Tribes) ही संज्ञा ज्यांच्यासाठी वापरली आहे त्याचे स्पष्टीकरण देतांना ''डॉ.बी.आर.आंबेडकर म्हणतात,

"The word Adivasi is really a general term, which has no specific legal demure connotation where as the word 'Scheduled Tribes' has a fixed meaning because it enumerates the tribes. In the event of the matter being taken to a court of law there should be a pracise definition as to who these adivasis are. It was therefore decided to enumerate the Adivasis under the term to be called Schuduled Tribes". [25]

थोडक्यात सांगायचे म्हणजे अनुसूचित जमाती म्हणजे सुरुवातीपासून भारतात वास्तव्यास असल्याचे आढळून आलेल्यांची जमातींची यादी. या जमातींमध्ये राहणीमान, खानपान, संस्कृती, परंपरा, रुढी, आणि अंधश्रध्दा याबाबतीत बऱ्याच प्रमाणात साम्य आढळते असे निदर्शनास येते. जातीपेक्षा जमाती गटांची लोकसंख्या

त्याचप्रमाणात बरीच कमी आहे. आणि म्हणूनच इतिहासात त्यांच्यावर वेगवेगळया प्रकारचे अन्याय झाल्याचे निदर्शनास येते.

**अनुसूचित जमात आणि जमाती समूच्चयः—**

‘‘मराठी विश्वकोषानुसार आदिवासी म्हणजे आधीपासुन किंवा पुर्वीपासुन राहणारे लोक होत. नागर संस्कृतीपासुन दूर व अलिप्त राहीलेले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी. (Aboriginal Primitive)”[२६)]

जमातीमध्ये जमाती समुच्चय असतात. जमाती हया एकाच प्रदेशात राहणाऱ्या समान बोली बोलणाऱ्या रक्त संबंधित लोकांचा गट असतो. त्यांच्यात एकी असते. त्यामुळे वेगवेगळया जमाती गटात उपजमातीत विभाजन झालेले असते. जमातींमध्ये वेगवेगळे समूच्चय असतात.

माना जमातींच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासात महादेव जांभुळे यांच्या मते, ‘‘माना जमातीत ७८ कुळे असून त्याचे विभाजन कुळांच्या जोडया व देवतांच्या संख्येनुसार झालेले आहे. प्रत्येक कुळाचे व जोडीचे कुलदैवत वेगवेगळे आहेत. देवांच्या संख्येवरुन चारदेवे, पाचदेवे, सहादेवे, सातदेवे, नउदेवे इत्यादी माना जमातीचे विभाजन उपगटात झालेले आहे. त्यांना माना जमातीचे देवके म्हणतात.’’[२७)]

स्वातंत्रपूर्व काळात माना जमातीचे राज्य अस्तित्वात असतांना राज्यकारभाराच्या दृष्टिने चार पदव्या सरदार व सुभेदारांना दिल्या होत्या. १) बडवाईक, २) मोकासी, ३) भोयर, ४) दिवाण, यावरुनही मानांचे वेगवेगळे उपजमाती गट पडलेले दिसतात.

शैलजा देवगावकरांच्या मते, ‘‘मानांच्या दोन पोटजाती आहेत. १) बडवाईक माना व २) खादमाना. तिसरा एक भाग कुणबी लोकांना मिसळून गेला. तोच कुणबी माना असावा.’’[२८)]

यावरुन माना जमातीचे जमाती समुच्चायात विभाजन झालेले आणि त्यांचे पुन्हा सूक्ष्म गट पडलेले आढळतात. त्यामुळे एखाद्या जमातीचे अध्ययन करतांना त्याच्या सूक्ष्म गटांचेही अध्ययन करणे आवश्यक ठरते.

**संरचनाः—**

रा.ज.लोटे यांच्या मते, ''सामाजिक संरचना ही एक अमूर्त (Abstract) संकल्पना आहे. व्यक्ती व्यक्तींमधील संबंधाच्या स्थिर प्रतिमानाला (Pattern) उद्देशूनच सामाजिक संरचना ही संकल्पना उपयोगात आणली जाते. समाजशास्त्रात सामाजिक संरचनेची संकल्पना ही प्रामुख्याने स्थायी व संघटीत असणाऱ्या गटांच्या संदर्भातच वापरली जाते. उदा. कुटुंब, जात, खेडे, शहर, राज्य या प्रत्येक संघटीत गटाची वेगळी अशी संरचना असते.'' [२९]

रामबिहारी सिंह तोमर यांच्या मते, ''सामाजिक संरचना मानव व्यवहाराच्या ते प्रतिमान आहेत जे सापेक्ष दृष्टिने स्थायी होउन जातात आणि जे एकदुसऱ्यांशी मिळून संस्थेचे रुप धारण करतात. सामाजिक संरचना कार्याचे प्रतिमान आणि संस्थांवर आधारीत असतात.''[३०]

डॉ.भोईटे व डॉ.बोबडे यांच्या मते, ''संस्थांतर्गत सामाजिक संबंधाचे स्वरुप निश्चित व दिर्घकाळ टिकणारे असे असले तरी ते अपरिवर्तनीय असे नसते. हया संबंधाचे स्वरुप कालांतराने बदलत जाते व त्याचबरोबर सामाजिक संस्थेची संरचनाही सामाजिक संस्थेमध्ये होणारा बदल हा जसा तिच्या संरचनेत होतो तसा तो तिच्या प्रकार्यामध्येही होतो. काही कारणांमुळे संस्थेच्या संरचनेत जर परिवर्तन झालेत तर त्याचा परिणाम त्या संस्थेच्या प्रकार्यामध्ये प्रकार वा स्वरुप बदलण्यात होतो. त्याचप्रमाणे संस्थेच्या प्रकार्यामध्ये काही बदल झाला तर त्याचा परिणाम त्या संस्थेच्या संरचनेवरही होतो.''[३१]

माना समाजामध्ये पूर्वीपासून कुटुंब पध्दती अस्तित्वात असल्याची दिसते. त्यात संयुक्त कुटुंबपध्दती ज्यात पती, पत्नी, मुले व इतर नातेवाईक राहतात तसेच

विभक्त कुटुंबपध्दती ज्यात पती, पत्नी व मुलेच फक्त राहतात यांचा समावेश होतो. बदलत्या काळानुसार व परिस्थितीनुसार इतर समाजांचा तुलनेत माना जमातीच्या कुटूंबसंस्थेत फारसा फरक पडल्याचे जाणवत नाही. अजुनही संयुक्त कुटुंबपध्दती अस्तित्वात असल्याचे जाणवते.

परंतु सध्या आधुनिकीकरणामुळे रोजगार मिळविण्यासाठी स्थलांतराचे प्रमाण वाढत असल्याने संयुक्त कुटुंबपध्दतीचे रुपांतर हळूहळू विभक्त कुटुंब पध्दतीत होत असल्याचे लक्षात येते.

**आदिवासींची ओळख:—**

डॉ.प्रदीप आगलावे यांच्या मते, ''भारतीय संविधानातील कलम ३४२ (१) अनुसार ज्यांचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादीत केला आहे त्यांना अनुसूचित जमाती असे म्हणतात''[३२]

'आदि' म्हणजे सर्वात पहिले आणि 'वासी' म्हणजे निवास करणारे. दुसरी एखादी व्यक्ती तिथे जाण्यापूर्वी त्याप्रदेशात सर्वात आधीपासून निवास करणारी जमात त्याला 'आदिवासी' ही संज्ञा प्राप्त आहे. 'आदिवासी' या संज्ञेचे कित्येकांनी वेगवेगळया अर्थाने व्याख्या केलेल्या आहेत. परंतु आदिवासींची खरी ओळख कशी पटवावी यासाठी प्रत्येकाने वेगवेगळा पण सर्व आदिवासींमध्ये आढळणारा समान निकष लावला आहे. डॉ.शैलजा देवगावकर यांच्या मते, ''आदिवासी म्हणजे लोकसमाजाचा प्राचीनतम भाग.''[३३] डॉ.गोविंद गारे व श्री.उत्तमराव सोनवाणे यांच्या मते, ''सतत प्रतिकुल परिस्थितीशी आदिवासींना झगडुन ठेवून निसर्गाने विरोधाभास साधला आहे. अज्ञान व दारिद्रय यांत खितपत पडलेल्या इथल्या मानवास निसर्गाने त्याच्या परिसरात भरपूर निसर्गसौदर्याचे वरदान दिले आहे.''[३४] पुढे ते वर्णन करतात,'आदिवासींचे जीवन हे अतिशय खडतर आहे. त्यामुळे ते निरस आणि बेचव झाले आहे. भयानक दारीद्रयाने त्यांच्या जीवनाला झगडयाचे स्वरुप आले आहे.''[३५]

डॉ.शैलजा देवगावकर यांच्या मते, ''भारतातल्या आदिवासी जमातीतील लोक ठेंगणे, काळे (निग्रोइतके नाही) नाक नकटे व रुंद अशा स्वरुपाचे सर्वसाधारणपणे आढळतात. त्यांच्या भुवयांची खालची हाडे पुष्कळदा बरीच वरती आलेली असतात. त्यामुळे डोळे खोल गेलेले वाटतात. अंगकाठी बारीक आढळते.''[३६]

चंद्रपूर जिल्हयातील माना जमातींची शारीरिक ठेवणही अशाच प्रकारची आढळते. गुरुनाथ नाडगोंडे यांच्या मते, ''काही भुमिपुत्रांनी सर्व लोकवस्तीपासुन दूर व दुर्गम असलेल्या डोंगरकपाऱ्यांत, नदयानाल्यांत, कडेकपाऱ्यांत, आपला तळ ठोकला. धरतीची लेकरे म्हणून ज्यांचा सर्वार्थाने उल्लेख करता येईल अशा आदिवासी समाजाची दुनियाही वेगळी आहे. डोंगरकपाऱ्यांत राहणाऱ्या आपल्याच रुढी व परंपरांना पालीसारखे चिटकून राहणाऱ्या फळाफुलांच्या व झाडापाल्यांच्या चवीने समाधान पावणाऱ्या आदिमांचे जीवन स्वच्छंदी पाखरा सारखे असते.''[३७]

डॉ.गोविंद गारे यांच्या मते, ''आदिवासी हे कोणत्याही एका विशिष्ट जाती जमातीचे नाव नव्हे. या जातीचा रंग आणि गंध ज्यांनी आपल्या अस्मीतेचा श्रृंगार मानला त्या सर्व मुळ टोळयांचे समूहनाम म्हणजे 'आदिवासी''.[३८]

डॉ.गोविंद गारे यांच्या मते, ''आदिवासी हा आद्य संस्कृतीचा द्योतक आहे. आद्य किंवा आधीचा रहिवासी असाही अर्थ त्यांत अभिप्रेत आहे.''[३९]

पुढे गोविंद गारे यांच्या मते, ''आदिवासी हे अशिक्षित, भोळया स्वभावाचे, प्रमाणिक व एका अर्थाने भित्रे असल्यामुळे त्यांच्या या गुणावगुणांचा फायदा बाहेरील लोकांनी वेळोवेळी उठविला आहे.''[४०]

आदिवासी म्हणजे कोण? आदिवासी नेमके कोणाला म्हणावे? यासाठी काही आदिवासींच्या व्याख्या पुढीलप्रमाणे – गोकुळदास मेश्राम यांच्या मते,

''१) 'संयुक्त राष्ट्रसंघाने केलेली व्याख्या – अ) जगातील कोणत्याही भागात दुसराच मानवसमूह एखादा प्रदेशात, विभागात किंवा प्रदेशात पोहोचला त्यापूर्वी वस्तीकरुन

असलेला मानवी समूह, ब) वर्चस्ववादी नसलेला समूह क) सजीव सृष्टिशी एकनिष्ठ झालेला सांस्कृतिक दुष्टया वेगळा समूह. ड) स्वत:ला आदिवासी म्हणून ओळखणाऱ्या मानवी समूहाचे वंशज छळ व दडपणाचे बळी ठरलेले लोक.''[४१)]

''गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्ट १९३५ च्या नुसार आदिवासींना 'मागासलेल्या जमाती' अशी वर्गवारी केली''.[४२)] महाराष्ट्रातील आदिवासी जमाती म्हणजे माडीया, गोंड, भिल्ल, कोरकू, कोलाम, माना, बुरुड, प्रधान, थोडी इ. आहेत.''[४३)]

डॉ.गोविंद गारे यांच्या मते, ''डी.एन.मुजुमदार यांनी आदिवासींची सर्व लक्षणे लक्षात घेवून त्यांची विस्तृत व्याख्या केली आहे. ते म्हणतात, 'समान नाव असणारा, एकाच प्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टिने एक पध्दतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटूंब समुहांचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय''.[४४]

डॉ.धुर्ये म्हणतात, 'The Computation of their number is made on the basis of a belief and a principle which must be explained. It is clear that even if a tribe has a Hindulized one, the whole tribe is included in the category of 'Forest' or 'Primitive' tribe however large the Hinduized section may be". [४५)]

आदिवासी स्त्रिया कपाळावर हातावर व अन्य अवयवांवर सांकेतिक चिन्ह, आकृत्या इ. गोंदण करतात.

सारांश आदिवासी व्यक्ती त्यांच्या वागण्यावरुन, त्यांच्या दिसण्यावरुन, त्यांचा पोषाख, त्यांची बोलीभाषा, त्यांची आभुषणे या सर्व गोष्टींवरुन अगदी वैशिष्टयपूर्ण वेगळेपण दर्शवून देतो. त्यामुळे त्यांची ओळख इतरांहून भिन्न असते. त्यांचा लाजरेबुजरेपणा व साधेपणा त्यांच्या अलिप्ततावादाची साक्ष पटवून देतात.

**आदिवासींची वैशिष्टये:—**

डॉ.जी.एस.धुर्ये यांच्या मते, "Many of the so-called aboriginal people have been pronounced by almost all those who came into close contact with them as rather simple, truthful, honest, uaually jovial and happy go lucky". [४६)]

प्रा.वक्काणीजी यांच्या मते, ''गोंडवांना तथा आदिवासी संस्कृती की विशेषताएँ चंदपूर तथा नागपूर, भण्डारा जिले में दृष्टीगोचर होती है।''[४७)] याचाच अर्थ असा की, चंद्रपूर, नागपूर, भंडारा जिल्हयात अधिक प्रमाणात आदिवासी निवास करतात व त्यांची त्यांनी मूळ संस्कृती किंवा वैशिष्टे अजूनही टिकवून ठेललेली आहेत असे लक्षात येते.

आदिवासींची ठळक वैशिष्टये सांगतांना डॉ.पिंगळे यांच्या मते, ''१) तात्पुरती भूक भागविण्यासाठी त्यांचा सर्व वेळ जातो. २) सामुदायिक जीवन जगणे. ३) त्यांच्यावर धर्माची पकड आहे. ४) एक नैसर्गिक अलौकिक शक्ती सर्व विश्वाच्या घडामोडींमागे असते ही संकल्पना त्यांच्यात दृढ आहे. ५) विश्वव्यापक धर्माची कल्पना त्यांच्यात वसते. ६) पशुपक्षी, वृक्षवनस्पती, नद्यानाले, समुद्रपर्वत आदी सर्वाठायी जीवात्मा असतो. सर्वाच्या संतोषार्थ विधी करावे लागतात. त्यांची अशी श्रध्दा आहे. ७) शरीरातील जीवात्मा संतुष्ट ठेवल्याने तो मुक्त होवू शकतो. ८) दैवाची व दैवतांची पूजा आदी करुन त्यांना संतुष्ट केल्यास संकटे टळतात. ९) वैद्यक, जादू, परंपरा, कायदा, न्यायनिवाडा यांचे पालन म्हणजे धर्मपालन करणे होय. १०) भगत (पुजारी) वृध्द ज्ञानी आदी लोकांच्या शब्दांना प्रमाण मानण्याची प्रथा आहे. ११) जादूविद्या शरीरावर, मनावर ताबा मिळविण्यासाठी उपयोगी पडते. तसेच निसर्गावर शक्तीवरही जादुविद्या मात करुन शकते अशी त्यांच्यात धारणा आहे. १२) त्यांच्या साहित्यात निसर्गाच्या घडामोडींचे निरीक्षण झालेले दिसते. १३) काव्यात अथवा गाण्याच्या रुपात तसेच कथा रुपात त्यांचे साहित्य असते. ते सुध्दा अलंकारीक असते.''[४८)]

डॉ.गोविंद गारे व उत्तमराव सोणवाणे यांच्या मते,''आदिवासी सृजनशील आहेत.''४९) पुढे ते वैशिष्टये सांगतात, ''आदिवासींच्या गरजा मर्यादीत असतात.''५०)

गुरुनाथ नागगोंडे यांच्या मते, 'विशिष्ट भूप्रदेश, प्रमाण लघुता, एकाच रक्तसंबंधावर आधारीत स्वत:ची बोलीभाषा पण लिपीचा अभाव, वेगळी जीवनपध्दती, साधी अर्थव्यवस्था, सिमीत तंत्रविद्या, समान धर्म, सामाजिक एकजीनसीपणा इत्यादी वैशिष्टयांनीच आदिम समाजाचे वेगळेपण नजरेत भरते.''५१)

प्रसिध्द इतिहास तज्ञ अ.ज. राजूरकर यांच्या मते, 'आदिवासी ही काही अखंड जमात नव्हे. त्यांच्यात सुमारे दोनशे जाती आहेत. सर्वच आदिवासी वन्य धर्मीय असले तरी त्यांच्यात भाषा, पोशाख, चालीरीती, देवधर्म यात बराच फरक आहे''.५२)

श्री.सी.जी.देवगावकर यांच्या मते, "Foraspen, Baladev or Lord Shiva and Kali the Godess are their chief deities. Antropblogists like Prof. C. Von Furen Hairmen drof have opined that Lord Shiva who is common among the Gond and many other tribals are as well as among the Hindus is an example of the beneficial exchange that might have taken place between the two. It can also said that Lord shiva who is considered the Lord of Nature was naturally common among the nature whorshipers which the Aryans have the Hindus were long back.

Handicrafts and Arts – "Their deities for worship are mostly made of wood from the branches of trees or the trunks. One important religious objects in their marriage ceremonys is a pillar curved out of a log of wood. Their may be of vairing size. The longest may be even tenfeet or move. Such pillars are most artificially curved and one finds bells, prism like hangings, cylindrical objects surrounded by chains made of wooden rings and all this is curved from a piece. These being no joint at any place". ५३)

वरील सर्व वैशिष्टयांवरुन असे स्पष्ट होते की, आदिवासी समाज इतर कोणत्याही समाजापेक्षा वेगळा आहे. बहुसंख्य आदिवासी दुर्गम व डोंगराळ भागात राहतात. आपल्याच रुढी व परंपरांना पालीसारखे चिटकून बसतात व फळाफुलांच्या, झाडपाल्यांच्या चवीनेच समाधान मानतात. त्यांची कुणाविषयी तक्रार नसते. निसर्गाच्या सतत सहवासाने स्वच्छंदी जीवन जगणारे आदिवासी रितीरीवाजांच्या जोखंडांनी बांधलेले असतात. त्यांच्या पारंपारिक जीवनाचे सातत्य शतकानुशतके अखंडपणे सुरु आहे. खायला नाही, प्यायला नाही तरीही उल्हासित व आनंदीत असलेले, गाणी व नृत्य यांनी नटलेले आदिवासींचे जीवन गौण किंवा असंस्कृत आहे असे कुणीच म्हणणार नाही.

सारांश असा की, आदिवासी समाजाची वैशिष्टये प्रगत समाजापेक्षा वेगळी आहेत. आदिवासी डोंगराळ भागात राहीला किंवा खेडेगावात राहीला तरी त्यांची जीवनपध्दती व स्वभावधर्म मात्र समान आहेत. त्यामुळेच 'माना' आदिवासी दुर्गम खेडयांत राहतो. तरी तो अलिप्तपणे जगतांना आढळतो.

## आदिवासी समाजाच्या अध्ययनाची पार्श्वभूमीः—

डॉ.गोविंद गारे यांच्या मते, ''आदिवासी किंवा आदिम समाज म्हणून ओळखला जाणाऱ्या समाजाला विचारवंत, अभ्यासक, प्रशासक व सामाजिक कार्यकर्ते यांनी विविध नावे दिलेली आहेत. रिसले, लॅस्सी, एल्विन, ग्रिगसन, शूबर्न, टॅलेंट, सेडविक, मार्टिन, ए.व्ही.ठक्कर यांनी या लोकांना 'अगदी प्राचीन (Aboriginal)' अगदी मुळचे रहिवासी, '(Aborigines)' म्हटले आहे. आदिम अगर आदिवासी (Primitive tribes) असे नामाभिधान हटनने केले आहे. डॉ.धुर्ये यांनी त्यांना तथाकथित मूळचे रहिवासी 'So-called aborigines' व मागासलेले हिंदू 'Backward Hindus' असे म्हटले आहे. पण भारतीय राज्यघटनेत केलेला 'अनुसूचित जमात' (Scheduled tribes) हा उल्लेख डॉ.धुर्ये यांना मान्य आहे.'' [५४)] गुरुनाथ नाडगोंडे यांच्या मते, ''आदिम समाजाच्या अध्ययनाची सुरुवात खऱ्या अर्थाने १८ व्या शतकात झाली. इव्हान्स प्रीचर्ड यांच्या मते, सामाजिक मानवशास्त्राचे अध्ययन ही प्रबोधन

काळाचीच निष्पत्ती आहे. याच प्रबोधन काळातील ठळक वैशिष्टयांची छाप आजपर्यंतच्या सामाजिक मानवशास्त्राच्या इतिहासावर पडल्याचे दिसून येते''[५५]

नाडगोंडे यांच्या मते, ''ग्रीक इतिहासकार, तत्वज्ञ व निसर्गवादी तत्ववेत्ते इत्यादींच्या लिखाणातून मानवविषयक तत्कालीन माहिती उपलब्ध आहे. इ.स.पूर्व ७०० ते ६०० या काळातील प्रवाशांनी लिहून ठेवलेल्या माहितीवरुन हिरोडाटस (इ.स.पूर्व४८४ ते ४२५) या ग्रीक लेखकाने मानवाविषयीची विस्तृत माहिती संकलीत केलेली आहे. तत्कालीन ज्ञान जगामध्ये प्रचलित असणाऱ्या श्रध्दा व विश्वास यातील विविधतेची नोंद हिरोडोटस याच लेखकाने प्रथम केली आहे. त्याने या काळात विविध केलेल्या नोंदी व विधाने यांची शहानिशा आधुनिक संशोधनाने केलेली आहे. हिपोक्रेटस (इ.स.पुर्व ४६० ते ३७७) या समकालीन ग्रीक तत्त्ववेत्याने भौतिक पर्यावरण व मानवी समाज यांतील घनिष्ठ संबंध स्पष्ट केला आहे. त्याचबरोबर प्लेटो, ॲरीस्टॉटल या गुरुशिष्यांनी राज्यसंस्था व मानवी प्रगती याविषयी आपली मते स्पष्ट मांडलेली आहेत. कायदा व शासन व्यवस्था यांच्या अभावी मानव हा अधिक धोकादायक आहे. या सिध्दांतावर ॲरिस्टॉटलने व्यक्तीच्या वर्तनाला वळण देण्याचे कार्य शासनसंस्था करते असे प्रतिपादन केले.''[५६] फ्रान्समधील मॉटेक्यु या तत्ववेत्याने मानवी समाजाचा सर्वार्थाने अभ्यास केलेला दिसून येतो. मानवी समाज, पर्यावरण व शासनसंस्थेतील सत्तेचे विभाजन या संबंधी मॉटेस्क्यूचे विचार सर्वश्रुत आहेत पण समाजाला रचना व मूल्ये असतात. हा त्यांनी मांडलेला विचार अतिमहत्वाचा होता. सेंट सायमन यांनी समाजविषयक विज्ञानाची मुहुर्तमेढ रोवून मॉटेस्क्यु यांच्याही पुढे एक पाउल टाकले. ऑगस्ट कॉम्ट हे तर सेंट सायमनचे शिष्य. पध्दतशीर विचारधारा हे त्यांचे प्रमुख वैशिष्टये होते. त्यांनीच समाजविषयीच्या विज्ञानाला, 'समाजशास्त्र' हे नामाभिधान केले. डेव्हिड हयुम व ॲडम स्मिथ हे इंग्लंडमधील लेखक अधिक गाजले. समाज ही एक स्वाभाविक व्यवस्था असून त्याची उत्पत्ती मानवी प्रकृतीत दिसून येते. पण सामाजिक करारात नाही असे त्यांनी स्पष्ट केले. या लेखकांनी सात समाजाचा तुलनात्मक पध्दतीने अभ्यास करुन एक वैशिष्टयपूर्ण सिध्दांत असा मांडला की, 'कोणत्याही स्थळातील व कालातील

मानव हा प्रगतीशील आहे. श्री इव्हान्स प्रीचर्ड यांच्या मते, 'सामाजिक मानवशास्त्रीय लिखाणाचा पाया १९ व्या शतकातील विचारवंतांनी घातला. इंग्लंडमधील मॅक्लेनन व टायलर व अमेरिकेतील मॉर्गन यांनी आदिम समाजाचे विश्लेषण करण्याचा योग्य प्रयत्न याच शतकात केला. सर एडवर्ड टायलर यांनी सामाजिक संस्थांच्या प्रगतीची चिकीत्सा विकासवादी तत्वानुसार प्रथमच केली. सर्वात्मवाद (Animism) बहुदेववाद (Polytheism) व एकेदेववाद (Monotheism) या धार्मिक विचाराच्या अवस्था आहेत असे त्यांनी सांगितले. सर जेम्स फ्रेझर यांनी आपल्या 'सोनेरी फांदी'(Golden Bough) या प्रसिध्द ग्रंथात जादूटोणा (Magic) धर्म (Religion) व विज्ञान (Science) या तीन अवस्थांतून मानवाचा विकास झाला. हे दाखवून दिले. लुईस मार्गन यांनी विवाह संस्था व कुटुंबसंस्था यांच्या प्रगतीतील टप्पे विशद केले. मॅक्लेनॉन यांनी इ.स. १८६५ साली 'आदिम विवाह' हा ग्रंथ प्रसिध्द केला. त्यात वधू पळवून नेवून विवाह करण्याचा उल्लेख केलेला आहे. स्विस संशोधक वाथ्वहोफेन यांनी इ.स.१८६१ साली मातृसत्ताक कुटुंब पध्दतीनंतरच पितृसत्ताक कुटुंबपध्दती उदयाला आली हे स्पष्ट केले. सर हेन्री मेन यांनी आपल्या 'प्राचीन कायदा' (Ancient Law) या ग्रंथात समूहाच्या स्वरुपाविषयी विवेचन करतांना प्राचीन समूहांचे स्वरुप रक्तसंबंधावर व आधुनिक समूहाचे स्वरुप प्रादेशिक संबंधावर आधारलेले आहे असे प्रतिपादन केले.''[५७]

सारांश, समाजशास्त्रांच्या अभ्यासकांची परंपरा फार मोठी आहे व तसेच ती जुनी आहे. मानवाचा अभ्यास करतांना आदिमांचा अभ्यास करणे अत्यावश्यक ठरते कारण मानवाच्या विकासाची प्रगतीची गोष्ट आदिमांपासूनच सुरु होते. प्रगतशील मानवाचे पूर्वज कसे राहत असतील याचे संपूर्ण चित्र आदिमांना पाहिल्यावर डोळयांपुढे उभे राहते. प्रगत मानवाची अप्रगत अवस्था म्हणजे आदिम समाज असेही म्हणण्यास हरकत नसावी. त्यामुळे आधुनिक युगात बऱ्याच अभ्यासकांनी आदिम समाजाचा म्हणजेच आदिवासी समाजाचा अभ्यास करण्याकडे आपला कल झुकविलेला दिसतो. आजच्या विज्ञान युगात ज्याप्रमाणे संगणकाचा अभ्यास करणे विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना आवश्यक वाटते, त्याच तळमळीने आदिवासी, अप्रगत समाजाचा अभ्यास करणे समाज

शास्त्राच्या अभ्यासकांना आवश्यक वाटते. म्हणून ही परंपरा अखंडपणे सुरुच आहे. नव्हे ती वाढतच आहे असे म्हणायला हरकत नाही.

**अध्ययनाचे महत्त्वः—**

गुरुनाथ नागगोंडे यांच्या मते, ''आदिम समाजाच्या अभ्यासाचे महत्त्व सामाजिक मानवशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनातून समजून घेणे तर अगत्याचे आहेच, पण त्याचबरोबर जीवनाच्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींना वाटत असलेल्या आदिमांच्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. प्रशासक, सामाजिक कार्यकर्ते, शेती अधिकारी, धर्मप्रचारक, खानमालक, मळेवाले, शैक्षणिक संस्था, आंतरराष्ट्रीय संघटना, इत्यादी विविध थरातील व्यक्ती व संस्था, आदिम जीवनाचे स्वरुप समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.''[५८)]

श्रीमती सुशिला ओडवायर यांच्या मते, 'देशातील आदिवासी समाज हे सामाजिक संशोधनाचे आज प्रमूख क्षेत्र बनले आहे. आदिवासींसाठी आखलेल्या योजना या नागरी संस्कृतीचा संदर्भ लक्षात घेवून आखल्या. यामुळे त्या अयशस्वी झाल्या.''[५९)]

डॉ.गोविंद गारे यांच्या मते, ''आदिवासींचा प्रश्न अलिप्तपणा आणि संपर्क या दोन्ही अवस्थांमध्ये या ना त्या रुपाने कायम राहतो त्याला कारण आदिवासींचा मागसलेपणा हा सर्वव्यापी आहे. म्हणजे प्रादेशिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक सामाजिक या चारही क्षेत्रांत आदिवासींचा मागासलेपणा सर्व क्षेत्रांतून हटविण्याचे प्रयत्न एकाचवेळी व्हावयास हवेत. या करीता बाहय जगाचा व त्यांच्या संस्कृतीचा संपर्क अपरिहार्यच नव्हे तर इष्टच मानला पाहिजे.''[६०)] या दृष्टिनेही आदिवासींचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन महत्त्वाचे ठरते.

डॉ.भा.कि.खडसे यांनी आदिवासी समाजाचे अध्ययन का करावे यांविषयी विस्तृत विवेचन प्रस्तुत केलेले आहे. त्यांच्या मते,

१) धर्मप्रसार, व्यापार आणि राज्यकारभार करण्याचे हेतूने आदिवासी समाजाच्या अभ्यासाची गरज प्रत्ययास आली.

२) विविध विषयांच्या शास्त्रीय अध्ययनासाठी आदिम समाजाचे अध्ययन करण्यात आले.

३) विकासवादी सिध्दांत स्पष्ट करण्यासाठी अभ्यासकांनी आदिवासी समाजाचा अभ्यास केलेला आढळतो.

४) स्थूल अभ्यासासाठी आदिम समाजाचा सूक्ष्म अभ्यास उपकारक ठरतो, म्हणून पध्दती शास्त्रीय दृष्टया आदिम समाजाच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित केले जाते.

५) सभ्य समाजाशी आदिवासी लोकांचा संपर्क स्थापित झाल्यापासून सात्मीकरणाची (Asimilation) प्रक्रिया कार्यान्वित झाली आहे. अनेक वर्षांच्या संबंधातून प्रगत समाजाची संस्कृती, वैशिष्टये आदिवासी आत्मसात करीत आहेत. त्यामुळै हे समाज त्यांच्या परंपरागत वैशिष्टयांपासून दूर जात आहेत. त्यांचे आधुनिकीकरण होऊ लागले आहे. प्रस्तुत दोन्ही प्रक्रियांमधून आदिवासी समाजाचे पारंपारीक जीवन संपुष्टात येईल काय? अशी शंका व्यक्त केली जात आहे. तेव्हा या समाजाचे समग्र अध्ययन अनेक दृष्टिने उपयुक्त ठरते.''[६१)]

आदिवासी विविध कामांसाठी विविध कारणांसाठी आदिवासी समाजाचे अध्ययन महत्वपूर्ण ठरते. परंतु 'माना' आदिवासींच्या बाबतीत अध्ययनाचे आणखी काही वेगळे महत्व ठरते. ते पुढीलप्रमाणे—

माना आदिवासी समजा कित्येक वर्षांपासून स्वत:च्या अस्तित्वासाठी संघर्षरत असलेला दिसतो. कधी तो गोडराजांसारख्या आदिवासींसोबत तर कधी स्वत:ला अनुसूचित जमातीचा स्वतंत्र दर्जा मिळावा म्हणून शासनासोबत त्यामुळे आजपर्यंत माना हे आदिवासीच आहेत. हे कित्येक अभ्यासकांनी आपल्या पुस्तकांत लिहीले असूनसुध्दा त्यांना स्वत:ला अनुसूचित जमातीच्या यादीत स्थान मिळविण्यासाठी

स्वत:चेच अस्तित्व वारंवार सिध्द करावे लागले. आणि लागत आहे. त्यामुळे माना आदिवासींचा अभ्यास एक आव्हानासत्मक विषय ठरतो. माना आदिवासींची वैशिष्टयेच नाही तर समस्याही इतर आदिवासींप्रमाणेच असल्याचे जाणवते. ते एकेकाळी राजे होते परंतू आता त्यांची अवस्था इतर आदिवासींप्रमाणेच असल्याचे जाणवते. त्यामुळे माना आदिवासींच्या अध्ययनाची आवश्यकता व महत्व पुढील कारणांमुळे जाणवते.

१) भारतात आतापर्यत समजाशास्त्राच्या अभ्यासकांनी विविध आदिवासी समाजांचे अध्ययन केलेले आहे. परंतु प्रत्येकाच्या स्थळाकालाप्रमाणे थोडया फार समस्या वेगवेगळया असतात. तरीही संपूर्ण आदिवासींच्या समस्यांमध्ये खुप फरक जाणवत नाही. माना आदिवासींच्या समस्या थोडयाफार फरकाने इतर आदिवासीं प्रमाणेच आहेत असे जाणवते. कारण त्यांना स्वत:चेच अस्तित्व सिध्द करण्यासाठी शासनासोबत लढा द्यावा लागला. त्यामुळे माना आदिवासींचे सूक्ष्म अध्ययन करणे फार आवश्यक आहे.

२) अशाप्रकारच्या संशोधनातून माना आदिवासींच्या समस्यांचा अभ्यास तर होतोच परंतु त्यांच्या परंपरा, रुढी, अंधश्रध्दा, याबाबतीत कोणती प्रगती झाली किंवा आधुनिकीकरणाच्या युगात कोणते बदल झालेत याचेही अध्ययन केल्याने समाजशास्त्रीय ज्ञानात भर अपेक्षित असते.

३) जेव्हा समाजशास्त्रीय अभ्यासकांनी इतर आदिवासींसोबत माना आदिवासींचा अभ्यास केला तेव्हा त्यांनी सरासरी किंवा ढोबळमानाने अभ्यास केलेला दिसतो. आधुनिकीकरणाच्या या युगात कोणतीही विकासाची पावले उचलतांना प्रत्येक गोष्टींचेच सूक्ष्म आणि वैयक्तिक व सखोल अध्ययन होणे महत्त्वाचे आहे. त्यातील बारकावे समजल्याशिवाय माना आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, भावनिक व बौध्दिक विकासाचे दरवाजे उघडणार नाहीत आणि भावनिक व बौध्दिक विकास किंवा बदल झाल्याशिवाय होणारी प्रगती ही वरवरची व दिखाऊ असते. त्यामुळे माना आदिवासींचे वैयक्तिक अध्ययन करणे आवश्यक आहे असे वाटते.

४) माना आदिवासी हा ग्रामीण भागात व दुर्गम प्रदेशात, शहरांत दिसतो. परंतु प्रगत समाजाच्या संपर्कात आल्यावर त्यांच्यात विविध बदल होतांना दिसतात. ते त्यांच्या संस्कृतीपासून त्यांना दूर नेताहेत का? त्यांच्या रुढी, परंपरा यांना दुखावतात का? या प्रश्नांची उत्तरे माना आदिवासींच्या अध्ययनाने मिळणार आहेत.

५) यापूर्वी सर्वसाधारण आदिवासी सोबत माना आदिवासींचा अभ्यास संशोधकांनी केलेला आहे. त्यामुळे त्यांचा स्वतंत्ररित्या अभ्यास करण्याची निवड समर्थनिय ठरते.

६) संगणक युगात माना आदिवासींवर आधुनिकीकरणाचा व पाश्चात्तीकरणाचा कोणता प्रभाव पडला व कितपत पडला. याचे अध्ययन होणे आवश्यक आहे. शिवाय त्यांच्या रुढी, परंपरांवर व श्रध्दांवर आधुनिकीकरणाने चांगला की वाईट परीणाम झाला हेही अभ्यासल्यामुळे त्यांच्या संस्कृतीची जोपासना करणे सोपे जाईल.

७) एकेकाळी राजे असलेले माना आदिवासी आज मात्र अगदी सर्वसाधारणपणे कमी पातळीवर जगतांना आढळतात. पोटासाठी राबणे व जगण्यासाठी खाणे इथपर्यतच त्यांचे जीवन सुरु आहे. याला कारण कोणते? आदिवासींच्या वर्तनाचे ते एक वैशिष्टय आहेत. परंतु तरी या प्रश्नाचे उत्तर शोधणे आवश्यक आहे. बदलत्या युगात स्पर्धेच्या जगात त्यांच्या अशा जगण्याला राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक काणते घटक जबाबदार आहेत? या प्रश्नांची उत्तरे मिळविणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांच्या विकासाच्या रुपरेषा शासनाला ठरविता येतील. म्हणजेच मानांच्या सर्वांगिण विकासासाठी वेगवेगळया उपाययोजना करता येतील. त्यासाठी हे अध्ययन आवश्यक आहे.

८) सध्या शासनाच्या विविध सोयी सवलती माना आदिवासींना मिळत आहेत. आदिवासींना मिळणाऱ्या सोयींना लाभ त्यांना मिळाला असला तरी सर्व योजनांचा फायदा त्यांना घेता येतो का? इतर समाज ज्या पध्दतीने व गतीने प्रगत होतांना दिसतो त्या गतीने माना आदिवासी समाज प्रगत होतांना दिसतो का? त्यांची आर्थिक,

शैक्षणिक, राजकीय सद्यस्थिती कोणती आहे? कोणत्या स्तरावर आहे? याचा शोध घेणे आवश्यक आहे. त्यासाठी माना चे अध्ययन करणे आवश्यक आहे.

९) इतर समाजाच्या तुलनेत माना समाजाची प्रगती संथगतीने होते आहे का? या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी त्यांच्या रुढी, परंपरा, चालीरिती, धर्म, जीवनपध्दती, पूजा विधी, व्यवसाय, श्रध्दा या सर्व बाबींचा सांगोपांग, परिपूर्ण अध्ययन करणे आवश्यक आहे.

१०) मानांच्या अध्ययनाने त्यांचे विचार, त्यांच्या समजूती, त्यांच्या अपेक्षा, त्यांच्या समस्या हे सर्व जाणून घेता येईल. माना आदिवासींना समजून घेण्यासाठी त्यांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

म्हणूनच त्यांचे अध्ययन करणे संयुक्तिक वाटते.

सारांश, माना आदिवासींचा अभ्यास केल्यामुळे संशोधिकेच्या ज्ञान व जिज्ञासेची पूर्तता तर होईलच परंतु माना आदिवासींची संपूर्ण जीवनशैली व त्यांचे उपेक्षित जगणेही शासनासमोर येईल. त्यांचा फायदा माना आदिवासींच्या जीवनप्रवाहात आधुनिकीकरणाच्या अनुकुलतेने बदल घडविण्यात होईल. त्यांना आर्थिक, शैक्षणिक बाबतीत सक्षम बनविण्यात होईल.

भारतासारख्या लोकशाही प्रधान देशात सर्वाप्रती समानतेचे तत्व आणण्यास होईल व समाजशास्त्रीय ज्ञानात भर पडण्यास होईल. भारताच्या विकासात माना आदिवासींनी योगदान द्यावे यासाठी त्यांना प्रशिक्षित करुन मुख्य प्रवाहात आणण्यात होईल. त्यामुळे माना आदिवासींचे जीवन व त्यात होणारे बदल, त्यांच्या समस्या अधिक प्रकाशात येण्यासाठी माना आदिवासी समाजाचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्याचा संशोधिकेचा मानस आहे.

**मानांची ओळखः—**

● **शारीरिक ठेवण —** डॉ.रमेशकुमार गजबे यांच्या मते, ''माना जमातीचे बहुतांश लोक अंगकाठीने ठेंगण्या बांध्याचे, काटक, लहान डोळयाचे, काळया सावळया रंगाचे, पसरट चेहऱ्याचे, बसक्या व पसरट नाकाचे, जाड ओठ व वरचा ओठ किंचित उंचावलेला, मेहनती कष्टाळु व लाजाळू वृत्तीचे आहेत.''[६२]

● **वास्तव्य —** डॉ.रमेशकुमार गजबे यांच्या मते, ''या जमातीचे वास्तव्य मुख्यत: बस्तर ते सातपुडा पर्वताच्या खालचा भाग म्हणजे पूर्वीच्या दंडकारण्यातील पूर्वेकडील भाग, पूर्वीच्या मध्य प्रांतातील विशेषत: बालाघाट जिल्हयात, आताच्या महाराष्ट्रातील पूर्व विदर्भ भागातील जिल्हयांमध्ये विशेषत: वैनगंगेच्या पश्चिम किनाऱ्यापासून ते भद्रावतीपर्यत व वैनगंगेच्या पूर्व किनाऱ्यापासून थेट कुरखेडा पर्यतच्या भूभागामध्ये प्रामुख्याने ग्रामीण, डोंगरी व जंगल, दऱ्या खोऱ्यांमध्ये वसलेले आहे. मुलुखगिरी करता करता काही माना जमातीचे लोक टोळयाटोळयांनी अत्यल्प प्रमाणात पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, बुलढाणा, यवतमाळ, अमरावती, अकोला, इ. जिल्हयांमध्ये विखुरलेले आढळतात.''[६३)]

● **बोलीभाषा —** डॉ.रमेशकुमार गजबे यांच्या मते, ''बोलीभाषेचा संदर्भ, माना जमातीचे संदर्भात उपलब्ध नसल्याने त्यांची मुळ भाषा कोणती हे आता सांगता येणे कठीण आहे असे डॉ. रमेशकुमार गजबे म्हणतात. तथापि बहुसंख्यांक भाषिकांच्या सानिध्यामुळे बहुतेक लोक मराठी झाडी बोलीभाषा झाडी पटयांमध्ये, तर अशुध्द खेडवळ मराठी भाषा इतर भागामध्ये बोलली जाते. जुन्या पिढीतील काही लोक सान्निध्यामुळे गोंडी व तेलगु भाषा सुध्दा बोलतात. पण त्याला मातृभाषा म्हणून मान्यता देत नाहीत. म्हणूनच काही ठिकाणी जी काही बोलीभाषा असेल त्यानुसार माना जमातीला संबोधतांना एकवचनात मानी अथवा अनेकवचनातात माने असे संबोधले गेलेले आहे. ही सर्व अशुध्द खेडवळ मराठी, हिंदी, मिश्रभाषा भुभागानुसार, बोलली जाते. म्हणून

जुन्या नोंदी पाहतांना याचा उलगडा होतो.''[६४] डॉ.गोविंद गारे मानांना मराठी भाषिक म्हणतात.''[६५]

- **व्यवसाय —** डॉ.गोविंद गारे यांच्या मते, ''माना ही शेतीप्रधान, स्वतंत्र जात आहे. हया लोकांचा मुख्य धंदा शेती व शेतमजुरी हा आहे. पूर्वीच्या काळी ते पिकांचे संरक्षण करणे, ग्रामसंरक्षण करणे ही कामे करीत असत. सुरजगड व माणिकगड पहाडी भागात त्यांची राज्ये होती. पुढे गोंड राजांनी त्यांचा पराभव केल्यानंतर अनेक माना जातीचे लोक गोंड राजाच्या सैन्यात दाखल झाले.''[६६]

चांदा सेटलमेंट रिपोर्ट मध्ये मेजर ल्युसी स्मिथ (१८६१) यांच्या मते, 'गोंडांच्या पूर्वी अहेरीजवळ सुरजगड आणि माणिकगड पहाडी भागात माणिकगड येथे माना लोकांचे राज्य होते. ते सुदृढबांध्याचे असून स्वभावाने प्रामाणिक व उद्योगी आहेत. सैनिकी पेशाच्या योग्य बरेच गुण त्यांच्यात असले तरी आता त्यांनी त्यांच्या तलवारी म्यानात आणि ढाली भिंतीवर ठेवल्या आहेत. आणि आता ते शेती या व्यवसायात रमले आहेत.''[६७]

सारांश, एकेकाळी शुर लढवय्ये असणारे माना आदिवासी जंगलाचे कडक नियम बनविल्यामुळे सध्या शेतांतून काम करताना दिसतात. परंतु त्यांच्या स्वत:जवळ जमिनी कमी प्रमाणात असल्याने काही माना आदिवासी इतर समाजांच्या शेतात मजुरी करतांना आढळतात. व अत्यल्प प्रमाणात शिक्षण घेऊन शासकीय, कार्यालयात काम करतात. परंतु त्याचे प्रमाण नाहीच्याच बरोबरीचे आहे.

- **माना जमातीची दैवते:—**

डॉ.गोविंद गोरे यांच्या मते, ''माना जमातील गोत्रे नाहीत. माणका देवी, नारायण देव, डोंगरदेवी ही त्यांची दैवते आहेत''.[६८]

दि.हिस्लॉप (papers on the aboriginal Tribes of the Central Provinces) आपल्या प्रस्तुत लेखात म्हणतात, ''गोंडांचे जे मंत्री होते (सरदार) व जे

शकुन वगैरे सांगत असत त्यांच्यात 'माना—ओझा' होते. ते आपल्या पवित्रतेला अत्यंत जपत असत. कोणत्याही इतर जातींच्या हातचे खात नसत.''[६९)

डॉ.रमेशकुमार गजबे म्हणतात, नारायण देव (सूर्यदेव) ठाकोर देव (महादेव), वाघदेव(वाघ), नागोबा (नाग), डोंगरदेव (पर्वत) वैरागडची गोरजाई, माणिकगडाची माणिकादेवी. परंतु माही व आखाडी सणाच्या दिवशी कुटूंबातील कुणी मृत पावल्यास त्याला विधिवत भगतामार्फत उतरवितात. कोंबडा, बकरा किंवा वराह बळी देतात आणि देव घडवितात. या प्रसंगी पूजा व संपूर्ण कार्यक्रम पार पाडणाऱ्याला 'भगत' म्हणतात आणि हा भगत उपलब्ध नसल्यास भूमकाकडून पुजेचा कार्यक्रम पार पाडतात. हा भूमक प्रामुख्याने गोंड हया जमातीचा असायचा माना जमातीची देवके ठरविल्याप्रमाणे ४,५,६,७ व ९ अशी असतात.

या जमातील ७२ कुळे असून, त्यांचे विभाजन कुळांच्या २२ जोडया व त्यांचे देवतांच्या संख्येनुसार झालेले आहेत. प्रत्येक जोडकुलांना वेगवेगळे 'भाट' आहेत. (भाट म्हणजे एका पिढीचा संपूर्ण इतिहास दुसऱ्या पिढीला ज्ञात व्हावा, म्हणून जे लोक इतिहास ऐकवित भ्रमण करीत व कुलदेवी, कुलदेवतांच्या तथा पूर्वजांच्या घराण्याचा इतिहास विदित करीत असत.) त्या बदल्यात त्यांना धान्य किंवा बिदागी म्हणून उपलब्ध असेल तर द्रव्य देण्यात येवून मान—पान केले जात असे. त्यांना 'भाट' हा किताब मान्य पावला होता. त्यामुळे चालत आलेल्या रुढी व परंपरा यांना असलेल्या भाटांच्या बाडावरती विश्वास टाकणे क्रमप्राप्त आहे.

**माना जमातीचा इतिहासः—**

डॉ.रमेशकुमार गजबे यांच्या मते, ''माना समाजाचे मूळ शोधतांना कुठलेही लिखित साहित्य उपलब्ध नाही. मानांचे भार (पाटाळे) त्यांना लग्नप्रसंगी, कधी धार्मिक विधी पार पाडतांना, कथा किर्तन करतात त्यावरुन आपणास वंशावळीची बरीच माहिती मिळते. परंपरेने चालत आलेली कथा किंवा माहिती कोणती? किंबहूना प्रादेशिक सान्निध्यामुळे भाटांनी त्यामध्ये केलेले बदल आणि यजमानांना कधी कधी खुश

करण्यासाठी त्यात आपल्याकडून घुसविलेली माहिती कोणती? हयाची माहिती अथवा अंदाज बांधणे अलिकडे कठिण झालेले आहे''.[७०] परंतु माना हे नागवंशीय आहेत. त्यांचे मूळ ओरीसामध्ये असून ते बसारमध्ये व बस्तरमधून तेव्हाच्या चांदयामध्ये (चंद्रपूर) साकत सरकत आले असावेत, असे डॉ.गजबे म्हणतात.''[७१]

शैलजा देवगावकर यांच्या मते, 'माना लोकांनी सुमारे दोन शतके गोंडवना भागात (चंद्रपूर व आसपास) राज्य केले''.[७२] रसेल ॲण्ड हिरालाल 'माना' लोकांना 'द्रविडीयन' म्हणतात. मुख्यत: शेतकरी आणि शेतमजुर असे हे लोक आहेत. मुळ वंशाबाबत (ओरीजीन ऑबस्क्युअर्ड) असे शब्द म्हणजे 'अस्पष्ट—अव्यक्त असा शेरा देण्यात आला आहे.''[७३]

मेजर ल्यूसी स्मिथ (१८६९) यांनी त्यांच्या चांदा सेटलमेन्ट रिपोर्ट मध्ये मानांच्या बाबतीत लिहितांना म्हटले आहे की, 'गोंडाच्या पूर्वी अहेरीजवळ सुरजागड आणि माणिकगड पहाडी भागात माणिकगड येथे माना लोकांचे राज्य होते.''[७४]

'श्री हिस्लॉप (पेपर्स ऑन दी ॲबओरीजनल ट्रीब्ज ऑफ दी सेन्ट्रल प्रोव्हीन्सर) आपल्या प्रस्तुतच्या लेखात म्हणतात, ''गोंडाचे जे मंत्री होते (सरदार) व जे शकुन वगैरे सांगत असते. त्यांच्यात 'माना—ओझा' होते. ते आपल्या पवित्रतेला अत्यंत जपत असत. कोणत्याही इतर जातींच्या हातचे नसत''.[७५]

डॉ.गोविंद गारे यांच्या मते, 'माना ही शेतीप्रधान स्वतंत्र जात आहे. ही जात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा जिल्हयातील प्रामुख्याने आढळते. विदर्भातील अन्य जिल्हयांतही ती आढळते. गोंडांचे राज्य येण्यापुर्वी माना लोकांनी दोन शतके राज्य केले असा इतिहास मिळतो''.[७६]

अ.ज. राजुरकर यांच्या मते, ''इ.स.२३० च्या सुमारास सातवाहन साम्राज्याचा अस्त झाला. त्या विस्तृत साम्राज्यात लहान लहान राज्ये उदयास आली. दक्षिण महाराष्ट्रात राष्ट्रकुटांनी आपला अंमल स्थापन केला. दक्षिण हैद्राबाद येथे 'मान' नामक शक नृपतीने राज्य स्थापन केले आणि विदर्भात वाकाटक उदयाला आले.''[७७]

अ.ज.राजुरकर यांच्या मते, ''नवव्या शतकापासुन तो बाराव्या शतकाच्या अखेरपर्यत वैरागड येथे नागवंशीय माना राजे राज्य करीत होते. हे घराणे बस्तरमधील चक्रकोटय येथील घराण्याचीच एक शाखा होती. त्यांचा पहिला राजा कुरुमप्रहोद होय. नागांचे राज्य वर्धा नदीच्या दक्षिणेस माणिकगडापर्यत विस्तारलेले होते अशी ही माहिती चांदा जिल्हयाच्या सेटलमेंट (१९६२—६३) रिपोर्टच्या इतिहास विभागात व चांदा गॅझेटिअर मध्ये (१९०९) मध्ये आढळते. त्यांनी ती माहिती चक्रकोटय घराण्यातील कागद पत्रावरुन घेतल्याचे नमुद केले आहे''.[७८]

सेन्ट्रल प्रोव्हीन्सेस डिस्ट्रीक्ट गॅझेटीअर्स चांदा डिस्ट्रीक्ट वॉल्युम ए मध्ये माना त्यावेळी जवळपास ४ टक्के म्हाजे २७००० लोकसंख्येने असून जवळपास १४ गावांत त्यांची सत्ता होती. (Own 514 villages) असे नमुद केलेले आहे. गोंडसत्तेच्या उदयापूर्वी माणिकगड आणि सूजरगड किल्यावर त्यांचे राज्य होते. ठाकूर देव हे त्यांचे दैवत होते. आणि तलवार हे त्यांचे पुजेतील शस्त्र. त्यांचे मुळे शोधून काढल्या गेले नाही. पण ते गोंडांची उपशाखा असल्याचे जाणवते असे नमूद केलेले आहे. परंतू गोंडांनी माना राजांचे राज्य जिंकून घेतले म्हणजे गोंडांनी गोंडांचेच राज्य जिंकून घेतले असा त्याचा अर्थ होईल. म्हणजे माना हे गोंडांची उपशाखा नाही हे स्पष्ट होते. शिवाय डॉ.गोविंद गारे यांनी सुध्दा त्यांच्या महाराष्ट्रातील आदिवासी जमातीमध्ये विदर्भात माना नावाची स्वतंत्र जात आहे असा उल्लेख केलेला आहे. शिवाय आदिवासींचा अभ्यास करणाऱ्या समाज शास्त्रज्ञांनी महाराष्ट्रातील आदिवासी जमात म्हणूनच माना जमातीचा अभ्यास केलेला आढळतो.

गोकुळदास मेश्राम यांच्या मते, ''माना हा जो गण आहे त्याची माना ही जात आहे. वैरागडच्या माना नागवंशीय राजाप्रमाणेच माणिकडचा राजा गहिलू हा नागवंशीय होता. त्याने माणिकादेवीच्या नावावरच माणिकगड हा किल्ला बांधला. गहिलू या राजानेच भद्रावती येथे भद्रनाग नावाचे नागमंदिर बांधले''.[७९]

टि.टि.जुलमे म्हणतात, ''नवव्या शतकात वैरागड येथे माना जातीच्या नागवंशीय राजांनी सत्ता स्थापन केली.''[८०]

माना जमातीच्या इतिहास संशोधनकाळात श्री.भास्कर वाकडे यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते. भास्कर वाकडे यांच्या मते, ''आजचे माना लोक हे गहिलू राजाचे वंशज आहेत''.[८१] ''नागवंश या भुमितील मूळवंश होय. आसाम व अंदमान येथे त्यांचे वंशज दिसतात. हत्ती हे नागवंशीयांचे प्रतिक आहे. राजचिन्ह आहे. अमरकोशात हत्तीस नाग म्हटले आहे. दास व नाग हे एकाच प्रकारचे लोक आहेत. ऋग्वेद काळात 'दाहक' नावाचा दास लोकांचा राजा होता.''[८२] ''नाग लोकांची वस्ती वंग, मगध, खांडवन, कुरुक्षेत्र, हरीद्वार, केरळ इत्यादी मिल प्रदेशात होती. कश्यप ऋषीपासून 'कद्रू' नामक त्याच्या मूळनिवासी पत्नीला झालेली संतती तिच 'नाग' जाती होय. माना हे नागवंशीयांचे वंशज आहेत.''[८३]

''तामिळ शब्दकोषात मानाचा अर्थ बाप (जन्मदाता) असा आहे. स्त्रिला निका म्हटले जायचे. म्हणजेच गणाच्या जन्मदात्यास माना व जन्मदातिस मानिका म्हणतात. मंणसा ही मानांची कुलमाता आहे.''[८४]

भास्कर वाकडे म्हणतात, 'नागवंशीयांची नावे टोटमययुक्त म्हणजेच सापांवरुन पडलेली असतात. मण्यार हा साप मानाचे गणप्रतिक टोटक असावे. प्रत्येक नागवंशीय जातींची नावे सापांच्या नावावरुन पडलेली आहेत. माना जातीचे नाव टोटमययुक्त असून ते चतुर्वण्याच्या चौकटीत मोडत नाही. मानाचे नाव चातुर्वण्याच्या पध्दतीच्या गुण किंवा कर्म (व्यवसाय) यावरुन पडलेले नाही. अशाप्रकारे माना ही स्वतंत्र अस्मिता असणारी जात आहे. यावरुन माना समाज जात नसून तो गण आहे. म्हणजेच का समाज जातिधिष्ठीत नसुन तो गणाधिष्ठीत आहे हे आपल्या लक्षात येईल''.[८५]

सारांश वरील सर्व विवेचनावरुन असे लक्षात येते की,

१) माना पूर्वी चंद्रपूर व त्याच्या आसपासच्या परिसरातील राज्यकर्ती जमात होती व त्यांनी स्वतःच्या राज्याच्या रक्षणाकरीता किल्ले बांधले होते.

२) माना राजांनी इ.स.नवव्या ते बाराव्या शतकापर्यंत राज्य केले होते. काही इतिहासकारात या बाराव्या व तेराव्या शतकांबद्दल वेगवेगळे मतप्रवाही आहेत परंतू जवळपास चार ते पाच शतके माना राजांनी राज्य केले हे मात्र नक्की होते.

३) माना राजांनी स्वतःचा असा इतिहास स्वतः लिहून ठेवलेला दिसत नाही. यावरुन आदिवासींमध्ये असलेली लेखन कलेचा अभाव स्पष्ट होतो.

४) माना राजांचे राजचिन्ह 'हत्ती' होते व ते नागवंशीय होते हे लक्षात येते याबाबत जवळपास सर्वच लेखकांत एकमत दिसते.

५) त्यांची नावे टोटमयुक्त असून ते माणिकादेवी, दंतेश्वरी व ठाकूरदेवाचे पुजारी आहेत तसेच ते निसर्गपुजक आहेत.

६) त्यांना गोंड राजांची हरवून त्यांचे राज्य जिंकून घेतले तेव्हा पासून माना जमातीचे लोक इतरत्र विखुरले गेले. त्यांच्या लेखनकलेच्या अभावामुळे त्यांचा इतिहास लिहिला गेल्याचे आढळत नाही. परंतु इतर प्रवाशांनी, इतर राजांनी व इंग्रजांनी त्यांच्याबद्दल माहिती लिहून ठेवली व तिच्याच आधारे इतिहासकार व समाज शास्त्राच्या अभ्यासकांनी त्यांचा इतिहास शोधून काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## १.२ आदिवासी साहित्याचा अध्ययन आढावा

### १) भारतीय आदिवासी

गुरुनाथ नाडगोंडे

कॉन्टीनेन्टल प्रकाशन—पुणे, तृतीय आवृत्ती—२००३

भारतीय आदिवासी या पुस्तकात गुरुनाथ नाडगोंडे यांनी भारतीय आदिवासींचे समाजशास्त्रीय, सखोल आणि सूक्ष्म अध्ययन प्रस्तुत केलेले आहे. या

पुस्तकात त्यांनी भारतात राहणाऱ्या आदिवासींचे वैशिष्टये, लक्षणे, भौगोलिक प्रदेशानुसार वर्गिकरण, त्यांच्या समस्या, त्यावर उपाययोजना, शासनाने आदिवासींसाठी राबविलेल्या विविध योजना तसेच संविधानातील आदिवासींसाठी करण्यात आलेल्या तरतुदी यांचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

त्याचप्रमाणे भारतातील आदिवासींच्या प्रथा, परंपरा, चालिरीती, अंध्दश्रध्दा, श्रध्दा, विवाहविषयक नियम, विवाहाचे प्रकार, घटस्फोटाच्या पध्दती, कुटुंब संस्था, कुल व कुलप्रतिकवाद, आप्तसंबंध व्यवस्था, मंडळे व युवागृहे, आर्थिक क्रिया, कायदा व न्याय, धर्म व जादू यांसारख्या बाबींचे सूक्ष्म अध्ययन प्रस्तुत केलेले आहे. त्यांनी महाराष्ट्रातील 'वारली' आदिवासींचे समाजशास्त्रीय अध्ययन करुन विवेचन प्रस्तुत केलेले आहे. त्याचप्रमाणे आदिवासींच्या अभ्यासाचे महत्व त्यांच्या अभ्यासाची पार्श्वभुमी वर्णन केलेली आहे.

त्यांनी क्षेत्र काम 'अभ्यासपध्दती विषयी सविस्तर वर्णन केलेले आहे. नाडगोंडे म्हणतात, माणसांची भ्रमंती अवस्था संपुष्टात आल्यानंतर माणूस कोठे ना कोठेतरी स्थिर होऊ लागला. सतत प्रयत्नशील असणाऱ्या मानवाने उदरनिर्वाहाची विविध साधने शोधून काढली व निश्चित अशी उदरनिर्वाहाची साधने मानवाला गवसल्यानंतर त्याच्या आयुष्याला स्थिरता लाभली. काही भुमिपुत्रांनी लोकवस्तीपासून दूर व दुर्गम असलेल्या डोंगर कपाऱ्यांत, नद्या नाल्यांत, कडेकपाऱ्यांत आपला तळ ठोकला. 'धरतीची लेकरे' म्हणून त्यांच्या सर्वार्थाने उल्लेख करता येईल. अशा आदिवासी समाजाची दुनियाही वेगळी आहे. डोंगरकपाऱ्यांत राहणाऱ्या, आपल्याच रुढी व परंपरांना पालीसारखे चिटकून राहणाऱ्या, फळाफुलांच्या व झाडापाल्यांच्या चवीने समाधान पावणाऱ्या आदिमांचे जीवन स्वच्छंदी पाखरासारखे असते.

आदिवासी कोणाला म्हणावे हे सांगतांना त्यांनी विविध मानवशास्त्रीय अभ्यासकांच्या व्याख्या दिलेल्या आहेत. त्यात गिलीन व गिलीन, डब्लु–जे.पेरी, डॉ. रिव्हर्स, इंपिरियल गॅझेटमधील व्याख्या, मदन व मजुमदार, बांगार्डस, डी.एन.मजुमदार

यांच्या व्याख्या दिलेल्या आहेत. इ.स.१९६२ साली शिलांगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेत आदिवासींची केलेली व्याख्या सांगतांना नाडगोंडे म्हणतात, ''एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट भू–प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच दृष्टिने मागसलेला अक्षर ओळख नसलेल्या, रक्तसंबंधावर आधारित, सामाजिक व राजकीय रीतिरीवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला 'आदिवासी समाज' म्हणतात. नागगोंडे यांनी आदिम समाजाची नऊ लक्षणे सांगितलेली आहेत. त्यात, १) विशिष्ट भूप्रदेश २) प्रमाण लघुता ३) एकाच रक्त संबंधावर आधारित ४) स्वस:ची बोलीभाषा व लेखन, कलेचा अभाव ५) स्वत:ची वेगळी जीवनपध्दती ६) साधी अर्थव्यवस्था ७) सीमित तंत्रविद्या ८) समानधर्म व ९) सामाजिक एकजिनसीपणा.

नाडगोंडे चंद्रपूर जिल्हयाच्या बाबतीत लिहीतात की, भारतातील आदिम जमातीमध्ये गोंड व संथाल जमाती संख्येच्या दृष्टिने मोठया आहेत. मध्यप्रदेश, आंध्रपदेश, बिहार व महाराष्ट्र या राज्यात गोंड आढळतात. महाराष्ट्रातील चंद्रपूर (चांदा) ही गोंड राजांची राजधानी मानली जाते.

आदिम समाजाच्या अभ्यासाचे महत्व सागतांना ते म्हणतात, आदिम समाजाच्या अभ्यासाचे महत्व सामाजिक मानवशास्त्ज्ञांच्या दृष्टिकोनातून समजून घेणे तर अगत्याचे आहेच, पण त्याचबरोबर जीवनाच्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींना वाटत असलेल्या आदिमांच्या अभ्यासाचे महत्व लक्षात घेतले पाहिजे. प्रशासक, सामाजिक कार्यकर्ते, शेती अधिकारी, धर्मप्रचारक,खाण–मालक, मळेवाले, शैक्षणिक संस्था, आंतरराष्ट्रीय इत्यादी विविध थरातील व्यक्ती व संस्था आदिम जीवनाचे स्वरुप समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

नाडगोंडे म्हणतात, आधुनिक समाजाबरोबरचे स्वाभाविक संघर्ष व आदिमांसमोर उभे राहीलेल्या सामाजिक व आरोग्यविषयक समस्या आणि धर्मांतराच्या अविरत प्रयत्नाने आदिम समाज हा नाशाच्या उंबरठयावर आहे, हे अमान्य करता येत

नाही. निसर्गाच्या सहवासात सातत्याने राहणाऱ्या आदिमांच्या निरोगी व निकोप जीवनात आधुनिक समाजाचा कामी शिरल्याने त्यांचे जीवन तर नासत चाललेच आहे पण चिंतेची बाब म्हणजे आदिमांच्या जीवनाकांक्षात नष्ट होत चाललेली आहे.

आदिमांच्या अभ्यासाची एतिहासिक पार्श्वभुमी सांगतांना नाडगोंडे म्हणतात, आदिम समाजाच्या अध्ययनाची सुरुवात खऱ्या अर्थाने १८ व्या शतकातच झाली असे म्हटले पाहीजे. इव्हान्स प्रीचर्ड म्हणतात, सामाजिक मानवशास्त्राचे अध्ययन ही प्रबोधनकालाचीच निष्पत्ती आहे. याच प्रबोधनकाळातील ठळक वैशिष्टयांची छाप आजपर्यतच्या सामाजिक मानवशास्त्राच्या इतिहासावर पडल्याचे दिसून येते.

सेंट सायमन यांनी समाजविषयक विज्ञानाची मुहूर्तमेढ रोवून मॉटेस्क्युच्याही पुढे एक पाऊल टाकले. ऑगस्ट कोंत हे तर सेंट सायमनचे शिष्य. पध्दतशीर विचारधारा हे त्यांचे वैशिष्टय होते. त्यांनीच समाजाविषयीच्या विज्ञानाला 'समाजशास्त्र' हे नामाभिधान दिले.

शेवटी शासनाच्या योजनांबाबत नाडगोंडे म्हणतात, कल्याणकारी योजना आखुन आदिम समाज पूर्णतया बदलेल व आदिम समाजापुढील राक्षसी समस्या मिटतील अशी समजूत करुन घेणे धोक्याचे आहे. या योजनांची अंमलबजावणी कशी व कुठवर होते हे पुन्हा तपासून पाहिले पाहिजे. सरकारकडून मिळत असणाऱ्या सवलतींचा वापर समर्पित भावनेने शहाणपणाने केला पाहिजे. ही जाणीव आदिमांच्यात निर्माण केली पाहिजे. अन्यथा नुसत्या सवलतींचा वर्षाव केला तरी त्या सवलती अनाठायीच जातील.

नाडगोंडे यांनी केलेल्या अध्ययनाशी माना जमातीचे साधर्म्य पडताळून पाहणे महत्त्वाचे असल्याने त्यादृष्टीने संशोधिकेने अध्ययन केले आहे.

## २) वैदर्भीय आदिवासी—जीवन आणि संस्कृतीः—

डॉ.सौ.शैलजा देवगावकर

प्रथमआवृत्ती—२००६— श्री.मंगेश प्रकाशन,नागपूर—१०

वैदर्भीय आदिवासींचे डॉ.सौ.शैलजा देवगावकर यांनी सखोल अध्ययन केलेले आहे. त्यांनी आपल्या सूक्ष्म अध्ययनाचे विवेचन प्रस्तुत ग्रंथात केलेले आहे. या पुस्तकात त्यांनी विदर्भातील माडिया गोंड, परधान, कोरकू, कोरवा, गोंड, गोवारी, माना, हलबा, हलबा—कोष्टी, बंजारा, इत्यादी आदिवासींबद्दल त्यांची कला, देवदेवता, लोकनृत्ये, विवाहगीते, स्त्रियांची जीवन पध्दती व वैशिष्टये, लोककथा, लोकजीवन, धार्मिक विधी, अंत्यसंस्कार त्याचप्रमाणे आदिवासींचा विकास आणि नवी आव्हाने याबाबत शैलजा देवगावकरांनी सखोल अध्ययन करुन विवेचन प्रस्तुत केलेले आहे.

आदिवासींच्या विषयी लिहीतांना शैलजा देवगावकर म्हणतात, आदिवासी जीवनाच्या कोणत्याही पैलूकडे पाहतांना पाहणाऱ्याचा दृष्टिकोन कसा आहे ही अत्यंत महत्वाची बाब ठरते. विदर्भातील आदिवासींची ओळख देतांना शैलजा देवगावकर म्हणतात, भारतातल्या आदिवासी जमातीतील लोक ठेंगणे, काळे (निग्रोइतके नाही) नाक नकटे व रुंद अशा स्वरुपाचे सर्वसाधारण आढळतात. त्यांच्या भुवयांची खालची हाडे पुष्कळदा बरीच वरती आलेली असतात. त्यामुळे डोळे खोल गेलेले वाटतात. अंगकाठी बारीक आढळते.

माना आदिवासींविषयी देवगावकर लिहितात, चंद्रपुर जिल्हयातील चिमूर भोवती असलेल्या शंकरपूर किंवा सुरजागड—माणिकगडच्या भागात गोंडांच्याच एखादी जमाती ही आदिवासी जमात आहे किंवा नाही हे ठरवितांना त्या जमातीचा वंशशास्त्र व सांस्कृतिक मानवशास्त्र हयांच्या संदर्भातून अभ्यास व्हावयास हवा. इतर कोणताही दृष्टिकोन हा अशास्त्रीय व अपायकारक ठरु शकतो. आदिवासींच्या लोकसाहीत्याबद्दल लिहीतांना म्हणतात, लोकसाहित्यात लोककथा, लोकगीते, पौराणिक तसेच एतिहासीक

कथा, लोककथा गीते, वाक्प्रचार, म्हणी इ.चा समावेश होतो. हया सर्व प्रकारांचा परंपरागत वारसा असतो. तसेच त्यांचा स्वत:चा ताल (रिदम) असतो.

आदिवासींच्या वैशिष्टयांबद्दल त्या सांगतात, आदिम समाज निर्सगपुजक आहे. निसर्गातील सुष्ट –दुष्ट शक्तींना संतुष्ट करण्यासाठी, मृत पूर्वजांच्या सन्मार्थ, ऋतुपरिवर्तन व वर्षबदल म्हणून जन्मापासून तो मृत्यु पर्यतच्या संस्काराप्रित्यर्थ सण. उत्सव अथवा समारंभाप्रसंगी आदिवासी जमातीत नृत्ये नाचली जातात. या नृत्यात धार्मिक भावना आणि आनंदाची मोठी सुरेख सरमिसळ असते. ही नृत्ये–लोकनृत्ये–समुहाची नृत्ये असतात. त्यातुन त्या जनजीवनाची परंपरा, त्यांच्या श्रध्दा आणि संस्कार या गोष्टिंचे दर्शन घडते. कुल–प्रतिक पशुपक्षांची हत्या करीत नाहीत.

शेवटी त्या म्हणतात, विकासासाठी ज्याप्रमाणे आदिवासींनी आपल्या अंधश्रध्दा आणि जुनाट परंपरा यांपासून दूर जाणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विकास कार्यक्रम राबविणाऱ्या प्रशासनेही साम्राज्यशाहीतून वारसाने मिळालेल्या चाकोरीच्या बाहेर जाणे आवश्यक आहे. याची दखली घ्यावयास हवी.

डॉ.शैलेजा देवगांवकर यांनी माना जमातीची जी माहिती दिली ती अतिशय त्रोटक स्वरूपात आहे. त्यामुळे सदर संशोधनातून माना जमातीची विविध सांस्कृतीक वैशिष्टे अभ्यासणे संशोधिकेला महत्त्वाचे वाटते व त्यादृष्टीने तीने अध्ययन केलेले आहे.

**३) महाराष्ट्रातील आदिवासी जमाती:–**

डॉ.गोविंद गारे.

कॉन्टिनेन्टल प्रकाशन पूणे–३० द्वितीय आवृत्ती–२००२

डॉ.गोविंद गारे आदिवासी समाजाचे गाढे अभ्यासक आहेत. त्यांनी 'महाराष्ट्रीतील आदिवासी जमाती' या पुस्तकात महाराष्ट्रातील आदिवासी समाजाविषयी

सविस्तर विवेचन केलेले आहे. यात त्यांनी महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमाती आंध–भिल्ल, तडवी–भिल्ल, धानका गावीत तथा भावची, गोंड, माडिया गोंड, हलबी, काथोडी अथवा कातकरी, कोकणा, कोलाम, कोळी, ढोर, कोळी महादेव, कोळी मल्हार, कोरकू, परधान, पारधी, ठाकूर, वारली इत्यादींची माहिती यांचे सूक्ष्म अध्ययन करुन माहितीचे विवेचन केलेले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रील अल्पसंख्यांक आदिवासी जमाती जसे वैगा, बरडा, बावचा किंवा बामचा, भाईना, भारिया, भूमिया, भात्रा, भुंजा, भुंजिया, बिंझवार, बिटकून, चोधरा, धनवार, धोडिया, दुबला, कमार, कवर, खैरवार, खारिया, कोल, कोंध, कोया, नागेसिया, नायकडा, ओरॉव, धनगड, परजा, पटेलिया, दोमला, राठवा, सवर, योरी, विंटेलिया इ. जमातींबद्दल माहिती दिलेली आहे.

त्याचप्रमाणे आदिवासी जमातींशी नामसदृश्य दाखविणाऱ्या जाती–जमाती विषयी सुध्दा त्यांनी विवेचन केलेले आहे.

आदिवासींच्या शिक्षणाविषयी गारे लिहीतात, आदिवासी लोक शैक्षणिक दृष्टया मागासलेले आहेत. राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ४७ टक्के (२००२ नुसार) आहे, तर आदिवासींमध्ये हे प्रमाण ३६.७७ टक्के आहे. स्त्रीशिक्षणाचे प्रमाण आदिवासींमध्ये फार कमी म्हणजे फक्त २४.०३ टक्के आढळून येते. आदिवासी आर्थिक दृष्टया फारच मागासलेले आहेत. त्यांचा मुख्य धंदा शेतीचा आहे. सुमारे ८५ टक्के लोक शेतीवर उपजीविका भागवतात. त्यात ४० टक्के लोक शेती करणारे व ४५टक्के लोक शेतमजुरी करणारे आहेत. शेती व्यतिरिक्त आदिवासी लोक चटया–टोपल्या तयार करणे, जंगलातील वनौपजे गोळा करणे, गवत कापणे, इत्यादी धंदे करतात. त्यांची राहणी साधी व गरजा मर्यादीत आहेत.

गारे म्हणतात, महाराष्ट्रात आदिवासींची आर्थिक परिस्थिती गरीबीची आहे. त्यांचे उपजिवीकेचे साधन शेती, शेतमजुरी आणि जंगलकाम आहे. शेती व्यवसाय करणाऱ्यांत स्वत:चे शेत असणारे, कुळ म्हणून शेती करणारे आणि शेतमजुर असे गट दिसून येतात. कुळ कायद्यापुर्वी अनेक लोक शेतमजुर होते. कुळ कायद्याच्या

आधारामुळे ते आता शेतमालक झालेले आहेत. महाराष्ट्र शासनाने कायेदशीर व बेकायदेशीर जमीन हस्तांतराचा कायदा केल्यामुळे जे आदिवासी जमिनीला मुकले होते. त्यांना जमिनी मिळून ते पुन्हा जमीनमालक झाले आहेत. परंतु अनेक ठिकाणी आदिवासींना अद्याप जमिनीचा कब्जा मिळालेला नाही. आदिवासी समाजात शेतमजुरांची संख्या सुमारे ४०—४५ टक्के आहे. ज्या शेतकऱ्यांकडे स्वत:ची जमीन आहे ते परंपरागत पध्दतीने शेती करतात. त्यामुळे शेतीतून बेताचेच उत्पन्न निघते. आधुनिक शेतीविकास योजनांचा कायदा अनेक शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नाही.

गारे म्हणतात, महाराष्ट्रातील आदिवासी जमातीची सांस्कृतिक, सामाजिक आणि धर्माचाराची जडण घडण एकसारखी नाही. प्रत्येक जमात ‘आदिवासी’च असली तरी ती आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासाच्या वेगवेगळया थरावर उभी आहे. कोलाम, कातकरी आणि माडीया गोंड या जमातींची गणना आदिम जमातीत करण्यात आली आहे. शिक्षण, आरोग्य आणि राहणीमान, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जडण घडण यामध्ये ते इतर आदिवासी जमातीच्या तुलनेत खूपच मागासलेले आहेत. गोंड, भिल्ल, महादेव कोळी, कोकणा, आंध, परधान, हलबा या जमातींनी गेल्या ५० वर्षात चांगली प्रगती केली आहे. त्यांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतीक क्षेत्रांत अनेक बदल होत आहेत. पूर्वीच्या भित्रा, बुजरा, नवख्या माणसाशी न बोलणारा, शहरी माणसापासून दूर राहणारा, पापभीरु वृत्तीचा, निसर्गावर भरोसा ठेवून जगणारा, आपल्याच आनंदात आणि मस्तीत रमणारा, निसर्ग धर्माप्रमाणे राहणारा, आपल्या श्रध्दा, आपली दैवते यांना उराशी बाळगून राहणारा आदिवासी आज हळूहळू लुप्त होत चालला आहे. महाराष्ट्रातील अशा जमातींच्या पूर्वापार चालत आलेल्या चालीरिती, परंपरा, संस्कृती, श्रध्दा,रुढी यांची ओळख काळाच्या ओघात पुसट होऊ लागली आहे. कालांतराने ती नष्ट होईल व हे सारे समाज भारतीय समाजाचेच एक भाग बनेल यात शंका नाही.

यावरुन डॉ.गारे यांच्या सूक्ष्म अध्ययनाचे महत्व लक्षात येते. माना आदिवासींची वैशिष्टये डॉ. गारे यांच्या अभ्यासाहून निराळी आहेत की काय किंवा

समान आहेत ही बाजू तपासणे महत्वाचे असल्याने संशोधिकेने सदर पुस्तकाचे अध्ययन केले आहे.

**४) सामाजिक मानवशास्त्रः—**

डॉ.भा.कि.खडसे

श्री. मंगेश प्रकाशन,नागपूर—१० तृतीय आवृत्ती—१९८९

डॉ.भा.कि.खडसे यांनी सामाजिक शास्त्राचा सूक्ष्म अभ्यास केलेला आहे. त्यांनी मांग जातीविषयी सखोल अभ्यास केलेला आहे. त्यांनी मांग जातीविषयी सखोल अध्ययन केलेले आहे. वरील पुस्तकात खडसे यांनी सामाजिक मानवशास्त्राचे अध्ययन करुन विवेचन प्रस्तुत केलेले आहे.

ते म्हणतात, सामाजिक मानवशास्त्र ही मानवशास्त्राची शाखा आहे. ॲरिस्टॉटलला मानवशास्त्राचा जनक म्हटले जाते. सॉलऐस्कच्या मताप्रमाणे, ‘‘मानवशास्त्र म्हणजे सकल मानववंशाचा व अखिल मानव जातीचा सविस्तर अभ्यास करणारे शास्त्र आहे. पृथ्वीवरील सर्वच मानवी समाजाचा अभ्यास मानवशास्त्राच्या कक्षेत येतो. मानवाच्या अभ्यासावर काळ, स्थळ, सांस्कृतिक स्तर यांचे कसलेही बंधन नसते. त्यांनी डॉ.मजुमदार आणि मदन यांची व्याख्या दिलेली आहे.’’ मानवाच्या शारीरिक, सांस्कृतिक व सामाजिक उत्पत्ती आणि विकासाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय.

खडसे यांच्या मताप्रमाणे मानवशास्त्र आदिम मानवाच्या अभ्यासाशी विशेषत्वाने निगडीत असलेले दिसते. ते म्हणतात, भारतातील सामाजिक मानवशास्त्राच्या अभ्यास विषयाच्या व्याप्तीत आदिम समाजाचा अभ्यास व ग्रामीण समुदायाचे अध्ययन अंतर्भूत आहे.

त्यांनी आदिवासी समाजाची लक्षणे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत. १) मर्यादित भूभाग २) मर्यादित लोकसंख्या ३) सजातीयता ४) आत्मीय तत्वज्ञान ५)

साधी अर्थव्यवस्था ६) मर्यादीत विशेषीकरण ७) लिखित साहित्याचा अभाव ८) शोध मतीमंद.

आदिवासी समाजातील कायदा, धर्म, आर्थिक संघटन, राजकी संघटन, कुटूंब व इतर संघटनांचा अभ्यास सामाजिक मानवशास्त्राच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट आहे.

खडसे म्हणतात, सामाजिक मानवशास्त्रात आदिवासी समाजाचा अभ्यास करतांना क्षेत्रसंशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येतो. त्यात प्रत्यक्ष निरीक्षण, सहभागी निरीक्षण, मुलाखाती आदी तंत्राचा अवलंब करण्यात येतो.

त्यांनी समाजशास्त्र व सामाजिक मानवताशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास केलेला आढळतो. ते म्हणतात, समजाशास्त्रीय अभ्यास पध्दतीत उपलब्ध प्रलेख, संख्याशास्त्र आणि सर्वेक्षण पध्दतींचा अवलंब करण्यात येतो. समग्राच्या अभ्यासाऐवजी विशिष्ट भागाच्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करण्यात येते. सामाजिक मानवशास्त्रात आदिवासी समाजाच्या सर्वांगिण अभ्यास अंतर्भूत असतो, तर समाजशास्त्रात विशिष्ट स्वरुपाचा अभ्यास महत्वाचा मानला जातो.

सामाजिक मानव शास्त्राच्या अभ्यासाचे महत्व त्यांनी सांगितले की—

१) आदिवासी जीवनाचे यथार्थ आकलन करण्यासाठी २) आदिवासी समाजाविषयीचे पूर्वग्रह दूर करण्यासाठी ३) आदिवासी कल्याण योजना आखतांना, समस्या सोडविण्यासाठी आणि प्रतिबंधात्मक उपाय म्हणून योजना आखण्यासाठी. ४) आदिवासी समाजाच्या विलोपांच्या संदर्भात सामाजिक मानवशास्त्रीय अभ्यासाचे महत्व त्यांनी सांगितले आहे.

ते म्हणतात, आधुनिक काळात प्रकार्यात्मक पध्दतीचा अवलंब सामाजिक मानवशास्त्रात प्राध्यान्याने करण्यात येते आहे. आदिवासी तसेच प्रगत जीवनाच्या अभ्यासात ही पध्दत उपयुक्त ठरलेली आढळते.

त्यांनी मलेशिया बेटावरील 'माना' वाद बाबत विवेचन प्रस्तुत केलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी मार्गनच्या विकासवादी सिध्दांत, बॅशोफेनचा सिध्दांत आणित वेस्टरफेनचा सिध्दांत प्रस्तुत केलेले आहे. त्यांच्या मते, वेस्टरफेनचा एकविवाही सिध्दांत आहे. जो मार्गन आणि बेशोफेनच्या स्वैराचारी विवाह विकास पध्दतीशी असंमत आहे. म्हणून वेस्टरफेनने पूर्वीपासून एकविवाह पध्दतीचा अस्तित्वात असल्याचे म्हटले आहे. आदिवासींचा अभ्यास म्हणजे मानव शास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा असून माना जमातीची आदिवासी म्हणून पडताळणी करण्यासाठी मानव शास्त्राच्या कसोटीवर त्यांची वैशिष्टये तपासणे महत्त्वाचे असल्याने संशोधिकेने सदर पुस्तकाचे अध्ययन केलेले आहे.

५) Gonds of the Central Indian Highlands-Volume two

Dr. B.H.Mehta

Concept publishing Company, New Delhi

डॉ.मेहता यांनी भारतातील गोंड जमातींविषयी सुक्ष्म, सखोल असे समाजशास्त्रीय अध्ययन केलेले आहे. त्यांचे गोण्ड्स ऑफ दी सेन्ट्रल इंडियन हायलॅण्ड्स वोल्युम टू हे पुस्तक १९८४ साली प्रकाशित झाले. या पुस्तकात त्यांनी गोंड जमातीविषयी सखोल विवेचन प्रस्तुत केले आहे. तसे पाहता बऱ्याच समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी गोंड जमातीचे अध्ययन केलेले आहे. कारण गोंड जमात मोठया संख्येने आहे. आणि तिच्या उपजमातीही खूप आहेत.

मेहता यांनी मध्य भारतातील मध्यप्रदेश व महाराष्ट्रात पसरलेल्या गोंड जमातीचे अध्ययन केलेले आहे. त्यांनी गोंड जमातीविषयी त्यांचे वास्तव्य, त्यांच्या उपजिवीकेचे निर्वाहाचे साधन आणि पध्दती, त्यांच्या शेतीविषयक व अर्थव्यवस्था, त्यांची जमीनदारी व्यवस्था, गोंडवाना भागातील जंगलव्याप्त क्षेत्र आणि त्यांची जंगलावर आधारित तसेच पशुपालन आधारित अर्थव्यवस्था, त्याच्यातील साधी दळणवळण, वाणिज्य आणि उद्योगधंदे, शेती, त्यांच्यातील जंगली भागात राहून उपजिविका करण्यासाठी त्यांची शक्ती व प्रेरणा स्थाने, त्यांच्यावरील संशोधन आणि विकासात्मक

योजना, नियम आणि कार्यवाहीचा सगळयाचा बाबतीत म्हणजे विशेषत: अर्थविषयक जीवनमानाच्या बाबतीत अतिशय वैशिष्टयपूर्ण आणि सखोल अध्ययन करुन विवेचन प्रस्तुत केलेले आहे.

डॉ.मेहता म्हणतात, 'The problem of hunger, food and work to obtain had existed for aborigines and primitive societies, as they exist at the present day'.

दुर्गम जंगलात आणि पहाडांवर जावून उपजिविकेचे साधन गोळा करण्यासाठी त्यांना कामाचे कौशल्य, वेगवेगळे शोध लावणे आणि स्वत:त हिंमत आणि क्षमता विकसित करावी लागते.

डॉ.मेहता गोंडजमातीबद्दल सांगतात की, गोंड समाजात जुन्या कुळ पध्दतीतून जमीनदारी पध्दती अस्तित्वात आली तेव्हा अनेक समस्या निर्माण झाल्या. त्यांना त्यांचे भाऊ ज्यांना ते भ्रातृहत्या करणारे संघर्ष करणारे म्हणतात ते राजगोंड यांच्याशी स्पर्धा करावी लागली. त्यांची स्थलांतरित शेती, शिकारीसाठी जंगल आणि त्यांनी मिळविलेल्या जमीनी बलशाली शासकीय विरोधी राजगोंडापुढे टिकविणे त्यांना जड वाटत होते. आणि म्हणून त्यांच्यात असुरक्षेची भावना तयार झाली होती. बाहेरुन येणाऱ्या शक्ती, भूक आणि सतत फिरस्ती असणारे सामाजिक जीवन, राजकीय बाबतीत विविध समस्या तयार झाल्या होत्या.

नेतृत्व, बाहेरुन येणाऱ्या संस्कृतीच्या झगझगाटाची छाप आणि बाहेरुन येणाऱ्या समाजाशी संपर्क यामुळे त्यांच्या शिकारी अवस्थेवर परीणाम झाले होते.

मेहता म्हणतात, मुळनिवासी किंवा आदिवासी समाज त्यांच्या अलिप्त आणि दुर्गम भागात शांतपणे जीवन जगतात. परंतु सैनिकांच्या शिरकावामुळे त्यांच्या भागात संपर्क वाढल्यामुळे विकासाला तेथे चालना मिळाली आणि त्यांच्यात सामाजिक परीवर्तन आणि त्यांच्या पर्यावरणात परिवर्तन घडून आले.

मेहता यांनी गोंडवाना भागातील जंगले आणि पशुपालन अर्थव्यवस्थेचे विवेचन कलेले आहे. ते म्हणतात, डोंगरीभागात आधिच औषधी व्यवस्था, दवाखाने सुविधा नसल्याचे जन्मदर कमीच असतो परंतु जंगलातील खडतर जीवनामुळे त्यांच्यातील मृत्युचे प्रमाण मात्र जास्त असते. त्यामुळे जंगली, डोंगरी भागात त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते आणि त्याची लोकसंख्या कमी असते. मेहता यांनी गोंड जमातीच्या दळणवळण, वाणिज्य आणि उदयोग धंदयाविषयी लिहिलेले आहे, ते म्हणतात.

आदिवासी त्यांच्या अलिप्तपणासाठी पूर्वीपासून ओळखले जातात. अलिप्तपणामुळेच त्यांना सुरक्षितता आणि सुखशांती मिळते. कुळावर आधारीत समाजव्यवस्थेत लहान लहान टोळयांनी राहणे आदी एकत्र येऊन शिकार करणे सोयीस्कर वाटते. ते जंगली भागात लपून छपून राहते आणि जंगली पशुंचा शिकारी करुन, जंगली जीवनयापनात आपले आयुष्य घालवतात.

मेहता म्हणतात की, आदिवासी टेकडयांवरील देवदेवता आदी इतर ठिकाणी राहणाऱ्या त्यांच्या बाबत नैसर्गिक उत्सुकता वाटेल अशा देवदेवतांची पूजा करतात.

गोंड आणि माना जणू जुळे भाऊच अशी त्यांची वैशिष्टे आढळतात. तरीही गोंडांप्रमाणे त्यांना आदिवासी म्हणण्यास गैरआदिवासी व स्वतः गोंड जमातही तयार नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आरक्षण आहे की काय ? याच धरतीवर माना आदिवासींचा अभ्यास संशोधिकेने केले आहे.

६) The Madia of Bhamragad

Dr.S.G.Devgaokar

एम.सी.मित्तल इंटर–इंडिया पब्लिकेशन दिल्ली फस्ट पब्लिशड–१९८२

डॉ.एस.जी. देवगावरकर हे आदिम समाजाचे गाढे अभ्यासक आहेत. त्यांनी समाजशास्त्रीय पध्दतीने आदिवासींचा सखोल अभ्यास केलेला आहे.

प्रस्तुत पुस्तकात देवगावकर यांनी विदर्भातील भामरागड भागातील अतिशय मागासलेले समजले जाणारे माडीया गोंड आदिवासींचे अध्ययन केलेले आहे. त्यात त्यांनी चंद्रपूर जिल्हयाची भौगोलिक माहिती दिलेली आहे. चंद्रपूर जिल्हयातील जंगलांबद्दल माहिती दिलेली आहे.

माडीया गोंड जमातीबद्दल ते म्हणतात, माडीयांचा धर्म इतर गोंडाप्रमाणे 'गोंडी' हाच मानतात. ते त्यांचा धर्म 'कोईतुर' धर्माप्रमाणे मानतात जो पूर्वीपासून मानल्या जातो. दुसऱ्या धर्मातील लोकांनी त्याच्या धर्मावर धार्मिक आक्रमण केलेले आहे. त्यांच्या भाषेला लिपी नसल्यामुळे त्यांच्या धार्मिक कथा, गोष्टी, नियम आणि कार्यवाही इत्यादी त्यांनी लिहून ठेवले नसल्याने तोंडीच कथा आणि पाठाडीच्या रुपाने पुढच्या पीढीकडे हस्तांतरीत केले जाते.

फरसापेन, मोठा देव किंवा भगवान शीव आणि काली देवी इत्यादी त्यांची मुख्य दैवते आहेत. प्रो.सी.वोन फ्युरेट हेमनड्रॉफ म्हणतात की, भगवान शीव हे गोंड आणि इतर आदिम जमाती त्याचप्रमाणे हिंदू मध्ये सुध्दा लोकप्रिय दैवत आहेत. ते म्हणतात की, शीव हे निसर्गाचे देव असल्याने ते सर्व निसर्गपुजक समाजात समान आहेत. ते आर्य हिंदूमध्ये पूर्वीपासून आणि 'गोंड' जमातीत जे निसर्गपुजक आजही आहेत, दैवत आहेत.

माडीया गोंड आदिवासींची वैशिष्टये सांगतांना देवगावकर म्हणतात, आदिवासींच्या देवतांच्या मूर्त्या पूजा करण्यासाठी विशेषत: झाडाच्या खोडा किंवा पानापासून बनविलेल्या असतात. सर्वांमध्ये एक मुख्यत: समान गोष्ट आढळते ती म्हणजे विवाह प्रसंगी त्यांचे एक लाकडाचा खांब धार्मिक विधीसाठी करतात. तो वेगवेगळया आकाराचा उंच असतो आणि तो विशिष्ट पध्दतीने आकर्षक कोरलेला असतो. तो एकाच खोडापासून तयार केलेला असतो.

त्यांनी आदिवासींच्या व्यवस्थापन विकासाबद्दल विवेचन प्रस्तुत केलेले आहे. ते म्हणतात, भारतीय संविधानात आदिवासींच्या शैक्षणिक आणि आर्थिक उत्थानासाठी विविध उपाययोजनांची तरतूद केलेली आहे आणि आदिवासींना किंवा अनुसूचित जमातींचे सामाजिक अत्याचारापासून आणि इतर शोषणापासून संरक्षण करणे राज्यांना बंधनकारक केलेले आहे. भारतीय राष्ट्रपतीद्वारे अनुसूचित जमामींच्या व्यवस्थापनाकरीता एका विशिष्ट अधिकाऱ्याची नेमणुक केली जाते. राष्ट्रपतींद्वारे दर दहा वर्षांनी एक समिती नेमली जाते जी आदिवासी भागावर आणि त्यांच्या कल्याणकारी योजनांवर अहवाल तयार करते.

देवगावकरांनी भारतीय संविधानातील अनुसूचित जमातींच्या संरक्षण आणि कल्याणकारी योजनांच्या तरतुदीबाबत सविस्तर विवेचन केलेले आहे. ते म्हणतात, आदिवासी विभागांचा विकास करण्याकरीता केंद्र सरकारकडून राज्यांना विशेष अनुदान दिले जाते.

देवगावकारांनी प्रस्तुत पुस्तकात माडीया गोंड जमातीचे सूक्ष्म अध्ययन विवेचन प्रस्तुत केलेले आहे. त्यांच्यासोबतच त्यांनी त्यांचे 'रेला' गीत ही प्रस्तुत केलेले आहे.

ते म्हणतात, १९५० मध्ये भारतातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या १७८.७५ लाख असनू २४५ जमाती त्यावेळी अस्तित्वात होत्या. जवळपास लोकसंख्येच्या ५ टक्के लोकसंख्या अनुसुचित जमातींची होती. बॉम्बे स्टेट मध्ये मात्र अनुसूचित जमातीचे लोकसंख्या प्रमाण ९.२ टक्के होते.

भामरागडचे माडीया गोंड आणि सोबतच चंद्रपूर, गडचिरोली भागातील माना जमात ही आदिवासी असतांना माडीयांप्रमाणेच काही वैशिष्टे माना जमातीत आढळतात का ? याचा पडताळा घेण्यासाठी संशोधिकेने सदर पुस्तकाचे अध्ययन केले आहे.

**७) बदलाच्या उंबरठयावरील कोकणा आदिवासी**

डॉ.गोविंद गारे

श्री.विद्या प्रकाशन पुणे— प्रथम आवृत्ती— ४जुन२०००

डॉ.गोविंद गारे हे समाजशास्त्राचे गाढे अभ्यासक असून आदिवासींचे त्यांनी सखोल अध्ययन केले आहे. त्यांची आदिवासींच्या अध्ययनावरील बरीच पुस्तके प्रसिध्द झालेली आहेत. प्रस्तुत पुस्तक गारे यांचे २००० साली प्रसिध्द झाले. प्रस्तुत पुस्तकात त्यांनी महाराष्ट्रातील कोकणा आदिवासींचे अध्ययनपूर्वक विवेचन केलेले आहे. गारे म्हणतात, आदिवासी हा आद्य संस्कृतीचा द्योतक आहे. आद्य किंवा आधीचा रहिवासी असाही अर्थ ज्यांत अभिप्रेत आहे. भारतीय संविधानानुसार त्यांची सूची केलेली आहे. त्यामुळे या समुहांना 'अनुसूचित जमाती' असे संबोधण्यात येते. या जमातींच्या आदिम संस्कृतीचा मुख्य गाभा. म्हणजे निसर्गपूजा. या निसर्गपुजक धर्मात प्रत्येक वस्तुत जीव असतो. त्यावर भूत, पिशाच्च या कल्पनांचा पगडाही भरपूर असतो.

इ.स.पूर्व १५०० या काळात नागर संस्कृती माहीत नसलेल्या भटक्या टोळयांचा भारतावर म्हणजे सिंधू संस्कृतीस जो आघात झाला त्या आधीचे लोक ते आदिवासी. वेशी, तटबंदी व बुलंद दरवाजे असूनही हा भयानक क्रूर घाला पडला होता.

पुढे ते म्हणतात, क्षत्रियांना हिणविण्यासाठी 'शुद्र' म्हणणे सुरु केले. सातवाहन, होयसळ, यादव आणि त्यांनतरची मुस्लिम राज्ये यांत वेगवेगळी आदिवासींचे उठाव झाले. परंतु त्याचा संगतवार इतिहास कुठेच लिहीलेला नाही. कालाघात आदिम जमातींची अनेक प्रदेशांत राज्ये निर्माण झाली. त्यांच्या अनेक संस्कृती विकसित झाल्या. त्यात नाव घेण्यासारखी गोंडाची व भिल्लांची संस्कृती प्रसिध्द होती. गोंडाची व भिल्लांची स्वतंत्र राज्ये होती. गोंड, भिल्ल संस्कृतीबरोबर संताळ, नागा, मिझो, हॅू, ओरान, यांच्याही संस्कृती विकसित झालेल्या होत्या.

त्या जमातींची स्वतंत्र राज्ये होती. त्यांचे स्वतंत्र वैभव होते. त्यांच्या स्वतंत्र भाषा होत्या. हया साऱ्या संस्कृती प्राचीन, विशाल, आदिम संस्कृतीची वेगवेगळी रुपेच होती आणि आजही त्यांच्या आदिम संस्कृतीचे जुनेपण आणि वेगळेपण कायम आहे.

या पुस्तकात त्यांनी धुळे, नंदूरबार जिल्हयात आढळणारी 'कोकणा' जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन केले. ज्यांची वस्ती, लोकसंख्या, घरे, संसार, स्वभाव पेहराव त्यांची लोकसंस्कृती, लोकपरंपरा याचाही अभ्यास केला आहे. त्यांची परीवर्तनाची दिशा इत्यादींबाबत विवेचन केलेले आहे.

पुढे ते म्हणतात, आदिवासी हे अशिक्षित भोळया स्वभावाचे, प्रामाणिक व एका अर्थाने भित्रे असल्यामुळे त्यांच्या या गुणावगुणांचा फायदा बाहेरील लोकांनी वेळोवेळी उठविला आहे. आदिवासींचा प्रश्न अलिप्तपणा आणि संपर्क या दोन्ही अवस्थांमध्ये या ना त्या रुपाने कायम राहतो, याला कारण आदिवासींचा मागासलेपणा हा सर्वव्यापी आहे. म्हणजे प्रादेशिक आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक, सामाजिक या चारही क्षेत्रात आदिवासींचा मागासलेपणा सर्व क्षेत्रांतून हटविण्याचे प्रयत्न एकाच वेळी व्हावयास हवेत. या करीता बाहय जगाचा व त्यांच्या संस्कृतीचा संपर्क अपरिहार्यच नव्हे तर इष्टच मानला पाहीजे.

प्रस्तुत पुस्तकात डॉ.गोविंद गारे यांनी आदिवासींच्या समस्याविषयी सविस्तर अध्ययनपूर्वक विवेचन केलेले आहे. अशाच प्रकारे याच धर्तीवर संशोधिकेलाही माना जमातीचे संपूर्ण अध्ययन करणे अपेक्षित आहे व तीने तसा प्रयत्न केलेला आहे.

# संदर्भ सूची


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | प्रा. पाटिल व्ही.बी. | — | महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, | पृ. ६९ |
| | | — | सागर प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००५. | |
| २. | डॉ. सिंह विरेंद्रनाथ | — | ग्रामीण समाजशास्त्र | पृ. ०१ |
| | | — | विवेक प्रकाशन दिल्ली प्रथमावृत्ती १९८८. | |
| ३. | डॉ. सिंह विरेंद्रनाथ | — | ग्रामीण समाजशास्त्र | पृ. १२ |
| | | — | कित्ता | |
| ४. | डॉ. गोखले शरदचंद्र | — | सामाजिक विकासाचे प्रश्न व धोरण | पृ.२४० |
| | | — | व्हिनस प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती ओक्टो. १९८९. | |
| ५. | डॉ. गोखले शरदचंद्र | — | सामाजिक विकासाचे प्रश्न | पृ.२५६ |
| | | — | कित्ता. | |
| ६. | ओडवायर सुशिला | — | सामाजिक संशोधन | पृ. १८ |
| | | — | अनिल मेहता अजब पुस्तकालय कोल्हापूर. | |
| | | — | प्रथमावृत्ती —१९८१ | |
| ७. | गोडबोले वि.ज. | — | समस्या शंभर कोटींची जनगणना—२००१ | पृ. १५ |
| | | — | दास्ताने रामचंद्र आणि कं पुणे. | |
| | | — | प्रथमावृत्ती —२००२ | |
| ८. | डॉ. गोरे गोविंद | — | आदिवासी कलाविश्व | पृ. ०५ |
| | श्री. सोनवाणे उत्तमराव | — | महाराष्ट्र शासन आदिवासी संशोधन व | |
| | | — | प्रशिक्षण संस्था पुणे. | |
| ९. | लोटे रा. ज. | — | सामाजिक व्यवस्था आणि सामाजिक परिवर्तन | पृ. ३० |
| | | — | पिंपळापुरे ॲन्ड कंपनी प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती १९८८ | |
| १० | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ ५१ |
| | | — | कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे—२००३ | |
| ११ | डॉ. सिंह विरेंद्रनाथ | — | ग्रामीण समाजशास्त्र | पृ. १८ |
| | | — | विवेक प्रकाशन दिल्ली प्रथमावृत्ती १९८८ | |
| १२ | डॉ. देवगावकर शैलेजा | — | महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य | पृ. १०७ |
| | | — | श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | प्रा. कुलकर्णी पी. के. | — | समाजशास्त्रातील सैद्धांतिक दृष्टिकोण | पृ.३७६ |
| | | — | मंगेश प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती .२००६ | |
| १४ | संत दु.का | — | संशोधन पद्धती प्रक्रिया व अंतरंग | पृ. ९४ |
| | | — | पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे. | |
| | | — | द्वितीय आवृत्ती. १९८८ | |
| १५ | ओडवायर सुशिला | — | सामाजिक संशोधन | पृ. १७ |
| | | — | कित्ता. | |
| १६ | प्रा.माने. माणिक चंद्रकांत | — | भारतीय समाज | पृ. २७ |
| | | — | विद्या प्रकाशन नागपूर | |
| १७ | **Dr. Mehta B.H.** | - | **Gonds of the Central Indian highlands Volume two** | पृ.६७६ |
| | | - | **Concept publishing company** | |
| | | - | **New Delhi** | |
| १८ | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ. १३ |
| | | — | मानवता सांस्कृतीक विकास व शोधकेंद्र चामोर्शी नोव्हेंबर २००४ | |
| १९ | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ. २० |
| | | — | कित्ता | |
| २० | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ. २० |
| | | — | कित्ता | |
| २१ | **Government of India** | — | **Indian 2007, A Reference Annual 51th Edition.** | |
| | | — | **Ministrg of Information and broad casting** | |
| २२ | **Government of India** | — | **Indian 2007, A Reference Annual 51th Edition.** | |
| | | — | कित्ता | |
| २३ | प्रा. वक्काणीजी नि.आ. | — | आधुनिक विदर्भ का इतिहास | पृ.३९९ |
| | | — | मंगेश प्रकाशन नागपूर, १९८५. | |
| २४ | प्रा. वक्काणीजी नि.आ. | — | आधुनिक विदर्भ का इतिहास | पृ.३९९ |
| | | — | कित्ता. | |
| २५ | मेश्राम गोकुळदास | — | आदिवासी संस्कृतीचे वासरदार आणि त्यांचा धम्म | पृ.१३० |
| | | — | गोकूळदास मेश्राम चंद्रपूर —२००६. | |
| २६ | मेश्राम गोकुळदास | — | आदिवासी संस्कृतीचे वारसदार आणि त्यांचा धम्म | पृ. १३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | — | कित्ता | |
| २७ | जांभुळे म.सि. | — | मानाजमातीचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास | पृ.२९ |
| | | — | श्री माणिकादेवी मंदीर बांधकाम समिती, नागपूर —२००७. | |
| २८ | डॉ. देवगावकर शैलेजा | — | वैदर्भीय आदिवासी | पृ. ७३ |
| | | — | मंगेश प्रकाशन नागपूर २००६. | |
| २९ | लोटे रा.ज. | — | सामाजिक व्यवस्था आणि समाजिक परिवर्तन | पृ. ४० |
| | | — | कित्ता. | |
| ३० | तोमर रामबिहारी सिंह | — | सामाजिक परिवर्तन | पृ. ०४ |
| | | — | श्रीराम मेहरा ॲण्ड कंपनी आगरा | |
| | | — | प्रथमावृत्ती —१९६९ | |
| ३१ | डॉ. भाईटे | — | सामाजिक संस्था | पृ. ०९ |
| | डॉ. बोबडे | — | पिंपळापूरे प्रकाशन नागपूर. | |
| | | — | प्रथमावृत्ती जून १९९० | |
| ३२ | डॉ. आगलावे प्रदिप | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ. ०२ |
| | | — | साईनाथ प्रकाशन, नागपूर. | |
| | | — | प्रथमावृत्ती ऑगस्ट. २००४ | |
| ३३ | डॉ. देवगांवकर शैलजा | — | महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य | पृ. ११६ |
| | | — | कित्ता | |
| ३४ | डॉ. गारे गोविंद | — | आदिवासी कलाविश्व | पृ. ०१ |
| | सोणवाणे उत्तमराव | — | कित्ता. | |
| ३५ | डॉ.गोरे गोविंद | — | आदिवासी कलाविश्व | पृ. ०३ |
| | सोनवाणे उत्तमराव | — | कित्ता. | |
| ३६ | डॉ. देवगावकर शैलजा | — | वैदर्भीय आदिवासी | पृ. ७३ |
| | | — | कित्ता | |
| ३७ | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. ०१ |
| | | — | कित्ता. | |
| ३८ | | — | सुगावा (मासिक) डिसेंबर २००२ | पृ. ०७ |
| | | — | सुगावा प्रकाशन पुणे | |
| ३९ | डॉ. गारे गोविंद | — | बदलाच्या उंबरठयावरील कोकणा आदिवासी | पृ. ०१ |
| | | — | श्री. विद्या प्रकाशन पुणे | |
| ४० | डॉ. गारे गोविंद | — | बदलाच्या उंबरठयावरील कोकणा आदिवासी | पृ.३३० |
| | | — | कित्ता | |
| ४१ | मेश्राम गोकुळदास | — | आदिवासी संस्कृतीचे वारसदार | पृ. १२८ |
| | | — | कित्ता | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४२ | मेश्राम गोकुळदास | — | आदिवासी संस्कृतीचे वारसदार | पृ. १२८ |
| | | — | कित्ता | |
| ४३. | मेश्राम गोकुळदास | — | आदिवासी संस्कृतीचे वारसदार | पृ. १३६ |
| | | — | कित्ता | |
| ४४. | डॉ. गारे गोविंद | — | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती | पृ. ०२ |
| | | — | कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे. २००२ | |
| ४५ | **Dr. Ghurye G.S.** | — | **The scheduled Tribes** | पृ. ०८ |
| | | — | **Third Edition 1963 Popular Prakashan Bombay** | |
| ४६ | **Dr. Ghurye G.S.** | — | **The scheduled Tribes** | पृ. १३३ |
| | | — | कित्ता | |
| ४७ | प्रा. वक्काणीजी नि.आं. | — | आधुनिक विदर्भ का इतिहास | पृ. |
| | | — | कित्ता. | ३९९ |
| ४८ | माया बोरसे | — | सुगावामासिक डिसेंबर २००२ | |
| | | — | कित्ता. | |
| ४९ | डॉ. गोरे गोविंद | — | आदिवासी कलाविश्व | पृ. ७६ |
| | सोनवाणे उत्तमराव | — | कित्ता | |
| ५० | डॉ. गोरे गोविंद | — | आदिवासी कलाविश्व | पृ. १०१ |
| | सोनवाणे उत्तमराव | — | कित्ता | |
| ५१ | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. ०५ |
| | | — | कित्ता | |
| ५२ | राजूरकर अ.ज. | — | चंद्रपूरचा इतिहास | पृ. ९८ |
| | | — | महाकाली प्रकाशन चंद्रपूर | |
| | | — | प्रथमावृत्ती —१९८२ | |
| ५३ | **Dr. Devgaokar S.G.** | — | **The madia of Bhamragadh** | पृ. २८ |
| | | — | **M.C. Mittal Inter . India** | |
| | | — | **Publication Delhi 1982** | |
| ५४ | डॉ. गारे गोविंद | — | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती | पृ. ०१ |
| | | — | कित्ता. | |
| ५५ | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. ३३ |
| | | — | कित्ता. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५६ | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. ३२ |
| | | — | कित्ता. | |
| ५७ | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. ३४, |
| | | — | कित्ता. | ३६,३९ |
| ५८ | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. १८ |
| | | — | कित्ता. | |
| ५९ | ओडवायर सुशिला | — | सामाजिक संशोधन | पृ. १७ |
| | | — | कित्ता | |
| ६० | डॉ. गोरे गोविंद | — | बदलत्या उंबरठयावरील कोकणा आदिवासी | पृ.३३२ |
| | | — | कित्ता | |
| ६१ | डॉ. खडसे भा.कि. | — | सामाजिक मानवशास्त्र | पृ. १५, |
| | | — | मंगेश प्रकाशन नागपूर. | १६ |
| | | — | तृतीय आवृत्ती — १९८९ | |
| ६२ | डॉ. गजबे रमेशकुमार | — | **Mana Scheduled Tribe** | पृ. ४६ |
| | | — | आनंद प्रकाशन नागपूर —२००५ | |
| ६३ | डॉ. गजबे रमेशकुमार | — | **Mana Scheduled Tribe** | पृ. ४५ |
| | | — | कित्ता | |
| ६४ | डॉ. गजबे रमेशकुमार | — | **Mana Scheduled Tribe** | पृ. ४५ |
| | | — | कित्ता | |
| ६५ | डॉ. गारे गोविंद | — | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती | पृ.२२० |
| | | — | कित्ता | |
| ६६ | डॉ. गारे गोविंद | — | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती | पृ. २१९ |
| | | — | कित्ता | |
| ६७ | डॉ. देवगावकर शैलजा | — | वैदर्भीय आदिवासी | पृ. ७२ |
| | | — | कित्ता | |
| ६८ | डॉ. गारे गोविंद | — | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती | पृ.२२० |
| | | — | कित्ता | |
| ६९ | डॉ. देवगावकर शैलजा | — | वैदर्भीय आदिवासी | पृ. ७२ |
| | | — | कित्ता | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७० | डॉ. गजबे रमेशकुमार | — | **Mana Scheduled Tribe** | पृ. ११ |
| | | — | कित्ता | |
| ७१ | डॉ. गजबे रमेशकुमार | — | **Mana Scheduled Tribe** | पृ. ११ |
| | | — | कित्ता | |
| ७२ | डॉ. देवगावकर शैलजा | — | वैदर्भीय आदिवासी | पृ. ७२ |
| | | — | कित्ता | |
| ७३ | डॉ. देवगावकर शैलजा | — | वैदर्भीय आदिवासी | पृ. ७२ |
| | | — | कित्ता | |
| ७४ | डॉ. देवगावकर शैलजा | — | वैदर्भीय आदिवासी | पृ. ७२ |
| | | — | कित्ता | |
| ७५ | डॉ. देवगावकर शैलजा | — | वैदर्भीय आदिवासी | पृ. ७२ |
| | | — | कित्ता | |
| ७६ | डॉ. गारे गोविंद | — | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती | पृ. २१९ |
| | | — | कित्ता | |
| ७७ | राजूरकर अ.ज. | — | चंद्रपूरचा इतिहास | पृ. ३३ |
| | | — | कित्ता | |
| ७८ | राजूरकर अ.ज. | — | चंद्रपूरचा इतिहास | पृ. ९१ |
| | | — | कित्ता | |
| ७९ | मेश्राम गोकुळदास | — | आदिवासी संस्कृतीचे वारसदार | पृ. २३५ |
| | | — | कित्ता | |
| ८० | जुलभे टि.टि. | — | गोंडवनातील ऐतिहासिक मूलचेरा | पृ. ११ |
| | | — | पुरातत्त्व बौद्ध संस्कृती सेवा संघ | |
| | | — | चंद्रपूर १९९२ | |
| ८१ | वाकडे भास्कर | — | मूळनिवासी माना | पृ. १२ |
| | | — | वज्रंकूस प्रकाशक वरोरा—२००६ | |
| ८२ | वाकडे भास्कर | — | मूळनिवासी माना | पृ. १९ |
| | | — | कित्ता | |
| ८३ | वाकडे भास्कर | — | मूळनिवासी माना | पृ. २३ |
| | | — | कित्ता | |
| ८४ | वाकडे भास्कर | — | मूळनिवासी माना | पृ. ७९ |
| | | — | कित्ता | |
| ८५ | वाकडे भास्कर | — | मूळनिवासी माना | पृ. ६३ |
| | | — | कित्ता | |

# प्रकरण २ रे

# अध्ययन क्षेत्राची परिचयात्मक रुपरेखा

# (Profile of Area of Research)

**प्रस्तावनाः—**

''माणसाची भ्रमंती अवस्था संपुष्टात आल्यानंतर माणूस कोठे ना कोठेतरी स्थिर होऊ लागला. सतत प्रयत्नशील असणाऱ्या मानवाने उदरनिर्वाहाची विविध साधने शोधून काढली व निश्चित अशी उदरनिर्वाहाची साधने मानवाला गवसल्यानंतर त्याच्या आयुष्याला स्थिरता लाभली. आद्यपाषाण युगापासून ते धातुयुगापर्यंतचा मानवाचा प्रवास हेच दर्शवितो. जगाच्या कोणत्या ना कोणत्या भुभागावर मानव आपले पाय रोवून स्थिरावू लागला. काहींनी निसर्गाचे वरदान लाभलेल्या मोजक्या लोकवस्तीची खेडी पसंत केली तर काहींनी सुधारलेल्या व उदयोगधंदयांनी बहरुन गेलेल्या शहरांत वस्ती केली. पण काही भुमिपुत्रांनी या सर्व लोकवस्तीपासून दूर व दुर्गम असलेल्या डोंगरकपाऱ्यांत, नद्यानाल्यांत, कडेकपाऱ्यांत आपला तळ ठोकला''.[१]

डॉ.गोविंद गारेंच्या मते, ''कोणताही समाज हा एक प्रादेशिक समूह असतो. प्रत्येक समाजाचे हे प्रभेदक लक्षण आहे. त्याविना कोणताही समाज अस्तित्वात येत नाही. आदिवासी समाजही या नियमाला अपवाद नाही. सामान्यपणे बाहय संपर्कापासून अलिप्त व दुर्गम असलेल्या डोंगराळ भागात आदिम समाजाचे वास्तव्य असते. आदिम समाज हा थोडया लोकांचा समूदाय असतो. ज्या विशिष्ट भू—प्रदेशावर आदिम राहात असतात तो भुप्रदेश मर्यादित असतो. समाजाची संख्या मर्यादित असल्याने त्यांच्या सामाजिक संपर्कावरही मर्यादा पडतात.''[२] त्यामुळे मानव जातीच्या व समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी प्रादेशिक व नैसर्गिक परिस्थितीचे वास्तविक ज्ञान असणे आवश्यक मानले जाते. प्रदेश ही केवळ भौगोलिक संकल्पना नसून त्यात भौतिक, सामाजिक व सांस्कृतिक घटक हे एकरुप झाल्याचे आपणास दिसते. भारतीय

समाज अशा प्रादेशिक समाजांचा मिळून झाला आहे. म्हणून भारतीय समाजाचे सम्यक ज्ञान होण्यासाठी जे भाषिक प्रादेशिक समाज आहेत. त्याचे योग्य ज्ञान होणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून या जिल्हयाचा विचार करण्यात येत आहे. 'तसेच ज्या भागाचा अभ्यास करावयाचा आहे त्यांच्याशी संबंधित भूगोल (Geographical), भुगर्भ (Geological), आणि हवामानासंबंधीची (Metrological) माहिती आवश्यक असते''.[३] कारण हयावरील घटकांचा परिणाम लोकसंख्येची विभागणी, आर्थिक जीवन, निवास प्रकार, भौतिक संस्कृती व मानव जातीच्या जीवन पध्दतीवर पडत असतो व या दृष्टिनेही अध्ययन क्षेत्राचा अभ्यास आवश्यक असतो.

संशोधिकेने ज्या चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासी समाजाचे अध्ययन केले तो चंद्रपूर जिल्हा आदिवासींच्या वास्तव्यासाठी कसा उपयुक्त आहे याचेही अध्ययन करणे आवश्यक आहे.

'आदिवासी जीवनावर सभोवतालच्या भौगोलिक परिस्थितीचा ठसा उमटलेला आहे. भौगोलिक वेगळेपणामुळे आदिवासी जमाती जमातींत आचार–विचार आणि सांस्कृतिक कल्पनाही वेगवेगळया दिसतात. असे असले तरी आजच्या वास्तव्याच्या ठिकाणी आदिवासी एकदम स्थानिय झाले नाहीत.'[४]. ''वैशिष्टयपूर्ण भू–भागामुळेच आदिवासींची आचार पध्दती वेगळी झाली.''[५]. वरील विवेचनावरुन एखादया ठिकाणी राहणाऱ्या व्यक्तीमुळे तेथील भौगोलिक परिस्थिती बदलते किंवा भौगोलिक परिस्थितीमुळे तिथे राहणारे व्यक्ती त्यांचे जीवनमान बदलते याचे अध्ययन मानवशास्त्राच्या आणि समाजशास्त्राच्या अभ्यासकांना अभ्यासाच्या दृष्टिने महत्वपूर्ण ठरते कारण मानवाचा भौगोलिक क्षेत्रावर व भौगोलिक क्षेत्राच्या मानवावर आपोआपच परिणाम होतो. ज्या भागात आदिवासी समाज मोठया प्रमाणात राहतो त्या भागालाच 'आदिवासी क्षेत्र' म्हणून ठरविले व संबोधले जाते तेव्हा विकास करण्यासाठी त्याच दृष्टिने त्या भागाकडे पाहीले जाते. त्यामुळे त्या भागाचा विकास करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहेत ते एका वेगळयाच दृष्टिकोनातून त्या भागाकडे पाहतात असे वाटते आणि म्हणूनच आदिवासी ज्या भागात राहतात तेथील भौगोलिक साधनसंपत्ती मोठी असूनही

त्या भागाच्या विकासाची गती मंदच आहे असे वाटते. उलट त्याच भागातील साधन संपत्तीचा उपयोग इतर भागात नेवून दूसरीकडेच विकास साधला जातो, असेही लक्षात येते. आदिवासी समाज साधाभोळा, गरीब, दूर्बल समजून त्यांना बरेच वेळा विकासाच्या नावाखाली इथून उठ, तिथे बस, तिथून उठ, तिथे बस, अशी त्यांची फरफड केली जाते. शिवाय त्यांच्या जीवन परिस्थितीत कोणताही विकास झाला नसल्याचे जाणवते. उलट तेथील विकासाचा फायदा बिगर आदिवासी समाजच जास्त घेतांना दिसतात आणि आदिवासींना जन्मभर मजूर म्हणूनच राबवून घेण्यात येते असे आढळते. त्यामुळे आदिवासी समाज ज्या भौगोलिक क्षेत्रात राहतो त्या क्षेत्राचेही सखोल अध्ययन विकासाच्या दृष्टिने आवश्यक ठरते.

त्यामुळे विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी समाजाचे समजाशास्त्रीय अध्ययन करतांना त्या भौगोलिक क्षेत्रांचे सूक्ष्म अध्ययन अथवा पुरेपूर माहिती संशोधकाला असणे क्रमप्राप्तच ठरते. म्हणून संशोधिकेने चंद्रपूर जिल्हयाचे विविध स्तरावरुन अध्ययन केलेले आहे. त्यामुळे 'माना' आदिम समाजाची समाज शास्त्रीय अध्ययनात मदत मिळाली.

**जिल्हयाची रुपरेखा:—**

**१) भौगोलिक स्थान:—**

''चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण—पूर्व भागात १८.४ अंश ते २०.५अंश या उत्तर अक्षांशावर व ७८.५अंश ते ८०.६ अंश या पूर्व रेखांश या भौगोलिक पट्टयांमध्ये वसला आहे. जिल्हयाच्या उत्तरेला नागपूर, भंडारा व वर्धा हे जिल्हे असून पूर्वेस गडचिरोली जिल्हा आहे. दक्षिणेस आंध्रप्रदेशातील आदिलाबाद जिल्हा असून पूर्व सिमा वैनगंगा नदीने मर्यादित करुन पश्चिम व दक्षिण सीमांचे रेखांकन वर्धा व वैनगंगा नद्या व माणिककड टेकडयांनी केलेले आहे. निसर्गाने चंद्रपूर जिल्हयाला समृध्द व सुपीक जमीन नियमित वर्षातून अखंड वाहणाऱ्या मोठया नद्या व

नाले तसेच सुमारे ४० टक्के क्षेत्रफळ व्यापणारी वनश्रींची हिरवीगार छत्री, विपुल सुर्यप्रकाश आणि खनिज संपत्तीचे भव्य मोठे साठे याचे वरदान दिले आहे.''[६]

जिल्हयातील सर्व नद्या उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहतात. उत्तर दक्षिण एक दुसऱ्यास समांतर पाणलोट क्षेत्राच्या साखळयांनी नद्याच्या पाणलोट क्षेत्राची जिल्हयाची भूरचना आहे. सपाट भागांचे सर्वसाधारणपणे उंची जिल्हयाच्या उत्तर भागात समुद्र सपाटीपासून ९०० फुट उंच उसून जिल्हयाच्या दक्षिणेकडील सपाट भागांची उंची ४०६ फुट आहे. यावरुन उत्तरेकडून दक्षिणेकडे सर्वसाधारण उतार असल्याचे स्पष्ट होते. ''चंद्रपूर जिल्हयाचे क्षेत्रफळ १०,६९५ चौ.किमी. क्षेत्रफळ आहे. हा जिल्हा आकारमानाने महाराष्ट्र राज्यात १४ व्या क्रमांकावर असून हे क्षेत्र राज्यात ३.५ टक्के आहे.''[७]

## २) प्राकृतिक रचनाः—

जिल्हयाच्या उत्तरेकडील भाग व दक्षिणेकडील भागाच्या मानाने काहीसा रुंद आहे. स्वाभाविकरित्या जिल्हयाचे खालील भाग पडतात. १) मूल—चिमूर टेकडयांचा भाग. २) वर्धा—वैनगंगा नद्याचे सखोल मैदान ३) चांदूरगडचा डोंगराळ भाग.

जिल्हयाच्या उत्तरेकडील भाग उंच आहे. या उंच भागांना चिमूर—पेरजागड —मुल टेकडया म्हणतात. राजूरा तहसिलीत दक्षिण दिशेला चांदूरगड नावाचे डोंगर आहे. मूल आणि चिमूर या दोन टेकडयांच्या रागांमूळे वर्धा आणि पैनगंगा नद्याच्या पाणलोट क्षेत्राची विभागणी झाली आहे.

## ३) चंद्रपूर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमीः—

चंद्रपूर जिल्हयाला ऐतिहासिक दृष्टया अतिशय महत्व आहे. 'गोंडवाना' म्हणून चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयाला पूर्वीपासूनच देशात ओळख आहे. चंद्रपूर

जिल्हयाला स्वत:चा असा प्राचीन इतिहास आहे. तर 'चिमूर–क्रांतीमुळे' देशाच्या लढयात चंद्रपूर जिल्हयाला मोलाचे स्थान मिळाले आहे.

''मौर्य, गुप्त, सातवाहन, चाणक्य, यादव, गोंड, ब्रिटीश, नागपूरकर भोसले अशा अनेकांची कारकिर्द या प्रदेशांनी पाहिली आहे. सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट, नागवंशीय माना यांच्याही राजवटी या प्रदेशाने अनुभवलेल्या आहेत. हिंदू आणि बौध्द राजांनी या प्रदेशावर बराच काळ राज्य केले. त्यानंतर माना राजांनी चंद्रपूरवर राज्य केले. त्यांच्याकडून इ.स.नवव्या किंवा १२ व्या शतकात गोंड राजांनी त्यांच्यांकडून सत्ता काबीज केली.''[८] गोंड राजांनी इ.स. १७५१ पर्यंत राज्य केले. त्यानंतर मराठयांचे राज्य सुरु झाले. मराठयांचा शेवटचा राजा रघुजी भोसलेंचा मृत्यू इ.स. १८५३ मध्ये झाला. त्यांच्या गादीला वारसा नसल्यामुळे नागपूर आणि चंद्रपूरचे राज्य ब्रिटीश राज्याला जोडल्या गेले. त्यानंतर इ.स.१८५४ पर्यत चंद्रपूर स्वतंत्र जिल्हा होते आणि इ.स.१८७४ पर्यत त्यात मुल, वरोरा, आणि ब्रम्हपूरी अशा तीन तहसीली होत्या. इ.स. १९५६ च्या कायद्याप्रमाणे चंद्रपूर जिल्हयाचे मध्यप्रदेशातून बाम्बे राज्यात स्थानांतर झाले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून म्हणजे इ.स. में १९६० पासून चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्राचा भाग आहे. इ.स. १९८२ मध्ये चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन होवून गडचिरोली या नव्या जिल्हयाची निर्मिती झाली.''[९]

आज चंद्रपूर हे नाव प्रचलित असलेला जिल्हा प्राचीन काळी ''लोकापूरा'' या नावाने ओळखला जात असे. याचेच नामांतर काही काळानंतर ''इंद्रपूर'' आणि त्यानंतर ''चंद्रपूर'' असे झाले. ब्रिटीशांच्या कारकिर्दीत हा जिल्हा ''चांदा'' या नावाने ओळखला जाऊ लागला. सन १९६४ मध्ये चांदा हे नाव बदलून पुन्हा चंदपूर असे करण्यात आले.

सन १८७४ मध्ये मद्रास राज्यातील गोदावरी जिल्हा संपूष्टात येऊन त्यातून चार तहसिली चंद्रपूर जिल्हयाला जोडण्यात आल्या व या तहसिलीचे मुख्यालय सिरोंचा ठेवण्यात आले. सन १९०५ मध्ये गडचिरोली मुख्यालय असलेली नवीन तहसिल

निर्माण करण्यात आली. सन १९०७ मध्ये नव्यानेच निर्माण झालेल्या दुर्ग जिल्हयात चंद्रपूर जिल्हयातील जमिनदारीचा काही भाग स्थानांतरित करण्यात आला. याच वर्षी लोअर सिरोंचा तहसिलीतील केरला, अवलका, आणि नुगुर या तीन विभागाच्या जवळ जवळ १५६० चौ.किमी. हिस्सा संलग्न मद्रास राज्यांना स्थानांतरित करण्यात आला. सन १९११ ते १९५५ या काळात जिल्हयाच्या सीमांमध्ये व त्यांच्या तहसिलीमध्ये कोणतेही फेरबदल झाले नाही. सन १९५६ मधील राज्यपुर्नरचनेचा परिणाम म्हणून पूर्वी मध्य प्रदेशात असलेला हा जिल्हा मुंबई राज्यात विलीन करण्यात आला. याच वर्षी हैद्राबाद राज्यातील आदिलाबाद जिल्हयातील राजूरा तहसिल ही नांदेड जिल्हयास जोडण्यात आली. त्यानंतर ती नांदेड जिल्हयातून वगळून सन १९५९ मध्ये चंद्रपूर जिल्हयास जोडण्यात आली. सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा म्हणून गणल्या जाऊ लागला. या वेळी जिल्हयात एकूण सहा तहसिली होत्या. हा जिल्हा आकारमानाने भारतात दुसऱ्या व महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाचा होता. दिनांक १मे१९८१ पासून जिल्हयातील सर्व पंचायत समित्यांना तहसिलीचा दर्जा देण्यात आला. त्यानुसार जिल्हयात सहा ऐवजी एकूण अठरा तालुके झालेत. नंतर प्रशासकीय सोयीसाठी जिल्हयाची दिनांक १६ ऑगस्ट १९८२ रोजी विभाजन करण्यात येवून गडनिरोली, धानोरा, आरमोरी, आरमोरी, कुरखेडा, चामोर्शी, सिरोंचा, अहेरी आणि एरापल्ली या आठ तहसिली नवीन निर्माण झालेल्या गडचिरोली जिल्हयातील समाविष्ठ झाल्यात. परिणामी चंद्रपूर जिल्हयात चंद्रपूर, भद्रावती, वरोरा, चिमूर, नागभिड, ब्रम्हपूरी, सिंदेवाही, मुल, गोडपिंपरी आणि राजूरा या दहा तहसिली आहेत.

''१५ ऑगस्ट १९९३ पासून मूल आणि राजूरा या दोन तहसिलींचे विभाजन होऊन सावली आणि कोरपना या दोन स्वतंत्र तहसिलींची निर्मिती झाली. तसेच १५ ऑगस्ट २००० पासून चंद्रपूर व गोंडपिपरी या दोन तहसिलींचे पुन्हा विभाजन होऊन बल्लारपूर व पोंभूर्णा या पोन स्वतंत्र तहसिलींची निर्मिती झाली. सध्या जिवती ही नवीन तहसिल निर्माण झाली असून चंद्रपूर जिल्हयात एकूण १५ तहसिली आहेत.''[१०]

डॉ.प्रभाकर गद्रे यांनी ‘‘नागपूर राज्याचा उदय आणि आस्थापना पुस्तकात चंद्रपूरचा इतिहास सांगितलेला आहे. त्याचप्रमाणे अ.ज.राजुरकर यांनी त्यांच्या ‘चंद्रपुरचा इतिहास’ या पुस्तकात चंद्रपूरच्या इतिहासाचे सविस्तर वर्णन केलेले आहे. ‘हल्लीच्या ज्या ठिकाणी चंद्रपूर वसले आहे, त्या जागेवर कृतयुगात लोकपूर नावाचे एक मोठे शहर असून तेथे कृतध्वज नावाचा राजा राज्य करीत होता. अशी आख्यायिका आहे. त्याच्या नंतर त्याचा पुत्र सुनंद याने राज्य केले. सुनंदाचे राज्य चालु असतांनाच येथे महाकाली देवी स्वयंभू प्रकट झाली. पुढे परशुरामाने २१ वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय केली. त्याने क्षत्रियांचे लोकापूरचे राज्य नष्ट केले.’’[११)] कलियुगाच्या प्रारंभी चंद्रहास्य नावाच्या राजाने आपल्या कौंतलपुर या राजधानीचा त्याग केला व महाकाली अंचलेश्वर ही ठिकाणे पाहून तेथे आपली राजधानी वससिली. त्या राजधानीस आपल्या नावावरुन चंद्रपूर, इंदूपुर असे नाव दिले अशी आख्यायिका आहे.’’[१२)] विदर्भ हा एक प्राचीन प्रदेश असून पूर्वी हा प्रदेश दक्षिणायन नावाने ओळखल्या जाई. विदर्भ नामक राजाने येथे आर्यांची वसाहत करुन त्यांना भरभराटीस आणले. म्हणून त्याला विदर्भ असे नाव पडले अशी आख्यायिका आहे.’’[१३] चालुक्य सम्राट कुलोत्तुंग द्वितीय राजेंद्र हा दिग्विजयास निघाला असता त्याने वजिराकर (वैरागड) व चक्रकोटय (बस्तर) येथे इ.स. १०७० च्या सुमारास मोठे विजय संपादन केले होते. त्याने वैरागड (चंद्रपूरच्या ईशान्येस ८० मैलांवर) येथे शत्रुचे हत्ती पकडले होते. वैरागड येथे त्याकाळी नागवंशीय माना जातीचे राजे होते.’’[१४] पूर्व विदर्भावर राष्ट्रकुट व चालुक्यांचा अंमल चालु असतांना वैनगंगेच्या पूर्वेस वैरागड येथे नागवंशीय माना जातीच्या राजांनी आपली सत्ता स्थापन केली होती.

नवव्या शतकात वैरागड येथे ‘माना’ जातीच्या नागवंशीय राजांनी सत्ता स्थापन केली. पहिला राजा कुसुमप्रहोद होय. याने वैरागड, गडबोरी, राजोली येथे किल्ले बांधले. दुसरा राजा सुर्जत बडवाईक. त्याने एक किल्ला बांधून त्यास आपल्या नावावरुन सुजरगड असे ठेवले. हा किल्ला चंद्रपूरच्या आग्नेयेस अहेरी जमीनदारीत

एका डोंगरावर आहे. शेवटच्या राजाचे नाव गहिलू होते. त्याने माणिकगड हा प्रसिध्द किल्ला बांधला. हा किल्ला चंद्रपुरहून २७ मैलांवर दक्षिणेस राजूरा तालुक्यात आहे.

इ.स.च्या नवव्या शतकापासून तो बाराव्या शतकापर्यत म्हणजे गोंडाचा उदय होईपर्यत या नागवंशीयांचे राज्य दक्षिणेस माणिकगडपर्यत व पूर्वेस भांदकपर्यत पसरले होते. नागराजे हे स्वतंत्र कधीच नसत. मोठया सत्तेचे त्यांच्यावर स्वामित्व असे. या प्रदेशांवर वैरागडच्या नाग राजांचा अंमल चालु असतांनाच त्यांचे स्वातंत्र बाराव्या शतकात संपुष्टात आले व रतनपुरच्या हैदयवंशी राजा जाज्वल्लदेव यांचे मांडलिकत्व पत्करुन त्यास वैरागडचे राजे कारभार देवू लागले. रतनपूर (छत्तीसगड कोसल) इ.स. १११४ च्या शिलालेखात जाजल्लदेव हा वैरागड, लांजी (बालाघाट) व भनारा (भंडारा) येथील सत्ताधिशांपासून कारभार होत असल्याचा उल्लेख सापडतो.''[१५] रामचंद्रदेव यादवाने इ.स.१३१० मध्ये वज्राकाराच्या (वैरागडच्या) राजाचा समूळ उच्छेद केल्याची माहिती उपलब्ध आहे. तरी ही अखेरची धडपड दिसते. त्यांना या प्रदेशावरील आपली सत्ता जास्त दिवस टिकविता आली नाही असे दिसते. याचे कारण म्हणजे त्यांना उत्पन्न झालेले नवीन मुसलमान शत्रु होय. तिकडे वैरागडच्या नाग राजांचीही सत्ता दुर्बळ झाली होतीच. त्याचा फायदा शिरपूर माणिकगड विभागातील गोंडांनी ताबडतोब घेतला व तेराव्या शतकात त्यांनी राज्य स्थापन केले.''[१६] राजगोंड जमातीतच बाराव्या शतकात कोल, भिल्ल नावाचा एक महापराक्रमी पुरुष जुनगाव–मोवाड ते शिरपूर माणिकगड या भागात उदयास आला. त्याने देवगिरीच्या यादवांची व वैरागडच्या नागवंशीय माना राजांची सत्ता संपुष्टात आलेली पाहून इतस्तत: विखुरलेल्या गोंडांना राजकीय दृष्टया संघटित केले व नागांपासून काही प्रदेश व माणिकगडच्या बळकट किल्ला जिंकून घेतला. व गोंड राज्याचा पाया घातला.''[१७] ''युसुफ आदिलखानाने नागराजाने बांधलेला (वैरागडचा) बळकट किल्ला पाडून जमीनदोस्त केला. सोबत खाणीतील हिरे व लुट घेऊन व वैरागड येथे काही सैन्य ठेवून तो लांजी (जि.बालाघाट) येथे गेला.''[१८] ''गोंडांचे वंशातील दहावा राजा खांडक्या

बल्लारशहा झाला. यांनी बल्लारपुर आणि चांदा येथील किल्ले बांधले आणि जुनोन्यास महाल आणि तळे बांधले.''[१९]

४) चंद्रपूर जिल्हयातील चिमूर क्रांतीः–

चिमूर आष्टी क्रांती विदर्भातील राष्ट्रीय आंदोलनातील इतिहासातील एक महत्वपूर्ण घटना आहे. चिमूर आणि वर्धा जिल्हयातील आष्टी येथील 'भारत छोडो आंदोलनातील' घटना जवळजवळ सारख्याच होत्या. चिमूर क्रांतीची विशेषता ही आहे की येथील आंदोलनाची सुरुवात बालाजी नावाच्या एका मुलाने केली. १४ ऑगस्टला चिमूर येथील १५ वर्षीय बालाजी रायपुरकरने जो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक होता, त्याने प्रभातफेरी काढली. ज्यात त्यांनी भारतमाता की जय अशा घोषणा दिल्या. रात्री त्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे भजन 'पत्थर बम होंगे और लाठीयॉ बन्दुके' ऐकले होते. त्यामुळे त्याने सकाळी शोभायात्रेची तयारी केली. परंतु कुणीही त्याला साथ दिली नाही. त्यामुळे त्याने १५ ऑगस्टला लहान–लहान मुलांना घेवून पुन्हा प्रभातफेरी काढली. पोलीसांनी त्यांना अडवलं. परंतु तुकडोजी महाराजांनी मध्यस्ती केल्यावर पोलीस मागे हटले. बालाजीला आनंद झाला. दुसऱ्या दिवशी पुन्हा मोठया प्रमाणात पोलीस मागवले गेले. त्यात जरासंध नावाचा सर्कल इन्स्पेक्टर होता. १६ ऑगस्ट १९४२ च्या सकाळी सेवादलाच्या कार्यकर्त्यांना अटक झाली. चोहीकडे पोलीसांचा पहारा बसवला. मुले गणवेश घालून एकत्रित झाले. पोलीसांनी त्यांचा झेंडा हिसकावून घेतला आणि त्यांच्यावर लाठीचार्ज केला. जरासंघाने झेंडयाला पायाखाली तुडविले. जे बालाजीला आवडले नाही. प्रभातफेरी सेवादल मैदानात आली. तिथून निघून बालाजी मंदीराजवळ आली. पोलीसांनी प्रभातफेरी प्रमुख गोपाळा कोरेकार यांना अटक केली. मुले गोपाळाला सोडविण्यासाठी धावली. त्यांना पोलीसांच्या काठयांची भीती वाटत नव्हती. पोलीसांनी निःशस्त्र मुलांवर लाठीचार्ज केला. त्यामुळे लोक चिडले आाि लाठीचार्जची आज्ञा देणाऱ्या पोलीसांना त्यांनी काठयांनी मारायला सुरुवात केली. तेव्हा सर्कल इन्स्पेक्टर जरासंघ यांनी गोळया घालण्याचे आदेश दिले. लोकांनी बालाजीला समजावले. परंतु बालाजीने करेंगे या मरेंगे ची घोषणा दिली. लोक एस.

डी.ओ. डुंगाजी यांना समजावायला डाक बंगल्यावर गेले परंतु त्यांनी लोकांना बदमाश म्हटले आणि इन्स्पेक्टरची बाजू घेतली आणि ते आपली बंदूक आणायला आत गेले. शास्त्रकार नावाच्या माणसाने त्यांच्यामागे जाऊन त्यांना आणि तहसिलदाराला पकडले आणि दोघांना बाहेर आणून काठया काठयांनी त्यांना मारुन टाकले आणि डाकबंगल्याला आग लावली. लोक परत आले आणि पोलीस बंदुका घेवून समोर आले. लोकांनी त्यांना रस्ता दिला. पोलीस पुढे आले. पट्टी बांधून जरासंध सोबत होता. लोक जयघोष करत पूढे आले. एवढयात पोलीसांनी मागून त्यांच्यावर गोळया झाडल्या. लोक घाबरले. परंतू मुले पुढे झाले. बालाजी पुढे होता. मुले आणि माणसे पोलीसांवर दगड फेकू लागले. एकीकडे सशस्त्र पोलीस आणि दोन अधिकारी आणि दुसरीकडे नि:शस्त्र दीड हजार लोक होते. दोघांमध्ये संघर्ष पेटला. पोलीस मागे हटले. बालाजी पुढे झाला. पोलीस मागे पळायला लागले. क्षुब्ध समुदाय मागे धावला. एक मैलपर्यत पळाल्यावर पोलीस लोखंडी पुलाच्या मागे लपले. पुन्हा अर्धा तास संघर्ष चालला. गोळया संपत आलेल्या पाहताच पोलीस समोर येवून गोळया घालू लागले. एक गोळी बाबुलाल झिरे यांच्या छातीवर लागली. तो जमीनीवर पडला. लोक चिडले. मुलांना मागे करुन लोक समोर आले. बालाजी पुढे झाला. गोळयांच्या माराला न घाबरता तो दगड फेकू लागला. त्याला गोळी लागली आणि तो पडला. जांभुरे, सिताराम लाखे, श्रीराम सालेवार, बाजीराव इत्यादी लोक घायाळ होऊन पडले. करेंगे या मरेंगे ची गर्जना गुंजली. लोकांनी दगडांचा वर्षाव केला. पोलीस बंदुका आणि पोषाख टाकून पळायला लागले. जरासंघाने बंदुकीच्या संगीनीने सखाराम सालेवारला जखमी केले. सालेवार यांची मदत करायला शास्त्रकार धावला. दोघांनी मिळून जरासंघाला मारुन टाकले. चिमूर सब– इन्स्पेक्टर तथा कांताप्रसाद पुलीस शिपाई शरण आले. बालाजी राघोबाजी रायपूरकर चिमूर क्रांतीयुध्दात प्रथम शहीद झाला.''[२०] आणि चिमूर क्रांती म्हणून १६ ऑगस्ट १९४२ चा दिवस भारताच्या स्वातंत्रलढयात सोनेरी अक्षरांनी लिहील्या गेला.

## ४) जिल्हयाचे स्वरुपः—

जिल्हा पातळीवरील राज्य कारभार जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत चालावा म्हणून ''महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१'' हा नवीन कायदा केलेला आहे. त्या कायद्याने क्र.६ प्रमाणे प्रत्येक जिल्हयासाठी एक जिल्हा परिषद आणि क्र.५६ प्रमाणे जिल्हयतील प्रत्येक गटासाठी एक पंचायत समिती स्थापन केलेली आहे. ग्रामपंचायतीवरील नियंत्रणासाठी स्थापन केलेली जिल्हा ग्रामपंचायत मंडळाची तरतूद आता रद्द करण्यात आली असून तो अधिकार ''जिल्हा परिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषदेची स्थायी समिती अगर मुख्य कार्यकारी अधिकारी'' हयांचेकडे देण्यात आलेला आहे.

चंद्रपुर जिल्हा दृष्टिक्षेपात (जुलै २०१० ची स्थिती)

१. भौगोलिक क्षेत्रफळ — १०६९५.०० वर्ग किमी.
२. जंगलव्याप्त क्षेत्र — ३,९४,००० हेक्टर
३. पिकाखालील एकूण क्षेत्र — ५,७६,७०० हेक्टर
४. गावे — एकूण १७९१, आबादी १४४२, ओसाड ३४९
५. आदिवासी/अतिरीक्त उपयोजना क्षेत्रातील एकूण गावे — ७५४
६. माडा/मिनी माडा क्षेत्रातील एकूण गावे — २९५
७. जंगल ग्रस्त गावे — ७४७
८. विशेष कृती कार्यक्रमाअंतर्गत तालुके — ९
९. दलीत वस्ती असलेली गावे — ७९६
१०. अनुसुची क्षेत्रातील गावे — १८२
११. नागरी हक्क संरक्षण अंतर्गत संवेदनशिल गावे — १३९
१२. शहरे — १५
१३. तालुके — १५
१४. पंचायत समित्या — १५

१५. ग्रामपंचायती – ८४७

१६. गटग्रामपंचायती – ४५२

१७. स्वतंत्र ग्रामपंचायती – ३९५

१८. एकात्मिक बालविकास प्रकल्प – १५

१९. एकात्मिक आदिवासी विकास गट – २

२०. नगर परिषदा – ७

२१. पोलीस स्टेशन – २१

२२. पोलीस आउट पोष्ट – २९

२३. महसूल सर्कल – ३८''[२१]

## ५) जिल्हा परिषद आणि पंचायत समित्याः–

१०६९५ चौ.किमी.क्षेत्रफळ असलेला चंद्रपूर जिल्हा आकारमानाने महाराष्ट्र राज्यांत १४ व्या क्रमांकावर असून हे क्षेत्र राज्यांत ३.५ टक्के आहे. जिल्हयाचे मुख्यालय चंद्रपूर हे मुंबईपासून ८७६ किमी. आहे. जिल्हयाच्या एकूण भौगोलिक क्षेत्राचा विचार केला असता १९ टक्के क्षेत्र असलेला राजुरा तालुका सर्वात मोठा तरे ५ टक्के असलेला मूल हा सर्वात लहान तालुका आहे. २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयात एकूण १८०५ गावे असून त्यापैकी १४८८ आबादीची व ३१७ उजाड आहेत.

सर्वात जास्त ओसाड खेडी 'चिमुर' मध्ये ७५ आहे तर सर्वात कमी बल्लारपूर तहसिलीत ६ आहे.

चंद्रपूर नगरपरिषद 'अ' वर्गिय असून बल्लारपूर 'ब' वर्गीय आहे. इतर नगरपरिषदा ५ 'क' वर्गिय आहेत. तसेच भद्रावती नगरपरिषद ही दिनांक १५ ऑगस्ट १९९७ रोजी स्थापन करण्यात आली. जिल्हयात एकूण ८४७ ग्रामपंचायती असून त्यातील एकूण सदस्य संख्या ६५९७ आहेत. तालुक्याचा ठिकाणी प्रत्येकी एक अशा एकूण १० कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत.'' [२२] सध्या चंद्रपूर जिल्हयात चंद्रपूर,

बल्लारपुर, राजूरा, पोंभूर्णा, कोरपना, जिवती, मूल सावली, सिंदेवाही, चिमूर, नागभीड, ब्रम्हपूरी, वरोरा, भद्रावती, गोंडपिंपरी इ. १५ एकूण १५ तहसिली आहेत.

**६) लोकसंख्या:–**

''जनगणना २००१ नुसार भारतातील अनुसूचीत जमातीची लोकसंख्या ८. ४३ करोड म्हणजे ८.२ टक्के आहे. महाराष्ट्रातील लोकसंख्या ९६,८७८,६२७ असून अनुसूचित जमातीची लोकसंख्या ८५,७७,२७६ म्हणजे ८.९ टक्के आहे.''[२३]

जनगणना २००१ च्या प्रकाशनानुसार जिल्हयात –

एकुण लोकसंख्या – २०,७१,१०१

पुरुष – १०,६२,९९३

स्त्रिया – १०,०८,१०८ आहेत.

चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रफळ १०,५२१ चौ.किमी. व १७४ चौ. किमी. शहरी आहे.

सरासरी प्रत्येक तहसिलमागे १०५ आबादी गावे आहेत. जनगणना २००१ प्रमाणे ग्रामीण भागातील लोकसंख्या – १४,०६,०३४ (६७.८९टक्के) आणि ६,६५,०६७ (३२.११टक्के) लोकसंख्या शहरी भागात राहणारी आहे.

तक्ता क्रमांक 1.1

## 2001-च्या जनगणनेनुसार तालुकावार क्षेत्रफळ, घरे, व लोकसंख्या

जिल्हा - चंद्रपूर

| अ. क्र. | तहसील | बाव | क्षेत्र चौ. कि. मी. [१९८१ नुसार] | दर चौ. कि. मध्ये लोकसंख्या | गांवे संख्या: वस्ती असलेली | गांवे संख्या: ओसाड | शहरे संख्या | आकडे हजारात: वापरातील निवासी गृहे संख्या | आकडे हजारात: कुटुंबे संख्या वस्ती असलेली | लोकसंख्या: एकूण | लोकसंख्या: पुरुष | लोकसंख्या: स्त्रिया |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | चंद्रपूर | एकूण | 941 | 477 | 80 | 10 | 5 | 96 | 102 | 448631 | 226832 | 221799 |
| | | ग्रामीण | 848 | 101 | 80 | 10 | 0 | 24 | 26 | 86058 | 44735 | 41323 |
| | | नागरी | 93 | 3899 | 0 | 0 | 5 | 72 | 76 | 362573 | 182097 | 180476 |
| 2 | भद्रावती | एकूण | 1121 | 140 | 124 | 31 | 2 | 28 | 29 | 156720 | 81073 | 75647 |
| | | ग्रामीण | 1121 | 140 | 124 | 31 | 0 | 21 | 22 | 85248 | 43543 | 41705 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 7 | 7 | 71472 | 37530 | 33942 |
| 3 | वरोरा | एकूण | 1184 | 140 | 153 | 35 | 1 | 32 | 35 | 166151 | 85917 | 80234 |
| | | ग्रामीण | 1163 | 107 | 153 | 35 | 0 | 23 | 25 | 123911 | 63980 | 59931 |
| | | नागरी | 21 | 2011 | 0 | 0 | 1 | 9 | 10 | 42240 | 21937 | 20303 |
| 4 | चिमुर | एकूण | 1015 | 156 | 178 | 75 | 0 | 30 | 31 | 157828 | 80948 | 76880 |
| | | ग्रामीण | 1015 | 156 | 178 | 75 | 0 | 30 | 31 | 157828 | 80948 | 76880 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | नागभिड | एकूण | 656 | 190 | 114 | 24 | 0 | 24 | 26 | 124358 | 62740 | 61618 |
| | | ग्रामीण | 656 | 190 | 114 | 24 | 0 | 24 | 26 | 124358 | 62740 | 61618 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | ब्रम्हपूरी | एकूण | 943 | 162 | 111 | 25 | 1 | 29 | 31 | 153112 | 77388 | 75724 |
| | | ग्रामीण | 921 | 132 | 111 | 25 | 0 | 23 | 25 | 121912 | 61341 | 60481 |
| | | नागरी | 22 | 1418 | 0 | 0 | 1 | 6 | 6 | 31200 | 15957 | 15243 |
| 7 | सिंदेवाही | एकूण | 620 | 171 | 92 | 22 | 0 | 20 | 21 | 106286 | 53397 | 52889 |
| | | ग्रामीण | 620 | 171 | 92 | 22 | 0 | 20 | 21 | 106286 | 53397 | 52889 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | मुल | एकूण | 495 | 222 | 78 | 27 | 1 | 19 | 20 | 109947 | 55646 | 54301 |
| | | ग्रामीण | 471 | 186 | 78 | 27 | 0 | 16 | 16 | 87691 | 44326 | 43365 |
| | | नागरी | 23 | 968 | 0 | 0 | 1 | 3 | 4 | 22256 | 11320 | 10936 |

तक्ता क्र. 1.1 पुढे चालु..

तक्ता क्रमांक 1.1

## 2001 च्या जनगणनेनुसार तालुकावार क्षेत्रफळ, घरे, व लोकसंख्या

जिल्हा - चंद्रपूर

| अ. क्रं. | तहसील | बाब | क्षेत्र चौ. कि. मी. [१९८१ नुसार] | दर चौ. कि. मध्ये लोकसंख्या | गांवे संख्या | | शहरे संख्या | आकडे हजारात | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वस्ती असलेली | ओसाड | | वापरातील निवासी गृहे संख्या | कुटुंबे संख्या वस्ती असलेली | लोकसंख्या | | |
| | | | | | | | | | | एकूण | पुरुष | स्त्रिया |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 9 | सावली | एकूण | 633 | 165 | 97 | 14 | 0 | 20 | 20 | 104583 | 52201 | 52382 |
| | | ग्रामीण | 633 | 165 | 97 | 14 | 0 | 20 | 20 | 104583 | 52201 | 52382 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 10 | गोंडपिपरी | एकूण | 1076 | 69 | 89 | 9 | 0 | 23 | 24 | 74574 | 37924 | 36650 |
| | | ग्रामीण | 1076 | 69 | 89 | 9 | 0 | 23 | 24 | 74574 | 37924 | 36650 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | राजुरा | एकूण | 1242 | 140 | 127 | 14 | 3 | 27 | 29 | 173809 | 89913 | 83896 |
| | | ग्रामीण | 1228 | 98 | 127 | 14 | 0 | 22 | 24 | 120869 | 61972 | 58897 |
| | | नागरी | 14 | 3781 | 0 | 0 | 3 | 5 | 5 | 52940 | 27941 | 24999 |
| 12 | कोरपना | एकूण | 768 | 157 | 143 | 12 | 0 | 19 | 20 | 120619 | 62486 | 58133 |
| | | ग्रामीण | 768 | 157 | 143 | 12 | 0 | 19 | 20 | 120619 | 62486 | 58133 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | बल्लारपूर | एकूण | 0 | 0 | 30 | 6 | 0 | 0 | 0 | 133660 | 69223 | 64437 |
| | | ग्रामीण | 0 | 0 | 30 | 6 | 0 | 0 | 0 | 43665 | 22649 | 21016 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 89995 | 46574 | 43431 |
| 14 | पोंभुर्णा | एकूण | 0 | 0 | 58 | 13 | 0 | 0 | 0 | 47631 | 24187 | 23444 |
| | | ग्रामीण | 0 | 0 | 58 | 13 | 0 | 0 | 0 | 47631 | 24187 | 23444 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जिल्हा एकुण | एकूण | 10695 | 194 | 1474 | 317 | 14 | 367 | 388 | 2077909 | 1059875 | 1018034 |
| | | ग्रामीण | 10521 | 134 | 1474 | 317 | 0 | 265 | 280 | 1405233 | 716519 | 688714 |
| | | नागरी | 174 | 3866 | 0 | 0 | 14 | 102 | 108 | 672676 | 343356 | 329320 |

टीप - 1) ही आकडेवारी केवळ अस्थाई व पुढिल पडताळणीच्या आधीन राहुन आहे.
2) रकाना क्र. 9,10 ची आकडेवारी 1991 नुसार असुन उर्वरित आकडेवारी 2001 नुसार आहे. तसेच रकाना क्र. 4 ची आकडेवारी 1981 नुसार आहे. त्यानुतर निर्मित तालुक्याचे क्षेत्रफळ त्यात समाविष्ट गावाच्या क्षेत्रफळाची बेरीज करुन काढण्यांत आली आहे. 3) पोंभुर्णा व बल्लारपूर नवनिर्मित तालुक्यांची रकाना क्र. 4, 9 व 10 ची माहिती उपलब्ध नाही. 4) आकडे पुर्णांकात केल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

आधार - 2001 ची जनगणना

## ७) लोकसंख्येची घनता: —

राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी ३.४८ टक्के क्षेत्र असलेल्या या जिल्हयात राज्याच्या २.२५ टक्के लोक राहतात. लोकसंख्येच्या तुलनेत क्षेत्र अधिक असल्यामुळे लोकसंख्येची घनता ही राज्याच्या दर चौ.किमी. ला २५५.९१ आणि देशाच्या २६७ घनतेपेक्षा कमी म्हणजे १९४.२८ होती. चंद्रपूर तालुक्यामध्ये लोकसंख्येची घनता सर्वाधिक म्हणजे ४७७ ही असून गोंडपिंपरी तालुक्यामध्ये सर्वात कमी म्हणजे ७० इतकी आहे.

चंद्रपूर जिल्हयात लोकसंख्येची घनता ११५ प्रति वर्ग किमी. एवढी आहे.

## ८) ग्रामीण व नागरी लोकसंख्येचे प्रमाण:—

जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६७.६३ टक्के लोक खेडयात तर ३२. ३७ टक्के लोक शहरात राहतात. नागरी लोकसंख्या एकूण ६.७३ लक्ष असून सर्वाधिक म्हणजे ५३.९० टक्के लोक चंद्रपूर नगरपरिषद क्षेत्र या पहिल्या क्रमांकाच्या शहरात राहतात. जिल्हयातील मूल नगरपरिषद सर्वात लहान असून त्यात जिल्हयाच्या नागरी लोकसंख्येच्या केवळ ३.३१ टक्के लोक राहतात.

## ९) लोकसंख्येतील स्त्री—पुरुष प्रमाण २००१ जनगणनेनुसार:—

जिल्हयात दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९४८ असून महाराष्ट्राच्या ९२२ च्या तुलनेत २६ ने अधिक आहे. ग्रामीण व नागरी भागात हे प्रमाण अनुक्रमे ९६१ आणि ९६९ इतके आहे.

## जन्ममृत्यूचे प्रमाण:—

सन २००० मध्ये जिल्हयात एकूण ४०२३५ जन्म नोंदविल्या गेलेत. तर दर हजार लोकसंख्येमागे नोंदविलेल्या जन्माचे प्रमाण १९.३६ होते. याच वर्षी मृत्युच्या एकूण नोंदीची संख्या १०७५६ होती. नोंदविल्या गेलेल्या एकूण मृत्युपैकी बालमृत्यू ५५८ होते. नोंदविलेल्या मृत्युचे दर हजारी प्रमाण ५.१८ इतके होते.

**साक्षरताः—**

२००१ च्या जनगणणेप्रमाणे एकूण लोकसंख्येच्या ७३.०७ टक्के लोकसंख्या साक्षर असून ग्रामीण भागातील साक्षरतेचे प्रमाण ६७.९० टक्के, तर नागरी भागातील साक्षरतेचे प्रमाण ८३.७० टक्के आहे. पुरुष आणि स्त्रिया यांची साक्षरतेची टक्केवारी अनुक्रमे ८३.१९ आणि ६२.५६ आहे. चंद्रपूर आणि बल्लारपूर या तालुक्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक आहे तर पोंभूर्णा तालुक्यात सर्वात कमी आहे. ''[२५]

**वापरातील निवासी घरे व कुटुंबः—**

१९९१ च्या जनगननेनुसार चंद्रपुर जिल्हयातील जनगणना घराची एकूण संख्या ४८०९८० तर कुटुंब संख्या ३५९०८५ इतकी आहे. यापैकी प्रत्येकी ७५ टक्के निवासी घरे आणि कुटुंबे ग्रामीण भागात आहे. एकूण कुटुंबाच्या संख्येत बेघर कुटुंबाचा समावेश आहे.

**वनः—**

'२०००—२००१ या वर्षात जिल्हयातील ५०८४ चौ.कि.मी. क्षेत्र वनाखाली असून जिल्हयाच्या क्षेत्रफळाशी त्याचे प्रमाण ४७.५४ टक्के इतके आहे. जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार या जिल्हयातील सन १९९९—२००० मधील एकूण क्षेत्र ४५३१ हेक्टर आहे. हे क्षेत्र जिल्हयाच्या एकूण क्षेत्राच्या ४१.५० टक्के आहे. चंद्रपूर जिल्हयातील एकूण भौगोलीक क्षेत्र १०६९५ चौ. किमी. असून जंगलव्याप्त क्षेत्र ४५३१ चौ.कि.मी. आहे. म्हणजे सुमारे ४१.५० टक्के भाग जंगल्यव्याप्त क्षेत्र आहे.''[२६]

### जिल्हयातील वनक्षेत्र वर्ष २०००—२००१ (वनक्षेत्र चौ.कि.मी.)

| अ. क्र. | विभाग | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | महसूल विभाग | ० | ० | १०१ | १०१ |
| २ | वन—विभाग | ४०४६ | ८७३ | ६४ | ४९८३ |
| ३ | जिल्हा एकूण | ४०४६ | ८७३ | १६५ | ५०८४ |

**वन्यपशुपक्षीः—**

हरीण, रानमांजर, मोर, घोरपड, सरपटणारे प्राणी, निळकंठ, भारद्वाज, दोन शेपटयांचा लहान बुलबुल हे प्राणी व पक्षी प्रामुख्याने आढळून येतात.

त्याप्रमाणे जंगलात वाघ, सिंह, अस्वल हे प्राणी आढळतात, परंतु त्याचे प्रमाण आता कमी होत आहे. जंगलात माकडे, लांडगे, रानकुत्री, ससा, मोर, मिट्टू, पानकोंबडी, डुकर, रानडुकर, म्हैस, निलगाय, हरीण, रानहेला, इत्यादी प्राणी पक्षीही आढळतात. ताडोबा—अंधारी अभयारण्यातील मुख्यतः वाघ व अन्य वन्यप्राणी पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी असते. चंद्रपूर जिल्हयातील जंगलात, खेडयांना वाघांची अतिशय भिती असते. कारण शेतातील पिकांवर ताव मारण्यासाठी रोजच्या रोज डुकरांच्या तसेच हरीणांच्या मागे वाघ येतात व गावातील गुरेढोरे तसेच मानवाला धोका असतो.

**वनोत्पादनः—**

गोडबोले यांच्या मते, 'अर्थव्यवस्थेत संपत्ती निर्माण करणाऱ्या घटकांपैकी सर्वात महत्वपूर्ण घटक म्हणजे श्रम. पूर्वी निसर्गपंथी विचारवंतांनी लिहून ठेवले आहे की, निसर्ग ही संपत्तीची जननी असून श्रम हा पिता आहे. निसर्ग हा संपत्ती निर्माण

करणारा घटके आहे. पण स्वत: निष्क्रीय आहे. त्याला श्रम या क्रियाशील घटकाची जोड मिळाली की मगच संपत्ती निर्माण होते.''[२७]

''वनोत्पादनापासून जिल्हयाच्या सन २०००–२००१ मध्ये १४.०० कोटी रुपयाचे उत्पन्न झाले. सर्वाधिक उत्पन्न हे बांबू, बिडीपाने (तेंदुपत्ता) पासून मिळाले असून त्याखालोखाल उत्पादन हे इमारती लाकूड यापासून मिळाले. वनोत्पादन जास्तीत जास्त वाढविण्याच्या दृष्टिने सार्वजनिक व पंचायतीच्या जमिनीवर झाडांची लागवड करणे, रस्ते व कालवे यांच्या बाजुने झाडे लावणे, तसेच मुलागणिक झाडे लावणे वगैरे योजना ही सामाजिक वनीकरण विभागाकडून राबविली जातात.''[२८]

प्रा.डॉ.नि.आ. वक्काणीजी यांच्या मते, ''चंद्रपूर जिल्हयाच्या जवळपास अर्धा भुभाग जंगलांनी व्याप्त आहे. चंद्रपूर जिल्हयातील जंगलात बांस (बांबूचे) प्रमाण अत्याधिक आहे.''[२९] जंगलातील सागवान तथा बांबुचा मोठा व्यापार चंद्रपूर जिल्हयात चालतो. निसर्गाने चंद्रपूर जिल्हयाला लाकडाचं वरदान दिले आहे. लाकूड कापण्याचे कारखाने चंद्रपूर तथा अमरावती जिल्हयात खूप आहेत. चंद्रपूर मधील जंगलामुळे बल्लारपुरला कागद कारखाना आहे. महाराष्ट्रील जंगलाचा चौथा हिस्सा एकटया चंद्रपूर जिल्हयात आहेत. तरीसुध्दा लाकूड व कागद कारखान्यांत प्रतिदिन रोजगार पाहिला तर एकटया चंद्रपूर जिल्हयात ३२८४, विदर्भात ८७९२ आणि विदर्भाच्या बाहेर ४७,९२८ आहेत. जंगलांशी संबंधित कारखान्यांची संख्या चंद्रपूर जिल्हयात केवळ ८ आहे. विदर्भात २१६ आणि विदर्भाबाहेर १०२१ एवढी मोठी आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, चंद्रपूर जिल्हयातील जंगल संपत्ती विपूल असूनही त्याकडे विशेष लक्ष दिले गेले नाही. ''[३०]

## जंगलातून मिळणारा राजस्व

| अ.क्र. | जिल्हा | वर्ष | रिवेन्यु | एक्सपेनडिचर | सरप्लस |
|---|---|---|---|---|---|
| १ | भंडारा | १९०५—०६ | ६२,००० | ३२,००० | ३०,००० |
| २ | चांदा | १९०५—०६ | १,५३,००० | ४०,००० | ७३,००० |
| ३ | नागपूर | १९०६—०७ | ९२,००० | ३८,००० | ५४,००० |
| ४ | वर्धा | १९०४—०५ | ४७,००० | १०,००० | ३७,००० |
| ५ | यवतमाळ | १९०६—०७ | २,१६,००० | — | — |

यावरुन हे स्पष्ट होते की, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्हयातील जंगल राजस्व अधिक प्राप्त होते.''[३१)]

याशिवाय येथील जंगलामध्ये ऐन, बिबळा, धावना, हळदी, आवळा, बेहडा, गराडी, खैर, मोहचार, टेंभरु, आंजन, कुळा, बाहवा, माली इ. उपयुक्त व औषधीयुक्त नवस्पती आढळतात. येथील हिरडा, बेहळा, आवळा यापासून त्रिफळा चुर्ण तयार केली जाते.

चिमूर, नागभीड, भागातील जंगलातील 'ऐनाच्या' झाडांवर कोसा किंवा रेशीमाचे किडे पोसले जातात. त्यापासून रेशमी साडया, विणक्याचे लघुउदयोग नागभीड परीसरात आहेत.

**नद्याः—**

जिल्हयाच्या पश्चिम सीमेवरुन वर्धा व पूर्व सीमेवरुन वैनगंगा नदी वाहते. वर्धा नदीमुळे यवतमाळ जिल्हयाची आणि वैनगंगा नदीमुळे गडचिरोली जिल्हयाची सीमा निश्चित झाली आहे. वर्धा नदी ही पश्चिम— दक्षिण दिशेने वाहत जावून आंध्र प्रदेशातून वाहत जाते. वर्धा नदी वरोरा, राजुरा, गोंडपिपरी या तालुक्यातून वाहत जाते. तर वैनगंगा नदी ब्रम्हपूरी, सिंदेवाही, मूल व गोंडपिपरी या तालुक्याच्या सीमेवरुन वाहत

जाते. वर्धा व वैनगंगा या जिल्हयातील सर्वात मोठया नदया असून बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत. वर्धा नदी ही सर्वात मोठी नदी असून हिलाच पुढे पैनगंगा व ईरई या नद्या मिळतात. पैनगंगा व ईरई या नद्यांचा संगम 'वढा' या गावाजवळ होतो. वर्धा व ईरई व अंधारी या जिल्हयातील मुख्य नद्या आहेत. ईरई नदीमुळे जिल्हयाच्या मुख्यालयाला पाण्याचा पुरवठा होतो व वैनगंगेने वाहत आणलेल्या गाळामुळे त्याच्या खोऱ्यातील जमीन अतिशय सुपिक समजली जाते.

**तलाव:—**

जिल्हयात सर्वात मोठे तलाव नाहीत. तथापी अनेक मध्यम तलाव आहेत. नलेश्वर, चारगाव, आसोलामेंढा, लभानसराड, अमलनाला, चंदईनाला, घोडासरी हे जिल्हयातील मुख्य तलाव असुन ते अनुक्रमे सिंदेवाही, वरोरा, सावली, राजुरा, गडचांदूर, वरोरा, नागभिड या तालुक्यात आहेत. अमलनाला व चारगाव या तलावावर बांध बांधलेले असून तिथे शासकीय स्तरावरुन मत्स्यव्यवसाय मोठया प्रमाणात होतो.

**हवामान:—**

सर्वसाधारणपणे जिल्हयाचे हवामान विषम आहे. म्हणजेच उन्हाळयात अति उष्ण व हिवाळयात अति थंड आहे. संपूर्ण राज्यात चंद्रपूर जिल्हयाचे उष्णतामान सर्वाधिक असते हे समजल्यास हरकत नाही. येथील सर्वाधिक नोंद केल्या गेलेल्या १८ मे १९८७ मध्ये ४८.४ सेल्सिअस इतके तर सर्वात कमी नोंद केल्या गेलेल्या १० जानेवारी १८९९ रोजी २.८ सेल्यियस तापमान होते. सन १९९८ मध्ये जिल्हयाची सर्वाधिक सरासरी कमाल उष्णतामान अनुक्रमे ४७.७ सेल्यिअस असून हिवाळयात किमान उष्णतामान ७.१ सेल्यिअस होते. जिल्हयातील कमाल व किमान उष्णतामान ठरविण्यासाठी जिल्हयात चंद्रपूर व ब्रम्हपूरी येथे दोन केंद्रे आहेत.

**पर्जन्यः—**

जिल्हयाचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान १२२५.६१ मिमी असून सर्वात जास्त सरासरी पाऊस सिंदेवाही १५०४.२ मिमी. पडतो. तर ब्रम्हपूरी आणि नागभीड व सावली येथे प्रत्येकी सरासरी १३६२.४ व १३०७.४ व १४२७.० मिमी. पाऊस या तालुक्यात पडला.

सन २००० मध्ये सर्वात जास्त पाऊस सिंदेवाही या तालुक्यात १५०४.२ मिमी. पडला तर सर्वात कमी पाऊस 'चिमूर' या तालुक्यात ८९०.५ मिमी. पडला.

**कृषीः—**

**जमीन व तिचे प्रकार—**

जिल्हयात जमिनीचे विविध प्रकार असून ते काळी जमिन, कन्हाळ, मोरांड, रेताड, किंवा बरडी आणि पांढरी या स्थानिय नावाने ओळखल्या जातात. वर्धा नदीच्या खोऱ्यातील काळया कसदार जमिनीत कापुस, गहु, डाळी आणि ज्वारी अशा प्रकारची कोरडवाहू पिके तर वैनगंगा खोऱ्यातील काळसर जमिनीत प्रामुख्याने भाताचे पिक घेण्यात येते.

**पिकाखालील क्षेत्रः—**

जिल्हयातील ९९—२००० मधील एकूण पिकाखालील असणाऱ्या ४९०७३७ हेक्टर क्षेत्रांपैकी अन्नधान्य पिकाखालील क्षेत्र ३,३१,८६८ हेक्टर म्हणजे एकूण पिकाखालील क्षेत्र ६७.६३ टक्के आहे. धान्य पिकांपैकी सर्वात जास्त क्षेत्र 'भात' या पिकाखाली क्षेत्राच्या२७.४४ टक्के आहे. त्याखालोखाल क्षेत्र हे ज्वारी खाली असून ते एकूण पिकाखालील क्षेत्राच्या १४.८९ टक्के आहे. डाळीच्या पिकाखालील क्षेत्र १६.२५ टक्के असून कपाशीखालील क्षेत्र १४.६० टक्के आहे.''[३२]

**पिकाचे उत्पादनः—**

सन २०००—०१ मध्ये तृणधान्याचे एकूण उत्पादन १,७७,८०० मे.टन असून ९९.२००० मध्ये २,९४,३०० मे.टन होते. कडधान्याचे सन २०००—०१ मधील उत्पादन २५,२०० मे.टन असनू सन ९९—२००० मध्ये ते ४८,४०० मे.टन होते. तसेच सन २०००—०१ मधील तेलबियांचे उत्पादन ३५०० मे.टन असून ९९—२००० मध्ये ते ९९०० मे.टन होते.

**पिकसंवर्धनः—**

पिकसंवर्धन मोहीमेअंतर्गत जिल्हयातील शेतकऱ्यांना भात विकास कार्यक्रमाअंतर्गत बियाण्याचे वाटप केल्या जाते. पिकसंवर्धन योजनेअंतर्गत सन २०००—०१ या वर्षात बिगर आदिवासी योजने अंतर्गत १०.३९ लाख रुपये खर्च करण्यात आला तर याच योजनेअंतर्गत आदिवासी उपयोजनेअंतर्गत ०.८९ लाख रुपये खर्च खर्च करण्यात आला. फलोत्पादन योजनेअंतर्गत बिगर आदिवासी योजना ५.३९ लाख रुपये व आदिवासी उपयोजना ०.२० लाख रुपये खर्च झाला.''[३३]

**सिंचन क्षेत्र व प्रकल्पः—**

जिल्हयामध्ये सन १९९९—२००० मध्ये निव्वळ भिजणारे क्षेत्र १,००,०३५ हेक्टर होते. त्यापैकी विहीरीद्वारे भिजणारे क्षेत्र १४,६५५ हेक्टर होते व इतर साधनांनी भिजणारे क्षेत्र ८५,३८० हेक्टर होते.

जिल्हयामध्ये मोठे पाटबंधारे प्रकल्प नाहीत. मध्यम पाटबंधारे प्रकल्पांपैकी आसोलामेंढा, घोडासरी, नलेश्वर, चारगाव, चंदईताला, उमरनाला व लाभानसराड, पकड्डीगुड्डम या आठ प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली आहेत तर डोंगरगाव या प्रकल्पाचे काम वन जमिनीमुळे खोळंबून राहिलेले आहे. पूर्ण झालेल्या वरील सात प्रकल्पाखालील एकूण लाभ क्षेत्रात १,०३,६४० हेक्टर असुन सन २०००—०१ या वर्षामध्ये ओलीताखालील एकूण क्षेत्र २९,२१५ हेक्टर होते.

**खनिजः—**

कोळसाः— जिल्हयात कोळसा खालील विभागात सापडतो. अ) चंद्रपूर, वरोरा व राजुरा विभागातील वर्धा व्हॅली एरिया ब) वरोरा तहसिलीतील काही भाग.

**लोखंडः— (आयर्न ओअर)**

उच्च प्रतीच्या लोहाचे साठे १) वैनगंगा नदीच्या पश्‍चिमेकडील भागात २) गडचिरोली जिल्हयातील सूरजागड व भामरागड उपविभागात उपलब्ध आहेत. याहून कमी प्रतिच्या लोहाचे साठे १.लोहारा २. आसोला (गुंजेवाही) ३. ब्रम्हपुरी मधील रत्नापुर व ४. वरोरा उपविभागातील पिंपळगाव व भिसी या ठिकाणी आहेत.

**सिमेंटः—**

चंद्रपूर, बल्लारपूर, उपविभागात सिमेंटचे खालील चार मोठे कारखाने आहेत. १) आवारपूर येथील लॉर्सन ॲण्ड टुब्रो कारखाना २) हरिगंगा सिमेंट कारखाना ३) माणिकगड सिमेंट कारखाना ४) घुग्घुस ए.सी.सी.सिमेंट कारखाने कार्यरत आहेत

**बॅराईटसः—**

चंद्रपूर, मुल या ४५ किमी. च्या पट्टयात अतिकमी प्रमाणात बॅराईटसचे साठे उपलब्ध आहेत.

**तांबेः—**

जिल्हयातील चंद्रपूर व ब्रम्हपूरी या भागात अल्प प्रमाणात तांबे सापडते.

**क्रोमाईटसः—**

भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाने सन १९७७—७८ मध्ये प्रथमच चंद्रपूर जिल्हयात क्रोमाईटसचे साठे उपलब्ध असण्याची शक्यता उघडकीस आणली. त्यानंतर

भू—विज्ञान व खनिकर्म खात्याने सर्वेक्षण करुन जिल्हयातील पुयारदंड, पिरेसुर व बल्लारपुरच्या काही भागात हे साठे उपलब्ध असल्याचे सिध्द झाले.

**उदयोगः—**

जिल्हामध्ये नोंदणीकृत झालेल्या कारखान्याची संख्या २००० मध्ये ४०० होती. त्यापैकी ३७९ कारखाने चालू स्थितीत होते. त्या कारखान्यामध्ये १३,९६६ कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला.

**मजुरीचे दरः—**

सन १९९९—२००० या वर्षामध्ये कुशल कारागिर उदा. सुतार, लोहार, चांभार यांचे मजुरीचे दर अनुक्रमे ७०रुपये, ७० रुपये, ६० रुपये प्रतिदिवस याप्रमाणे तर अकुशल कामगार उदा. शेतमजुर व गुराखी यांना अनुक्रमे देण्यात येणारी सरासरी मजूरीचे दर ५० रुपये, व ३० रुपये प्रतिदिवस असे असल्याचे आढळते.

**चंद्रपूर जिल्हयातील अनुसूचित जाती/जमातीः—**

महाराष्ट्रात आदिवासी जमाती राहात असलेल्या भागाचे प्रामुख्याने तीन विभाग पडतात—

१) सहयाद्री विभाग — सहयाद्री पर्वताच्या विभागात महादेव कोळी, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी हया जमाती असून त्यांचे महाराष्ट्र एकूण आदिवासींशी प्रमाण ३० टक्के आहे.

२) सातपुडा विभाग — या पर्वत रांगांमध्ये भिल्ल, कोकणा, गावित, दुबळा, कोरकु, धानका या जमाती असून जळगाव, औरंगाबाद, अमरावती या जिल्हयांचा यात समावेश होतो.

३) गोंडवन विभाग — विदर्भातील डोंगराळ भागात प्रामुख्याने चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, नागपूर या जिल्हयांचा समावेश होत असुन यात गोंड माडिया

गोंड, कोरकु कोलाम, परधान, आंध या जमाती आढळुन येतात. गोंडवन विभागातच 'माना' आदिम जमात आढळून येते.

१९९१ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील एकूण लोकसंख्येत अनुसूचित जातीचे प्रमाण १६.९० टक्के असुन अनुसूचित जमातीचे प्रमाण १९.७० टक्के आहे. महाराष्ट्रात राज्यासाठी हे प्रमाण १९.०९ टक्के आणि ९.२७ टक्के आहे.''[३४)]

चंद्रपूर जिल्हयात सर्वत्रच आदिवासी समाज विखुरलेला आहे. कोरपना, पोंभुर्णा, बल्लारपुर, राजूरा इत्यादी भागांत परधान, कोलाम, आंध, गोंड, इत्यादी आदिवासी जमाती तर ब्रम्हपुरी, नागभिड, चिमुर, सिंदेवाही, वरोरा, भद्रावती, मुल इत्यादी तालुक्यात माना व गोंड आदिवासींची संख्या अधिक आहे. चंद्रपूर जिल्हयातील एकूण लोकसंख्या जनगणना २००१ नुसार २०,७१,१०१ असून त्यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या २,९६,९२७ पैकी पुरुष १,५२,१४१ तर स्त्रिया १,४४,७८६ त्यातही शहरी २२,४२३ तर ग्रामीण १,७४,५०४ म्हणजे १४.०८टक्के आहे.

**त्याचप्रमाणे अनुसूचित जमातीची लोकसंख्या –**

एकूण – ३,७५,२५६

पुरुष – १,९०,५५८

स्त्रिया – १,८४,६९८

शहरी – ५६,२८९

ग्रामीण – ३,१८,९७६ म्हणजेच १८.१टक्के आहे.

१००० पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९४८

| | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|
| अनुसुचित जाती – | ९७० | ९११ |

अनुसूचित जमाती – ९८७ ९१४

तर जिल्हयात – ९६७ ९०० आहेत.''[३५)]

## चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी जमातीः—

भारतीय जनगणना १९६१ नुसार जवळपास ३४ जमातींना गडचिरोली, सिरोंचा आणि राजुरा या तीन तहसिलींतील अनुसूचित जमाती म्हणून गणल्या गेले. (त्यावेळी चंद्रपूर जिल्हयात सहा तहसिली होत्या.) गडचिरोली आणि सिरोंचा तहसिलीसाठी ही अनुसूची वेगळी आणि राजूरा तहसिलीसाठी वेगळी होती. परंतु चंद्रपूर, वरोरा आणि ब्रम्हपूरी तालुक्यासाठी कोणतीही जमात अनुसूचित जमातीच्या यादीत समाविष्ट केली नव्हती. १९६१ च्या जनगणेनत ३४ पैकी फक्त १३ जमातींचा समावेश सूचित केला गेला होता. (उर्वरीत २१ अनुसूचित जमाती पुढीलप्रमाणे आहेत – आंध, बैगा, भारना, भारीया, भूमिया, भत्रा, भूंजिया, बरहुल, धनवार, गडबा, कमार, खारिया, कोंध, कोल, कोरवा, नझवार, मूंडा, नीएल, ओरॉव, पारजा,सौंता आणि सवार.)

अनुसूचित भागांतील अनुसूचित जमाती ज्यांची नोंद झाली त्या आहेत – भील, बींझवार, गोंड, कोलाम, हलबा, कवार, खैरवार, कोया, नागेशिया, परधान, पारधी आणि थोटी. त्यांची संख्या १,८३,४३१ म्हणजे १४.८२ टक्के होती.

१९६१ ला माना जमात गोंड जमातींची उपजमात किंवा गोंड जमातीची शाखा म्हणून गणल्या जात होती.

गोंड ही सर्व जमातीत संख्येने आणि सांस्कृतिक ओळखीच्या बाबतीत सर्वात प्रमुख जमात आहे. जिल्हयातील त्यांची लोकसंख्या १,६६,२६६ असून ते एकूण लोकसंख्येच्या १३.४३ टक्के तर जमातीच्या लोकसंख्येच्या ९९.७४ टक्के होते. परधान ७,१४५ हे दुसऱ्या क्रमांकावर तर त्यामागे हलबा ४,७३७, कवार २,८१२ व कोलाम १,५१६ होते आहेत.

एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अनुसूचित जमाती हया साक्षरता आणि शिक्षणात बऱ्याच प्रमाणात मागासलेल्या आहेत. स्त्रिया साक्षरतेच्या बाबतीत जास्तच मागे आहेत. गोंड जमात जी सर्वात संख्येने जास्त आहे ती या बाबतीत जास्तच मागासलेली आहे. त्यांच्या तुलनेत इतर जमातींत साक्षरतेचे प्रमाण थोडे जास्त आहे. याचे कारण गोंड ही जमाती इतर जमातींचा समूह आहे. ज्यात भामरागडचे माडीया किंवा मारीया गोंडांचा जे संख्येने अधिक आहेत त्यांचा समावेश आहे की जे अजुनही मागासलेल्या वातावरणात राहतात.

जवळपास ९३ टक्के अनुसूचित जमातीतील कामगार शेतीच्या व लागवडीच्या कामावर काम करतात. मजुरांचे प्रमाण जे ६२टक्के आहे, इतर लोकसंख्येच्या ५८टक्केच्या जास्त आहे. याचे कारण अनुसूचित जमाती या पूर्णपणे ग्रामीण असून त्या आर्थिकदृष्टया मागासलेल्या आहेत.’[३६]

जनगणना १९९१ प्रमाणे जिल्हयातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या—

एकूण — ३,४९,१६९

पुरुष — १,७६,६२५

स्त्रिया — १,७२,५४४

ग्रामीण — ३,०३,०४५

शहरी — ४६,१२४

अनुसुचित जमातीची लोकसंख्येशी टक्केवारी १९.७० टक्के १००० पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण—

ग्रामीण — ९८७, शहरी — ९१४ आहे.’’[३७]

चंद्रपुर जिल्हयातील एकूण आदिवासींच्या संख्येचा विचार करता माना या आदिवासी जमातीची लोकसंख्या आजमितीस जवळपास १,००,००० ते १,५०,००० च्या आसपास आहेत.

डॉ.सौ.शैलजा देवगावकर यांच्या मते, ‘चंद्रपूर व आसपास माना लोकांनी सुमारे दोन शतके गोंडवना भागात राज्य केले. रसेल ॲण्ड हिरालाल ‘माना’ लोकांना ‘द्रविडीयन’ म्हणतात. मुख्यत: शेतकरी आणि शेतमजुर असे हे लोक आहेत. मुळ वंशाबाबत (original obscure) असे शब्द म्हणजे अस्पष्ट– अव्यक्त असा शेरा देण्यात आलेला आहे. मात्र मेजर ल्यूसी स्मिथ (१८६९) यांनी त्यांच्या चांदा सेटलमेंट रिपोर्ट मध्ये मानांच्या बाबत लिहितांना म्हटले आहे की, गोंडांच्या पूर्वी अहेरीजवळ सूरजागड आणि माणिकगड पहाडी भागात माणिकगड येथे माना लोकांचे राज्य होते. दिसायला ते गोंडांसारखे आहेत. ते सृदृढ बांध्याचे असून स्वभावाने प्रामाणिक व उदयोगी आहेत. सैनिकी पेशाच्या योग्य बरेच गुण यांच्यात असले तरी आता त्यांनी त्यांच्या तलवारी म्यानात आणि ढाली भिंतीवर ठेवल्या आहेत आणि शेती या व्यवसायात ते रमले आहेत. श्री हिस्लॉप (papers on the aboriginal tribes of the central provinces) आपल्या प्रस्तुतच्या लेखात म्हणतात, ‘गोंडाचे जे मंत्री होते सरदार म्हणा. जे शकुन वगैर सांगतात असत, त्यांच्यात माना ओझा हे होते. ते आपल्या पवित्रतेला अत्यंत जपत असत. कोणत्याही इतर जातींच्या हातचे खात नसत. ’’[३८]

गोकुळदास मेश्राम यांच्या मते, ‘‘महाराष्ट्रातील आदिवासी जाती म्हणजे माडीया, गोंड, भिल्ल, कोरकु, कोलाम, माना, बुरड, प्रधान, धोटी इत्यादी आहे.’’[३९] पुढे ते म्हणतात, माना हा जो गण आहे त्याची माना ही जात आहे.’’[४०] भास्कर वाकडे यांच्या मते, ‘माना’ हे नागवंशीयांचे वंशज आहेत.’’[४१] ‘‘मणसा’ ही मानांची कुलमाता आहे.’’[४२]

## तक्ता क्रमांक - 1.7

### 1991 च्या जनगणनेनुसार अनुसुचित जातीव जमातीची आकडेवारी

(आकडे हजारात)

जिल्हा - चंद्रपूर

| अ. क्र. | तहसील | वाव | अनुसुचित जाती | | | अनुसुचित जमाती | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | चंद्रपूर | एकूण | 101 | 53 | 48 | 56 | 29 | 27 | 157 | 82 | 75 |
| | | ग्रामीण | 23 | 12 | 11 | 24 | 12 | 12 | 47 | 24 | 23 |
| | | नागरी | 78 | 41 | 37 | 32 | 17 | 15 | 110 | 58 | 52 |
| 2 | भद्रावती | एकूण | 22 | 12 | 10 | 28 | 15 | 13 | 50 | 27 | 23 |
| | | ग्रामीण | 15 | 8 | 7 | 25 | 13 | 12 | 40 | 21 | 19 |
| | | नागरी | 7 | 4 | 3 | 3 | 2 | 1 | 10 | 6 | 4 |
| 3 | वरोरा | एकूण | 17 | 9 | 8 | 33 | 17 | 16 | 50 | 26 | 24 |
| | | ग्रामीण | 11 | 6 | 5 | 29 | 15 | 14 | 40 | 21 | 19 |
| | | नागरी | 6 | 3 | 3 | 4 | 2 | 2 | 10 | 5 | 5 |
| 4 | चिमुर | एकूण | 26 | 13 | 13 | 48 | 24 | 24 | 74 | 37 | 37 |
| | | ग्रामीण | 26 | 13 | 13 | 48 | 24 | 24 | 74 | 37 | 37 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | नागभिड | एकूण | 18 | 9 | 9 | 24 | 12 | 12 | 42 | 21 | 21 |
| | | ग्रामीण | 18 | 9 | 9 | 24 | 12 | 12 | 42 | 21 | 21 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | ब्रम्हपूरी | एकूण | 24 | 12 | 12 | 13 | 6 | 7 | 37 | 18 | 19 |
| | | ग्रामीण | 18 | 9 | 9 | 10 | 5 | 5 | 28 | 14 | 14 |
| | | नागरी | 6 | 3 | 3 | 3 | 1 | 2 | 9 | 4 | 5 |
| 7 | सिंदेवाही | एकूण | 14 | 7 | 7 | 29 | 14 | 15 | 43 | 21 | 22 |
| | | ग्रामीण | 14 | 7 | 7 | 29 | 14 | 15 | 43 | 21 | 22 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

तक्ता क्र 1.7 पुढे चालु.

## तक्ता क्रमांक - 1.7

## 1991 च्या जनगणनेनुसार अनुसुचित जाती व जमातीची आकडेवारी

जिल्हा - चंद्रपूर (आकडे हजारात)

| अ. क्र. | तहसील | बाब | अनुसुचित जाती | | | अनुसुचित जमाती | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 8 | मुल | एकूण | 12 | 6 | 6 | 19 | 10 | 9 | 33 | 16 | 15 |
| | | ग्रामीण | 9 | 4 | 5 | 16 | 8 | 8 | 25 | 12 | 13 |
| | | नागरी | 3 | 2 | 1 | 3 | 2 | 1 | 6 | 4 | 2 |
| 9 | सावली | एकूण | 13 | 6 | 7 | 16 | 8 | 8 | 29 | 14 | 15 |
| | | ग्रामीण | 13 | 6 | 7 | 16 | 8 | 8 | 29 | 14 | 15 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 10 | गोंडपिपरी | एकूण | 18 | 9 | 9 | 26 | 13 | 13 | 44 | 22 | 22 |
| | | ग्रामीण | 18 | 9 | 9 | 26 | 13 | 13 | 44 | 22 | 22 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | राजुरा | एकूण | 21 | 11 | 10 | 31 | 16 | 15 | 52 | 27 | 25 |
| | | ग्रामीण | 15 | 8 | 7 | 29 | 15 | 14 | 44 | 23 | 21 |
| | | नागरी | 6 | 3 | 3 | 2 | 1 | 1 | 8 | 4 | 4 |
| 12 | कोरपना | एकूण | 14 | 7 | 7 | 26 | 13 | 13 | 40 | 20 | 20 |
| | | ग्रामीण | 14 | 7 | 7 | 26 | 13 | 13 | 40 | 20 | 20 |
| | जिवती | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | बल्लारपूर | एकूण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | ग्रामीण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 14 | पोंभुर्णा | एकूण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | ग्रामीण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जिल्हा एकूण | एकूण | 300 | 154 | 146 | 349 | 177 | 172 | 649 | 331 | 318 |
| | | ग्रामीण | 194 | 98 | 96 | 302 | 152 | 150 | 496 | 250 | 246 |
| | | नागरी | 106 | 56 | 50 | 47 | 25 | 22 | 153 | 81 | 72 |

टिप - 1) आकडे पुर्णांकात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

2) बल्लारपूर व पोंभुर्णा या दोन नवनिर्मित तालुक्याची वेगळी माहिती उपलब्ध नाही. ती अनुक्रमे चंद्रपूर व गोंडपिपरी तालुक्यात समाविष्ट करण्यांत आली आहे.

आधार -- 1991 ची जनगणना.

४३

# संदर्भ सूची


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | प्रा. नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. ०१ |
| | | — | कॉन्टीनेन्टंल प्रकाशन —पुणे, २००३. | |
| २. | डॉ. गारे गोविंद | — | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती | पृ. ०३ |
| | | — | कॉन्टीलेन्टल प्रकाशन पुणे, २००२ | |
| ३. | डॉ. खडसे भा.कि. | — | सामाजिक मानवशास्त्र | पृ. ३९ |
| | | — | मंगेश प्रकाशन नागपूर. | |
| | | — | तृतीय आवृत्ती — १९८९. | |
| ४. | डॉ. गारे गोंवदि | — | आदिवासी कला विश्व | पृ. ०१ |
| | श्री. सोनवाणे उत्तमराव | — | महाराष्ट्र शासन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे. | |
| ५. | श्री गारे गोविंद | — | आदिवासी कलाविश्व | पृ. १ |
| | श्री सोनवाणे उत्तमराव | — | कित्ता | |
| ६. | महाराष्ट्र शासन | — | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा चंद्रपूर २०००—२००१ | ०३ |
| | | — | जिल्हा सांख्यिकी कार्यालय अर्थ व सांख्यिकी संचलनालय महाराष्ट्र शासन, चंद्रपूर. | |
| ७. | महाराष्ट्र शासन | — | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा चंद्रपूर २०००—२००१ | पृ. ०३ |
| | | — | कित्ता | |
| ८. | **Bhatt. S.C.** | — | **The Encyclopaedic District Gazetteers of India Volume 7.** | पृ.३८५ |
| | | — | **Gyan Publishing house New Delhi 1998** | |
| ९. | **Bhatt. S.C.** | — | **The Encyclopaedic District Gazetteers of India Volume 7.** | पृ.३८५ |
| | | — | **Gyan Publishing house New Delhi 1998** | |
| १० | महाराष्ट्र शासन | — | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा चंद्रपूर २०००—२००१ | पृ.०१, ०२ |
| | | — | कित्ता | |
| ११ | राजूरकर अ.ज. | — | चंद्रपूरचा इतिहास | पृ. क्र. ०८ |
| | | — | महाकाली प्रकाशन चंद्रपूर प्रथमावृत्ती १९८२ | |
| १२ | राजूरकर अ.ज. | — | चंद्रपूरचा इतिहास | पृ. ०९ |
| | | — | कित्ता | |
| १३. | जुलमे टि.टि. | — | गोंडवनातील ऐतिहासिक मूलचेरा | पृ. १४ |
| | | — | पुरातत्व बौद्ध संस्कृती सेवा संघ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | — चंदपूर –१९९२ | |
| १४. | राजूरकर अ.ज. | — चंद्रपूरचा इतिहास<br>— कित्ता | पृ. ७० |
| १५. | राजूरकर अ.ज. | — चंद्रपूरचा इतिहास<br>— कित्ता | पृ. ८१ |
| १६. | राजूरकर अ.ज. | — चंद्रपूरचा इतिहास<br>— कित्ता | पृ. ९० |
| १७. | राजूरकर अ.ज. | — चंद्रपूरचा इतिहास<br>— कित्ता | पृ.१०५ |
| १८. | राजूरकर अ.ज. | — चंद्रपूरचा इतिहास<br>— कित्ता | पृ.१२६ |
| १९. | राजूरकर अ.ज. | — चंद्रपूरचा इतिहास<br>— कित्ता | ५७ परिशिष्ट (अ) |
| २०. | प्रा. वक्काणिजी नि.आ. | — आधुनिक विदर्भ का इतिहास<br>— मंगेश प्रकाशन, नागपूर १९८५. | पृ.२२३ |
| २१. | महाराष्ट्र शासन | — विकासाच्या वाटा – २०११<br>— जिल्हा परिषद– चंद्रपूर | पृ. ०५ |
| २२. | महाराष्ट्र शासन | — जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – जिल्हा – चंद्रपूर २०००–२००१<br>— कित्ता. | पृ. ०४ |
| २३. | **Government Iof ndia** | —<br>— **India 2007**<br>— **A Reference Annual 5th Edition. Ministry of Information and broadcasting.** | |
| २४. | महाराष्ट्र शासन | — जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – जिल्हा – चंद्रपूर २०००–२००१<br>— कित्ता. | पृ. ०१, ०२ |
| २५. | महाराष्ट्र शासन | — जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – जिल्हा – चंद्रपूर २०००–२००१<br>— कित्ता. | पृ. ०८ |
| २६ | महाराष्ट्र शासन | — जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – जिल्हा – चंद्रपूर २०००–२००१<br>— कित्ता. | पृ. ०८ |
| २७. | गोडबोले वि.ज. | — समस्या शंभर कोटींची जनगणना २००१<br>— दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे.<br>— प्रथमावृत्ती २००२ | पृ. ०१ |
| २८. | महाराष्ट्र शासन | — जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – | पृ. ०८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | जिल्हा – चंद्रपूर २०००–२००१ | |
| | | – | कित्ता. | |
| २९. | प्रा. वक्काणिजी | – | आधुनिक विदर्भ का इतिहास | पृ. ०२ |
| | नि.आ. | – | कित्ता. | |
| ३०. | प्रा. वक्काणिजी | – | आधुनिक विदर्भ का इतिहास | पृ.३७३ |
| | नि.आ. | – | कित्ता. | |
| ३१. | प्रा. वक्काणिजी | – | आधुनिक विदर्भ का इतिहास | पृ.३७३ |
| | नि.आ. | – | कित्ता. | |
| ३२. | महाराष्ट्र शासन | – | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – जिल्हा – चंद्रपूर २०००–२००१ | पृ. ०९ |
| | | – | कित्ता. | |
| ३३. | महाराष्ट्र शासन | – | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – जिल्हा – चंद्रपूर २०००–२००१ | पृ. १० |
| | | – | कित्ता. | |
| ३४. | महाराष्ट्र शासन | – | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – जिल्हा – चंद्रपूर २०००–२००१ | पृ. ०७ |
| | | – | कित्ता. | |
| ३५. | महाराष्ट्र शासन | – | विकासाच्या वाटा–२०११ | पृ. ०६ |
| | | – | कित्ता. | |
| ३६. | **www. chanda district District census Handbook. 1991 Chanda district.** | | | २१ |
| ३७. | गजानन जानभोर | – | जिल्हा लोकमत वार्तारंग | |
| ३८. | डॉ. देवगावकर शैलजा | – | वैदर्भीय आदिवासी | पृ. ७२ |
| | | – | मंगेश प्रकाशन –नागपूर २००६ | |
| ३९. | मेश्राम गोकुळदास | – | आदिवासी संस्कृतीचे वारसदार आणि त्यांचा धम्म | पृ.१३६ |
| | | – | गोकुळदास मेश्राम चंद्रपूर २००६. | |
| ४०. | मेश्राम गोकुळदास | – | आदिवासी संस्कृतीचे वारसदार आणि त्यांचा धम्म | पृ.२३५ |
| | | – | गोकुळदास मेश्राम चंद्रपूर २००६. | |
| ४१. | वाकडे भास्कर | – | मूळनिवासी माना | पृ. ७२ |
| | | – | वज्रांकुस प्रकाशन वरोरा –२००६ | |
| ४२. | वाकडे भास्कर | – | मूळनिवासी माना | पृ. ६९ |
| | | – | कित्ता | |
| ४३. | महाराष्ट्र शासन | – | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – जिल्हा – चंद्रपूर २०००–२००१ | पृ. २०, २१ |

# प्रकरण ३ रे

# संशोधन पध्दती

# (Research Method)

**प्रस्तावना:–**

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. तो समुहाने राहतो आणि समुहात राहता असतांना स्वत:साठी आणि समुहासाठी मानवाने विविध नियम आखले आहेत, ज्यामुळे समूहाचा कारभार व्यवस्थित चालावा. परंतु समुहात वावरत असतांना स्वत:ला समूहाच्या कार्यात समायोजन करण्याकरीता मानवा समोर अनेक समस्या उद्भवतात. त्यामुळे अगदी लहानात लहानापासून तो मोठयात मोठी समस्या सम्यक मार्गाने सोडविण्यासाठी मानवाला समस्येच्या कारणांचे संशोधन करुन त्या समस्या सोडवावी लागतात. समाजात होणारे हे सामाजिक संशोधन एका विशिष्ट पध्दतीने चालते. किंवा चालावे लागत. तरच त्याचे योग्य निराकरण होते अन्यथा संपूर्ण परीक्षण वाया जाते. म्हणून सामाजिक संशोधनाची योग्य अशी वैज्ञानिक पध्दत सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी उपयोगात आणावी लागते. सामाजिक शास्त्राच्या संशोधकाला याची जाणीव, वारंवार ठेवावी लागते. जेणेकरुन संशोधकाचे परिश्रम, वेळ व पैसा वाया जाणार नाही.

डॉ.प्रदिप आगलावे यांच्या मते, ''कोणत्याही सामाजिक समस्या सोडविण्याकरीता किंवा कोणत्याही गृहीत कृत्याने परीक्षण करणे, नवीन घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांमधील नवीन संबंध शोधण्याच्या उद्देशाने कोणत्या तरी योग्य पध्दतीचा उपयोग करणे हा सामाजिक संशोधनाचा अर्थ आहे''.[१] संशोधन करतांना मनुष्य तन, मन, धनाने पुर्णत: त्यात गुंतलेला असतो. परंतु 'जिज्ञासा, उत्सुकता' ही मानवाला जन्मत:च मिळालेली देणगी असल्यामुळे संशोधनाला चालना मिळून विविध क्षेत्रात संशोधन होत आहे.

संशोधन ही जटील प्रक्रिया आहे हे माहित असूनही संशोधन कर्ता जेव्हा संशोधनाचे कार्य हाती घेतो तेव्हा नक्कीच त्याच्या समोर कोणता तरी उद्‌देश असतो किंवा कोणतीतरी समस्या असते ज्यासाठी तो संशोधन करण्यास प्रेरित होतो आणि संपूर्ण संशोधन कार्य पूर्ण होईपर्यंत तो स्वतःला त्यात गुंतवून घेतो. डॉ. सदा कऱ्हाडे यांच्या मते, ''एखादे तत्व अथवा वस्तुस्थिती शोधून काढतांना तसेच एखादया गोष्टीची निश्चिती करण्याकरिता केलेले परिक्षणपूर्वक अन्वेषण, काळजीपूर्वक, चिकित्सापुर्ण चौकशी अथवा तपासणी म्हणजे संशोधन''.[२] अशा संशोधन कार्याची रुपरेशा ठरवितांना कोणत्या पध्दतीने संशोधन कार्य केले पाहिजे याची रुपरेषा ठरविणे व त्यानुसार काम करणे महत्वाचे असते. एखादया विशिष्ट ठिकाणी जायचे आहे आणि तेथे जाण्यासाठी अनके मार्ग जात असतील तर जो मार्ग सोयीस्कर आणि सुरक्षित असतो त्याच मार्गाने जावे लागते. तसेच ध्येयापर्यत पाहोचण्यासाठी लागणारी सामग्री सोबत घ्यावी लागते. त्याचप्रमाणे संशोधनाच्या किचकट प्रक्रियेला थोडी सुलभ आणि सुरक्षित यशस्वी बनविण्यासाठी विविध पध्दती व तंत्रांचा अवलंब करणे आवश्यक असते. ध्येयाच्या पुर्तीसाठी यशस्वीतेसाठी नियोजन महत्वाचे असते. नियोजनावर वेळ खर्च केल्यास त्याची यशस्वीता नक्कीच हाती येते. म्हणून प्रत्येक संशोधकाला संशोधन पध्दती ठरविणे म्हणजेच संशोधनाचे नियोजन करणे आवश्यक ठरते. तंत्रशुध्द व्याकरण शुध्द प्रबंध लेखन हे संशोधनातील महत्वाचे अंग आहे. आणि अंतिम अंग आहे, जे संशोधनाला वाचकासमोर मांडते.

## १) संशोधन समस्याः—

मानवाचे जीवन सुलभ होण्याकरीता ज्या सामाजिक संस्था मानवाने उभारल्या त्या अधिक गुंतागुंतीच्या बनत आहेत. त्यात वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत आणि हे प्रश्न शास्त्रीय पध्दतीने सोडविणे आवश्यक ठरते. सामाजिक वा समस्यावर संशोधन करण्यासाठी शास्त्रीय संशोधन पध्दतीचा आधार घ्यावा लागतो. शास्त्र म्हणजे काय हे सांगतांना डॉ.बी.एम.कऱ्हाडे म्हणतात, ''एखादया विषया संबंधीचे केवळ ज्ञान संग्रह म्हणजे शास्त्र नाही किंवा केवळ

संग्रहीत ज्ञानाला आपण शास्त्र म्हणत नाही तर ज्ञान किंवा तथ्ये कोणत्यातरी क्रमबध्द, व्यवस्थित पध्दतीने संग्रहीत करावी लागतात. म्हणजेच शास्त्र ही एक अभ्यासाची पध्दती आहे''.[३] म्हणूनच संशोधिकेने 'आदिवासी माना समाजाचा' अभ्यास करण्याकरीता शास्त्रीय पध्दतीचा अवलंब केला. शास्त्रीय पध्दतीच्या पायऱ्यांनीच संशोधन करणे क्रमप्राप्त ठरले. डॉ.प्रदीप आगलावे यांच्या मते, ''कोणत्याही सामाजिक समस्या सोडविण्याकरीता किंवा कोणत्याही गृहीत कृत्याचे परिक्षण करणे, नवीन घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांमधील नवीन संबंध शोधण्याच्या उद्देशाने कोणत्यातरी योग्य पध्दतीचा उपयोग करणे हा सामाजिक संशोधनाचा अर्थ आहे.''[४]

संशोधिकेने जेव्हा संशोधन करावयाचे ठरविले तेव्हा 'माना' आदिवासी समाजातील शैक्षणिक दृष्टया दुर्बल असलेल्या घटकाची समस्या संशोधिकेच्या मनात आली आणि त्यावर संशोधिकेने विचार करणे सुरु केले. परंतु संशोधिका स्वतः ग्रामीण व आदिवासी भागात राहून शिक्षणदानाचे कार्य करीत असल्यामुळे हळूहळू तिने आदिवासी समाज किंवा संपूर्ण जीवनावरच लक्ष केंद्रित केले तर असे लक्षात आले की, 'माना आदिवासी' हा संपूर्णच अध्ययनाचा विषय ठरु शकतो. ग्रामीण भागात राहून खेडयापाडयांत राहून हिंदू संस्कृतीशी समरस झालेला तरीही स्वतःची वेगळी संस्कृती जपलेला, शैक्षणिक, आर्थिक, दृष्टया लगेच डोळयात भरणारा माना समाज जवळीक साधली असता आणखीच समस्याग्रस्त जाणवला आणि सहजच त्यांच्याविषयी, त्यांच्या जीवनपध्दती आणि सर्वांगीण बाबतीत जाणून घेण्याची उत्सुकता व आवश्यकता संशोधिकेला जाणवली आणि ज्या आदिवासी गावात संशोधिका राहते तिने आणखीनच माना आदिवासींच्या जीवन शैलीत डोकावण्याचा प्रयत्न करण्याच्या उद्देशाने अधिक अध्ययन केले असता ग्रामीण भागात राहूनही माना आदिवासींची अवस्था अंतर्गत व बहिर्गत दृष्टया ही अशी का? हा प्रश्न संशोधिकेला जाणवला. स्वतः संशोधिका त्यांच्यात राहत असल्याने तिने माना आदिवासींशी जास्तच जवळीक साधली व सुक्ष्मतेने आणि समाजशास्त्रीय पध्दतीने माना आदिवासींचे अध्ययन केले जावू शकते याच पार्श्वभुमीवर आणि माना आदिवासींच्या प्रथा, परंपरा, रुढी, चालिरीती, त्यांचे आचार

विचार, आर्थिक, सामाजिक स्थिती आणि आधुनिकतेचा परिणाम व त्यांच्यातील परिवर्तन या सर्वच बाबतीत संशोधिकेला जाणून घेण्याची उत्सुकता जागली आणि त्यातुनच स्वत:ची कुवत, खर्च, वेळ व आवड या सर्वांचा विचार करुन मार्गदर्शकांशी चर्चा करुन संशोधिकेकडून ''चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी माना जमातीचे समाज शास्त्रीय अध्ययन'' हा विषय निश्चित केला.

## २) अध्ययनाचा उद्देश:—

संशोधिकेने जेव्हा वरील विषय निवडला त्यासाठी अनेक उद्देश डोळयांसमोर ठेवले. महत्वाचे म्हणजे निव्वळ जिज्ञासा किंवा जाणून घेण्याची उत्सुकता असुनही कोणीतरी माना आदिवासींबाबत सखोल अध्ययन करण्याची निकड संशोधिकेला प्रकर्षाने जाणवली तेव्हा स्वत:च का करु नये? असा प्रश्न तिच्या मनात पडला. त्यामुळे स्वत:च्या बुध्दिचा आणि ज्ञानाचा उपयोग एखादया आदिवासी समाजासाठी व्हावा याच हेतूने अध्ययन करण्याचे ठरविले. परंतु एखादया समाजाचे अध्ययन करायचे तर त्याचे विविध पैलू असू शकतात. आणि या पैलुंना व्यवस्थित क्रमवार लावून म्हणजेच अध्ययनाचे उद्देश ठरवून नियोजनबध्द अध्ययन करणे आवश्यक ठरले. म्हणजेच एखादया समस्येचा सर्वांगिण अभ्यास करण्याचे ठरविले. तेव्हा विविध स्तरावर त्याला योजनाबध्द स्वरुप देवून उद्दिष्ट ठरवावे लागले. सामाजिक संशोधनाचे उद्देश तसे ढोबळमानाने दोन भागात विभाजित करता येतात—जसे, १) सैध्दांतिक उद्देश (Theoretical objects) २) व्यावहारीक अथवा उपयोगितावादी उद्देश (Applied objects). परंतु सैध्दांतिक उद्देश डोळयासमोर ठेवूनच संशोधिकेला उद्देशांची निश्चिती करावी लागली कारण पुढे त्यातुनच व्यावहारीक अथवा उपयोगीतावादी उद्देशांवर आधारित समोरचे संशोधन होऊ शकते. त्यामुळे ''चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी माना जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन'' या विषयाअंतर्गत खालील उद्दिष्टे समोर ठेवली आहेत.—

१) माना जमीतीच्या मूळ संरचनेचे व त्यात झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे तसेच त्यांच्या सांस्कृतीक परिवर्तनाचे अध्ययन करणे –

माना आदिवासींमध्ये इतर आदिवासींप्रमाणे अंतर्गत संरचना आहेत. जसे कुटुंबसंस्था, विवाह संस्था, न्यायसंस्था, विवाहपूर्व व विवाहबाहय संबंध, घटस्फोटाबाबत नियम इत्यादीबाबत पूर्वापार चालत आलेल्या रिती, नियम व अटी आणि सध्या शैक्षणिक प्रगती व आधुनिकीकरणामुळे त्यांच्यात, त्यांच्या मूळ संरचनेत काही परिवर्तन झाले का? याबाबतचे अध्ययन करणे हे पहिले उद्दिष्ट आहे.

माना जमातीत त्यांचे इतर आदिवासींप्रमाणे देवक, कुलदैवते, श्रध्दा, अंधश्रध्दा, नवस करणे, बोलीभाषा, त्यांचे व्यसनसुध्दा त्यांच्या संस्कृतीला धरुन आहे. त्यांच्या धार्मिक विधी, रुढी, परंपरा, मानमान्यता, चांगले वाईट याबद्दल त्यांच्या काही कल्पना आहेत. या सर्व सांस्कृतिक बाबींचे अध्ययन करणे आणि आधुनिकीकरणाने किंवा इतर समाजांच्या संपर्काने त्यांच्या सांस्कृतिक आचार विचारांत काही परिवर्तन झाले का? आणि परिवर्तन झाले असेल तर ते संथ गतीने की तीव्र गतीने? इतर समाजांतील परिवर्तना समान आहे का? याचेही अध्ययन करणे हे एक उद्दिष्ट आहे.

२) माना जमातीचे ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक तसेच आर्थिक व राजकिय या बाबतीत सद्य:स्थितीचे अध्ययन करणे –

माना जमात ही इ.स. नवशेच्या आसपास चंद्रपूर जिल्हयातील राज्यकर्ती जमात होती. परंतु तिचा उदय कुठून झाला? माना जमातीचे पूर्वज कोण? त्यांचे राजे, किल्ले याबाबत ऐतिहासिक जानकारी माना जमातीला कितपत आहे अध्ययन करणे.

माना जमाती या गावांत राहतात. परंतु दुर्गम भागातील गावांत त्यांची संख्या जास्त आहे. गावात राहणाऱ्या इतर बिगर आदिवासी व आदिवासी समाजबाबत त्याचप्रमाणे ज्यांना माना आदिवासी स्वत:च्या जमातीपेक्षा श्रेष्ठ समजतात अशा जाती जमातींसोबत माना आदिवासींचे संबंध कसे आहेत? त्यांना बिगर आदिवासी

जमातींकडून कसे वागवले जाते याबाबत माना आदिवासींची सामाजिक सद्य:स्थितीचे अध्ययन करणे.

त्याचप्रमाणे शिक्षणाच्या दृष्टीने पूर्वी आणि सध्या माना आदिवासींमध्ये झालेले बदल व प्रगती, शैक्षणिक दृष्टया त्यांचे विचार आणि शिक्षणाचा त्यांच्या विचारावर आणि आचारावर झालेला सद्य:स्थितीतील परिणाम एकूणच त्यांची शिक्षणाच्या बाबतीत सद्य:स्थिती काय आहे याचे अध्ययन करणे, हेही एक उद्‌दिष्ट आहे. तसेच

माना जमात सुरुवातीस म्हणजे इ.स.च्या नवव्या शतकात चांदा जिल्हयातील राज्यकर्ती जमात होती. त्यामुळे राजकीय पुढारीपणाचे गुण नक्कीच त्यांच्या रक्तात व स्वभावात असतील का? याचा आढावा घेणे. संविधानाने अनुसूचित जमातीला जे ७टक्के आरक्षण दिलेले आहे. त्याचा राजकीय क्षेत्रात माना जमातीने कितपत उपयोग करुन घेतला? व भारताच्या राजकारणात त्यांचे कितपत योगदान आहे याबाबत जाणून घेणे हेही अध्ययनाचे उद्‌दिष्ट आहे.

त्याचप्रमाणे माना आदिवासी हे शेतकरी म्हणून गणल्या गेले. सर्वच जणांजवळ नाही तरी पण अधिक जणांजवळ थोडीफार शेती असून ते शेतांवर व जंगलातील साधनांवर उपजिवीका करतांना आढळतात. परंतु जास्त प्रमाणात मजुरीही करतांना आढळतात. त्यामुळे माना आदिवासी नेमके कोणकोणते व्यवसाय करतात व त्यांच्या आर्थिक उत्पन्नाचे साधन कोणते? याचे अध्ययन करणे तसेच त्यांची सध्याची आर्थिक स्थिती कशी आहे. याचेही अध्ययन करणे हेही एक उद्‌दिष्ट संशोधिकेने ठेवले आहे.

३) माना जमातीसाठी जिल्हयात उपलब्ध असलेल्या सोयी व सवलतींचा त्यांच्या विकासासाठी कितपत उपयोग झाला या विषयींचे अध्ययन करणे –

शासनाने अनुसूचित जमातींसाठी विविध योजना राबविल्या आहेत. त्याचप्रमाणे विविध सोयी व सवलती दिल्या आहेत. माना जमातीला ८मार्च२००६ रोजी अनुसूचित जमातीचा दर्जा प्राप्त झाला. त्यापुर्वी यांना अनुसूचित जमातीच्या

सवलती व योजनांचा उपयोग घेता आला नाही. परंतू ८मार्च२००६ नंतरही अनुसूचित जमातींसाठी शासनाने लागू केलेल्या सोयी, सवलती व योजनांचा माना आदिवासींना त्यांच्या आर्थिक, सामाजिक, विकासासाठी उपयोग झाला किंवा नाही? आणि उपयोग झाला तर तो कितपत झाला? या योजनां बद्दल माना आदिवासींना कितपत माहिती आहे? या सर्व बाबींचे अध्ययन करणे हेही एक उद्दिष्ट आहे.

४) आधुनिकीकरणाचा माना जमातीवर किती प्रभाव पडला, तो मानांना साधक आहे की बाधक आहे, याबाबत सविस्तर मिमांसा करणे –

सध्याचे आधुनिकीकरणाचे युग आहे. त्याचा प्रभाव सर्व स्तरावर, सर्व समाजांवर वेगवेगळया पध्दतीने पडलेला आहे व पडत आहे. आधुनिकीकरणाने जवळपास सर्व समाजांतील जीवनमूल्ये बदलत आहेत असेच आढळते आणि लोकांच्या राहणीमानातही फरक जाणवायला लागला आहे. परंतु माना आदिवासींच्या संरचनेत, संस्कृतीत आणि त्यांच्या सर्वच बाबतीत त्यांच्या आचार, विचारात आधुनिकीकरणाने फरक पडला का? प्रभाव पडला का? आणि जर प्रभाव पडला असेल तो इष्ट की अनिष्ट? त्यामुळे माना आदिवासींच्या जीवनात काही नवीन समस्या निर्माण झाल्या का? या सर्वच बाबींचे अध्ययन करणे हेही एक उद्दिष्ट आहे.

खरं म्हणजे शासन सर्व अनुसूचित जाती, जमातींचा विकास करण्यासाठी ज्या योजना राबवित आहे त्याचा मूळ उद्देश किंवा दिशा ही आधुनिकीकरण करणे हीच आहे. म्हणजे आदिवासींना भौतिक सुविधा देऊन त्यांचा राहणीमानात, जीवनमानात, सुलभता आणने व ते उंचावणे हाच हेतू आहे. याचा अर्थ आधुनिकीकरणाच्या दिशेने जर आदिवासींची वाटचाल होत असेल तर ती खरोखरच त्यांच्यासाठी योग्य आहे का? की संस्कृती जपणुकीच्या नावाखाली त्यांना जंगल, रानटी अवस्थेतच ठेवावे हाही विचार पुढे येतो. या सर्वच बाबतीत विचारपूर्वक चिंतन करणे व मीमांसा करणे हाही अध्ययनाचा एक उद्देश आहे.

आदिवासी हे साधेभोळे आहेत परंतु मानवाला उत्सुकता आणि नाविण्याची आवड जन्मत:च लाभल्यामुळे इतरांकडे पाहून स्वत:ला बदलण्याची इच्छा प्रत्येक माणसात असते. मग ते त्याच्याकरीता चांगले की वाईट याचा माणुस फार विचार करीत नाही. आजकालच्या आधुनिकीकरणाच्या युगात बिगर आदिवासींचा झगमगाट व राहणीमान यापासून ग्रामीण भागात राहणारा आदिवासी स्वत:ला अलिप्त ठेवु शकला असेल का? जर तो अलिप्त ठेवू शकला नसेल तर या आधुनिकीरणातील कोणते परिवर्तन त्यानं स्विकारले? कोणत्या पध्दतीने त्याने ते स्विकारले? कधी कधी अर्धवट ज्ञान हे माणसाला मारक असते असे जाणवते. मग एकीकडे विकास आणि दुसरीकडे अज्ञान या दोघांच्या मध्ये आदिवासींची संस्कृती भरडली जात आहे का? माना आदिवासींचा भौतिक विकास होत असतांना त्यांचे विचार व आचारही बदलत आहेत का? की निव्वळ पोशाख बदलून 'मी विकसित झालो' संस्कृतीचे जतन म्हणून श्रध्दा आणि अंधश्रध्दा अधिक तीव्र होत आहेत का? ग्रामीण आणि समुहात असलेली त्याची संस्कृती आणि विविध संस्था आधुनिकीकरणाने आणि विकासाच्या नावाखाली कोलमडून पडत आहेत का? ना धड इकडे ना धड तिकडे अशी आदिवासींची स्थिती होत आहे का? अर्धवट शिक्षणाने त्यांचे पारंपारीक व्यवसाय सुटलेत का? आणि नवीन व्यवसाय ही मिळत नाहीत अशी स्थिती झाली आहे का? विकासाच्या नावाखाली आदिवासींचा साध्या भोळेपणाचा फायदा घेवून बीगर आदिवासीच फायदा करुन घेत आहेत का? विकासाच्या नावाखाली करोडो रुपयांच्या योजना राबविल्या जातात. त्या खरोखरच त्यांच्यापर्यंत पोहोचतात का? आणि नसतील तर का पोहचत नाहीत? आधुनिकीकरणाचा अर्थ तरी आदिवासी समाजाला कळतो का?

एकूणच माना जमातीत इतर समाजाच्या देखादेखी परिवर्तन होत आहे का? आणि ते जर होत असेल तर ते इतर समाजांच्या तुलनेत संथ आहे का? समान आहे का? की जलद आहे? आणि त्याची दिशा उर्ध्व आहे की अधो आहे? या सर्वांची मिमांसा करणे, विवेचन करणे हेही उद्‌दिष्ट या अध्ययनाचे आहे.

### ३) उपकल्पना/गृहितकृत्ये –

सामाजिक शास्त्रात संशोधनकर्ता एखादी समस्या निवडतो आणि संशोधन सुरु करतो तेव्हा संशोधन भरकटत जावू नये यासाठी तो काही ठराविक उद्दिष्टे डोळयांसमोर ठेवतो. परंतु संशोधन प्रत्यक्षात सुरु करण्यापुर्वी प्रत्येक संशोधक त्या समस्येशी निगडीत काही प्राथमिक स्वरुपाचे अध्ययन करतो आणि त्यावरुन काही कल्पना, उपकल्पना ठरवतो. काही गृहितके बांधतो. ज्यांचा आधार संशोधन करतांना घेतो. त्यांनाच गृहितके म्हणतात. डॉ.सुमन बेहरे यांच्या मते, ''संशोधनाची सुरुवात गृहितकृत्याने होते''.[५] पुढे त्या म्हणतात की, ''गृहितकृत्य असेल तर संशोधक विद्यार्थ्याला विषयाचा उपयुक्त विचार करायला मार्गदर्शन मिळते. अनेक लोकांच्या डोळयात चमकलेल्या भन्नाट कल्पनांमुळे विज्ञानाचा विकास होत गेला व ज्ञानात भर पडत गेली आहे''.[६] यावरुन आपल्याला गृहित कृत्याची महती समजते. ''प्रारंभी गृहितकृत्ये ही कल्पना, कल्पनापुर्व विचार, अनुमान, अंदाज किंवा अंत:प्रेरणा इत्यादीपैकी काहीही असु शकते. परंतु पुढे ती संशोधन कृती किंवा अन्वेषणाचा आधार बनते''.[७] त्यामुळे प्रस्तुत अध्ययनात कोणकोणती गृहितकृत्ये मांडली आणि त्यांचा पडताळ करण्यात आला याचेही विवेचन आवश्यक आहे.

प्रस्तुत अध्ययनात संशोधिकेकडून पुढील उपकल्पनांचा किंवा गृहितकांचा पडताळा करण्यात आला. त्यांची क्रमवार मांडणी करण्यात आली आहे.

१) माना जमात त्यांच्या इतिहासाविषयी अनभिज्ञ आहे. त्यांच्या अस्मितेविषयी माना जमात विशेष जागरुक नाही. तसेच माना जमात कष्टाळू, अल्पसंतुष्टी व नशिबावर विश्वास ठेवणारी आहे.

२) माना जमात आर्थिक, शैक्षणिक बाबतीत अतिशय मागासलेली आहे असे निदर्शनास येते. तसेच माना जमात सद्यस्थितीत जुन्या रुढी, चालिरिती, परंपरा, श्रध्दा, यांनी बुरसटलेली आहे. त्यांना त्यांच्या अधिकारांची विशेष जाणीव नाही असे वाटते.

३) शासनाच्या सोयी व सवलतींचा माना जमातीच्या विकासासाठी विशेष फायदा झालेला नाही असे निदर्शनास येते.

४) राजकीय क्षेत्रात माना जमात जागृत होत आहे व राजकारणात सहभाग होऊ लागली आहे.

५) माना जमातीतील अंतर्गत संरचनेत आधुनिकीकरणाचा प्रभाव जाणवत नाही.

संकलित माहितीच्या आधारावर वरील गृहितकृत्ये पडताळून पाहणे ही संशोधिकेची संशोधनामागील मूळ भूमिका आहे.

**४) संशोधन आराखडा –**

संशोधन आराखडा किंवा अभिकल्प किंवा प्ररचना किंवा इंग्रजीत ज्याला Design असे म्हणतात. म्हणजे एक संशोधन प्रक्रियेचे नियोजनच आहे. संशोधन आराखडा बनविणे म्हणजे कार्ययोजना आखणे होय. श्रीमती पी.व्ही.यंग यांच्या मते, "A Research design is the logical and systematic planning and directing of a piece of research".[८]

डॉ.कऱ्हाडे यांच्या मते, ''आराखडयाचा अर्थ अशी योजना जी विषयवस्तूंच्या विभिन्न पैलूंचे अन्वेषण करुन संशोधनाच्या पूर्वनिर्धारित उद्‌दिष्टांच्या प्राप्तीसाठी क्रियान्वित केली जाते.''[९] समाजशास्त्रात शास्त्रीय पध्दतीने संशोधन करतांना विषयाशी संबंधित विविध पायऱ्यां मधून जावे लागते. त्यात अनेक अडचणी व प्रश्न, समस्या असतात किंवा निर्माणही होतात. त्यामुळे पुढे येणाऱ्या अथवा आपल्या नियोजित कार्यात निर्माण होणाऱ्या वा उपस्थित होण्याची शक्यता असणाऱ्या समस्या व अडचणींचा विचारपूर्वक अंदाज येवून त्या समस्यांचा व अडचणींच्या निराकरणासाठी आधिच व्यवस्था करुन ठेवण्याचा प्रक्रियेस संशोधन आराखडा असे म्हणतात. श्रीमती सुशिला ओडवायरच्या मते, ''संशोधन आराखडयाचे प्रयत्न विफल होण्याची शक्यता नसते कारण कोणत्या दृष्टिने व कोणत्या पध्दतीने तथ्य संकलित करावयाचे आहे याचे निर्देशन आराखडयामुळे होत असल्याने निष्फळ प्रयत्नांना वाव राहत नाही.

आराखडयामुळे वेळ, पैसा, शक्ती वाचविणे शक्य होते''.[१०] याचाच अर्थ असा की, योग्य संशोधन आराखडा तयार केल्यास संशोधनाच्या यशस्वीतेची हमी संशोधन आराखडयातच असते. योग्य नियोजनानेच कामात यश मिळण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळेच संशोधन आराखडा बनविणे भाग पडते.

संशोधनाचा उद्‌देश, संशोधनासाठी लागणारा कालावधी, संशोधनाच्या उद्‌देशानुरुप माहितीची उपलब्धता, संशोधन कार्यातील मितव्ययता, संशोधनाची पध्दती, साधणे, तथ्यांचे विश्लेषण नमुना निवडीचे आधार, एकूण येणारा खर्च इत्यादी सर्वांचा विचार करावा लागतो. आराखडयाची ही कार्ययोजना तयार करणे होय. त्यामुळे संशोधनाचा उद्‌देश सफल होतो किंवा इच्छित संशोधन करणे सहज शक्य होते.

साधारणत: संशोधन आराखडयाचे अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा, वर्णनात्मक संशोधन आराखडा, निदानात्मक संशोधन आराखडा व प्रयोगात्मक संशोधन आराखडा इत्यादी प्रकार आहेत. प्रस्तुत संशोधन केवळ माना आदिवासी समाजाच्या सद्य:स्थितीत आणि त्यांच्या जीवनशैलीत व समाजाच्या विविध अंगात झालेल्या किंवा न झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करुन मिमांसा करणे एवढाच असल्याने संशोधिकेने फक्त वर्णनात्मक संशोधन आराखडयाचाच उपयोग केलेला आहे.

**वर्णनात्मक संशोधन आराखडा:—**

संशोधनाचा विषय व (समस्या सुत्रण) व उद्‌दिष्टे निश्चित केल्यानंतर प्राथमिक अध्ययनावर आधारित गृहितकृत्ये किंवा परिकल्पना तयार केल्या आणि संशोधनाला नियोजित रुप देण्यासाठी ''वर्णनात्मक संशोधन आराखडा प्रमाण करण्यात आला. ''वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा मुख्य उद्‌देश उपलब्ध तथ्य, माहिती व आकडेवारीच्या आधारावर एखादी व्यक्ती, समूह, समाज, घटना किंवा कोणताही विषय अथवा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे, वैशिष्टयांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा आहे. त्यासाठी अध्ययनासाठी निवडलेल्या 'विषय वस्तुची' संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. या संशोधन आराखडयाचा आधार विश्वसनीय तत्व व वास्तविकता

हा असतो. या आधारावर तत्व व माहितीचे विश्लेषण केले जाते. या विश्लेषणातून प्राप्त वर्णन माहितीचे अर्थ निरुपन केले जाते. या प्रक्रियेला वर्णनात्मक विश्लेषण असे संबोधले जाते आणि ज्या आराखडयाच्या केंद्रस्थानी या प्रक्रियेला ठेवले जाते. त्याला वर्णनात्मक संशोधन आराखडा असे म्हणतात''.[११]

या वर्णनात्मक संशोधन आराखडयाचे महत्त्व हे आहे की हा आराखडा ज्या संशोधन उद्देश वास्तवाचे वर्णन करणे हा आहे. त्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. सामाजिक घटनांच्या अभ्यासात सामाजिक समस्या सुध्दा असू शकतात. परंतु ज्ञानप्राप्ती हे वर्णनात्मक अध्ययनाचे उद्दिष्ट असल्यामुळे वर्णनात्मक अध्ययनात त्या समस्येच्या निराकरणावर लक्ष केंद्रित न करता त्या समस्येचे परिपूर्ण स्वरुप समजून घेण्यावर अधिक भर असतो. त्याचप्रमाणे लोकांची वैशिष्टये, समस्या, विषयक त्यांचा दृष्टिकोन, त्यांची मते यांच्याविषयी शासनाला माहिती असेल तरच त्यानुसार धोरणांची आखणी व अंमलबजावणी शासनाकडून होवून लोकांना त्यांचा फायदा होईल परंतु अशाप्रकारची माहिती वर्णनात्मक अध्ययनांतुन प्राप्त होत असते. म्हणूनच विकासाच्या योजना व धोरणांची योग्य अंमलबजावणी होण्याच्या दृष्टिने वर्णनात्मक संशोधन अध्ययनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासींबाबत चिकीत्सक, सखोल अध्ययन करावयाचे उद्दिष्ट असल्यामुळे त त्यांची मिमांसा करण्याचे उद्देश असल्यामुळे वर्णनात्मक आराखडयाची निवड केली आहे.

वर्णनात्मक अध्ययनामध्ये कोणत्या उद्दिष्टांचे अध्ययन करावयाचे आहे. अशा अध्ययनासाठी आवश्यक व पर्याप्त ठरतील अशा पध्दती कोणत्या, हे संशोधन कर्त्यास स्पष्ट करावे लागते. संशोधन विश्वात कोणत्या व्यक्ती व एककांचा अंतर्भाव करावयाचा आहे. म्हणजेच कोणत्या नमून्यांची कशी निवड करावयाची आहे हेही स्पष्ट करावे लागते. अशाप्रकारे अध्ययनामधून जी तथ्ये किंवा पुरावे गोळा करण्यात येणार ती गोळा करण्याच्या पध्दती लवचिकते– ऐवजी अचुकतेस प्राधान्य जास्त दिले जाते.

म्हणजे कशाचे मोजमाप करायचे आहे, मोजमापाची प्रमाणिक व विश्वसनीय तंत्रे कोणती या गोष्टींचे स्पष्ट निर्धारण या अध्ययनातून होणे आवश्यक आहे. त्याचे सविस्तर वर्णन वर्णनात्मक संशोधन आराखडयात करणे आवश्यक आहे.

## ५) अध्ययनाचे क्षेत्रः—

''चंद्रपूर जिल्हयात आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात आहे. म्हणजेच १९९१ च्या जनगणने नुसार १९.७० टक्के आहे.''[१२] त्यामुळे अर्ध्यापेक्षा जास्त तालुक्यांना आदिवासी भाग म्हणून घोषित केले गेले आहे. चंद्रपूर जिल्हयाच्या इतिहासातच माना आणि गोंड आदिवासींनी चंद्रपूर जिल्हयांवर व त्याच्या आसपास राज्य केले असल्यामुळे चंद्रपूर जिल्हा आणि आदिवासींचे जुनेच नाते आहे. चंद्रपूर जिल्हयाची भौगोलिक स्थिती म्हणजे तेथे जंगलव्याप्त क्षेत्र जास्त प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे पेरजागड आणि चिमूर टेकडया असा डोंगराळ भागही आहे. त्यामुळे जिल्हयात कारखाने, उदयोगधंदे कमी व भातशेत्या जास्त आहेत. दगडी कोळशाच्या खाणी असल्यामुळे व जंगले अधिक असल्यामुळे त्यावर आधारित काही उदयोग आहेत. परंतु विशेषतः इथले आदिवासी शेतीवर, शेतमजुरीवर आणि जंगलातील कामावर जगतांना आढळतात. चंद्रपूर जिल्हयात गोंड आणि त्यांच्या उपजमातींची संख्या अधिक आहे. त्यापाठोपाठ परधान, कोलाम व माना आदिवासींची संख्या आहे. दुर्गम भागात आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात आहे. तेथे रहदारी व दळणवळणाची समस्या अजूनही आहे आणि रस्ते व दळणवळण यंत्रणा प्राथमिक स्वरुपातच आहेत. इतर खेडयांमध्ये आदिवासी व बिगर आदिवासींच्या मिश्रजातीच्या वस्त्या पाहायला मिळतात. ज्या ठिकाणी, शहरीकरण, झालेले आहे तेथे विकसित भाग दिसतो. इतर सर्वत्र मात्र आदिवासी आणि मागासलेपण यांचा संबंध पाहायला मिळतो. 'घोडाझरी' नावाच्या माना आदिवासी अधिक असलेल्या गावात अजुनही शासकीय मोटारगाडी जात नाही. तर साध्या नाल्याही गावात नाहीत. संडास बांधलेले नाहीत. दखाखान्यासाठी २० ते २५ किलोमीटर बैलगाडी किंवा सायकलने जावे लागते. तर रोजदारीसाठी जंगल व इतर गावांत भटकावे लागते. संपूर्ण चंद्रपूर जिल्हयात सर्व जाती—जमातींचे लोक पाहायला

मिळतात.  त्यामुळे आदिवासींचा व बिगर आदिवासींचा आपसात संस्कृतीची सरमिसळ झाल्याचा 'आभास' होतो.  परंतु जिवती, कोरपना, पोंभूर्णा या ठिकाणी आदिवासींची परिस्थिती विशेषत्वाने मागासलेली आढळते.

चंद्रपूर जिल्हयातील संशोधिकेने सर्वेक्षण केले असता असे लक्षात आले की, चिमूर, सिंदेवाही, नागभीड, वरोरा व भद्रावती इत्यादी तालुक्यांतुनच माना आदिवासींची दाट वस्ती एकवटली आहे.  ब्रम्हपूरी, मुल, सावली, या तालुक्यांत माना आदिवासींची संख्या विरळ आहे.  तर जिवती, कोरपना, पोंभुर्णा, राजुरा, गोंडपिंपरी, बल्लारशा, व चंद्रपूर या तालुक्यांत फक्त कामधंदयासाठी गेलेलेच माना आदिवासी आढळतात.  तेथे त्यांच्या वस्त्या नाहीत.  त्याचप्रमाणे संपूर्ण जिल्हयातून माना आदिवासींची लोकसंख्याही जवळपास एक लाखाच्या आसपास आहे.  कारण जिल्हयातून एकूण आदिवासी साडेतीन लाख आहेत.  त्यात गोंड व त्यांच्या उपजमाती तसेच परधान व कोलाम यांची संख्या जास्त आहेत.  शिवाय 'माना' आदिवासींना ८ मार्च २००६ रोजी आदिवासी म्हणून अनुसूचित जमाती मध्ये नोंद झाली असल्याने २००१ च्या जनगणनेत त्यांची संख्या उपलब्ध होत नाही.

त्यामुळे संशोधिकेने राजुरा, नागभिड, भद्रावती, मुल, सिंदेवाही, चिमूर, वरोरा तालुक्यातील माना आदिवासींची निवड नमुना म्हणून केली की जे संपूर्ण जिल्हयाचे प्रतिनिधित्व करतील.

वरील तालुक्यांतील प्रत्येक एककाच्या अध्ययनाऐवजी समष्टीचे अध्ययन केले जाईल इतक्या प्रमाणात उपसमग्रातील एककाच्या नमुन्यात समावेश करण्यात आला.  अशा एककाचे कितीही नमुने निवडून त्याची पाहणी केली असता येणाऱ्या निष्कर्षात समग्राच्या चाचणीच्या तुलनेत जास्त अंतर असणार नाही, अशा विश्वासातून २००एककांची निवड करण्यात आली.  एकूण २६ खेडयांना किंवा गावांना व माना आदिवासी राहात असणाऱ्या वस्त्यांना भेट देऊन त्यातुन २०० एककांचा नमुन्यात अंतर्भाव करण्यात आला.  या ठिकाणी 'एकक' ही संज्ञा 'व्यक्तीसाठी उपयोगात

आणली आहे' जो त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचे प्रतिनिधित्व करातो. २०० ही संया चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासींच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आकाराने बरीच मोठी असल्यामुळे समग्राची प्रतिनिधित्व करण्याची तिची कुवत शंकास्पद नाही.

## ६) नमुना निवड योजना:–

जेव्हा संशोधन क्षेत्र मोठया प्रमाणात असते तेव्हा जनगणनेप्रमाणे संशोधन क्षेत्रातील प्रत्येक एककाला समाविष्ठ करु शकत नाही. त्यामुळे संशोधनामधून ज्या समग्र व विश्वसनीय निष्कर्ष काढण्याची ही बाब संबंधित आहे. त्या समग्रातून काही एकक निवडून जे संपूर्ण संशोधन क्षेत्राचे प्रतिनिधित्व करु शकतील अशावरच संशोधन कार्य केले जाते. नमुना ही संपूर्ण विश्वाची लहानशी प्रतिकृती असते व याला शास्त्रीय मान्यता असते. समग्राबाबत काही अनुमान बांधण्याकरीता समग्रामधून पाहणीसाठी एक भाग निवडण्याच्या प्रक्रियेस नमुना चाचणी असे म्हणतात. फ्रँक याटन यांच्या मते, ''संपूर्ण समग्राचे प्रतिनिधित्व करेल या विश्वासाने निवडलेला एक भाग किंवा अंश यासाठी नमुना ही संज्ञा राखीव आहे.''[१३] तर समाजशास्त्रीय शब्द कोषानुसार, ''एका निश्चित संख्येमध्ये व्यक्तीगत, व्यक्ती किंवा निरीक्षणास एका विशिष्ट समग्रातून काढण्याची प्रक्रिया किंवा पध्दती अथवा अध्ययनाच्या हेतून एका समग्रातून एका भागाची निवड म्हणजे नमुना निवड पध्दती होय''.[१४] नमुना निवड पध्दतींचे बरेच फायदे होण्यासारखे असतात. नमुना निवड पध्दतीमध्ये संशोधन समग्रातून काही नमुन्यांची अध्ययनासाठी निवड केली जाते आणि त्याचे सखोल अध्ययन केले जाते. त्यामुळे त्याच्या परिणामात शुध्दतेचे प्रमाण अधिक असते. त्याचप्रमाणे अध्ययन क्षेत्र मर्यादित होते. त्यामुळे सखोल अध्ययन करणे शक्य होते. संशोधन कालावधीत नमुन्याची संख्या कमी किंवा जास्त करावयाची झाल्यास ती सहजपणे करता येते. नमुना निवड पध्दतीत काही निवडक घटकांचाच अभ्यास असल्यामुळे वेळ, धन व श्रमाची मोठया प्रमाणात बचत होते. त्यामुळे संशोधिकेकडून प्रस्तुत संशोधन समग्रातून दोन प्रकारचे नमुने निवडण्यात आले. १) तालुका नमुना २) उत्तरदात्यांचा नमुना

संशोधन विश्वात येणारे एकक निश्चित किती आहेत अथवा विश्वात येणाऱ्या व्यक्तींची (एककांची) संख्या किती आहे हे जेव्हा संशोधकाला माहीत असते तेव्हाच तो संभाव्यता नमुना निवड पध्दतीचा उपयोग करु शकतो. परंतु याउलट अध्ययन क्षेत्र माहीत असून तसेच अध्ययन विश्वात कोण येणार हे जरी माहित असले तरी अध्ययन विश्वात व्यक्तींची किंवा उत्तरदात्यांची निश्चित संख्या माहीत नसते किंवा उत्तरदात्यांची संख्या असमान पध्दतीने विखुरलेली असते. त्याचप्रमाणे अधेमध्ये त्यांचे कामानिमित्त स्थलांतरही होत असते. आणि उत्तरदात्यांची संख्या व्यापक असते तेव्हा 'गैरसंभाव्यता नमुना पध्दतीचा' उपयोग केला जातो. या पध्दतीत संशोधनकर्ता आपल्या इच्छेनुसार नमुना निवडत असतो. त्याच्यावर कोणतेही नियंत्रण नसते. परंतु तरीही नमुना निवडतांना कोणताही पूर्वग्रह किंवा पूर्वसूचना केलेली नसते.

वरील दोन्ही प्रकारचे नमुने निवडण्यासाठी संभाव्यता व गैरसंभाव्यता अशा प्रकारची निवड करण्यात आली. तालुक्यांचा नमुना निवडण्यासाठी स्वप्रयोजन व स्वनिर्णय नमुना पध्दतीचा तर उत्तरदात्यांचा नमुना निवडण्यासाठी 'क्षेत्र नमुना पध्दतीचा' उपयोग करण्यात आला.

**अ) तालुक्यांचा नमुनाः—**

चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासींचे समाजशास्त्रीय अध्ययन असा संशोधनाचा विषय असला तरी सुध्दा संपूर्ण चंद्रपूर जिल्हयातील माहीती घेतली व सर्वेक्षण केले असता असे लक्षात आले की, जिवती, कोरपना, पोंभूर्णा, गोंडपिंपरी, राजुरा, बल्लारशा, चंद्रपूर, इत्यादी तालुक्यांमध्ये गोंड, कोलाम, आणि परधान जमातींची संख्या विपुल प्रमाणात आहे. आणि उर्वरित चंद्रपूर जिल्हयात जसे सावली, मुल, ब्रम्हपुरी, नागभीड, सिंदेवाही, चिमुर, वरोरा, भद्रावती, इत्यादी तालुक्यांत गोंड आणि माना जामातींची संख्या अधिक आहे. परंतु त्यातही चिमुर, नागभीड, सिंदेवाही, वरोरा व भद्रावती इत्यादी तालुक्यांत माना जमातींची लोकवस्ती दाट प्रमाणात एकवटलेली आहे. त्याच भागात त्यांचे भद्रावतीचे 'भद्रनागमंदिर' नागभीड तालुक्यातील 'मुक्ताबाई

मंदीर’ इत्यादी देवस्थाने प्रामुख्याने आहेत आणि चिमुर–भीसी गावानजीकच्या भागातच विशेषत्वाने माना वस्ती दाट स्वरुपात आढळते. त्यामुळे तालुक्यांचा नमुना निवडतांना संशोधिकेने सप्रयोजन व स्वनिर्णय नमुना निवड पध्दती प्रस्तुत अध्ययनात निवडलेली आहे. चिमुर तालुक्यातुन मोठया प्रमाणात माना आदिवासींची लोकसंख्या असल्यामुळे चिमूर, तालुक्यातून जास्त प्रमाणात नमुना निवड केलेली आहे.

### ब) उत्तरदात्यांचा नमुनाः–

माना आदिवासी हे विशिष्ट क्षेत्रात राहत असल्यामुळे कोणकोणते नमुना निवडावे यासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील क्षेत्र नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला. ‘‘यात समग्रातून निवडलेले नमुना घटक हे संख्येने अधिक असतातच पण त्याचबरोबर ते अधिक विश्वसनीय व विविधतापूर्ण असतात.’’[१५] तालुक्यांची निवड केल्यानंतर प्रत्येक तालुक्यातून उत्तरदात्याची संख्या निर्धारीत करणे आवश्यक होते. त्यामुळे विविध वयोगटातील, स्त्री–पुरुष, विविधता येतील याप्रमाणे कुटुंबाचे प्रतिनिधीत्व करणारे समग्र माना जमातीचे प्रतिनिधित्व करतील असे उत्तरदाते निवडले. त्यासाठी माना आदिवासींची मोठी वस्ती असलेल्या गावांत जावून माना जमातींची घरे कुठे आहेत याची माहीती घेतली. त्यानंतर जे जे माना आदिवासी भेटले त्यांची मुलाखत घेऊन अनुसूची भरत गेले. जे प्रथम भेटले त्यांच्यापासून सुरुवात करुन मुलाखत अनुसूची भरत गेले. त्यामुळे विशिष्ट लोकांचीच मुलाखत घ्यायची असे न ठरवता जे माना आदिवासी घरी भेटत गेले त्यांच्या घरी जाऊन त्यांची मुलाखत घेवून अनुसूची भरली. चंद्रपूर जिल्हयातील एकूण आदिवासी लोकसंख्येचा विचार करता माना आदिवासींच्या लोकसंख्या साधारणतः १,००,००० ते १,५०,००० च्या आसपास असल्याचे आढळते. त्यामुळे गावातील माना आदिवासींची लोकसंख्या विचारात घेऊन त्या प्रमाणात नमुना निवडत गेले. काही लोकांनी वेळ नसल्यामुळे नंतर येण्यास सांगितले. त्यांची त्यांच्या सोयीच्या वेळी जाऊन मुलाखत घेतली. परंतू त्यात समग्राचे प्रतिनिधीत्व करतील याची काळजी घेवूनच उत्तरदाते निवडले म्हणता येईल. एकेका गावातून किमान ०१ व कमाल २० उत्तरदात्यांची मुलाखत घेतली. त्यामुळे एकूण २६ गावांतून २००

उत्तरदात्यांची नमुना निवड म्हणून मुलाखत घेतली. त्यात कोणताही आपपर भाव ठेवला नाही.

नमुन्याचा आकार निर्धारित केल्यानंतर समग्रातून नमुन्याची निवड करावयाची असते. त्यासाठी आधुनिक निवड पध्दती प्रचलित आहेत. प्रस्तुत संशोधनात दोन्ही पध्दतीचा उपयोग केलेला आहे.

संशोधिका स्वत:च ग्रामीण आदिवासी गावात राहात असल्यामुळे आदिवासींची त्यांना जवळून ओळख आहे. तरीपण माना आदिवासींची अधिक वस्ती असलेली गावे आणि तालुके यांची माहीती घेणे आवश्यक होते. त्यामुळे संशोधिकेने सर्वप्रथम चंद्रपूर जिल्हयातील 'जिल्हाधिकारी वेबसाईटवरुन' व चंद्रपूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०००—२००१ वरुन एकूण आदिवासींची तालुका निहाय लोकसंख्या मिळवली. त्यानंतर माना आदिवासींची वस्ती कोणकोणत्या तालुक्यांत आहे हे जाणून घेण्यासाठी विविध लोकांशी, सामाजिक कार्यकर्त्यांशी व राजकीय नेत्यांशी संपर्क साधला. शेवटी सहकारी सोसायटीच्या लेखापरीक्षण कार्यालयांतून माना आदिवासींची कोणकोणत्या तालुक्यांत संख्या आहे. हयाची माहिती मिळवली आणि पुन्हा एकदा गोंडपिंपरी, राजुरा, बल्लारशा, चंद्रपूर, पोंभुर्णा, इत्यादी भागांतून स्वत: जाउन काही गावांत विचारणा केली असता त्या तालुक्यांत माना आदिवासी नसल्याचे आढळले. अशा प्रकारे माहिति मिळवल्यावर संशोधिकेने तालुक्यांची निवड करतांना 'संभाव्यता निवड पध्दतीच्या' मुलभुत अटींप्रमाणे की समग्रातील एककांची अद्यावत माहिती आवश्यक असते. याप्रमाणे सात तालुक्यांची निवड केली. प्रस्तुत अध्ययनात जे तालुके निवडले आहेत त्यांत माना वस्ती दाट स्वरुपात असून त्यांच्या ज्या गावांत वस्त्या आहेत याची माहीती सहकारी सोसायटयांमध्ये व त्यांच्या लेखापरीक्षण कार्यालयांतून मिळवण्यात आली.

संभाव्यता व गैरसंभाव्यता या दोन्ही पध्दतींचा स्विकार करुन स्वप्रयोजन नमुना निवड पध्दती आणि सोयीस्कर नमुना निवड पध्दती यांना आधारभुत मानून

तालुक्यांची निवड केल्यानंतर उत्तरदात्यांचा नमुना निवडण्यासाठी 'क्षेत्र नमुना निवड' पध्दतीचा उपयोग करण्यात आला. जिल्हयात तसे एकूण अनुसूचित जमातींची लोकसंख्या व तालुक्यानुसार एकूण अनुसूचित जमातींची लोकसंख्या मिळते. परंतु तालुक्यानुसार किंवा गावांनुसार एकूण निव्वळ माना आदिवासींची संख्या ढोबळमानाने प्राप्त होवू शकते. त्यामुळे विशिष्ट क्षेत्रातील नमुना निवडायचा असलयामुळे क्षेत्र नमुना निवड पध्दती वापरण्यात आली.

**७) तथ्य संकलन पध्दती:—**

कोणत्याही संशोधनात एकदा अध्ययन विषय निश्चित झाला की त्या विषयासंबंधी तथ्ये गोळा करणे अतिशय गरजेचे असते. म्हणजेच त्यामुळे नमुना निवडीविषयीचा निर्णय घेतल्यानंतरची पुढची पायरी म्हणजे समग्रातील निवडलेल्या लोकांना केन्द्रस्थानी मानुन तथ्य संकलन करणे ही होय. त्यांसाठी वैज्ञानिक पध्दतीचाच उपयोग केला जातो. डॉ.बी.एस.कऱ्हाडे यांच्या मते, ''ज्ञानेंद्रियांचा आधारे घेणारा स्थितीबोध म्हणजेच तथ्य होय असे म्हणता येईल''.[१६]

तथ्य संकलनासाठी प्रमुख तीन पध्दती प्रचलीत आहेत. आधुनिक काळातील तथ्य संकलनाची प्रचलीत तंत्रे या तीन पध्दतीत सम्मिलीत आहेत. हया तीन पध्दती पुढीलप्रमाणे आहेत—

१) मौखिक — शाब्दिक प्रकारानुसार माहीतीदारांचा उपयोग— मुलाखत

२) लिखीत — शब्दिक प्रतिक्रियान्वये पत्र, जीवनचरित्र— प्रश्नावली

३) गैरशाब्दिक क्रियाप्रमाणे — निरीक्षण, प्रयोगात्मक पध्दती

डॉ.बी.एम.कऱ्हाडे यांच्या मते, ''तथ्य संकलनाचे दोन प्रकार आहेत. — १) प्राथमिक तथ्य सामग्री Primary Data — संशोधन समस्येच्या अनुषंगाने आपल्याला हवी असणारी माहीती स्वत: मिळविणे. २) दुयम तथ्य सामग्री Secondary data — इतरांनी जमा केलेल्या माहीतीवरुन माहीती संकलीत करणे. ही माहीती इतरांनी व

स्वत: काही वेगवेगळया उद्‌देशांनी जमा केलेली असते. तिचा उपयोग संशोधकाला त्यांच्या स्वत:च्या संशोधन कार्यासाठी करता येवू शकतो''.[१७]

संशोधिकेचा अध्ययन विषय आदिवासी समाजाशी संबंधित असल्यामुळे प्रस्तुत अध्ययनात मुलाखत, मुलाखत अनुसूची व निरीक्षण आदी प्राथमिक तथ्य सामग्रीचा तथ्य संकलनासाठी उपयोग केला. त्याचप्रमाणे दुयम स्त्रोतांमध्ये प्रकाशित, अप्रकाशित साहित्य, कार्यालयीन कागदपत्रे, वर्तमानपत्र, मासिके इत्यादी लिखीत साहित्याचा उपयोग करण्यात आला.

### १) मौखिक शाब्दिक क्रिया पध्दती (मुलाखत):–

मुलाखत हा तथ्य संकलनाचा एक मौखिक प्रकार आहे. संबंधीत व्यक्तीशी प्रत्यक्ष संभाषण करुन अथवा गप्पागोष्टी करुन संशोधन विषयासंबंधी तथ्ये संकलीत करण्याच्या क्रियेस मुलाखत म्हणतात. प्रा.डॉ.पु.ल. भांडारकर यांच्या मते, ''व्यक्तीच्या मुलाखतीच्या आधारे आपणास त्यांच्या व्यक्तीमत्त्व व संघटनांमधील अनेक खाचाखोचा आढळून येतात. व्यक्तींच्या भावना, इच्छा, आकांक्षांना, अभिवृत्ती, मते, व्यक्तींची मनोराज्ये, व्यक्तींचा इतर व्यक्तींशी असणाऱ्या संबंधाचे स्वरुप व त्यांच्यात होणारे परिवर्तन या सर्वांनाच सामाजिक संदर्भ किंवा पार्श्वभुमी असते व या पार्श्वभुमीचे ज्ञान करुन घेता येते''.[१८] तथ्याचे संकलन करण्यासाठी लिखीत, शब्दिक क्रिया संबंधित प्रश्नावली पध्दतीपेक्षा मौखिक शाब्दिक क्रिया, संलग्न मुलाखत पध्दती अनेक अर्थाने उपयुक्त ठरते. संशोधनाच्या दृष्टिने ज्यावेळी संशोधक उत्तरदाता यांचात परस्पर/ आंतरक्रिया होवून माहीती गोळा केली जाते, या क्रियेला मुलाखत पध्दती असे म्हणतात. त्याचप्रमाणे आदिवासी समाज हा विशेषत: अडाणी व निरक्षरांचे प्रमाण अधिक असल्यामुळे प्रश्नावली पध्दतीपेक्षा मुलाखत पध्दती अनेक अर्थाने उपयुक्त ठरते. श्रीमती पी.व्ही.यंग यांच्या मते, "The interview is a highly flexible tool in the hands of skillful interviewrs". [19]

मुलाखत तंत्राच्या मर्यादा लक्षात घेवून गुणात्मक तथ्ये प्राप्त करुन घेण्यासाठी उपयुक्त म्हणून प्रस्तुत संशोधनात मुलाखत तंत्राला स्विकृत करण्यात आले.

आणखी महत्वाचे म्हणजे आदिवासी हे अशिक्षित, निरक्षर आहेत. पण सुशिक्षित आदिवासी सुध्दा एखादा फार्म भरायला किंवा माहीती लिहून दयायला हिंमत करीत नाही. मुळातच ते भिडस्त स्वभावाचे आहेत की साधेभोळे आहेत, त्यामुळे स्वत: लिहून दयायला त्यांची हिंमत होत नाही. त्यातल्या त्यात स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. ज्या स्त्रिया थोडेफार शिकल्या त्यांनाही नीट लिहीता, वाचता येत नाही. त्याचप्रमाणे समाजशास्त्रीय पध्दतीने तयार केलेली मुलाखत, प्रश्नावलीचे प्रश्न, त्यांचा अर्थ त्यांना समजेलच असे नाही. त्यांना प्रश्नाचा अर्थ समजावून सांगावा लागतो. त्यासाठी अनुसूची तयार करण्यात आली. आणि मुलाखत घेतल्याशिवाय अनुसूची भरता येत नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या चेहऱ्यावरुन, त्यांच्या प्रत्यक्ष राहणीमानाला पाहून, त्यांच्या चेहऱ्यावरील भावनांना 'तथ्य' म्हणुन स्विकारण्यासाठी सुध्दा त्यांच्या मुलाखती घेणे आवश्यक होते. म्हणून सामाजिक संशोधनाची विश्वसनियता व उपयुक्तता वाढविण्यासाठी मुलाखत पध्दतीचा वापर करण्यात आला.

## २) मुलाखत अनुसूची:—

अध्ययनाचा विषय आदिवासी समाज असल्यामुळे तथ्य संकलनासाठी मुलाखत तंत्राचा अवलंब करावयाचा असा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर वैयक्तिक मुलाखत घेतांना संचित मुलाखत तंत्राचा वापर करण्याबाबत निश्चित करण्यात आले. डॉ.बी.एम. कऱ्हाडेंच्या मते, ''संशोधन विषयासंबंधीचे वस्तुनिष्ठ तथ्य संकलनाचे एक प्रमाणित साधन निर्माण करणे हा अनुसूचीचा मुख्य उद्देश आहे''.[२०] संचित मुलाखत पध्दतीत मुलाखतकारास मुलाखत घेतांना कोणत्या प्रश्नाची मांडणी करावयाची या विषयी पुर्ण निर्णय घ्यावे लागतात. अनुसूचीमुळे प्रत्येक उत्तरदात्याला विचारले जाणारे प्रश्न सारखेच असतात. त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करुन मुलाखत अनुसूची विकसित करण्यात आली.

चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासींबद्दल त्यांच्या ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय इत्यादींबाबत त्यांच्या मुळ संरचनेबाबत, आधुनिकीकरणाने, शिक्षणाने व बिगर आदिवासींच्या संपर्कात आल्याने त्यांच्यातील झालेल्या परिवर्तनाबाबत तथ्य प्राप्त करण्यासाठी संशोधनातील उद्दिष्टे गृहीत कृत्याला अनुसरुन मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली.

मुलाखत अनुसूचित विचारण्यात आलेले प्रश्न दोन प्रकारचे आहेतः—

अ) आवृत्त प्रश्न— ज्याचे पर्याय ठराविक असुन ते अनुसूची मध्येच दिलेले आहेत.

ब) मुक्त प्रश्न — ज्यांचे पर्याय दिलेले नाहीत. उत्तरदाता मुक्त स्वरुपात उत्तर नोंदवू शकतो. ठराविक उत्तरे असणाऱ्या प्रश्नांचे प्रमाणीकरण झालेले असते. त्यामुळे अशा प्रश्नांच्या उत्तरांची नोंद करणे सोपे जाते. याउलट मुक्त प्रश्नांच्या उत्तरांचे संकेतन करण्यात अडचणी येतात. परंतु उत्तरदाता त्याला अपेक्षित असणारे मत नोंदविण्यास स्वतंत्र असतो. काही वेळेला प्रश्न मुक्त स्वरुपाचे ठेवल्याने अध्ययन कर्त्यास जास्तीची माहीती मिळू शकते जी त्याने गृहीत धरलेली नसते. त्यामुळे मुक्त प्रश्नांचे स्वतःचे महत्व आहे. मुक्त प्रश्नांच्या उत्तरांमुळे नवीन संशोधनाला चालना मिळते असे संशोधिकेला वाटते.

प्रस्तुत मुलाखत अनुसूचित वर निर्देशित केलेल्या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

### ३) मुलाखत अनुसूचीची पूर्वतपासणीः—

मुलाखात अनुसूची तयार करतांना संशोधिकेला किमान पाच ते सहा वेळा अनुसूची बदलावी लागली. विशिष्ट उद्देश ठेवून संशोधन कार्याला सुरुवात केल्यावर अनुसूची ही उद्दिष्टानुसार तयार झाली पाहिजे. परंतु ज्या समाजाला ते प्रश्न विचारायचे त्यांना ते प्रश्न समजले पाहिजे. त्यामुळे प्रश्नांची भाषा क्लिष्ट नको. अनुसूचीने संशोधनाचे सर्व उद्देश पूर्ण केले पाहिजे. जी माहीती अनुसूचीद्वारे

मिळवायची ती माहीती सहज प्राप्त झाली पाहिजे. प्रश्नांची संदिग्धता नको किंवा द्विअर्थी प्रश्न नकोत. त्याचप्रमाणे माना समाज हा आदिवासी असला तरी स्वाभीमानी आहे. त्यांच्या स्वाभीमानाला ठेच लागायला नको. अशाप्रकारे प्रश्न नकोत. अनुसूची त्यांना कंटाळा येईल एवढी प्रश्नांची संख्याही नको अशा वेगवेगळया स्तरांवर अनुसूचीबद्दल विचार केल्यावर अनुसूची तयार केली. परंतु मुलाखत अनुसूचिला विकसित केल्यानंतर तिला अंतिम स्वरुप देण्यासाठी अनुसूचीची पुर्वतपासणी करणे आवश्यक असते. हे लक्षात घेवून पूर्व तपासणीसाठी पाच कुटूंबातील पाच व्यक्तींची निवड करुन मुलाखत अनुसूचित ग्रंथीत केलेल्या प्रश्नाची उत्तरे कशी देतात हे तपासण्यात आले. प्रस्तुत तपासणीत संशोधकाला काही प्रश्नांची उत्तरे सर्वांची सारखीच येत असल्याचे लक्षात आले तर काही प्रश्न संदिग्ध, अपूर्ण द्विअर्थी असल्याचे लक्षात आले. काही प्रश्नांची मांडणी उत्तरदात्यांना गोंधळात टाकते तर काही प्रश्नांची उत्तरे देतांना उत्तरदाल्याला संकोच वाटतो, असे आढळले. काही प्रश्नांची भाषा क्लिष्ट होती. प्रश्नांच्या मांडणीतील क्रम बदलविणे उपयुक्त ठरेल असे वाटते. हया सर्व त्रृटी पूर्व तपासणीत आढळल्या. त्यांना दूर करण्यात येवून मुलाखत अनुसूचीला अंतिम रुप देवून मुद्रीत करण्यात आले.

## ४) उत्तरदात्यांशी संबंध प्रस्थापन आणि तथ्याचे संकलनः—

संशोधनातील खरी कसौटी प्रत्यक्ष तथ्य संकलनात असते आणि तोच महत्वाचा भाग असतो. जेथे सामाजिक संशोधन असते आणि त्यातही आदिवासी जमात म्हटल्यावर आधीच संशोधनकर्त्याला स्वतःला बऱ्याच चांगल्या सवयी लावाव्या लागतात व स्वतःच्या व्यक्तीमत्वात बरेच बदल घडवावे लागतात. संशोधन समग्र चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासींचे असल्यामुळे व तेही त्यांच्या संपूर्ण जीवनप्रणालीवर आधारीत असल्याने चंद्रपूर जिल्यातील माना आदिवासींची वस्ती दाट असलेल्या भागातील चिमूर, नागभीड, सिंदेवाही इत्यादी तालुक्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर या तालुक्यांतील काही गावांत जाऊन तेथील प्रमाणशीर एककांची निवड नमुना म्हणून करण्यात आली. त्यासाठी निकष ठेवले ते म्हणजे स्त्री—पुरुष,

विविध वयोगटाचे असतील. ते आपल्या कुटुंबाचे तसेच संपूर्ण माना जमातीचे प्रतिनिधित्व करतील. संशोधन क्षेत्र व्यापक असल्यामुळे त्या त्या ठिकाणी जाउन कुटुंब प्रमुखाच्या किंवा प्रतिनिधींच्या मुलाखती 'मुलाखत अनुसूची' हे साधन वापरुन घेण्यात आल्या. ते तथ्य संकलनाचे कार्य सप्टेंबर २०१० ते जून २०११ पर्यत म्हणजेच एकूण १२ महिने (एक वर्ष) च्या कालावधीत पूर्ण करण्यात आले.

माना समाज हा शेतीवर किंवा शेतमजुरीवर जगत असल्याने दिवसा ते कामावर जातात. त्यामुळे शेतीच्या कामाच्या दिवसांत संशोधिकेला त्यांना रात्री उशीरापर्यंत किंवा पहाटे सात आठ वाजता भेटावे लागे. नवीन गावे व नवीन लोक तेही त्यांच्या वस्त्या माहीत नसल्याने कुणाला तरी विचारावे लागते. ''माना समाजाची वस्ती कुठे आहे?'' असे गावातील चौकात विचारताच लोकांचा घोळका सभोवती जमा व्हायचा. बऱ्याच जणांना शासनाचे कोणीतरी आले का? असे वाटायचे. संशोधिकेने मुलाखती सुरु करण्याच्या दोन वर्षा अगोदर गावागावांत दारीद्रय रेषेखालील कुटुंबाची गणना कोणत्या तरी शिक्षकांनी केली होती. त्यात त्यांनी बऱ्याच गावांतील गरीब कुटुंबांना दारीद्ररेषेखालील सूची मधून वगळले होते. ज्यांची नावे यापूर्वीच्या दारिद्रियरेषेखालील कुटूंबाच्या यादीत होते. परंतु आता त्यांची नावे वगळल्यामुळे कित्येक कुटुंबाना शासकीय योजनांपासूनच नव्हे तर 'स्वस्त धान्याच्या दुकानातील 'धान्य व रॉकेल पासूनही वंचित व्हावे लागले असे नंतर संशोधिकेला माहीत झाले. त्यामुळे मुलाखत घ्यायला गेले असता सुरुवातीला कोणीही माहीती सांगायला तयार होत नव्हते. मग स्वत:चा परिचय देऊन मुलाखतीचा उद्‌देश सांगितल्याबरोबर लगेचच लोक स्वत:च्या समस्या डोळयांत पाणी आणून सांगायला लागायचे. कुणाची विहिर केस मिळाली नाही, कुणाला घरकुल मिळाले नाही. कुणाला निराधार योजना मिळत नाही, तर कुणाला पात्रता असूनही अंगणवाडीची सेविका करुन घेतले नाही. अशा प्रकारे समस्या सांगायला सुरुवात करायचे. एका ठिकाणी एक म्हातारे गृहस्थ सपत्नीक संशोधिकेकडे आले आणि त्यांनी सांगितले की त्यांच्याजवळ शेतजमीन आहे. परंतु जंगलातील जनावरे कोणतेही पीक होऊ देत नाही. आणि शेतजमीन असल्यामुळे त्यांना इतर

योजनाही मिळत नाही. त्यामुळे संशोधिकेने त्यांना मदत करावी अशी हात जोडून विनंती करायला लागले. एका गावात एका विधवा स्त्रीने मुलाखत घेता—घेताच रडत रडत उठुन चालली गेली. एका गावात एक व्यक्ती संशोधिका घरी जाताच बाहेर निघून गेले व त्यांनी गावातील ग्रामपंचायत सदस्यांना बोलावून आणले. तर एका ठिकाणी काही लोक दारु पिऊन संशोधिकेला हाकलून लावण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांना वाटले की संशोधिका शासनामार्फत माहीती घेण्यासाठी आल्या आणि आता त्यांच्या गावातील दारीद्रयरेषेखालील नावे पुन्हा कमी करणार की काय? सगळया गावांत दारिद्रियरेषेखालील क्रमांक जावू नये किंवा ज्यांना नाही त्यांना तो मिळावा याच बाबीवर जास्त जोर देण्यात आला परंतु जेव्हा संशोधिका स्वत:चा परिचय व त्यांच्या येण्याचा उद्देश समजावून सांगितल्यावर काही लोक मुलाखत दयायला तयार झाले. तर कही लोक उठून गेले. एका ठिकाणी तर फारच वाईट प्रसंग संशोधिकेवर ओढवला. संशोधिका एकटीच एका घरी मुलाखत घेत बसली असतांना अचानक एक व्यक्ती दारु पिउन आला व तो एकदम संशोधिकेच्या अंगावर चवताळून आला. त्याने संशोधिकेचे कागद इकडे तिकडे फेकून दिले. शासकीय योजनांबद्दल विचारलेले प्रश्न त्यांना आवडले नाही. त्यामुळे शासनाला तो शिव्या देऊ लागला. शासनाचा रोष त्याने संशोधिकेवर काढला. परंतु लगेच त्याच्या घरच्या लोकांनी त्यांना पकडून दूर घेऊन गेले. परंतु संशोधिका काही वेळाने त्यांच्या घरी गेल्या. त्यांनी त्या व्यक्तीला समजावून सांगितले. त्यांना हिंमत दिली की संशोधनाने नक्कीच काहीतरी मार्ग निघेल. त्यानंतर त्या व्यक्तीने संशोधिकेला मुलाखत दिली. प्रस्तुत अनुसूचीत बरेच प्रश्न असल्याने व जास्त लांबलचक असल्यामुळे लोक कंटाळून जायचे. त्यांना उत्तरे देण्याचा त्रास यायचा. तेव्हा मोठया कौशल्याने त्यांच्याकडून उत्तरे काढून घ्यावी लागत. कधी कधी एखादया प्रश्नाचे उत्तर सांगता सांगता कुणी कुणी स्वत:वर झालेल्या अन्यायाची कथा सांगता सांगता भावविवश होउन जात तेव्हा त्यांचे मन न दुखावता त्यांना पुन्हा मुळ मुदयांवर आणावे लागे. काही म्हातारे लोक संशोधिका त्यांच्यासाठी काहीतरी मदत करेल या आशेने पाहात असत. परंतु संशोधिकेने निव्वळ

हा एक अभ्यास आहे म्हणताच त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव उडून जात. बऱ्याच जणांना वाटे की आपला फार्म जनगणनेप्रमाणे भरायला आल्या. त्यामुळे आपण प्रत्येकानी आपली माहीती सांगायला पाहीजे. त्यामुळे ते आमच्या घरी या आणि आमची माहीती लिहा अशा प्रकारेही बोलणारे लोक संशोधिकेला मिळाले.

प्रत्येक खेडयात काही उत्तरदाते उत्साहीत होवून माहीती देत होते. परंतु तुमच्या समस्या नक्कीच सरकार दरबारी पोहोचतील असे आश्वासन त्यांना दयावे लागे. एका ठिकाणी एक सुशिक्षित व्यक्ती येवून संशोधिकेला हात जोडून तुम्हीच आमच्यासाठी काहीतरी करु शकता या सुरात म्हणाले, कारण त्यांच्या अमरावती भागात बोलीभाषेचा अपभ्रंश करुन माना चे माने असे लिहिल्या गेले. त्यातुन शाळेतील प्रमाणपत्रावर माने जात लिहीली आहे. त्यामुळे त्यांना माने असे लिहील्या गेले. त्यामुळे त्यांना माना जमातीचे जात प्रमाणपत्र मिळत नाही यामुळे कित्येकांना त्यांची नोकरी गमवण्याची वेळ आली होती. एकाच कुटुंबात एकाला माना व एकाला माने असे प्रमाणपत्र मिळाल्याने त्यांची नोकरी गेली. ती व्यक्ती एका घरी पाहूणा म्हणून आली होती.

संपूर्ण संशोधनात मुलाखती प्रक्रियेत संशोधिकेला बरेच वेगवेगळे अनुभव आले. परंतु जास्तीत जास्त ठिकाणी आदर व चांगली वागणुक मिळाली. संशोधिकेनेही प्रथमपासुन लोकांच्या भावना, विचारांचा आदर करावयाची भुमिका स्विकारली त्यामुळे त्यांचा आदर झाला व त्यांना मुलाखीतीचे काम व्यवस्थित पार पाडता आले.

### ५) मुलाखत प्रक्रियेतील इतर नोंदी:—

मुलाखत घेतांना त्यांच्या अपेक्षा उत्तरदात्यांना नोंदवता येत नव्हत्या. म्हणजे त्यांना थोडया शब्दांत सांगता येत नव्हते. हे शासनाने करावे असे सांगण्याऐवजी शासन त्यांच्यासाठी हे करत नाही असे उलटच ते सांगत असत. काही ठिकाणी त्यांना व्यवस्थित सांगता यायचे किती जणांना स्वाक्षरी करता येते हे

पाहण्यासाठी संशोधिकेने अनुसूचिच्या शेवटी उत्तरदात्यांची स्वाक्षरी घेण्याचा उपक्रम केला. त्यामुळे किती जणांना किमान स्वाक्षरी करता येते याचा पडताळा घेतला. मुलाखत घेतांना इतर मिळालेली माहिती जसे ऐतिहासीक माहीती, भौगोलिक परिस्थती, अडचणी, वा अनुसूचतीतील प्रश्नांपेक्षा वेगळी माहिती संशोधिकेने वेगळया वहीत नोंदून घेतली.

**६) इतर माहितीदारांचा उपयोग:—**

माना आदिवासींसंबंधी लिखित सामग्री अतिशय कमी प्रमाणात आढळली. सध्या जे शिक्षित, सामाजिक कार्यकर्ते व राजकारणी आहेत किंवा माना जमातीतीलच चांगले साहित्यिक आहेत. त्यांनीच थोडया प्रमाणात माना जमातीचा इतिहास शोधून काढण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे माना जमातीविषयी लिखाण केलेले आढळते. त्यांच्या मुलाखती घेउन (अनुसूची न भरता) अनुसूचीतील प्रश्नांव्यतिरीक्त माहीती एकत्र केली. मुक्ताबाई डोंगरावर होणाऱ्या वार्षिक जत्रेत व भद्रावती येथे भरलेल्या माना आदिवासींच्या मेळाव्यास संशोधिका स्वत: हजर होत्या व त्यांनी प्रत्यक्ष माना जमातींच्या लोकांत मिसळून त्यांच्या मेळाव्याचे व संस्कृतीचे जवळून अवलोकन केले. त्याचप्रमाणे माना आदिवासींचे लग्न व मृत्युसंस्कारात सहभागी होऊन प्रत्यक्ष संस्कृतीचे अवलोकन केले. माना आदिवासींच्या ‘शिवरात्र पुजेत’ सहभागी होऊन व त्यांच्या विविध धार्मिक सणांत सहभागी होऊन त्यांच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे निरीक्षण केले. माना आदिवासींच्या मुलांसोबत राहून त्यांच्या शैक्षणिक जीवनाचे निरीक्षण केले. आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांशी चर्चा करुन त्यांना मिळणारी वागणुक, शैक्षणिक सोयी सुविधा व प्रत्यक्षात मिळणारे ज्ञान यांचे निरीक्षण व अध्ययन केले आणि तेथील विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियांची टिपणे लिहून घेतली. आश्रमशाळेतील अतिशय विदारक तथ्ये समोर आली. त्याचप्रमाणे माना जमातीतील राजकारणी लोकांशी भेटी घेऊन माना जमातींविषयी अधिक जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे माना जमातीतील वयोवृध्द व्यक्तींशी संपर्क साधला. त्यांच्याशी मोकळया गप्पा मारल्या व त्यांची मुलाखत घेवून त्यांच्याकडून माना आदिवासींच्या उत्पत्तीविषयी दंतकथा एकून घेतल्या.

तर काही ठिकाणी सरकारी कार्यालयांतम माना आदिवासींना कशी वागणूक मिळते याचे अवलोकन केले.

अशाप्रकारे मुलाखती व्यतिरीक्त विविध प्रकारे माना आदिवासींच्या जीवनाविषयी माहीती जाणून घेतली. प्रस्तुत समग्राची मुलाखत अनुसूची तयार करतांना मदत तर झालीच परंतु त्याचबरोबर त्या त्या समूहाचे आकलन करुन घेण्यास मदत झाली आणि जी माहीती एकत्रित केली तिचा अनावश्यक व अतिशयोक्तीपूर्ण भाग वगळून इतर सामग्री प्राथमिक स्वरुपात म्हणून मानण्यात आली.

**२) लिखित सामग्री—शाब्दिक क्रिया पध्दती:—**

तथ्य संकलनाच्या पध्दतीत लिखीत पुरावा म्हणून उपलब्ध असलेल्या कागदपत्रात महत्त्वाचे स्थान असते. कागदपत्रांचे मूलभूत व दुय्यम असे दोन प्रकार केल्या जातात. मूलभूत कागदपत्रात पत्रे, कोर्टाच्या नोंदी, जनगणना अहवाल, आत्मचरित्रे, रोजनिशी यांचा तर दुय्यम कागद पत्रांत प्रत्यक्ष मूलभूत कागदपत्रांच्या आधारे केलेल्या संशोधन अहवालाचा समावेश होतो.

आदिवासी समाजात मुळातच साक्षरांची संख्या कमी असल्यामुळे व त्यांची लिपी नसल्यामुळे त्यांचे स्वत:चे असे लिखित साहित्य कमी प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे संदर्भ साहित्याचाच जास्त वापर करण्यात आला.

प्रस्तुत संशोधनात मूलभूत कागदपत्रे म्हणून जिल्हयाची लोकसंख्या व लोकसंख्येचे विविध पैलू नोंदविण्यासाठी जनगणना अहवालाचा उपयोग करण्यात आला. त्यासाठी चंद्रपूर जिल्हा वेबसाईट, चंद्रपूर जिल्हा वातरिंग व चंद्रपूर जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन २००१, चांदा डिस्ट्रीक्ट गॅझेटियर इत्यादी साहित्यांचा वापर करण्यात आला. त्यातून चंद्रपूर जिल्हयाची भौगोलिक व सांख्यिकीय माहीती मिळवली. त्याचप्रमाणे काही सुशिक्षित माना आदिवासींनी लिहीलेली पुस्तके, प्राथमिक व मूलभूत कागदपत्रांत समाविष्ट करण्यात आली. तसेच महाराष्ट्र शासनाचे अनुसूचित जाती—अनुसूचीत जमातीची यादी जनगणना २०१०—११ साठीची मुलभूत कागदपत्रात

समाविष्ट करण्यात आली. डॉ.सुमन बेहेरे यांच्या मते, ''प्रत्येक सामाजिक घटनेला इतिहास असतो. त्याचा अभ्यास केल्याशिवाय सामाजिक घटनेचे पूर्ण आकलन शक्य नाही''.[२१] परंतु माना जमातीची ऐतिहासिक माहीती लिखीत पुराव्यात अतिशय तोकडया प्रमाणात आढळते. माना जमातीला आदिवासींचा दर्जा मिळावा यासाठी शासनाशी संघर्ष करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या माना आदिम जमात मंडळच्या वतीने काढण्यात आलेल्या स्मरणिकेचाही मूलभूत कागदपत्रात समावेश करण्यात आला. त्याचप्रमाणे 'मानांना' आदिवासींचा दर्जा मिळाला किंवा अनुसूचित जमातीत स्थान मिळाले त्याचा 'माननीय सुप्रीम कोर्टाने' दिलेल्या न्याय निवाडयाची प्रत इंटरनेटवरु प्राप्त करुन घेतली. त्याचाही मूलभूत पुरावा म्हणून स्विकारण्यात आले.

वर्तमानपत्र—सामाजिक कागदपत्रे म्हणून संबोधल्या जातात. वर्तमानपत्रातून आलेल्या बातम्यातून मान्य आदिवासींच्या सद्यस्थितीचे बरेच आकलन होते. त्याचप्रमाणे विविध योजना व शासनाचे कार्यक्रमही वर्तमानपत्रांतून तसेच मासिकांतून प्रसिध्द होत असतात. माना आदिवासींचे विविध कार्यक्रम व त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी विविध योजनांचा स्विकार इत्यादी निदर्शनास यावे या हेतूने बातम्यांचे संकलन करण्यात आले. त्याचप्रमाणे माना आदिवासींविषयी विविध ग्रंथातून काही थोडया प्रमाणात जी माहीती आढळली त्यांचाही उपयोग दुय्यम कागदपत्रात करण्यात आला. त्यामुळे जिथे आवश्यकता वाटली तेथे विविध प्रसंगाचे फोटो काढून घेतले. त्यांचाही दुय्यम सामग्रीत उपयोग करुन घेतला.

अशाप्रकारे तथ्य संकलन करण्यात आले.

**३) निरीक्षण पध्दती:—**

प्रस्तुत अध्ययनात तथ्य संकलनासाठी मुलाखत तंत्रासोबतच निरीक्षण तंत्राचाही उपयोग करण्यात आला. संशोधकाला अध्ययन क्षेत्राचे निरीक्षण करावेच लागते. श्रीमती सुशिला ओडवायर यांच्या मते, ''निरीक्षण करीत असतांना संशोधन कर्ता महत्त्वाच्या गोष्टींची नोंद करतो असे अनेक विषयांचे अनेक फोटो शक्य असेल

तर घेतो''[२२] प्रत्यक्ष काही गोष्टी पहाव्या व अनुभवाव्या लागतात. तेव्हाच तथ्य संकलन करतांना त्यात वास्तवता येते. त्यातही संशोधन क्षेत्र हे आदिवासी भाग असल्याने व अध्ययनाचा विषय आदिवासी समाज असल्याने त्या समुहाविषयी थोडी माहीती व थोडेसे कुतुहल असल्याने निरीक्षण करणे आवश्यक ठरले. निरीक्षण पध्दतीचा वापर करण्यासाठी स्वत: अध्ययन क्षेत्रात जावे लागते. कधी तटस्थ राहून दुरुनच काही गोष्टींचे निरीक्षण करावे लागते. म्हणजेच 'अनियंत्रित निरीक्षण' करावे लागते. प्रस्तुत अध्ययनात संशोधिकेने अनियंत्रित निरीक्षण पध्दतीचा वापर केला. डॉ. प्रदीप आगलावे यांच्या मते, ''अनियंत्रित निरीक्षण म्हणजे ज्यांचे निरीक्षण करावयाचे आहे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसते. ज्या परिस्थितीमध्ये क्रिया घडतात त्याच परिस्थितीमध्ये त्या क्रियांचे निरीक्षण केले जाते. निरीक्षण कर्त्यांवर आणि ज्याचे निरीक्षण करायचे आहे. त्या परिस्थितीवर कोणत्याही प्रकारे नियंत्रण ठेवले जात नाही. निरीक्षण कर्ता मुक्तपणे त्या घटनांचे निरीक्षण करतो''.[२३] समाजशास्त्रात एखादया समुहाचे निरीक्षण करावयाचे असते तर त्या समुहाचे अनियंत्रित निरीक्षण करावेच लागते. त्यामुळे संशोधिकेनेही अनियंत्रित निरीक्षण पध्दतीचाच वापर माना आदिवासींच्या विविध पैलुचा अभ्यास करण्याकरीता केला. आदिवासींच्या धार्मिक कार्यक्रमांत ज्यात इतर बाहेरील व्यक्तीला स्थान नसते, ते दुरुनच निरीक्षण करावे लागते. अशावेळी संशोधिकेने 'असहभागी निरीक्षण पध्दतीचा' वापर केला तर काही ठिकाणी जसे समारंभ, मेळावे, लग्नकार्य, इत्यादी स्वत: सहभागी होवून म्हणजेच 'सहभागी निरीक्षण पध्दतीचा' वापर करुन निरीक्षण केले. समूहातील अन्य सभासदांप्रमाणेच सर्व प्रकारच्या क्रिया नव्यानेच सभासद झालेला संशोधक स्वत: करतो. समुहातील सर्व सभासदांना आपल्या वर्तनाचे निरीक्षण करण्यासाठी एक संशोधक आला आहे याची कोणतीही कल्पना नसते. कारण नवीन सभासद आपल्यापैकीच एक आहे असे अन्य सभासदांना वाटते. समुहातीलच एक सभासद होवून निरीक्षण केल्यामुळै त्या समुहाच्या भावना, श्रध्दा, विश्वास, प्रथा, इत्यादींचे यथार्थ ज्ञान संशोधिकाला प्राप्त होते. या सर्वांचा योग्य तो अर्थ संशोधकाला लावता येतो. प्रस्तुत अध्ययनात स्वत: संशोधिका माना आदिवासींची वस्ती असलेल्या

गावात राहत असल्यामुळे विविध प्रसंगी त्या माना आदिवासींत सहभागी होवून निरीक्षण करतात. त्यामुळे प्रस्तुत अध्ययनात बऱ्याच मोठया प्रमाणात सहभागी निरीक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला. परंतु काही धार्मिक क्रियांमध्ये मात्र दुरुनच निरीक्षण करावे लागले. घोडाझरी या गावी संशोधिकेने चार दिवस राहून मुलाखत अनुसूची भरली. त्याचप्रमाण निरीक्षण सुध्दा केले. मुक्ताबाई येथील मेळाव्यात सतत दोन वर्ष (दिवसांवर) सहभागी होवून त्यांचे धार्मिक जीवन जवळून पाहीले. तर त्यांचे आचार व विचारही जवळून निरीक्षण करण्यात आले. त्याचप्रमाणे त्यांच्या विश्वास व श्रध्दा यांचेही अवलोकन करण्यात आले. भद्रावती येथील एका कार्यक्रमाप्रसंगी माना आदिवासींची विविध कार्यक्रम, परंपरागत नृत्ये व मंडळाच्या कार्यक्रमांचे निरीक्षण करण्यात आले. त्याचप्रमाणे वासेरा या माना आदिवासी असलेल्या गावात गावाबाहेरील एका झाडाखालील लाकडाने व दगडाने तयार केलेल्या देवांना (मुर्तींना) विविध प्रकारे पूजा करतांना पाहीले. त्यात डोक्यावर पाण्याने भरलेली घागर घेऊन त्यावर कडुनिंबाच्या झाडाच्या फांदया ठेवून पूजा करण्यात आली. त्याचेही निरीक्षण करण्यात आले. संशोधिकेने स्वत: दररोज बारा दिवस एका गावातील आश्रम शाळेत जावून तेथील माना आदिवासी विद्यार्थ्यांचे निरीक्षण केले. त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन, त्यांना मिळणारे अन्न, कपडे, त्यांची राहण्याची व्यवस्था, त्यांना मिळणारे रोजच्या उपयोगाचे सामान इत्यादींचे निरीक्षण केले. त्यांना दररोज सकाळी नाश्ता व दोन वेळ जेवण मिळायचे. परंतू ते धान्य नीट स्वच्छ केले जात नव्हते. त्यांचे कपडे मळलेले होते व बऱ्याच विद्यार्थ्यांच्या अंगाला 'खरुज' हा त्वचेचा आजार झाला होता. दुसऱ्या एका आश्रमशाळेत संध्याकाळच्या वेळेला एका लहान विद्यार्थिनीचा उपचाराअभावी सर्पदंशाने मृत्यू झाला होता, तर परीक्षेच्या वेळी काही शिक्षक या आदिवासींना काहीच येत नाही, असे म्हणून मारत होते. संशोधिका याचे निरीक्षण करत असतांना त्यांच्या अंगावर शहारे येत होते. प्रत्यक्षात त्या विद्यार्थ्यांना 'आदिवासींना काहीच येत नाही, समजत नाही'. या सबबीवर नीट शिक्षण देण्यात येत नव्हते असे नंतर माहीत झाले. परंतु याबाबत कोणतेही आदिवासी कुठेही तक्रार करीत नव्हते असे लक्षात आले.

बऱ्याच गावातील माना आदिवासींमध्ये दारु पिण्याचे व तंबाखू चुना, सुपारी यांचे मिश्रण केलेले 'खर्रा' नावाचे पदार्थ खाण्याचे त्यांना व्यसन लागले होते. त्यात स्त्रियाही 'खर्रा' खायला लागल्यामुळे लहान आदिवासी मुलांनाही गुटखा, खर्रा, तंबाखु खाण्याचे व्यसन मोठया प्रमाणावर जडले होते. कोणत्याही सणासुदीला सकाळपासुनच दारु पिणारे बरेच आदिवासी होते.

अशाप्रकारे त्यांच्यात बऱ्याच वाईट सवयी पडल्या होत्या. लग्नप्रसंगी लग्नाच्या पूर्व संध्येला त्यांचा 'डहाका' नावाचा कार्यक्रम संशोधिकेला पाहता आला. त्यात एका 'भगत' नावाच्या माणसाच्या अंगात मृत पावलेली माणसे येतात. त्यांची पूजा केली जाते. असाही प्रकार पाहण्यात आला. तर आदिवासी स्त्रियांनी हाताला कंकण बांधतांना म्हटलेली सुंदर गीतेही संशोधिकेला ऐकता आली. माना आदिवासीचा आवडता 'दंडार' व 'तमाशा' हा लोक–नाटयाचा पारंपारीक कार्यक्रमही संशोधिकेला पाहता आला. सध्याचे सिनेमा आणि टि.व्ही.च्या युगात या पारंपारीक लोककलेचा निखळ आनंद वेगळाच असतो. त्याचप्रमाणे माना आदिवासींत बैलाच्या शर्यती ज्यांना 'शंकरपट' म्हणतात. त्याचीही मोठी हौस असते. अशा शंकरपटांना ते आवर्जुन जातात व बैलांच्या शर्यतीवर काही लोक पैसेही लावतात. तर काही आदिवासी शंकरपटाच्या निमित्ताने भरणाऱ्या जत्रेचीच मजा करतात. शिवरात्रीला आवर्जुन शंकराच्या मूर्तीची व शिवलिंगपूजा करतांना संशोधिकेने निरीक्षण केले की मोठया तन्मयतेने व श्रध्देने ते पूजा करतात. खेडयांमध्ये मुलाखत घेतांना संशोधिकेने तेथील लोकांचे निवासस्थान, खाण्यापिण्याच्या वस्तू, धार्मिक स्थळे, वागण्याच्या पध्दती, परस्पर संबंधाचे प्रतिमान, कुटूंबातील जीवनमान दर्शक वस्तू इत्यादी बाबींच्या नोंदी घेतल्या.

### ८) तथ्य प्रक्रियनः—

तथ्य संकलनाच्या विविध पध्दतीचा उपयोग केल्यानंतर प्राप्त झालेल्या तथ्यांचे तथ्य प्रक्रियन व सारणीकरण ही संशोधनातील पुढची पायरी समजली जाते.

तथ्य प्रक्रियन सर्वसाधारणपणे दोन पध्दतीने केले जाते. एकंदर संपूर्ण काम हाताने केले जाते, त्याला हस्तसारणीकरण म्हणतात. (Manual Tabulation) याउलट संगणकाचा उपयोग करुन प्रक्रियन केल्या जात असेल तर त्याला यांत्रिकी सारणीकरण असे म्हणतात. (Mechanical Tabulation)

तथ्यांचे संपादन करणे, संकेतीकरण करणे, वर्गीकरण करणे आणि सारणीकरण करणे हे संकलीत तथ्यांवरील प्रक्रियनाचे प्रमुख टप्पे आहेत. तथ्य प्रक्रियनाचे कार्य कोणत्या दिशेने व्हावे हे बहुतांशी घेतलेल्या संशोधन विषयाचे उद्‌देश व गृहीतकृत्ये यावर अवलंबून असते. म्हणुनच प्रक्रियनाच्या प्रत्येक पायरीत उद्‌देश व उपकल्पना (गृहीतक) समोर ठेवावे लागतात. म्हणून या ठिकाणी संशोधिकेने अध्ययनाच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयाची चर्चा केलेली आहे.

**अ) संस्करणः—**

संशोधिकेचे संशोधन क्षेत्र मोठे आहे आणि नमुन्यांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे संशोधिकेने मुलाखतकाराची योजना करण्याचे ठरविले. परंतु नंतर संशोधन विषय आदिवासी समाज असल्याने इतर मुलाखतकार उत्तरदात्यांकडून माहीती योग्य तऱ्हेने घेवू शकणार नाही असे वाटले. शिवाय स्वत: मुलाखत घेतल्यामुळे मुलाखतीसोबत निरीक्षण तंत्राचाही अवलंब करता येतो हे लक्षात आल्यावर संशोधिकेने स्वत:च मुलाखती घेण्याचे कार्य पूर्ण केले व तथ्य संकलीत केले. परंतु मुलाखत अनुसूचीतील प्रश्नांची संख्या जास्त असल्यामुळे उत्तरदाते कंटाळून जात असत. किंवा कधी कधी त्यांना कामाला जायला वेळ होत असे. त्यामुळे संशोधिकेने काही ठिकाणी उत्तरे संक्षिप्त स्वरुपात नोंदवून घेतले तर काही ठिकाणी अधिकची माहीती पेन्सीलने नोंदवून घेतली. ती माहीती इतर वहीत नोंदवून घेतली. त्याचप्रमाणे एकाच गावात मुलाखत घेत असतांना तेथील सुविधांबाबत सर्व उत्तरदात्यांना विचारल्यास एकाच प्रकारचे उत्तर यायचे त्यामुळे गावातील माहीती बरेच वेळा काही उत्तरदात्यांच्या संदर्भात नोंदवली गेली. अशाप्रकारे तथ्य संकलीत करीत असतांना त्यात विविध प्रकारच्या त्रृटी

राहण्याची शक्यता असते. प्रस्तुत त्रृटींना वेळीच दूर केले नाही तर तथ्यातील विश्वसनीयता, वस्तुनिष्ठता व अचुकतेला बाधा येते. म्हणून संकलीत तथ्यावर संपादनाचा संस्कार म्हणून संस्करण करुन न्यूनता दूर करणे आवश्यक होते. पु.ल. भांडारकर यांच्या मते, ‘‘संस्करणामुळे केवळ संकेतीकरणात पुढे उत्पन्न होणाऱ्या समस्याच टाळल्या जातात असे नाही तर त्याचबरोबर संस्करणामुळे तथ्य संकलनाची गुणवत्ताही वाढते’’.[२४] त्यामुळे तथ्यातील गुणात्मकता वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने संशोधिकेने मुलाखत अनुसूचींच्या साहाय्याने वैयक्तिक मुलाखत घेतल्यानंतर रिकामा वेळ प्राप्त होताच संस्करणाचे कार्य केले. संस्करण करीत असतांना आधी अनुसूचिला क्रमांक दिला. त्यानंतर एखादया ठिकाणी नजर चुकीने खुण केली नसेल तर उत्तर आठवून त्यावर खुणा केल्या. गावातील भौतिक सुविधांबद्दल माहीती घेतांना सर्व उत्तरदात्यांनी सारखीच माहीती सांगितली. ती काही अनुसूचित लिहीलेली होती. तिलाही संबंधित गावांच्या अनुसूचित लिहील्या गेली. त्यानंतर जी उत्तरे वेळेअभावी संक्षिप्त टिपली होती. ती विस्तृत स्वरुपात लिहीली. अशाप्रकारे लक्षात आलेल्या त्रृटी पूर्ण केल्या.

अध्ययनाचे क्षेत्र मोठे असले तरी संशोधिकेने स्वतः मुलाखती घेतल्या. त्यामुळे मुलाखत कार्याला एक वर्षाचा जवळपास कालावधी लागला. परंतु मुलाखत घेवून झाल्यावर लगेच तथ्यांवर संस्करणाचे कार्य केले. स्वतः मुलाखती घेतल्यामुळे विशेष जास्त प्रमाणात त्रुटया राहणार नाही याची आधिच काळजी घेतली होती. त्यामुळे लेखनाचे कार्य सोपे झाले.

**ब) वर्गीकरणः—**

संशोधनात जे तथ्य गोळा केले जातात. ते वेगवेगळया पध्दतीने विखुरलेले असतात. या सर्व तथ्यांना विशिष्ट गटांमध्ये विभागून त्यांची मांडणी करणे, आवश्यक असते. तथ्यांचे वर्गीकरण म्हणजे, ‘‘प्राप्त केलेल्या तथ्याचे त्याच्या सारखेपणाच्या अथवा वेगवेगळया आधारावर काही निश्चित व मोजक्या गटात विभाजन करणे होय’’.

अनुसूचित साधारणत: मुक्त व आवृत्त अशा दोन्ही स्वरुपाचे प्रश्न होते. जे मुक्त प्रश्न होते अशा प्रश्नांना वेगवेगळया उत्तरदात्यांकडून वेगवेगळया प्रकारची उत्तरे प्राप्त होत होती. अशा विखुरलेल्या माहीतीला मोजक्या गटात आणणे आवश्यक असते. जिथे आवृत्त प्रश्न आहेत त्या ठिकाणी पुर्वनिर्धारित उत्तरे दिली होती. त्यामुळे त्याचे वर्गीकरण करणे आवश्यक ठरत नाही. कारण उत्तराच्या स्वरुपाच्या पूर्वीच वर्गीकरण दिलेले होते. परंतु मुक्त प्रश्नांना अनेक स्वरुपाची उत्तरे प्राप्त होत असल्यामुळे सारणीकरणाच्या दृष्टीने वगीकरणाची गरज होती. अशा विस्कळीत उत्तरांचा बारकाईने विचार करुन एकाच प्रश्नाला प्राप्त झालेल्या अनेक उत्तरांचे कमीत कमी गट करुन त्याचे वर्गीकरण करण्यात आले.

### क) संकेतीकरण:—

एकदा वर्गीकरण कार्य पूर्ण झाले की, त्यानंतर तथ्यात संकेतीकरण करावे लागते. ''तथ्यांना सारणीकृत करणाऱ्या कार्यपध्दतीला संकेतीकरण असे म्हणतात''.[२५] संकेतीकरण म्हणजे पूर्वनिर्धारीत वर्गाला समाविष्ठ होणाऱ्या प्रत्येक उत्तरास संकेत देणे व हे संकेत आकडयात, शब्दात किंवा खुणा करुन दिल्या जातात. प्रश्नावली, मुलाखत अनुसूची, निरीक्षण अनुसूची व इतर तथ्य संकलनाच्या पध्दतीने संकलीत केलेल्या तथ्याचे प्रतिकात रुपांतर करण्यात येते. प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने मुलाखत अनुसूची विकसित करतांनाच संकेतन केले. तसेच मुलाखत अनुसूचीमध्ये उत्तरदात्याने दिलेल्या उत्तरांची नोंद करतानाही ती नोंद सांकेतिकरित्या केलेली होती. त्यासाठी अंक व खुणांचा उपयोग करण्यात आला. या दोनही स्तरावर संकेतीकरण करण्याचा प्रयत्न केल्यावर उर्वरीत तथ्यांचे संकतीकरण करण्याचे कार्य संपूर्ण तथ्य एकत्रीत केल्यावर पार पाडले. त्यासाठी मुलाखत अनुसूचीवर वेगवेगळया रंगाच्या पेन्सिलने खुणा केल्या. संशोधिका स्वत:च संकेतक असल्या कारणाने संशोधिकेला तथ्याची आरंभापासून यथायोग्य माहीती होती. त्यामुळे संकेतीकरण कार्यात सुलभता आली. संकेतीकरणापुर्वी तथ्याचे संस्करण करण्यात आले होते. त्या कारणाने संकेतीकरणात अडथळे प्रत्ययास आले नाहीत.

## ड) संकेतन तक्ता—

मुलाखत अनुसूचीद्वारे जी तथ्ये प्राप्त झाली त्यांचे संकेतीकरण केल्यावर आधी वेगवेगळया प्रश्नांसाठी वेगवेगळे संकेतन तक्ते तयार केले. त्यामुळे संकेतन तक्ते सुटसुटीत झाले. त्यानंतर एक मोठा संकेतन तक्ता तयार करुन त्या सर्व समग्रास तक्त्यामध्ये नोंदविण्यात आले. सर्वच उत्तरदात्यांची सर्व प्रश्नांना दिलेली उत्तरे एकत्रित करता यावी व एका दृष्टिक्षेपात बघता यावी म्हणून संकेतन तक्त्याची/मास्टर चार्टची आवश्यकता असते. संकेतन तक्त्यात ग्रंथीत केलेल्या तक्त्यामुळे सारणीकरणाचे काम सुलभ झाले आणि महत्वाचा म्हणजे विभीन्न चलातील पारस्पारीक संबंध स्पष्ट करुन परस्पर छेदक सारण्या तयार करण्याचे काम साध्य झाले. संकेतन तक्त्याच्या मदतीने नमुन्यातील एककाच्या संदर्भात प्राप्त झालेले तथ्य एका दृष्टिक्षेपात पाहता येतात व त्यातील अंतसंबंध दर्शविणे सोयीस्कर होते. एकप्रकारे संकेतन तक्ता सारणीसाठी उपयुक्त ठरतो. जेव्हा संशोधक आदिवासी समाजाचे अध्ययन करतो त्यांच्या बऱ्याच क्रिया एकमेकांशी संबंधित असतात. त्यामुळे वेगवेगळया चलांतील कार्यकारणभाव सारण्यांद्वारे स्पष्ट करता येतो.

## ई) सारणीकरणः—

तथ्यावर संस्करण झाले. संकेतीकरण झाले म्हणजे त्यांचे 'सारणीकरण' करावे लागते. वर्गीकरण व सारणीकरण या दोन्ही प्रक्रिया परस्परांना पुरक आहेत. ''सारणीकरणाचा उद्देश तथ्य सामग्रीला एक व्यवस्थित रुप देउन संशोधन समस्येला अधिक स्पष्ट करणे हा आहे. सामाजिक संशोधनासाठी संकलीत केलेल्या तथ्यांना किंवा आकडयांना सुव्यवस्थित व सरळ स्वरुपात प्रस्तुत करणे म्हणजेच सारणीकरण होय. सारणीद्वारे तथ्यांच्या वर्गीकरणानंतर त्या तथ्यांची अशा व्यवस्थित तऱ्हेने मांडणी करता येते की, त्यामुळे तथ्याचे महत्त्व व अर्थ स्पष्ट होईल.''[२६]

सारणीकरण दोन प्रकारे केल्या जाते. हाताने करावयाच्या सारणीकरणास हस्तसारणीकरण म्हणतात. तर यंत्राने करावयाच्या सारणीकरणास यांत्रिक सारणीकरण

म्हणतात. प्रस्तुत अध्ययनात वर्गीकरण संकेतन, मोजणी ही सर्व कार्य हातानेच केलेली आहेत. म्हणजेच 'हस्तसारणी करणाचा' उपयोग करण्यात आला. यांत्रिकी सारणीकरणापेक्षा हस्तसारणीकरण पध्दती स्विकारण्यामागे संशोधिकेची भुमिका अशी की,

१) संशोधनासाठी नमुना म्हणून निवडलेल्या एककांची संख्या २०० असल्याकारणाने यांत्रिकीकरणा पेक्षा हस्तसारणीकरण आर्थिक दृष्टया फायदेशीर ठरते.

२) संशोधनकर्ती स्वत: ग्रामीण आदिवासी भागात राहत असल्यामुळे जवळपास यांत्रिकीरणाची सोय उपलब्ध नव्हती.

३) यांत्रिकी सारणीकरण जलदगतीने होणारी असली तरी त्यासाठी लागणारी पूर्व तयारी पंचकार्डात तथ्यांची मांडणी करणे इत्यादी बाबीकरीता बराच वेळ आवश्यक ठरला असता.

४) अचुकरित्या केलेल्या हस्तसारणीकरणातुन गुणात्मकता वाढावी अशा प्रकारची भूमिका, मध्यवर्ती माणून यांत्रिकी सारणीकरणापेक्षा हस्तसारणीकरणाला स्विकृत करण्यात आले.

सारणीकरणात संशोधन समस्या व उद्देश आधारभूत मानून दोन किंवा जास्त चलातील सहानुवर्ती संबंध जाणुन घेण्यासाठी योजना तयार करण्यात आली. या योजनेप्रमाणे ऐतिहासिक माहीतीचा सामाजिक सद्यस्थिती व परिवर्तनाशी असणारा संबंध त्याचप्रमाणे सांस्कृतिक चलाचा शैक्षणिक चलाशी, धार्मिक चलाचा राजकीय चलाशी त्याचप्रमाणे आधुनिकीकरणाचा सहसंबंध मूळ संरचनेच्या व सामाजिक परिवर्तनाशी अशा प्रकारे एका चलाचा इतर चलांशी असणारा सहानुवर्ती संबंध स्पष्ट करण्याच्या हेतूने सारण्या तयार करण्यात आल्या. सारण्यामध्ये दोन चलातील किंवा तीन चलातील संबंध स्पष्ट करणाऱ्या परस्पर छेदक सारण्या बनविण्यात आल्या. सारण्या बनविल्या नंतर संकलीत तथ्यांचे सारांश रुपात मांडण्यासाठी सांख्यिकीय मध्य, मध्यीका, शेकडेवारी इत्यादी मापाचा उपयोग करण्यात आला. तसचे सारणीकरणाचे काम पूर्ण

झाल्यावर त्यात संमिलीत असलेल्या चलाच्या सहानुवर्ती संबंधाला आधारभुत मानुन तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करण्यात येवून निष्कर्षाची मांडणी करण्यात आली.

## ९) अहवाल लेखनः—

संशोधकाने परिश्रमपुर्वक उभे केलेले ज्ञान एका विशिष्ट पध्दतीने लेखनबध्द करणे आवश्यक असते आणि संशोधकाने केलेल्या संशोधनाच्या प्रक्रीयेचा शेवटचा टप्पा हा अहवाल लेखनाचा व सादरीकरणाचा असतो. संशोधनातुन उभ्या केलेल्या इमारतीवर कळस चढविण्याचे काम अहवाल लेखनानेच पूर्ण होत असते. त्यामुळे संशोधनाचा अंतिम टप्पा हा अहवाल लेखन असून तो सर्वाधिक महत्त्वपूर्ण आहे. अभ्यासविषय निश्चित करुन त्यासंबंधी विविध मार्गाने व विविध तंत्रांच्या सहायाने माहिती संकलीत करण्याच्या उद्‌देशाने संशोधनाची वाटचाल होत असली तरी संशोधनाचे अंतिम उद्‌दिष्ट एवढे मर्यादीत नसते तर संशोधनाचे उद्‌दिष्ट अधिक व्यापक असते. संशोधना दरम्यान संशोधकाने ज्या ज्या कृती केल्या, पध्दती वापरल्या, वास्तविक माहीती मिळवून तिचे शास्त्रीय विश्लेषण करुन अभ्यासाविषयाबाबतचे निष्कर्ष काढले हे निष्कर्ष व्यवस्थितरित्या व सुत्रबध्दी पध्दतीने लिहून जगाला माहित होण्यासाठी तो ज्या विद्यापीठात संशोधनकार्य करीत असेल त्या विद्यापीठात सादर करावा लागतो.

संशोधन कितीही उत्कृष्ट केले असेल परंतु त्याचा अहवालच सादर केला नसेल तर त्या संशोधनास महत्त्व नसते. आशय विश्लेषण व अर्थ शोधन झाल्यानंतर अभ्यास विषयाच्या स्वरुपांपासून ते त्या संबंधीच्या निष्कर्शपर्यंतची माहिती सूसूत्र पध्दतीने शब्दांकित करणाच्या क्रियेलाच अहवाल म्हणतात. ''गुड आणि हॉट यांच्या मते, अहवाल तयार करणे हे संशोधनाचे अंतिम चरण होय आणि त्याचा उद्‌देश इच्छुक वाचकांना अध्ययनातुन काढण्यात आलेल्या परिणामांना समजू शकेल अशा व्यवस्थित व विस्तारपुर्वक स्वरुपात मांडणे होय की ज्याद्वारे वाचक तथ्यांना समजू शकेल व स्वतःपुरता तरी संशोधनाच्या निष्कर्षाची प्रामाणिकता पडताळून पाहण्यायोग्य बनेल''.[२७] डॉ.सदा कऱ्हाडे यांच्या मते, ''प्रबंधाच्या प्रारंभिक व कच्या रुपरेषेत आवश्यकतेनुसार

तसेच शक्यते नुसार, संभाव्यतेनुसार फेरबदल करीत संशोधन हेतूच्या अनुषंगाने प्रबंधाची अंतिम रुपरेषा निश्चित करता येते. ती केल्यानंतरच मग प्रकरणश: प्रबंध लेखन करणे सोयीचे असते''.[२८] याचाच अर्थ असे म्हणावे लागेल की संशोधन अहवाल लेखनाची पूर्वतयारी संशोधन समस्या निश्चितीपासुनच करावी लागते. सुशिला ओडवायर यांच्या मते, ''अहवाल लेखन ही संशोधन कर्त्याची एक महत्वाची जबाबदारी मानावी लागेल''.[२९] त्या पुढे म्हणतात, ''अचुकता व स्पष्टता हे उत्तम शास्त्रीय स्वरुपाच्या लेखनांचे मुलभूत गुण आहेत''.[३०]

सदर संशोधनात संशोधनकर्तीने वर्णनात्मक संशोधन उत्तरआराखडयाचा अवलंब केला. त्यामुळे अहवाल लेखन करतांना एक व्यवस्थित दिशा प्रदान झाली. संशोधनकर्तीला सदर अहवाल लेखनाला सहा महिण्याच्या वर कालावधी लागला. त्यात प्रस्तावना, समस्या सुत्रण, अध्ययनाचे उद्‌देश, गृहीतकृत्ये व तथ्य संकलनाच्या पध्दती, नमुना निवडीचे तंत्र व नमुन्यांची संख्या त्याचप्रमाणे तथ्यांच विश्लेषण, वर्गीकरण सामान्यीकरण व निष्कर्षापर्यतची सगळी बांधणी सूत्रबध्द पध्दतीने करण्यात आली. अहवाल लेखनाच्या शेवटच्या टप्यापर्यत जशीजशी तथ्ये प्राप्त होत गेली त्याप्रमाणे अहवाल लेखनात त्यांचा समावेष करण्यात आला. व अहवाल लेखनाचे क्लिष्ट कार्य मोठया परिश्रमाने पूर्ण करण्यात आले. तरीही अहवाल लेखनात मनुष्य स्वभावाप्रमाणे काही त्रृटी राहण्याची शक्यता असल्याने मार्गदर्शकांकडून वारंवार त्याची तपासणी करण्यात आली. व त्रृटींना दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न संशोधिकेकडून करण्यात आला.

अहवाल लेखनात दिलेली सांख्यिकी बऱ्याच ठिकाणाहून गोळा करण्यात आली. त्यात दुय्यम स्त्रोतांचाही उपयोग करण्यात आला. सदर संशोधन चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासी संबंधी असल्याने व माना आदिवासी संबंधाने फार लिखीत माहीती उपलब्ध नसल्याने मोठया प्रयत्नाने मिळवावी लागली. त्यामुळे दुय्यम स्त्रोतांत त्रृटी असल्यास त्या त्रृटी अहवाल लेखनात राहू नये म्हणून वारंवार दक्षता घेण्यात आली. अशाप्रकारे अहवाल लेखनाचे कार्य पूर्ण करण्यात आले.

## १०) संशोधनातील अडचणी:—

सामाजिक संशोधन ही एक मोठी जटील व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्याचप्रमाणे डॉ.सुमन बेहेरे यांच्या मते, ''सामाजिक घटनांचा अभ्यास तसाही वेळखाउ असतो व सतत बदलत्या तथ्यांचे अध्ययन करणे कठीण होते. आणि अनेकदा संशोधन पूर्ण होते व तेव्हा निष्कर्ष कालबाहय होतात''.[३१] परंतु तरही पुढे त्या असेही लिहीतात की, ''संशोधन ही प्रगतीची जननी आहे''.[३२] डॉ.दु.का.संत यांच्या मते, ''आधुनिक युग हे संशोधनाचे युग आहे''.[३३] त्यामुळे समाजाची प्रगती करण्यासाठी सामाजिक संशोधनाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. तेव्हा संशोधन प्रक्रियेत संशोधनकाने घेतलेले निर्णय कार्यान्वित करीत असतांना अनेक प्रकारच्या अडचणींचा मुकाबला करावा लागतो. असे म्हणण्यापेक्षा अडचणींचा मुकाबला करावा लागणार हे संशोधन सुरु करण्यापुर्वीच संशोधकाला माहीत असते. त्याची त्यांना जाण असते आणि त्यासाठी त्यांनी आधीच विचारही केलेला असतो. अडचणींमुळे संशोधनाच्या कार्याची गती अवरोधित होते. दुसरे म्हणजे प्रमाण्यता, विश्वसनीयता व वस्तुनिष्ठतेला बाधा येवू शकते. यासाठी संशोधकाने अडचणींचा विचार आधीच केलेला असतो तरीही काही अनपेक्षित अडचणी येतातच ज्यांचे निवारण करुन संशोधनाचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी संशोधकाने प्रयत्नशील असले पाहीजे.

प्रस्तुत अध्ययनात संशोधिकेला खालीलप्रमाणे अडचणी आल्या—

१) चंद्रपूर जिल्हयात माना आदिवासी जमात इ.स.च्या ९ व्या शतकापासून वा त्याच्या पूर्वीपासून वास्तव्यास आहे. इ.स. च्या ९ व्या शतकात चंद्रपूर जिल्हा व त्याच्या आसपास माना आदिवासींचे राज्य होते असा उल्लेख 'डिस्ट्रीक्ट गॅझेटीयर चांदा डिस्ट्रीक्ट मध्ये आढळतो. तरीही त्यांना २००६ पर्यत विशेष मागास प्रवर्गात नोंदल्या गेले होते. त्यामुळे त्यांना पुन्हा शासनासोबत संघर्ष करावा लागला व ८ मार्च २००६ रोजी त्यांना आदिवासींचा दर्जा मिळून अनुसूचित जमातींच्या यादीत १८ व्या क्रमांकावर (नंतर १७ व्या क्रमांकावर पुढे सरकली) नोंद घेण्यात आली. त्यामूळे महाराष्ट्रातील

आदिवासींचा अभ्यास करणाऱ्या बहुतेक अभ्यासकांनी 'माना' आदिवासी वगळूनच अध्ययन केलेले आढळते. त्यामुळे माना आदिवासी विषयी अगदी तोकडी माहीती ग्रंथात मिळाली.

२) जिल्हयात माना आदिवासींना इ.स.२००६ मध्ये अनुसूचित जमातींच्या यादीत नाव नोंदविल्यामुळे जनगणना २००१ च्या अहवालात किंवा इतरत्र सांख्यिकीय माहीतीत कुठेही मानांचा आदिवासींच्या संख्येत विचार नव्हता तर त्यांचा गोंड आदिवासींची पोटजमात तर कुठे कुणबी म्हणून विवेचन होते. त्यामुळे माना आदिवासींची प्रत्यक्ष लोकसंख्या प्राप्त होवू शकली नाही. संशोधिकेला इतर आदिवासींच्या लोकसंख्येवरुन अंदाजे चंद्रपूर जिल्हयातील माना आदीवासींची लोकसंख्या काढावी लागली. त्यामुळे सुरुवातीला मोठया संख्येत नमुना घेतला परंतु प्रत्यक्षात सर्वेक्षण केल्यावर नमुना कमी करावा लागला.

३) चंद्रपूर जिल्हयात आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात आढळते. चंद्रपूर जिल्हा आर्थिक, सामाजिक समालोचन मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागले. इ.स. २००८—२००९ प्रमाणे आकडेवारीच देता आली.

४) आदिवासी समुदायात साक्षरतेचे प्रमाणे अतिशय कमी असल्यामुळे लोकांना त्यांचे वय, शिक्षण, उत्पन्न यांची अचूक माहीती देण्यात अडचणी आल्या. प्रस्तुत माहीती अचुक नोंदवून घेण्यासाठी वेगवेगळया तंत्राचा व मितीचा अवलंब करावा लागला. त्याचप्रमाणे मुलाखत अनुसूचीतील काही प्रश्न त्यांना समजावून सांगावे लागले.

५) आपली माहीती सांगितली तर काय होईल किंवा माहीती सांगूनही काहीच उपयोग नाही या दोन्ही भावनेने अधिकाअधिक लोक टाळाटाळ करीत. त्यामुळे त्यांना समजावण्यातच अधिक वेळ लागत असे. काही उत्तरदाते प्रश्नांची उत्तरे देतांना स्वत:च्या जीवनातील प्रसंग सांगू लागत किंवा शासनाला दुषणे देत असत. अशावेळी त्यांच्या कथनास योग्य तो प्रतिसाद देउन कौशल्याने मूळ विषयाची जाणीव करुन देण्यात येत होती.

६) माना आदिवासींची संख्या ज्या गावात अधिक आहे ती बहुतांश गावे मुख्य रस्त्यापासून बरीच आतमध्ये, दुर्गम भागात आहेत. त्यामुळे तिथे बसही जात नव्हती. उदा. घोडाझरी गाव जंगलात आहे. खातोडा गाव आडवळणाला आहे. अशावेळी संशोधिकेला स्वत:च्या साधनाने जावे लागे. परंतू घनदाट जंगलातून जाण्याचा अनुभवही थरारकच होता. एक दिवस जाण्यायेण्याचा एवढा त्रास! तर हे आदिवासी स्वत:चे जीवनचरीत्र एवढया दुर्गम भागात कसे चालवत असतील? असाही विचार संशोधिकेच्या मनात आला. आणि या उत्सुकतेतून संशोधनाला अधिकच 'अर्थ' प्राप्त झाला असे वाटले. म्हणूनच ते इतर प्रगत समाजापासून तुटलेले आहेत असेही लक्षात आले. घोडाझरी गावात संशोधिकेची उन्हाळयाचे दिवस असल्याने अंगणातच झोपण्याची व्यवस्था केली गेली होती. तेथील लोकांनी सांगितले की, त्यांच्या घरचे गाईचे वासरु पंधरा दिवसाअगोदर गोठयातून वाघाने नेले, तेव्हा संशोधिकेच्या अंगावर शहारे आले. तेथील आदिवासी स्त्रिया ज्या तळयावर कपडे धुवायला जात तेथेही संशोधिका गेली. तळे गावापासुन बरेच लांब होते. तेथील निसर्ग सौदर्य अप्रतिम होते. परंतु त्या तळयावर काही झाले तर गावापर्यत हाकही जात नव्हती. त्याप्रमाणे तेथील स्त्रिया टेंभूर्णीची पान तोडायला नेहमीप्रमाणे जंगलात गेल्या. एक स्त्री पाणी संपल्यामुळे तिथेच बसून राहीली. इतर स्त्रिया गावात येउन सांगेपर्यत व बैलगाडी घेउन तिला आणायला जाईपर्यत ती स्त्री मरण पावली. हे सगळ ऐकतांना ते शब्दबध्द करण्याची हिंमत होत नव्हती. एवढया प्रगत देशात एखादया गावातील लोकांना दवाखान्यात जाण्यासाठी साधे एक वाहनही मिळू नये किंवा औषधही मिळू नये काय? साधारणत: अशीच परिस्थिती खातोडा, पाहर्णी इत्यादी गावांची ही आहे जेथे कुणी आजारी पडले तर दवाखान्यात जाण्याचीही सोय नाही. त्यामुळ तेथील लोक मुलाखती देण्यात उदासीन होते.

७) वेगवेगळया समुहातील जीवन वैशिष्टयांप्रमाणे संशोधिकेला अडचणी जाणवत होत्या. आदिवासी समुदायात, दुपारच्या वेळी गावात कोणीही मिळत नव्हते. परंतु त्यांना ऋतुनुसार काम मिळते. वर्षभर कायम मिळत नाही. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी

सकाळी व संध्याकाळी मुलाखती घ्याव्या लागल्या. उन्हाळयात आदिवासींना जास्त कामे नसतात. त्यामुळ जंगलातून अंधारात जाउन टेंभूर्णीची पाने आणने व त्यांचे 'मूडके' बनवून विकणे अशा प्रकारची कामे ते करतात. दुपारी घरी बसून मुळके बनवतात. (मुळका म्हणजे ५० पानांची एकावर एक ठेवून घडी तयार करणे व बांधणे.) त्यावेळी त्यांच्या मुलाखती घ्याव्या लागल्या.

८) मुलाखतीस बराच वेळ म्हणजे निदान दीड ते दोन तास तरी लागत. त्यामुळे कधीकधी लोक कंटाळत असत. त्यांच्या कलाने माहीती विचारुन घ्यावी लागली. त्याचप्रमाणे त्यांचेही बरेच एकून घ्यावे लागते. एका उत्तरदात्याकडे संशोधिका मुलाखत घ्यायला गेल्या असता त्यांनी गावातील ग्रामपंचायत सदस्यांना बोलावून आणले. त्यांनी सांगितले तेव्हा त्या व्यक्तीने मुलाखत दिली. दुसऱ्या एका गावात संशोधिका मुलाखत घ्यायला गेल्या असता त्यांना कळले की त्या गावात नुकताच एक मोठा वाघ येऊन गेला आणि त्याने एका माणसाला पंजा मारुन घ्यायाळ केले तेव्हा कुणाचीही मन:स्थिती मुलाखत दयायची नव्हती व संशोधिकेला त्या दिवशी परत यावे लागते. इतर वेळी त्या गावात जावे लागले. अशाप्रकारे अनेक दिवस वाया गेले.

९) मूलाखती घेतांना संशोधिकेला कळले की त्या भागात 'दारिद्रयरेषेखालील' लोकांची गणना करण्यात आली होती व त्यात अनेक गरीब व गरजू कूटुंबांना वगळले होते. त्यामुळे संशोधिका मुलाखत घ्यायला जाताच लोक माहिती सांगायला घाबरत. ज्यांच नाव 'दारिद्रयरेषेखालील यादीत' आहे त्यांना असे वाटे की संशोधिका त्यांचे नाव यादीतून काढून टाकेल. परंतु नंतर त्यांना समजावून सांगितले की ते माहीती सांगायला तयार होत असत.

१०) संशोधिका मुलाखत घ्यायला गेल्या की लोक त्यांना त्यांच्या योजनांची कागदपत्रे दाखवत भ्रष्टाचारामुळे त्यांना योजना कशा मिळत नाहीत हे समजावून सांगत त्याचप्रमाणे अधिकारी कार्यालयात त्यांना किती त्रास देतात हेच सांगत. त्यामुळे त्यांची

कागदपत्रे पाहण्यात व त्यांना समजावण्यात बराच वेळ जाई.  त्यामुळे मुलाखतींसाठी बराच मोठा कालावधी घालवावा लागला.

संशोधिकेला अशाप्रकारे बऱ्याच अडचणी आल्या असल्या तरी आपल्या वैयक्तिक मुलाखतींना, निरीक्षण नोंदींना वस्तुनिष्ठपणे नोंदवण्याचे पथ्य संशोधिकेने पाळले.  त्या सर्व गोष्टींकडे निव्वळ एक अध्ययन म्हणून तटस्थपणे पाहीले व त्यांची जशीच्या तशी नोंद घेण्याचा प्रयत्न केला.

# संदर्भ सूची


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. आगलावे प्रदिप | — | संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे | पृ. १६ |
| | | — | विद्या प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती — जाने २००० | |
| २. | डॉ. कऱ्हाडे सदा | — | संशोधक सिद्धांत आणि पद्धती | पृ. १० |
| | | — | प्रकाश विश्वासराव लोकवाङ्मय गृह मुंबई—२५. | |
| ३. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | पृ. ०२ |
| | | — | मनोहर पिंपळापुरे प्रकाशन — नागपूर. | |
| | | — | प्रथमावृत्ती — जाने.२००७ | |
| ४. | डॉ. आगलावे प्रदिप | — | संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे | पृ. १६ |
| | | — | कित्ता. | |
| ५. | डॉ. बेहेरे सुमन | — | सामाजिक संशोधन पद्धती | पृ. ३२ |
| | | — | विद्या प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती —१९९८ | |
| ६. | डॉ. बेहेरे सुमन | — | सामाजिक संशोधन पद्धती | पृ. १० |
| | | — | कित्ता. | |
| ७. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | पृ. ९८ |
| | | — | कित्ता. | |
| ८. | **Young P.V.** | — | **Scientific Social Surveys and Research.** | पृ.१३१ |
| | | — | **Prentice Hall of India Private Ltd.** | |
| | | — | **New Delhi.** | |
| ९. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | पृ.११६ |
| | | — | कित्ता. | |
| १०. | श्रीमती ओडवायर सुशिला | — | सामाजिक संशोधन | पृ. १९ |
| | | — | अनिल मेहता अजब पुस्तकालय, कोल्हापूर | |
| | | — | प्रथमावृत्ती —१९८१ | |
| ११. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | १३० |
| | | — | कित्ता. | |
| १२. | महाराष्ट्र शासन | — | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०००—२००१ जिल्हा चंद्रपूर. | पृ. ०७ |
| | | — | जिल्हा सांख्यिकी कार्यालय अर्थ व सांख्यिकी संचलनालय महाराष्ट्र शासन चंद्रपूर. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | पृ.१४१ |
| | | — | कित्ता. | |
| १४. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | पृ.१४१ |
| | | — | कित्ता | |
| १५. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | पृ.१६५ |
| | | — | कित्ता | |
| १६. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | पृ.१७२ |
| | | — | कित्ता | |
| १७. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | १७४ |
| | | — | कित्ता. | |
| १८. | डॉ. भांडारकर पु.ल. | — | सामाजिक संशोधन पद्धती | ३४५ |
| | | — | दत्तसन प्रकाशन नागपूर प्रथामावृत्ती . | |
| १९. | Young P.V. | — | Scientific Social Surveys and Research. | पृ.२२२ |
| | | — | कित्ता. | |
| २०. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | पृ.२७७ |
| | | — | कित्ता. | |
| २१. | डॉ. बेहेरे सुमन | — | सामाजिक संशोधन पद्धती | पृ. ६४ |
| | | — | कित्ता. | |
| २२. | श्रीमती ओडवायर सुशिला | — | सामाजिक संशोधन | पृ. २२ |
| | | — | कित्ता. | |
| २३ | डॉ. आगलावे प्रदीप | — | संशोधन पद्धतीशासत्र व तंत्रे | पृ.२१७ |
| | | — | कित्ता. | |
| २४. | डॉ. भांडारकर पु.ल. | — | सामाजिक संशोधन पद्धती | पृ.५५३ |
| | | — | कित्ता | |
| २५. | डॉ. भांडारकर पु.ल. | — | सामाजिक संशोधन पद्धती | पृ.५५० |
| | | — | कित्ता | |
| २६. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | पृ.४०१ |
| | | — | कित्ता. | |
| २७. | डॉ.कऱ्हाडे बी.एम. | — | शास्त्रीय संशोधन पद्धती | पृ.४८३ |
| | | — | कित्ता | |
| २८. | डॉ. कऱ्हाडे सदा | — | संशोधन सिद्धांत आणि पद्धती | पृ.१८६ |
| | | — | कित्ता | |
| २९. | श्रीमती ओडवायर सुशिला | — | सामाजिक संशोधन | पृ.१८४ |
| | | — | कित्ता. | |
| ३०. | श्रीमती ओडवायर सुशिला | — | सामाजिक संशोधन | पृ.१८८ |
| | | — | कित्ता | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१. | डॉ. बेहेरे सुमन | — | सामाजिक संशोधन पद्धती | पृ. ५२ |
| | | — | कित्ता. | |
| ३२. | डॉ. बेहेरे सुमन | — | सामाजिक संशोधन पद्धती | पृ. १२ |
| | | — | कित्ता. | |
| ३३. | डॉ. संत दु.का. | — | संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग | पृ. ९४ |
| | | — | पुणे विद्यार्थी गृहप्रकाशन पुणे. | |
| | | — | द्वितीय आवृत्ती – १९८८. | |

# प्रकरण ४ थे

# नमुना वर्णन, वैवाहिक, कौटुंबिक, शैक्षणिक व धार्मिक संरचना व परिवर्तन

## ४.१ नमुना निवड उत्तरदात्यांची सामान्य माहिती

**वास्तव्य:**

माणसाची भ्रमंती अवस्था संपुष्टात आल्यानंतर माणूस कोठे आहे ना कोठेतरी स्थिर होऊ लागला. सतत प्रयत्नशील असणाऱ्या मानवाने उदरनिर्वाहाची विविध साधने शोधून काढली व निश्चित अशी उदरनिर्वाहाची साधने मानवाला गवसल्यानंतर त्याच्या आयुष्याला स्थिरता लाभली. आद्यपाषाण युगापासन ते धातुयुगापर्यंतचा मानवाचा प्रवास हेच दर्शवितो. जगाच्या कोणत्या ना कोणत्या तरी भूभागावर मानव आपले पाय रोवून स्थिरावू लागला. काहिंनी निसर्गाचे वरदान लाभलेल्या मोजक्या लोकवस्तीची खेडी पसंत केली तर काहिंनी सुधारलेल्या व उदयोगधंदयांनी बहरून गेलेल्या शहरांत वस्ती केली. पण काही भूमिपुत्रांनी या सर्व लोकवस्तीपासून दूर व दुर्गम असलेल्या डोंगर कपाऱ्यांत, नद्यानाल्यांत, कपाऱ्यांत आपला तळ ठोकला.''१

याबाबतीत रोमेश थापर यांच्या मते, ''हजारो वर्षांपासून मूळनिवासी किंवा आदिम–जमाती जंगला–पहाडांत वास्तव्यास आहेत की ज्यांची लोकसंख्या विकसित आणि मैदानी क्षेत्रात राहणाऱ्या लोकांपेक्षा जेमतेम आहे. त्याच्याजवळ जगण्याची जेमतेम साधने आहेत.''२

संशोधनाचे अध्ययन विषय असलेल्या माना जमातीच्या वास्तवाबाबतही त्यापेक्षा काही निराळी परिस्थिती आहे असे म्हणता येणार नाही. डॉ. एस.जी. देवगांवकर यांच्या मते,''माना ही शेती करणाऱ्यांची तसेच मजूरी करणाऱ्यांची द्रविडीयन मूळ असलेली चांदा (चंद्रपूर) जिल्ह्यातील जात असून ती चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, (गोंदिया) आणि बालाघाट (मध्यप्रदेश) या. जिल्ह्यांमध्ये पसरलेली आहे.''३ यावरून हे चित्र स्पष्ट होते

की भारतातील वरील जिल्हे हे जंगल आधिक्य असणारे जिल्हे म्हणून प्रसिद्ध आहेत आणि अशा मुख्यत: जंगल अधिक असणाऱ्या जिल्हयांत माना जमातीची वस्ती असणे म्हणजे आदिवासी आणि दुर्गम भाग यांच्या सहसंबंधाला पुष्टी देणेच होय असे निदर्शनास येते.

सदर संशोधनासाठी नमुना म्हणून चंद्रपूर जिल्हयातील जी तालुके संशोधिकेने निवडलेली आहेत, त्या तालुक्यांची निवड करतांना माना जमातीची त्या तालुक्यात असलेली वस्ती व लोकसंख्या यांचा विचार करूनच निवडलेली आहेत. पुढील सारणीत नमुना म्हणून निवडलेल्या तालुक्यांची व त्याअंतर्गत गावांची संख्या, तसेच एकूण उत्तरदात्यांची संख्या दर्शविलेली आहे.

**सारणी क्र. १**

**उत्तरदात्यांच्या वास्तव्याची तालुकानिहाय, गावनिहाय संख्यादर्शक सारणी**

| अ. क्र. | तालुका | गाव (संख्या) | उत्तरदाते (संख्या) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | राजुरा | ०१ | ०१ | ०.५% |
| २. | नागभिड | ०३ | २४ | १२% |
| ३. | भद्रावती | ०१ | १४ | ०७% |
| ४. | मूल | ०२ | २१ | १०.५% |
| ५. | सिंदेवाही | ०३ | २१ | १०.५% |
| ६. | चिमूर | १४ | ९८ | ४९% |
| ७. | वरोरा | ०२ | २१ | १०.५% |
| | **एकूण** | **२६** | **२००** | **१००%** |

वरील सारणीत दर्शविल्याप्रमाणे चंद्रपूर जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती व लोकसंख्येचे वितरण पाहता ज्या तालुक्यांत 'माना' जमात आढळते. त्या तालुक्यांची

नमुना—म्हणून निवड करण्यात आली. यासाठी संशोधिकेने एकूण ०७ तालुक्यांतील २५ खेडी व ०१ राजुरा शहर एकूण २६ गावे यांचा समावेश केलेला आहे. डॉ. एस.जी. देवगावकर यांच्या, ''माना हल्ली चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर व अमरावती जिल्ह्यात राहत असले तरी त्यांची जास्त वस्ती चंद्रपूर जिल्याच्या चिमूर, सिंदेवाही आणि वरोरा तहसिलीत आढळते''.४ या संदर्भानुसार चिमूर तालुक्यातील 'भिसी' गावाच्या सभोवती माना आदिवासींची लोकवस्ती अधिक एकवटली असल्याने चिमूर तालुक्यातील महत्तम १४ गावांची व एकूण ९८ (४९%) उत्तरदात्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली. राजुरा हे शहर असून त्या तालुक्यात विशेष माना वस्ती आढळत नाही. परंतु कामधंदयासाठी शहरात जाणाऱ्या लोकांचाही त्यात समावेश असावा म्हणून राजुरा तालुक्यातील ०१ गावाची व ०१ (०.५%) उत्तरदात्यांची निवड करण्यात आली नागभिड तालुक्यातील एकूण ०३ गावांची आणि अतिशय दुर्गम जंगलांनी वेढलेल्या अशा गावांची व एकूण २४ (१२%) उत्तरदात्यांची निवड केल्या गेली. भद्रावतीतील एका खेडयाची परंतु तिथे वेगळेपण असे की त्या गावातील माना जमातीचे एक व्यक्ती पंचायत समिती सभापती असून त्यांनी कोणकोणती प्रगती गावासाठी केली या संदर्भाने त्या गावाची निवड करून त्यातील एकूण १४ (०७%) उत्तरदात्यांची निवड केल्या गेली. मूल, सिंदेवाही व वरोरा या तालुक्यांतील सर्वसाधारण गावांची म्हणजे मूल मधील ०२ गावांतून २१ (१०.५%) उत्तरदात्यांची, सिंदेवाही तालुक्यातील ०३ गावांतून २१ (१०.५%) उत्तरदात्यांची तर वरोरा तालुक्यातून ०२ गावांतून २१ (१०.५%) उत्तरदात्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली.

वरील नमुना निवडीचे कारण असे की माना जमात खेडयात, दुर्गम भागात वा गावांत किंवा शहरात जरी वास्तव्यास असली तरी त्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अध्ययन करतांना अध्ययन विविध स्तरांवर केले जावे, माना आदिवासींचा विकासात्मक परीवर्तनाचा तुलनात्मक अभ्यास व्हावा व संशोधनास सूक्ष्मता यावी यासाठी संशोधिकेने तालुके व गावांची विविध कारणांनी निवड केली आहे.

चंद्रपूर जिल्हयातील नमुना म्हणून निवडलेल्या तालुक्यातील गावांच्या नावांची यादी पुढील साणीत दर्शविलेली आहे.

**सारणी क्र. २**

**उत्तरदात्यांच्या वास्तव्याच्या गावांची नामनिर्देशित सारणी**

| **अ.क्र.** | **तालुका** | **गावांची नावे** |
|---|---|---|
| १. | राजुरा | राजुरा |
| २. | नागभिड | खरबी, चिंधीचक, घोडाझरी |
| ३. | भद्रावती | मासळ |
| ४. | मूल | चक, उसराळा |
| ५. | सिंदेवाही | कोकेवाडा, रत्नापूर, नलेश्वर मोहाडी. |
| ६. | चिमूर | वडसी, खातोडा, गोंदोडा, वाघेडा, अडेगाव, खांबाडा, विहीरगाव, पळसगाव, मालेवाडा, महादवाडी, डोमा, आंबेनेरी, कपर्ला, माने मोहाडी |
| ७. | वरोरा | बेंबळा, वायगाव |
| | **एकूण ०७** | **२६ गावे** |

वरील सारणीत दशविल्याप्रमाणे राजुरा हे शहर असून इतर खेडी आहेत. त्यात खरबी, घोडाझरी, ही खेडी अतिशय धनदाट जंगलात असून इथे जाण्यासाठी डांबरी सडक नाही, किंवा कोणतेही शासकिय वाहन नाही. चिंधीचक, रत्नापूर, वडसी, खातोडा, गोंदोडा, वाघेडा, अडेगाव, विहीरगांव, पळसगांव, महादवाडी, मानेमोहाडी, कपर्ला इत्यादी गावे मुख्य रस्त्यांपासून २ ते ७ किलोमिटर पर्यंत आत असून गावात जाण्यासाठी कच्ची व पक्की सडक आहे. परंतु जंगलाला लागून असल्याने जंगली पशूंची भिती असते. मासळ, चक, उसराळा, कोकेवाडा, नलेश्वर, मोडाडी, खांबाडा, मालेवाडा, आंबेनेरी, बेंबळा, वायगाव इत्यादी गावे मुख्य रस्त्यावर व रस्त्याच्या १ ते २ किलोमिटर आत आहेत.

हिंदू संस्कृती पुरूषप्रधान असून पुरूषांना स्त्रियांपेक्षा जास्त महत्त्व दिले गेले आहे. मात्र आदिवासी समाजात स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने स्थान दिल्याचे आढळते. याचे कारण त्यांच्यात स्त्रियाही घरासोबत आर्थिक मिळकतीत बरोबरीचे साहय करतांना आढळतात.

याच धर्तीवर संशोधिकेने नमुना म्हणून पुरूषांसोबत स्त्रियांचाही उत्तरदात्यांत समोवश केलेला आहे. त्याची माहिती पुढील सारणीत दर्शविलेली आहे.

## सारणी क्र.३

## उत्तरदात्यांचे स्त्रीपुरूष विभाजनदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पुरूष | १६१ | ८०.५% |
| २. | स्त्रिया | ३९ | १९.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

उत्तरदात्यातील स्त्रियांचे प्रमाण एकूण उत्तरदात्यांच्या प्रमाणाच्या दृष्टीने बरेच कमी आहे. वरील सारणीत दर्शविल्याप्रमाणे पुरूष उत्तरदात्यांची संख्या १६१ (८०.५%) व स्त्रिया उत्तरदात्यांची संख्या ३९ (१९.५%) एवढीच आहे. एकूण २०० उत्तरदात्यांपैकी स्त्री व पुरूष उत्तरदात्यांची संख्या समान असावी असा प्रामाणिक प्रयत्न संशोधिकेने केला. परंतु सारणीत मात्र स्त्री उत्तरदात्यांची संख्या बरीच कमी दिसते. कारण आदिवासी क्षेत्रात स्त्रियांकडुन प्रश्न विचारून उत्तर मिळविणे तसे बरेच कठीण जाते. मुळात दिवसभरात घरच्या व शेतीच्या कामामुळे स्त्रियांना फारसा फावला वेळ उपलब्ध होत नाही. त्यामुळे प्रयत्न करूनही स्त्री उत्तरदात्या कमी प्रमाणात मिळाल्या. त्याचे आणखी एक कारण असे की, त्यांच्या संस्कृतीनुसार घरी पुरूष असतांना त्यांच्यासमोर आपण मुलाखतीस दोनतीन तास दयावे हयाबाबत त्यांच्या मनात संकोच निर्माण होतो. परंतु स्त्री उत्तरदात्यांशी चर्चा करतांना शेजारच्या आणखी काही स्त्रिया

एकत्र येऊन उत्तरे देऊ लागत. त्यामुळे एकासोबतच अनेक उत्तरदात्यांच्या मनातील विचार जाणून घेण्याची मुलाखती दरम्यान संशोधिकेला संधी प्राप्त झाली.

आदिवासी जमात पूर्वी जंगलापहाडात भटके जीवन व्यतित करायचे, परंतु उपजिविकेची स्थायी साधने गवसल्यापासून त्यांनी एका ठिकाणी आपले बस्तान मांडले. याच पार्श्वभूमिवर माना जमात शेती करणारी व मजुरी करणारी असतांना ज्या गावात त्यांचे वास्तव्य आहे तेथे ते वडिलोपार्जित राहतात की इतर गावांहून काही कारणास्तव स्थलांतर होऊन आले असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र.४**

**उत्तरदात्यांचे वास्तव्याचे ठिकाणी मूळ गाव म्हणून अथवा स्थलांतरीत म्हणून आदिवासी असल्याबाबतची सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | मूळगावी राहणारे | १८९ | ९४.५% |
| २. | बाहेरगावातून स्थलांतरीत झालेले | ११ | ५.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की इतर आदिवासी जमातींप्रमाणे माना आदिवासींमध्ये सुद्धा स्थलांतराचे प्रमाण सध्या कमी आढळते. २०० उत्तरदात्यांपैकी महत्तम १८९ (९४.५%) उत्तरदाते त्यांच्या स्वगावी किंवा मूळगावी राहणारे आहेत. जरी गावात बऱ्याच समस्या असल्या तरी त्यांना गावीच राहणे पसंत आहे. तर एकूण ११ (५.५%) उत्तरदाते विविध कारणांनी इतर गावांतून त्या गावी स्थलांतरीत झालेले आढळले. त्यात कुणी पत्नीच्या गावीच म्हणजे आपल्या

सासुरवाडीला कामधंदयानिमित्त स्थायिक झाले. तर कुणी मजुरीसाठी वा नोकरीसाठी राहायला आले.

परंतु माना आदिवासींमध्ये स्थलांतराचे प्रमाण नगण्यच आहे असे निदर्शनास येते. हा आदिवासींचा 'ठेवले अनंते तसेची राहावे' या उक्तीप्रमाणे स्वभाव वरील सारणीतून निदर्शनास येतो.

सारणी क्र. ४ ला अनुसरूनच या गावात आपले वास्तव्य कशामुळे आहे? असाही एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र.५**

**वास्तव्याच्या गावातील कारणदर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | वडीलोपार्जीत | १४७ | ७३.५% |
| २. | शेतीमुळे | ३४ | १७% |
| ३. | व्यवसायामुळे | ०० | ००% |
| ४. | मजूरी मिळते | १५ | ६.५% |
| ५. | नोकरीमुळे | ०२ | ०.१% |
| ६. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०२ | १% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीत गावातील वास्तव्याचे वडिलोपार्जित कारण १४७ (७३.५%) उत्तरदात्यांनी सांगितले आहे. ही संख्या महत्तम उत्तरदात्यांची असून यालाच संलग्न अशी शेतीमुळे मग ती स्वत:ची असो किंवा सासुरवाडीची असो किंवा ठेक्याने

वा बटईने कसण्यासाठी घेतलेली असो ३४ (१७%) उत्तरदाते या कारणासाठी गावात वास्तव्य असल्याचे उत्तर देतात. डॉ. बी.एम. कऱ्हाडे यांच्या मते, ''आदिवासी जमाती हया अतिशय दुर्गम अशा दऱ्याखोऱ्यात, जंगलकपाऱ्यात वसलेल्या असतात. तसेच त्या अप्रगत अवस्थेत आहेत. त्यांच्यात शिक्षणाचा अभाव आहे. आदिवासी जमातीत नवीन शोधाचा अभाव व प्रसरणात प्रतिकुलता असल्यामुळे नवप्रवर्तनाचे प्रमाण कमी असते. त्यामुळेच आदिवासी समाज स्थायी वाटतात. परिवर्तनाची गती फार मंद असते. आपला उदरनिर्वाह कसा करावा हीच या समाजाची मुख्य समस्या असते.''५ म्हणजेच आदिवासी समाज मग तो गावात राहत असो किंवा खेडयात, दुर्गम भागात राहत असो. तेथे कोणत्याही व कितीही अडचणी येवोत परंतु त्यांची पर्व न करता वास्तव्याचे ठिकाणी स्थिर राहण्याची वृत्ती आदिवासी जमातींमध्ये दिसून येते. डॉ. मुजुमदार आणि मदन यांनी आदिवासी आर्थिक जीवनाच्या स्थैर्य आणि समानता या वैशिष्टयांकडे लक्ष वेधले आहे. कारण आदिवासी समाज इतर समाजापासून दूर व दुर्गम भागात राहतो. साहजिकच इतर समाजाशी फारसा त्यांचा संबंध येत नाही. त्यामुळे प्रगत समाजाच्या आर्थिक जीवनात उठणाऱ्या आंदोलनाचा व वादळी बदलाचा स्पर्शही आदिवासी जीवनाला होत नाही. साहजिकच प्रगत समाजाच्या संपर्काअभावी आदिवासींच्या साध्या व जुजबी तंत्रविद्येत फारसा बदल होत नाही. साहजिकच सर्वांच्या आर्थिक जीवनात स्थैर्य व सारखेपणा असतो. कोणत्याही जीवनात फारमोठी स्थित्यंतरे घडून येत नाही. बंधुभावावर आधारलेले सामाजिक संबंध असल्यामुळे सर्वांच्या आर्थिक जीवनात सारखेपणा दिसून येतो. समाजिक उद्दिष्ट व हक्क यांची सांगड घातली गेली असल्याने आदिम अर्थव्यवस्थेसंबंधी असंतोषही दिसून येत नाही.''६

वरील सारणीत महत्तम उत्तरदाते वडिलोपार्जित व शेतीमुळे या गावात राहतो असे उत्तर देतात व सध्या शेतीची काय अवस्था आहे हे सर्वांनाच माहित आहे. परंतु आदिवासींचा वास्तव्याचा स्थायीभाव वरील विधानाची पुष्टी करतो. मजुरी मिळते म्हणून त्या गावात राहतो असे १५ (७.५%) उत्तरदाते उत्तर देतात. यात जी गावे मुख्य रस्त्यालगत आहेत ते किंवा धरणा वा जंगलाशेजारी आहेत जेथे लाकूडतोडीचेही

काम मिळते अशा उत्तरदात्यांची ही संख्या आहे. नोकरीमुळे या गावात राहतो असे ०२(१%) उत्तरदाते सांगतात तर यापेक्षा वेगळे उत्तर ०२(१%) उत्तरदाते देतात. त्यांना कारण इतरांना माहित होऊ नये असे वाटते की त्यांचे आर्थिक कारण नसावे असे वाटते यात बहुतांची पत्नीच्या माहेरी राहावयास गेलेल्या उत्तरदात्यांची संख्या आहे.

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की इतर आदिवासींचा जो वास्तव्याचा स्थायीभाव आहे तोच 'माना' आदिवासींमध्येही आढळून येतो. परंतु सध्या शिक्षणासाठी व मजुरीसाठी शहराकडे वळण्याची प्रवृत्ती माना आदिवासींमध्ये आढळून यायला लागली आहे. त्याचे प्रमाण अत्यल्प किंवा नगणच जरी असले तरी नोकरीमुळे, मजुरी मिळते म्हणून व यापेक्षा वेगळे उत्तर देणारे एकूण १९ (९.५%) उत्तरदाते आहेत जे वडिलोपार्जित किंवा शेतीसाठी त्या गावी राहत नाही किंवा स्वत:चे गाव सोडून आलेले आहेत. त्यामुळे आर्थिक समस्या भेडसावत असतांना पोट भरण्यासाठी व आर्थिक समस्येवर उपाय शोधण्यासाठी स्वगाव सोडण्याची परिवर्तनवादी वृत्ती माना समाजातही उदयास येऊ लागलेली आहे असे प्रामुख्याने निदर्शनास येते.

**सारणी क्र.६**

**उत्तरदात्यांची वयोगटानुसार वर्गिकरण दर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | १८ ते ३५ वर्ष | ५९ | २९.५% |
| २. | ३६ ते ५० वर्ष | ६४ | ३२.००% |
| ३. | ५१ ते ६० वर्ष | ४२ | २१.००% |
| ४. | ६१ वर्षावर | ३५ | १७.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

कोणत्याही देशाच्या विकासात तेथील आर्थिक घटकाचा मोठा वाटा असतो. किंवा आर्थिक विकासात हातभार लावणारा किंवा प्रत्यक्ष सहभाग घेणारा घटकच

देशाच्या विकासासाठी कारणीभूत व महत्त्वाचा असतो. त्यामुळे आर्थिक विकासात प्रत्यक्ष सहभाग घेणारा वयोगट १८ ते ५८ किंवा ६० वर्षापर्यंतच मानव सहभागी होतो असे विविध अभ्यासान्वये लक्षात आले आहे. पांढरपेशा वर्गात तरी हया वयोगटाची मर्यादा १८ ते ५८ किंवा ६० इतकी आहे. असे मानायला हरकत नाही. परंतु शेतकरी व मजुर वर्गात मात्र या वयोगटाची नक्की मर्यादा सांगता येत नाही. आदिवासी हा सुद्धा शेतकरी व मजुर वर्गात मोडतो. त्यामुळे आदिवासी समुदायात सुद्धा कुटुंबासाठी अर्थाजनात सहभागी होणारा वयोगट १० ते १२ वर्षापासून मरेपर्यंत ही असू शकतो. परंतु ''केंद्र शासनाने बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिकार अधिनियम २००९ दिनांक १ एप्रिल २०१० पासून लागू केला.''[७] त्यानुसार इथला आठवीपर्यंत किंवा वयोगट ६ ते १४ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मजुरीला न जाता शाळेचे बंधन घातले गेले आहे. त्यामुळे आदिवासी समाजातील काही प्रमाणात मुले आठवी किंवा दहावीपर्यंत शिक्षण घेतात. व दर्जेदार शिक्षण न मिळाल्याने किंवा शिक्षणास योग्य वातावरण उपलब्ध नसल्याने दहावीत नापास होऊन पुन्हा आपल्या कौटुंबिक व्यवसायात सहभागी होतांना दिसतात. त्यामुळे किमान १४ ते १६ वर्षांपासून अगदी शेवटच्या श्वासापर्यंत काम करणे व कुटुंबातला आर्थिक मदत करणे हे आदिवासी समाज संरचनेच्या बाबतीत निदर्शनास येते.

''संविधानात (भारतीय) प्रौढ मतदानाची तरतूद आहे. १८ किंवा त्याहून अधिक वय असलेल्या कोणत्याही व्यक्तिला मग तिचा धर्म, पंथ, जात, लिंग आणि जन्मस्थान कोणतेही असो, पूर्ण मताधिकार आहे.''८ वरील विधानाला अनुसरून १८ वयोगटावरील व्यक्तिला स्वत:ला चांगला व योग्य निर्णय घेण्याची क्षमता येते हे गृहीत धरून संशोधिकेने उत्तरदात्यांचे किमान वय १८ निश्चित केले. व त्यानंतर संशोधनात विविध वयोगटातील व्यक्तिंचा समावेश असावा या दृष्टीने सर्व वयोगट समावेशित उत्तरदात्यांची नमुना म्हणून निवड केली.

वरील सारणीत असे निदर्शनास येते की १८ ते ३५ वर्ष वयोगटातील उत्तरदात्यांची संख्या ५९ (२९.५%) आहे. हा वयोगट फारच परिवर्तन–शिलवृत्तीचा व

उत्साही वयोगट म्हणून गणल्या जातो. या वयोगटाच्या प्रतिक्रिया जाणून घेणे संशोधिकेला महत्वाचे वाटले. त्यामुळे वरील वयोगटाला सामिल केले गेले. वयोगट ३६ ते ५० वर्षे यामध्ये महत्तम ६४ (३२%) उत्तरदात्यांचा समावेश केला. हा वयोगट कोणतीही जबाबदारी पेलण्यात समर्थ वयोगट असून तो वैचारिक पातळीवर महत्त्वाचा वयोगट आहे. असे गृहीत धरून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी त्या वयोगटातील महत्तम उत्तरदात्यांची नमुना म्हणून निवड केल्या गेली. ५१ ते ६० वर्ष वयोगटातील उत्तरदात्यांची संख्या ४२ (२१%) आहे. हा वयोगट वैचारिक परिपक्वता असलेला असल्यामुळे संशोधिकेने त्या वयोगटाची नमुना म्हणून निवड केली. तर ६२ वर्षावरील उत्तरदाते ३५ (१७.५%) असून हा वयोगट अनुभवाने समृद्ध, रूढी, परंपरांची जाण असलेला व आदिवासी समाजाची ऐतिहासिक व वर्तमान स्थिती दर्शविणारा असल्याने संशेधिकेने या वयोगटाची नमुना म्हणून निवड करणे अगत्याचे समजून त्यांची निवड केली.

एकंदर वरील वयोगट पाडण्यासाठी संशोधिकेचा हेतू माना आदिवासी समाजातील स्थिती व परिस्थिती दोन्हींचे समाजशास्त्रिय दृष्टीने अध्ययन व्हावे असा असल्याने वेगवेगळ्या हेतुने वेगवेगळया वयोगटांची नमुना म्हणून निवड केलेली आहे.

**पोटजमात विषयक:**

माना जमातीत एकूण २०० उत्तरदात्यांना आपली जमात कोणती हा प्रश्न विचारला असता १००% उत्तरदात्यांनी 'माना' असे सांगितले. परंतु पोटजात कोणती? या प्रश्नाचे उत्तर १००% उत्तरदात्यांनी 'माना जमातीत पोटजमात नाही' असे उत्तर दिले.

यावरून 'माना' जमातीत इतर कोणतीही पोटजमात नाही ही बाब प्रकर्षाने निदर्शनास

येते.

**देवक, देवे व कुलदैवत विषयक :**

डॉ. गोविंद गारे यांच्या मते, ''मानवशास्त्रज्ञ कुलाला 'Clan' शब्द वापरतात. कुल हा एकपक्षीय आप्तसंबंधीयांचा समूह आहे. वांशिक दृष्टीने ते सर्व आप्त एकाच वांशिक गटातील असतात. कुलामध्ये पितृवंशांचे नातेवाईक समाविष्ट केले जातात.''९ त्यामुळे प्रत्येक कुलाचे एक दैवत किंवा देव असतो. या संदर्भात डॉ. गोविंद गारे म्हणतात,'' एकाच पूर्वजापासून एकाच कुलातील सर्व सदस्यांची उत्पत्ती झाली आहे या श्रद्धेवर कुलाची उभारणी झालेली असते. म्हणनूच एकाच कुलातील सदस्य एकमेकांशी रक्ताच्या नात्यातील भाऊबंद समजले जातात. ज्या पूर्वजापासून कुलाची उत्पत्ती झाली तो पूर्वज हा सत्य किंवा काल्पनिक पूर्वज मानवप्राणीच असतो असे नाही. पण पशू, पक्षी, झाडे किंवा इतर कोणत्याही स्वरूपाची नैसर्गिक वस्तू इत्यादींचा समावेश पूर्वज मानण्यात होत असल्याचे दिसून येते. तेव्हा ज्या सत्य किंवा काल्पनिक अशा सजीव निर्जीव वस्तू पासून कुलाची उत्पत्ती झाली अशी त्या कुलातील सदस्यांची जबरदस्त श्रद्धा असते त्या सजीव अगर निर्जीव–वस्तुला देवक अगर कुलचिन्ह (Totem) असे म्हणतात. सर्वसाधारणपणे असे दिसून येते की, निसर्गातील निर्जीव वस्तू व कुलांची उत्पत्ती यांचा संबंध प्रस्थापित केला जातो. म्हणून पशू, पक्षी, झाडे, प्राणी इत्यादी निसर्गातील वस्तुंना देवक मानण्यात येते. ज्या सजीव अगर निर्जीव वस्तूपासून एखादया कुलाची उत्पत्ती झाली आहे असे मानण्यात येते त्या सजीव अगर निर्जीव वस्तूबाबत त्या कुलातील सदस्य विशिष्ट तऱ्हेचे आचरण करीत असतात.''१०

याच पार्श्वभूमीवर माना आदिवासींच्या देवक व कुलदैवतांसंबंधी, कुलचिन्हासंबंधी जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला. माना आदिवासींमध्ये 'मूठपूजा' करण्याची पद्धत आहे. त्यानुसार ते मुठ मांडून पूजा करतात. त्यासाठी त्यांच्या कुलाची परंपरा असल्याप्रमाणे तांदूळ त्या संख्येत मूठ भरून भरून ठेवतात. त्यांनुसार त्यांना देवांची संख्या प्राप्त होते. माना जमातीत असे चारदेवे, पाचदेवे, सहादेवे, सातदेवे व नऊदेवे असल्याचे आढळते. ते आपल्या संख्येनुसार तांदळाच्या मुठी मांडतात व त्यांची

पूजा करतात. त्याच संख्येत दिवे, पुऱ्या व वडे ही करून त्यांची पुजा करतात. (पुऱ्यांना पात्या असे संबोधले जाते. दिवे पिठाचे करतात.) देवांनुसार आडनावे व देवक (किंवा कुलचिन्ह) वेगवेगळे आहे. कुलचिन्हामध्ये हत्ती, घोडा, गरूड खांब, निलकंठ पक्षी, गरूड, पिंजरा, नाग, बेलाचे झाड, कळंब, चाराचे झाड, वाध, मुंगुस, तितिर, घोरपड, सिंदीचे झाड, शेळी, गोंगलझाड, मोहाचे झाड, उमरीचे झाड, मोर, कडुनिंब, मेघनाथ, काटेरी झुडुप, कासव, हनुमानमुखी वानर व वराह इत्यादी कुलचिन्ह आढळले. तर कुलदैवताची विचारणा केल्यावर पुढील कुलदैवतांची नावे समजली. राखाई, जाखाई, रणखांब, कमलावती, पाखराई, नागनाथ, गोरजाई, तुळजाई, वाघोबा, दागोबा, कमळ, शंकावती, अंबादेवी, माणकावती, सती, माणिकादेवी, रेणुका, गायमुख, डोंगरदेव, इत्यादी कुलदैवतांची नावे उत्तरदात्यांकडून सांगण्यात आली.

वरील बाबींवरून, असे निदर्शनास येते की, माना समाजात इतर आदिवासींप्रमाणे देव, देवके, कुलचिन्ह, कुलदैवत मानण्याची प्रथा आहे व त्यानुसार त्यांना आरचरण करणे, निशिद्धतेचे नियम पाळणे, पूजा अर्चा करणे इत्यादी धार्मिक रूढीपरंपरांना मान्यता आहे. माना जमातीत एकूण ७२ कुळे असून त्यानुसार त्यांची देवांची संख्या व कुलदैवत व कुलचिन्ह ठरलेली आहेत.

उत्तरदात्यांची निवड करतांना संशोधनात विविधता यावी व वेगवेगळया गटांतील उत्तरदाते सहभागी व्हावे या दृष्टिने उत्तरदात्यांच्या वैवाहिक दर्जामध्ये सुद्धा विविधता राखल्या गेली. याचे कारण असे की विवाहाच्या दर्जावरून सुद्धा व्यक्तिचे त्यांच्या समाजातील स्थान ठरते. हिंदू परंपरेनुसार विवाहाच्या दर्जाला कुटुंबात व समाजात फार मोलाचे व महत्त्वाचे स्थान आहे. कुटुंबवत्सल विवाहित पुरूष किंवा स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोण व इतर वैवाहिक दर्जा नसलेल्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोण यात निश्चितच फरक पडतो. वैवाहिक दर्जानुसारच हिंदू धर्मात त्यांच्या धार्मिक विधी पुजाअर्चेत त्या व्यक्तिचे स्थान व सहभाग निश्चित केले जाते. त्यामुळे वयोगट व धार्मिक व्यवस्था व कौटुंबिक संरचना या सर्वात विवाहाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. त्यामुळे वैवाहिक दर्जाचेही महत्त्व आपोआपच सिद्ध होते असे म्हणायला हरकत नाही.

याच पार्श्वभूमीवर संशोधिकेने उत्तरदात्यांच्या त्यांच्या वैवाहिक दर्जाबद्दल विचारणा केली. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र.७**

**उत्तरदात्यांची विवाहविषयक स्थितीदर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | विवाहित | १८५ | ९२.५% |
| २. | अविवाहित | ०७ | ३.५% |
| ३. | घटस्फोटित | ०० | ००% |
| ४. | विधवा | ०७ | ३.५% |
| ५. | विधूर | ०१ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

भारत देशातच नव्हे तर संपुर्ण विश्वातच कुटुंब संस्थेचा पाया असणारी व पर्यायाने समाजाच्या बांधणीत महत्त्वाचे स्थान असणारी विवाहसंस्था सर्व धर्मांना मान्य आहे. त्यामुळे आदिवासींच्या संदर्भात विवाहसंस्थेचा अभ्यास करतांना वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, आदिवासी समाजसुद्धा याला अपवाद नाही. आदिवासी समाजातही विवाहाचे महत्त्व मान्य केल्याचे दिसते. एकूण उत्तरदात्यांपैकी १८५ (९५. ५%) उत्तरदाते हे विवाहित आहेत. त्यात सर्वच विवाहासाठी आवश्यक वयोगटाचे नमुने निवडण्यात आले. एकूण उत्तरदात्यांपैकी ०७ (३.५%) महिला उत्तरदाते हे 'विधवा' आहेत तर ०१ (०.५%) पुरूष उत्तरदाते हे विधूर आहेत. ०७(३.५%) उत्तरदाते अविवाहित आहेत. त्यात पुरूष व महिलांचा समावेश करण्यात आला. जरी ते विवाहित नाहीत तरी त्यांच्याही समाजाबद्दल, देशाबद्दल व एकूणच माना आदिवासी समाजाबद्दल माहिती, अपेक्षा, विचार समजून घेण्यासाठी त्यांची निवड करण्यात आली.

एकूण २०० उत्तरदात्यांपैकी एकही उत्तरदाता घटस्फोटीत आढळला नाही. घटस्फोटित उत्तरदात्यांचे प्रमाण ००% आहे.

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की आदिवासी माना जमातीत विवाहाचे महत्त्व मान्य केले असून विवाह करणे कुटुंबाच्या वाढीसाठी व आर्थिक मदतीकरीता आवश्यक आहे. असे दिसून येते. कारण १८ वर्षे वयाच्या वरील वयोगट नुमना म्हणून निवडण्यात आल्यामुळे १८५ म्हणजे महत्तम उत्तरदाते हे विवाहित आहेत. परंतु माना जमातीत घटस्फोटाचे प्रमाण नगण्यच असल्याचे निदर्शनास येते. याची कारणे विवाह विषयक प्रकरणात घटस्फोटाच्या सारणीच्या विश्लेषणादरम्यान पुढे नमुद करण्यात आलेली आहेत. परंतु घटस्फोटाचे नगण्य प्रमाण माना जमातीत स्त्री—पुरूष नक्कीच एकमेकांच्या मताचा आदर करतात व एकमेकांना समान दर्जा देतात, किंवा स्त्रिया व पुरूष एकमेकांच्या गुणांना व अवगुणांना सहजपणे घेतात असे निदर्शनास येते आणि आदिवासी समाजाचा हा सहनशिलेतेचा मोठा गुणधर्म आहे याची पुष्टी होते.

विवाहाचा एक महत्त्वाचा उद्देश्य अपत्यांना जन्म देऊन पुनरूत्पादनाचा सृष्टीचा नियम पाळणे तसेच त्या अपत्यांच्या समाजाची मान्यता देणे, कायदयाची मान्यता देणे हा सुद्धा आहे. परंतु अपत्यांना संख्येवरूनसुद्धा त्या कुटुंबाची आर्थिक स्थिती ठरल्या जाते. आधुनिक जगतात जेथे 'हम दो हमारा एक' याप्रमाणे घोषवाक्य दिल्या जाते, तिथेच शेतीप्रधान कुटुंबात मात्र जेवढी जास्त अपत्ये तेवढी शेतीसाठी लागणारी मानवी शक्तीची अधिक उपलब्धता असे गृहीत धरून जास्तीत जास्त अपत्यांना जन्म देण्यात येतो. असेही एकीकडे चित्र पाहायला मिळते.

हिंदू कुटुंबात अपत्यांचे स्थान वडीलांचे मृत्यूनंतर श्राद्धा करणे, कुटुंबाचा वंश चालवणे व संपत्तीचा अधिकार चालविणे या दृष्टीनेसुद्धा अतिशय महत्त्वपूर्ण आहे. जर एखादी स्त्री अपत्यांना जन्म देऊ शकत नसेल तर पतीने दुसरे लग्न करून अपत्य प्राप्ती करणे किंवा एखादया पुरूषाला अपत्य प्राप्त होत नसेल तर स्त्रिला त्याच्यापासून फारकत घेता येते हे सुद्धा समाजमान्य मानल्या जाते. त्यामुळे कुटुंबात अपत्यांना

अतिशय महत्व असते. याच पार्श्वभूमीवर माना जमातीत अपत्यांना जन्म देण्याविषयीची स्थिती जाणून घेण्यासाठी त्यांच्या कुटुंबात किती अपत्ये आहेत? असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याचे विश्लेषण पुढील सारणीत करण्यात आले आहे.

**सारणी क्र.८**

**उत्तरदात्यांची अपत्ये विषयक स्थितीदर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | १ मूल असणारे | १९ | ९.५% |
| २. | २ मुले असणारे | ६२ | ३१.००% |
| ३. | ३ मुले असणारे | ६५ | ३२.५% |
| ४. | ३ च्या वर मुले असणारे | ३७ | १८.५% |
| ५. | निपुत्रिक /अपत्यहिन | १० | ५.००% |
| ६. | अविवाहित असल्यामुळे लागू पडत नाही | ०७ | ३.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की १ मूल असणारे एकूण १९ (९.५%) उत्तरदाते आहेत. याचे कारण त्यांचे नुकतेच लग्न झालेले आहे. म्हणजे त्यांचे वय जास्त नाही. त्यांना पुढे मुले होऊ शकतात. २ मुले असणारे एकूण ६२ (३१.००%) उत्तरदाते आहेत. ज्यात आधुनिक विचारसरणीचे २ अपत्यांवर समाधान मानणारे महत्तम लोक आहेत. आणि शिवाय काही थोडे वयाने कमी म्हणजे लगन होऊन फार वर्षे न झालेलेही आहेत. ३ मुले असणारे महत्तम ६५ (३२.५%) उत्तरदाते आहेत. तर ३ च्या वर मुले असणारे ही ३७ (१८.५%) उत्तरदाते आहेत. ज्यात ५,६,७,८ पर्यंत अपत्यांची संख्या आहे. हे प्रमाणही काही कमी नाही. यामध्ये वयोवृद्ध उत्तरदाते अधिक आहेत. निपुत्रिक किंवा अपत्यहिन उत्तरदात्यांची संख्या १०

(०५%) आहे. याला विविध कारणे असू शकतात. ज्यात नुकतेच लग्न झालेले उत्तरदाते आहेत व काही वयोवृद्ध उत्तरदाते आहेत ज्यांना अपत्यप्राप्तीचा लाभ झालेला नाही. मुलाखत घेतांना त्यांच्या चेहऱ्यावरचे विषण्णतेचे भाव सहज दिसून आले. ज्या वयोवृद्धांना किंवा लग्न होऊन बरीच वर्षे झाली तरी ज्यांना अपत्यप्राप्ती झाली नाही अशा उत्तरदात्यांना अपत्यप्राप्ती झाली नाही म्हणून अतिशय दु:ख आहे. जीवनात काहीतरी अर्धवट, कमतरता राहील्याचे त्यांना जाणवते व अपत्यसुखापासून त्यांना वंचित राहावे लागल्याने ते सतत दु:खी असल्याचे लक्षात आले. परंतु याचे कारण शारीरिक नसून विशेषत: जादुटोणाच असे ते मानतात. असेही निदर्शनास आले. त्यामुळे अपत्य प्राप्तीसाठी दवाखान्यात डॉक्टरांकडे जाऊन उपचार करण्यापेक्षा ते मंत्र, तंत्र, नवस इत्यादी बाबींद्वारेच उपचार करतात असेही प्रकर्षाने जाणवले. याचे एक कारण अज्ञानही असू शकते. असे संशोधिकेला वाटते. तर अविवाहित असल्यामुळे मुले नाहीत असे ०७ (३.५%) उत्तरदाते आहेत.

वरील सारणीवरून माना जमातीत शेतीप्रधान कुटुंब व अपत्यांची संख्या यांचा संहसंबंध असल्याचे प्रकर्षाने निदर्शनास येते. माना जमातीत व्यवसाय म्हणून शेती करत असल्यामुळे शेतीला हातभार लावण्यासाठी अधिकाधिक अपत्यांना जन्म देणे त्याचप्रमाणे कुटुंबनियोजनाचे महत्त्व व पद्धत यांची माहिती नसल्यामुळे सुद्धा किंवा कुटुंबनियोजनाबद्दल भिती व चुकीची माहिती असल्यामुळे सुद्धा अधिक अपत्यांची संख्या असल्याचे जाणवते. परंतु त्याचबरोबरीने नविन विचारसरणीला अनुसरून व वाढत्या महागाईमुळे, कुटुंबनियोजनाचे महत्त्व व पद्धत माहित असल्यामुळेही संध्या २ अपत्यांवर समाधान मानणारे कुटुंबही अधिक असल्याने माना समाजातही आता अपत्यांच्या संख्येविषयी विचारांत सकारात्मक परिवर्तन होत आहे असे म्हणावयास जागा राहते.

# संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | नाडगोंडे गुरूनाथ | — भारतीय आदिवासी<br>— कॉन्टीनेन्टल प्रकाशन विजयानगर पुणे २००३. | पृ.क्र.१ |
| २. | Thapar Romesh | – Tribe, caste & Religion in India<br>– The macmillan company of India seminar publicatiojn meerut. | पृ. १ |
| ३. | डॉ. देवगावकर एस.जी. | — महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती<br>— श्री साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती २००९. | पृ. ३०४ |
| ४. | डॉ. देवगावकर एस.जी. | — महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती<br>— कित्ता. | पृ. ३०५ |
| ५. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — आदिवासी समाजाचे समाजशास्त्र<br>— मानवता सांस्कृतिक विकास व शोध केंद्र चामोर्शी जि. गडचिरोली २००४. | पृ. १६८ |
| ६. | डॉ.बी.एम.कऱ्हाडे | — आदिवासी समाजाचे समाजशास्त्र<br>— कित्ता. | पृ. १६९ |
| ७. | महाराष्ट्र शासन | — सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन<br>— शिक्षण मार्गदर्शिका भाग—३<br>— महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्यापरिषद)<br>पुणे ३० प्रआ.२०१२. | पृ. १ |
| ८. | कश्यप सुभाष सी. | — आपली संसद संचालक नॅशनल | पृ. ६७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बुक ट्रस्ट इंडिया नवी दिल्ली चौथी आवृत्ती २०११ | |
| ९. | डॉ. गारे गोविंद | — महाराष्ट्रातील आदिवासी जमाती<br>— कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे<br>द्वितीय आवृत्ती —२००२. | पृ. ५ |
| १०. | डॉ. गारे गोविंद | — महाराष्ट्रातील आदिवासी जमाती<br>— कित्ता. | पृ. ८ |

## ४.२ विवाह व्यवस्था आणि परिर्वतन व कौटुंबिक संरचना आणि परिवर्तन

**वैवाहिक :—**

‘मानवाच्या वैषयिक वर्तनाचा स्वतंत्रपणे विचार करता हे स्पष्ट होते की, विषयवासना ही शारीरिक पण सार्वत्रिक स्वरूपाची गरज आहे.’१ मानवाच्या मूलभूत गरजांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा यांसोबतच कामवासनेला सुद्धा महत्त्वाचे स्थान आहे. कामवासना किंवा विषयवासना ही व्यक्तिची शारीरिक गरज आहे. ती तृप्त करून घेण्याचे प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करीत असतो. अन्न गरजांची पूर्तता करून घेण्याचे अगत्य जसे सर्व मानवसमाजाने जाणलेले आहे तसेच कामवासनेची मूलभूत अशी गरज भागवण्याची आवश्यकतादेखील सर्व मानव जातीला पटलेली आहे. परंतु कामतृप्ती करून घेण्याचे प्रमाण सर्व लोकांमध्ये सारखेच असते असे नाही. काही लोकांमध्ये विषयवासना अत्यंत कमी प्रमाणात आढळते, म्हणजेच काही व्यक्ती वैषयिक बाबतीत संयमी व नीग्रही असतात. याऊलट काही व्यक्ती विलक्षण वैषयिक असतात. अशा स्थितीत मानवाच्या विषयवासनेच्या वृत्तीवर नियंत्रण ठेवणे समाजाला आवश्यक वाटते. लोकांचे वैषयिक वर्तन ही सामाजिक व नैतिक बाब आहे. असे समाज मानतो. व्यक्तिचे वैषयिक वर्तन योग्य असावे यासाठी समाजाचे जाणिवपूर्वक प्रयत्न असतात. हया प्रयत्नातूनच विवाहसंस्थेचा जन्म झाला.

‘हिंदू सामाजिक व्यवस्थेत प्रारंभापासूनच विवाहाचे स्थान महत्वपूर्ण राहीले आहे. कारण वैदिक काळापासूनच विवाहाला धार्मिक क्रियेचे एकरूप मानले जात होते. ऋग्वेदात विवाहाचा उद्देश्य गृहस्थी बनून यज्ञाचे संपादन करणे तथा अपत्यांचे प्रजनन करणे हे आहे. पाश्चात्त्य विचारवंतांनी जेव्हा विवाहाचा मुख्य उद्देश्य लैंगिक तृप्ती हे मानले आहे तेथेच हिंदू विवाहाचा मुख्य उद्देश्य धर्माचे पालन करणे हा आहे. हिंदू विवाहात धर्माला प्रमुख स्थान असल्यामुळे आजसुद्धा त्याचे स्थायित्व कायम आहे.’२

स्त्रीपुरूषामधील शरीरसंबंधाचे योग्य नियमन विवाहामुळेच होते असे वेदांमध्ये सांगितले आहे. महाभारतात एका तपस्विनीची कठोर तपश्चर्येची गोष्ट

सांगितलेली आहे. ती तपस्विनीची कठोर तपश्चर्येची गोष्ट सांगितलेली आहे. ती तपस्विनी स्वत:ला जोडीदार निवडू शकली नाही म्हणून ती अविवाहित राहिली. मोक्ष प्राप्तीसाठी कठोर तपश्चर्या केल्यानंतरही तिला मोक्षप्राप्ती झाली नाही. याचे कारण नारदाने तिला सांगितले की तुझ्यावर विवाहाचे संस्कारच झाले नसल्यामुळे तू अपवित्र आहेस आणि म्हणून तुला मोक्षप्राप्ती होणे शक्य नाही. विवाह, विवाहित स्त्रीपुरूषांची जीवनातील उद्दिष्टे आणि धर्माचे पालन हया तिन्हीची अशा रितीने सांगड घातली गेली. विवाह हा पवित्र संस्कार असेल तर विवाहापूर्वीचे पावित्र्य राखणे ही स्त्रीपुरूषावरील जाबाबदारी ओघाने आलीच. पुरूषांसाठी 'ब्रम्हचर्य व्रत' आणि स्त्रियांसाठी 'ऋतुप्राप्ती पूर्वीचा काळ' हा शुद्धता ठेवण्यासाठी सांगितलेला आहे. म्हणनूच ब्रम्हचारी मुलांसाठी शरीरांच्या शिस्तीसाठी अनेक बंधने व नियमने सांगितली आहेत. तसेच मुलींसाठी ही तिच्या मात्यापित्यांना अनेक जबाबदारीच्या गोष्टी सांगितल्या आहेत. हिंदूनी विवाह पवित्र संस्कार मानला आहे. त्यादृष्टीने विवाह कोणत्या वयात व्हावा. विवाहातील जोडीदार कोण असावेत ते कसे असावेत आणि विवाह विधी कोणी करावा, कशा रितीने करावा याबाबतीत सविस्तर नियम हिंदू धर्मात सांगितले आहेत.''३

हिंदू विवाहाच्या बाबतीत श्री रविन्द्रनाथ मुकर्जी असे लिहीतात की, 'हिंदू विवाह हा समाजमान्य काही धार्मिक संस्काराद्वारा दोन स्त्रीपुरूषांचा विधीवत मिलन होय की ज्याचा उद्देश्य धर्मकार्य, रतिसुख आणि अपत्यप्राप्ती आहे.'४

''कोणत्याही समाजामध्ये अपत्याचे पालणपोषण आणि प्रशिक्षणाकरीता नेहमी विवाह हा नियमित करण्याची आवश्यकता भासते. हयाकरीता प्रमाणके असतात, की जी प्रमाणके असे निर्धारित करतात की कोणत्या व्यक्तीसोबत कोणत्या परिस्थितीमध्ये कशाप्रकारे विवाहसंबंध प्रस्थापित केल्या जाऊ शकतात. एकदा विवाह झाल्यानंतर त्यांच्यापासून कोणत्या अपेक्षा असतील आणि असे संबंध कोणत्या परिस्थितीत संपुष्टात येतील. कोणत्याही समाजामध्ये अशा प्रमाणकांची संपूर्ण व्यवस्था ही विवाह संस्था होय[५]

सामाजिक परिवर्तनाचे संदर्भात 'चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी माना जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन' करतांना विवाहसंस्थेशी संबंधित प्रश्नांची चर्चा करण्यापूर्वी समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञ यांनी विवाहाचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या काही व्याख्या केल्या आहेत. त्या पाहणेही क्रमप्राप्त ठरेल.

गिलिन आणि गिलीन यांच्यामते, 'स्त्री पुरूष यांच्यांत लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याचा समाजमान्य मार्ग म्हणजे विवाह होय.' एडवर्ड वेस्टर्न मार्क यांच्या मते, विवाह म्हणजे एक किंवा अनेक पुरुषांचा एक किंवा अनेक स्त्रियांशी आलेला संबंध होय. या संबंधास प्रथा किंवा कायदयाने मान्यता दिली जाते. तसेच त्यात अंतर्भूत होणाऱ्या दोन्ही पक्षाविषयी तसेच त्यांच्यापासून जन्मास येणाऱ्या मुलाबाबत काही कर्तव्य आणि अधिकाराचा समावेश होतो.' बिल्स आणि होईजर यांच्या मते, 'विवाह ही प्रत्येक समाजातील क्लिक्ट अशी सांस्कृतिक घटना आहे. तिच्याद्वारे केवळ जैविक कार्यच पूर्ण होत नाही तर त्याशिवाय लहान मुलांचे संगोपन, कुटुंबाचे पालनपोषण आणि इतर कौटुंबिक गरजांची पूर्तता होते.'६

हिंदू धर्मशास्त्राने धर्माचरण हे विवाहाचे प्रमुख कार्य मानले आहे. धर्माचे पालन, प्रजोत्पादन व रती असे त्रिविध कार्य पार पाडणे हे हिंदू विवाहाचे उद्दिष्ट मानले आहे. रतिसुख हा जीवनाचा भाग आहे. परंतु त्याला मोकाट न सोडता ते रतिसुख धर्मबंधनांनी बद्ध झालेले आहे. विवाहबाहय कामोपभोग त्याज्य व निंदय मानले आहे. डॉ. बोबडे यांच्या मते, 'प्रत्येक हिंदू व्यक्तिला आपल्या जीवनात काही धार्मिक कर्तव्य पार पाडावी लागतात त्यात कर्तव्याच्या पूर्ततेसाठी पत्नीची आवश्यकता असते. पत्नीशिवाय पुरूषाला पूर्णत्त्व येत नाही.म्हणूनच धार्मिक कार्याकरिता विवाह केवळ आवश्यकता नव्हे तर अनिवार्य आहे. हिंदूमध्ये स्त्रीला धर्मपत्नी म्हणून संबोधले आहे. कारण तिच्याशिवाय धार्मिक कार्य करता येत नाही.'७

'ऋग्वैदिक काळात विवाह एक पवित्र संस्कार मानला जात असे. वराची निवड वधुपिता करीत असे. परंतु वर निवडतांना मुलीची इच्छा विचारात घेतली जात

असे. विशेषत: वयस्क झाल्यानंतरच विवाह केल्या जाई. तेव्हा एकपत्नी विवाह प्रथा होती.'८

या संदर्भात संशोधन विश्वातील माना जमातीतील विवाहासाठी वर व वधू यांचे लग्नाच्या वेळीचे वय काय? असा प्रश्न विचारून त्यांच्या वयातील अंतर जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीवरून निदर्शनास येतात.

**सारणी क्र. १**

**उत्तरदात्यांच्या विवाहाच्यावेळी त्यांचे व त्यांच्या जोडीदारांच्या वयातील अंतरदर्शक सारणी.**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | दोनपेक्षा कमी वर्षे | १० | ५.००% |
| २. | दोन ते पाच वर्षे | १२९ | ६४.५% |
| ३. | सहा ते दहा वर्षे | ५१ | २५.५% |
| ४. | दहापेक्षा जास्त वर्षे | ३ | १.५% |
| ५. | लागू पडत नाही. | ७ | ३.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की लग्नाच्या वेळी माना आदिवासींमध्ये वर व वधू यांच्या वयातील अंतर दोनपेक्षा कमी वर्ष असणारे १० (५%) उत्तरदाते आहेत. तर दोन ते पाच वर्षे अंतर असणारे १२९ (६४.५%) म्हणजे महत्तम उत्तरदाते आहेत. सहा ते दहा वर्षे वयातील अंतर सांगणारे एकूण ५१ (२५.५%) उत्तरदात्यांनी सांगितले तर दहा पेक्षा जास्त वर्षे अंतर वर व वधु यांच्यात आहे असे ३ (१.५%) उत्तरदाते सांगातात. यामध्ये विशेषत: ६० च्या वर वय असणारे उत्तरदाते आहेत. अविवाहीत ७ (३.५%) उत्तरदाते असल्याने त्यांना हा प्रश्न लागू पडला नाही. सदर सारणीत दोन ते

पाच वर्षे अंतर असणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत. तर कोणत्याही वधुचे वय लग्नाच्या वेळी वरापेक्षा जास्त नसल्याचे मुलाखतीदरम्यान समजले. यात वर वधूचे लग्नाच्या वेळी वय साधारणत: १६ च्या वरच आढळले.

यावरून असे लक्षात येते की माना आदिवासी जमातीत अतिशय लहान वयात मुलामुलींची लग्न करीत नाहीत. साधारणत: मुलगी वयात आल्यावरच म्हणजे किमान १६ वर्षे वय झाल्यावरच लग्न करतात. असे मुलाखती दरम्यान आढळले. माना जमातीत मुलेही शेतकाम किंवा मजूरीला लवकर लागतात. त्यामुळे मुलगा व मुलगी कामाला लागले की लगेच लग्न अशी प्रथा विवाहाबाबत असल्यामुळे मुलगा व मुलीच्या वयात लग्नाच्या वेळी दोन ते पाच वर्षापेक्षा अधिक अंतर आढळत नाहीत. सहा ते दहा वर्षे वयातील अंतर हे अतिशय म्हातारे किंवा आता नोकरीची वाट पाहणारे क्वचित तरूण यांमध्येच आढळते.

हिंदू समाजात विवाहासाठी जोडीदार निवडीबाबत वडीलधारी मंडळीचेच मत विशेषत्त्वाने लक्षात घेतले जाते. परंतु आदिवासी जमातींच्या विवाहासाठी जोडीदार निवडीचे स्वरूप हिंदू रितीरिवाजाप्रमाणे आहे की काय हेही जाणणे महत्त्वाचे आहे. यासंदर्भात संशोधन विश्वासतील माना जमातीतील विवाहाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी तसेच विवाहासाठी जोडीदार निवडतांना जोडीदाराची निवड कुणी करायची असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्या प्रश्नाला उत्तरदात्यांकडून मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीवरून निदर्शनास येतो.

**सारणी क्र.२**

**उत्तरदात्यांच्या जोडीदारांचे निवडीचे स्वरूपदर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | वडिलधाऱ्यांनी ठरविलेले | १८० | ९०% |
| २. | जोडीदाराच्या संगनमताने | १० | ५.००% |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | आंतर धर्मीय | ०० | ००% |
| ४. | आंतरजातीय | १ | ०.५% |
| ५. | प्रेमविवाह | २ | १% |
| ६. | लागू पडत नाही | ७ | ३.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

माना या आदिवासी जमातीतील विवाहाचे स्वरूप वरील सारणीत दर्शविलेले आहे. एकूण २०० उत्तरदात्यांपैकी वडीलधाऱ्यांनी ठरविल्याप्रमाणे विवाह होतात असे १८० (९०%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. जोडीदारांनी स्वत: निर्णय घेऊन जुळवून आणलेले विवाह १० (५%) असून आंतरजातीय विवाह ०१ (०.५%) व प्रेमविवाह ०२ (१%) आहेत.

पाश्चात्य व नागरी समाजात विवाहासाठी जोडीदार निवडायचे बरेचसे अधिकार नियोजित वर व वधूंनाच मिळाले असले तरी ग्रामीण समुदायातील माना जमातीत मात्र अनुभवाने पोक्त असलेल्या आई–वडिलांनी मुलांच्या विवाहासाठी जोडीदार निवडावे ही बाब प्रकर्शाने निदर्शनास येते.

वरील सारणीतील विवाहाचे स्वरूप लक्षात घेतल्यास आधुनिक काळात आंतरजातीय, आंतरधर्मीय, आंतरप्रांतीय अशा विवाहाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असले तरी संशोधन विश्वातील माना जमातीच्या लोकांमध्ये विवाह जुळवून आणतांना वडीलधाऱ्या मंडळींच्या निर्णयाचे स्वागत केले जाते ही बाब प्रकर्षाने उल्लेखन्यासारखी आहे.

पारंपारिक समाजात आपला वैवाहिक जोडीदार निवडण्याचे सर्व अधिकार केवळ मातापिता व कुटुंबातील जेष्ठ व्यक्तिंनाच होते. त्यात आत थोडासा बदल होऊन संबंधित वधू वरांना आपले मत व्यक्त करण्याचा व पसंत नसलेल्या मुलाला /मुलीला नकार देण्याचा अधिकार हा सुशिक्षित कुटुंबात वधु वरांना मिळाला आहे. हयाच

विवाहातील जोडीदार निवडण्याच्या बाबतीत योगेंद्र सिंग सांगतात, जेव्हा मातापित्यांच्या ऐवजी मुले स्वत: विवाहातील जोडीदारांची निवड करतात तेव्हा त्यांच्या वैवाहिक संबंधांच्या स्वरूपामध्ये गुणात्मकता असते'९

उच्च शिक्षित नागरी समाजामध्ये मुले/मुली जोडीदारांची स्वत: निवड करण्यात पुढाकार घेतात. परंतु ग्रामीण समुदायामध्ये मुले/मुली जोडीदाराची स्वत: निवड करण्यात स्वत: पुढाकार घेत नाहीत. यासंदर्भात राम आहूजा म्हणतात की, 'आता गेल्या तीन चार दशकांपासून मातापित्यांनी विवाहाकरीता जीवनसाथी पसंत करतांना मुलांशी सल्लामसलत करण्यास सुरूवात केली आहे. सुरूवातीला केवळ मुलांची सहमती घेतली जात असे. परंतु आता मुलींची सहमती सुद्धा विचारली जाते. काही उदाहरणामध्ये मुले स्वत: जोडीदार पसंत करून मातापित्यांशी सल्लामसलत न करता विवाहबद्ध होतात. अशाप्रकारे आज असे म्हणता येईल की, माता पित्यापासून संयुक्त असा विवाहातील जोडीदार निवडण्यात परिवर्तन झाले आहे. आपल्या जोडीदारांच्या निवडीमध्ये मुलांना पूर्ण स्वातंत्र्य अपेक्षित नाही तर मातापिता आणि स्वत: मिळून जोडीदारांनी निवड अपेक्षित आहे'१० राम आहुजा यांनी काढलेले निष्कर्ष प्रस्तुत अध्ययनाशी अगदी मिळता जुळता आहे. आपला विवाह कोणत्या पद्धतीने पार पडता? हा प्रश्न उत्तरदात्यांना विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**सारणी क्र.३**

**उत्तरदात्यांच्या विवाहाच्या पद्धतीदर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | परंपरागत पद्धतीने | १९० | ९५% |
| २. | विवाह मेळाव्यात | १ | ०.५% |
| ३. | ऐच्छिक पद्धतीने | ०० | ००% |
| ४. | धार्मिक स्थळी किंवा अन्य ठिकाणी | १ | ०.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | नोंदणी पद्धतीने | ९ | ०.५% |
| ६. | लागू पडत नाही | ७ | ३.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

आदिवासी जमातीत विवाहाच्या पद्धती कशाप्रकारे असतात व त्या संदर्भाने माना या आदिवासी जमातीत विवाहाच्या कोणत्या पद्धती अवलंबिल्या जातात याचे वर्णन वरील सारणीत दर्शविलेले आहे.

''माना जमातीत परंपरागत पद्धतीने चाललेला विवाह विधी सतत तीन दिवस चालायचा. हा लग्नविधी म्हणजे निरनिराळया दंडोकाची मालिकाच असायची. विवाहविधी वधुमंडपी पार पडतो. विवाहाच्या पहिल्या दिवशी डहाका (वादय) वाजवून कुलदैवताची पूजा केली जाते. याप्रसंगी कोंबडा, बकरा किंवा वराह यांचा बळी देऊन भाव दिला जात असे. कुलदेवतांची पूजा झाल्यावर कुलदैवतांचा प्रसाद म्हणून दुपट्टयात आंबीहळद किंवा डोकरीहळद बारीक करून त्यात दातरंगी झाडाचा पाला बांधून लाल रंग तयार करून व त्याचा कुंकू म्हणून वापर करीत नंतर नवरदेव नवरीचे घरी परणु जातो. (परणु जाणे म्हणजे नवरदेव बनून वधुच्या गावी जाणे.) जानोशा (वरासाठी वधुकडच्यांनी वधुच्या गावी नियोजित केलेली थांबण्यासाठी जागा.) वरून नवरदेव मामाच्या कडेवर बसून घोंगडीची घोंगूशी पांघरून मंडपात जातो. त्यावेळी अन्नाचे व शेणाचे गोळे तयार करून नवरदेवाच्या अंगावरून ओवाळून उजवीकडे व डावीकडे टाकतात. नवरदेव मांडवात प्रवेश करतेवेळी पळस वाकाचा गुडा मधल्या बोटाने सोडवून प्रवेश करतो. प्रवेश मंडपाच्या आडव्या आडयांतून निषिद्ध मानतात. वधु पक्षाकडे वधुसाठी रंगाऱ्याकडून विशिष्ट प्रकारचे रंगविलेले पिवळे लुगडे तयार केले जाते. त्याला 'खेंडा' म्हणतात. हा खेंडा नेसल्यावर जमात पंचायतीच्या प्रमुखाने लग्न लावल्यानंतर वधुला वर आपल्या कडेवर घेऊन बोहोल्याला पाच वेळा फेऱ्या मारतो आणि नंतर वधु आणि वर एकमेकांना गुलाल लावतात. तिसऱ्या दिवशी थट्टा मस्करीचा कार्यक्रम असतो. नवरदेव नवरीला स्वत:च्या घरी नेतो त्याला 'यशचा दिवा' म्हणतात.''११

अशाप्रकारे माना आदिवासी जामीत विवाहाची परंपरा पद्धती अस्तित्वात आहे. २०० उत्तरदात्यांपैकी परंपरागत पद्धतीने विवाह केलेले १०९ (९५%) उत्तरदाते आहेत. तर आधुनिक काळात सामुहिक विवाह सोहळा ज्याला 'विवाह मेळावा असे म्हणतात त्यात १ (०.५%) उत्तरदात्याने विवाह केले असे उत्तर दिले. धार्मिक स्थळी किंवा अन्य ठिकाणी १(०.५%) उत्तरदात्याने विवाह केलेला असून कायदयाची मान्यता घेऊन नोंदणी पद्धतीने विवाह करण्याऱ्या उत्तरदात्यांची संख्या १(०.५%) आहे.

एकंदरीत आधुनिक काळात विविध नागरी, ग्रामीण समुदायात व विविध जाती समुदायात विवाहाच्या आधुनिक पद्धती स्विकारल्या गेल्या असल्या तरी माना जमातीत मात्र अजूनही परंपरागत पद्धतीचाच स्विकार होतो आहे. त्याच्या स्वरूपात परिवर्तन होत असले तरी ते मोठया प्रमाणातील परिवर्तन आहे असे म्हणता येणार नाही.

आपल्या कुटुंबात मुलामुलींच्या विवाहाचा निर्णय कोण घेतात हा प्रश्न विचारला असता जी माहिती प्राप्त झाली त्याचे वर्णन पुढील सारणीत दर्शविलेले आहे.

**सारणी क्र.४**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबातील विवाहविषयक निर्णय प्रक्रियेत सदस्यांचा**

**सहभाग दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | स्वत: मुले /स्वत: मुली | २ | १% |
| २. | स्वत: मुली | ०० | ००% |
| ३. | सर्वांच्या संगणमताने | १७६ | ८८% |
| ४. | आईवडील | २१ | १०.५% |
| ५. | वडील फक्त | १ | ०.५% |
| ६. | इतर मंडळी | ०० | ००% |

| | | | |
|---|---|---|---|
| | **एकूण** | २०० | १००% |

आज भारतीय समाज परिवर्तन प्रक्रियेच्या संक्रमण अवस्थेतून जात आहे. ग्रामीण समुदायातील माना हा आदिवासी समुदाय सुद्धा याला अपवाद नाही. परंपरागत कुटुंबव्यवस्थेत कुटुंबातील सर्वच निर्णय केवळ जेष्ठ पुरूष मंडळीच घेत असत. परंतु आज मुलामुलींच्या विवाहसंबंधीच्या महत्त्वपूर्ण निर्णय प्रक्रियेत महिला व मुलेमुली प्रत्यक्ष सहभागी होतात.

वरील सारणीमध्ये स्वत: मुलेमुली निर्णय घेणाऱ्यांचे प्रमाण केवळ ०२ (१%) आहे तर, सर्वांच्या संगणमताने निर्णय घेतले जाते असे १७६ (८८%) उत्तरदाते सांगतात. आईवडीलच निर्णय घेतात असे २१(१०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर फक्त वडीलच निर्णय घेतात असे ०१ (०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. यावरून विवाहासारख्या महत्त्वपूर्ण विषयावर सर्वांच्या सहमतीने निर्णय घेतल्या जातो हे कौटुंबिक निर्णय प्रक्रियेतील सर्व सदस्यांचा सहभाग ही आधुनिकीकरणाकडे परिवर्तीत होणारी बाब ठरते.

वर्तमान स्थितीमध्ये आईवडील व कुटुंबातील इतर सदस्य एकत्र मिळून जोडीदार निवडण्याचे निर्णय घेत असले तरी ते सर्वदृष्टीने विचार विमर्श करून निर्णय घेतात. अशाप्रकारच्या जोडीदार निवडीत प्रेमविवाह व घटस्फोट फारसे आढळत नाहीत. ‘‘पूर्वीपेक्षा आज जोडीदार निवडतांना व्यक्तिगत गुण, शिक्षण, आर्थिक व्यवसाय, सौंदर्य इत्यादींकडे अधिक लक्ष दिले जाते. सध्या विवाहावर खर्च कमी आणि विवाहातील रितीभातीसुद्धा कमी झाल्या. बालविवाह प्रथा जवळपास समाप्त होत आहे.’’१२

विवाहातील जोडीदार निवडण्याचे संदर्भात राम आहुजा लिहीतात की, ‘ मुलांकरीता जोडीदार निवडतांना आईवडील अनेक गोष्टी लक्षात घेतात. कारणे ते त्यास कुटुंबाचा विषय समजतात. ते ज्या गोष्टीवर जोर देतात. त्यापैकी प्रमुख म्हणजे कुटुंबाची प्रतिष्ठा ज्या कुटुंबातून जोडीदाराची निवड करायची त्या कुटुंबातील सदस्यांची नैतिकता,

कुटुंबाची संपत्ती, मुलगा आणि मुलीची शारीरिक सुदृढता मुलामुलींचे चारित्र्य, मुलांची नोकरी व उत्पन्न इत्यादी होय.'१३

पती पत्नी हे संसार रथाची दोन चाके मानली जातात. त्यामुळे सुखमय संसारासाठी ही दोन्ही चाके एकमेकाला पूरक व समान असणे गरजेचे आहे. वधुवराची निवड ही कोणाच्याही मार्फतीने झाली तरी ती परस्परपुरक व समतेची असली पाहिजे अन्यथा संसारी जीवन यशस्वी होत नाही. त्यासाठीच विवाहातील जोडीदार निवडण्याला नेमका आधार कोणता हे पाहणेसुद्धा तेवढेच महत्त्वाचे आहे. त्याकरीता उत्तरदात्यांना वधुची निवड करतांना कोणत्या बाबीला प्राधान्यक्रम देता असा प्रश्न विचारण्यात आला. त्याची वारंवारीता पुढील सारणीत दर्शविलेली आहे.

**सारणी क्र.५**

**विवाहासाठी स्त्री जोडीदार निवडीचे पसंतीदर्शक सारणी.**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मुलगी देखणी असावी. | १९०० | ००% |
| २. | मुलगी शिकलेली असावी | ७ | ३.५% |
| ३. | मुलगी काम करणारी असावी | ५७ | २८.५% |
| ४. | मुलगी देखणी व काम करणारी असावी. | ५ | २.५% |
| ५. | वरील सर्वच | १३१ | ६५.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीत वधू म्हणून मुलीची निवड करतांना कोणत्या बाबींना प्राधान्यक्रम दयाल या प्रश्नाच्या संदर्भात १) मुलगी देखणी असावी २) मुलगी काम करणारी असावी ३) मुलगी शिकलेली असावी. ४) वरीलपैकी सर्वच गुण असणारी असे पर्याय ठेवण्यात आले होते. आधुनिक काळात वधुनिवडीत सौंदर्याला विशेष प्राधान्य दिले जात असले तरी माना जमाती समुदायात केवळ स्त्रीच्या सौंदर्याला विशेष

महत्त्व दिले जात नाही. तर त्या सोबतच काम करणारी असावी, या पर्यायाला ५७ (२८.५%) उत्तरदात्यांनी प्राधान्य दिले आहे. तर शिकलेली असावी या पर्यायाला ७ (३.५%) उत्तरदाते प्राधान्यक्रम देतात. मुलगी देखणी व काम करणारी असावी या पर्यायाला ५(२.५%) उत्तरदात्यांनी प्राधान्य क्रम दिलेला आहे. तर वरील सर्वच गुणसंपन्न असावी अशी अपेक्षा करणारे महत्तम १३१ (६५.५%) उत्तरदाते आहेत.

याचाच अर्थ आपल्या मुलासाठी वधू निवडतांना ती एखादयाचा गुणाने संपन्न असावी यावर मातापित्यांचे समाधान होत नाही. तर ती सर्वगुण संपन्न असावी याकडे जास्त कल आहे. हे वधू निवडतील मोठे परिवर्तन आहे.

**सारणी क्र.६**

**विवाहासाठी पुरूष जोडीदार निवडीचे पसंतीक्रम दर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | मुलगा शिकला असावा | १२ | ६% |
| २. | मुलगा देखणा असावा | ० | ००% |
| ३. | मुलगा कमावता असावा | ८७ | ४३.५% |
| ४. | मुलगा सद्‌गुणी असावा | ०१ | ०.५% |
| ५. | शिकला व कमावता असावा | ०३ | १.५% |
| ६. | शिकला, देखना व कमावता असावा. | ८ | ४% |
| ७. | वरील सर्वच | ८९ | ४४.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीप्रमाणे माना आदिवासींमध्ये ज्याप्रमाणे वधुनिवडीबाबत प्राधान्यक्रम दिला गेला त्याचप्रमाणे वर निवडीबाबत मुलगा शिकला असावा याला १२ (६%) उत्तरदात्यांनी प्राधान्यक्रम दिला तर मुलगा कमावता असावा यासाठी ८७ (४३.

५%) उत्तरदात्यांनी पसंती दर्शविली. मुलगा सद्‌गुणी असावा असा ०१ (०.५%) उत्तरदाता म्हणतो. तर मुलगा शिकला, व कमावता असावा असे ३ (१.५%) उत्तरदाते म्हणतात. मुलगा शिकला, देखणा व कमावता असावा अशी अपेक्षा ८ (४%) उत्तरदात्यांची आहे तर वरील सर्वच गुणसंपन्न वर असावा अशी ८९ (४४.५) उत्तरदात्यांची अपेक्षा आहे.

यावरून माना आदिवासींमध्ये शिक्षण व सद्‌गुण या गुणांपेक्षा त्यांच्या आर्थिक मिळकतीला प्राधान्यक्रम दिले जाते असे निदर्शनास येते.

विवाहासाठी जोडीदार निवडतांना तो आपल्या जातीमधीलच असावा असे विवाहाचे बंधन असते आणि तेच जातीव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्टय आहे. केवळ जातीतच नव्हे तर पोटजातीतसुद्धा आंतर विवाहाचे बंधन असते. के.एम.कपाडिया म्हणतात की, 'धर्मशास्त्र प्रत्येक हिंदूला आपल्या वर्गामध्येच विवाह करण्याचे निर्देश देते. परंतु व्यावहारिक स्वरूपामध्ये प्रत्येक वर्ग अनेक जाती आणि उपजातीमध्ये विभागलेले आहे. आणि हया उपजाती अनेक भागामध्ये विभागलेल्या आहेत.'१४

या संदर्भात एस.व्ही. केतकर यांनी व्यंगात्मक शब्दांत म्हटले आहे की, 'भारतामध्ये कोटयावधी हिंदू आपापसात अशाप्रकारे विभागले आणि उपविभागले गेले आहेत की त्यातील अशा काही जाती आहेत की ज्या १५ कुटुंबाबाहेर विवाह करू शकत नाही.'' [१५] ' आंतरविवाहाचा अर्थ आपल्या जाती–जमातीच्या आत विवाह करणे होय. आमच्या येथे अनेक जाती–जमाती असून त्या अनेक उपजातीमध्ये विभागल्या गेलेल्या आहेत व त्या उपजाती जमाती उपवर्गात विभालेल्या गेलेल्या आहेत व त्या उपजाती जमाती उपवर्गात विभागलेल्या आहेत. व त्यातील सर्वच उपवर्ग आंतरविवाहीय आहेत.'१६ ग्रामीण समुदायातील माना ही एक जमात आहे व भारतीय हिंदू जाती व्यवस्थेनुसार ती सुद्धा याला अपवाद राहू शकत नाही. परंतु परिवर्तनाच्या प्रक्रियेत आता पोटजमातीमध्ये सुद्धा विवाह होऊ लागले आहेत. याची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी 'आपल्या विवाह इच्छुक मुलामुलीने जमातीबाहेर विवाह केल्यास आपण त्यास संमती

दयाल काय?' असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याची वारंवारिता पुढील सारणीत दर्शविण्यात आली आहे.

**सारणी क्र.७**

**आपल्या मुलामुलींनी समुहाबाहेर विवाह केल्यास उत्तरदात्यांची प्रतिक्रियादर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | फक्त मुलालाच मान्यता देऊ | २ | १% |
| २. | फक्त मुलीलाच मान्यता देऊ | १ | ०.५% |
| ३. | दोघांनाही मान्यता देऊ | ५८ | २९% |
| ४. | मान्यता देणार नाही | २९ | १४.५% |
| ५. | काही काळ मान्यता देणार नाही. | १०७ | ५३.५% |
| ६. | दंड करू. | ३ | १.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीप्रमाणे फक्त मुलालाच मान्यता देऊ इच्छिणारे ०२ (१%) उत्तरदाते आहेत तर फक्त मुलीलाच मान्यता देणारे ०१ (०.५%) उत्तरदाते आहेत. दोघांनाही मान्यता देणार अशी मनोवृत्ती असलेले ५८ (२९%) उत्तरदाते आहेत. तर मान्यता देणार नाही अशी २९ (१४.५%) उत्तरदात्यांनी ताठर भूमिका घेतलेली आहे. काही काळ मान्यता देणार नाही असे १०७ (५३.५%) उत्तरदात्यांनी सांगितले तर ३ (१.५%) उत्तरदाते दंड करू असे म्हणतात.

एकंदरीत सर्वच क्षेत्रात शीघ्र गतीने परिवर्तन होतांना दिसत असले तरी विवाहाच्या संदर्भात समूहाबाहेर विवाहाला माना जमातीची मान्यता नाही हे वरील सारणीवरून निदर्शनास येते.

प्राचीन रूढी प्रथा परंपरानुसार विधवा स्त्रीला पुनर्विवाह करण्याची अनुमती नव्हती मनूच्या मतानुसार 'एका पतीव्रता स्त्रीचा दुसरा विवाह स्वीकार्य नाही. मनूने पुन्हा असे म्हटले की विधवांच्या पुनर्विवाहासंबंधी कुठेही रूढी प्रथा नाही.' १७ जोडीदार निधन पावल्याने विधूर किंवा विधवा झालेल्या व्यक्तिंना पुनर्विवाह करण्याची परवानगी काही समाज देतात तर काही समाज अशी परवानगी फक्त विधूरांनाच देतात आणि विधवांनी पुनर्विवाह करणे निषिद्ध मानतात.'१८ 'विधवा स्त्रियांच्या संदर्भात एम.एन. श्रीनिवास म्हणतात की, 'केवळ विधवांनाच नव्हे तर पुनर्विवाहित विधवांना सुद्धा शुभकार्यापासून अलिप्त ठेवले जाते.'१९

प्रतिभा रानडे यांच्या मते, ''ब्राम्हण वर्गातील विधवांवर पुनर्विवाहाची बंदी होती. खालच्या वर्गातील विधवांना पुन्हा विवाह करण्यास बंदी घातली गेली ती उच्च समजल्या जाणाऱ्या ब्राम्हण वर्गातील निकषांवर असे दिसते.''२०

'भारतीय हिंदू समाज व्यवस्थेचा विचार करतांना प्राचीन परंपरेपासनूच विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता नव्हती. परंतु विवाहाच्या संबंधात एक आधुनिक प्रवृत्ती म्हणून विधवांच्या पुनर्विवाहाचा विचार होत आहे. आज सामाजिक व नैतिक हया' दोन्ही दृष्टीने असा अनुभव घेतला जातो विधवांचा सुद्धा पुनर्विवाह झाला पाहिजे. विशेष करून अशा विधवांचा की ज्यांना अल्पवयातच वैधव्य आले. त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी, अनैतिक व्यभिचार थांबविण्यासाठी, त्यांच्या मुलांना अनाथ होण्यापासून वाचविण्यासाठी आणि विधवांनासुद्धा राष्ट्रोपयोगी बनविण्यासाठी विधवा पुनर्विवाह विचार उचित मानला जाते.'२१

ईश्वरचंद्र विद्यासागर आणि अनेक समाजसुधारकांनी केलेल्या अतिशय कळकळीच्या प्रयत्नांना यश आले आणि १८५६ मध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याची परवानगी देणारा महत्त्वाचा कायदा मंजूर झाला. अशा परिस्थितीत 'तुमच्या जमातीत विधवा पुनर्विवाह मान्य आहे काय? असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र.८

## विधवा पुनर्विवाह मान्यता दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १९६ | ९८% |
| २. | नाही | ०३ | १.५% |
| ३. | सांगता येत नाही | ०१ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीप्रमाणे विधवा पुनर्विवाहाला मान्यता देणारे १९६ (९८%) उत्तरदाते आहेत तर विधवा पुनर्विवाहासाठी नकार देणारे ३ (१.५%) उत्तरदाते आहेत. १ (०.५%) उत्तरदाता याबाबतीत मात्र तटस्थ आहे.

यावरून असे निदर्शनास येते की हिंदू समाज व्यवस्थेत विधवांच्या पुनर्विवाहावर बंधने टाकलेली दिसत असली तरी माना जमातीमध्ये विधवांच्या पुनर्विवाहाला नि:संकोच मान्यता दिली जाते.

आधुनिक काळात विवाहसंस्थेच्या संदर्भात हुंडाप्रथा ही एक ज्वलंत समस्या आहे. सर्वच जाती जमातीच्या शहरी संस्कृतीशी सबंधित भौतिकवादाकडे झेपावलेल्या लोकांमध्ये हुंडाप्रथेचे प्रस्थ दिसते. अशा परिस्थितीत माना जमातीत हुंडाप्रथेचे स्वरूप जाणून घेण्यासाठी तुम्ही आपल्या लग्नात वरमूल्य (हुंडा) किंवा वधुमूल्य घेतले होते काय? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ९

## उत्तरदात्यांची विववाहाच्या वेळी हुंडा घेण्याची स्थितीदर्शक सारणी.

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | वरमूल्य घेतले | २६ | १३% |
| २. | वधूमूल्य घेतले | ३ | १.५% |
| ३. | घेतले नाही | १६४ | ८२% |
| ४. | माहित नाही | ०० | ००% |
| ५. | लागू पडत नाही | ०७ | ३.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीत असे निर्शनास येते की, २०० उत्तरात्यांपैकी २६ (१३%) पुरूष उत्तरात्यांनी वरमूल्य घेतले तर ३ (१.५%) स्त्री उत्तरात्यांनी वधूमूल्य घेतले. एकूण १६४ (८२%) उत्तरात्यांनी कोणत्याही प्रकारचे वरमूल्य किंवा वधूमूल्य घेतले नाही.

यावरून असे लक्षात येते की, माना आदिवासी जमातीत हुंडा घेण्याची प्रथा आजतागायत तरी दिसून येत नाही.

आपल्या विवाहाच्या वेळी वरमूल्य (हुंडा) किंवा वधूमूल्य दिले होते काय? असा प्रश्न विचारला असता त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविण्यात आलेल्या आहेत.

**सारणी क्र.१०**

**उत्तरदात्यांच्या विवाहाच्यावेळी हुंडा देण्याविषयीची स्थितीदर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | वरमूल्य दिले | १ | ०.५% |
| २. | वधूमूल्य दिले | २३ | ११.५% |
| ३. | दिले नाही | १६९ | ८४.५% |
| ४. | लागू पडत नाही | ०७ | ३.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| | **एकूण** | २०० | १००% |

वरील सारणीत दर्शविल्याप्रमाणे वरमूल्य दिले असे सांगणारा १(०.५%) उत्तरदाता आहे. तर वधूमूल्य दिले असे २३ (११.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. वरमूल्य किंवा वधूमुल्य दिले नाही असे १६९ (८४.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. हिंदू रितीरीवाजाप्रमाणे हुंडा देण्याघेण्याची पद्धती माना आदिवासींमध्ये फारसी आढळत नाही. पूर्वी मात्र माना आदिवासींमध्ये वधूमूल्य म्हणजे 'देज' देण्याची पद्धती अस्तिवात होती. हे वरील  सारणीवरून दिसून येते. ती पद्धत आता पूर्णपणे बंद झालेली आहे. आता इतर समाजाकडे पाहून वरमूल्य म्हणजे 'हुंडा देण्याची पद्धत सुरू होत आहे. परंतु त्याचे प्रमाण नगण्य आहे. आणि दिल्या गेलेल्या हुंडयाची रक्कम किंवा वस्तूही खूप नाही असे निदर्शनास येते.

हुंडा प्रथा ही भारतीय समाज व्यवस्थेच्या विवाह संस्थेला लागलेला कलंक आहे. केवळ हिंदू समाजातच नव्हे तर जैन, मुस्लिम, इत्यादी समाजसुद्धा हुंडा प्रथेमुळे त्रस्त झाला. वराला हुंडा देऊन लग्न करण्याच्या या पद्धतीमुळे एक  नवीनच समस्या निर्माण झाली. हुंडयासाठी नवविवाहितेला जाळून टाकण्याच्या: विहिरीत ढकलून दिल्याच्या आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याच्या; सासू ननंदा, पतीने वधूला जीवे मारल्याच्या घटना आपण रोजच पाहतो. विशिष्ट रक्कम, धन  किंवा काही वस्तू अनेकांना पण या जिवघेण्या प्रथेमुळे जगणे कठीण झाले. भौतिकवादी तत्वज्ञानाच्या प्रभावातून हुंडा पद्धतीचे प्रस्थ आधुनिक काळात अधिकच वाढले आहे. त्यामुळे मुलगी जन्माला येणे, हेच एक संकट समजले जाते. प्रस्तुत अध्ययनातील 'माना' समाज सुद्धा हयाच समाजव्यवस्थेचा एक भाग असल्यामुळे या समाजात हुंडा प्रथा आहे काय? व असल्यास त्याचे स्वरूप काय? हे जाणून घेण्यासाठी आपल्या जमातीत हुंडा दिला अथवा घेतला जातो काय? व हुंडयाचे स्वरूप काय? हे उत्तरदात्यांकडून जाणून घेण्यात आले. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र.११

## हुंडयाचे स्वरूपदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पैशाच्या स्वरूपात | १२ | ६% |
| २. | सामानाच्या स्वरूपात | ७ | ३.५% |
| ३. | धान्याच्या स्वरूपात | १७ | ८.५% |
| ४. | दागिण्याच्या स्वरूपात | १३ | ६.५% |
| ५. | इतर | ०२ | १% |
| ६. | हुंडा दिला अथवा घेतला नाही. | १४९ | ७४.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियावर माना जमातीत हुंडा प्रथेचे प्रस्थ असल्याचे दिसून येत नाही. एकूण १४९ (७४.५%) उत्तरदात्यांनी आपल्या जमातीत हुंडा दिला अथवा घेतला नाही हे मान्य केले तर पैशाच्या स्वरूपात हुंडा देणारे १२(६%) उत्तरदाते आहेत. सामानाच्या स्वरूपात भेटवस्तू म्हणून स्विकारणाऱ्या ७ (३.५%) उत्तरदाते आहेत. त्याला खऱ्या अर्थाने हुंडा म्हणता येणार नाही. धान्याच्या स्वरूपात १७ (८.५%) उत्तरदाते हुंडा स्वीकारणारे आहेत. तर दागिन्याच्या स्वरूपात १३ (६.५%) उत्तरदाते आहेत. व इतर स्वरूपात २ (१%) उत्तरदाते हुंडा स्विकारतात. अर्थात या जमातीत हुंडयाच्या स्वरूपात स्विकारलेल्या वस्तूंचे मूल्य जास्त नसते. खरे पाहिले तर ‘माना’ जमातीत अलिकडच्या काळात काही प्रमाणात दिसून येणारी ‘हुंडा प्रथा’ हा हिंदू समाजाचा माना जमातीवर झालेला परिणाम होय.

## सारणी क्र.१२

## उत्तरदात्यांची आपल्या मुलांच्या लग्नात हुंडा देण्याघेण्याविषयक अभिवृत्तीदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मूलाने वरमूल्य घ्यावे | ०७ | ३.५% |
| २. | मुलीने वधूमूल्य घ्यावे | ०२ | १.००% |
| ३. | दोघांनीही घ्यावे | १६ | ८% |
| ४. | दोघांनीही घेऊ नये. | ११४ | ५७% |
| ५. | सांगता येत नाही. | ६१ | ३०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणी क्रमांक ११ मध्ये उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया व परंपरेने 'माना' जमातीत हुंडाप्रथा असल्याचे निदर्शनास येत नाही. परंतु अवतीभवतीच्या इतर जातींचा प्रभाव म्हणून हुंडा प्रथेला शिरकाव माना जमातीत होणारच नाही असे म्हणता येत नाही. याबाबतची उत्तरदात्यांची अभिवृत्ती जाणून घेण्यासाठी वरील प्रश्नांचे प्रयोजन होते. त्यात मुलाने वरमूल्य अथवा हुंडा घ्यावे असे ७ (३.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. मुलीने वधूमूल्य घ्यावे असे ०२ (१%) उत्तरदात्यांचे मत आहे. ही तर आदिवासी जमातीची प्रथाच आहे. आयुष्यभर वधुपित्याने आपल्या मुलीच्या पालनपोषणावर, शिक्षणावर जो काही खर्च केला त्याची अल्पशी परतफेड व वरपक्षाला वधुमुळेच होणाऱ्या अपत्याचा लाभ याची थोडीशी परतफेड म्हणून आदिवासी जमातीत वधूमूल्याला परंपरेने मान्यता प्राप्त झाली आहे. परंतु मुलींनी वधुमूल्य घ्यावे असे केवळ ०२ (१%) उत्तरदात्यांना वाटते. हे विवाह संस्थेतील मोठे परिवर्तन आहे. दोधांनीही वर व वधू मूल्य घ्यावे असे १६ (०८%) उत्तरदात्यांना वाटते. तर ६१ (३०.५%) उत्तरदाते या संदर्भात तटस्थ आहेत. त्यामुळे आधुनिक भौतिकवादाकडे झेपावणाऱ्या काळामध्येसुद्धा माना जमातीत हुंडयाची फार मोठी अपेक्षा असल्याचे दिसून येत नाही.

विवाहाच्या संदर्भात प्रत्येक समाजाची काही प्रमाणके परंपरेनी चालत आलेली असतात. जसे हिंदू धर्मात विवाहापूर्वी ब्रम्हचर्याचे पालन करणे हे प्रमाणक निर्धारित आहे व त्याचे प्रत्येकाने कटाक्षाने पालन करावे असा अलिखित नियम आहे. परंतु आदिवासी समाजात मात्र अशाप्रकारचे नियम दिसत नाहीत. उलट सेमीनागा, नेमीनागा या नागा जमातीत स्त्रीला एकदोन अपत्य झाल्याशिवाय तिचा विवाहच होत नाही. अशा परिस्थितीत त्या जमातीत विवाहपूर्व शरीर संबंध ठेवणे हे ऐच्छिक नव्हे तर अनिवार्य बाब ठरते. माना ही जमात सुद्धा आदिवासी जमात असल्यामुळे विवाहपूर्व शरीर सबंधाबाबात अभिवृत्ती जाणून घेण्यासाठी विवाहपूर्वीच्या शारीरिक संबंधाबाबत आपले मत काय असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र.१३**

**उत्तरदात्यांची विवाहपूर्व शारीरिक संबंधाबाबत प्रतिक्रियादर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | दंडास पात्र आहे | ५४ | २७% |
| २. | असल्यास हरकत नाही | २६ | १३% |
| ३. | काहीच मत नाही | १०८ | ५४% |
| ४. | सांगता येत नाही | १२ | ०६% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की, ५४ (२७%) उत्तरदात्यांनी विवाहपूर्व शरीर संबंध प्रस्ताापित करणे मान्य नाही व अशी कृती घडल्यास ते दंडास पात्र आहेत अशी उत्तरे दिली. व ती सर्व तरूण वर्गातील सुशिक्षित उत्तरदाते आहेत. याऊलट विवाहपूर्व शरीरसंबंध प्रस्थापित झाल्यास काहीच हरकत नाही, तो ज्याचा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. असे २६ (१३%) उत्तरदात्यांचे मत आहे. या उत्तरदात्यांमध्ये परंपरागत विचारांचे  वयस्क व अशिक्षित, अल्पशिक्षित उत्तरदात्यांचे

प्रमाण जास्त आहे. १०८ (५४%) उत्तरदाते या प्रश्नाच्या संदर्भात तटस्थ आहेत. याचाच अर्थ ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे. त्यामुळे कोणाला प्रोत्साहीतही करता येत नाही किंवा आडकाठीही घालता येत नाही. ही तारूण्याची नैसर्गिक प्रक्रिया आहे. परंतु जेव्हा एखादे प्रकरण तक्रार म्हणून समाजासमोर येते त्यावेळी मात्र जमाती पंचायतीला दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे. तर १२ (६%) उत्तरदात्यांना या प्रश्नाच्या संदर्भात काहीही सांगता आले नाही.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, परंपरेप्रमाणे विवाहपूर्व संबंधास आदिवासी जमातीची एक प्रकारची मूकसंमती आहे.

वरील सारणीत विवाहपूर्व संबंधाबाबत उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या तसेच विवाहबाहय संबंधाबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्याच्या दृष्टीने अतिशय नाजूक प्रश्न विचारला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र.१४**

**उत्तरदात्यांची विवाहबाहय शारीरिक संबंधाबाबत प्रतिक्रियादर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | दंडास पात्र आहे | १४९ | ७४.५% |
| २. | असल्यास पात्र आहे. | ११ | ५.५% |
| ३. | घटस्फोट दयावा | ०८ | ०४% |
| ४. | सांगता येत नाही. | २३ | ११.५% |
| ५. | काहीच मत नाही. | ०९ | ४.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीक्रमांक १३ मध्ये उत्तरदात्यांच्या विवाहपूर्व संबंधाबाबतच्या प्रतिक्रिया लक्षात घेतल्या. आदिवासी जमातीत विवाहपूर्व संबंधाबाबत त्यांच्या जमातीची मूकसंमती असली तरी विवाहबाहय संबंधाबाबत मात्र ते अतिशय गंभीर असतात.

कुठलाही आदिवासी माणूस विवाहबाहय संबंध खपवून घेत नाही. असे अनेक आदिवासी अभ्यासकांचे मत आहे. त्याच पार्श्वभूमीवर माना जमातीत या विषयावर प्रतिक्रिया जाणून घेतल्या समाजाच्या नियंत्रणात राहूनच शारीरिक गरज पूर्ण करायची असते. कारण विवाहाचा उद्देश्यच मुळात तो असतो. पण विवाहबाहय संबंध आल्यास तो त्या व्यक्तिच्या हातून घडलेला फार मोठा अपराध आहे व अशा व्यक्तिला त्याच्या त्या कृतीबद्दल दंड झालेच पाहिजे असे १९४ (७४.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर ११ (५.५%) उत्तरदाते असल्यास हरकत नाही असे म्हणतात. परंतु ती त्यांची मूळात हरकत नाही अशी भूमिका नसून त्या प्रकारणावरील मूले इतर नातेवाईक, कुटुंबाची प्रतिष्ठा या घटकांचा असणारा दबाव यामुळे मुकाटयाने सहन केल्यावाचून दुसरा पर्याय नाही अशी या उत्तरदात्यांची खंत आहे. अशी हरकत करणाऱ्या व्यक्तींना घटस्फोट दयावा कारण पतीपत्नीचे नाते शारीरिक गरज समाजमान्य मार्गाने पूर्ण करण्यासाठीच विवाहाचे बंधन असून विवाहाच्या हया मर्यादा सोडून व्यक्ति वागत असेल तर त्याला पती अथवा पत्नी म्हणून राहण्याचाही अधिकार नाही. त्याला सरळ घटस्फोट दयावा अशी कठोर भूमिका ०८ (४%) उत्तरदात्यांनी दिलेली आहे. यावर काय बोलावे अशी निराशावादी उत्तरे २३ (११.५%) उत्तरदाते देतात. तर ०९ (४.५%) उत्तरदाते यांचे यावर काहीच मत नाही असे सांगतात.

एकंदरीत वरील प्रतिक्रियांवरून असे लक्षात येते की माना जमातीतील लोक विवाहबाहय संबंधाच्या बाबतीत अतिशय संवेदनशील व विरोधक आहेत.

**सारणी क्र.१५**

**उत्तरदात्यांचे पहिले अपत्य म्हणून मुलगा आणि मुलगी यांच्या जन्माचे स्वागत दर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | मुलगा | २० | १०% |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | मुलगी | ०५ | २.५% |
| ३. | मुलगा मुलगी सारखीच | १७२ | ८६% |
| ४. | सांगता येत नाही. | ०३ | १.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

भारतीय हिंदू समाजव्यवस्थेचा विचार करीत असतांना कुटुंबात प्रथम अपत्य म्हणून मुलाचेच स्वागत होते. डॉ. भा. की. खडसे यांच्या मते,''हिंदू धर्मात पूत्रप्राप्तीच्या आकांक्षेला विशेष महत्त्व दिले जाते. 'पूत नामक नरकातून तारणारा तो पूत्र' असे म्हणतात. माता पित्यांचा वृद्धापकाळात सांभाळ करणारा, मृत्यू संस्कार, पिंडदान करणारा पूत्र, वंशाचा दिवा मानण्यात येतो. संपत्तीचा वारसा त्याच्याकडूनच चालतो. अशा अनेक दृष्टीने पुत्रप्राप्तीची कामना केली जाते. असे असले तरी सध्याच्या काळात मुलगा व मुलगी यांना सारखेच मानले पाहिजे हा नवविचार दृढ होत आहे. स्त्रीपुरूष समानता हे त्यात समाविष्ट असलेले तत्त्व आहे.'' २२ या संदर्भात माना जमातीतील उत्तरदात्यांनी प्रथम अपत्य म्हणून मुलाचे स्वागत करू असे २० (१०%) उत्तरदात्यांची मते तर मुलीचे स्वागत करू असे केवळ ५(२.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. मुलगा मुलगी सारखीच असे १७२ (८६%) उत्तरदाते सांगतात. तर ०३ (१.५%) उत्त्तरदात्यांना त्यावर प्रतिक्रिया देता आल्या नाही.

यावरून केवळ मुलांच्या स्वागतापेक्षाही मुलगा–मुलगी सारखेच असे म्हणणाऱ्या महत्तम उत्तरदात्यांची संख्या लक्षात घेता स्त्रीपुरूष समानतेचे तत्त्व माना समाजातही अलिकडे रूजल्याचे दिसून येते. हा या समाजातील परिवर्तनवादी विचार म्हणावा लागेल.

पती व पत्नी यांनी समाजमान्य व कायदेशीर पद्धतीने वैवाहीक संबंध संपुष्टात आणणे म्हणजे 'घटस्फोट' होय. ''विवाहाला समाजाची मान्यता असल्याशिवाय किंवा कायदयाची मान्यता असल्याशिवाय तो अस्तित्त्वात येऊ शकत नाही. म्हणूनच हा विवाह संपुष्टात आणावा लागतो.''[२३] घटस्फोटालाच ग्रामीण भागात सोडचिठ्ठी असं

म्हणतात. तर काही भागात काडीमोड हा शब्द वापरला जातो. वैवाहिक जीवनात स्त्री पुरुषांच्या बरोबरीची मानल्या जाऊ लागली. पती पत्नी संबंध हे समानतेचे मानल्या जाऊ लागले. स्त्रियांना स्वातंत्र्य जीवनपद्धतीतील भिन्नता, सामाजिक मूल्यात झालेले परिवर्तन विरोधी स्वभावातून उद्‌भवलेले कौटुंबिक तणाव ईत्यादीमुळे स्त्रीला वैवाहीक जीवनात तिच्यावर होणारा अन्याय दूर व्हावा म्हणून घटस्फोट घेण्याची परवानगी देयात आली व घटस्फोट घेण्याबद्दल जनमत जागृत झाले काही कारणामुळे व पतीपत्नीला कोणत्याही परिस्थितीतीत जुळवून घेणे शक्य नसेल तर वैवाहिक बंधनातून मुक्त करण्याची सोय घटस्फोटाद्वारे करण्यात आली डॉ. प्रदिप आगलावे यांच्या मते,'' आदिवासी समाजात घटस्फोट घेण्याच्या अनेक पद्धती आढळतात. आदिवासी जमातीच्या रुढी परंपरांनुसार प्रत्येक जमातीत घटस्फोटाच्या वेगवेगळया पद्धती आहेत. भारतीय समाजात न्यायालयात जाऊन घटस्फोट घेतला जातो. परंतु आदिवासी समाजात न्यायालयात नाही त्यांच्या जमातीत पंच हेच त्यांचे न्यायालय असते.''[२४] माना जमातीतील घटस्फोटाचे स्वरुप जाणून घेण्यासाठी घटस्फोट घ्यायचा असेल तर कोणतीपद्धती वापरली जाते? असा एक साधा प्रश्न विचारला गेला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र.१६**

**उत्तरदात्यांची घटस्फोटाच्या पद्धतीदर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | जात पंचायतीकडे जाता | ४५ | २२.५% |
| २. | तंटामुक्ती समितीकडे जाता | ११० | ५५% |
| ३. | कोर्टात जाता | ३१ | १५.५% |
| ४. | घरीच घटस्फोट घेता | १४ | ७% |
| ५. | इतर पद्धत वापरतात | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

मानाा जमातीत घटस्फोट घेण्यासाठी त्यांच्या गाव पातळीवरील विविध पद्धतीचा उपयोग केला जातो. जसे कोर्टात जाऊन सनदशीर मार्गाने घटस्फोट घ्यावा असे ३१(१५.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. डॉ. प्रदिप आगलावे यांच्या मते, आदिवासी जमातीत घटस्फोट घेण्याच्या विविध पद्धती असल्या तरी अलिकडे त्यांचा संपर्क सभ्य समाजाशी येतो तसेच ते देखील भारताचे नागरीक आहेत. म्हणून त्यांना भारतीय दंड विधान लागू आहे. त्यामुळे घटस्फोटाच्या परंपरागत पद्धती हळूहळू नष्ट होत आहेत. आता आदिवासी लोक सुद्धा घटस्फोट पाहीजे असल्यास न्यायालयात जातात.''[२५] साधारणत: गावात जाती पंचायतीच्या मार्फतीने वैवाहिक जीवनात तोडगे काढले जातात. पती पत्नी मधील तणावाचे निरसर करण्याचे प्रयत्न केले जातात व त्यातूनही मार्ग निघाला नाही तर जातपांचायत अथवा गाव पंचायत मार्फतीने पाचामुखी परमेश्वर या न्यायाने घटस्फोटाला मंजूरी दिली जाते. ही या जमातीची परंपरागत पद्धती असून एकूण ४५(२२.५%) उत्तरदाते या पद्धतीने घटस्फोट घेण्याचे मान्य करतात अलिकडच्या काळात गावातील कौटुंबिक व जातीय निवाडे सोडविण्यासाठी प्रत्येक गावात तंटामुक्ती समितीची स्थापना करण्यात आली. अलिकडच्या काळात जात पंचायती नष्ट झाल्या तयांची जागा तंटामुक्ती समितीने घेतली आहे. अशा तंटामुक्ती समितीच्या माध्यमाने घटस्फोट घेण्यात यावा असे महत्तम ११०(५५%) उत्तरदात्यांचे मत आहे. म्हणजेच आधुनिक काळात वैवाहीक व कौटुंबिक तक्रारी व घटस्फोटापर्यंतचे निर्वाळे देण्याचे काम आज तंटामुक्त समितीकडे आलेले दिसून येते हे या क्षेत्रातील मोठे परिवर्तन आहे. घरीच घटस्फोट दिला अथवा घेतला जातो असे १४ (७%) उत्तरदात्यांचे मत आहे. घरीच घटस्फोट घेतात. या प्रकारात कुटुंबातील पतीपत्नीतील उलट विकोपाला गेला असला तरी मुलाबाळांच्या इतर नातेवाईकांच्या व आप्तजनांच्या असे मानसिक दडपण असते की पती—पत्नी दोघेही आंतरिक कलह चव्हाटयावर आणू शकत नाही. अशा परिस्थितीत कधी पत्नी आपल्या मुलींना किंवा स्वत: घराबाहेर (विशेषत: माहेरी) निघून जाते तर कधी कधी पुरुष सुद्धा पत्नी व कुटुंबाचा त्याग करुन घराबाहेर निघून जातात.

वरील सर्वच प्रकार घटस्फोटासाठी अंगिकारल्या जातात असे उत्तरदात्यांचे मत दिसते.

वरील प्रश्नांची प्रतिक्रिया म्हणून घटस्फोटाच्या विविध पद्धती उत्तरदात्यांनी नोंदविल्या असल्या तरी माना जमातीत घटस्फोटाचे प्रमाण फार अत्यल्प आहे असे संशोधिकेच्या निदर्शनास आले.

**कौटुंबिक:—**

कुटुंब हा समाजाचा प्राथमिक घटक मानवाच्या सभ्यतेपासूनच सुरु आला. ''समाजाच्या नियमानुसार विवाह करुन स्त्रीपुरुष यांनी एकत्र राहणे अभिप्रेत असते. ते दोघेही स्वत:चे कुटुंब तयार करतात. कालांतराने या दोघांच्या शारीरिक संबंधामुळे त्यांना मुले होतात. पाश्चात्य समाजात केवळ पतीपत्नी एकत्र राहतात. परंतु हिंदू समाजासारख्या काही समाजात पतीपत्नी विशेषत: पती स्वत:च्या वृद्ध आईवडीलांची देखील देखभाल करतात. जुने जोडपे नविन जोडप्यांबरोबर एकत्रपणे राहत असते त्याला संयुक्त कुटुंब म्हणतात.''[२६] कुटुंब या गटातील सर्व व्यक्ती परस्परांची काळजी घेतात. परस्परांना मदत करतात. परस्परांवर प्रेम करतात व एकमेकांविषयी आपुलकी दर्शवितात. आईवडील मुलांचे संगोपन करतात. त्यांना शिक्षण देतात. त्यांच्या आपुल्याला चांगली दिशा देण्याचा प्रयत्न करतात. मुलांचे लग्न झाले की तो पत्नीसह वेगळा राहतो. एका कुटुंबातून दुसरे कुटुंब निर्माण होते. नविन जोडप्यांच्या प्रेमातून शारीरिक संबंधातून त्यांच्या कुटुंबाचा आकार वाढतो. डॉ. श. गो. देवगावकर यांच्या मते. ''समाजाच्या निर्मितीत आणि विकासात कुटुंबसंस्थेचे महत्त्व अनन्य साधारण आहे. आपण म्हणतो की कुटुंब ही नागरिक जीवनाची शाश्वत पाठशाळा होय. समाजात आणि राजकीय व्यवस्थेत पदार्पण केल्यावर जे सद्‌गुण असणे आवश्यक समजण्यात येते त्यांचे बीजरोपण कुटुंबातच होते. त्याग, बंधुभाव, आज्ञापालन, वरिष्ठांचा आदर, शिस्त, परस्पर सहिष्णुता व इतर अनेक गुणांचे बीजरोपण कुटुंबातच होते''[२७]

मांना जमातीच्या प्रस्तुत अध्ययनात कुटुंबाचे स्वरुप जाणून घेण्यासाठी आपल्या कुटुंबाचे स्वरुप कसे आहे? असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. १७

## उत्तरदात्यांच्या कुटुंबाचे स्वरुप दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विभक्त | १०५ | ५२.५% |
| २ | संयुक्त | ९५ | ४७.५% |
| ३ | इतर (विभक्तपण संयुक्त असल्यासारखे) | ०० | ००% |
| | एकूण | २०० | १००% |

प्रत्येक कुटुंबाचे स्वरुप त्या कुटुंबात किती व्यक्ती आहेत त्यावर अवलंबून असते. सामाजिक संकेतानुसार, संस्कृतीनुसार कुटुंबाचे स्वरुप बदलते. काही समाजात विवाह झाल्यावर देखील व्यक्ती स्वत:च्या पत्नीसंगत आईवडीलाबरोबर राहते. एवढेच नव्हेतर लहान भावाचे लग्न झाल्यानंतर ते जाडपे देखील त्यांच्याबरोबर राहते. त्यामुळे आपल्याला कुटुंबाचे निरनिराळे स्वरुप दिसून येतात. वरील सारणीत संयुक्त कुटुंबात राहणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ९५(४७.५%) आहे. तर विभक्त कुटुंबात राहणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १०५(५२.५%) आहे.

परंपरागत पद्धतीने ग्रामीण कुटुंब म्हणजे संयुक्त कुटुंबच होते. परंतु अलिकडच्या काळात ग्रामीण भागात सुद्धा विभक्त कूटूंबाची संख्या वाढते आहे. हे प्रस्तुत अध्यपनातील माना जमातीच्या प्रतिक्रियांवरुन दिसते. याचाच अर्थ संयुक्त कुटुंबकडून विभक्त कुटुंबाकडे बदलत गेलेले कुटुंबाचे स्वरुप हे एक मोठे परिवर्तन आहे.

विज्ञान तंत्रज्ञान व औद्योगिक क्रांतीमुळे कुटुंबाचे स्वरुप बदलत आहे. हा बदल होण्यास स्त्रीमुक्ती चळवळ, बदलणारी जीवनमूल्ये, स्त्रीशिक्षण, बदलणाऱ्या धार्मिक कल्पना, आधुनिक कायदे, इ. कारणीभूत झाले आहेत. कौटूंबिक संबंध फार महत्त्वाचे असतात. ते व्यक्तिच्या जिवनाला दिशा देतात. परंतु ते एकाच पातळीवर नसतात. तसेच कौटूंबिक संबंध हे कुटुंबातील व्यक्तीच्या विशिष्ट भूमिकावर आधारित असतात. या संबंधांना विशिष्ट भावनिक मूल्य असते. पती पत्नीमधील संबंध आईवडील व मूले यांच्यातील संबंध अशाप्रकारे कौटूंबिक संबंध असतात. कुटुंबाचे विकासात्मक दिशेने संचालन होत असतांना महत्त्वाचे निर्णय कोण घेतो हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यासंबंधीच्या उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दिल्या आहेत.

### सारणी क्र. १८

### उत्तरदात्यांची कुटुंबातील महत्त्वाच्या निर्णयात सहभाग दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वत:पती | ०७ | ३.५% |
| २ | स्वत:पत्नी | २ | १% |
| ३ | दोघेही मिळून | १८६ | ९३% |
| ४ | मुले | ०० | ००% |
| ५ | इतरांच्या सल्ल्याने | ५ | २.५% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीत दर्शविल्याप्रमाणे असे लक्षात येते की कुटुंबातील महत्त्वाचे निर्णय स्वत: पतीने घ्यावे असे म्हणणारे उत्तरदाते केवळ ७ (३.५%) आहेत. तर स्वत: पत्नीने कुटुंबातील महत्त्वाचा निर्णय घ्यावा असे म्हणणारे २(१%) उत्तरदाते आहेत. इतरांच्या सल्याने कुटुंबातील कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेण्याचे मत ५ (२.५%) उत्तरदात्यांनी दर्शविले आहे. तर पतीपत्नी दोघांनी मिळून कोणतेही कार्य करावे अथवा

करु नये यावर विचा विमर्श करुन मग दोघांच्या संगनमताने कुटुंबातील महत्त्वाचा निर्णय घ्यावा असे महत्तम म्हणजे १८६ (९३%) उत्तरदाते सांगतात. हिंदू समाजात पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचे अस्तित्व असल्याचे जाणवते त्यामुळे केवळ पित्यानेच किंवा कुटुंबातील कर्त्या पुरुषानेच कुटुंबातील महत्त्वाचे निर्णय घ्यावे अशी आजवर पद्धत आढळून येते स्त्रीला त्यात सहभागी करुन घेण्याचे प्रमाण नगण्यच आढळते. परंतु माना आदिवासी जमातीत मात्र पितृसत्ताक पद्धती आढळत असली तरीसुद्धा स्त्रीपुरुष समानता या तत्त्वाचा अवलंब होतांना दिसतो.

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की माना आदिवासी जमातीत पतीपत्नी दोघांनी कौटुंबिक महत्त्वाच्या निर्णयात सहभाग घेणे हे मोठे परिवर्तन आहे असे निदर्शनास येते.

''स्त्रियांच्या स्वास्थ्यावर परिणाम करणाऱ्या सांस्कृतिक प्रमाणकांमध्ये विवाहाकडे पाहण्याचा दृष्टीकोन विवाहासमयीचे वय, कुटुंबातील स्थान, सामाजिक प्रथांनी ठरवून दिलेली स्त्रियांनी करावयाची भुमिका इत्यादी घटकांचा समावेश होतो.''[२८] स्वास्थ विभागाचे असे अध्ययन आहे की, दुर्गम आदिवासी भागात राहणाऱ्या समुदायात स्त्रियांचे बाळंतपण साधारणत: घरीच केले जाते. त्यामुळे बाळंतपणात दगावणाऱ्या माता व अपत्यांच्या मृत्यूचे प्रमाणही अधिक आहे. यावर उपाययोजना म्हणून शासन स्तरावरुन अनेक उपाययोजना केल्या जातात. जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर, विभागीय स्तरावर बाळंतपणाच्या सोयी उपलब झाल्या आहेत. एवढेच नव्हेतर ग्रामीण स्तरावर सुद्धा स्वास्थ परिचारीका'' प्रशिक्षित दायी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. या सर्वांचा माना जमातीचे लोक उपभाग घेतात काय? यासंबंधी स्त्रियांचे बाळंतपण कोठे केले जाते असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे आाहेत.

## सारणी क्र. १९

## उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्रियांचे बाळंतपणाचे ठिकाणदर्शक सारणी.

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | घरीच सुईनद्वारे | ११५ | ५७.५% |
| २ | ग्रामीण रुग्णालयात | ५८ | २९% |
| ३ | खाजगी दवाखान्यात | ०९ | ४.५% |
| ४ | घरीच नर्स किंवा डॅक्टरला बोलावतो. | २ | १% |
| ५ | वेळेवर सुचेल तिथे | १६ | ८% |
| ६ | सांगता येत नाही | ०० | ००% |
| | एकूण | २०० | १००% |

माना जमातीच्या बहुतेक कुटुंबातून स्त्रियांचे बाळंतपण घरीच सुईनद्वारे केल्या जाते. असे ११५(५७.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. ग्रामीण रुग्णालयात बाळंतपण करुन घ्यावे. असे ५८(२९%) उत्तरदात्यांचे मत आहे. परंतु यातील तांत्रिक अडचण अशी की दुर्गम भागात प्रत्येक खेडयात ग्रामीण रुग्णालयाची सोय नाही. त्यामुळे ग्रामीण रुग्णालयाचा लाभ सर्व ग्रामीण लोकांना घेता येत नाही. अशा परिस्थितीत खाजगी डॉक्टरचा आधार घ्यावा लागतो. अशा खाजगी डॉक्टरद्वारे आहे. स्त्रियांचे बाळंतपण करुन घ्यावे लागते असे ९ (४.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर घरीच खाजगी डॉक्टरला किंवा गावातील नर्सला बोलावतो असे म्हणणारे २ (१%) उत्तरदाते आहेत. प्रसंगानुसार जे सोईचे असेल ते केले जाते असे १६ (८%) उत्तरदात्यांचे मत आहे.

शासनस्तरावरुन स्वास्थाच्या कितीही सोई केल्या असल्या तरी ग्रामीण परिसर रहदारीच्या साधनांचा अभाव, घरची आर्थिक परिस्थिती यामुळे शासकिय सुविधांचा लाभ आजही घेता येत नाही. त्यामुळे आदिवासी जमातीतील रुढी परंपरासुद्धा त्यात आडकाठी निर्माण करतात. जसे एका खेडयात एका आदिवासी महिलेचे घरीच

बाळंतपण झाले. बाळांतपणात सुखरुप आटोपले. परंतू तीन दिवसांनी तिचे मूल दगावले बालमृत्यूची नोंद घेण्यासाठी एकात्मीक महिला व बाल कल्याण विभागाचे ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिकारी त्या गावात घरीच घटनेच्या पाहणीसाठी गेले. चौकशीमध्ये वैद्यकिय अधिकाऱ्याने त्या बाईला विचारले की बाळंतपण घरी केले हे ठिक झाले. परंतु निदान त्यानंतर बाळाला रुग्णालयात आणले असते तर ते दगावले नसते. त्यावर ती बाळंतबाई म्हणाली की, ''माझी अजून बाज निघाली नाही. आणि मी दवाखाण्यात कशी जाऊ शकते?'' ही समाजाची प्रथा स्वास्थ संवर्धनात आडकाठी निर्माण करते.

## सारणी क्र. २०

## मुलांच्या संगोपनाच्या जबाबदारीची स्विकार्यदर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वत:पतीने | १ | ०.५% |
| २ | स्वत:पत्नीने | १० | ०५% |
| ३ | दोघांनी मिळून | १८९ | ९४.५% |
| ४ | इतर दुसऱ्याकुणी | ०० | ००% |
| | एकूण | २०० | १००% |

हिंदू समाजाच्या रिती प्रथा, परंपराप्रमाणे स्त्रियांनी चूल व मूल सांभाळावे अशीच धारणा स्त्रियांबद्दल समाजाची झालेली आढळते. परंतु वरील सारणीत आपल्याला ही बाब निदर्शनास येत नाही. माना आदिवासींना 'आपल्या कुटुंबात मुलांच्या संगोपनाची जबाबदारी कुणी स्विकारावी असे तुम्हाला वाटते?' असा प्रश्न केला असता स्वत: पतीने स्विकारावी असे मत नोंदविणारा १(०.५%) उत्तरदाता असून स्वत: पत्नीने जबाबदारी स्विकारावी असे मत १०(५%) उत्तरदात्यांचे आहे. परंतु पती व पत्नी

दोघांनी मिळून कुटुंबातील अपत्यांचे संगोपन करावे. असे १८९ (९४.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे.

यावरुन असे लक्षात येते की, हिंदू कुटुंब पद्धतीप्रमाणे मुलांचे संगोपन आईनेच करावे असे जरी असले तरी माना आदिवासींमध्ये मात्र पती व पत्नी दोघांनीही याबाबतीत समान दर्जा व समान जबाबदारी दिली आहे. हे एक विचारातील परिवर्तन समजावे.

# संदर्भ सूची


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. ८६, |
| | | — | कान्टीनेन्टल प्रकाशन, विजयानगर पुणे. २००३ | ८७ |
| २) | मुकर्जी रविन्द्रनाथ | — | भारतीय समाज व संस्कृती | पृ.१९३ |
| | | — | विवेक प्रकाशन — नविनतम संस्करण २००८ | |
| | | — | जवाहर नगर, दिल्ली. | |
| ३) | डॉ. काळदाते सुधा | — | भारतीय समाजारचना | पृ. २७, |
| | | — | महाराष्ट्र विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ औरंगाबाद. विद्यापीठ— १९७६. | २८ |
| ४) | मुकर्जी रविन्द्रनाथ | — | भारतीय सामाजिक संस्थाएँ | पृ.३१३ |
| | | — | विवेक प्रकाशन जवाहरनगर दिल्ली. १९९५. | |
| ५) | जॉन्सन हेन्री एन. | — | समाजशास्त्र एक विधीवत विवेचन | पृ.२६२ |
| | | — | अनुवादक योगेश अटल. कल्याणी पब्लीकेशन्स, नवी दिल्ली. १९९१ | |
| ६) | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | भारतीय समाज प्रश्न आणि समस्या | पृ.१५४ |
| | | — | पिंपळापुरे अँण्ड कंपनी पब्लीशर्स नागपूर—२००९. | |
| ७) | डॉ. बोबडे प्रकाश | — | भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक | पृ. ९३, |
| | | — | श्री. मंगेश प्रकाशन नागपूर—१९९४. | ९४ |
| ८) | महिपाल | — | हिंदू और हिंदू | पृ. २० |
| | | — | आर.बी. एस.ए. पब्लिशर्स जयपूर २००३. | |
| ९) | Sing Yogendra | — | Social Stratification and Social Change in India | पृ. १७ |
| | | — | Manohar Publication New Delhi-1977. | |
| १०) | आहुजा राम | — | भारतीय सामाजिक व्यवस्था | पृ.११७ |
| | | — | रावत पब्लिकेशन जवाहरनगर, जयपूर — २००४ | |
| ११) | डॉ. गजबे रमेशकुमार | — | Mana Scheduled Tribe | पृ. ५६ |
| | | — | आनंद प्रकाशन नागपूर—२००५ | |
| १२) | सचदेव विद्याभूषण डी. आर. | — | समाजशास्त्र के सिद्धांत | पृ.५०८ |
| | | — | किताबमहल इलाहाबाद—२००९. | |
| १३) | आहुजा राम | — | भारतीय सामाजिक व्यवस्था | पृ.११९ |
| | | — | कित्ता. | |
| १४) | Kapdia –K.M. | — | Marriage and Family in India | पृ.११२ |
| | | — | Oxford university press Bombay. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५) | Ketkar S.V. | — | History of Cast in India | पृ. १५ |
| | | — | Ithaca, New York 1909 | |
| १६) | दोषी एस.एल. | — | भारतीय समाज संरचना और परिवर्तन | पृ.१९४ |
| | जैन पी.सी. | — | नॅशनल पब्लीसींग हाऊस जयपूर —२००२ | |
| १७) | नाटाणी पी.एन. | — | भारत में विवाह व्यवस्था | पृ.१५८ |
| | | — | बुक एनक्लेव जयपूर—२००९ | |
| १८) | डॉ. अनंतराम शरयू | — | सामाजिक संस्था | पृ. ८१ |
| | | — | महाराष्ट्र विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर—१९८१ | |
| १९) | श्री निवास एम.एन. | — | आधुनिक भारत में सामाजिक परिवर्तन | पृ.१३१ |
| | | — | राजकमल प्रकाशन प्रा. लि. नई दिल्ली | |
| २०) | रानडे प्रतिभा | — | स्त्री प्रश्नांची चर्चा | पृ.१७९ |
| | | — | एकोणिसावे शतक | |
| | | — | पॉप्युलर प्रकाशन मुंबई — १९१४. | |
| २१) | मुकर्जी रविन्द्रनाथ | — | भारतीय समाज व संस्कृती | पृ.२२६ |
| | | — | कित्ता | |
| २२) | डॉ. खडसे भा.कि. | — | मांगजात | पृ. ८० |
| | | — | श्री मंगेश प्रकाशन रामदासपेठ नागपूर १९९० | |
| २३) | डॉ. कऱ्हाडे बी.एन. | — | भारतीय समाज प्रश्न आणि समस्या | पृ.२१४ |
| | | — | पिंपळापुरे अॅण्ड कं पब्लिशर्स महल, नागपूर. —२००९ | |
| २४) | डॉ. आगलावे प्रदीप | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ. ९९ |
| | | — | साईनाथ प्रकाशन , नागपूर प्रथमावृत्ती. | |
| | | — | ऑगस्ट— २००४. | |
| २५) | डॉ. आगलावे प्रदीप | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ.१०० |
| | | — | कित्ता. | |
| २६) | डॉ. देशपांडे चंद्रशेखर आणि इतर | — | कुटुंब आणि वैवाहिक समायोजन | पृ. ०२ |
| | | — | यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ नाशिक ऑगस्ट —२००२. | |
| २७) | डॉ. देवगावरकर श.गो. | — | राजकीय समाजशास्त्र | पृ. २८ |
| | | — | मंगेश प्रकाशन नागपूर. | |
| २८) | अनुवादक— अनंतरामशरयू बंडसे उमा | — | भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान पॉप्युलर प्रकाशन मुंबई — १९०९ | पृ.१४० |

## ४.३ शैक्षणिक व धार्मिक व्यवस्था आणि परिवर्तन :

### शैक्षणिक

शिक्षणाला जसे साध्य मानले जाते तसेच त्याच्याकडे अन्य हितावह साध्य गाठण्याचे एक साधन म्हणूनही पाहिले जाते. शिक्षणामुळे व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाच्या व संयुक्तपणे विचार करण्याच्या बौद्धिक शक्तीचा विकास होतो. आर्थिक, राजकिय त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्य पार पाडण्याची पात्रता त्यांच्या अंगी येते आणि त्या अनुषंगाने त्याचा सामाजिक, आर्थिक दर्जा वाढण्याससुद्धा मदत होते. समाजात बदल घडवून आणणे तसेच विकास घडवून आणणे आणि इतरही उद्दिष्ट गाठण्याचे एक प्रमुख साधन म्हणून शिक्षणाचा वापर करता येतो. हे आता सिद्ध झाले. ''शिक्षणामुळेच ऊर्ध्वगामी गतिशिलतेला वाव मिळतो आणि त्या अनुषंगाने विविध सामाजिक स्तरातील माणसांच्या दर्जामध्ये समानता प्रस्थापित करण्यात मदत होते. मानवी हक्काविषयी केल्या गेलेल्या जागतिक ठरावानुसार शिक्षण मिळतो हा प्रत्येक मानवाचा मूलभूत हक्कच आहे असे मानले गेले आहे.''[१]

शिक्षण मानव समाजाकरीता अत्यंत आवश्यक आहे. ढोबळ मानाने शिक्षणाचे दोन उद्देश्य आहेत. १) सार्वजनिक उद्देश्य व २) विशिष्ट उद्देश्य सर्व राष्ट्र आणि सर्व कालखंडामध्ये मानवाचा सर्वांगीण विकास साधणारा शिक्षणाचा समान उद्देश आहे. ''प्राचीन काळापासून आजपर्यंत, पूर्वेकडील राष्ट्रापासून ते पश्चिमेकडील राष्ट्रामध्ये शिक्षणाचा उद्देश्य व्यक्तिमधील विभिन्न योग्यता आणि प्रवृत्तीचा संपूर्ण विकास करणे होय की ज्यामुळे त्या व्यक्तिला व्यक्तिगत आणि समाजिक जीवनामध्ये योग्यरित्या समन्वय साधता येईल. मानवाच्या रचनेत देश, कालपरत्वे बदल होत नाही. त्याचप्रमाणे शिक्षणाचे मूलभूत आणि सार्वजनिक उद्देश सुद्धा स्थिर असतात. उदा. स्वस्थ शरीरामध्ये स्वस्थ मन आवश्यक आहे. हा सिद्धांत सर्वत्र लागू पडतो. सर्व राष्ट्रामध्ये मानसिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षणही आवश्यक मानले जाते.''[२]

चारित्र्य, नैतिकता व शिस्तबद्धता या गुणांचे राष्ट्रीयदृष्टया असणारे महत्त्व वादाचीतच आहे. चारित्र्याहिन व्यक्तींचे राष्ट्र रसातळास गेल्याशिवाय राहू शकत नाही. प्लेटो यांच्या मते, ''मानवी स्वभाव धर्माचा योग्य असा परिपोष करुन चारित्र्य संपन्न नागरिक घडविणे हेच शिक्षणाचे सर्वोच्च उद्दीष्ट आहे.''[३] ''शिक्षणाला समाजाचा आरसा म्हटल्या जाते. समाजातील उलटापालट ही शिक्षणामध्ये प्रतिबिंबीत होणे स्वाभााविक असते. ज्या ठिकाणी असे होत नाही. तेथील विचार अथवा ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये इतर संकटे उद्‌भवतात जगाच्या इतिहासात असे कितीतरी वेळा पाहायला मिळाले की जेव्हा जेव्हा कोणताही समाज किंवा राष्ट्रामध्ये क्रांती, युद्ध अथवा नवीन अपेक्षित बदल घडून आले तेव्हा शिक्षणाची उद्दष्टये आणि कार्यक्रमावर त्या घटाकांचा प्रभाव जाणवतो.[४]

''कोणत्याही राष्ट्रामध्ये नवीन शोध आणि संशोधनासाठी शिक्षण आवश्यक आहे. देशाच्या आर्थिक नियोजनामध्ये कुशल प्रशासक, योग्य वैज्ञानिक कारागीर, प्रशिक्षित शिक्षक आणि विविध व्यवसाया करीता कुशल व्यक्तिची मोठया संख्येने आवश्यकता असते.''[५] शिक्षण हे आधुनिकीकरणाचे एक महत्त्वाचे साधन आहे. पारंपारिक दृष्टया शिक्षणाचा विषय आाध्यात्मिक आणि गुढ गुंजनात्मक होता. विचारांचे दळणवळण हे वरच्या वर्गापुरते मर्यादित होते आणि व्यवसायिक संघटनेची रचना पारंपारिक होती. आधुनिक शिक्षणाचा उद्देश पुर्णवेळ वेगळा असतो. त्याचा आशय उदारमंतवादी व वैश्विक असतो. शिक्षणाचा दृष्टीकोन विज्ञानवादी आहे. ''आधुनिक शिक्षणामध्ये समता, स्वातंत्र्य, मानवता आणि अंद्धश्रद्धा निर्मूलन यांचा समावेश होतो. कोणीही कष्ट करुन हे शिक्षण प्राप्त करु शकतो. आधुनिक शिक्षणाच्या काही शाखांनी (उदा. विज्ञान, शिक्षणस्थापत्य, वैद्यकिय) जागतिक दृष्टीकोनावर लक्ष केंद्रीत केले. आधुनिकीकरणाची ही महत्त्वाची मूल्ये आहेत. आधुनिक समाजाची निर्मिती करण्यासाठी हे शिक्षण आवश्यक ते कौशल्य निर्माण करु शकते.''[६]

भारतात शिक्षणाची परंपरा अगदी प्राचीन काळापासून आहे. ज्ञानार्जन व विद्यादान हया दोन्ही गोष्टी आपल्याकडे महत्त्वाच्या मानल्या गेल्या आहेत. अजूनही त्या

तशाच मानल्या जातात. स्वाई यांच्या मते,'' शिक्षण हे अनेक व्यवसाय प्रवेशांची पूर्वावश्यकता असून, सामाजिक, आर्थिक, अधिकारयुक्त मोबदला देणाऱ्या स्वत:ला व्यवसायात झोकून देण्याकरीता शिक्षण आणि व्यवसायिक प्रशिक्षण परिणामकारक असते. उद्योग व्यवसायातील उन्नती आणि उदग्र गतिशिलता ही सातत्याने शिक्षणातील वाढ, ज्ञान आणि प्रशिक्षण सुचक असून हा उपाय योग्यता आणि व्यावसायिक संपादणूक यांच्यातील सहसंबंध दर्शविणारा आहे.''[७]

''स्तरीकरण सिद्धांताच्या दृष्टीकोनानुसार शिक्षण हे सामाजिक गतीशिलतेमधील अडथळे दूर करते. वर्गिय स्तर आणि वर्ग संरचना त्याकरीता शिक्षण एकप्रवाही मान्य विचारात घेण्यायोग्य आहे. हा संदर्भ लक्षात घेवून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आदिवासी तरुण तरुणींना स्वत:च्या पायावर सक्षमपणे राहता यावे यासाठी त्यांना व्यवसायशिक्षणाचे प्रशिक्षण देण्यात येते. मुलींना हवाईसुंदरीचे शिक्षण देण्यात येते. २००५—२००६ मध्ये १०० आदिवासी मुलींना हवाईसुंदरीचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे स्वप्नवत वाटणारी गोष्ट प्रयत्यक्षात साकार होत आहे.''[८]

याच पार्श्वभूमीवर अध्ययन क्षेत्र असलेल्या माना जमातीतील शिक्षणाचे प्रमाण जाणून घेण्यासाठी शिक्षणविषयक प्रश्न विचारण्यात आला.

## सारणी क्र. १

## उत्तरदात्याच्या शिक्षणाची स्थितीदर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | ६३ | ३१.५% |
| २ | प्राथमिक | ६६ | ३३% |
| ३ | माध्यमिक | ४४ | २२% |
| ४ | उच्चमाध्यमिक | १८ | ९% |
| ५ | पदवी व पदव्युत्तर | ९ | ४.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

संपूर्ण भारतीय समाजात शिक्षणाचे प्रमाण जे कमी दिसते त्यातील बहुतेक आदिवासींचे असते. याला माना ही आदिवासी जमात सुद्धा अपवाद नाही. वरील सारणीमध्ये ६३ (३१.५%) उत्तरदाते हे निरक्षर आहेत. ६६ (३३%) उत्तरदाते हे केवळ प्राथमिक शिक्षण शिकलेले आहेत. ४४ (२२%) उत्तरदाते हे माध्यमिक शिक्षण घेतलेले आहेत. उच्च माध्यमिक १८ (९%) तर पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणारे केवळ ९ (४.५%) उत्तरदाते आहेत.

वर सांगितल्याप्रमाणे एकूण लोकसंख्येत निरक्षरतेचे प्रमाण वाढविण्यात आदिवासी जमाती हयाच प्रमुख आहेत. निरक्षरता आणि विकास हयांचे व्यस्त प्रमाण असते. वरील सारणीवरुन माना जमातीची शिक्षणविषयक स्थिती त्यांच्या आर्थिक मागासलेपणा व निकृष्ठ सामाजिक दर्जा विशद करण्यास पुरेसा व बोलका आहे.

शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी व शैक्षणिक प्रगती विशद करण्यासाठी दोन पिढयांतील शैक्षणिक आढावा घेणे संयुक्तिक ठरते. त्याच दृष्टीने उत्तरदात्यांना त्यांच्या स्वत:च्या शिक्षणासोबतच त्यांच्या वडीलांचे शिक्षण काय होते? असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्यची वारंवारीता पुढील सारणीत दर्शविलेली आहे.

## सारणी क्र. २

## उत्तरदात्यांच्या वडीलांच्या शिक्षणाची स्थितीदर्शक सारणी


| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | १८२ | ९१% |
| २ | प्राथमिक | १५ | ७.५% |
| ३ | माध्यमिक | ०३ | १.५% |
| ४ | उच्चमाध्यमिक | ०० | ००% |
| ५ | पदवी व पदव्युत्तर | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

सारणी क्र. १ मध्ये उत्तरदात्यांच्या निरक्षरांची संख्या ६३ (३१.५%) होती. तर सारणी क्र. २ मध्ये उत्तरदात्यांच्या वडीलांच्या निरक्षरतेची संख्या १८२ (९१%), तर प्राथमिक शिक्षण घेतलेल्यांची संख्या केवळ १५ (७.५%) होती. उच्च माध्यमिक शिकलेली एकही व्यक्ति उत्तरदात्यांच्या वडिलांमध्ये नव्हती परंतु उच्चमाध्यमिक तसेच पदवी व त्यासमोरचे शिक्षण घेणारे २७ (१३.५%) उत्तरदाते आहेत. यावरुन दोन पिढीतील शिक्षणात झालेली प्रगती निदर्शनास येते. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हे एकमात्र मूलभूत साधन माध्यम आहे. विद्येविना मानवी जीवनातील अर्थहिनता व व्यर्थता भारतीय समाजातील पूर्वीच्या पिढीत दिसून येत होती. परंतु आज माना समाजांनी शिक्षणाची कास धरली व तो सुद्धा इतर समाजाच्या पाठोपाठ प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे हे वरील सारणीवरुन निष्पण होते.

निरक्षरता आणि अज्ञान या गोष्टी व्यक्तिच्या तसेच राष्ट्राच्या विकासाच्या आड येतात.''[९] हे लक्षात घेऊन समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी व समाजसुधारणेसाठी महात्मा ज्योतिबा फुले तसेच कोल्हापूरचे राजे राजर्षी शाहू महाराज देशाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे, वि.रा. शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी

लोकांनी शिक्षणाचा मार्ग सुपीक केला आणि समाजविकासाला खऱ्या अर्थाने चालना दिली. अशा परिस्थितीत सध्याच्या स्थितीत उत्तरदात्यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन जाणून घेण्यासाठी शिक्षण घेतल्यामुळे आपल्या आचारविचारात बदल होतो आहे. या मताशी आपण सहमत आहात काय? असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याची वारंवारीता पुढीलप्रमाणे आहे.

### उत्तरदात्यांच्या आणि त्यांच्या वडीलांच्या शिक्षणाचा तुलनात्मक आलेख




### सारणी क्र. ३

### शिक्षणामुळे उत्तरदात्यांच्या मते आचार विचारात होणारा बदलदर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पूर्णत: सहमत | ५५ | २७.५% |
| २ | अंशत: सहमत | ८२ | ४१% |
| ३ | टसहमत | २४ | १२% |
| ४ | सांगता येत नाही. | ३९ | १९.५% |

| | एकूण | २०० | १००% |
|---|---|---|---|

वरील सारणीचे अवलोकन केल्यास शिक्षण घेतल्यामुळे आपल्या आचारविचारात निश्चितच बदल होतो. या मताशी सहमत असलेले ५५ (२७.५%) उत्तरदाते आहेत. अंशतः सहमत असलेले ८२ (४१%) उत्तरदाते आहेत. वरील उत्तरदात्यांचा शिक्षणविषयक असलेला सकारात्मक दृष्टीकोन त्यांच्यासमोर विकासाचा मार्ग चोखाळणारा दिसतो. याउलट शिक्षण घेतल्यामुळे आपल्याला आचार विचारात बदल होतो. या मताशी असहमत असणारे २४ (१२%) उत्तरदाते असून ती साधारणतः अशिक्षित, वयोवृद्ध व परंपरागत विचारांचे उत्तरदाते आहेत. त्यांचा हा विचार विकासासाठी प्रतिगामी स्वरुपाचा ठरतो. सांगता येत नाही असे म्हणणारे ३९ (१९.५%) उत्तरदाते असून ते या संदर्भात तटस्थेची भूमिका घेतांना दिसतात.

माना जमातीत  असे काही युवक आहेत की जे शिक्षणात प्राविण्य मिळवून उच्च पदावर जाऊ शकत नाहीत आणि अर्धवट शिकलेले म्हणून परंपरागत शेतीसारखा व्यवसाय करण्याशिवाय त्यांच्याजवळ पर्याय नाही अशा युवक वर्गाची एक खंत म्हणून तटस्थ उत्तरदात्यांची प्रतिक्रिया आहे.

## सारणी क्र. ४

## उत्तरदात्यांच्या मते शिक्षणामुळे झालेला बदल दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | राहणीमान उंचावले | २० | १०% |
| २ | विचार सारणीत बदल झाला | ४१ | २०.५% |
| ३ | आर्थिक बाबतीत बदल झाला | १० | ५% |
| ४ | वरील सर्वच बदल झाले. | ३३ | १६.५% |
| ५ | कोणताच बदल झाला नाही | ९६ | ४८% |

| | | | |
|---|---|---|---|
| | **एकूण** | २०० | **१००%** |

वरील सारणीत उत्तरदात्यांचा शिक्षणामुळे अनुभवलेला बदल दर्शविण्यात आला आहे. शिक्षणामुळे राहणीमान उंचावले व त्यामुळे सामाजिक दर्जा उंचावला असे २० (१०%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर विचारसरणीत बदल झाला असे ४१ (२०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. यावरुन त्यांच्या राहणीमानात फार बदल झाला नसला तरी आता याबाबतीत विचारप्रवण झालेला आहे. ही मात्र परिवर्तनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची बाब ठरते. आर्थिक बाबतीत बदल झाला असे १० (५%) उत्तरदात्यांचे मत आहे. हा बदल फार नजरेत बसण्यासारखा नसला तरी दारिद्रयरेषेखाली जगणाऱ्या लोकांसाठी शासनाकडून ज्या विविध योजना राबविल्या जातात त्यातून लाभान्वित झालेले व स्वत:च्या बचतीतून आपला आर्थिक दर्जा उंचावण्याची अभिलाषा बाळगणारे उत्तरदाते या प्रवर्गात मोडतात. वरीलपैकी सर्वच बाबतीत बदल झाले असे ३३ (१६.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. म्हणजे शिक्षणातून सर्वांगीण विकास साधला जातो. अशी धारणा बाळगणारे उत्तरदाते सर्वच बाबतीत बदल झाला असे सांगतात. तर कोणताच बदल झाला नाही. असे सांगणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ९६ (४८%) असून ही संख्यासुद्धा बरीच मोठी आहे. सर्वच स्तरातून शिक्षणामुळे परिवर्तन घडून येते हे सर्वश्रृत असले तरी माना जमातीतील लोकांची परिस्थिती मात्र त्याला उपवाद आहे. असे संशोधनकर्तीच्या निदर्शनास आले.

आधुनिक काळात भारतीय संविधानाने समतेचे तत्त्व स्विकारले. त्यामुळे स्त्रीपुरुष असा लिंगभेद न मानता शिक्षणाच्या बाबतीत सर्वांना समान संधी दिलेली आहे अशा परिस्थितीत माना जमातीमध्ये स्त्रीपुरुषांच्या बाबतीत शिक्षणविषयक मते जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## सारणी क्र. ५

## मुलामुलींना शिक्षणाची समान संधी मिळावी याबाबतीत उत्तरदात्यांचे अभिमत दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | समान संधी मिळाली पाहीजे | १९४ | ९७% |
| २ | मुली शिकून वडीलांना उपयोग नाही | ०१ | ०.५% |
| ३ | मुली शिकल्यास त्यांना चांगला वर शोधणे कठीण जाईल | २ | १% |
| ४ | यापेक्षा वेगळे उत्तर | ३ | १.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीत उत्तरदात्यांच्या मुलामुलींच्या बाबतीत शिक्षणविषयक अभिमत जाणून घेण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यानुसार मुलगा मुलगी असा भेद न मानता दोघांनाही समान संधी मिळाली पाहिजे असे महत्तम १९४ (९७%) उत्तरदात्यांचे मत आहे. ही बाब माना जमातीतील शिक्षणविषयक अभिलाषा व्यक्त करणारी बाब ठरते. हे या जमातीतील मोठे परिवर्तन म्हणावे लागेल. मुलगी शिकून उपयोग काय? असे १(०. ५%) उत्तरदात्याचे मत आहे. मुलगी शिकली तर तिला वर शोधणे कठीण जाईल असे २(१%) उत्तरदात्यांना वाटते असा प्रतिगामी विचार मांडणारे ३(१.५%) उत्तरदाते असले तरी त्यांची संख्या मात्र अपवादात्मकच समजावी लागेल. यापेक्षा वेगळे उत्तर देणारे ३(१.५%) उत्तरदाते असून त्यांनीही वेगवेगळी कारणे विशद केली आहेत. वर शोधायला कठीण जाणे व शिकलेल्या मुली हाताबाहेर जाणे अशी विविध कारणे सांगितलेली आहेत. परंतु त्यांची संख्या मात्र फारच कमी आहे.

## सारणी क्र.६

## मुलींना उच्चशिक्षणासाठी बाहेरगावी पाठविण्याबाबत पालकांचे मतदर्शक सारणी.

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पाठविण्यास हरकत नाही. | १९३ | ९६.५% |
| २ | मुलींनी दूर शहरात राहू नये | ०१ | ०.५% |
| ३ | मुंलीनी गावातील अथचा गावाशेजारील शाळेत जेवढे मिळेल तेवढेच शिक्षण घ्यावे. | ०४ | ०२% |
| ४ | हयापेक्षा वेगळे उत्तर | ०२ | ०१% |
| **एकूण** | | **२००** | **१००%** |

कायदयाने स्त्रीपुरूष समानता असा निकष मान्य केला असला तरी भारतीय पुरूष प्रधान हिंदू संस्कृतीचा पगडा अजूनही ओसरलेला नाही. हयाच पार्श्वभूमीवर मुलींना उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी पाठविण्यास पालकाची सहमती जाणून घेण्याचा वरील सारणीत प्रयत्न करण्यात आला. गावातील शिक्षण आटोपल्यावर पुढच्या शिक्षणासाठी बाहेरगावी पाठविण्यास हरकत नाही असे महत्तम १९३ (९६.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. ही माना जमातीतील मुलींच्या शिक्षणाविषयीची उत्कट अभिलाषा दर्शविते. हे या जमातीच्या विचारातील मोठे परिवर्तन म्हणावे लागेल. मुलींना दूर शहरात शिक्षणासाठी पाठवू नये असे ०१(०.५%) उत्तरदात्याचे मत असून बाहेर पाठविल्यास शहरी संस्कृतीचे दोष त्याच्या विचारातून व्यक्त होतांना दिसतात. मुलींनी गावातील अथवा पंचक्रोशीतील शाळांमध्येच शिक्षण घ्यावे शहरात जाण्याची अभिलाषा बाळगू नये असे ०४(२%) उत्तरदात्यांचे मत आहे. शहरी संस्कृतीविषयी आपण जे ऐकतो ते आपल्या दारापर्यंत येऊ नये असा भितीयुक्त सावधानतेचा इशारा या उत्तरदात्यांच्या उत्तरातून प्रत्ययास येतो. यापेक्षा वेगळे उत्तर देणारे ०२(१%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते उच्च शिक्षण घेऊनही मुलींना उपयोग नाही. नोकरी लागत नाही.

त्यामुळे त्यांनी गावातच लिहीण्यावाचण्यापुरते शिक्षण घ्यावे असा निराशावादी विचार त्यांना व्यक्त केला.

शिक्षणाच्या संदर्भात रामनाथ शर्मा लिहितात, की, ''व्यक्ति स्वतःचा आणि आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करू शकत नाही तसेच कुटुंबाच्या सर्वसाधारण गरजा पूर्ण करू शकत नाही असे शिक्षण मग ते कितीही आध्यात्मिक असले तरी व्यर्थ आहे. अर्थात त्यात जिविकोपार्जन शिक्षण आवश्यक आहे.''[१०] शिक्षणात अग्रेसर असूनही त्या शिक्षणातून स्वतःचा विकास साधता आला नाही तर त्या शिक्षणाला अर्थ उरत नाही. शिक्षणाने दृष्टी फाकते. रूढी परंपरागत विचार मागे पडून व्यक्ति विज्ञानवादाकडे झेपावतो. भांडारकर व वैदय यांच्या मते, '' वर्तमान युग हे गतिमान युग असून या युगात काळाच्या गरजांप्रमाणे व्यक्तिंच्या आचार विचारांमध्ये द्रुतगतीने व सतत बदल घडून येत राहणे आवश्यक आहे. म्हणूनच बदलत्या कालमान स्थितीस अनुरूप ठरेल असे लवचिक व गत्यात्मक व्यक्तिमत्व नियोजित शिक्षणाच्या माध्यमाद्वारेच निर्माण होणे शक्य आहे.''[११] अशा परिस्थितीत माना जमातीतील युवक वर्ग परंपरातून बाहेर निघून शिक्षणाची ओढ जोपासली आहे काय? हे पाहण्याच्या दृष्टीने शिकलेली मुले मुली रूढीपरंपरांना मानतात काय? असा एक प्रश्न विचारण्यात आला त्यांची वारंवारीता पुढील सारणीत दर्शविली आहे.

**सारणी क्र. ७**

**शिकलेल्या मुलामुलीतील रूढीपरंपरा आणि शिक्षण यांचे संबंधदर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | १०७ | ५२.५% |
| २ | नही | १७ | ८.५% |
| ३ | कधीकधी मानतात | ७७ | ३८.५% |
| ४ | सांगता येत नाही | ०१ | ०.५% |

| | | |
|---|---|---|
| **एकूण** | **२००** | **१००** |

वरील सारणीत शिकलेली मुलेमुली रूढींपरंपरांना मानतात काय? या प्रश्नासाठी १०७ (५२.५%) उत्तरदात्यांनी होय असे उत्तर दिले. याचाच अर्थ औपचारीक शिक्षणात माना जमातीचे प्रमाण बरेच वाढले असले तरी ते परंपरेतून बाहेर निघाले नाही असे निदर्शनास येते. 'नाही' असे उत्तर देणारे केवळ १७ (८.५%) उत्तरदाते असून असे विचार व्यक्त करणारे प्रगतीपथावरील उत्तरदाते होते. संकटाच्या वेळी देव आठवतो अशी ग्रामीण भागात एक म्हणआहे. शिकलेली मुले स्वत:ला पुरोगामी समजत असले तरी त्यांच्या पंरपरावरचा विश्वास संपलेला नाही, असे ७७ (३८.५%) कधी कधी मानतात असे उत्तर देणाऱ्यांची संख्या दिसते. तर सांगता येत नाही असे तटस्थ उत्तर देणारी ०१ (०.५%) उत्तरदाता आहे.

आदिवासी जमातीचा सर्वांगीण विकास व्हावा व आदिवासी समाज इतर समाजाबरोबर विकसित व्हावा हया दृष्टीकोणातून अनुसूचित जातीजमातीसाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना लागू केल्या आहेत. अनुसूचित जमाती कल्याण समितीद्वारे त्यांच्या विकासासंदर्भात अहवाल शासनाला सादर केल्या जातो.

''न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी घेण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अंमल बजावणी संबंधीचा अहवाल अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १९ एप्रिल १९८८ रोजी विधानसभा विधानपरिषदेला सादर केला. अनुसूचित जमाती कल्याणसमितीने शासनाला पुढीलप्रमाणे शिफारशी केल्यात.''[१२]

१) शासनाने आदिवासी लोकांना असलेल्या योजनांचा जास्तीत जास्त फायदा घेण्याच्या दृष्टीने योग्य व आवश्यक कर्मचारी वर्ग वाढवावा जेणेकरून शासनाकडे असलेल्या सर्व योजनांचा फायदा आदिवासी लोकांना पुरेपुर व वेळेवर मिळू शकेल.

२) आदिवासी उमेदवारांना न्युक्लिअस बजेटच्या योजनेखाली फायदा मिळवून देतांना त्यांना कायमचा स्वयंरोजगार कसा मिळेल. या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने न्युक्लिअस बजेटमध्ये काही महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास महामंडळाने शासनाकडून अनुशेष भरण्याची परवानगी दिल्याबरोबर अनुसूचित जमातीचा असणारा अनुशेष पूर्णपणे भरून काढावा. तसेच शासनाने व अनुशेष भरून काढण्यासाठी नोकरीभरतीसाठी त्वरीत परवानगी दयावी.

३) आदिवासी क्षेत्रातील कामाकरीता शासनाने प्राधान्याने तुलनात्मक दृष्टया अधिक निधींची तरतूद करावी आणि त्यातून रस्त्यांची कामे करण्याचा प्रयत्न करावा.

आदिवासी योजनांचा माना जमातीतील लोक फायदा करून घेतात हे जाणून घेण्यासाठी आपल्याला स्वत: किंवा घरातील व्यक्तिच्या शिक्षणासाठी आरक्षणाचा फायदा झाला आहे काय? असा एक प्रश्न विचारला, त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र.८**

**कुटुंबसदस्यांना शिक्षणासाठी आरक्षणाचा फायदादर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | १८ | ०९% |
| २ | नही | १७४ | ८७% |
| ३ | अंशत: झाला | ०४ | ०२% |
| ४ | सांगता येत नाही | ०४ | २% |
| **एकूण** | | **२००** | **१००** |

वरील सारणीत उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्यांना शिक्षणासाठी आरक्षणाचा फायदा कसा झाला हे दर्शविले आहे. त्यात शिक्षणासाठी आरक्षणाला

फायदा झाला असे केवळ १८(०९%) उत्तरदाते 'होय' असे उत्तर देतात तर महत्तम १७४ (८७%) उत्तरदाते आरक्षणाचा फायदा शिक्षणासाठी झालाच नाही असे मत नोंदवतात एकीकडे शासनाने आदिवासी प्रवर्गातील लोकांना शैक्षणिक प्रगतीसाठी बऱ्याच सवलती व आरक्षण दिले. तरीही १७४ माना आदिवासी आरक्षणाचा फायदा शिक्षणासाठी मिळालाच नाही असे सांगतात ही बाब प्रथमदर्शनी विरोधाभास दर्शविणारी दिसते. परंतु त्याचे मुख्य कारण असे की, '' गोंडमाना या नावाने पूर्वी त्यांना अनुसूचित जमातीत आरक्षणाचा लाभ देण्यात येत होता. परंतु अशी कोणतीही मानांची पोटजात अस्तित्त्वात दिसत नाही. गोंड आणि माना हे जंगलात राहणारे आणि जुने रहिवासी असल्याने काही साधर्म्य आढळले तरीते भिन्न आहेत. मात्र अनुसूचित जमात आदिवासी म्हणून भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आता 'माना' याच नावाने त्यांना आरक्षणाची मान्यता मिळाली आहे. (संदर्भ महाराष्ट्र राज्य विरूध्द मिलिंद आणि इतर सर्वोच्च न्यायालय म.हा.१ लॉ जर्नल २००१ (१) आणि माना आदिम जाती मंडळ विरूध्द महाराष्ट्र राज्य रिट पिटीशन क्र. ९५९ ऑफ २००२ बॉम्बे हायकोर्ट) शासनाच्या अनुसूचित जमातीच्या यादीत क्रमांक–१८ वर ज्या जाती आहेत त्यात माना ही जात आहे.[१३] अशा परिस्थितीत त्यांना जातीचे प्रमाणपत्र जाती पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी अडचणी व विलंब लागतो आहे. त्यामुळे त्यांना आरक्षणाचा लाभ पाहिजे त्या प्रमाणात घेता आला नाही. आरक्षणाचा अंशत: फायदा झाला असे ०४ (२%) उत्तरदात्यांचे मत आहे. हे मत मुलांना मिळालेल्या शिष्यवृत्ती पुरतेच मर्यादित आहे. तर सांगता येत नाही असे ०४(०२%) उत्तरदाते आपले मत नोंदवितात.

एकंदरीत माना ही जमात अनुसूचित जमातीच्या यादीत असली तरी मध्यंतरीच्या त्यांच्या जमाती असल्याच्या बाबीवर हरकती घेतल्यामुळे व काहीकाळ त्यांना 'विशेषमागास प्रवर्गात' अंतर्भूत केल्यामुळे त्यांना न्यायालयीन लढा दयावा लागला. तोपर्यत त्यांना जमातीच्या सवलतीचा फायदा घेता आला नाही.

सदयपरिस्थितीतही त्यांना पूर्वी काढलेल्या इंग्रजीतील जात प्रमाणपत्रांना मराठी भाषेत करून घ्या असा आदेश देण्यात आला. त्याचप्रमाणे शिष्यवृत्तीसाठी लागणारी कागदपत्रे ऐन शेतीच्या हंगामाच्या वेळीच शाळांद्वारे (शासनाद्वारे) मागविण्यात येतात. यासर्व बाबींमुळे सुध्दा शिक्षणासाठी आरक्षणाचा फायदा घेता आला नाही. आणि जेव्हा हया सवलती मिळायला सुरूवात झाली तेव्हा मात्र विलंबामुळे हया जमातीला आरक्षणाचा विशेष फायदा झाल्याचे दिसून येत नाही.

आदिवासी जमाती हया विकासाच्या प्रक्रियेत सगळयात शेवटचा घटक म्हणून मानले जाते. त्यांना जर विकासाच्या प्रक्रियेत ओढून घ्यायचे असेल तर त्यांना अधिकच्या सवलती अथवा मदतीचा हात देणे गरजेचे आहे. ही बाब शासनाने स्विकारली व त्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी शिष्यवृत्ती सारख्या योजना सुरू केल्या याचा लाभ प्रत्यक्षात किती मिळतो हे जाणून घेण्यासाठी आपण स्वत:साठी किंवा कुटुंबातील इतरांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती घेतली आहे काय? असा एक प्रश्न विचारण्यात आला? त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र.९**

**उत्तरदात्यांची स्वत: अथवा कुटुंबातील इतर व्यक्तिंसाठी**

**घेतलेल्या शिष्यवृत्तींचा लाभदर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ६६ | ३३% |
| २ | नही | १३४ | ६७% |
| ३ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ०० |
| **एकूण** | | **२००** | **१००** |

बुडत्याला काठीच आधार या म्हणीप्रमाणे शिक्षणात मागे पडलेल्या आदिम जमातीच्या या घटकाला शासनाने शिष्यवृत्तीचा आधार दिला आहे. भारत

सरकारच्या शिष्यवृत्तीने लाभान्वित होणारे ६६ (३३%) उत्तरदाते 'होय' असे उत्तर देतात. तर १३४ (६७%) मात्र शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतल्याचे दिसून येत नाही. यावरून हळूहळू जागृतीच्या पातळीवर येऊन शासकिय शिष्यवृत्तीचा लाभ घेण्याकडे माना जमातीच्या लोकांचा कल वाढत आहे. पुर्वी शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या लाभार्थीची संख्या मर्यादित असली तरी आता त्यांची संख्या वाढत आहे ही बाब परिवर्तनाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

''शिक्षणामुळे आधुनिकीकरणाला चालना देणाऱ्या घटकांमध्ये शिक्षणाचा समावेश अपरिहार्य आहे. शिक्षणाने व्यक्तिच्या मनात आकांक्षा निर्माण केल्या जातात. नवीन जीवनशैलीचे आकर्षण वाटू लागते. विवेकवाद जागृत होतो. परंपरावादी अभिवृत्तींची जागा आधुनिकतेशी नाते जोडणाऱ्या अभिवृत्ती घेतात.''[१४] चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी जमातीतील वेगवेगळया जनगणना अहवालातील शैक्षणिक संदर्भ लक्षात घेतल्यास एकंदरीतच हा समाज आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेपासून कित्येक मैल मागे असल्याचे लक्षात येते. तद्वतच शिक्षणाचा उपयोग केवळ नोकरी मिळविण्यापुरताच आहे असा संकुचित अर्थ त्यांना अभिप्रेत आहे. याबाबतचे मत जाणून घेण्यासाठी आपल्या स्वत:साठी किंवा घरातील इतर सदस्यांसाठी शिक्षणाचा उपयोग नोकरी मिळविण्यासाठी झाला काय? असा प्रश्न विचारण्यात आला त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र. १०**

**शिक्षणाचा उपयोग नोकरी मिळविण्यासाठी झाला काय?**

**उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियादर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २४ | १२% |
| २ | नही | १७५ | ८७.५% |
| ३ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०१ | ०.५% |

| **एकूण** | **२००** | **१००** |
|---|---|---|

आदिवासी जमातीच्या आर्थिक हितसंबंधाच्या संरक्षणासाठी सरकारी सेवा म्हणजे केंद्रीय लोकसेवा आयोग, प्रादेशिक लोकसेवा आयोग मंडळे व इतर क्षेत्रात ७% राखीव जागांचा प्रबंध करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षणाचा उपयोग नोकरी लागण्यासाठी झाला काय? यावर २४ (१२%) उत्तरदाते 'होय' असे उत्तर देतात. तर 'नाही' असे उत्तर देणारे १७५ (७७.५%) उत्तरदाते आहेत. ही उत्तरदात्यांची संख्या फार मोठी आहे. कारण नोकरीची पूर्व अट शिक्षण हिच आहे आणि माना जमातीत शिक्षणाचे प्रमाणच कमी असल्यामुळे अशिक्षित अथवा अल्पशिक्षित व्यक्ति नोकरीची अपेक्षा बाळगू शकत नाही. म्हणूनच शिक्षणाचा उपयोग नोकरीसाठी झाला असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण कमी असले तरी ०१(०.५%) उत्तरदाता मात्र त्याला अपवाद आहे. अनुकंपा तत्त्वावर नोकरीला लागल्यामुळे या निकषामध्ये आपण बसत नाही असे त्याचे मत आहे.

''महाराष्ट्र राज्यातील आरक्षण तरतूदीनुसार राज्यशासनाच्या नोकरीमध्ये अनुसूचित जातींना १३% अनुसूचित जमातींना ०६–०७, विमुक्त जाती (अ) ३% भटक्या–जमाती (ब) २.५% भटक्या जमाती (क) (धनगर व तत्सम ३.५% भटक्या जमाती (ड) (वंजारी व तत्सम) २.०%, विशेष मागास प्रवर्ग २.०%, इतर मागासवर्ग (O.B.C.) १९.०% असे एकूण ५२% नोकऱ्या आरक्षित ठेवल्या आहेत. ५०% पेक्षा जास्त आरक्षण असू नये असे तत्व असतांनाही महाराष्ट्र सरकारने ५२% आरक्षण ठेवून आपले पुरोगामित्त्व व कायम ठेवले आहे. नोकऱ्यातील आरक्षणामुळे दुर्गम व मागासवर्गीय लोक मोठया पदावर कार्यरत आहेत.''[१५] याच पार्श्वभूमीवर आपल्याला अथवा आपल्या कुटुंबातील सदस्याला नोकरी असल्यास कोणत्या आधारावर नोकरी मिळाली? असा एक प्रश्न विचारला असता पुढील प्रतिक्रिया प्राप्त झाल्या.

## सारणी क्र. ११

### उत्तरदात्यांना नोकरी असल्यास ते मिळविण्याचे निकष दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गुणात्मक दर्जा चांगला असल्यामुळे | १३ | ६.५% |
| २ | वशीला लावल्यामुळे | ०३ | १.५% |
| ३ | पैसे खर्च केल्यामुळे | ०२ | १.००% |
| ४ | अनुकंपामुळे | ०५ | २.५% |
| ५ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ०० |
| ६ | लागू पडत नाही | १७७ | ८८.५% |
| **एकूण** | | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास गुणात्मक दर्जा चांगला असल्यामुळे नोकरी मिळाली असे १३(६.५%) उत्तरदात्यांना वाटते. ही संख्या कमी असली तरी नोकरीच्या सनदशीर मार्गाचा अवलंब करून ती मिळविण्यात आली. याचा एक आनंद सांगितल्याचा अनुभव संशोधिकेला आला. वशिला लावल्यामुळे ०३(१.५%) उत्तरदात्यांनी नोकरी मिळाली असे मान्य केले. पैसे खर्च केल्यामुळे नोकरी मिळाली असे ०२(१%) उत्तरदाते प्रामाणिकपणे कबूल करतात. अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळाली असे ०५(२.५%) उत्तरदात्यांना वाटते तर १७७(८८.५%) उत्तरदाते की ज्यांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना नोकरीच मिळाली नाही ही बाब सुध्दा माना जमातीतील आदिवासी लोकांचे शैक्षणिक प्रमाण कमी असणे व नोकरीची संधी न मिळणे हे त्यांचा मागासलेपणा कायम ठेवणारे घटक ठरतात.

## सारणी क्र. १२

## उततरदात्यांच्या कुटुंबातील सदस्यांना व्यवसाय व नोकरीसाठी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा फायदा दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | ०५% |
| २ | नही | १८६ | ९३% |
| ३ | अंशत: मिळाला | ०२ | ०१% |
| ४ | आरक्षणाचा फायदा मिळूनही पैसे खर्च करावे लागेल | ०१ | ०.५% |
| ५ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०१ | ०.५% |
| **एकूण** | | **२००** | **१००%** |

वरील सारणीत उत्तरदात्यांना त्यांचे व्यवसाय व नोकरीसाठी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा फायदा मिळाला आहे असे १०(०५%) उत्तरदात्यांना वाटते. तर व्यवसाय व नोकरीसाठी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा कोणताच फायदा आपल्याला मिळाला नाही असे १८६ (९३%) उत्तरदात्यांना वाटते. ही उत्तरदात्यांची संख्या महत्तम असून त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाणच अत्यल्प असल्यामुळे नोकरीमध्ये अत्यल्प प्रमाण असणे स्वाभाविक आहे. अशंत: लाभ मिळाला असे ०२(१%) उत्तरदाते सांगतात. तर ०१ (०.५%) उत्तरदाता आरक्षणाचा फायदा मिळूनही पैसे खर्च करावे लागले अशी खंत व्यक्त करतात. तर यापेक्षा वेगळे  उत्तर ०१(०.५%) उत्तरदात्याने दिले.

**धार्मिक :**

भारतीय ग्रामीण, आदिवासी समाजजीवनात धर्माचा फार मोठा प्रभाव आहे. त्यांचे भावनात्मक बौध्दीक दैनंदिन जीवन धर्माशीच निगडित असते. त्यांचे

कौटुंबिक जीवन, सामाजिक व आर्थिक जीवन, जातीचे व्यवहार, त्यांच्या मनोरंजनाच्या कल्पना धर्मातत्त्वाला अनुसरूनच असतात. एवढेच नव्हे तर त्यांच्या शिल्पकला, चित्रकला, लोकगिते, नृत्य, नाटक व इतर सामाजिक सोहळे धर्मश्रध्देला अनुषंगिकच असतात अर्थात आदिवासींचे संपूर्ण जीवन धर्ममय झालेले असते. त्यामुळे त्यांच्या धर्मश्रध्दा वेगळया करून आदिवासी समाजाचे अध्ययन करणे कठीण आहे. पी.के. कुलकर्णी याच्या मते, ''विसाव्या शतकाला रामराम करून एकेविसाव्या शतकात प्रवेश करणाऱ्या सर्व व्यक्तिंनी एक गोष्ट लक्षात ठेवणे जरूरीचे आहे की, आजही सर्वच राष्ट्रात तेथील समाजजीवनावर धर्माचा खुपच पगडा असून त्याच्या समाजाच्या सामाजिक जीवनात आजही धर्माची भूमिका महत्त्वाची आहे. व्यक्ति समाज आणि ाधर्म यांचे नाते अजूनही अतुट आहे. मानवी जीवनात व्यक्तिला कितीही ऐहिक किंवा भौतिक सुखे प्राप्त झाली तरी मानसिक सुखासाठी व्यक्तिला शेवटी धर्माची कास धरावीच लागते.''[१६]

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून धर्म म्हणजे काय? याचे उत्तर शोधणे संयुक्तिक ठरेल. या जगात दोन शक्ती असल्याचे विचारवंत मानतात त्यातील एक म्हणजे आपली मानवीशक्ती की ज्यांच्याद्वारे या जगातील ऐहिक किंवा भौतिक व्यवहार चालतात. तर दुसरी अमानवीय किंवा नैसर्गिक शक्ती होय. या अमानवीय किंवा नैसर्गिक शक्तीलाच मानवाने दैवी, अलौकिक पारलौकिक, शक्ती इत्यादी संज्ञानी संबोधले आहे. या अमानवी, दैवी, अलौकीक शक्तीच्या स्वरूपाबद्दल या मानवामानवात मतभेद असले तरी या शक्तीच्या अस्तित्त्वाबाबत सर्वमानवामध्ये मात्र एकमत आहे.

या अमानवी, दैवी, पारलौकीक शक्ती आणि मानवी शक्ती यांच्या परस्पर संबांधातून धर्माची उभारणी अथवा निर्मिती झाल्याचे विद्वानांच्या निदर्शनास आले आहे. या विश्वातील दैवी अथवा लौकीक शक्तीला मानवाने मान्यता दिली. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे दैवी शक्ती मानवाच्या आकलनशक्तीच्या पलीकडे आहे. म्हणूनच जेम्स फ्रेझर यांनी, ''धर्म म्हणजे मानवापेक्षा श्रेष्ठ शक्तींची आराधना किंवा प्रार्थना होय की ज्या शक्तीद्वारे मानवी जीवन व निसर्ग व्यवहारांचे मार्गदर्शन व नियंत्रण केले जाते.''[१७] असे म्हटले आहे. अधिक व्यापकपणे धर्माची व्याख्या डॉ. रविंद्रनाथ

मुकर्जी यांनी केली. त्यांच्या मते, ''धर्म म्हणजे कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या अलौकीक, अतिमानवी व अतिसामाजिक शक्तीवरील श्रध्दा होय. या श्रध्देच्या मुळाशी भय, विश्वास, भक्ती व पावित्र्य विषयक धारणा असून त्यांची अभिव्यक्ती प्रार्थना, पुजा व आराधना यांचे द्वारे होते.''[१८]

''मानवाने या ईश्वराची अनेक रूपे म्हणजेच अनेक प्रतिमा निर्माण केल्यात हिंदू धर्मातील ब्रम्ह, विष्णु आणि महेश, गणपती, मारोती, शनि विविध देवी (परमेश्वराचे स्त्रीरूप), इत्यादींच्या मूर्ती म्हणजेच मानवाने स्वकल्पनेने साकार केलेल्या परमेश्वराच्या विविध प्रतिमाच होत मानवाला निसर्गाच्या सानिध्यात राहतांना निसर्गाचाच भलाबुरा अनुभव आला. त्यावरून मनुष्याने झाडाला, नदीला, समुद्राला, डोंगराला तसेच मृत आत्म्यांनाही देव मानण्यास सुरूवात केली. ज्या माणसाने देव अधिक समजून घेण्याचा प्रयत्न केला त्या माणसांना देव दिसला असावा अशी समजूत सर्वसामान्य माणसांनी करून घेतली व अशी माणसे त्यामुळे अधिक ज्ञानी समजल्या गेली. म्हणूनच धर्मगुरू, धर्मापदेशक, पुरोहीत, पुजारी, संत महंत, इत्यादी व्यक्ती धर्माच्या तज्ञ मानल्या जाऊ लागल्या. त्यांच्या मार्फत सर्वसामान्य माणसे धर्माचा अर्थ ईश्वराचे स्वरूप समजावून घेऊ लागले. देवावर किंवा परमेश्वरावर श्रध्दा ठेवायची म्हणजे नेमके काय? यातूनच कदाचित परमेश्वर खुश ठेवण्याच्या भावनेचा उदय झाला असला आणि त्यासाठी समाजात देवाची किंवा परमेश्वराची पुजाअर्चा करणे, त्यांची प्रार्थना करणे, त्यांची स्तुती करणे, त्याला दूध, तूप, प्रार्थना फळे, वस्त्रे इत्यादी अर्पण करणे तसेच त्यांच्या समोर नरबळी देणे इत्यादी क्रियांची निर्मिती होऊन कालांतराने या क्रिया म्हणजेच धर्म अशी सर्वसामान्य मानसांची श्रध्दा झाली.''[१९]

आदिवासींच्या धर्मकल्पनेसंदर्भात गोंविदगारे लिहीतात, ''आदिवासी मूलत: निसर्गपूजक आहेत. त्यांची श्रध्दा आहे की, सर्व चराचर सृष्टीत जीवात्मा असतो. त्यांच्या मूळ दैवतांची नावे, त्यांची स्थाने, स्वरूपे अगर प्रतिके पाहिल्यास त्यांच्या अनेक देवांना आकार नाहीत असे दिसून येते. निसर्गातील अनेक अदभूत चमत्कारांना देवतारूपे मानून अजागतेपणे तो झाडे, लाकडे, दगडधोंडे, प्राणी, नदीनाले, इत्यादी रूपात अतर्क्य,

निर्गुण, निराकार ईश्वराची पूजा करू लागला. त्या त्या रूपाला त्यांनी आपल्या शक्तीशाली देवाचे नाव देऊन टाकले. बेढव, बेडौल आकाराचे दगडधोंडे किंवा नैसर्गिकरित्या विशिष्ट आकार प्राप्त झालेला खडकसुध्दा या देवांचे स्थान व प्रतिक होऊ शकतो.''[२०]

या संदर्भात प्रस्तुत अध्ययनातील 'माना' जमातीच्या धार्मिक कल्पना काय आहेत आणि त्यांचा मूलत: धर्म कोणता हे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांचा धर्म पुढील सारणीत दर्शविलेला आहे.

## सारणी क्र. १३

## उत्तरदात्यांची धर्मदर्शक सारणी

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | हिंदू धर्म मानणारे | १७६ | ८८% |
| २ | हिंदू धर्म वगळता इतर धर्म सांगणारे | ०१ | ०.५% |
| ३ | धर्म न सांगणारे | २३ | ११.५% |
| **एकूण** | | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास आपला धर्म 'हिंदू' आहे असे म्हणणारे १७६ (८८%) उत्तरदाते आहेत. हा निश्चितच हिंदू धर्माचा आदिवासीवर झालेला प्रभाव आहे. या उत्तरदात्यामध्ये बहुतांशी तरूण वर्गातील उत्तरदाते आहेत. डॉ. गोविंद गारे या संदर्भात लिहीतात, ''बऱ्याच आदिवासी जमातींनी हिंदू दैवतांचा स्वीकार केला आहे. दत्तेश्वरी, मन्नादेवी, लक्ष्मी, चामुंडा, महादेव, भैरोबा, मारूती, इत्यादी हिंदू दैवंताची ते पूजा करतात. कॉलरा, देवी, यासारखी रोगराई असल्यास भूत पिशाच्यांच्या कोपामुळे ही रोगराई होते अशी त्यांच्यापैकी अनेकांची समजूत आहे. ही रोगराई कशी उदभवते त्यावर उपाय काय आहेत हे शोधून काढण्यासाठी गावात 'भगत' असतो. भूत–पिशाच्यांचे निर्मूलन किंवा बंधन करण्याचे तंत्र भगताला अवगत असते यावर

आदिवासींचा विश्वास आहे. भोळेभाबडे आदिवासी श्रध्दाळूपणाने भगताने सुचविलेले उपाय करतात आदिवासींमध्ये धार्मिक आणि सामाजिक विधीत मद्याला, दारूला विशेष स्थान असते जन्म, मृत्यू, लग्न, पंचायत, पाहुण्यांचा आदरसत्कार, घेणेदेणे कोणत्याही निमित्ताने एकत्र येणे झाले की दारू घेण्याचा कार्यक्रम होतो. काही जमातीत स्त्रिया, मुलेदेखील दारू पितात जन्मापासूनच त्यांची ही सवय असते. मूल जन्मल्यानंतर मुलाच्या तोडांत दारूचा थेंब टाकला नाही तर ते मूल नशीबवान निघणार नाही असा त्यांच्यात समज आहे. मृत्यू पावलेल्या माणसाच्या तोंडातही दारूचा थेंब घालावा लागतो. मनुष्याला मृत्यू आला तर प्रेत जागविण्यासाठी लोकांना दारू देण्याची व प्रेत वाहून नेणाऱ्यांनाही दारू देण्याची प्रथा काही आदिवासी जमातीत आढळते. महाराष्ट्रात आदिवासी जमाती हिंदूचे सण मोठया उत्साहाने साजरे करतात. हिंदू सणांत आदिवासी सणांचे मीलन झाल्यामुळे त्यांचे सण अर्धे आदिवासी झाल्याचे दिसून येतात.''[२१] तर आपला धर्म सांगता न येणारे २३(११.५%) उत्तरदाते असून यातील बहुतेक उत्तरदाते वयस्क वयोगटातील आहेत. त्यांना 'आम्ही हिंदू धर्माचे सदस्य आहेत' ही गोष्टच मुळात मान्य नाही. 'आदिवासी माना' हाच आमचा धर्म आहे' यावर कटाक्षाने त्यांचा भर होता. तर हिंदू वगळता निसर्ग व मानवता धर्म हाच आमचा धर्म आहे. हिंदू धर्मात आपण मुळीच मोडत नाही व आदिवासी प्रचलित इतर धर्मानाही मानत नाही तर सतत निसर्गाच्या सानिध्यात राहणारा आदिवासी हा निसर्गशक्तीलाच धर्म मानतो व त्याचीच पूजाअर्चा करतो असे त्याचे मत असून हे मत आदिवासीच्या संदर्भात शास्त्रज्ञांनी मांडलेले आहे. 'मानावाद' 'बोंगावाद' यांच्याशी जवळीकता साधणारी आहे. यावरून परंपरेने आदिवासी हे हिंदू धर्माला मानत नाही. परंतु अलिकडच्या काळात युवावर्ग हिंदू धर्माच्या देवदेवता, सणसमारंभ, धार्मिक विधी आत्मसात करतो हे माना जमातीतील धार्मिक क्षेत्रातील आधुनिक परिवर्तन आहे असे मान्य करावे लागेल.

''ग्रामीण जीवन कृषीव्यवसायावर आधारलेले आहे. कृषी व्यवसाय निसर्गाच्या लहरी पावसावर अवलंबून असणे आणि विज्ञाननिष्ठ संस्कृतीच्या अभावामुळे निसर्गाविषयी असलेल्या अर्धवट ज्ञानामुळे ग्रामीण पारंपारीक धर्म प्राथमिक अवस्थेत

आढळतो त्यामध्ये सचेतन वाद, अनेक देववाद, जादू, भूतप्रेत विषयीच्या धारणा प्रचलित आहेत. त्यांच्या सर्व सामाजिक, आर्थिक अंगावर धार्मिकतेचा प्रभाव आहे.[२२] सुनिल गोयल यांच्यामते, ''ग्रामीण लोकांचा धर्म आणि देवदेवतावर अगाढ श्रध्दा असते. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती असून निसर्गावर आधारित असतो. शेतकऱ्यांमध्ये निसर्ग शक्ती विषयी भीतीची मनोवृत्ती असते. त्यामुळे शेतकरी निसर्ग शक्तीची आराधना करतात. ''[२३]

आदिवासी समाजातील व्यक्ती तसाही धर्मभोळा आहे. देवदेवतावर त्यांचा अगाढ विश्वास आहे. दैव, नशिब, भाग्य या गोष्टीवर पुर्णत: विसंबून राहणारा आहे. हाच त्यांचा धर्मभोळेपणा जाणून घेण्यासाठी 'आपला नशिबावर विश्वास आहे काय?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र. १४**

**उत्तरदात्यांचा नशिबावर असलेला विश्वासदर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | पूर्ण विश्वास आहे | १५५ | ७७.५% |
| २ | अंशत: विश्वास आहे | ११ | ५.५% |
| ३ | अजिबात विश्वास नाही | २८ | १४% |
| ४ | सांगता येत नाही | ०६ | ०३% |
| **एकूण** | | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास नशिबावर पूर्णत: विश्वास आहे असे महत्तम १५५ (७७.५%) उत्तरदात्यांना वाटते. अंशत: विश्वास आहे असे ११(५.५%) उत्तरदाते म्हणतात. अजिबात विश्वास नाही असे २८(१४%) तर सांगता येत नाही असे ०६ (०३%) उत्तरदात्यांचे मत आहे. नशिबावर विश्वास आहे असे म्हणणाऱ्या महत्तम

उत्तरदात्यांची संख्या लक्षात घेता तो आजही नशिब, भाग्य यांच्यात गुरफटलेला आहे. ते खऱ्या अर्थाने त्यांच्या मागासलेपणाचे लक्षण आहे असे मानावे लागेल.

डी. ब्रासेस यांच्यामते, ''धर्माची सुरूवात अडाणी लोकांनी कल्पीलेल्या मूर्तिपूजेतच आहे. कारण त्यापेक्षा खालच्या प्रतिची कोणतीही कृती धर्माची सुरूवात म्हणून कल्पीता येणारच नाही.''[२४]

धार्मिक क्रियेमध्ये दृश्य, पवित्र, भौतिक वस्तु या पदार्थाचा वापर केला जातो. अशा वस्तू अतिनैसर्गिक, अलौकीक विश्वासाशी संबंधित असतात. धार्मिक क्रिया मोक्षप्राप्तीसाठीही केल्या जातात. या धार्मिक क्रियांचा प्रभाव अलौकीक शक्तीच्या ईच्छेवर अवलंबून असते. अलौकीक शक्तीची प्रार्थना करून सुध्दा मनोकामना पूर्ण होत नसेल तर व्यक्ति जादूटोण्याकडे वळतो. याच आधारावर उत्तरदात्यांना –शगून, अपशगून, जादूटोणा यावर आपला विश्वास आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे आहेत.

**सारणी क्र. १५**

**उत्तरदात्यांच्या शगून, अपशगून, जादूटोणा यावरील विश्वासदर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवाररी** |
|---|---|---|---|
| १ | पूर्ण विश्वास आहे | २८ | १४% |
| २ | अंशतः विश्वास आहे | ९७ | ४८.५% |
| ३ | अजिबात विश्वास नाही | ७१ | ३५.५% |
| ४ | सांगता येत नाही | ०४ | ०२% |
| **एकूण** | | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे दिसते की, शगून, अपशगून जादुटोणा यावर आपला पूर्ण विश्वास आहे असे २८ (१४%) उत्तरदात्यांचे मत आहे. अंशतः विश्वास आहे असे ९७(४८.५%) उत्तरदाते सांगतात त्यांची संख्या महत्तम असून ती परंपरागत

अंधश्रध्देच्या विश्वासातून पूर्णतः बाहेरही आले नाहीत व आधुनिक वैज्ञानिक दृष्टीकोनही स्विकारलेला नाही. अशा दोन्हीच्या सीमेवर असलेले उत्तरदाते होत. अजिबात विश्वास नाही असे ७१(३५.५%) उत्तरदात्याचे मत असून ही संख्या सुध्दा बरीच मोठी, आहे व आदिवासी सुध्दा अंधश्रध्देतून बाहेर निघतो आहे यांची साक्ष पटवून देणारी आहे. तर ०४(०२%) उत्तरदाते असे आहेत की ज्यांना मात्र त्यावर काहीच सांगता आले नाही.

एकंदरीत परंपरेने अंधश्रध्देच्या गर्तेत सापडलेली माना – जमात अलिकच्या काळात अंधश्रध्देतून बाहेर पडत आहे असे निदर्शनास येते.

''जादू, धर्म आणि विज्ञान हयातील सीमारेषांची इतकी सरमिसळ झालेली आहे की, त्यातील साम्य व वैषम्य याबद्दल विद्वानांमध्ये मतभेद आढळतात एवढे मात्र खरे की, या सर्वाचे मूळ किंवा बीज एकत्र आढळतात. जादू आणि धर्म विधीवत नियमांचे पालन करतात. जादू ही अंधश्रध्देच्या पायावर उभी असते धार्मिक प्रार्थना आणि जादूतील मंत्रतंत्र हयात फरक विशेषतत्त्वाने आढळतोच असे नाही. सृष्टीतील शक्तीवर ताबा मिळवून इष्टसिध्दीसाठी त्याचा उपयोग होतो. जादू विद्या संकटातून तरून जाण्याची आणि इष्ट प्राप्तीचे साधन प्रारंभ काळापासून वाटत होती. आपले जीवन सुसह्य व सुखकर व्हावे यासाठी अतिमानवी शक्तींना वश करून घेणे वा त्यावर प्रभाव गाजविणे यासाठी मानवाची धडपड होती. यातून मंत्र – तंत्रात्मक विधान सुरू झाले. यात विशिष्ट ठिकाणची माती व पाणी विशिष्ट प्राण्यांचे पंख, भस्म, न कळणाऱ्या भाषेतील प्रार्थना, गंभीर वातावरण, विशिष्ट काळ व वेळ व बळी या गोष्टींना जादूविद्येत महत्त्व प्राप्त झाले.''[२५] या जादू व अंध्दश्रध्देच्या भितीतूनच नवसाची संकल्पना जन्माला आली. आपली उद्दिष्टे साध्य करून घेण्यासाठी इष्ट देवतांना नवस बोलणे व तो फेडणे ही धर्मातील परंपरा आहे. मनुष्य हा स्वार्थी प्राणी आहे असे समजले जाते. कोणतीही कृती तो अहेतुक करीत नाही. तर प्रत्येक कृतीमागे कोणतातरी उद्देश अथवा हेतू असतो आणि तो पूर्ण करून घेण्यासाठी देवदेवतांना कोंबडे, बकरे कापून बळी देऊन नवस फेडण्याची परंपरा सुरू झाली.

हया तत्त्वाच्या आधारावर 'आपण कधी नवस केला आहे काय?' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र. १६**

**उत्तरदात्यांच्या नवस फेडण्याविषयीची मनोवृत्ती दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एकदा केला | २२ | ११% |
| २ | नेहमीच करतो | ०१ | ०.५% |
| ३ | नवस केलेला नाही | १७३ | ८६.५% |
| ४ | नवस करण्यावर विश्वास नाही | ०४ | ०२% |
| ५ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| **एकूण** | | **२००** | **१००%** |

एकदाच नवस केला असे २२ (११%) उत्तरदात्यांचे मत आहे. नेहमीच करतो असे ०१(०.५%) उत्तरदाता सांगतो व तो धार्मिक वृत्तीची बाई असून अंधश्रध्देचा मनावर अतिशय पगडा असणारी आहे. नवस केलेला नाही असे महत्तम १७३ (८६. ५%) उत्तरदाते सांगत असून त्यावर आपला विश्वासच नाही असे ०४ (०२%) उत्तरदाते सांगतात. प्रत्यक्ष सर्वेक्षणात संशोधनकर्तीच्या निरिक्षणाअंती लक्षात आले की, 'नवस फेडणे' ही आदिवासींची परंपरा नाही. ते खऱ्या अर्थाने निसर्गपूजक आहेत. नवस फेडणे ही संकल्पना हिंदू धर्मातील असून जो काही थोडा फार नवस फेडण्याचा प्रकार दिसतो. तो हिंदू धर्माचा आदिवासींवर झालेला परिणाम होय.

अलौकिक शक्तीला प्रसन्न करून घ्यायचे असेल आपल्याला हवे तेव्हा वाटेल त्यावेळी अनुकूल करून घ्यायचे असेल तर जादूचा उपयोग केला जातो. जादूद्वारा अलौकिक शक्तीला आपल्या काबूत अथवा नियंत्रणात ठेवता येते. इच्छा साकार करण्यासाठी ध्येयसिध्दीसाठी जादूचा प्रयोग केला जातो. खरे पाहता जादू हे आदिवासी

जमातीच्या जीवनातील महत्वाचे अंग आहे. निसर्गातील जी संकटे येतात, उदा. महापूर दुष्काळ, रोगराई इत्यादीचे आक्रमण यावर नियंत्रण मिळविण्यासाठी इच्छेप्रमाणे जादू या शक्तीचा उपयोग करता येतो यासाठी विशिष्ट प्रकारची क्रिया करावी लागते त्याकरीता आवश्यक साधनांची वस्तु व सामानाची आवश्यकता असते व पूजाविधी अथवा जादूविधी करण्यासाठी भगताची गरज असते. माना जमातीमध्ये सुध्दा अशाप्रकारे पूजाविधी जादूविधी करणाऱ्या पुरोहिताला भगत असे म्हणतात. डॉ. शैलजा देवगावकर यांच्यामते, ‘‘माना जमातीतसुध्दा प्रत्येक कुळाला एकेक भाट असते. त्याला शेंडयां म्हणतात. भाट नसणाऱ्या कुळाला जातीबाहय ठरवितात.’’[२६] त्याच्या कृतीवर लोकांचा विश्वास असतो. त्यांनी केलेल्या प्रत्येक विधि व सूचनांचे आदिवासी लोक कटाक्षाने पालन करतात. हीच बाब जाणून घेण्यासाठी ‘भगतावर आपला विश्वास आहे काय? ‘असा प्रश्न विचारला त्यावर उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र.१७**

**उत्तरदात्यांचा भगतावर असणारा विश्वास दर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | पूर्णत: होय | ५९ | २९.५% |
| २ | अजिबात नाही | ५९ | २९.५% |
| ३ | थोडा फार आहे. | ८२ | ४१% |
| ४ | सांगता येत नाही | ०० | ००% |
| **एकूण** | | **२००** | **१००%** |

आपल्या कुटुंबावर अथवा कुटुंब सदस्यावर आलेले दैवी संकट निवारण्यासाठी भगतांनी केलेल्या कर्मकांडावर पूर्णत: विश्वास आहे असे मानणारे ५९ (२९.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर भगताच्या कर्मकांडावर अजिबात विश्वास नाही

असे म्हणणारे सुध्दा ५९ (२९.५%) उत्तरदाते आहेत तर थोडाफार विश्वास आहे. असे ८२ (४१%) उत्तरदात्याचे मत असून ही संख्यासुध्दा महत्तम आहे. एकंदरीत पूर्णत: अंधश्रध्देत रूतलेला व भगतावर पूर्णत: विसंबून असणारा माना आदिवासी हा हळूहळू त्यातून बाहेर पडतो आहे. परंतु अजूनही भगताच्या मायाजाळातून तो पूर्णत: बाहेर पडलेला नाही. म्हणजेच अजूनही धार्मिक विधी व कर्मकांड करण्यासाठी भगताचे माना जमातीतील महत्त्व संपलेले नाही असे या अध्ययनातून निदर्शनास येते.

''आदिवासी समाजात कोणीही आजारी पडल्यास त्याला पहिले भगताकडे नेले जाते आदिवासीची ही पक्की खात्री असते की रोगाचा प्रकार कोणताही जरी असला तरी त्याचे कारण देवतांची अवकृपा, पूर्वजांचा राग आणि चेटूक असते. यापैकी कोणत्या कारणाने रोग उत्पन्न झाला आहे याचे निदान भगत करतो. मग चेटूक असल्यास` उतरविणे किंवा देवदेवता असंतुष्ट असतिल तर त्यांना संतुष्ट करणे किंवा पितरकोप असेल तर तो शांत करणे ही कामे केवळ भगतच करू शकतो. आजारांचे एकदा निदान झाल्यानंतर योग्य ते मंत्र उच्चारून ताईत गंडे, आदि वस्तु दैवी समर्थाने भारावून देणे, भूत पिशाच्याला हाकूलन लावणे इत्यादी उपचार तो करतोच पण त्याचबरोबर मसाज करणे, दुखणारा भाग दाबणे शेकणे इत्यादी बरोबरच रोगी व्यक्तिला तो देवळात झोपावयास सांगतो. भिल्ल जमातीत रोगाची साथ आल्यास वस्तीच्या सर्व सीमेवर मंतरलेले तांदूळ फेकतात व नंतर कोंबडे मारून टाकले जातात. रोगकारीणी देवतांना संतुष्ट करण्याची ही उपाययोजना असते.''[२७]

माना ही सुध्दा आदिवासी जमात असल्यामुळे आजारपणात कुठले उपाय केले जातात हे जाणुन घेण्यात आले. उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. १८

## आजारपणातील उपायांचे स्त्रोतदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दवाखाना | ६६ | ३३% |
| २ | भगताकडे | ०२ | ०१% |
| ३ | दवाखान्यात व भगताकडे जातो | १३० | ६५% |
| ४ | प्रथम भगताकडे व गुण न झाल्यास दवाखान्यात | ०२ | ०१% |
| ५ | घरीच राहतो. | ०० | ००% |
| **एकूण** | | **२००** | **१००%** |

अलिकडच्या काळात शासन स्तरावर ग्रामीण आदिवासी भागापर्यंत दवाखान्याची सुविधा पुरविण्याची व्यवस्था शासनामार्फत होत आहे. प्रस्तुत अध्ययनातील ६६ (३३%) उत्तरदाते हे आजारपणातील उपचारासाठी डॉक्टरकडेच जातात, असे त्यांचे मत आहे. तर १३० (६५%) उत्तरदाते हे प्रथम तातडीचा उपाय म्हणून दवाखान्यात जात असले तरी त्यांचा पूर्णत: डॉक्टरवती व दवाखान्यातील औषधोपचारावरती पुर्णत: विश्वास नसल्यामुळे केवळ तेवढयाच उपचारावर विसंबून न राहता परत गावातील अथवा परीसरातील भगताकडे सुध्दा जाऊन त्यांच्याकडूनही आजारपणातील उपाययोजना करून घेतात. केवळ ०२ (०१%) उत्तरदाते हे आजारपणातील उपचारासाठी भगतावरच अवलंबून असतात. ते डॉक्टरकडे अथवा दवाखान्यात जात नाही. यावरून ते कठोर परंपरावादी आहेत असे निदर्शनास येते ०२(१%) उत्तरदाते प्रथम भगताकडे व गुण न झाल्यास डॉक्टरकडे जातात हया सर्व विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, भगताची परंपरागत उपचाराची पकड कमी होत असून आता लोक आजारपणातील उपचारासाठी दवाखाना व डॉक्टरवर अवलंबून असतात हे माना जमातीतील स्वास्थाच्या संदर्भातील मोठे परिवर्तन आहे असे समजावे लागेल.

अदिवासी जमातीत प्रत्येक सण, उत्सव व आनंदाच्या प्रसंगी मद्याचा आस्वाद घेतला जातो. त्याशिवाय त्यांचा आनंद द्विगुणीत होत नाही. धार्मिक विधी अथवा पुजापाठाच्यावेळी सुध्दा हातभट्टीच्या काढलेल्या मद्याचा पहिला द्रोण हा देवाला नैवेदय म्हणून वाहिले जाते या पार्श्वभूमीवर माना ही जमात सुध्दा आदिवासीच असल्यामुळे मद्यपानाच्या संदर्भात त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र. १९**

**माना जमातीच्या रितीरीवाजाप्रमाणे कोणत्याही धार्मिक कर्यात व समारंभात मद्यपानाची अनिवार्यता दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय तो रिवाजच आहे. | ०३ | १.५% |
| २ | कधी कधी आवश्यक | ३७ | १८.५% |
| ३ | आवश्यक नाही | १५२ | ७६% |
| ४ | सांगता येत नाही | ०८ | ०४% |
| **एकूण** | | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास प्रत्येक धार्मिक कार्यात मद्यपानाची अनिवार्यता आहे अथवा तो आपला रिवाजच आहे असे ०३(१.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. कार्यक्रमाच्या स्वरूपावरून कधी कधी अनिवार्य आहे असे ३७ (१८.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर अशा कुठल्याही कार्यक्रमात मद्यपानाची अनिवार्यता नाही असे महत्तम १५२ (७६%) उत्तरदात्यांना वाटते. तर सांगता येत नाही अशी तटस्थ भूमिका घेणारे ०८(०४%) उत्तरदाते आहेत. यावरून प्रत्येक आदिवासी जमातीच्या मद्यपानाच्या आस्वाद विषयीच्या भावना वेगवेगळया आहेत. जसे गडचिरोली जिल्हयातील माडीया जमातीत प्रत्येक धार्मिक कार्यात मद्यपानाची अनिवार्यता दिसत

असली तरी माना जमातीत मात्र अशी अनिवार्यता नाही. ती कदाचित पूर्वी असेल परंतु आजच्या स्थितीत ती अनिवाार्यता असल्याचे दिसून येत नाही. हा माना जमातीतील विकास व परिवर्तनाचा भाग आहे असे म्हणावयास जागा राहते.

''परंपरागत सांस्कृतिक मुल्यांना कारेकोरपणे जतन करणारे आदिवासी हे मात्र आजही जळात चैतन्य पाहणाच्या, त्याला वास्तविक समजण्याच्या आणि त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि पर्यायाने सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग ठरविण्याच्या अवस्थेत आजही आहेत. पंचमहाभुतांना त्यांच्या जीवनात असलेले महत्त्व आणि त्यातून निर्माण होणाऱ्या ऋणाच्या  व श्रध्देच्या कल्पना स्पष्ट व्हाव्यात यादृष्टीने त्यांचे काही सण, काही पुजा प्रकार व त्यातील काही नैसर्गिक, प्रतिकात्मक देवदेवतांची पूजा केली जाते.''[२८] या अध्ययनातील माना जमात ही सुध्दा याला अपवाद नाही. संस्कृतीकरणाचा एक प्रभाव म्हणून प्रत्येकच आदिवासी जमात हिंदूची संस्कृती आत्मसात करीत आहे. पुढील सारणीत माना आदिवासी जमातीत केलेल्या सण समारंभाची वस्तुस्थिती दर्शविण्यात आली आहे.

**सारणी क्र. २०**

**माना जमातीत पाळत असलेल्या सण समारंभाची वास्तवता दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | फक्त आखाडी | ०१ | ०.५% |
| २ | फक्त नागदिवाळी | ०० | ००% |
| ३ | फक्त नागपंचमी | ०० | ००% |
| ४ | हिंदू धर्मियांचे सर्वसण | १७ | ८.५% |
| ५ | आखाडी व नागपंचमी | ४१ | २०.५% |
| ६ | आखाडी, नागदिवाळी व नागपंचमी | २९ | १४.५% |
| ७ | हिंदू धर्मियांचे सर्वसण व आखाडी, नागदिवाळी व | ११२ | ५६% |

| | | | |
|---|---|---|---|
| | नागपंचमी (सर्व) | | |
| | **एकूण** | **२००%** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास आपल्या कुटुंबात कोणकोणते सण साजरे केले जातात. या संदर्भात केवळ आखाडी या सणाला प्रथम प्राधान्य देणारे केवळ ०१ (०.५%) उत्तरदाते आहेत. केवळ नागदिवाळी अथवा केवळ नागपंचमी याला प्राधान्य देणारे कोणीही उत्तरदाते नाही. हिंदू धर्मियांचे सर्वच सण साजरेकरतो असे १७ (८.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. आखाडी व नागपंचमी हे सण साजरे केले जातात. असे ४१ (२०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे ही संख्या सुद्धा बरीच विचारात घेण्यासारखी आहे. आखाडी, नागदिवाळी व नागपंचमी हे सण साजरे केले जातात. असे २९ (१४.५%) उत्तरदाते सांगतात हिंदू धर्मियांचे सर्वच सण व आखाडी, नागदिवाळी व नागपंचमी हे माना जमातीच्या खास उल्लेखीलेले सण साजरे केले जातात. असे महत्तम ११२ (५६%) उत्तरदात्यांचे मत आहे. यावरुन केवळ माना जमातीचे सण म्हणून उल्लेखील्या गेलेले परंपरागत आखाडी, नागदिवाळी व नागपंचमी यांचे हळूहळू महत्त्व कमी घेऊन हिंदू धर्मियांचे सर्वसण साजरे करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व हा संस्कृतीकरणाचा परीणाम आहे असे संशोधिकेला वाटते.

कोणत्याही समाजात जेव्हा समाज सदस्य एकत्र येऊन एखादया कार्यक्रमाचे आयोजन करतात तेव्हाच त्यांच्या एकदुसऱ्याशी क्रिया, प्रतिक्रिया व आंतरक्रिया घडत असतात. त्यातूनच समाज एकसंघ बनत जातो व समाजाची एकात्मता ही साधली जाते. याच पाश्वभूमीवर माना जमातीत आपण एकत्र येऊन कोणकोणते कार्यक्रम साजरे करता? असा प्रश्न विचारुन त्यांच्यातील एकसंघता जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांची वारंवारिता पुढील सारणीत दर्शविलेली आहे.

## सारणी क्र. २१

## माना जमातीत पाळत असलेल्या सण समारंभाची वास्तवता दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | लग्न समारंभ | २७ | १३.५% |
| २ | धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम | ४० | २०% |
| ३ | थोरपुरुषांच्या जयंती /पुण्यतिथी | १७ | ८.५% |
| ४ | वरील सर्व | ११६ | ५८% |
| ५ | इतर | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००%** | **१००%** |

लग्न समारंभ पार पाडणे हे प्रत्येकच मानवजातीचे कर्तव्य असले तरी त्याकडे एक सामुहिक कार्यक्रम म्हणून त्या लग्नसमारंभाकडे पाहीले जाते असे २७ (१३.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम एकत्र येऊन पार पाडले जाते असे ४० (२०%) उत्तरदात्यांचे मत असून यात पुजाविधी व त्याप्रित्यर्थ आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा अंतर्भाव होतो. थोर पुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी तसेच राष्ट्रीय कार्यक्रमांचे सामुहिक रित्या आयोजन केले जाते असे १७ (८.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. ही सुद्धा आधुनिक राष्ट्रीय कार्यक्रमाच्या जाणीव जागृतीचा भाग म्हणता येईल.

वरीलपैकी सर्वच कार्यक्रम समूहात एकत्र येऊन पार पाडले जातात असे महत्तम ११६ (५८%) उत्तरदात्यांचे मत आहे. यावरुन लग्नसमारंभ ही केवळ वैयक्तिक कुटुंबाची जबाबदारी नसून संपूर्ण जमातीची जबाबदारी आहे असे निदर्शनास येते. तसेच महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या यातून महापुरुषाच्या आदर्श समाज बांधवाच्या समोर ठेवून त्यांना आदर्शाच्या दिशेने घेऊन जाण्याचा एक सुप्त प्रयत्न या समाजाकडून होत

असतांना दिसतो हे सुद्धा या जमातीची प्रगतीच्या दिशेने होत चाललेली वाटचाल आहे असे निदर्शनास येते.

डॉ. श्रीराम म. महाकरकार यांच्यामते, ''आदिवासी स्त्रिया श्रद्धाळू वृत्तींच्या आणि निसर्गपूजक आहेत. अज्ञानामुळे आदिवासी स्त्रिया अंधश्रद्धेच्या बळी ठरल्या आहेत. आदिवासी स्त्रीच्या स्थानाचा विचार करता विवाहपुर्व काळात तरुण युवती हया दृष्टीने तिला बरेच स्वातंत्र्य आहे. आधुनिक स्त्रीला एवढे स्वातंत्र्य नाही. आधुनिक जगातील स्त्री ही अनेक बंधनाच्या दडपणाखाली वावरत असून पाहिजे तसा जोडीदार मिळणे किंवा मिळविणे हयासाठी पर स्वाधीन आहे. इतकेच नव्हे तर हुंडा ही प्रथा आजही बंद झालेली दिसत नाही. याउलट आपला साथीदार निवडणे न पटल्यास घटस्फोट घेणे इ. चे स्वातंत्र्य आदिवासी स्त्रीला असून वरालाच वधुचे मूल्य मोजावे लागते आदिवासी स्त्री कुटुंबाच्या आर्थिक कार्यात मोलाचे सहकार्य करते आणि त्यामुळे कुटुंबात आणि समाजात तिला महत्त्व प्राप्त झाले. या क्षेत्रात तिचे जीवन पुरुषाइतके स्वयंपूर्ण आहे असे म्हणता येईल. तसेच सांस्कृतिक जीवनातही तिने आपल्या कर्तुत्त्वाने समाजात आपले स्थान राखले आहे. असे म्हणता येईल.''[२९]

कोणत्याही समाजात स्त्रियांचा समाजिक दर्जा निर्धारित करतांना सैद्धांतिक दृष्टया स्त्रियांवर सोपविलेले काम व त्यांना समाजात मिळणारी प्रत्यक्ष वागणुक या आधारावर त्यांचे सामाजिक स्थान निर्धारीत केले जाते. माना समाजामध्ये पितृसत्ताक कुटुंबपद्धती आहे. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा हा पुरुषांच्या तुलनेत दुय्यम राहणे स्वाभाविकच आहे. आदिवासी जमातीत स्त्रियांच्या मासिक धर्म या कारणामुळे त्या अपवित्र आहेत असे समजून त्यांच्यावर विविध निर्बंध लावले जातात या पार्श्वभूमिवर माना हया जमातीत पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचा धार्मिक दर्जा जाणून घेण्यासाठी आपल्या कुटुंबात स्त्रिया धार्मिक कार्यविधी करतात काय? अथवा धार्मिक कार्यात सहभागी होतात काय? असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. २२

## माना जमातीत स्त्रियांचे धार्मिक कार्यविधीत सहभाग दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कधी कधी करतात | ७६ | ३८% |
| २ | नेहमीच करतात | १२१ | ६०.५% |
| ३ | विशिष्ट सणालाच करतात | ०३ | ०१.५% |
| ४ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००%** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास स्त्रियांना प्रत्येकच धार्मिक कार्यात सहभागी करुन घेतले जातेच असे नाही. साधारणत: कुलदेवता, ग्रामदेवता, व इष्ट देवता या स्तरावर धार्मिक पुजाविधी पार पाडली जाते. त्यात सर्वच पुजाविधीत स्त्रियांचा सहभाग असतोच असे नाही. तर काही स्तरावर स्त्रियांना पुजाविधीसाठी दूर अंतरावर ठेवले जाते. कुटुंबातील स्त्रिया कधी कधी धार्मिक कार्यविधी करतात असे ७६ (३८%) उत्तरदात्यांचे मत आहे. साधारणत: मासिक धर्माच्या काळात त्यांना अपवित्र समजून धार्मिक कार्यात सहभागी करुन घेतले जात नाही त्यामुळे नेहमीच स्त्रियांना सहभााग घेण्याची संधी न मिळता कधी कधीच त्या धार्मिक विधी करतात असे वरील उत्तरदात्यांचे मत आहे. नेहमीच करतात असे १२१ (६०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे त्याच्या मते कोणत्याही धार्मिक कार्यात स्त्रियांना डावलले जात नाही काही सण हे विशेष करुन स्त्रियांसाठीच असतात. त्यामुळे विशिष्ट सणामध्ये स्त्रियांनाच प्राधान्यक्रम असतो. असे ०३ (१.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. कधी कधी सहभाग करतात असे ७६ (३८%) उत्तरदात्यांचे मत असले तरी नेहमीच सहभाग असतो. असे १२१ (६०. ५%) उत्तरदात्यांचे मत आहे व ते महत्तम आहे. त्यामुळे माना जमातीतील स्त्रियांना सुद्धा धार्मिक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिले जाते असे म्हणायला जागा राहते.

# संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | अनुवादकशरयू बेडसे उमा | भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९८७ | पृ.०४ |
| २. | शर्मा रामनाथ<br>शर्मा राजेन्द्रनाथ | — शैक्षणिक समाजशास्त्र<br>— अटलांटिक पब्लीशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स नवी दिल्ली. १९९७. | पृ. ३५ |
| ३. | भांडारकर पु.ल.<br>वैदय नि.स. | — भारतातील सामाजिक समस्या संपादक विलास संगबे<br>— पॉप्युलर प्रकाशन मुंबई—१९९७ | पृ.२८७ |
| ४. | नाटाणी शोभा | — भारतीय समाज और नारी. दशा और दिशा<br>— मार्क पब्लिशर्स जयपूर — २०१० | पृ. ६२ |
| ५. | शर्मा रामनाथ<br>शर्मा राजेन्द्रनाथ | — शैक्षणिक समाजशास्त्र<br>— कित्ता | पृ. ९२ |
| ६. | चौधरी नारायण<br>जोशी विरोचन<br>बापट जोत्स्ना | — सामाजिक परिवर्तन प्रक्रिया व घटक<br>— यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ नाशिक — २००९ | पृ. ८० |
| ७. | Dr. Swai | — Education and occupation mobility in vidarbha Editor Bhole<br>— Nagpur University teachers journal- 1995 – 96 खंड -38 | पृ. ४३ |
| ८. | महाराष्ट्र शासन , डॉ. विजयकुमार गवित | यांचे आदिवासींच्या कल्याणासाठी (मुलाखत)<br>— लोकराज्य मासिक नोव्हे. २००४ | पृ. ३६ |
| ९. | डॉ. कुलकर्णी अनिल | — प्रौढ शिक्षण एकदृष्टिक्षेप<br>— साकेत प्रकाशन औरंगाबाद | पृ. ०१ |
| १०. | शर्मा रामनाथ<br>शर्मा राजेन्द्रनाथ | — शैक्षणिक समाजशास्त्र<br>— कित्ता. | पृ. ३६ |
| ११. | भांडारकर पु.ल.<br>वैदय नी.स. | — भारतातील सामाजिक समस्या<br>— कित्ता. | पृ.२८५ |
| १२. | डॉ. आकरे बी. एन. | — आदिवासींच्या जीवनावर सामुदायिकविकास योजनेचा झालेला परिणाम<br>— पिंपळापुरे बुक डिस्ट्रब्युटर्स नागपूर ऑक्टो. २००९. | पृ. ०९ |
| १३. | डॉ. देवगावकर एस.जी. | — महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती<br>— श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर. —डिसे. २००९ | पृ. ३०९, ३१० |
| १४. | डॉ. मिसाळ हनुमंत | — महाराष्ट्रातील दलितांचे अंतरंग<br>— मातंग समाजाचे समाजशास्त्रीय विश्लेषण<br>— कैलास पब्लीकेशन औरंगाबाद सप्टें. २००६ | पृ. ८० |
| १५. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — भारतीय समाज प्रश्न आणि समस्या | पृ.३४० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | — | पिंपळापुरे अँण्ड कं. पब्लीशर्स नागपूर. जून २००९. | |
| १६. | कुलकर्णी पी.के. | — | सामान्य समाजशास्त्र | पृ.३४० |
| | | — | श्री मंगेश प्रकाशन रामदासपेठ नागपूर. २००० | |
| १७. | Rao Shankar S.N. | — | Sociology S. Chand & camp. Ltd. New Delhi – 1995. | पृ.४४६ |
| १८. | मुकर्जी रविंद्रनाथ | — | सामाजिक मानवशास्त्र की रूपरेषा | पृ.२५९ |
| | | — | विवेक प्रकाशन, जवाहरनगर दिल्ली –२००८ | |
| १९. | जैमिनी शारदा भाऊराव | — | कुणबी समाज स्वरूप, संस्कृती सभ्यता. | पृ. २८ |
| | | — | संघर्ष प्रकाशन नागपूर. तृतीय आवृत्ती . २००१. | |
| २०. | डॉ. गारे गोविंद | — | आदिवासी कलाविश्व | पृ. २८ |
| | श्री सोनवाणे उत्तमराव | — | महाराष्ट्र शासन आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था –पुणे. | |
| २१. | डॉ. गोरे गोविंद | — | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती. | पृ. १४, |
| | | — | कॉन्टीनेंटल प्रकाशन विजयानगर पुणे. द्वितीया आवृत्ती –२००२ | १५ |
| २२. | सचदेव विद्याभूषण डी. | — | समाजशास्त्र के. सिद्धांत | पृ.५०२, |
| | आर. | — | किताबमहल इलाहाबाद –२००९. | ५०३ |
| २३. | गोयल सुनिल | — | भारतीय सामाजिक व्यवस्था | पृ. ४८ |
| | गोयल संगिता | — | आर.बी. एस.ए. पब्लीशर्स जयपूर–२००३ | |
| २४. | जॉन्सन हेन्री एम. | — | समाजशास्त्र एक विधीवन विवेचन | पृ. ३८७ |
| | | — | कल्याणी पब्लीकेशन – नवी दिल्ली १९९१ (अनुवादक – योगेश अटल) | |
| २५. | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. ३०९, |
| | | — | कॉन्टीनेन्टल प्रकाशन –पुणे २००३. | पृ. ३१० |
| २६. | डॉ. सौ. देवगावकर | — | वैदर्भीय आदीवासी जीवन आणि संस्कृती | पृ. १२९ |
| | शैलजा | — | श्री मंगेश प्रकाशन, नवी रामदासपेठ नागपूर | |
| २७. | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. ३१२ |
| | | — | कित्ता. | |
| २८. | डॉ. देवगावकर शैलजा | — | वैदर्भीय आदिवासी जीवन आणि संस्कृती | पृ. १२३ |
| | | — | कित्ता | |
| २९. | श्री. महाकरकार श्रीराम | — | आदिवासी स्त्री व राजकारण | पृ. ३७ |
| | महादेव | — | श्री राजराजेश्वर शै.सां. व. सामाजिक बहुउद्देशिय संस्था चामोर्शी, जि. गडचिरोली. प्रा. आवृत्ती ७ जाने २००६. | |

# प्रकरण ५ वे

# आर्थिक संरचना व परिवर्तन, शासकिय योजना व त्याचे माना आदिवासींसाठी फायदे

## ५.१ आर्थिक संरचना व परिवर्तनः

''कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत देशाच्या जनतेचा विचार हा सर्वाधिक महत्त्वाचा असतो.''[१] आणि जनतेच्या विकासाचा विचार करतांना त्यांच्या अर्थव्यवस्थेचाही विचार तितकाच महत्त्वाचा ठरतो. ''अन्न, वस्त्र व निवारा या तीन (मानवाच्या) मूलभूत गरजा आहेत. त्यांच्या परिपूर्ती शिवाय आपण मानव व मानवी समाजाचे अस्तित्व याची कल्पनादेखील करू शकत नाहीत. मानवाला आपल्या या मूलभूत गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणत्या ना कोणत्या—प्रकारच्या आर्थिक क्रिया कराव्या लागतात.''[२] ''अर्थव्यवस्था ही एक अशी व्यवस्था असते की ज्या व्यवस्थेत विशिष्ट भौगोलिक पर्यावरण, औदयोगिक पातळी व सांस्कृतिक परिस्थितीच्या संदर्भात एखादया समाजाने आपल्या भौतिक गरजांच्या परिपूर्तीसाठी केलेल्या सर्व कार्याचा व प्रयत्नांचा अंतर्भाव होतो. रूथ बेनझेल अर्थव्यवस्थेची कल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट करतांत, ''भौतिक अस्तित्वाशी निगडित असलेल्या समस्यांच्या संदर्भात मानवी वर्तनाचे जे समग्र संघटन असते त्यास अर्थव्यवस्था असे म्हणतात.''[३]

समाजशास्त्राचा अभ्यासक जेव्हा एखादया आदिवासी जमातीच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करतो. तेव्हा त्याला आदिवासी समाजाच्या अर्थव्यवस्थेचे वैशिष्टय ठळकपणे लक्षात येतात. संशोधिकेचा अध्ययन विषय—माना आदिवासी असल्याने आदिवासींच्या अर्थव्यवस्थेविषयी जाणून घेणे क्रमप्राप्तच ठरते. त्यांची आर्थिक सद्यस्थिती व त्यात होणारे परिवर्तनसुद्धा अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

आदिम समाजाचे जीवन कष्टप्रद व संघर्षमय आहे. आदिम समाजांच्या अर्थव्यवस्थेचे केंद्रीभूत वैशिष्टय जर कोणते असेल तर ते हे आहे की, त्यांच्या सर्व आर्थिक क्रिया प्रक्रिया जिवंत कसे राहावे ही मूलभूत समस्या सोडविण्याच्या दिशेने घडून येताना दिसतात. उदरपूर्तीच्या दृष्टीने केलेल्या अनेकविध आर्थिक क्रिया प्रक्रियांचे संघटन हीच आदिम समाजाची अर्थव्यवस्था होय. ''आदिम अर्थव्यवस्था प्रत्यक्ष स्वरूपात आदिम मानवाच्या चरितार्थाशी संबंधित आहे. जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तू व सेवा यांचे उत्पादन, वितरण व उपभोग याबाबीच आदिमांच्या आर्थिक क्रियांचे आधार व उद्दिष्ट आहेत. आदिमांच्या सर्व आर्थिक क्रिया किंबहुना संपूर्ण अर्थव्यवस्थाच मोठया प्रमाणात नैसर्गिक पर्यावरणाने प्रभावित झालेली असते. आर्थिक क्षेत्रात त्यांची प्रगती अत्यंत मंद गतीची आहे. याचा परिणाम त्यांच्या इतर क्षेत्रातील संस्कृती, शिक्षण, कला व प्रगतीवरदेखील दिसून येतो.'' [४]

आदिवासी अर्थव्यवस्थेच्या बाबतीत श्री. बी.एच. मेहता यांच्या मते,'' The aborigines must have known isolation for centuries. Isolation gave sicurity to primitive societies and provided prosperity to the clan based as kinship because it guaranteed the monopoly for gattering and hunting economies of small groups of people living in small and defined areas. The regions in which they lived and practised their elementary economic activities were wild and offen covered thick forests. There were hardly any tracts through them."5

भारतीय समाजाच्या बाबतीत श्री शामचरन दुबे म्हणतात, ''भारताची जवळजवळ निम्मीलोकसंख्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गिय यांची असूनही देशातील फक्त १०% शेतीलायक जमीन त्यांच्या मालकिची आहे. वेठबिगार आणि खालच्या दर्जाचे व्यवहार करणाऱ्यांना, गरिबांना या दुदैवी पेचप्रसंगातून सुटण्याचे मार्ग फार थोडे आहेत.''६ भारतीय आदिवासींच्या बाबतीतही तीच परिस्थिती निदर्शनास येते. पूर्वापार जंगले तोडून शेती करीत आलेल्या आदिवासींना आता तोही मार्गशिल्लक करतोय किंवा नाही असेवाटायला लागले आहे. जंगलासंबंधीत त्यांचे

आर्थिक व्यवहार तर जवळपास बंदच होत चाललेले आहेत. परंतु दिवसेंदिवस पारंपारिक पद्धतीने पावसाच्या लहरीपणावर अवलंबून असणाऱ्या शेत्याही ओसाड पडत चाललेल्या आहेत. व त्यावर जाणून–बुजून शेतजमिनी Non-Agriculture दाखवून त्यांपासून प्लॉट पाडून विकणाऱ्या बिल्डर्सच्या आमिषांमुळे तर शेतकरी, आदिवासी त्यांच्या जमिनींपासून वंचित होतानाच दिसतात.

माना आदिवासींचा वारंवार शेतकरी म्हणून उल्लेख होतांना आढळतो जंगलव्याप्त भागात राहणारे, जंगलाशी संबंधित काही आर्थिक क्रिया करतात तर काही शेती व सोबत जोडधंदा–म्हणून पशूपालन व्यवसाय करतात.परंतु आता चाऱ्याच्या दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या प्रश्नामुळे पशुपालन व्यवसायही कमी होत चालला आहे. नोकरी मिळविण्याच्या इतपत शिक्षण वशिला किंवा डोनेशन दयायला पैसाही नसणारा माना आदिवासी कोणत्या उपजिविकेवर स्वत:चे व स्वत:च्या कुटुंबाचे उदरभरण करतो या संदर्भाने माहिती जाणून घेण्यासाठी व त्यांच्या आर्थिक क्रिया व अर्थव्यवस्था जाणून घेण्यासाठी संशोधिकेने त्यांच्या अर्थार्जनाशी संबंधित व त्यांच्या जीवनमानाशी संबंधित बरेच प्रश्न त्यांना विचारले व माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे त्यांच्या अर्थव्यवस्थेत झालेला बदल व भौतिक बाबतीत झालेले परिवर्तनही जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

माना आदिवासींच्या सद्याच्या व्यवसायाच्या संबंधाने जाणून घेण्यासाठी ''आपण सध्या कोणता व्यवसाय करता?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. १**

**उत्तरदात्यांची स्वत:ची व्यावसायिक सद्यस्थिती दर्शक सारणी.**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | शेती | १३० | ६५% |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | नोकरी | ०६ | ०३% |
| ३. | इतर (मजुरीसहीत) | ६४ | ३२% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, शेती हा मुख्य व्यवसाय असणारे महत्तम १३० (६५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्याजवळ स्वत:ची शेती आहेत किंवा ते इतर नातेवाईकांची शेती वाहतात. ही संख्या मोठी आहे. नोकरी सरकारी किंवा खाजगी संस्थेत करणारे एकूण ०६ (०३%) उत्तरदाते आहेत. इतर समुहांच्या तुलनेत ही संख्या अतिशय कमी प्रमाणात असल्याचे आढळले. मजुरीसोबत इतर कामे करणारे एकूण ६४(३२%) उत्तरदाते आहेत जे शेतांवर किंवा मिळेल ती मजुरी करतात. काही पानठेले व चहाच्या टपऱ्या चालवतात. सध्या काही लोक टॅक्टर चालविणे, मळणीयंत्रावर काम करणे इत्यादी कामेही करतात.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की शेती करणाऱ्यांचे प्रमाण अजूनही सर्वाधिक आहे. जरी शेती पावसाच्या लहरीपणावर अवलंबून असली व ती परवडत नसली तरी सुद्धा माना आदिवासी शेती करणे पसंत करतात.

वरील सारणीला अनुसरूनच उत्तरदात्यांच्या वडिलोपार्जित व्यवसायाविषयी जाणून घेण्यासाठी ''आपला वडिलोपार्जित किंवा परंपरात व्यवसाय कोणता ''असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र. २**

**उत्तरदात्यांच्या वडिलोपार्जित व्यवसाय दर्शक सारणी.**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | शेती | १५४ | ७७% |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | नोकरी | ०१ | ०.५% |
| ३. | इतर (मजुरीसहीत) | ४५ | २२.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, वडिलोपार्जित शेती व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण महत्तम १५४ (७७%) आहे तर शासकिय अथवा खाजगी संस्थामध्ये नोकरी करणाऱ्यांचे प्रमाण ०१ (०.५%) आहे. त्याचप्रमाणे मजुरीसहित इतर व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण –४५ (२२%) आहे.

## सारणी क्र. ३

## उत्तरदात्यांची सद्यस्थितीतील व वडिलोपार्जित व्यवसायाची तुलनादर्शक सारणी.


| **अ. क्र** | **सद्यस्थितीतील व्यवसाय** | **वारंवारीता** | **टक्केवारी** | **वडिलोपार्जित व्यवसाय** | **वारंवारिता** | **टककेवारी** | **फरक** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेती | १३० | ६५% | शेती | १५४ | ७७% | –१२ % (घट) |
| २. | नोकरी | ०६ | ०३% | नोकरी | ०१ | ०.५% | + २.५% (वाढ) |
| ३. | इतर (मजुरीसहित) | ६४ | ३२% | इतर (मजुरीसहित) | ४५ | २२.५% | +९.५ %(वाढ) |
| | एकुण | २०० | १००% | एकुण | २०० | १००% | |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, वडिलोपार्जित व्यवसायाची सद्यस्थितीतील व्यवसायाशी तुलना केल्यास शेती व्यवसाय करणाऱ्यांमध्ये १२% घट झालेली दिसते. तर नोकरी करणाऱ्यांमध्ये २.५% वाढ झालेली आहे. हा शिक्षणाचा लाभ इथे दिसून येत आहे. तर मजुरीसहित शेती व्यतिरिक्त इतर छोटे–मोठे  व्यवसाय करण्याऱ्यांची संख्या ९.५% नी वाढलेली आहे.

औदयोगिकरण व वाढती लोकसंख्या, वाढती गरज हे यामागचे कारण आहे. शेती परवडत नसल्याने व पिढीगणिक शेतीचे तुकडे झाल्याने शेतीवर अवलंबून राहणे कठीण झाले आहे. सतत शेतीतील नापिकेमुळे व मजूरी खत, बि–बियाणे, किटकनाशके यांच्या वाढलेल्या किंमती तसेच सिंचनाचा मोठा प्रश्न यामुळे आता दिवसेंदिवस शेतीवर अवलंबून राहणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. असे आपल्या निदर्शनास येते. त्याचप्रमाणे शिक्षण घेऊन नोकरी मिळविण्याची आशा, परंतु दर्जेदार शिक्षण न मिळाल्याने शेवटी मजुरीचा मार्ग पत्करणे हेही परिवर्तन माना समाजात आपल्याला दिसून येत आहे हे परिवर्तन लक्षणिय आहे असे म्हणावयास हरकत नाही.

**उत्तरदात्यांचा सद्यस्थितीतील व वडिलोपार्जित व्यवसायाचा**

**तुलनात्मक आलेख**




जोडधंदा करणे हा शेतीला पूरक व्यवसाय असतो. तो पूर्ण वेळ केल्या जात नाही. परंतु शेतीसोबतच किंवा इतर व्यवसायासोबतच फावल्या वेळात केल्या जातो. माना आदिवासींत शेती व्यवसायाव्यतिरिक्त किंवा नोकरी व मजूरी व्यतिरिक्त इतर कोणता जोडधंदा किंवा पूरक व्यवसाय केल्या जातो का? हे जाणून घेण्यासाठी ‘‘आपण कोणता जोडधंदा करता? असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. ४

## उत्तरदाते करीत असलेल्या जोडधंदयाची (पूरक व्यवयाय) माहिती दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | जोडधंदा करणारे | ३० | १५% |
| २. | जोडधंदा न करणारे | १७० | ८५% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, शेतीला किंवा इतर व्यवसायाला पूरक असा जोडधंदा जसे पशूपाल, टोपल्या विणणे, तट्टेबोरे विणणे, जंगलातील खस आणून ताटया बनविणे इत्यादी व्यवसाय करणाऱ्यांची संख्या फक्त ३०(१५%) आहे. इतर १७० (८५%) उत्तरदाते मात्र निव्वळ एकच व्यवसाय करतात. शेती, नोकरी, किंवा मजुरी यावरून असे निदर्शनास येते की, माना आदिवासी अल्पसंतुष्टी असून त्याला अधिक आर्थिक लाभ मिळविण्याचा लोभ नाही.

आदिम समाजात कुटुंब हेच अर्थउत्पादनाचे एकक असते त्यामुळे सर्व संपत्ती ही कुटुंबाची आहे, असे मानले जाते. त्यामुळे आदिम समाजाच्या आर्थिक विकासाचा आढावा घ्यायचा झाल्यास त्यांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न जाणून घेणे गरजेचे आहे.

माना आदिवासींचे एकूण वार्षिक उत्पन्न जाणून घेण्यासाठी त्यांच्या कुटुंबाला एकक मानून कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न जाणून घेण्यासाठी ''आपल्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न किती?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ५

## उत्तरदात्यांची त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्नदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | २० हजारांपेक्षा कमी | १२९ | ६४.५% |
| २. | २० हजार ते २५ हजार | ५९ | २९.५% |
| ३. | २५ हजार ते १ लाख | १० | ५% |
| ५. | १ लाखपेक्षा जास्त | ०२ | ०१% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की २० हजारपेक्षा कमी उत्पन्न असणारे महत्तम १२९ (६४.५%) उत्तरदाते आहेत. २० ते २५ हजार उत्पन्न असणारे एकूण ५९ (२९.५%) उत्तरदाते आहेत. तर २५ हजार ते १ लाख उत्पन्न असणारे १० (०५%) उत्तरदाते आहेत. १ लाखापेक्षा जास्त उत्पन्न असणारे ०२(०१%) उत्तरदाते आहेत. २० हजारापेक्षा कमी व २० ते २५ हजारांपर्यंत उत्पन्न असणारे महत्तम शेतकरी व मजूर वर्गातील लोक आहेत. २५ हजार ते १ लाखापर्यंत उत्पन्न असणारे मोठे शेतकरी आहेत व जे १ लाखापेक्षा जास्त उत्पन्न असणारे आहेत ते नोकरी करणारे उत्तरदाते आहेत.

यावरून असे निदर्शनास येते की, वाढत्या महागाईच्या काळात २५ हजारापर्यंत महत्तम १८८ (९४%) उत्तरदाते आहेत. तर एकूण ६% उत्तरदातेच २५ हजारापेक्षा जास्त उत्पन्न असणारे आहेत. माना आदिवासींचे आर्थिक मागासलेपण व दुर्बलता यावरूनच लक्षात येते.

माना आदिवासींमध्ये शेती करणाऱ्यांचे प्रमाण महत्तम आहे. शेतीला प्राधान्य देणारे किंवा वडिलोपार्जित शेती व्यवसाय असल्याने शेती करणारे जास्तीत जास्त लोक आढळतात. शिवाय शेतीव्यवसाय असा आहे की तो संपूर्ण कुटुंबाला

घरच्याघरीच व्यवसाय उपलब्ध करून देतो. त्या खालोखाल मजूरी करणाऱ्यांचे व इतर व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण आहे व अत्यल्प प्रमाण नोकरी करणाऱ्यांचे आहे. आदिवासींची कोणत्याही परिस्थितीत समाधानी राहण्याची वृत्ती पाहता माना आदिवासी त्यांच्या सद्यस्थितितील व्यवसायात समाधानी आहेत का? हे जाणून घेणे महत्त्वाचे वाटले. त्या संदर्भात ''आपण सध्या करीत असलेल्या व्यवसायात समाधानी आहात काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. ६**

**उत्तरदात्यांच्या सद्यस्थितीत करीत असलेल्या व्यवसायातील समाधान दर्शक सारणी.**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | संपूर्ण समाधानी आहे. | ९१ | ४५.५% |
| २. | अल्प समाधानी आहे. | ७३ | ३७.५% |
| ३. | मुळीच समाधानी नाही | ३३ | १६.५% |
| ५. | सांगता येत नाही. | ०३ | १.५% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, सद्यस्थितीत करीत असलेल्या व्यवसायात संपूर्ण समाधानी आहे असे उत्तर देणारे महत्तम ९१ (४५.५%) उत्तरदाते आहेत.तर अल्पसमाधानी आहे असे मत व्यक्त करणारे एकूण ७३ (३७. ५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्या मते सध्याचा व्यवसाय ठीक नाही. परंतु महागाईमुळे त्यांना आर्थिक ताण सहन करावा लागतो. सद्यस्थितीतील व्यवसायात आपण मुळीच समाधानी नाही असे उत्तर देणारे ३३ (१६.५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते सध्याच्या व्यवसायात मेहनत खूप करूनही उत्पन्न मात्र मिळत नाही. शेती पिकत नाही. मजुरी मिळत नाही. त्यांचा मुठीत ताकद आहे. ते कोणतेही काम करू शकतात. परंतु त्यांना

कामही मिळत नाही. त्यामुळे ते मुळीच समाधानी नाहीत. तर याबाबतीत काहीही सांगता येत नाही. असे तटस्थ उत्तर देणारे ०३ (१.५%) उत्तरदाते आहेत.

आदिवासी समुदाय अल्पसंतुष्टी आहे व मिळेल त्या परिस्थितीत तो समाधानी राहतो. जास्त विचार करीत नाही. त्यामुळेच पैशाच्या लोभाने तो इतरांचे अधिकार हिसकावून घेत नाही. भ्रष्टाचार करीत नाही किंवा इतरांना लुबाडत नाही. उलट तोच इतरांकडून लुबाडल्या जातो, नाडल्या जातो. वरील विवेचनावरून माना आदीवासीही यास संदर्भात काही वेगळा नाही हेच म्हणावेसे वाटते.

जे माना आदिवासी सद्यस्थितितील व्यवसायात समाधानी नाहीत. त्यांच्या असमाधानाचे कारण शोधून घेणेही महत्त्वाचे आहे. कारण माहित असल्याशिवाय त्यावर कोणतीही उपाययोजना करणे शक्य नसते त्यासंदर्भात माना आदिवासींच्या सद्यस्थितीतील व्यवसायात असमाधानी असणाऱ्या उत्तरदात्यांचे त्यामागचे कारण जाणून घेण्यासाठी, ''जर समाधानी नसाल तर कारणे सांगा.'' असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. ७**

**उत्तरदात्यांची समाधानी नसल्याची कारणे दर्शक सारणी.**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | खेडयात राहावे लागते. | २३ | ११.५% |
| २. | अर्थार्जन कमी प्रमाणात मिळणे. | ७८ | ३९% |
| ३. | व्यवसाय करण्याची लाज वाटते | ०० | ००% |
| ४. | यापेक्षा चांगला व्यवसाय करू शकतो. | ०४ | ०.२% |
| ५. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०१ | ०.५% |
| ६. | लागू पडत नाही. | ९४ | ४७% |

| | एकूण | २०० | १००% |
|---|---|---|---|

अल्पसमाधी असणारे व मुळीच समाधानी नसणारे एकूण १०६ उत्तरदाते असल्याने त्यांपैकी खेडयात राहावे लागते. असे एकूण २३ (११.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. व खेडयात शहरांप्रमाणे कोणत्याही सुविधा नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे तरं अर्थार्जन कमी प्रमाणात मिळते असे महत्तम ७८(३९%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्यांच्या मते खेर मेहनत करूनही उत्पन्न मात्र–जेमतेम मिळते. त्यात मुलांना उच्च व चांगले, दर्जेदार शिक्षण, सुविधा व अन्न देऊ शकत नाही. परिवाराचे राहणीमान सुधारू शकत नाही व कोणतीही हौस पुरवू शकत नाही त्यामुळे या व्यवसायामुळे आम्ही समाधानी नाही. सध्याचा व्यवसाय करण्याची लाज वाटते असे कोणत्याही उत्तरदात्यांचे मत नाही. यावरून ते कोणत्याही कामाला कमी लेखत नाही हे लक्षात येते. मात्र सद्यस्थितित आहे त्यापेक्षा चांगला व्यवसाय आपण करू शकतो असे एकूण ०४(२%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्यांच्यामते सद्याच्या व्यवसायापेक्षा चांगले व्यवसाय ते करू शकतात. परंतु इतर व्यवसाय करण्याची संधीच त्यांना मिळत नाही. 'त्यापेक्षा वेगळे उत्तर' देणारे ०१(०.५%) उत्तरदाते आहेत. त्यांना वाटते की त्यांच्यासोबत भेदभाव केल्या जातो. त्यांना शहरातल्या मजुरांपेक्षा त्याचसमान कामाची कमी मजूरी मिळते.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की मेहतन करूनही अर्थार्जन प्राप्त होत नाही. त्यामुळे सद्यस्थितीतील व्यवसाय करण्यात काही माना आदिवासींना समाधान वाटत नाही.

आदिवासी समुदाय हा स्थितीप्रीय असतो. कोणत्याही परिस्थितीत त्यांना आपला प्रदेश व आपला समूह सोडणे आवडत नाही. परंतु सध्याची स्थिती अशी आहे की मुलांच्या शिक्षणासाठी पैशांची अधिक आवश्यकता व जगण्यासाठी आवश्यक सोयीसुविधांसाठी पैशाची निकड भासत असते. वाढत्या गरजा व इतर लोकांकडे पाहून मुलांच्या वाढत्या गरजा व आशा–आकांक्षा पूर्ण करण्यासाठी अधिक पैसा कमविणे अनिवार्य झाले आहे. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी नाही, असल्या तर मजूरी मिळत

नाही. त्यामुळे अधिक पैसा कमविण्यासाठी गाव सोडून शहराकडे जाणे अपरिहार्य ठरते व ग्रामीण भागाकडून शहराकडे लोकांचे जथ्येच्या जथ्ये रोजगाराच्या शोधात जातांना दिसतात. ग्रामीण युवक अधिक पैसा कमविण्यासाठी, रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करतांना दिसतो.

माना आदिवासींची याबाबतीत काय मते आहेत हे जाणून घेण्यासाठी ''आपण या व्यवसाया व्यतिरिक्त इतर ठिकाणी व्यवसाय करण्यास जाण्यासाठी तयार आहात काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. ८**

**उत्तरदात्यांची व्यवसायासाठी स्थलांतराची अभिलाषा दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | चांगला असल्यास जाऊ | २२ | ११% |
| २. | चांगला असला तरी गाव सोडणार नाही. | १०२ | ५१% |
| ३. | जास्त पैसे मिळाले तर विचार करू | ६४ | ३२% |
| ४५. | सांगता येत नाही. | १२ | ०६% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, चांगला व्यवसाय असल्यास जाऊ असे म्हणणारे एकूण २२(११%) उत्तरदाते आहेत. तर जास्त पैसे मिळाले तर विचार करू असे म्हणणारे एकूण–६४ (३२%) उत्तरदाते आहेत. म्हणजे स्थलांतर करण्याची अभिलाषा बाळगणारे एकूण ८६ (४३%) उत्तरदाते आहेत. तर चांगला असला तरी गाव सोडणार नाही असे म्हणणारे महत्तम १०२ (५१%) उत्तरदाते आहेत.

याबाबतीत कोणताच निर्णय सध्या घेऊ शकत नाही. या अर्थाने सांगता येत नाही असे म्हणणारे एकूण १२(६) उत्तरदाते आहेत.

वरील विवेचनावरून माना आदिवासींची स्थितिप्रियता निदर्शनास येते. परंतु त्याचबरोबर चांगला व्यवसाय मिळाल्यास अर्थार्जनासाठी गाव सोडण्याची अभिलाषा बाळगणारे एकूण ८६ (४३%) उत्तरदाते आहेत. ही संख्या सुद्धा कमी नाही. त्यामुळे माना आदिवासींमध्ये आता परिवर्तन होत आहे व हे परिवर्तन जरी त्यांना घराचे बेघर करीत आहे असे वाटते तरी त्यांच्या विकासासाठी ते आवश्यक आहे. विकास जर आदिवासींपर्यंत पोहोचत नसेल तर आदिवासींनी विकसित ठिकाणापर्यंत जाणे यात कोणतेच गैर नाही व हे परिवर्तन यादृष्टीने एक सकारात्मक परिवर्तन ठरते.

शेती करण्याऱ्या १२ माना आदिवासींनी आपला पारंपारिक व्यवसाय सोडला आहे. त्यामुळे त्या बाबतीत जाणून घेणे अतिशय महत्त्वपूर्ण आहे. त्यासंदर्भात जाणून घेण्यासाठी संशोधिकेकडून ''आपण पारंपारिक व्यवसाय सोडला आहे काय?'' हा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. ९**

**उत्तरदात्यांची पारंपारिक व्यवसाय बदलाची स्थिती दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | २० | १०% |
| २. | नाही | १६५ | ८२.५% |
| ३. | पारंपारिक व्यवसायासोबत आधुनिक पूरक व्यवसाय करतो. | १५ | ७.५% |
| ४. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीद्वारे असे निदर्शनास येते की, पारंपारिक व्यवसाय सोडला असे उत्तर देणारे एकूण २० (१०%) उत्तरदाते आहेत. याला, कारण त्यांनी घेतलेले शिक्षण व वाढलेल्या परिवारामुळे झालेले शेतीचे तुकडे होय. कमी शेतीत कुटुंबाचे भागत नाही. त्यामुळे शेती व्यवसायात छुपी बेरोजगारीची स्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे इतरत्र कामधंदा–शोधणे त्यांना भाग पडले. पारंपारिक व्यावसाय सोडला नाही असे महत्तम १६५ (८२.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर पारंपारिक व्यवसायासोबत आधुनिक पूरक व्यवसायही करतो जसे शेतीसोबत पानठेला, चहाची टपरी चालविणे, पशूपालन अथवा जंगलातील बांबू किंवा खस आणून टोपल्या ताटवे विणणे, इत्यादी.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की पारंपारिक व्यवसाय करणारे महत्तम उत्तरदाते आहेत. त्यामुळे माना आदिवासींनी अजुनही त्यांचा पारंपारिक व्यवसाय सोडला नाही असे म्हणता येणार नाही. तर सोबतच ते इतर व्यवसायाकडेही वळायला लागले आहेत. हे एक सकारात्मक परंतु अतिशय मंदगतीने होणारे परिवर्तन आहे.

सारणी क्र. ९ नुसार पारंपारिक व्यवसाय सोडणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २० आहे. त्यांनी आपला पारंपारिक व्यवसाय का सोडला याचे कारण जाणून घेणे अपेक्षित असल्याने त्या उद्देशाने, ‘‘जर होय असेल तर का सोडला? याची कारणे सांगा’’ असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. १०

## उत्तरदात्यांची पारंपारीक व्यवसाय सोडण्याची कारणे दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पारंपारीक व्यवसाय करणे कमीपणाचे वाटते. | ०१ | ०.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | अर्थाजन कमी प्रमाणात मिळते. | ०७ | ३.५% |
| ३. | घरातील सदस्यांच्या शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागते. | ०१ | ०.५% |
| ४. | नोकरीसाठी बाहेरगावी राहावे लागत असल्यामुळे | ०२ | १% |
| ५. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०९ | ४.५% |
| ६. | लागू पडत नाही | १८० | ९०% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, पारंपारिक व्यवसाय सोडलेल्या २० उत्तरदात्यांपैकी एकूण ०१ (०.५%) उत्तरदात्यांनी पारंपारिक व्यवसाय करणे कमीपणाचे वाटते असे उत्तर दिले. अर्थाजन कमी प्रमाणात मिळते असे एकूण ०७ (३.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. घरातील सदस्यांच्या शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागते. असे उत्तर देणारे ०१ (०.५%) उत्तरदाते आहेत. तर नोकरीसाठी बाहेरगावी राहावे लागते त्यामुळे पारंपारीक व्यवसाय करू शकत नाही असे ०२ (०१%) उत्तरदाते सांगतात. यापेक्षा वेगळे उत्तर म्हणजे शहरात राहायचे आहे. काही पत्नीच्या माहेरी राहायला गेले तर काही मजुरीसाठी इतरत्र गेल्यामुळे पारंपारिक व्यवसाय सोडल्याचे एकूण महत्तम ०९ (४.५%) उत्तरदात्यांचे मत आहे.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की पारंपारिक व्यवसाय सोडण्याची विविध कारणे असली तरी महत्तम उत्तरदात्यांनी आपला पारंपारिक (वडिलोपार्जित) व्यवसाय सोडलेला नाही.

सद्यास्थितितील व्यवसायाव्यतिरिक्त इतर व्यवसाय करण्याची अभिलाषा जाणून घेण्यासाठी व शासकिय योजनांचा फायदा मिळून इतर व्यवसाय सुरू करण्याची ईच्छा जाणून घेण्यासाठी ‘‘या व्यवसायाव्यतिरिक्त आपण आणखी कोणता व्यवसाय करू

इच्छिता?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. ११

## उत्तरदात्यांची सध्यस्थितितील व्यवसायाव्यतिरिक्त इतर व्यवसाय करण्याची अभिलाषा दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | सरकारी नोकरी | १० | ०५% |
| २. | खाजगी नोकरी | ०८ | ०४% |
| ३. | खाजगी व्यवसाय | ९३ | ४६.५% |
| ४. | यापेक्षा वेगळे उत्तर | ८९ | ४४.५% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, शिक्षण घेतलेल्या परंतु नोकरी न मिळालेल्या १०(५%) उत्तरदात्यांची सरकारी नोकरी करण्याची इच्छा आहे. नाही सरकारी तर खाजगीच चालेल असे म्हणणारे व खाजगी नोकरी असे उत्तर देणारे एकूण ०८ (०४%) उत्तरदाते आहेत. तर शासकिय योजनेचा लाभ मिळाल्यास खाजगी व्यवसाय सुरू करण्याची अभिलाषा ९३ (४६.५%) उत्तरदात्यांची आहे. यापेक्षा वेगळे उत्तर म्हणजे शेती व्यवसाय असल्याने सद्यस्थितितील व्यवसायच ठीक असल्याचे सांगणारे एकूण ८९ (४४.५%) उत्तरदाते आहेत.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की सद्यस्थितीतील व्यवसायच ठीक म्हणणारे उत्तरदाते अधिक आहेत तर खाजगी व्यवसाय शासकिय योजनेच्या मदतीने करू इच्छिणाऱ्यांचीही संख्या महत्तम आहे. यावरून पारंपारीक व्यवसाय सोडून

इतर नोकरी व व्यवसाय करू इच्छिणारे माना आदिवासी त्यांच्या परंपरागत व्यवसायाच्या बाहेर निघू इच्छितात. त्यांच्या गरिबीला ते आता कंटाळले आहेत व मेहनतच करायची तर जिथे जास्त पैसे मिळतील तिथे करू अशी त्यांची इच्छा आहे. व त्यांच्या अर्थव्यवस्थेतील हे एक सकारात्मक वैचारिक परिवर्तन आहे असे म्हणायला हरकत नाही.

''आर्थिक विकासाच्या विविध योजना सुरू करण्यात आल्या. पूर्वी आदिवासी स्थानांतरित शेती करीत होते. पण आज स्थिर शेती करायला लागले. आदिवासींनी नवीन तंत्रज्ञान शिकून उदर निर्वाहापुरते उत्पादन नकरता विक्री करण्याकरिता काही आदिवासी उत्पादन करतात. तर शेती सोबतच पुरक व्यवसायही करू लागले आहेत. तर काही आदिवासी औदयोगिक क्षेत्रात मजूर म्हणूनही काम करू लागले आहेत. प्रगत समाजाच्या संपर्कामुळे आदिवासींमध्ये आत्मनिर्भरता निर्माण होत आहे. परंतु त्यासेबतच काही परिवर्तनेही होत आहेत. एवढे सर्व होत असूनही १९९१ च्या जनगणनेत ९०.९४ एवढे आदिवासी दारिद्ररेषेखाली जगतात. ही एकच गोष्ट त्यांच्या आर्थिक मागासलेपणाची साक्ष देते.'' [७] सध्या दारिद्ररेषेखाली कमीतकमी कुटुंब यावेत म्हणून विविध स्तरांवरून प्रयत्न करण्यात येतात. आदिवासींचे राहणीमान सुधारावे यासाठी त्यांना विविध योजना लागू केल्या जातात. शासकिय पातळीवरून राबविणाऱ्या योजनांमध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण फार मोठे आहे. परंतु त्याहीपेक्षा गैरसरकारी संस्थामधून व इतर स्वयंसेवी संस्थामधून आदिवासींच्या नावावर शासनाला लुबाडण्याचे कार्य मोठया प्रमाणावर सुरू आहे. या संस्थातील कर्मचाऱ्यांचा व अधिकाऱ्याचा पगार जेमतेम असतो, परंतु नोकरीवर लागताच वर्षादोन वर्षातच कित्येक कर्मचारी व अधिकारी विविध प्रकारे संपत्ती जमा करतात. निव्वळ 'फोटो' काढून शासनाला प्रोजेक्ट दाखविले जातात. परंतु प्रत्यक्षात मात्र हे घोटाळे सुरू आहेत. निरक्षर आदिवासींना योजनेखाली मिळणारे साहित्य–परस्पर विकूण टाकणे, कमी साहित्य देऊन ज्यादा साहित्यावर आंगठा किंवा स्वाक्षरी घेणे अशाप्रकारे अतोबात नाडल्या जात आहेत आणि जे काही आदिवासींना

मिळते त्यातही काही आदिवासी निव्वळ दारूसाठी व थोडया पैशासाठी मिळालेले साहित्य कमी पैशात इतरांना विकून टाकतात.

अशाप्रकारे योजनांचा निव्वळ कागदोपत्री कारभार चालतांना आढळतो. मात्र एवढा घोटाळयांचा पैसा ज्यांच्या 'कर' भरण्यातून जातो ते मात्र 'हे लोक शासनाला लुबाडतात, आमचे काय जाते? असे म्हणून मुग गिळून बसतात. भ्रष्टाचारी लोक आदिवासींनाच नाडत नाहीतर योजनांसाठी ज्यांच्यावर करांचा बोजा पडतो त्या सर्व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर भरणाऱ्यांना सर्वांनाच डोळयांदेखत लुबाडत असतात हे वास्तव नाकारता येणार नाही.

तरीही शासन आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांच्यासाठी विविध योजना राबविण्याच्या आटोकाट प्रयत्न करीतच आहे. विकासाचे मोजमाप करण्यासाठी विविध घटकांचा अंतर्भाव करण्यात येतो. एखादया समुहाच्या राहणीमानाचा दर्जा ठरविण्यासाठी त्यांचे राहते घर, त्यांच्या घरातील सुखसुविधांच्या भौतिक वस्तू इत्यादींचा आधार घेतल्या जातो. म्हणजे त्यांच्या संपत्तीवरून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा ठरविल्या जातो. समाजात वावरतांना ही संपत्ती ज्याला म्हणजो त्या आपल्या मालकीच्या वस्तूवरूनच इतर लोक त्याचा सामाजीक दर्जा ठरवितात व त्याला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देतात. त्यामुळे साहजिकच कोणत्याही समुहाचा आर्थिक बाबतीत अभ्यास करतांना त्यांच्या संपत्तीचा आढावा घेणे क्रमप्राप्तच ठरते. डॉ. प्रदीप आगलावे यांच्या मते, ''संपत्तीची संकल्पना आणि मालकी हक्क यांचा जवळचा संबंध आहे. वस्तूवर व्यक्ती आणि समूह यांचा असलेला अधिकार म्हणजे मालकी होय आणि मालकीत असलेल्या वस्तू म्हणजे संपत्ती होय. महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या वस्तू मग त्या वस्तू मूर्त किंवा अमूर्त असो, त्यांचा समावेश संपत्ती अंतर्गत केल्या जातो. त्यामुळे निवास, अन्न संकलन किंवा अर्थोत्पादनात उपयोगात आणली जाणारी, घरे, अन्नपदार्थ, कपडे, हत्यारे, मंत्र व गाणी इतयादी उपयुक्त अशा मुर्त आणि अमुर्त बाजुंना संपत्ती मानण्यात येते.''[८] आदिवासींची संपत्ती म्हणजे त्यांची घरे, पशू, व त्यांच्या घरातील वस्तू तसेच त्यांच्या मालकीची शेतजमिन इत्यादी असतात.

आदिवासींची घरे लहान झोपडीवजा अथवा कौलारू मातीची असतात. सध्या घरकूल योजनेद्वारा बऱ्याच आदिवासींना सिमेंट विटांची पक्की घरे बांधून देण्यात येत आहेत. तरी परंतु कौलारू मातीची व झोपडीवजा घरेच अधिक प्रमाणात दिसून येतात. माना आदिवासींचा आर्थिक अभ्यास करतांना त्यांच्या राहणीमानाचा आढावा घेणे महत्वाचे वाटते. त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा ठरविण्यासाठी व त्यांत होणारे परिवर्तन जाणून घेण्यासाठी त्यांचे राहते घर व घरातील सुखसुविधांच्या भौतिक वस्तूंबाबत जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधिकेने केला. त्यासंदर्भात विविध प्रश्न विचारण्यात आले. आधुनिक काळात जिथे सर्वांना आवश्यक असतील व निसर्गाची, पर्यावरणाची हानी होणार नाही, त्याचप्रमाणे पर्यावरण दुषित होणार नाही, आरोग्याला पोषक ठरतील अशाप्रकारच्या सुखसुविधांच्या भौतिक वस्तू सर्वांकडे असणे गरजेचे आहे. त्यात माना आदिवासींकडे या अत्यावश्यक गरजांची पूर्ती झालेली आहे काय? या संदर्भात जाणून घेण्यासाठी हा आढावा घेण्यात आला.

या संदर्भात, ''आपले घर कशाप्रकारचे आहे?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. १२

## उत्तरदातयांच्या निवाऱ्याचे स्वरूप दर्शक सारणी

## दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मातीचे घर | १४४ | ७२% |
| २. | विटा सिमेंटचे १ मजली | ५१ | २५.५% |
| ३. | विटासिमेंटचे २ मजली | ०० | ००% |
| ४. | गवती झोपडी | ०५ | २.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, मातीचे घर आहे असे महत्तम १४४ (७२%) उत्तरदात्यांनी सांगितले. तर विटा–सिमेंटचे १ मजली परंतु कौलारू घर आहे असे ५१ (२५.५%) उत्तरदात्यांनी सांगितले. यात नोकरी करणारे कर्मचारी वर्ग त्याचप्रमाणे घरकुल योजना मिळालेले उत्तरदाते आहेत. विटासिमेंटचे २ मजली घर कुणाचेही नाही. तर गवती झोपडी आहे असे ०५.(२.५%) उत्तरदात्यांनी उत्तर दिले. प्रत्यक्ष मुलाखत अनुसूची भरतांना संशोधिकेने या वास्तवाचे निरिक्षण केलेले आहे. त्यामुळे हे सत्य नाकारता येत नाही की महत्तम माना आदिवासींचे राहते घर अजूनही परंपरागत आहे. करोडो रूपयांच्या योजना राबवूनही २.५% माना आदिवासींची घरे गवती झोपडी असणे हे भारतासारख्या महान देशाला कमीपणा आणणारे आहे असे वाटते. चार माणसांच्या कुटुंबासाठी करोडो रूपयांचे बंगले असतांना अजूनही गरिब आदिवासींना साधे मातीचेही घर मिळू नये हे आर्थिक विषमतेचे एक मोठे उदाहरण आहे असे म्हणावेसे वाटते.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की माना आदिवासींच्या राहत्या घराच्या परिवर्तनाची गती अतिशय मंद, कासव पावलाने आहे याबाबत शंकाउरत नाही.

आधुनिक सुख–सुविधांच्या वापरासाठी व एकूणच विकासाचे घटक म्हणून घरातील वीज (electric) चे महत्त्व नाकारता येणार नाही. आज प्रत्येक गावात व प्रत्येकाच्या घरात वीज असणे आवश्यक आहे. शासनाने वीज महामंडळाचे खाजगीकरण केल्याने वीज अतिशय महाग झालेली आहे. परंतु शासनाने अतिशय कमी दरात गरीब आदिवासींना वीज उपलब्ध करून दिलेली आहे. तरिही त्याचा लाभ सर्वांनी घेतला असे दिसत नाही. याबाबतीत जाणून घेण्यासाठी ‘‘आपल्या घरात वीज (electric) आहे काय? असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. १३

## उत्तरदात्यांच्या घरी अत्यंत आवश्यक असलेली वीजेची (electric) उपलब्धता दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १४५ | ७२.५% |
| २. | नाही | ५५ | २७.५% |
| ३. | होती, परंतु बील न भरल्यामुळे बंद आहे. | ०० | ००% |
| ४. | गरज नाही | ०० | ००% |
| ५. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, वीज आहे म्हणणारे एकूण १४५ (७२.५%) उत्तरदाते आहेत. तर वीज नाही म्हणणारे एकूण ५५ (२७.५%) उत्तरदाते आहेत. वीज आहे असे उत्तरदात्यांची संख्या जरी महत्तम असली तरी नाही म्हणणाऱ्यांची संख्याही लक्षात घेण्यासारखी आहे. सर्वांच्या घरी वीज असणे हे शासनाचे ध्येय असतांना ज्यांची ऐपत नाही त्यांच्या घरी वीज नाही हे योग्य होणार नाही.

२७.५% माना आदिवासींच्या घरी वीज नसणे हे आर्थिक मागासलेपणाचे लक्षण आहे असे म्हणायला हरकत नाही.

जंगलतोडीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे त्याला गोबरगॅस व एल—पी—जी गॅस हा एक चांगला पर्याय आहे. जंगलातून लाकूड आणण्यासाठी बंदी व रॉकेलचा तुटवडा त्यामुळे प्रत्येक घरी स्वयंपाकाचा गॅस असणे आवश्यक झाले आहे. यासंदर्भात शहरांमधून जी आता मूलभूत गरज झालेली आहे, कारण गॅस नाही तर स्वयंपाक नाही व स्वयंपाक नाही व स्वयंदाक नाही तर अन्न नाही असा स्वयंपाकाचा गॅस माना आदिवासींच्या किती घरांतून उपलबध आहे हे जाणून घेण्यासाठी ''आपल्या

घरात स्वयंपाकाचा गॅस आहे काय?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. १४**

**उत्तरदात्यांच्या घरी अत्यावश्यक असलेली स्वयंपाकाच्या गॅसची उपलब्धता दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | २४ | १२% |
| २. | नाही | १७५ | ८७.५% |
| ३. | गोबर गॅस आहे. | ०१ | ०.५% |
| ४. | गॅस आहे परंतु पैशाअभावी सिलेंडर आणता येत नाही. | ०० | ००% |
| ५. | लागू पडत नाही. | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, स्वयंपाकाच्या गॅसची उपलब्धता केवळ २४ (१२%) उत्तरदात्यांकडे आहे. त्यामध्ये भद्रावती तालुक्यातील मासळ या गावी शासकिय योजनेतून मिळालेल्या गॅसच्या उपभोक्तयांचा अधिक समावेश आहे. इतर नोकरी असणारे उत्रदातेच असे आहेत ज्यांच्या घरी स्वयंपाकाचा गॅस आहे. तर पशुपालन असल्याने गोबर गॅस आहे असे केवळ ०१ (०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. कोणत्याही प्रकारची गॅस सुविधा उपलब्ध नाही असे महत्तम १७५(८७.५%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे. त्यांना जंगलातून पशू व वनअधिकाऱ्यांची भिती असतांनाही डोक्यावरून मोळया वाहून आणाव्या लागतात. बऱ्याचवेळा वन अधिकारी त्यांच्या कुऱ्हाडी घेऊन जातात. बैलबंडीने जळाऊ लाकूड जंगलातून आणण्याची परिस्थिती आता राहिलेली नाही. त्यामुळे एवढया मोठया प्रमाणातील आदिवासींना जळाऊ इंधनाची समस्या भेडसावत आहे.

गॅस सिलेंडरची उपलब्धता ८७.५% माना आदीवासींजवळ नसणे ही एक आर्थिक मागासलेपणाचे लक्षणच म्हणता येईल यात शंका नाही.

विकसनशील व विकसित देशांच्या विकासाचा निर्देशांक ठरवितांना प्रत्येक घरातील भौतिक सुविधांचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे. त्यावरूनच विकासाची कल्पना आपण करू शकतो. शहरीभागांतून राहणाऱ्या घराघरांतून आपल्याला आता या वस्तू कमी–अधिक प्रमाणात दिसतात. भारतासारख्या देशात कमालीची अधिक विषमता आढळते. काही लोकांचे मोठमोठे बंगले, गाडया, चैनीच्या वस्तू भरभरून आहेत. मात्र त्यांचा उपभोग घेणाऱ्या व्यक्ती नाममात्रच आहेत. तर महत्तम लोक एकाच खोलीत राहतात. त्यांना वैयक्तिकता लाभत नाही. किंवा त्यांच्या घरांतून कोणत्याही भौतिक सुविधा आढळून येत नाही. भौतिक सुविधा तर दूरच परंतु अन्न, वस्त्रासाठीही जे दिवसभर राबराब राबतात तरिही त्यांना ते पुरेसे मिळत नाही. याबाबतीत गुरूनाथ नाडगोंडे यांच्या मते, ''महाराष्ट्रातील सर्व आदिवासी जमातीचे प्रश्न देशातील इतर भागांत असणाऱ्या आदिवासींसारखेच आहेत. शैक्षणिक व आर्थिक दृष्टया त्यांची परिस्थिती शोचनीय आहे. वाहतुक, पिण्याचे स्वच्छ पाणी, पक्की घरे, वैदयकिय सोयी, शैक्षणिक सोयी यांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. एवढेच नव्हे तर आर्थिक पिळवणुकीचा प्रश्न सर्वांत गंभीर आहे. त्यातच त्यांच्या उन्नतीला घातक ठरतील अशा त्यांच्या रीतिरिवाजांची भर पडलेली आहे.''[१] अशाप्रकारचे विवेचन आदिवासींच्या संदर्भात जवळपास सर्वच विचारवंत, अभ्यासक व समाजशास्त्रज्ञांनी केलेले आहे. जे अतिशय जळजळीत वास्तव आहे.

यांना आदिवासींच्या बाबतीतली परिस्थिती या संदर्भाने जाणून घेण्यासाठी, ''आपल्या घरात आधुनिक सुखसोयीच्या कोणकोणत्या वस्तू आहेत?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. १५

## उत्तरदात्यांची त्यांच्या घरात असलेल्या मूलभूत सुविधांची उपलब्धता

## दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | फक्त पंखा | ६७ | ३३.५% |
| २. | पंख व रेडीओ | १९ | ९.५% |
| ३. | पंख, टिव्ही, रेडिओ/ टेपरेकॉर्डर | ०४ | २% |
| ४. | पंख, टिव्ही, रेडीओ/ टेपरेकॉर्डर व मोटरसायकल | ०१ | ०.५% |
| ५. | ठतर | ०० | ००% |
| ६. | कोणतीच वस्तू नाही | १०९ | ५४.५% |
| | एकूण | २०० | १००% |

५५ (२७.५%) उत्तरदात्यांकडे वीज (electric) ची उपलब्धता नाही. त्यामुळे त्यावर आधारित इतर भौतिक सुविधा असण्याचा संभव नाही. 'फक्त पंखा' उपलब्ध असणारे एकूण ६७(३३.५%) उत्तरदाते आहेत. तर पंखा व रेडीओ उपलब्ध असणारे १९(९.५%) उत्तरदाते आहेत. या वस्तू बऱ्याच प्रमाणात लग्नसमारंभात सप्रेम भेट दिल्या जातात. पंखा, टिव्ही, रेडीओ टेपरेकॉर्डर यांची उपलब्धता असणारे ०४ (२%) उत्तरदाते आहेत. तर पंखा, टिव्ही,रेडिओ/टेपरेकॉर्डर व मोटरसायकल यांची उपलब्धता असणारे केवळ ०१ (०.५%) उत्तरदाते आहेत. यांपैकी कोणतीच वस्तू उपलब्ध नाही असे महत्तम १०९ (५४.५%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे. याचे महत्वाचे कारण एकतर त्यांच्या घरी वीज उपलब्ध नाही व दुसरे म्हणजे त्यांची आर्थिक पारिस्थिती फार हलाखिची असल्याने त्या वस्तू ते विकत घेऊ शकत नाही.

एकूणच माना आदिवासींचे इतर आदिवासींप्रमाणे आर्थिक मागासलेपणा आपल्या लक्षात येतो.

सततचे साथीचे रोग ग्रामीण भागांतून वारंवार येतात. त्याचे महत्वाचे कारण— म्हणे दुषित पाणी आणि दुषित पाण्याला कारणीभूत असणारे गावाच्या बाहेरील रस्ते होत. ग्रामीण भागात लोक रस्त्याच्या दुतर्फा शौचालयाला बसतात. व सर्वत्र घाण—पसरली जाते. त्यामुळे पावसाळयात जेथे शेतांत जाण्यासाठी जागा नसल्याने गावालगतच रस्त्यांच्या दुतर्फा घाण पसरल्याने पावसाच्या पाण्यामुळे विहिरींच्या व इतर पाण्यामध्ये मिसळली जाते. त्यामुळै कावीळ, कॉलरा, टायफाइड अशाप्रकारचे साथीचे रोग अतिशय मोठया प्रमाणात पसरतात. शिवाय बाहेर शौचालयास गेल्यामुळे रहदारी असल्याकारणे वारंवार उभे राहिल्याने पोट निट साफ होत नाही व स्त्रियांना पोटाचे अनेक विकास जडले जातात. त्यामुळे शौचालयाची आवश्यकता व त्याच्या वापराची आवश्यकता आपल्या लक्षात येते. शासन या संदर्भात वारंवार शौचालय बांधण्याची योजना राबवित आहे. आर्थिक परिस्थितीप्रमाणे साधे शौचालय व सैष्टीक शौचालय, तर कोणत्या गावांतून सामुहिक शौचालय बांधले जात आहेत. घरोघरी शौचालय बांधण्याची योजना मोठया प्रमाणावर कार्यान्वित करण्यात आली. लोकांनी योजनेचा लाभ घेतला. बऱ्याच लोकांनी शौचालय बांधले. परंतु घरच्याघरी शौचालयास जाणे त्यांना आवडत नाही. व त्यासंदर्भात अनेक गैरसमज असल्याने त्या शौचालयाचा वापर करतांना आढळत नाही. त्या शौचालयांना त्यांनी स्नानघर बनविले तर कुणी गोवऱ्या, काडया भरून ठेवण्यासाठी त्याचा उपयोग केला. बऱ्याच जणांना जागा उपलब्ध नसल्याने त्यांनी शौचालय बांधून घेतले नाही. तर कुणी योजनेचा पैसा मिळाला नाही म्हणून शौचायल बांधले नाही.

सध्या कोणत्याही लोकप्रतिनिधींना व शासकिय कर्मचाऱ्यांना घरी शौचालय असणे व ते उपयोगात आणणे शासनाने अनिवार्य केलेले आहे. माना आदिवासींची या संदर्भात काय परिस्थिती आहे हे जाणून घेण्यासाठी ''आपल्या घरात

शौचालय बांधलेले आहेत काय?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत  दर्शविलेल्या आहे.

### सारणी क्र. १६

### उत्तरदात्यांच्या निवासस्थानी आरोग्यासाठी आवश्यक असलेली शौचालयाची उपलब्धता दर्शक सारणी

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | होय | ५५ | २७.५% |
| २. | नाही | ११५ | ५७.५% |
| ३. | बांधलेपण वापरत नाही. | ३० | १५% |
| ४. | यापेक्षा वेगळे इतर | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते  की, शौचालय घरी आहे व वापरत आहे असे म्हणणारे एकूण ५५ (२७.५%) उत्तरदाते आहेत. तर शौचालय घरी बांधले आहे परंतु वापरत नाही असे ३० (१५%) उत्तरदात्यांचे मत आहे. शौचालय घरी नाही असे महत्तम ११५ (५६.५%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे.

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, ५७.५% उत्तरदात्यांकडे शौचालय नाही. याचाच अर्थ सर्वांच्या घरी शौचालय ही शासनाची योजना पूर्णपणे यशस्वी झाली नाही व तिचा लाभ संपूर्ण  माना आदिवासींना मिळाला नाही.

भारतीय रहिवासी म्हणून पुरावा व अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तू मिळविण्याचे साधन म्हणजे 'शिधापत्रिका' (राशनकार्ड). शिधापत्रिका असणे प्रतयेक नागरिकांसाठी अनविार्य बाब आहे. पूर्वी सर्वांना शिधापत्रिकेवरील एककानुसार सर्वांना समान—दरात स्वस्त अन्नधान्य व इतर जीवनोपयोगी वस्तुंचा पुरवठा करण्यात येई. परंतु

सध्या आर्थिक गट पाडून त्यानुसार कुटुंबाच्या एककांच्या प्रमाणात अन्नधान्याच्या किंमती वेगवेगळया ठरवून अन्नधान्य व इतर वस्तू पुरविल्या जातात.

उत्पन्नच्या मर्यादेवरून शिधापत्रिकेचा रंग ठरविलेला आहे. पांढरे रंगाच्या शिधापत्रिकेला सध्या कोणतेही धान्य स्वस्त धान्य दुकानातून मिळत नाही. तर केशरी रंगाच्या शिधापत्रिकेला मिळणारे धान्य अतिशय महाग असल्याने ते कुणीही घेत नाहीत. पिवळे व फिकट पिवळे रंगाची शिधापत्रिका म्हणजे दारिद्रयरेषेखालील (ग्रामीण भागासाठी उत्पन्न रू. ११,०६० पेक्षा कमी) व अंत्योदय लाभार्थी त्यांना किमान दरात धान्य व इतर जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्या जातात.

माना आदिवासींना त्यांच्या आर्थिक बाबतीत उत्पन्नाच्या कोणत्या गटात शासनाने सामिल करून घेतले आहे. हे जाणून घेण्यासाठी ''आपल्याकडे कोणत्या रंगाची शिधापत्रिका आहे?'' असा प्रश्न विचारण्यात आला त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. १७**

**उत्तरदात्यांकडे असलेल्या शिधापत्रिकेबाबत माहितीदर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पांढरे | ०४ | ०२% |
| २. | पिवळे व फिकट पिवळे | १११ | ५५.५% |
| ३. | केशरी | ७० | ३५% |
| ४. | कार्डच नाही | १५ | ७.५% |
| | एकूण | २०० | १००% |

शिधापत्रिका ही त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थितीची निदर्शक आहे. दारिद्रयरेषेखालील शिधापत्रिका असली तर अनेक योजनांचा लाभ घेता येतो. अन्यथा मिळत नाही. जर एकत्र कुटुंब असेल व त्यांची शिधापत्रिका दारिद्रय रेषेखालील किंवा

अंत्योदय असेल व त्यांनतर कुटुंब विभक्त झाले तर त्या कुटुंबातील विभक्त झालेल्या त्याच्या मुलाच्या कुटुंबाला मात्र दाद्रियरेषेखालील किंवा अंत्योदयाची शिधापत्रिका तहसिल कार्यालयाकडुन दिल्या जात नाही. तर केशरी रंगाची अधिक उत्पन्न असलेली शिधापत्रिका दिल्या जाते त्यामुळे त्यांना कोणताही लाभ मिळत नाही. शिवाय स्वस्त धान्य दुकानातून निव्वळ तांदूळ, गहू व साखर इत्यादी वस्तूच उपलब्ध करून दिल्या जातात.

वरील सारणीचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, पांढऱ्या रंगाची शिधापत्रिका असणारे ०४ (२%) उत्तरदाते आहेत त्यांच्याकडे नोकरी आहे. केशरी रंगाची शिधापत्रिका असणारे ७० (३५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्याकडे भरपूर शेती आहे. पिवळे व फिकट पिवळे रंगाची शिधापत्रिका असणारे महत्तम १११ (५५.५%) उत्तरदाते आहेत ते दारिद्रिय रेषेखालील व अंत्योदय आहेत. तर कार्डच उपलब्ध नाही असे म्हणणारे एकूण १५ (७.५%)  उत्तरदाते आहेत.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की, सर्वांना सर्व कामाकरिता शिधापत्रिका अनिवार्य असतांनासुद्धा ७.५% माना आदिवासी कुटुंबाजवळ शिधापत्रिका नाही. त्यामुळे ते सर्वच योजनांपासून वंचित आहेत. तर फक्त ४(२%) उत्तरदात्यांजवळ पांढरे कार्ड असणे म्हणजे २% माना आदिवासींचा उत्पन्नाच्या वरच्या गटात मोडतात. तर १११ (५५.५%) माना आदिवासी हे दारिद्रेरेषेखालील व अंत्योदयात येतात. यावरून त्यांचे आर्थिक मागासलेपण लक्षात येते.

आदिवासींच्या भोळेपणाचा फायदा सर्वत्रच होतांना व त्यांच्यासाठी येणाऱ्या योजना लाटतांना लोक दिसतात. तेव्हा स्वस्त धन्य दुकानातून माना आदिवासींना त्यांच्या हक्काचे धान्य व इतर जीवनोपयोगी वस्तू मिळते का? हे जाणून घेणे महत्वाचे आहे. कारण इतर कोणत्याही योजनेपेक्षा स्वस्त धान्य दुकानातून मिळण्याऱ्या धान्याच्या बळावरच आज कित्येक कुटुंब जीवंत आहेत. अन्यथा ते केव्हाच

महागाईमुळे भुकेने तडफडून मृत्यु पावले असते. स्वस्त धान्य दुकानाचे मालक ही संपूर्ण धान्य मागणी करतात. मात्र महिनाभर धानय वाटप न करता महिन्यातील काही दिवसच वाटप करतात व वेळेवर पैसे नसल्यामुळे धान्य न सोडवू शकलेल्यांचे धान्य बाजारपेठांत ज्यादा दराने विकून टाकतात. परंतु आदिवासींना व इतरही लोकांना मात्र स्वस्त धान्य दुकानदार दर महिन्याला धान्य वाटप करतो असेच वाटते. शिवाय तो दुकानदार तेल व इतर वस्तू आणत नाही. त्यामुळे निव्वळ तांदूळ, गहू व साखर इत्यादिवरच सर्वांना समाधान मानावे लागते.

या संदर्भात जाणून घेण्यासाठी ''स्वस्त धान्य दुकानात आपल्याला आपल्या वाटयाचे महिन्याचे संपूर्ण धान्य योग्य दरात मिळते काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. १८**

**उत्तरदात्यांची स्वस्त धान्य दुकानात मिळणाऱ्या धान्याबाबतची उपलब्धता दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | दर महिन्याला मिळते | १३४ | ६७% |
| २. | कधी कधी मिळते | १२ | ०६% |
| ३. | कधीच मिळत नाही | २० | १०% |
| ४. | महिन्यातून काही दिवसच वाटत होत असल्याने वेळेवर पैसे नसल्यास धान्य मिळत नाही. | १९ | ९.५% |
| ५. | सनासुदीलाच मिळते. | ०१ | ०.५% |
| ६. | केशरी व पांढरे शिधापत्रिका असल्यामुळे व कार्डच नसल्यामुळे मिळत नाही. | १४ | ०६% |
| | एकूण | २०० | १००% |

दर महिन्याला धान्य मिळते असे म्हणारे एकूण महत्तम १३४ (६७%) उत्तरदाते आहेत. कधी—कधी मिळते असे म्हणणारे १२ (०६%) उत्तरदाते आहेत. कधीच मिळत नाही अशी तक्रार करणारे २० (१०%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते स्वस्त धान्य दुकानदार त्यांना असणारे केशरी रंगाचे शिधापत्रिकेचे धान्य तहसिल कार्यालयातून कधीच सोडवून आणत नाही. महिन्यातून काही दिवसच वाटत होत असल्याने वेळेवर पैसे नसल्यास धान्य मिळत नाही असे १९ (९.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. हे जरी ९.५% उत्तरदात्यांचे म्हणणे असले तरी हीच परिस्थिती प्रतयेक गावात दिसून येते. सनासुदीलाच मिळते असे ०१ (०.५%) उत्तरदाते म्हणतात. तर केशरी व पांढरी शिधापत्रिका असल्याने व कधी काही जणांजवळ शिधापत्रिकाच नसल्याने धान्य मिळत नाही असे १४(०७%) उत्तरदात्यांचे मत आहे.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की दर महिन्याला धान्य मिळते असे जरी महत्तम उत्तरदात्यांचे म्हणणे असले तरीसुद्धा त्यांनाही महिन्याकाठी काही दिवसच धान्य वाटप सोडवावा लागतो. तेवढया वेळात पैसे नसल्यास धान्य सोडवू शकत नाही व ते धान्य त्यांच्या नावावर खपवून स्वस्त धान्य दुकानदार ते धान्य— बाजारात जास्त दराने विकत  असतो. कोणत्याही प्रकारे व परिस्थितीत आदिवासी समुदायाचे शोषण होते हेच यावरून सिद्ध होते असे म्हणावयास जागा राहते.

संपत्तीच्या संकल्पनेत कुटुंबाच्या मालकीची किंवा एखादया व्यक्तिच्या मालकीची शेतजमिन येते. ग्रामीण भागात जीवन सर्वस्वी शेतीवर अवलंबून आहे असे आपण म्हणतो. परंतु शहरी लोकसुद्धा भरपूर प्रमाणात शेती खरेदी करून त्या कसण्यासाठी ग्रामीण लोकांना देत आहेत असे निदर्शनास येऊ लागले आहे. भरपूर पैसा असल्याने अधिकारी कर्मचारी व मोठे राजकारणी नेते यांनी भरपूर शेतजमिनीची खरेदी केलेली आहे व ते स्वत: ती न कसता नोकरांमार्फत व मजुरांमार्फत कसवून घेतांना आढळतात. भारताला कृषिप्रधान देश म्हणतात कृषीला प्रधानता देणे, महत्त्व देणे व पर्यायाने त्यांच्या विकासाला प्रथम महत्त्व देवून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे

शासनाचे प्रथम कर्तव्य ठरते. डॉ. प्रदीप आगलावे यांच्या मते, ''नैसर्गिक संपत्तीमध्ये भूमी ही विशेष महत्वाची बाब आहे. मानावाचा भूमीशी केवळ आर्थिक संबंधच असतो असे नाही. मानवाचे वेगळया प्रकारचे संबंध असतात. म्हणून जन्मभूमीला पवित्र मानले जाते. जमीन मानावाला अन्न देते. म्हणून जमिनीला भू—माता मानले गेले आहे. शेतकऱ्यांना आपल्या जमिनी—विषयी आपुलकी असते. ती त्याची अमोल अशी संपत्ती असते. म्हणून भूमीचे महत्व हे केवळ पैशाच्या आधारावर असते असे नाही तर त्यापेक्षा भूमी त्यांच्यासाठी सर्व काही असते. कारण भूमीवरच त्यांची आणि त्यांच्या कुटुंबाची उपजीविका अवलंबून असते. आदिवासी समाजात भूमीचे विशेष महत्त्व आहे.''[१०] अशाप्रकारे भूमीचे महत्त्व सर्वांसाठीच विशद केलेले आहे. डॉ. विरेन्द्रनाथ सिंह यांच्या मते, ''ग्रामीण समाज मुख्यतः कृषिव्यवसाय से जुड़ा है। ''[११] ग्रामीण समाजाला कृषि व कृषिवर आधारित लहान—मोठे व्यवसाय त्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे ग्रामीण विकास साधायचा असेल तर कृषिपद्धतीत सुधारणा व विकास घडवून आणणे तसेच त्यावर आधारित उदयोगांना चालना देणे व त्याचे शिक्षण देऊन त्यासाठी आर्थिकमदत करणे अपरिहार्य आहे. या बाबतीत ''महात्मा गांधींजी म्हणतात, ''स्वातंत्र्यता ही खालून वर सुरू झाली पाहीजे. अशाप्रकारे प्रत्येक गाव गणराज्य अथवा पंचायतीचे राज्य असेल त्याच्याजवळ संपूर्ण सत्ता आणि शक्ती असेल याचा अर्थ असा की, प्रत्येक गाव आत्मनिर्भर असेल. आपल्या गरजा आपल्या गावातच पूर्ण झाल्या पाहीजेत की ज्यामुळे आपला गावगाडा स्वतःच चालवू शकतील. एवढेच नव्हेतर संपूर्ण जगाच्या विरूद्ध आपले संरक्षण स्वतःच करू शकतील.'' [१२] यातूनच महात्मा गांधीजींची गाव—गणराज्याची स्पष्ट रूपरेषा दिसून येते. त्यांचे 'गाव—सुखी तर देश सुखी' ही धारणा लक्षात येते. भारतात सर्वप्रथम ग्रामीण स्वायत्तताच अस्तित्वात होती. परंतु आधुनिकीकरणाने व औदयोगिकरणाने शहरीकरणाला चालना मिळाली आणि मजूरी—नोकरीच्या शोधात लोक घरेदारे, शेतीवाडी सोडून परिवारासहीत शहरात येऊन बसले. आता ग्रामीण भागात शिकले सवरले लोक राहतांना दिसत नाहीत. मात्र

आदिवासी समुदायाने अजुनपर्यंत खेडी ओसाड पडू दिली नाही. त्यांनी शेती करणेही सोडले नाही ते परवडो अगर न परवडो शेतीची सेवाच करतांना आढळतात.

मात्र आदिवसींच्या शेतीसंबंधाने अनेक समस्या असल्याचे आपल्या निदर्शनास येते. पूर्वी त्यांच्याकडे खूप शेतजमिनी होत्या. आता मात्र फार कमी शेतजमिनी राहिल्याचे दिसून येते. यासंबंधाने अनेक सुरक्षात्मक कायदेही केले गेले आहेत. ''प्रचलित कायदयांमध्ये सुधारणा करून आदिवासींची जमीन बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत होऊन देणे तसेच आदिवासींच्या बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत झालेल्या जमिनींचा कब्जा पुन्हा प्रस्थापित करणे हे दोन हेतु आदिवासींच्या हस्तांतरीत जमीनीबद्दलच्या  या कायदयांचे आहेत. वर नमुद केल्याप्रमाणे कायदा क्रमांक ३५/७४ प्रमाणे ६ जुलै १९७४ नंतरच्या आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरणाचा तसेच सकृतदर्शनी अवैध वाटणाऱ्या हस्तान्तरणाची जिल्हा– धिकाऱ्यांनी चौकशी करायची आहे. खात्री पटल्यावर ती हस्तांतरणे अवैध असल्याचे जाहिर करायचे आहे. जमीन कब्जा संबंधीत आदिवासींला पुन्हः परत धावयाचा आहे तर कायदा–क्रमांक १४/१९७५ प्रमाणे १ एप्रिल १९५७ ते ६ जुलै १९७४ या कालावधीत झालेल्या आदिवासींच्या जमीनीचे सर्व हस्तांतरणाबाबत चौकशी करून खात्री पटल्यावर जमीन कब्जा संबंधीत आदिवासीला पुनः परत द्यावयाचा आहे.''[१३] वरील प्रमाणे अनेक कायदे पारित झालेले आहेत. असे कायदे करण्याची गरज का भासली? तर या संदर्भात डॉ. जी.  एस. धुर्ये यांच्या मते, ''There can be no room for doubt that a number of the so called aboriginals tribes had lost their lands to the Hindus**.''**[१४] सध्या आदिवासींकडे थोडया प्रमाणात शेतजमिनी शिल्लक आहेत. आता त्यांना जंगले तोडून शेती वाढविता येत नाही.

माना आदिवासींजवळ सध्या त्यांच्या मालकिच्या किती शेत जमीनी आहेत हे त्यांची संपत्ती व आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांना ''आपल्याला आपल्या मालकिची किती शेतजमिन आहे?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. १९

## उत्तरदात्यांच्या मालकिची शेतजमिनीची उपलब्धता दर्शक सारणी

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | स्वत:च्या मालकिची शेतजमीन नाही (भूमिहीन) | ४७ | २३.५% |
| २. | १ एकर (अल्पभूधारक) | ३८ | १९% |
| ३. | १ ते ५ एकर (अल्पभूधारक) | ८८ | ४४% |
| ४. | ५ एकरपेक्षा जास्त | २७ | १३.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीद्वारे असे निदर्शनास येते की, स्वत:च्या मालकिची शेतजमीन नाही (भूमिहीन) असे एकूण ४७ (२३.५%) उत्तरदाते आहेत. ते इतरांच्या शेतावर मजूरी करतात किंवा दगड फोडणे, जंगलाची कामे करतात १ एकर जमीन आहे असे ३८ (१९%) उत्तरदात्यांचे मत आहे. १ ते ५ एकर जमीन आहे असे ८८(४४%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे. तर ५ एकरपेक्षा जास्त शेतजमीन आहे असे २७ (१३.५%) उत्तरदात्यांनी सांगितले.

भूमिहीन असणे व १ एकर (अल्पभूधारक) असणे म्हणजे जवळजवळ भूमिहीनच मोजण्यात येते. कोरडवाहू शेती असलेल्या शेतकऱ्यांना ४ एकर जमिनी (२ हेक्टर) जरी आसली तरी सुद्धा तो भूमिहीनाप्रमाणेच जगतो. कारण पावसाच्या पाण्यावर शेती अवलंबून असल्याने तीचा विशेष फायदा होत नाही. शासकिय योजनां पाच एकर जमिनीपर्यंतच्या शेतकऱ्यांना मिळतात परंतु त्यांची आर्थिक परिस्थिती इतकी हलाखीची असते की ते योजनांसाठी कागदपत्रे बनविणे व पेसे खर्च करून पंचायत समितीमध्ये वारंवार जाणे, मजूरी बुडविणे इत्यादी आर्थिक नुकसानही सहन करू शकत नाही. त्यांना थोडेफार पैसे देऊन त्यांच्या नावाने गैरआदिवासी व इतर लोक शासकिय व गैरशासकिय संस्थाकडून योजनांचा फायदा मिळवून घेतात. पाच एकरापेक्षा जास्त जमीन फक्त ३.

५टक्कें लोकांकडे आहे. सततच्या नापिकीमुळे तेही फक्त 'खाऊन' पिऊन सुखी ज्याला म्हणता येईल तसेच आहेत. फक्त त्यांना इतरांच्या शेतावर मजूरी करायला जावे लागत नाहीत. परंतु भूमिहीन व पाच एकरापर्यंतच्या सर्व शेतकऱ्यांना इतरांच्या शेतावर मजुरीला गेल्याशिवाय त्यांचा प्रपंच चालू शकत नाही. सध्या शासन धानाच्या एकरी पिकामागे १४०००रू. यांचे कर्ज ० टक्के व्याजदराने १ लाखापर्यंत देत आहे. त्याला कर्ज म्हणण्यापेक्षा 'उसणे' पैसे म्हणणे किंवा शेती करण्यासाठी शासनाकडून मदत म्हणणे जास्त चांगले आहे. हा एक शासनाचा गरीब शेतकऱ्यांसाठी एक कौतुकास्पद उपक्रम आहे असे म्हणता येईल.

पूर्वी बऱ्याच मोठया व सुपिक असणाऱ्या शेत्या होत्या. आता मात्र माना आदिवासींचे आर्थिक मागासलेपणाचे एक महत्त्वाचे कारण त्यांच्याजवळ असलेली थोडीशी व सिंचनाचा अभाव असलेली शेतजमीन आहे. जीचा ते विकासही करू शकत नाही व तिला सोडून जाऊही शकत नाही असे म्हणता येईल.

आदिवासींचे जीवन शेतीवर व जंगलावर आधारित आहे यावर वारंवार समाजशास्त्रज्ञांनी व इतर अभ्यासकांनी विवेचन प्रस्तुत केलेले आहे. शेतीच्या संबंधित अनेक समस्या आहेत. विशेषत: आदिवासीच्या मालकीच्या ज्या शेतजमिनी आहेत त्यांच्या संबंधाने तर अतोनात समस्या आहेत. या संदर्भाने एम.जी. कुलकर्णी यांच्या मते, '' The problem regarding the agricultural land refers to fragmentation, lack of soil conservation lack of water resources for irrigation, lack of improved seeds, lack of manure and chemical fertilizers, lack of cash resources on easy terms, lack of working live stock , lack of innovation in the methods of cultivation and lack of other supporting enterprises like dairing. The alienation of lands is also usually mentioned as a problem rampant among the tribals.''[१५]

आदिवासींच्या शेतीसंदर्भाने ते विकासासाठी या समस्यांवर उपाय शोधणे गरजेचे आहे व ते शोधले जाऊन उपाययोजना केल्याही जात आहेत. परंतु त्या राबविणाऱ्या यंत्रणा मात्र कुचकामी ठरत आहेत. असेच वारंवार निदर्शनास येत आहे.

आदिवासींनी फार पूर्वी जंगले तोडून शेतभूमी तयार केली. त्याचे कारण सर्वत्र जंगलेच जंगले होती. व शेतीचा शोध लागल्यावर शेतीसाठी जमिन तयार करून घेण्यासाठी जंगले तोडणे आवश्यकत्व होते. परंतु आदिवासींनी अतोनात जंगलतोड केलेली नाही. कारण त्यांना पशुपालनासाठी व शिकार करणे, कंदमुळे गोळा करणे, बांबू, तेंदुपाने, व इतर जंगलातील वनऔषधींसाठी जंगलाची अतिशय आवश्यकता होती. त्यामुळे त्यांनी जंगलाची नासधूस केलेली नाही असे आढळते. त्या संदर्भात डॉ. गोविंद गारे यांच्या मते, ''आर्थिक शोषणाचा दुसरा प्रकार म्हणजे आदिवासींची अर्थव्यवस्था व वनसंपत्तीवरील त्यांचे पारंपारिक हक्क हे शासकिय निर्बंधामुळे अगर आदिवासींच्या सुधारणेकरिता शासनाने स्वीकारलेल्या अनेक कार्यक्रमांमुळे नष्ट अगर कमी होणे हा होय.''[१६] वरील आशयाने जंगलतोडीशिवाय शेतजमीन तयार करण्याला पर्याय नाही व शेतीशिवाय आदिवासींना व इतर ग्रामीण लोकांना पर्याय नाही इतर लोकांजवळ आज ज्या शेतजमिनी आहेत त्या त्यांनी आदिवासींकडूनच मिळविल्या आहेत. त्यामुळे त्यांनीही अप्रत्यक्षपणे जंगलतोड केलेली आहे. सध्या तर निव्वळ सिमेंटचे जंगल तयार करण्यासाठी शेतीला पडीत करून विकत घेणे व जंगलाशेजारील गावे उठवून तेथे मोठमोठे हॉटेल्स बांधणे हे काम राजरोसपणे तथाकथित श्रीमंत व सुधारित लोक करत आहेत. मात्र त्यांना कुणीही बंधने घालत नाहीत. कारण ते सर्व श्रीमंत व तथाकथीत उच्चवर्णीय सुधारकांच्या हिताचेच आहे.

माना आदिवासींजवळ थोडया शेतजमिनी उरलेल्या आहेत. काही आदिवासी गावे बंधारे व जलसिंचन प्रकल्पासाठी तर काही अभयारण्यासाठी उठविली आहेत. त्यांना पुन्हा शासनाने इतर ठिकाणी जंगलाशेजारी वसाहती तयार केल्या आहेत. त्यामुळे पुन्हा जंगलतोडून शेतजमीन तयार करण्यासाठी काही प्रमाणात त्यांना परवानगी देण्यात आली होती. त्या संदर्भाने माहिती जाणून घेण्यासाठी, ''सद्यास्थितीत आपण

जंगल तोडून शेती तयार केली आहे काय?'' असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. २०**

**उत्तरदात्यांनी जंगलतोडून तयार केलेल्या शेतजमीनीविषयक माहिती दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १५ | ७.५% |
| २. | नाही | १८४ | ९२% |
| ३. | माहित नाही | ०१ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, स्वत: उत्तरदात्यांनी किंवा त्यांच्या वडीलांनी जंगलतोडून शेतजमीन तयार केलेली आहे. या अर्थाने 'होय' असे उत्तर देणारे एकूण १५ (७.५%) उत्तरदाते आहेत. त्यामध्ये विस्थापित कुटुंबाचा अधिकाअधिक समावेश आहे. तर आमची जमीन पारंपारीक व वडिलोपार्जितच आहे. त्याअर्थी नाही असे उत्तर देणारे एकूण १८४ (९२%) उत्तरदाते आहेत. 'माहित नाही' म्हणजे स्वत: जंगलतोडून शेती तयार केलेली नाही परंतु वडीलांनी जंगलतोडून शेती तयार केली की नाही याबाबतीत काहीही माहित नाही असे उत्तर देणारे ०१ (०.५%) उत्तरदाते आहेत.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की सद्यस्थितीत विस्थापित सोडले तर इतर कोणत्याही माना आदिवासींनी जंगलतोडून शेती तयार केलेली नाही.

आदिवासींच्या शेतीसंबंधाने डॉ. गोविंद गारे यांच्या मते, ''आज बाहेरून आलेल्या लोकांनी मोठया प्रमाणावर त्यांच्या (आदिवासी) मालकीच्या जमिनी बळकावल्या आहेत. अनेक ठिकाणी आदिवासी लोकसंख्या व जमीनीची मालकी ही काळाच्या ओघात व्यस्त झाली आहे.''[१७] आदिवासींजवळ आधीच थोडया जमीनी

शिल्लक आहेत. त्यातही शासनाचे विकास प्रकल्प जसे रस्तेबांधणी, नदयांवर पूल तयार करणे, बंधारा बांधणे, धरण बांधणे, धरणाला कालवे काढणे, पाट काढणे, अभयारण्य व पर्यटकांसाठी पर्यटन स्थळे तयार करणे, इत्यादी अनेक योजना राबवितांना वारंवार त्यांना शेतजमिनींचा वापर करावा लागतो.

नहर बनविण्यासाठी तर अतोनात शेतीची नुकसान होते. मात्र धरणाचा लाभ इतरांना होतो. पर्यटन स्थळे व अभयारण्ये यांचा आदिवासींना कोणताही उपयोग नाही मात्र निसर्गरम्य स्थळे ही त्यांचेच वास्तव असणारी असल्याने त्यांना ती गमवावी लागतात. या संदर्भात माना आदिवासींची स्थिती जाणून घेण्यासाठी ''आपली शेतजमीन किंवा राहती जमीन शासनाने विकास प्रकल्पासाठी वापरली आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. २१**

**उत्तरदात्यांची शासकिय प्रकल्पासाठी शेतजमीन किंवा राहती जमीन वापरण्याबद्दल माहिती दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ०७ | ३.५% |
| २. | नाही | १९३ | ९६.५% |
| ३. | माहित नाही. | ०० | ००% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, शासनाने विकास कामासाठी व शासकिय कामासाठी त्यांची राहती अथवा शेतजमीन वापरली आहे असे एकूण ०७ (३.५%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे. तर कोणत्याही प्रकारची जमीन शासनाने वापरली नाही असे एकूण १९३ (९६.५%) उत्तरदात्यांनी सांगितले.

जरी ३.५% ही संख्या वरवर पाहता कमी वाटत असली तरी ती इतरांच्या तुलनेत मोठी आहे. ३.५% लोकाच्या जमिनी शासकिय कामासाठी वापरल्या गेल्या हे यावरून स्पष्ट होते.

शासनाला कोणतीही व कुणाचीही जमीन विकासासाठी वापरण्याचा अधिकार आहे. परंतु त्याबद्दल मात्र संबंधीत व्यक्तिंना त्यांच्या मालमत्तेसाठी पुरेपुर व योग्य मोबदला देणे ही शासनाचे कर्तव्य आहे. व ते नियमाने बंधनकारक आहे. ‘‘जिल्हाधिकारी जी संपादन करण्यात आली आहे अशी संपदा जमीन किंवा हितसंबंध यांचे मूल्य निर्धारित करण्यासाठी विहीत रीतीने चौकशी करील उक्त प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्याला दाण्याची संपरीक्षा करतांना दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ अन्वये न्यायालयाला पुढील बाबतीत जे अधिकार निहित असतील तेच अधिकार असतील. (५) संपदा जमीन किंवा हितसंबंध यांचे मूल्य निर्धारीत केल्यानंतर निवाडा देईल. अशा निवाडयात पुढील गोष्टी असतील. अ) अशी संपदा जमीन किंवा हितसंबंध यांचा तपशील ब) अशा जमिनीसाठी त्यांच्या मते देता येईल. अशा नुकसानभरपाई क) ज्यांचा हितसंबंध आहे अशा सर्व व्यक्तीमध्ये भरपाईच्या रकमेचे संविभाजन,’’[१८] अशाप्रकारे शासन नुकसान भरपाई देण्यास बंधनकारक आहे.

या संदर्भात ज्या ०७ (३.५%) माना आदिवासींच्या जमिनी शासनाने विकास प्रकल्पासाठी वापरल्या त्यांना नुकसान भरपाई मिळाली की नाही हे जाणून घेण्यासाठी ‘‘जर आपली जमीन शासनाने विकास प्रकल्पासाठी वापरली असेल तर तिचा योग्य मोबदला आपल्याला शासनाकडून मिळाला आहे काय?’’असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. २२

## उत्तरदात्यांना शासनाने वापरलेल्या जमिनीच्या बदल्यात मिळालेल्या नुकसान भरपाई बाबत माहितीदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पूर्ण मोबदला मिळाला | ०० | ००% |
| २. | अपूर्ण मोबदलास मिळाला | ०३ | १.५% |
| ३. | मूळीच मोबदला मिळाला नाही. | ०४ | २% |
| ४. | मोबदल्याची गरज नाही | ०० | ००% |
| ५. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| ६. | लागू पडत नाही. | १९३ | ९६.५% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, पूर्ण मोबदला मिळाला असे कुणीही सांगितले नाही अपूर्ण मोबदला मिळाला म्हणजे जेवढे मंजूर झाले तेवढे पेसे मिळाले नाही असे ३(१.५%) उत्तरदात्यांनी सांगितले मुळीच माबदला मिळाला नाही असे ०४ (२%) उत्तरदात्यांनी उत्तर दिले. तर मोबदल्याची गरज नाही असे कुणाचेच मत नाही.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की, जमीन शासनाने वापरली परंतु १.५% लोकांना अपूर्ण मोबदला दिला. यावरून आदिवासींच्या संदर्भात शासन किती हयगय करते असे निदर्शनास येते व माना आदिवासींशीही संघर्ष किंवा तक्रार करतांना दिसत नाहीत.

शासनाने अधिकची जमीन संपादन करून ज्यांना जमिनी नाही अशा भूमिहीनांना त्याचे वाटप केलेले आहे. 'कमाल जमिन धारणा' कायदयान्वये ज्या जमिनींचे संपादन केल्या गेले त्यांचे वाटप भूमिहीनांना करण्यात आले. त्या संदर्भात

माना आदिवासींना त्याचा लाभ मिळाला काय?'' हे जाणून घेण्यासाठी ''आपल्याला शासनाकडुन मोफत जमीन मिळाली आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. २३

## उत्तरदात्यांना शासनाकडून मोफत जमिनीच्या वाटपाबाबत माहिती दर्शक सारणी.

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १० | ५% |
| २. | नाही | १८९ | ९४.५% |
| ३. | माहित नाही | ०१ | ०.५% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, १० (५%) उत्तरदात्यांना शासनातर्फे मोफत जमीन प्राप्त झालेली आहे. तर १८९ (९४.५%) उत्तरदात्यांना त्या मिळालेल्या नाहीत. माहित नाही असे उत्तर देणारे ०१ (०.५%) उत्तरदाते आहेत.

सारणी क्र. १९ प्रमाणे एकूण ४७ (२३.५%) माना आदिवासींजवळ स्वत:च्या मालकीच्या शेतजमिनी नाहीत, जे भूमिहीन आहेत. परंतु त्यापैकी फक्त १० (५%) भूमिहिनांना शासन शेतजमीन उपलब्ध करून देऊ शकले ही बाब अतयंत खेदाची आहे असे म्हणावेसे वाटते. कारखानदारांना कारखान्यासाठी जेवढया सवलती दिल्या जातात त्याचप्रमाणे पारंपारिक शेतकऱ्यांसाठी काही कारणास्तव भूमिहीन झाल्यामुळे शेतजमीन उपलब्ध करून देणे शासनाचे कार्य व नैतिक जाबादारीही ठरते असे म्हणायला हरकत नाही. परंतु अत्यंत कमी शेतकऱ्यांना शेतजमिन मिळू शकली व इतर माना आदिवासी मात्र या लाभापासून वंचित राहीले असे म्हणता येईल.

शेतजमीन जरी शासनाने मोफत दिली तरी त्यासंदर्भात मालकी हक्क म्हणून तलाठयाकडून शेतीच्या दस्ताऐवजावर संबंधित शेतकऱ्यांची नावे नोंदणी करून

त्याचा ७/१२ क्रमांकाचा नमुना त्या शेतकऱ्याला उपलब्ध करून देणे हे शासनाचे काम आहे. ग्रामीण भाषेत त्याला 'पट्टा देणे' असे म्हणतात. परंतु कायदयाच्या भाषेत 'पट्टा देणे' म्हणजे जमीन कसण्यासाठी देणे होय. ग्रामीण भाषेतील पट्टा देणे म्हणजे संबंधित जमिनीचे संबंधीचे व्यवहार करण्यासंबंधी पूर्ण अधिकार संबंधित शेतकऱ्याला देणे असे म्हणता येईल.

या संदर्भात ज्या माना शेतकऱ्यांना मोफत जमीन शासनाकडून मिळाली किंवा जंगलतोडून तयार केलेली जमीन व तसे करण्याचे अधिकार त्यांना शासनाकडून मिळाले (विशेषत: विस्थापितांना) त्यांना हया संबंधित जमिनीचे पट्टे मिळणे व ७/१२ क्रमांकाचा नमुना मिळणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना त्या जमिनीच्या संदर्भात कोणतेही आर्थिक व्यवहार करता येत नाहीत. या संबंधाने माहिती करून घेण्यासाठी ''आपल्याला शासनाकडून जमिनीचे पट्टे मिळाले काय?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र.२४**

**उत्तरदात्यांना शासनाकडून जमिनीचे पट्टे मिळाल्याबाबतची माहितीदर्शक सारणी.**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ०९ | ४.५% |
| २. | नाही | १५ | ७.५% |
| ३. | सांगता येत नाही. | ०१ | ०.५% |
| ४. | नागू पडत नाही | १७५ | ८७.५% |
| | एकूण | २०० | १००% |

जंगलतोडून शेतजमीन तयार केली आहे म्हणणारे एकूण १५ उत्तरदाते आहेत तर शासनाकडून मोफत जमीन मिळाली असे एकूण १० उत्तरदाते आहेत. वरील सारणीनुसार त्यांपैकी ०९ (४.५%) उत्तरदात्यांना जमिनीचे पट्टे मिळाले आहेत. तर

१५(७.५%) उत्तरदात्यांना जमीनीचे पट्टे मिळालेले नाहीत. याबाबतीत काहीही सांगता येत नाही  असे तटस्थ उत्तर ०१ (०.५%) उत्तरदात्यांनी दिले. तर १७५ (८७.५%) उत्तरदात्यांना ही बाब लागू पडत नाही.

यावरून ५०टक्के पेक्षा  जास्त जणांना ज्यांना जमिन मिळाली वा जंगलतोडून शेतजमिन तयार केली त्यांना पट्टे म्हणजे जमिनीच्या व्यवहारासंबंधीचे अधिकार मात्र मिळालेले नाहीत असे निदर्शनास येते. त्यामुळे माना आदिवासींना शासनासोबत संघर्ष करावे लागतात. परंतु ते मागासलेले गरीब असल्यामुळे त्यांचे कुणीच ऐकूण घेत नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे.

आदिवासी म्हणजे जंगलाचे राजे अशी म्हण प्रचलित आहे. परंतु आता मात्र ती म्हण कुठेच लागू पडत नाही. जंगल आदिवासींचे घर, निसर्ग आदिवासींचे जीवन, परंतु आता त्याबाबतीत कोणतीही प्रतिक्रिया वास्तवात राहिली नाही. याचे कारण की जंगलासंबंधित शासकिय कायदे आणे आदिवासींच्या नैसर्गिक संपत्तीवर गैरआदिवासींनी केलेले अतिक्रमणच म्हणावे लागेल. जंगलाचा आणि आदिवासींचा अतुट संबंध मात्र अजुन संपलेले दिसत नाही. अजूनही त्यांना जीवनावश्यक गरजांची पूर्ती करून घेण्यासाठी जंगलाचाच आश्रय घ्यावा लागतो. वृक्ष संरक्षण अधिनियम १९७६ अनुसार वृक्ष तोडण्यावर बंदी आलेली आहे. परंतु आदिवासींना त्यांच्या उपजिविकेसाठी व शेतीसाठी लागणारे लाकूड आणण्यासाठी वनकायदयांमध्ये विविध अटी सहीत तरतुदी केलेल्या आहेत. परंतु आदिवासींना मात्र काययाचे ज्ञान नसल्यामुळे त्यांना तरतुदी अटी काहीही माहित नाहीत. त्यामुळे जंगलातील कोणत्या वस्तु आणण्यावर बंदी आहे व कोणती वस्तू आणण्यास मुभा आहे हे त्यांना माहित नसल्यामुळे त्यांची कुचंबना होत आहे. यासंदर्भात जंगलातील कोणकोणत्या वस्तू ते आणतात हे जाणून घेण्यासाठी त्यांना ''जंगलातील कोणकोणत्या वस्तू आणता?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. २५

## उत्तरदात्यांच्या जंगलातील वस्तूंच्या वापराविषयी माहितीदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | इमारती लाकूड | ०० | ००% |
| २. | जळाऊ लाकूड | १५७ | ७८.५% |
| ३. | इमारती व जळाऊ लाकूड | २७ | १३.५% |
| ४. | इमारती जळाऊ लाकूड व वनोत्पादने उदा. मोहफुले आवळा इ. | ०० | ००% |
| ५. | शिकार करून प्राणी आणणे | ०० | ००% |
| ६. | ठतर | १६ | ८% |
| ७. | वरील सर्व | ०० | ००% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, जळाऊ लाकूड आणणारे महत्तम १५७ (७८.५%) उत्तरदाते आहेत. कारण त्यांना स्वयंपाकाचा गॅस किंवा रॉकेल उपलबध नसल्याने अन्नासारखी मूलभूत गरज भागविण्यासाठी जंगलातील जळाऊ लाकूड आणण्याशिवाय दुसरा पर्यायच उपलब्ध नाही. इमारती जळावू लाकूड आणणारे एकूण २७ (१३.५%) उत्तरदाते आहेत. त्यांना घर बांधणीसाठी लाकडाची आवश्यकता असते व त्यांना ते आणणे अपरिहार्यच असते. सध्यातर शिकार करून प्राणी आणण्याचे प्रमाण शून्य आहे. कायदयाने बंदी आल्यामुळे साधेभोळे आदिवासी सध्या त्या वाटेला जात नाहीत. मात्र खस आणणे बांबू आणणे, तेंदूपाने, आवळा, मोहफुले, चार इत्यादी गोळा करणे व वनौषधी आणणे इत्यादी म्हणजे इतर वस्तू आणणारे १६ (०८%) उत्तरदाते आहेत.

सर्वाधिक जळाऊ लाकूड आणणारे माना आदिवासी हे सध्यातरी चूलीवरच स्वयंपाक करतात असे निदर्शनास येते.

वाळलेल्या काडया आणण्यासाठी व काही शेतीकामासाठी लागणारे साहित्य आणण्यासाठी आधी वनअधिकाऱ्यांची रितसर परवानगी घ्यावी लागते. परंतु वाळलेल्या लाकडांच्या मोळया आणण्यासाठीही वनअधिकारी त्यांच्याकडून काही मोबदला घेतांना दिसतात. किंवा त्यांच्या कुऱ्हाडी व सायकलवर आणत असल्यास सायकल जप्त करतात. तर कधी ते वाळलेल्या काडया आणायला मनाई करत नाही. परंतु तरीही जंगलातील हिंस्त्र श्वावदांची भीती मात्र पाठीशी असतेच, जंगलाशेजारील मोळी आणायला किंवा गूरे चारायला गेलेल्या लोकांना वाघाने हल्ला केला व मारले अशा कितीतरी बातम्या पेपरांतून छापून येतात. परंतु तरीही आदिवासी महिला उदरनिर्वाहासाठी दूध पिणाऱ्या मुलांनाही घरी ठेवून दूर जंगलात जाऊन डोक्यावर मोळया आणतांना दिसतात.

या संदर्भात माना आदिवासींना कोणकोणत्या अडचणी येतात हे जाणून घेण्यासाठी ''जंगलातील वस्तू आणण्यासाठी आपल्याला कोणकोणत्या अडचणी येतात?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. २६**

**उत्तरदातयांना जंगलातील वस्तू आणतांना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत माहितीदर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | जंगलचे अधिकारी आणू देत नाहीत. | ७४ | ३७% |
| २. | जंगलाच्या अधिकाऱ्यांना वस्तूचा मोबदला दयावा लागतो. | १० | ५% |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | जंगलातील प्राण्यांची भीती वाटते. | ०१ | ०.५% |
| ४. | वरील सर्वच | ७० | ३५% |
| ५. | अडचणी येत नाही. | ४१ | २०.५% |
| | एकूण | २०० | १००% |

जंगलाचे अधिकारी व जंगलातील वस्तूंचे ठेके घेणारे ठेकेदार दोघेही आदिवासींना किती नाडतात हे सर्वश्रृत आहे. वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, जंगलचे अधिकारी आणू देत नाहीत असे म्हणणारे महत्तम ७४ (३७%) उत्तरदाते आहेत. सरकारी कायदयांचे बंधन असल्यामुळे जंगलाचे अधिकारी त्यांना लाकूडफाटा व इतर साहित्य आणण्यास बंदी घालतात. तर जंगलाच्या अधिकाऱ्यांना वस्तूंचा मोबदला दयावा लागतो तर ते आणू देतात असे १० (५%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्यासाठी धान दयावे लागतात किंवा पेसे दयावे लागतात. जंगलातील प्राण्यांची भीती वाटते असे ०१ (०.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. ही संख्या इतक्या कमी प्रमाणात असल्याचे कारण जन्मापासून जंगलाशी मैत्री असणाऱ्या आदिवासींना जंगलात जायला विशेष भीती वाटत नाही. परंतु सध्याची सुशिक्षित मुलं जंगलात जायला भितात. तर 'वरीर सर्वच' अडचणी येतात असे ७० (३५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. म्हणजे त्यांना प्राण्यांचीही भीती तर वाटतेच परंतु त्यापेक्षा अधिकाऱ्यांचीच जास्त भीती वाटते. कारण ते त्यांच्या कुऱ्हाडी, सायकली व बैलबंडी जप्त करतात. किंवा मग त्यांना वर्षाचे धान किंवा पैसे दयावे लागतात. मात्र अडचण येत नाही असेही म्हणणारे एकूण ४१ (२०.५%) उत्तरदाते आहेत. त्यांना अडचण येत नाही. कारण काही जणांकडे स्वयंपाकाचा गॅस आहे. काहींच्या शेतातच झाडे असल्याने ते स्वत:च्या शेतातूनच इंधन जमा करतात. घरासाठी लिलावात काढलेली लाकडे घेतात तर काहीजवळ शेती नसल्याने त्यांना शेतीला अवजारासाठी लाकडे लागत नाही. त्यामुळे त्यांना अडचण येत नाही.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की इंधनासाठी, घरासाठी व शेतीला लागणाऱ्या अवजारांसाठी तसेच जोडव्यवसाय किंवा उदरनिर्वाहासाठी,

पशुचाऱ्यासाठी माना आदिवासींना जंगलावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे त्यांना वरीलप्रमाणे अडचणी आल्यामुळे त्यांना बराच त्रास सहन करावा लागतो.

आदिवासी समुदायामध्ये आर्थिक मागासलेपणाचे वारंवार विवेचन केलेले आढळते. त्यांना उदरनिर्वाहासाठी, शेती, जंगल व मजुरीवर अवलंबून राहावे लागते. त्यातही माना आदिवासी हे ग्रमीण दुर्गम भागात राहतात. तेथे कोणताही औदयोगिक विकास झालेला नाही. काही बोटावर मोजण्याइतपत लोकांनी शिक्षण घेऊन नोकरी मिळविली आहे तर काही लोक मजुरीसाठी शहरात गेलेले आहेत. परंतु त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. मात्र जे गावात राहतात, दुर्गम भागात, खेडयापाडयांत राहतात. त्यांना मात्र शेती, जंगल व त्यावर आधारीत मजुरीचाच आधार असतो. वारंवारच्या नापिकीमुळे शेतीही आता परवडत नाही. शिवाय महाग झालेली खते, बी–बीयाणे, औषधी फवारणी इत्यादींनी त्यांचे बेहाल करून सोडले आहे. जंगलासंबंधी कायदयांची अनेक बंधने आल्याने त्यांना जंगलासंबंधी कायदयांची अनेक बंधने आल्याने त्यांना जंगलावरही सर्वस्वी अवलंबून राहता येत नाही. किंवा जंगलातील कच्चा माल आणून वस्तू बनवल्यावर ठेकेदार त्यांच्याकडून त्या कवडीमोलाला विकत घेतात. उदाहरणार्थ एका बांबूच्या तट्टयांची किंमत ६० ते १००रू. बाजारात असते. परंतु ठेकेदार मात्र आदिवासींकडून एक ताटवा ३० रूपयात विकत घेतात. अशाप्रकारे कितीही काम केले तरी दारिद्रय संपत नाही हेच आदिवासींच्या बाबतीत सत्य आहे. त्यामुळे गावातच किंवा गावाशेजारच्या परिसरात रोगजार उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. किंवा इतर कोणताही व्यवसाय, रोजगार परिसरात मिळणे आवश्यक असते.

या संदर्भाने माना आदिवासींबाबत माहिती जाणून घेण्यासाठी ‘‘आपल्या गावात आपलयाला वर्षभर रोजगार मिळतो काय?’’ असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. २७

### उत्तरदात्यांच्या गावात उपलब्ध असलेल्या रोजगार विषयक स्थितीदर्शक सारणी.

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १३ | ६.५% |
| २. | नाही | १८ | ९% |
| ३. | काही महिनेच मिळतो. | १६० | ८०% |
| ४. | काही महिने कामासाठी बाहेरगावी जावे लागते. | ०७ | ३.५% |
| ५. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०२ | १% |
| | एकूण | २०० | १००% |

ग्रामीण भागातील रोजगार म्हणजे कृषीशी संबंधित हंगामापुरताच मिळतो. तर इतर रोजगारही पाहिजे त्या प्रमाणात मिळत नाही. वरील सारणीवरून असे लक्षात येते की, वर्षभर रोजगार मिळतो असे म्हणणारे केवळ १३ (६.५%) उत्तरदाते आहेत. यांपैकी बरेच जण दुसऱ्या शेतकऱ्यांच्या (गैरआदिवासी) शेतावर वर्षभर गडीमाणूस म्हणून काम करतात. तर काही जण नोकरीला असल्याने तसे उत्तर देतात. वर्षभर रोजगार मिळत नाही, असे एकूण १८ (९%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. काही महिनेच म्हणजे शेतीच्या हंगामात रोजगार मिळतो असे महत्तम १६० (८०%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. ६ ते ८ महिने हंगामात रोजगार मिळतो. नंतर चार महिने मात्र जंगलात जाणे, इतर मजुरीसाठी भटकणे असेच जगावे लागते. ऐन उन्हाळयाच्या वेळी जेव्हा लग्न व इतर खर्चिक समारंभ असतात तेव्हाच रोजगार उपलब्ध नसतो. तर काही महीने कामासाठी बाहेरगावी जावे लागते. असे ०७ (३.५%) उत्तरदाते सांगतात. यापेक्षा वेगळे उत्तर देणारे ०२ (१%) उत्तरदाते आहेत जे सतत आपली कामे बदलत असतात.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की आधीच मजुरी कमी असतांना पुन्हा वर्षभर रोजगार उपलबध नसणे माना आदिवासींच्या आर्थिक मागासलेपणात भर टाकतो यात तिळमात्र शंका नसावी.

रोजगाराचा प्रश्न निघताच मजुरीचीही समस्या डोके वर काढते. शासनाने 'किमान वेतन' कायदा लागू केलेला आहे. त्यानुसार वेळोवेळी वाढत्या महागाईप्रमाणे किमान वेतन निश्चित केले जाते व त्यानुसार मजुरी देणे सर्वांनाच बंधकारक असते. परंतु ज्यांना मजुरी मिळते त्या आदिवासींना किमान वेतन कायदा व समान कामासाठी समान वेतन कायदयाची माहिती नसते. त्यांना शासनाने ठरविलेली किमान मजुरीही माहित नसते. तर माहित असूनही ते इतरत्र –तक्रार करित नाही. या संदर्भात सर्वांचीच पिळवणुक होत असते. सध्या शासनाने १४५ रू. किमान वेतन (मजुरी) अकुशल कामगारांसाठी निश्चित केलेली आहे. व स्त्रीपुरूषांसाठी ती समान आहे. परंतु तरीही शासकिय कामे वगळता वैयक्तिकरित्या कामावर कामाची घाई असेल तर १००रू. व नसेल तर ६० रू. पर्यंतच मजुरी त्यांना दिली जाते. त्यातही समान कामासाठीही पुरूषांना जास्त व स्त्रियांना कमी मजुरी दिली जाते.

माना आदिवासींच्या बाबतीत यासंदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी ''आपल्याला शासनाने मंजूर केलेली मजुरी मिळते काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दाखविलेल्या आहेत.

**सारणी क्र. २८**

**उत्तरदात्यांना शासकिय नियमाप्रमाणे (अकुशल कामगारांना) देय असलेली मजूरी मिळण्याबाबत स्थितीदर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १० | ५% |
| २. | नाही | ६४ | ३२% |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | शासनाने किती मजुरी | १२५ | ६२.५% |
| ४. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०१ | ०५% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, शासकिय नियमाप्रमाणे मजुरांना कामाकरीता देय असलेली मजूरी मिळते असे १० (५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. त्यांना शासकिय कामाची मजूरी शासकिय नियमाप्रमाणे मिळते असे म्हणायचे आहे. तर शासकिय कामाव्यतिरिक्त शासकिय नियमाप्रमाणे मजुरी मिळत नाही असे ६४ (३२%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. शासनाने किती मजूरी निश्चित केलेली आहे तेच माहिती नाही असे उत्तर देणारे महत्तम १२५ (६२.५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते गावात सर्वांना जी मजूरी मिळते तीच आम्हाला मिळते. तर यापेक्षा वेगळे उत्तर देणारे ०१(०.५%) उत्तरदाते आहेत त्यांच्यामते मजुरीचे दर कामाप्रमाणे सतत बदलत असतात.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की, शासनाने निश्चित केलेली अकुशल कामागारांसाठी किमान वेतन मात्र माना आदिवासींना माहित नाही. त्याबाबतीत ते अनभिज्ञ आहेत असे म्हणायला हरकत नाही.

शासन आपल्या पातळीवरून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना राबवित असते. संविधानानुसार रोजगार उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्यामुळे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, रोपवाटिका, तळे, बांध येथे मातीकाम तर शेतविकासासाठी मातीकाम, अशाप्रकारच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करून ग्रामपातळीवर रोजगार उपलब्ध करून दिल्या जातो. त्या संदर्भात ग्रामपंचायत कार्यालयीन दर्शनिय भागावर मोठा फलक लावलेला असतो. ग्रामपंचायतामार्फत ही कामे राबविली जातात. त्यासाठी फार्म (अर्ज) भरणे व बँकेत खाते काढणे आवश्यक असते. अुशल कामगारांना कामासाठी अर्ज केल्यावर त्यांच्या गावात किंवा गावाजवळ काम उपलब्ध करूण देणे बंधकारक असते. त्यासाठी किमान वर्षातून १०० दिवस

रोजगारहमी योजना राबविली जाते. परंतु जेव्हा शेतीचा हंगाम सुरू असतो नेमकी त्याचवेळी ही योजना राबविली जाते. त्यामुळे शेती किंवा रोजगार हमी यांपैकी एकाच कामावर लोकांना जाता येते व त्याचा काहीही लाभ मिळत नाही असे वारंवार निदर्शनास येते.

याबाबत माना आदिवासींचे मत जाणून घेण्यासाठी ''रोजगार हमीची १०० दिवसांचा रोजगार देण्याची हमी शासनाने घेतली आहे. तेव्हा हंगामाशिवाय १०० दिवसांचे रोजगार हमीचे काम आपल्याला मिळते काय?'' असा प्रश्न विचारल्या गेला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. २९**

**उत्तरदात्यांची रोजगार हमी विषयक मतदर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | नेहमी मिळते | ०१ | ०.५% |
| २. | कधीकधी मिळते | १५३ | ७६.५% |
| ३. | मिळतच नाही | ४४ | २२% |
| ४. | फार्म (अर्ज) भरता येत नाही | ०० | ००% |
| ५. | यापेक्षा वेगळे इतर | ०२ | १% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, नेहमीच काम मिळते असे ०१ (०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. कधीकधी मिळते असे महत्तम १५३ (७६.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्यांच्या मते रोजगार हमीचे काम मिळते परंतु १०० दिवसच मिळते असे नाही. किंवा नेहमीच मिळते असेही नाही. तर ते अधून मधून ८ दिवस, १० दिवस असे मिळते. रोजगारहमीचे काम मिळतच नाही असे ४४ (२२%) उत्तरदात्यांचे मत आहे. कधीच त्यांच्या गावी रोजगारहमी योजना राबविण्यात येत नाही.

असे ते म्हणतात. तर यापेक्षा वेगळे उत्तर ०२(१%) उत्तरदात्यांचे आहे. त्यांच्यामते दारिद्ररेषेखालील कुटुंबाना काम दिले जाते त्यामुळे त्यांना काम मिळत नाही.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की, जरी शासनाने मागेल त्याला काम अशी योजना राबविली असली तरी सुद्धा प्रत्यक्षात ती योजना मात्र प्रभाविपणे राबविली जात नाही असेच म्हणावे लागेल.

जी.एस.धुर्ये यांच्या मते,'' The most important and general feature of the life of the people as must be clear from the account of their doing and of the views of a number of written(given above) is that they get into debt and that because of their simple nature and ignorance of law their debts increase beyond bonds.''[१९]

शेतकऱ्यांवरील कर्जाच्या बाबतीत महाराष्ट्रातील माजी मुख्यमंत्री मा. श्री. शरद पवार लिहीतात, ''महाराष्ट्रातील शेती व्यवसाय निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असतो. निसर्गाची साथ नसलेल्या वर्षी ग्रामीण महाराष्ट्रात राहणाऱ्या लक्षावधी कुटुंबाचा संसार उध्वस्त होतो. राज्यात पाण्याच्या उपलब्धतेची मर्यादा आहे. एकूण जमिनीपैकी सर्व प्रयत्नानंतरही पाण्याखाली येणारे जमिनीचे क्षेत्रफळ १४ टक्के एवढे आहे. म्हणून महाराष्ट्रतील शेती नेहमीच परावलंबी राहते. शेतकरी अडचणीत येतो. घेतलेली कर्जे तो वेळेवर परत करू शकत नाही. कर्ज थकले की त्याला नवीन कर्ज मिळत नाही. परिणामी एखादया वर्षी पाऊस उत्तम पडला तरीही भांडवला अभावी शेतीला बी–बीयाणे, खते, औषधे हयांच्या अभावी तो उत्पादन वाढवू शकत नाही आणि कर्जही परत करू शकत नाही.''[२०]

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांवरील कर्जाविषयी केलेले हे मार्मिक विवेचन प्रत्येक पुस्तकांमधून आपल्याला वाचायला मिळते व वास्तवातही सर्वत्र पहायला मिळते. पूर्वी कर्जे घेणे म्हणजे लाजिरवाणे वाटायचे. आता–तर कर्जे घेणे हा एक नवीन विचारप्रवाहच निर्माण झाला आहे. कोणतीही गोष्ट कर्ज घेतल्याशिवाय पूर्ण करूच शकत नाही असाही लोकांचा आता विचार बनत चालला आहे. बँक व इतर संस्थांनी

कर्जाच आकर्षक गाजर दाखवून लोकांना आकृष्ट केले आहे व त्यावर ते आपले धंदे जोरदार चालवत आहेत. या संदर्भात डॉ. भा.की. खडसे यांच्यामते, ''आतापर्यंत लोक आर्थिक मदत किंवा सावकाराकडून घेत असत. आता बँक व शासनाकडून आर्थिक मदत घेण्याची जाणीव– लोकांमध्ये वाढलेली आहे. जातीसभांती केलेल्या ठरावात शासनाने व्यवसाय करण्यासाठी, घरे बांधण्याकरीता आर्थिक मदत द्यावी असे समाविष्ट केलेले दिसते. पारंपारिक कर्ज प्राप्त करणाऱ्या केंद्राकडून शासन व बँकाची मदत घेण्याची अभिवृत्ती आधुनिकता स्पष्ट करणारी आहे.''[२१] पूर्वी सावकाराकडे संपत्ती अथवा जमीन जुमला गहाण ठेवून कामकार्याकरिता कर्ज घेतले जाई. त्या कर्जाच्या व्याजानेच शेतकरी नेस्तनाबूत होत. अशाप्रकारे सावकारी पद्धतीला थोडासा आळा बसला आहे. परंतु आता बँका व इतर संबंधांनी सावकारी सुरू केल्याचे चित्र दिसत आहे. सततच्या नापिकेमुळे शेतकरी कर्जबाजारी  झालेत व त्यातही कोणताही समारंभ मोठया श्रीमंत लोकांचे पाहून अवाढव्य खर्च करत आहेत. त्यामुळेही कर्जाचा डोंगर वाढतच आहे. आदिवासी समाज मात्र अल्पसंतुष्टी आहे तरीही त्याला उपजिविकेसाठी विविध कामांसाठी वारंवार कर्जे घ्यावी लागतात.

या संदर्भात माना आदिवासींची काय परिस्थिती आहे ते जाणून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. यासाठीच, ''आपल्यावर कोणाचे कर्जे आहे काय? असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. ३०**

**उत्तरदात्यांची कर्जविषयक स्थितीदर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | सावकाराचे आहे | ०४ | ०.२% |
| २. | बँकेचे आहे. | ८१ | ४०.५% |
| ३. | सावकार व बँक दोन्हीचे आहे. | ०१ | ०.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | नातेवाईकांचे आहे. | १४ | ७% |
| ५. | कर्ज नाही | १०० | ५०% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

आदिवासींच्या कर्जस्थितीबाबत डॉ. गोविंद गारे लिहीतात, ‘‘आदिवासी क्षेत्रांतील लोकांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीची आजची पातळी व यापूर्वी केलेल्या प्रयत्नांचा परिणामांचा अनुभव लक्षात घेता, आदिवासी जमातीचे लोकांचे जीवनमान सुधारून आदिवासी व बाहेरिल क्षेत्रांतील प्रगतीचे अंतर कमी करणे हे आदिवासी उपयोजनेचे उद्दिष्ट आहे. आदिवासी उपयोजना तयार करून राज्य शासनाने महाराष्ट्रातील १४ जिल्हयांतील आदिवासींच्या प्रगतीची गती वाढविण्याचे मोठे पाऊल उचलले आहे. त्याचाच एक भाग म्हणून सावकारी व सौदेबाजीतील पिळवणूक दूर करण्यासाठी शासनाने ‘महाराष्ट्र जनजाती आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा, १९७६ हा एक व्यापक स्वरूपाचा कायदा अधिनियमित केला आहे. या कायदयान्वये आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासींना भूतपूर्व ऋणांतून मुक्त करण्यात आले आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सावकार व व्यापारी यांना दूर केल्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी बहुउद्देशीय आदिवासी सेवा सरकारी सोसायटयांची स्थापना केली आहे. ,,[२२]

या विवेचनावरून असे निदर्शनास येते की आदिवासींच्या आर्थिक स्थितिविषयक व्यापारी व सावकारांना हटविल्याने पुन्हा पोकळी भरून काढण्यासाठी सहकारी सोसायटयांची स्थापना केल्या गेली. परंतु कर्जपुरवठा करूनच आदिवासींचा विकास करणे आवश्यक आहे का? विना कर्जपुरवठा त्यांच्यासाठी विकासाच्या संधी निर्माण करणे, त्यांच्या कलागुणंना वाव देणे, त्यांना कर्ज देण्यापेक्षा त्यांना काम देणे, त्यांना ज्यादा वेतन देणे, त्यांच्या निर्मीत साधनांना शेतीतील निर्मीत धान्याला चांगला भाव मिळवून देणे व इतरांपेक्षा त्यांना अधिक प्रोत्साहन भत्ते दिल्यास पुन्हा त्यांना कर्जबाजारी करण्याची गरज भासणार नाही.

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, सावकाराचे कर्ज आहे असे ०४ (२%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे सावकारकी (गावपातळीवर श्रीमंत असलेले लोक) अजूनपर्यंत बंद झालेली नाही. ती छुप्यारितीने चालूच आहे. सावकार व बँक दोन्हीचे कर्ज आहे असे ०१(०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. नातेवाईकांचे कर्ज आहे. असे १४ (७%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. याचा अर्थ माना आदिवासी जमातीत नातेवाईक एकमेकांना आर्थिक मदत करतात व हे वास्तव आहे की, एखादयाच्या घरी कोणती अडचण, समस्या अथवा कार्यक्रम असला तर त्यांचे सर्व सोयरे आर्थिक व इतरही मदत करायला स्वत:हून पुढाकार घेतात ही त्यांच्यातील संवेदनशिलता व सामाजिकतेचे प्रतिकच आहे. असे म्हणावे लागले. सावकारकीची जागा आता बँकानी घेतली आहे. फरक एवढाच आहे की बँका सावकारांप्रमाणे कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांवर बळजबळी करतांना आढळत नाहीत किंवा त्यांना मानसिक त्रास देत नाहीत. शिवाय २०१३—१४ प्रमाणे धानाच्या शेताला एकरी १४,०००रू. तर सोयाबिन व इतर पिकासाठी एकरी १२,०००रू. चे कर्ज १,००,००० रू. पर्यंत बीनव्याजाने बँका शेतकऱ्यांना देतात. ही त्यांना एकप्रकारे कर्ज नसून आर्थिक मदतच आहे असे म्हणता येईल. त्याचप्रमाणे कोणताही कामधंदा सुरू करण्यासाठी सुद्धा २५,०००रू. कर्ज बँकाकडून मिळते. बँकेचे कर्ज आहे असे एकूण ८१ (४०.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. 'कर्ज नाही' असे महत्तम १०० (५०%) लोकांचे म्हणणे आहे.

साधी राहणी व अल्पसंतुष्टी स्वभाव यामुळे या झगमगाटाच्या दुनियेतही ज्यांनी आपल्या गरजांवर नियंत्रण ठेवण्यात यशस्वी झालेले आहेत. त्यामुळे मिळेल त्या पैशात घर खर्च भागविणे व त्यामुळे कर्ज घेण्याची सध्या त्यांना गरज वाटली नाही हे त्यांना भूषणावहच आहे. जरी त्यांची माडी नाही, त्यांच्या घरी वीज नाही, कोणत्याही प्रकारच्या भौतिक सुविधा नाही परंतु 'कर्जासारखे ओझे' नाही त्यावरूनच त्यांची अल्पसंतुष्टी वृत्ती निदर्शनास येते. व कर्जमुक्त होण्याचा ते प्रयत्न करीत आहेत हे सकारात्मक परिवर्तन होत आहे असे म्हणावे लागेल.

कर्ज घेण्यासाठी कोणत्या ना कोणत्या कारणाची गरज असते. विनाकारण कोणीही कर्ज घेत नाही. शिवाय श्रीमंत लोकांचा झगमगाट पाहून गरीब ही आता कर्ज काढून लग्न समारंभ व इतर कार्यक्रम खर्चिक पद्धतीने करू लागले आहेत.

या संदर्भात ज्या माना आदिवासींनी कर्ज घेतले त्याची कारणे जाणून घेण्यासाठी ''जर कर्ज घेतले असेल तर ते कोणत्या कामासाठी वापरले?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. ३१**

**उत्तरदात्यांनी घेतलेल्या कर्जाची कारणे दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | लग्नासाठी | ०९ | ४.५% |
| २. | शिक्षणासाठी | ०० | ००% |
| ३. | दवाखान्यासाठी | ०४ | २% |
| ४. | शेतीसाठी | ७७ | ३८.५% |
| ५. | घरासाठी | ०५ | २.५% |
| ६. | नोकरीसाठी | ०० | ००% |
| ७. | इतर कामासाठी | ०५ | २.५% |
| ८. | लागू पडत नाही. | १०० | ५०% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

एकूण १०० (५०%) उत्तरदत्यांनी विविध कामांसाठी कर्ज घेतलेले आहे. लग्नासाठी कर्ज घेणारे ०९(४.५%) उत्तरदाते आहेत. यावरून लग्न सोहळे कर्ज काढून हौस मौज पूर्ण केली जाते हे निदर्शनास यते. शिक्षणासारख्या विकासात्मक घटकासाठी मात्र कुणीही कर्ज घेतले नाही. दवाखान्यासाठी ०४ (०२%)

उत्तरदात्यांनी कर्ज घेतलेले आहे. घरासाठी (०५ (२.५%) उत्तरदात्यांनी कर्ज काढलेले आहे. नोकरीसाठी कुणीही कर्ज घेतले नाही. इतर कामासाठी ०५(२.५%) उत्तरदात्यांनी कर्ज काढलेले आहे. तर महत्तम ७७(३८.५%) उत्तरदात्यांनी कर्ज शेतीसाठी काढलेले आहे.

यावरून असे निदर्शनास येते की मजुरांकडे तारण ठेवायला काहीही नसते. त्यामुळे त्यांना कर्जच मिळत नाही. शेतकऱ्यांकडे तारण ठेवायला शेती असते. त्यामुळे ७७(३८.५%) उत्तरदात्यांनी शेतीसाठी कर्ज घेतले आहे. याशिवाय कर्ज काढल्याशिवाय सध्या शेतकऱ्यांचे भागत नाही त्यामुळे शेतकरी वर्ग मोठया प्रमाणात कर्जबाजारी झालेला आहे. असे म्हणाायला हरकत नाही.

कर्ज घेण्यासाठी पूर्वी सावकार व्यक्तींकडे कर्ज मागितले जाई. त्यासाठी तारण म्हणून घर, मालमत्ता व शेतीवाडी गहाण टाकल्या जाई. त्याचप्रमाणे ते व्याजही मोठया प्रमाणात आकारत असत. व कर्जफेड केली नाही तर गहाण टाकलेली मालमत्ता जप्त केली जाई. अशाचप्रकारे कितीतरी लोक त्यांच्याजवळील मालमत्तेपासून वंचित झालेत. त्यांच्याजवळ तारण ठेवायला काही नव्हते ते त्यांच्याकडे श्रम करीत व कर्ज फेडण्याचा प्रयत्न करीत. परंतु निरक्षरतेमुळे मुद्दल व व्याजाचा ताळमेळ बसत नसे. व त्यांच्या पिढयानपिढया सावकाराची गुलामगिरी करण्यातच जाई. (वेठबिगारी पद्धती) कायदयाने आता सावकारीवर बंदी आणून गहाण ठेवण्याच्या पद्धतीवर अनेक प्रकारच्या अटी लादल्या आहेत. कमीदरात बँका ही गहाण ठेवू लागल्या तरी ज्यांच्याकडे गहाण ठेवायला काही नाही त्यांचे काय? हा प्रश्न पुढे आला. आता सरकारी सोसायटया व बँका हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु सावकारीची जागा आता गावागावातील 'बचत गट' घेतांना दिसतात. बँकांकडून कमी दरात कर्ज घेऊन ते गट गावातील अडलेल्यांना ज्यादा दराने कर्ज देत आहेत त्यात दर महिन्याला ०३ ते ०५ टक्के व्याज आकारत आहेत व त्याचा कोणताही लेखी हिशोब ठेवण्यात येत नाही

असेही निदर्शनास येत आहे. (कच्चा हिशोब ठेवण्यात येतो.) बँकेतून कर्जपुरवठा होतो परंतु त्यासाठी कागदपत्रांची जमवाजमव करायला खूपच त्रास होतो.

त्याच धर्तीवर माना आदिवासींना कर्ज कोणाकडून घेणे सोयीचे जाते. हे जाणून घेण्यासाठी ''आपल्याला कर्ज कोणाकडून घेणे सोयीचे वाटते?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ३२

## उत्तरदात्यांना सोयीस्कर असणारी कर्ज मिळण्याच्या स्त्रोताबाबत मतदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | सावकाराकडून | ०० | ००% |
| २. | बँकेकडून | १३५ | ६७.५% |
| ३. | इतर लोकांकडून | ०९ | ४.५% |
| ४. | कोणाकडूनच नाही | ५६ | २८.००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, सावकाराकडून कर्ज घेणे सोयींचे वाटते असे कोणत्याही उत्तरदात्यांचे मत नाही. तर बँकेकडून कर्ज घेणे सोयीचे वाटते असे १३५ (६७.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. इतर लोकांकडून जसे नातेवाईकांकडून कर्ज घेणे सोयींचे वाटते असे ०९ (४.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर कोणाकडूनच कर्ज घेणे सोयीचे नाही असे ५६ (२८.००%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्यापैकी अनेकांनी कर्ज घेतलेले नाही.

वरील सारणीवरून सध्या बँकाकडून कर्ज घेणे सोयीचे वाटते असे महत्तम उत्तरदात्यांचे मत असले तरी कर्ज कोणाकडूनच घेणे सोयीचे वाटत नाही हाही विचार पुढे येत आहे. सावकारकीला सर्वांनी दुरून हात जोडले आहेत. माना आदिवासींमधील हे एक सकारात्मक विचारांचे परिवर्तन आहे असे म्हणावे लागेल.

कर्ज देणे व वसूल करणे हया दोन्ही गोष्टी एकमेकांपासून वेगळ्या करता येत नाही. पूर्वी सावकार कर्ज देत व बळजबरीने शेतीमाल निघताच वसूल करत. मालमत्ता जप्त करत किंवा वेठबिगारी करवून घेत. सध्या मात्र तो प्रकार कमी पाहायला मिळतो. परंतु अजूनही संपलेला आहे असे म्हणता येत नाही. बँका मात्र कर्ज वसूलीसाठी अशाप्रकारे बळजबरीने करतांना दिसत नाही. मात्र वस्तु खरेदीकरीता कर्ज घेतले व ते वेळेच्या आत परत केले नाही तर ती वस्तू उचलून घेऊन जातात. माना आदिवासींचे याबाबत अनुभव जाणून घेणे फार महत्त्वाचे आहे. २०० उत्तरदात्यांपैकी १०० (५०%) उत्तरदात्यांनी विविध कामाकरीता व विविध संस्थाकडून कर्ज घेतलेले आहे. त्याना कर्जवसूलीचा कोणता अनुभव आहे हे जाणून घेण्यासाठी ''आपल्याला कर्ज वसूलीसाठी कोणी बळजबरी केली आहे काय?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ३३

## उत्तरदात्यांना कर्जवसुलीबाबत आलेला अनुभव दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | सावकाराने केली | ०३ | १.५% |
| २. | बँकेत केली | ०८ | ४% |
| ३. | व्यापाऱ्याने केली. | ०० | ००% |
| ४. | इतर लोकांनी केली | ०० | ००% |
| ५. | कोणीच केली नाही | १०० | ५०% |
| ६. | लागू पडत नाही | ८९ | ४४.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की ०४ (०२%) उत्तरदात्यांनी सावकाराकडून कर्ज घेतलेले आहे. त्यापैकी ०३ (१.५%) उत्तरदात्यांना सावकाराने

कर्जवसुलीसाठी बळजबरी केलेली आहे. तर ८१ (४०.५%) उत्तरदात्यांनी बँकेकडून कर्ज घेतले आहे. त्यांपैकी ०८(४%) उत्तरदाते बँकांनी कर्जवसुलीसाठी बळजबरी केली असे म्हणतात. कोणीही बळजबरी केली नाही असे ८९ (४४.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. १०० (५०%) उत्तरदात्यांनी कर्ज घेतलेले नाही.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की आदिवासींकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोण बदलत आहे. परंतु सावकार व बँकांनी केलेली बळजबरी ही संख्यात्मक दृष्टया कमी वाटली तरी त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

वरील प्रश्नाला अनुसरूनच कर्जवसुलीच्या बळजबरीचे स्वरूप जाणून घेणे महत्त्वाचे असल्याने,'' कर्ज वसुलीच्या बळजबरीचे स्वरूप कसे होते?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. ३४**

**उत्तरदात्यांना आलेल्या कर्जवसुलीविषयक बळजबरीचे स्वरूप दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | घरातील सामान जप्त केले | ०० | ००% |
| २. | जमीन मालमत्ता जप्त केली | ०० | ००% |
| ३. | शाब्दिक अपमान केला | ०६ | ३% |
| ४. | शारिरीक त्रास दिला | ०० | ००% |
| ५. | इतर प्रकारे | ०५ | २.५% |
| ६. | लागू पडत नाही. | १८९ | ९४.५% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की घरातील सामान किंवा मालमत्ता कोणीही जप्त केली नाही किंवा शारीरिक त्रासही दिला गेला नाही. परंतु शाब्दिक अपमान केला असे ०६ (०३%) उत्तरदात्यांनी सांगितले. यात जातीवाचक शिवीगाळ केल्या गेला असे त्यांचे म्हणणे आहे. तर इतरप्रकारे (भांडण, तंटा, करून) त्रास दिला असे ०५(२.५%) उत्तरदात्यांचे मत आहे.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, अजूनही शाब्दिक अपमान त्याचप्रमाणे कर्ज वसूलीसाठी त्रास देणे सुरूच आहे. हे माना आदिवासींच्या बाबतीत निदर्शनास येते.

कोणत्याही देशातील अर्थव्यवस्था त्या देशातील नागरिकांच्या क्रयशक्ती (खरेदी करण्याची शक्ती) व बचतीचे प्रमाण यावरच अवलंबून असते. बचत करण्यासाठी जर नागरिकांनी बँकाची निवड विविध माध्यमांद्वारे केली तर त्या बचतीचा देशाच्या विकासात फार मोठा उपयोग केल्या जातो आणि बचतीचे प्रमाण हे नागरिकांना मिळणाऱ्या उत्पन्नावर आधारित असते. उच्च उत्पन्न मर्यादा असणाऱ्यांना ठराविक प्रमाणात बचतीची सक्ती केली जाते. परंतु अत्यल्प उत्पन्न असणाऱ्यांना तशी सक्ती केली जाऊ शकत नाही. मात्र त्यांच्या भविष्यासाठी त्यांनी बचत करावी यासाठी त्यांना प्रोत्साहीत केले जाऊ शकते. 'थेंबे थेंबे तळे साचे' या म्हणीप्रमाणेच त्यांना थोडी थोडी करून बचत करायला लावणे व ही बचत देशातील सर्वात मोठ्या समुहाकडून करून घेणे म्हणजे आपोआपच देशासाठी मोठे भांडवल प्राप्त करून घेणे होय. बचत करणे ही गोष्ट बऱ्याच अंशी उत्पन्नावर अवलंबून असते. कारण त्यासाठी खर्च करण्याच्या मोहाला आवर घालावा लागतो व ते कार्य फार कठीण असते.

या संदर्भात माना समाजाचे मत व स्थिती जाणून घेण्यासाठी त्यांना "आपण मुलांच्या भविष्यासाठी पैशांची बचत करता काय?" असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ३५

## उत्तरदात्यांची भविष्यासाठी पैशांची बचत करण्याची प्रवृत्ती दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | थोडी बचत करतो | ३० | १५% |
| २. | अधिक प्रमाणात करतो | ०१ | ०.५% |
| ३. | शिल्लक उतर नसल्यामुळे बचत करीत नाही. | १६६ | ८३% |
| ४. | गरजच वाटत नाही. | ०३ | १.५% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, थोडी बचत करतो म्हणजे गावातील महिला व पुरूष बचत गट आहेत. त्यामध्ये महीना २० ते ५० रूपयांपर्यंत बचत करतो किंवा गावातील पोष्टांत आर.डी. (आवर्त ठेव) द्वारे महिन्याला २० ते ५० रू. जमा करतो असे म्हणणारे एकूण ३० (१५%) उत्तरदाते आहेत. तर अधिक प्रमाणात बचत करतो असे ०१ (०.५%) उत्तरदाते म्हणतात. त्यामध्ये उच्च शिक्षित व नोकरी करणारे आहेत. शिल्लक उरत नसल्यामुळे बचत करीत नाही असे महत्तम १६६ (८३%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर गरजच वाटत नाही असे ही उत्तर देणारे ०३(१.५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्या घरी कोणतातरी व्यवसाय आहेत. त्यांच्या त्यांची मुले ही तो व्यवसाय करणार आहेत. आमची मूले शिकून त्यांना नोकरी लागत नाही असे त्यांचे मत आहे.

शिल्लक उरत नसल्यामुळे बचत करीत नाही असे महत्तम उत्तरदात्यांचे मत आहे व ही संख्या फार मोठी आहे. या संदर्भाने माना आदिवासींची बचत करण्याची

प्रवृत्ती व स्थिती अत्यंत कमी असून त्यांचे आर्थिक मागासलेपण सहजच आपल्या लक्षात येते असे म्हणावयास हरकत नाही.

बचत करतांना ती कुठे करावी हाही महत्त्वाचा प्रश्न आहे. पूर्वी लोक एखादया भांड्यात पैशाची बचत करून ते भांडे कुठेतरी जमिनीत पुरून ठेवत व नंतर ते चोरले जाई काही लोक दुसऱ्यांकडे पैसे बचत करून ठेवत व कधी—कधी त्यांची प्रामाणिकता लयाला गेल्याने कित्येकांचे पैसे लुबाडले जायचे. आता बँका व पोस्टातून पैसे बचत केल्याने त्यावर व्याज तर मिळतेच शिवाय पैशांच्या सुरक्षिततेची हमीसुद्धा मिळते. माना जमातीत बचत करण्याची प्रवृत्ती व स्थिती अतिशय कमी आहे. परंतु जे काही थोडे लोक बचत करतात ते कुठे करतात? हे जाणून घेण्यासाठी 'जर बचत कीत असाल ती तो कुठे करता?'' असाही एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. ३६

## उत्तरदात्यांची बचत करण्याचे स्थान दर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | घरीच | ०० | ००% |
| २. | गावातील पोष्टात | ०९ | ४.५% |
| ३. | बँकेत | १८ | ९% |
| ४. | सावकाराकडे | ०० | ००% |
| ५. | बचत गटात | ०३ | १.५% |
| ६. | इतर ठिकाणी | ०१ | ०.५% |
| ७. | लागू पडत नाही | १६९ | ८४.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, एकूण ३१(१५.५%) एत्तरदाते बचत करणारे आहेत. त्यापैकी सावकाराकडे किंवा घरी कुणीही बचत करीत नाही. तर ओळखीचे किंवा नातेवाईक या अर्थाने इतर ठिकाणी बचत करतो असे उत्तर देणारे ०१ (०.५%) उत्तरदाते आहेत. गावातील नव्यानेच स्थापन झालेल्या बचत गटांमध्ये बचत करतो असे ०३ (१.५%) उत्तरदाते सांगतात. तर गावातील पोष्टात बचत करतो असे ०९ (४.५%) उत्तरदात्यांनी उत्तरे दिली. बँकेत बचत करतो असे महत्तम १८(०९%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे.

यावरून पोस्टाचे किंवा बँकेचे महत्त्व माना आदिवासींना समजू लागलेले आहे. व अल्प का होईना परंतु बचत करण्याकडे त्यांची प्रवृत्ती वाढू लागली आहे. हे एक सकारात्मक परिवर्तन आहे असे म्हणायला हरकत नाही.

# संदर्भ सूची


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | गोडबोले वि.ज. | — | समस्या शंभर कोटींची जनगणना —२००१ | पृ. ०१ |
| | | — | दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे प्रथमावृत्ती २००२. | |
| २. | प्रा. देशपांडे प्र.वि. | — | सांस्कृतिक मानवशास्त्र | पृ.१४८ |
| | प्रा. बोबडे प्रकाश | — | श्रीपाद मुंजे, विद्या प्रकाशन रूईकर मार्ग, नागपूर | |
| | प्रा. बारबिंड भगवान | | | |
| | | — | प्रथमावृत्ती १४ जुलै १९८१ | |
| ३. | देशपांडे प्र.वि. | — | सांस्कृतिक मानव वंशशास्त्र | पृ.१४९ |
| | बोबडे | — | कित्ता. | |
| | बारबिंड | | | |
| ४. | देशपांडे प्र.वि. | — | सांस्कृतिक मानव वंशशास्त्र | पृ.१४८ |
| | बोबडे | — | कित्ता. | |
| | बारबिंड | | | |
| ५. | Dr. Mehta B.H. | — | Gonds of the Central Indian high lands volu. Two | पृ.७५६ |
| | | — | Concept publishing Company | |
| | | — | New Delhi. | |
| ६. | दुबे शामचरण | — | भारतीय समाज | पृ. ५८ |
| | | — | नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नवीदिल्ली | |
| | | — | दुसरी आवृत्ती —२००३. | |
| ७. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ.२७० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | — | मानवता संस्कृतिक विकास व शोध केंन्द्र | |
| | | — | चामोर्शी नोव्हे. २००४ | |
| ८. | डॉ. आगलावे प्रदीप | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ.१५६ |
| | | — | साईनाथ प्रकाशन नागपूर. | |
| | | — | प्रथमावृत्ती ऑगस्ट .२००४ | |
| ९. | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ.३८६ |
| | | — | कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे—२००३. | |
| १०. | डॉ. आगलावे प्रदीप | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ.१५७ |
| | | — | कित्ता. | |
| ११. | डॉ. सिंह विरेन्द्रनाथ | — | ग्रामीण समाजशास्त्र | पृ. १८ |
| | | — | विवेक प्रकाशन दिल्ली. प्रथमावृत्ती —१९८८ | |
| १२. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | समाजाास्त्रीय विचारचिंतन | पृ. ९६ |
| | | — | अशोक पिंपळपुरे प्रकाशन दिल्ली प्रथमावृत्ती नागपूर ऑक्टो २०१० | |
| १३. | शरदचंद्र | — | भारतशासन आणि महाराष्ट्र शासनाचे नवीन कायदे —२००१ | पृ. १६ |
| | | — | नवीन कायदे प्रकाशन उन्नाव कानपूर. | |
| १४. | Ghyvye G.S. | – | The Scheduled Tribes | पृ. २३ |
| | | – | Thivd Edition 1963 | |
| | | – | Popular Prakashan Bombay. | |
| १५. | Kulkarni M.G. | | Problems of Tribal Development – A case study | पृ.३४६ |
| | | - | Parimal Prakashan Aurangabad First Published 1974 | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | समाजशास्त्रीय विचारचिंतन | पृ. ४२ |
| | | — | कित्ता | |
| १७. | डॉ. गारे गोविंद | — | बदलच्या उंबरठ्यावरील कोकणा आदिवासी | पृ.३३१ |
| | | — | श्री विद्या प्रकाशन पुणे. | |
| १८. | शरदचंद्र | — | भारत शासन आणि महाराष्ट्र शासनाचे नवीन कायदे —२००१ | पृ. १५ |
| | | — | कित्ता | |
| १९. | Ghurye G.S. | — | Scheduled Tribes | पृ.१९८ |
| | | — | कित्ता. | |
| २०. | महाराष्ट्र शासन | — | राज्यातील शेतकरी भूमिहीनांना ताठ मानेने जगण्यास मदत करणारे महाराष्ट्र शासनाचे निर्णय | पृ.०१ |
| | | — | माहिती व जनसंपर्क महासंचलनालय, महाराष्ट्र शासन, रंगनाथ मुद्रण वडाळा मुंबई नोव्हे. १९८८ | |
| २१. | डॉ. खडसे भा. की. | — | मांग जात समाजशास्त्रीय अध्ययन | पृ.२१७ |
| | | — | मंगेश प्रकाशन नागपूर—१९९० | |
| २२. | डॉ. गारे गोविंद | — | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे २००२. | पृ. २१ |

## ५.२ शासकिय योजना व माना आदिवासींसाठी त्याचे फायदे (मूल्यांकन)

भारतात विविध वंश, धर्म आणि संस्कृतीचे लोक राहतात. इतकेच नव्हे तर विविध भाषा आणि बोली बोलणारे लोक आहेत. त्यामुळे भारतीय समाजात विविधता आढळते. भारतीय समाज विविध जातीमध्ये विभाजित झाला आहे. जातींप्रमाणेच विविध आदिवासी जमाती सुद्धा आहेत. देशातील जवळपास सर्वच राज्यात आदिवासी लोक आढळतात. इंग्रजीमधील 'Tribe' या शब्दाचा अर्थ 'जमात असा होतो' आदिपासून किंवा सुरूवातीपासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे म्हणजे आदिवासी होय. त्यामुळेच जंगलात किंवा डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांना आदिवासी असे संबोधले जाते. ''डॉ. व्हेरीयर इल्विन आणि ठक्कर बाप्पा यांनी आदिवासींना Aboriginal असे संबोधले आहे. Aboriginal याचा अर्थ मूळचे निवासी असा होतो. आदिवासी हे जंगलात किंवा डोंगराळ भागात राहतात म्हणून त्यांना 'वन्य जमाती' किंवा 'गिरीजन' असे म्हटले जाते. आदिवासी हे यादेशातील मूळचे रहिवासी आहेत. म्हणून त्यांना वनवासी गिरीजन म्हणणे योग्य नाही. ते खऱ्या अर्थाने या देशाचे आदिवासी म्हणजेच मूळचे निवासी अर्थात 'मूळनिवासी' आहेत. भारतीय संविधानात आदिवासींना 'अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) असे संबोधले आहे. भारतीय संविधानातील कलम ३४२ (१) अनुसार 'ज्यांचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादीत केला आहे. त्यांना अनुसूचित जमाती असे म्हणतात.''[१] हया सर्व व्याख्या जरी शास्त्रीय दृष्टया योग्य असल्या तरी 'आदिवासी' हा शब्द मात्र व्यवहारात लोक 'मागासलेले' या अर्थानेच घेत असतात. मागासलेले मग ते भौतिक साधनसंपत्ती ने, आर्थिक, सामाजिक, वैचारिक, शैक्षणिक कोणत्याही बाबतीत असोत. एकंदर सर्वच बाबतीत मागासलेले ज्यांचे राहणीमान इतर समाजापेक्षा (गैरआदिवासी पेक्षा) निकृष्ट दर्जाचे आहे. कारण त्यांच्याजवळ कोणतेही सुखसंपन्नतेची भौतिक साधने नाहीत. त्यामुळे इतर गैरआदिवासीपेक्षा बऱ्याच बाबतीत मागे राहिलेले आदिवासी या अर्थाने लोक त्यांच्याकडे पाहतात. एका अर्थाने सर्वजण हे कबूलचकरतात कीआदिवासी समाज हा खरोखरच भौतिक, वैचारिक, शैक्षणिक, सामाजिक या साऱ्याच बाबतीत मागासलेला आहे. त्यामुळे

शासनही त्यांच्यासाठी विविध योजना राबवून त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्नच करीत आहे. परंतु श्री जानबा चौधरींची मुलाखत घेतल्यावर त्यांना आदिवासी म्हटलेले आवडत नव्हते. कारण कदाचित त्यांच्या काळात एवढया मोठया प्रमाणावर शासकिय योजना आदिवासींच्या नावावर नव्हत्या व त्यांना त्या माहितही नव्हत्या. परंतु सद्या परिस्थिती अशी आहेकी, शासकिय आदिवासी योजनांचा लाभ घेण्यासाठी इतरही गैरआदिवासी समाजातील काही लोक खोटी प्रमाणपत्रे बनवून त्या योजना लाटत आहेत. माना आदिवासींना सद्यस्थितीत या 'आदिवासी' शब्दाबाबत काय वाटते हे जाणून घेणे अतिशय महत्वाचे ठरते.

यासाठीच माना आदिवासींना आदिवासी म्हणवून घेणे किंवा आदिवासी म्हटलेले कितपत योग्य वाटते? त्यांना ते आवडते किंवा नाही याबाबत त्यांची मनोवृत्ती जाणून घेण्यासाठी 'आपल्याला आदिवासी हा शब्द योग्य वाटतो काय? 'असा एक प्रश्न संशोधिकेकडून विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. १**

**उत्तरदात्यांची आदिवासी शब्दाबद्दल भावना दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | योग्य वाटते | १८५ | ९२.५% |
| २. | योग्य वाटत नाही | ०४ | २% |
| ३. | उपहासाने बोलल्या जातो. | ०३ | १.५% |
| ४. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०८ | ०४% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, 'आदिवासी' हा शब्द योग्य वाटतो असे उत्तर देणारे महत्तम १८५ (९२.५%) उत्तरदाते आहेत. त्यांची

आता अनुसूचित जमाती या अर्थाने आपल्याला आदिवासी म्हणतात व आपण आदिवासी नाही म्हटले तर कदाचित आपले नाव या यादीतून वगळून टाकतील, आपल्याला कोणतीही सवलत योजना मिळणार नाही हयाही विचाराचे उत्तरदाते आहेत. तर आदिवासी आहोतच. आम्ही मूळचे भारतीय अशा अर्थाने आदिवासी शब्द योग्य वाटतो असेही म्हणणारे उत्तरदाते आहेत. त्याचप्रमाणे आम्ही इतके मागासलेले आहोत की इतर समाज पुढे गेला (विकसित झाला) व आम्ही मागेच राहिलो. (अविकसित राहिलो) म्हणनूही आम्ही आदिवासी असेही मत व्यक्त करणारे उत्तरदाते आहेत. एकंदर या उत्तरदात्यांना आदिवासी हा शब्द योग्य वाटतो.

आदिवासी शब्द योग्य वाटत नाही असे म्हणणारे उत्तरदाते ०४ (०२%) आहेत. तर उपहासाने बोलल्या जाते असे म्हणणारे एकूण ०३ (१.५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते आम्ही जरी अनुसूचित जमातीत आहोत तरी सुद्धा आम्ही मागासलेले आहोत म्हणून आम्हाला आदिवासी असे म्हटल्या जाते, ते आम्हाला आवडत नाही. लोक आदिवासी म्हणून चिडवतात. त्यांच्या मुलाबाळांना आदिवासी म्हणून चिडवतात व त्यांना आदिवासी म्हणून इतरत्र योग्य वागणूक दिली जात नाही. शाळांमधून आदिवासींना काय येते. म्हणून त्यांच्या मुलांना नीट व दर्जेदार शिक्षण दिले जात नाही. तर सर्वत्र आदिवासी म्हणून त्यांची हेटाळणीच केली जाते. म्हणून त्यांना आदिवासी म्हणणे योग्य वाटत नाही. असे ते म्हणतात. व बऱ्याच प्रमाणात त्यांचे म्हणणे योग्य आहे असेही आपल्या निदर्शनास येते यापेक्षा वेगळे उत्तर देणारे म्हणजे आदिवासी शब्द योग्य असला तरी लोक चिडवतात म्हणून त्यांना तो शब्द आववडत नाही. त्यापेक्षा S.T. म्हणा. असे त्यांचे मत आहे असे एकूण ०८ (४%) उत्तरदाते आहेत.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, माना आदिवासी समुदायाला 'आदिवासी' शब्द महत्तम लोकांना योग्य वाटतो. आदिवासी शब्दाचा त्यांना अभिमान आहे परंतु आदिवासी शब्दाशी जुळलेल्या उपहासात्मक व मागासलेल्या म्हणून हेटाळणी

करण्यात येते त्याबाबत मात्र इतर समाजाबद्दल (गैर आदिवासींबद्दल) त्यांची नाराजी अगदी रास्त आहे.

आदिवासी समाज अजूनही मोठ्या प्रमाणात मागासलेला आहे. आदिवासी समाजाचा विविध स्तरावरून विकास झालेला नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचा शैक्षणिक विकास झालेला नाही. म्हणून त्यांचा आर्थिक विकास झालेला नाही. त्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य, धार्मिक, राजकिय, शैक्षणिक व आर्थिक अशा बऱ्याच प्रमुख व महत्त्वाच्या समस्या भारतातील आदिवासींच्या बाबतीत निदर्शनास येतात. या समस्या सोडविल्याशिवाय आदिवासींचा खऱ्या अर्थाने विकास होऊ शकत नाही. व पर्यायाने संपूर्ण भारताचाही विकास पूर्णपणे व यशस्वीरित्या होऊ शकत नाही हे लक्षात घेऊन शासकिय व गैरशासकिय संघटनांनी आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी विशेष उपक्रम राबविले आहेत.

''केन्द्रशासन आणि राज्यशासनाने आदिवासींचे कल्याण व्हावे म्हणून 'आदिवासी कल्याण कार्यक्रम सुरू केले आहे.''२ भारतीय संविधानात अनुसूचित जाती व जमातींसाठी विविध संरक्षणात्मक व विकासात्मक कायदे केलेले आहेत. ''४६ व्या कलमानुसार राज्याकडून आदिवासींना आर्थिक आणि शिक्षणासंबंधी विशेष सोयी देण्याची व्यवस्था केली आहे. जेणे करून ते आपली उन्नती करून घेऊ शकतील. कलम १६४ नुसार आदिवासी कल्याणाकरीता आणि त्यांच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी राज्यात सल्लागार परिषद आणि स्वतंत्र विभागाची स्थापना करण्याची व्यवस्था केली आहे. तसेच केंद्र सरकारात एका विशेष अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची व्यवस्था करण्यात आली. कलम २४४ (५) नुसार आंध्रप्रदेश, बिहार, गुजरात, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा आणि राजस्थान येथील राज्यपाल दरवर्षी राष्ट्रपतीस आदिवासींच्या प्रशासनाबद्दल अहवाल सादर करतील. कलम ३३० आणि ३३२ नुसार आदिवासींना लोकसभा आणि विधानसभेत पुरेसे प्रतिनिधित्त्व मिळावे म्हणून त्यांना आरक्षण देण्यात आले. कलम ३३५ नुसार प्रशासनाची कार्यक्षमता सुरक्षित राखून आदिवासींना केंद्रीय आणि राज्य सरकारच्या नोकऱ्यांमध्ये विशेष सवलती दिल्या आहे. आदिवासी

उमेदवारांनी प्रशासनातील पदासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता पूर्ण केली पाहिजे. वयोमर्यादेच्या बाबतीत त्यांना सूट देण्यात आली आहे. कलम ३३८ नुसार अनुसूचित जाती आणि आदिवासी करीता एका अधिकाऱ्यांची नेमणुक  करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला देण्यात आला आहे. अनुसूचित जाती आणि आदिवासी कल्याणासाठी संविधानाने दिलेल्या संरक्षणात्मक तरतुदीचे पालन होते की नाही, हे पाहणे आणि त्याबाबत अहवाल  राष्ट्रपतीला सादर करणे हे त्या अधिकाऱ्याचे विशेष कार्य असेल. राष्ट्रपती संसदेच्या दोन्ही सभागृहापुढे हे अहवाल ठेवतील. या विशेष अधिकाऱ्यास 'अनुसूचित जाती जमाती' कमिश्नर असे म्हणतात. कलम ३४२ नुसार राष्ट्रपतींना असा अधिकार देण्यात आला की, राज्यांच्या राज्यपालाच्या सल्ल्याने प्रत्येक राज्यातील अनुसूचित जमाती कोणत्या आहेत ते ठरविण्यात यावे आणि तशी यादी तयार करावी. २६ जानेवारी १९५० ला केंद्र सरकारने असा निर्णय घेतला की, नोकऱ्याकरिता राष्ट्रीय पातळीवर, खुली स्पर्धा आहे. आणि ज्या नियुक्त्या अन्य प्रकारे केल्या जातात त्यात अनुसूचित जाती आणि जमातीकरिता अनुक्रमे १५% आणि ७.५% जागा राखून ठेवण्यात याव्यात. सरकारी, मर्यादित कंपन्या आणि स्वायत्त संस्थांना देखील हा नियम लागू आहे. अशाप्रकारे आदिवासी लोकांना इतर समाजाबरोबर आणण्यासाठी विशेष सोयी आणि सवलतीची तरतूद भारतीय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. ''३

अशाप्रकारे भारतीय संसदेने वेळोवेळी कायदयात सुधारणा करून व कायदे करून आदिवासींना विविध सोयी व सवलती तसेच आरक्षणाच्या माध्यमातून समान न्याय मिळावा म्हणून तरतुदी केल्या आहेत. परंतु खरोखरच या सोयीव सवलतींचा योग्य उपयोग आदिवासींना होतो काय? किंवा ते या योजनांचा फायदा घेतात काय? याबाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर श्री अरूण शिंदे यांच्या मते, ''स्वातंत्र्यानंतरही साठ वर्षे सतत विकासाच्या दिशेने वाटचाल करूनही हवा तसा विकास साधला जात नाही याची प्रकर्षाने जाणीव होत आहे. साठ वर्षात अनेक विकास योजना आल्या. अनेक स्थिरावल्या, कधी काही नामशेष झाल्या हे

समजलेच नाही. दारिद्रयामध्ये खितपत पडलेल्या सामान्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच जातांना दिसते आहे. विकास योजनांचे लाभार्थी म्हणुन नेहमीचेचे चेहरे सतत दिसत आहेत. प्रत्येक योजनेमागिल भूमिका स्पष्टपणे समोर न आल्यामुळै लाभार्थी पुन्हा–पुन्हा लाभ मिळविण्याच्या रांगेत दिसत आहेत. सामान्य माणसांना रोजच्या जिवनामध्ये सतत अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सामान्यांचा वेळ, पैसा, आणि शक्ती विनाकारण वाया जाते आहे.''४ यावरून असे निदर्शनास येते की खरोखरच ज्यांच्या नावाने योजना निघतात त्या त्यांच्यापर्यंत खरोखरच पोचतात काय? सद्यस्थितीत माजलेल्या तणाप्रमाणे भ्रष्टाचाराची माजलेली कीड जिथे शिकल्या सवरल्या व पुढारलेल्या लोकांनाही आडमार्गाने घेते व त्यांनाही त्यांचे अधिकार मिळू देत नाही तेथे या भोळया –भाबडया निरक्षर लोकांचा टिकाव लागत असेल काय? असे बरेच प्रश्न अनुत्तरीतच राहतात. या प्रश्नांची उत्तरे जाणून घेणे संशोधिकेसाठी फार महत्त्वाचे ठरले.

शासनाने आदिवासींच्या व विशेषत: आदिवासी शेतकऱ्यांच्या विकासाकरिता बऱ्याच दर्जेदार योजना राबविल्या आहेत.

१) दारिद्रय रेषेखालील आदिवासी उपयोजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अर्थसहाय्य येण्याची योजना :– त्यासाठी २५,००० रू. पेक्षा कमी उत्पन्न व ६ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी शेतजमीन असणे आवश्यक आहे. परंतु त्यासाठी BPL. यादीत नाव असणे आवश्यक आहे. परंतु अनेक शेतकऱ्यांची नावे बी.पी.एल. यातून वगळल्या गेली ज्यांचे उत्पन्न २५,०००रू. पेक्षा कमी आहे. त्यामुळे या योजनेपासून अनेक लाभार्थी वंचित आहेत. या योजनेमुळे शेतीसाठी लागणारे सर्व प्रकारचे अर्थसहाय्य शेतकऱ्यांना केले जाते.

२) आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी लाभार्थीकडील दुभत्या जनावरांना खद्यपुरवठा करणे.

३) जंगल भागातील जनावरांसाठी कृमीनाशक औषधी खरेदी.

४) जंगल भागातील जनावरांसाठी रोगप्रादुर्भाव नियंत्रणासाठी पेटंट औषधी खरेदी.

५) ५०% अनुदानावर गोपालकांना चाबकटर पुरविणे.

६) ८ ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुला/मुलींना लेडीज सायकल पुरविणे.

७) स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देणे

८) प्राथमिक शाळेतील अनुजाती जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती.

९) १ ला ते ४ थी मधील विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता

१०) शालेय पोषण आहार योजना

११) लेखन साहित्य व गणवेश योजना.

१२) विद्यार्थ्यांना शिक्षणाकरिता विद्यावेतन व शिष्यवृत्ती योजना.

१३) आदिवासी स्त्रियांसाठी मातृत्व अनुदान योजना.

या व अशाप्रकारे आदिवासी (अनुसूचित जमाती) तसेच ग्रामीण भागातील सुधारणासाठीशासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. परंतु या योजनांची माहीती व या योजनांचा लाभ आदिवासींपर्यंत पोहोचतो काय? हाच प्रश्न शेवटी महत्त्वाचा ठरतो. माना आदिवासी विशेषतः दुर्गम, ग्रामीण भागात राहतो, शेती करतो. ज्यांची शेती नाही ते इतर शेतकऱ्यांकडे मजूरीने व गडीमाणूस म्हणून काम करतात. परंतु संध्या काही सुशिक्षित मुले गडीमाणूस म्हणून काम करण्यापेक्षा स्वत:चा व्यवसाय करण्याला प्राधान्य देऊ लागले आहेत. ज्यांच्या शेत्या आहेत त्या जंगलात किंवा जंगलाशेजारी आहेत. त्यांना कुंपन नाही, सिंचनाचे साधन नाही व उत्तम बि–बियाणे नाही खतांच्या व किटकनाशकांच्या औषधींच्या किंमती तर गणनाला भिडल्यात आणि उत्पादनाला भाव मिळत नाही अशा परिस्थितीत जगणे कठीण झालेल्या शेतमजुरांना शासनाने थोड्याफार प्रमाणात मदत व्हावी म्हणून विविध सोयी सवलती व योजना जाहीर केलेल्या

आहेत. त्यांची माहिती माना आदिवासींना माहित आहे काय? हे जाणून घेण्यासाठी ''शासनाने आदिवासींना व्यवसाय करण्यासाठी व शेतीसाठी विविध सोयी सवलती उपलब्ध करून दिलेल्या आहेत. याची तुम्हाला माहिती आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. २**

**उत्तरदात्यांची शासनाच्या योजनांबाबात माहिती दर्शक सारणी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय, पूर्ण माहिती आहे. | १० | ५% |
| २. | थोडीफार माहिती आहे. | १३१ | ६५.५% |
| ३. | नाही | ५७ | २८.५% |
| ४. | सांगता येत नाही | ०२ | १% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, होय, पूर्ण माहिती आहे असे उत्तर देणारे केवळ १०(०.५%) उत्तरदाते आहेत. हे उत्तरदाते सतत ग्रामपंचायत व पंचायत समिती, आदिवासी समाज कल्याण विभाग यांच्याशी संपर्क साधून असतात. त्यामुळे त्यांना ही माहीती आहे. थोडीफार माहिती आहे असे महत्तम १३१ (६५.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. हे सामान्य उत्तरदाते नेहमीच आपल्या कामात व्यस्त असताना इतर कुणी सांगितली तर माहिती ऐकतात. त्यांना काही योजनांबद्दल माहिती आहे. तर योजनांबद्दल अजिबात माहिती नाही असे ५७ (२८.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. हे उत्तरदाते म्हातारे व स्त्रिया आहेत. काही उत्तरदात्यांकडे राशनकार्ड (शिधापत्रिका) व दारिद्रेरेषेखालील यादीत नाव नोंद नसल्याने योजना मिळत नाही. त्यामुळे ते योजनेकडे

लक्ष देत नाहीत. म्हणून त्यांना योजना माहित नाहीत. तर सांगता येत नाही असे तटस्थ भूमिका घेणारे ०२(०१%) उत्तरदाते आहेत.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, माना आदिवासी आता आपल्या अधिकाराबद्दल जागृत होऊ लागला आहे व योजनांची माहिती करून घेऊन लागला आहे. मात्र शेती विषयक व व्यवसायाबाबत योजनांची माहिती त्यांना पूर्णपणे माहित नाही आणि योजना माहित असल्या तरी ते मिळविण्याचे निकषा त्यांना माहित नसतात. तरी ते त्यांना आवश्यक असणाऱ्या योजनांबाबत माहिती काढून घेऊ लागले आहेत.

सारणी क्र.०२ ला अनुसरूनच ''योजनांची माहिती असल्यास या योजनांची माहिती आपल्याला कोणाकडून मिळाली?'' असाही प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढीलसारणीत दर्शविण्यात आल्या आहेत.

**सारणी क्र. ३**

**उत्तरदात्यांची शासकिय योजना मिळविण्याची स्थानदर्शन सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायतीमार्फत मिळाली | ९७ | ४८.५% |
| २. | संस्थामार्फत मिळाली | ०५ | २.५% |
| ३. | समूहाच्या नेत्यांकडून मिळाली | ०४ | ०२% |
| ४. | स्वत:च मिळविली | २० | १०% |
| ५. | शासनाच्या अधिकाऱ्यांनी सांगितली. | १५ | ७.५% |
| ६. | लागू पडत नाही | ५९ | २९.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, स्वयंसेवी संस्थांमार्फत माहिती मिळाली असे ०५ (२.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. समूहाच्या

नेत्यांकडॅन माहिती मिळाली असे फक्त ०४ (२%) उत्तरदात्यांचे मत आहे. याचा अर्थ माना समाजाचे मेळावे आयोजित केले जातात. व त्यात नेत्यांकडून आपल्या मागासलेल्या पणाचा समाजाला योजनांची माहिती दिली जाते. परंतु ती माहिती मिळविणारांचे प्रमाण मात्र अंत्यल्प आहे. स्वत:च माहिती मिळविली असे उत्तर देणारे २० (१०%) उत्तरदाते आहेत. त्यांनी एकमेकांना विचारून व त्यांना जेव्हा जेव्हा गरज वाटली तेव्हा तेव्हा स्वत:च कार्यालयांत जाऊन माहिती मिळविली. शासनाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलेली असे १५(७.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. यात आदिवासी समाजकल्याण कार्यक्रमाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. ग्रामपंचायतीमार्फत योजनांची माहिती मिळाली असे महत्तम ९७ (४८.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. ७३व्या घटनादुरूस्तीने ग्रामपंचायतीला व ग्रामसभेला अनेक अधिकार प्रदान केल्याने हा मोठा फायदा झाला की आता गावातील आदिवासी व इतर मागासलेल्या लोकांना ग्रामपंचायती मार्फत माहिती पुरविली जाते. पंचायतराजची ही यशस्विता आहे असे समजण्यास हरकत नाही.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, माना आदिवासी हे योजनांबाबत ग्रामपंचायतीमार्फत माहिती मिळवू लागले आहेत.

योजनांची माहिती असणे आणि प्रत्यक्ष योजनांचा लाभ घेणे हया दोन अतिशय वेगवेगळ्या गोष्टी आहेत. एखादी योजना माहिती करून घेणे आणि जरी तीचे निकष लागू पडत असले तरी तया योजनेचा लाभ करून घेणे हयात फार मोठी तफावत आहे. योजनांची माहिती आहे म्हटल्यावर हया योजनांचा लाभ किती माना आदिवासींना झाला हेही जाणून घेणे अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे, ‘‘आपण कधी शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ घेतला आहे काय? असा एक प्रश्न संस्थेधिकेकडून विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. ४

## उत्तरदात्यांची शासकिय वैयक्तिक लाभाच्या योजनांचा घेतलेला लाभदर्शक सारणी.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | होय | २५ | १२.५% |
| २. | नाही | १२३ | ६१.५% |
| ३. | आम्हाला योजना मिळतच नाही | ४९ | २४.५% |
| ४. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०३ | १.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

शासकिय वैयक्तिक लाभाच्या आदिवासींसाठी बऱ्याच विकासात्मक योजना आहेत. त्यांची माहिती आपण यापूर्वी पाहिलेलीच आहे. योजना आहेत परंतु आदिवासींच्या नावाखाली अधिकाधिक कर्मचारी, अधिकारी, व इतर स्वयंसेवी संस्थोचे कर्मचारी, अधिकारी त्याचप्रमाणे इतर हुशार व चलाख लोक स्वत:चेच हित मोठयाप्रमाणावर साधून घेतात असे सगळीकडे निदर्शनास येते. खोटे दस्तावेज सादर करून बऱ्याच योजना कागदोपत्री दाखवितात व त्यांचा निधी ते लाटतात असेही संशोधिकेच्या वारंवार निदर्शनास आले. यात शासकिय व त्याचप्रमाणे स्वयंसेवी संस्था जास्तीत जास्त आदिवासींच्या योजनांचा फायदा उठवतात. काही आदिवासींसुद्धा मिळालेल्या योजनांचा अगदी थोड्या पैशात निव्वळ दारू व व्यसनासाठी इतरांना विकून टाकतात. परंतु स्वत: त्याचा फायदा करून घेत नाहीत. ही बाब आता सर्वत्र सर्रासपणे सुरू आहे.

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या योजना जसे शेतीसाठी लागणारे साहित्य, घरांसाठी व्यवसायासाठीच व इतर शैक्षणिक व उच्च शैक्षणिक बाबींसाठी शासनाकडून येणारी आर्थिक मदत अशाप्रकारे लाभ घेणारे होय, असे उत्तर देणारे केवळ २५ (१२.५%) उत्तरदाते आहेत व नाही असे उत्तर देणारे १२३ (६१.५%) उत्तरदाते आहेत. ही संख्या फार मोठी आहे.

आम्हाला योजना मिळतच नाही असे म्हणून कोणत्याही योजना घेतल्या नाही असे ४९ (२४.५%) उत्तरदाते उत्तर देतात. त्यांच्यामते त्यांचे राशनकार्ड (शिधापत्रिका) लाल रंगाची आहे. ते दारिद्रय रेषेखालील यादीत समावेशित नाही. कारण त्यांच्या नावाने ६ एकरपेक्षा जास्त शेतजमिन आहे. म्हणून त्यांना योजना मिळत नाहीत परंतू ६ एकर पर्यंत शेतीवरही योजना मिळतात हे त्यांना माहित नाही. यापेक्षा वेगळे उत्तर देणारे ०३ (१.५%) उत्तरदाते आहेत. त्यांनी योजनेसाठी प्रयत्न केले. परंतु त्यांना योजनेचे लाभ मिळाले नाही.

वरील सारणीवरून असे लक्षात येते की, माना समाजात शेतकरी आहेत. परंतु शेतीवर आधारित योजनाही त्यांना मिळत नाही. एकूण १७५ (८७.५%) उत्तरदाते शासकिय 'वैयक्तिक' लाभाच्या योजनापासून वंचित आहेत. ही फार खेदाची बाब आहे. असे म्हणायला हरकत नाही. त्यामुळे विकासाचे प्रयत्न निव्वळ कागदोपत्रीच आहेत असे निदर्शनास येते.

सारणी क्र. ४ प्रमाणे एकूण २५ उत्तरदात्यांना शासकिय वैयक्तिक योजनांचा लाभ मिळालेला आहे. त्यांनी कोणकोणत्या योजनांचा लाभ घेतला आहे हे जाणून घेण्यासाठी 'घेतला असल्यास कोणकोणत्या योजनांचा लाभ घेतला?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. ५**

**उत्तरदात्यांनी कोणकोणत्या शासकिय वैयक्तिक लाभच्या योजना घेतल्या त्यांची माहिती दर्शक सारणी.**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शेतीविकासासाठी लागणारी सामुग्री | ११ | ५.५% |
| २. | व्यवसायाकरिता लागणारे साहित्य | ०१ | ०.५% |
| ३. | घरगुती वापरासाठी लागणारे साहित्य | ०६ | ०.३% |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | ठतर | ०७ | ३.५% |
| ५. | लागू पडत नाही. | १७५ | ८७.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, एकूण ११ (५.५%) उत्तरदात्यांनी शेतीविकासासाठी लागणाऱ्या सामुग्रीच्या स्वरूपात शासकिय वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ घेतला आहे. तर ०१ (०.५%) उत्तरदात्यांनी व्यवसायाकरीता लागणारे साहित्य मिळविले आहे. ०६(३%) उत्तरदात्यांनी घरगुती व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्याचा लाभ घेतलेला आहे. तर इतर योजनांचा ०७ (३.५%) उत्तरदात्यांनी लाभ घेतलेला आहे. संशोधन विश्वातील एकूण २०० उत्तरदात्यांपैकी १५७ (७८ण्५%) उत्तरदाते शेती करतात. परंतु त्यापैकी फक्त ११(५.५%) उत्तरदात्यांना शेती विकासासाठी लागणाऱ्या सामुग्रीचा लाभ मिळाला आहे. दर वर्षी शेती करण्याकरीता ०% व्याजदराने कर्जाच्या स्वरूपात मात्र सध्या शासनाने सर्व शेतकऱ्यांना मदत करण्याचे सूरू केलेले आहे. ती मदत योग्य आहे. परंतु त्यासाठी आदल्या वर्षीचे संपूर्ण कर्ज परत करावे लागते ही मात्र अट आहे आणि नापिकी झाली किंवा इतर कोणते आर्थिक खर्चाचे काम आले तर शेतकऱ्यांना कर्ज फेडीअभावी ही मदत मिळू शकत नाही. संशोधन क्षेत्रात ७७% उत्तरदाते शेती व्यवसाय करतात व कमी अधिक प्रमाणात त्यांच्याकडे शेती असली तरी त्या सर्वांची आर्थिक परिस्थिती मात्र जवळपास सारखीच आहे. कारण शेती विषयीच्या समस्या सर्वश्रृत आहेत. शहरी भागातील एका मजूराचे घर व त्याचे राहणीमान आणि संशोधिकेने एका १८ एकर शेती मालकाच्या घरी भेट दिली तेव्हा त्याच्या घराची व राहणीमानाची तुलना केली तर शहरी मजदूरचे शेतकऱ्यांच्या मानाने कितीतरी पटीने उच्च राहणीमाना आहे असे वाटले. कारण पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारी शेती निव्वळ ७/१२ च्या फार्मवरच आहे. प्रत्यक्षात मात्र तिचे लाभ अजिबात दिसून येत नाही. प्रा. देशपांडे, प्रा. बोबडे व प्रा. बारबिड यांच्या मते, ''आदिम समाजातील शेती अविकसित आहे.''[५] त्यामुळे शेती

विकासासाठी शासकिय पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे व त्याचा लाभ सर्व आदिवासींना व इतर शेतकऱ्यांना मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यासोबतच शेतमालाला भाव मिळणे आवश्यक आहे. १ लाख वेतन असणाऱ्यांना महागाई भत्ता मिळतो तरी त्यांच्यासाठी व १००रू. दरदिवशी मजुरी असणाऱ्या मजूरासाठी त्याला महागाईभत्ता मिळत नाही शेतमालाचे भाव मात्र सर्वत्र सारखेच असल्याचे दिसतात. त्यामुळे मजूरी वाढविणे व शेतमालाला भाव मिळवून देणे हे शेतीचा व शेतमालाचा दर्जा उंचावण्याचे एक साधन ठरेल असे संशोधिकेला वाटते.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की, अजूनही ९०% उत्तरदाते शेतीविकासाच्या योजनांपासून वंचित आहेत. त्यांना त्या योजनांचा कोणताही फायदा झालेला नाही असे म्हणायला हरकत नाही.

संशोधन विश्वातील एकूण २०० एककांपैकी एकूण २५ (१२.५%) उत्तरदात्यांनीच शासकिय वैयक्तिक लाभाचा योजनांचा लाभ घेतला आहे. परंतु एवढया भ्रष्टाचाराची भाग फोफावलेल्या व्यवस्थेत शासकिय योजनांचा फायदा घेतांना साध्याभोळया आदिवासींना कोणकोणत्या अडचणी आल्या हेही जाणून घेणे आवश्यक आहे. त्यासाठीच, ''शासकिय योजनांचा लाभ घेतांना आपल्याला कोणकोणत्या अडचणी आल्या?'' असा प्रश्न विचारण्यात आला त्यांच्या प्रतिक्रया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ६

## उत्तरदात्यांच्या शासकिय योजनांचा लाभ घेतांना आलेल्या अडचणीदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कागदपत्रे मिळवितांना त्रास झाला. | १० | ०.५% |
| २. | अधिकाऱ्यांना पेसे दयावे लागले. | ०२ | १% |
| ३. | वशिला लावावा लागला. | ०२ | १% |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | कोणत्याच अडचणी आल्या नाहीत. | ११ | ५.५% |
| ५. | लागू पडत नाही. | १७५ | ८७.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, कागदपत्रे मिळतांना त्रास झाला असे एकूण १० (५.५%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे. तर अधिकाऱ्यांना पैसे दयावे लागले असे ०२ (१%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे. वशिला लावावा लागला असे २(१%) उत्तरदाते उत्तर देतात तर कोणत्याच अडचणी आल्या नाही असे एकूण ११ (५.५%) उत्तरदात्यांचे मत आहे.

आपणा सर्वांनाच माहित आहे की, कोणत्याही कामासाठी शासन अनेक कागदपत्रे मागते. विशेषत: आपल्या देशातील प्रत्येक योजना, आरक्षण सर्वच गोष्टी जातीच्या प्रमाणपत्राशिवाय मिळत नाही. आणि जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी कमाल १४ दाखले जोडवे लागतात. तर किमान १२ दाखले जोडावे लागतात. त्याहीपेक्षा जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविणे अवघड असते. त्यामुळे एवढे दाखले मिळविणे म्हणजे फारमोठी सर्कस करावी लागते. त्यात वेळ आणि पैसा अतोनात खर्च करावा लागतो. ज्या अधिकाऱ्यांकडून दाखले मिळवायचे ते आज या उदया या असे सांगून वेळ वाया घालवतात तर काही अधिकारी लाच घेतात. नाही तर सामान्य पावती तरी कापायला लावतात. त्यामुळे ज्या गरीब माणसाला योजना मिळवायची त्याच्याकडे अधिक पैसे नसतात. शिवाय वेळ गेल्याने त्याची मजुरीही जाते. त्यामुळे ते अधीच अडचणी येतात. अशावेळी प्रमाणपत्र मिळाले नाहीतर योजनाही मिळत नाही. म्हणून कागदपत्रे जमा करणे मोठे दिव्य करण्यासारखे आहे. साधे अनुसूचित जमातीच्या लहान मुलांकरीता असलेली शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी निव्वळ बँकेचे खाते उघडण्यासाठीसुद्धा बँकेचे अधिकारी आठ–आठ दिवस त्रास देतातच शिवाय त्या पालकाकडून बचत ठेवही घेतात व कित्येकांना पासबुकही देत नाहीत. त्यामुळे बरेच लोक योजनांच्या वाटयालाच जात नाही. दारिद्रय रेषेखालील कित्येक श्रीमंत लोकांना ओळखीचा फायदा मिळून दारिद्रय

रेषेच्या यादीत सामिल केले व गरीब गरजूंना मात्र डावलल्या गेले. वडील जर B.P.L. गटात मोडत असतील व मुलगा लग्न झाल्यावर वेगळा रहायला गेला तर शिधापत्रिकेला वेगळे करतांना त्याच्या मुलाला B.P.L. गटाची शिधापत्रिका मिळत नाही. अशा अनेक अडचणी कागदपत्रे मिळवितांना येतात. या उत्तरदात्यांपैकी ०५% उत्तरदात्यांना निव्वळ कागदपत्रे जमा करायला त्रास गेला व इतर जणांनाही पैसे देणे, वशिला लावणे यासारख्या गोष्टींना सामोरे जावे लागले यांसारख्या गोष्टींना सामोरे जावे लागले. यावरून असे निदर्शनास येते की, शासकिय योजना राबविणारी यंत्रणा किती कुचकामी ठरत आहे. म्हणजे संपूर्ण आदिवासी समाजासाठी शासकिय योजना असतांना निव्वळ ५.५% लोकांनाच त्या सहजासहजी प्राप्त झाल्या. यावरून शासकिय योजनांचा विकासासाठी कितपत उपयोग होतो यावर प्रश्नचिन्ह लावणे इष्ट वाटते. व त्या योजना अयशस्वी होत आहेत असे म्हणायला जागा राहते.

भ्रष्टाचाराची किड भारतीय समाजात खोलवर रूजलेली आहे. त्यासाठी अनेक आंदोलने होत आहेत. परंतु लाच देणारे व लाच घेणारे दोघेही तेवढेच जबाबदार असतात. लाच देणारे तर पर्याय नाही म्हणूनन लाच दयायला तयार होतात. परंतु एखादया मेलेल्या माणसाला पुन्हा मारणे किंवा प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणे त्याला म्हणता येईल. त्याप्रमाणे अधिक मागासलेले, गरीब म्हणून गणल्या गेलेले आदिवासी, विधवा स्त्रिया व अनाथ मुले यांकडूनही लाच घेतल्याशिवाय त्यांना सोडले जात नाही. बऱ्याच वेळी अशा लोकांना योजना मिळवून देतो म्हणून मधले ठेकेदार लोक पैशाने लुबाडतात. व नंतर योजनाही मिळवून देत नाहीत विधवा स्त्रियांना निराधार योजना मिळवून देण्यासाठी ठेकेदारांनी लाटल्याची अनेक उदा. आपल्याला समाजात पाहावयास मिळतात. परंतु त्यांच्यासाठी दाद मागण्यासाठी कुणीही रितशीर मार्गाने तक्रार करतांना दिसत नाहीत.

या संदर्भात ज्या माना आदिवासींना योजना घेण्यासाठी पैसे दयावे लागले ते कुणाकुणाला दयावे लागले हे जाणून घेण्याची संशोधिकेला आवश्यकता वाटली.

त्यामुळे भ्रष्टाचाराची किड किती खोलवर रूजली आहे व आदिवासींना नाडणारे कोणकोण आहेत याचा सूक्ष्मपणे अभ्यास करता येईल. त्यासाठी ''जर या योजनांचा लाभ घेण्यासाठी पेसे  दयावे लागले तर ते कुणाकुणाला दयावे लागले?'' असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाची उत्तरे साध्याभोळ्या आदिवासींनी भितभितच दिली. परंतु तुमच्या नावाची कुठेही चर्चा होणार नाही, उल्लेख होणार नाही असे आश्वासन दिल्यावरच त्यांनी उत्तरे दिली. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र. ७**

**उत्तरदात्यांची भ्रष्टाचार ग्रस्तता दर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामसेवक | ०१ | ०.५% |
| २. | पंचायत समिती सदस्य अधिकारी किंवा कारकूनाला | ०५ | २.५% |
| ३. | जिल्हा परिषद सदस्य, अधिकारी किंवा कारकुनाला | ०० | ००% |
| ४. | इतर मध्यस्थींना किंवा नेत्यांना | ०१ | ०.५% |
| ५. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०२ | ०१% |
| ६. | लागू पडत नाही. | १९१ | ९५.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, एकूण ०९ एककांनी (उत्तरदात्यांनी) योजना मिळविण्यासाठी पैसे दिले. त्यांनी कागदपत्रे मिळविण्यासाठी किंवा इतर कामासाठी योजना मिळविण्यासाठी पैसे दिले. ग्रामपंचायत  सदस्य किंवा ग्रामसेवकाला पैसे दिले असे ०१(०.५%) उत्तरदात्यांनी सांगितले तर पंचायत समिती सदस्य, अधिकारी किंवा कारकुनाला पैसे दिले असे ०५(२.५%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे. ही संख्या लक्षात घेण्यासारखी आहे. कारण ग्रामीण भागातील आदिवासींसाठी

राबविल्या जाणाऱ्या बऱ्याच योजना पंचायत समिती स्तरावरच राबविल्या जातात. त्यामुळे सर्वाधिक पंचायत समिती स्तरावर सदस्य, अधिकारी किंवा कारकुनाला पैसे मोजले जातात. जिल्हापरिषद सदस्य, अधिकारी किंवा कारकुनाला कुणीही पैसे दिल्याचे सांगितले नाही तर इतर मध्यस्थींना किंवा नेत्यांना पैसे दिल्याचे ०१ (०.५%) उत्तरदात्यांनी उत्तर दिले. यापेक्षा वेगळे उत्तर म्हणजे ज्यांना कुणाला पैसे दिले हे सांगावेसे वाटले नाही असे एकूण ०२ (०१%) उत्तरदाते आहेत.

आदिवासी कल्याण कार्यक्रम हे पंचायत समिती स्तरावर राबविल्या जातात व काही गैरशासकिय संस्था ज्या आदिवासी कल्याण कार्यक्रम राबवितात त्यांचेही कार्यक्रम पंचायत समिती स्तरावरच असतात. तसेही ग्रामीण विकासासाठी राबविले जाणारे बरेच कार्यक्रम पंचायत समिती स्तरावरूनच राबविले जातात. त्यामुळे वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की, महत्तम पंचायत समिती स्तरावर सदस्य, अधिकारी, कारकूनाला कोणत्याही योजनेसाठी पैसे दयावे लागतात असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

डॉ. प्रदिप आगलावे यांच्या मते,‘‘स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींच्या आर्थिक जीवनात बरेच परिवर्तन झालेले आढळून येते. दळणवळणाच्या सोयी सर्वत्र उपलब्ध करून देण्यात आल्यात. त्यामुळे आजपर्यंत प्रगत समाजापासून अलिप्त असलेल्या आदिवासींचा संपर्क प्रगत समाजाशी झाला आहे. शासनाने विविध सोयी सवलती आदिवासींकरीता उपलब्ध करून दिल्यात. त्यामुळे आदिवासी शिक्षण घेऊ लागले. शिक्षण घेतलेल्या आदिवासींचे आर्थिक जीवन पूर्णत: बदलले आहे. नोकरी करणाऱ्या आदिवासींचा एक नवा वर्ग निर्माण झाला आहे.’’[६]

डॉ. प्रदीप आगलावे यांचे म्हणणे आता आदिवासींना कितपत लागू पडते हेही जाणून घ्यावे लागेल. डॉ. शरदचंद्र गोखले यांच्या मते,‘‘लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याची धमक आमच्या विकासामध्ये अजूनही आलेली नाही. इतकेच काय परंतु आपल्या लोकांमध्ये असलेल्या सुप्त शक्तीचा पूर्ण उपयोगही विकासासाठी करण्यात

आलेला नाही.''[७] अशाप्रकारे विचारवंतात शासकीय योजनांच्या बाबतीत व विकासाच्या बाबतीत परस्पर विरोधी विधाने करण्यात आलेली आढळतात. डॉ. जी.एस.घुर्ये यांच्या मते,'' First comes the Union responsibility for making financial grants. Article 275 Clawse (1) reades, 'these shall be paid out of the consolidated Fund of India as grants in aid of [to?] the revenues of a state such capital and recurring sums as may be necessary to enabe that state to meet the costs of such schemes of development as may be undertaken by the state with the approval of the Government of India for the purpose of promoting the welfare of the scheduled Tribes in that state"[८] वरील विधानांवरून आपल्या लक्षात येईल की अनुसूचित जमातींच्या विकासासाठी शासनाने हेतुपूरस्सर प्रयत्न करणे गरजेचे आहे असे नाही तर त्यांचे ते प्रथम कर्तव्य ठरते. कुटुंबात जशी एखादी अति गरज असलेली व्यक्ति असली की सर्वजण तिची काळजी घेतात. त्याचप्रमाणे भारतीय समाजात आदिवासी समुदाय हा अति आवश्यकता असलेल्या समुदाय आहे. त्यामुळे शासनानेच नव्हेत तर सर्वांनीच आपली नैतिक जबाबदारी ओळखून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करायला पाहीजेत. कारण भारतीय समाजाचे ते अविभाज्य घटक आहेत.

भारतीय संविधानात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विकासासाठी विविध तरतुदी करण्यात आलेल्या आहेत व त्यांना अनुसरून केंद्र शासन व राज्य शासन आपल्या आपल्या पातळीवर विविध योजना राबवत असतात. सध्या ग्रामीण भागांतून योजनांचे पिक आलेले लक्षात येते. परंतु वरील सारख्यांमध्ये उल्लेखित केल्याप्रमाणे संशोधन विश्वातील एकंदर १२.५% लोकांनाच या योजनांपैकी काही योजनांचा लाभ झालेला आहे. परंतु तरीही त्यांचा राहणीमानावर त्याचा परिणाम झालेला दिसून येत नाही. म्हणजे राहणीमानात फरक पडलेला जाणवत नाही. त्याच अनुषंगाने माना आदिवासींच्या शासकिय योजनांच्या बाबतीत काय प्रतिक्रिया आहेत हे जाणून घेण्यासाठी, ''शासनाने आदिवासींसाठी केलेल्या उपायात्मक तरतुदीमुळे आपण समाधानी

आहात काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ८

## उत्तरदात्यांचे शासकीय योजनांविषयी असलेले समाधानदर्शक वा असमाधानदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पूर्ण समाधानी | ०८ | ४% |
| २. | अंशत: समाधानी | ३२ | १६% |
| ३. | समाधानी नाही | २६ | १३% |
| ४. | योजना असल्या तरी त्यांचा लाभ मिळत नाही म्हणून समाधानी नाही. | १३३ | ६६.५% |
| ५. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०१ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, शासकिय योजनांमुळे पूर्णत: समाधानी आहोत. असे एकूण ०८(४ ) उत्तरदात्यांचे मत आहे. हे परंपरावादी आदिवासी असून आदिवासीचा कोणत्याही परिस्थितीत समाधानी असल्याचा त्यांचा स्वभाव बदललेला नाही असे दिसते. त्याचप्रमाणे या उत्तरदात्यांमध्ये असे उत्तरदाते समाविष्ट आहेत ज्यांनी या शासकिय योजनांचा लाभ घेतलेला आहे. अंशत: समाधानी आहो असे उत्तर देणारे एकूण ३२ (१६%) उत्तरदाते आहेत. यामध्येही शासकिय योजनांचा वैयक्तिक किंवा सामुहिक लाभ झालेले उत्तरदाते आहेत.

समाधानी नाही असे उत्तर देणारे २६ (१३%) व योजना असल्या तरी त्यांचा लाभ मिळत नाही म्हणून समाधानी नाही असे उत्तर देणारे एकूण १३३ (६६.५%) उत्तरदाते आहेत. म्हणजे एकूण १५९ (७९.५%) उत्तरदाते शासकिय योजनांवर

नाराज असल्याचे दिसून येते. त्यांच्या मते या शासकिय योजना कुचकामी आहेत. निव्वळ नावासाठी आहेत. मुळात मात्र त्यांचा आदिवासींच्या विकासासाठी कोणताही फायदा झालेला नाही. त्यापेक्षा वेगळे उत्तर देणारे एकूण ०१ (०.५%) उत्तरदाते आहेत.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की, शासकिय योजना गवगव्यासहित सुरू होतात परंतु ज्यांच्यासाठी त्या राबविल्या जातात त्यांच्या पर्यंत त्या पूर्णपणे व जशाच्या तशा पोहोचत नाहीत. शिवाय त्या योजनांच्या मदतीचे स्वरूप इतके कमी असते की सध्याच्या महागाईच्या काळात त्या योजनांमुळे विकास करतो असे म्हणता येत नाही. योजना मंजूर झालेल्या वेळात त्याच्यावरील किंमत व जोपर्यंत ती योजना राबविली जाते तेव्हा त्या वस्तूंची वाढलेली किंमत यातील दरी आदिवासी लोकांना भरून काढणे शक्य नसते. त्यामुळे सर्व पातळयांवर मोठ्या प्रमाणात या योजना अयशस्वी ठरल्याचे जाणवते. समाधानी नाही असे म्हणणाऱ्या १५९ (७९.५%) उत्तरदात्यांच्या उत्तरामूळे तर या बाबीवर शिक्कामोर्तब झाल्याचे म्हणायला जागा उरते.

शासकिय वैयक्तिक लाभाच्या योजनांबाबत समाधान नसल्यास शासनाकडून माना आदिवासींना कोणत्या अपेक्षा आहेत हे जाणून घेणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे ''आपण शासकिय वैयक्तिक लाभाच्या योजनांमुळे जर समाधानी नसाल तर शासनाकडून आपल्याला कोणत्या अपेक्षा आहेत?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ९

## उत्तरदात्यांची शासनाकडून अपेक्षादर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आर्थिक मदत मिळावी | १०२ | ५१% |
| २. | सामाजीक कार्यासाठी मदत मिळावी | ६३ | ३१.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | शैक्षणिक मदत मिळावी | १३ | ६.५% |
| ४. | अपेक्षा न सांगणारे | २२ | ११% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, वैयक्तिक आर्थिक मदत मिळावी जेणेकरून शेती किंवा व्यवसाय करता येईल अशाप्रकारे अपेक्षा व्यक्त करणारे एकूण १०२ (५१%) उत्तरदाते आहेत. सामाजिक कार्यासाठी म्हणजे गावात रस्ते, बससेवा, समाजमंदिर, व्यासपिठ, इत्यादींसाठी मदत मिळावी असे एकूण ६३ (३१.५%) उत्तरदात्यांची अपेक्षा आहे. शैक्षणिक मदत मिळावी त्यामुळे विद्यार्थ्यांना चांगल्याप्रकारे प्राथमिक व उच्च शिक्षण घेता येईल जेणेकरून त्यांनाही चांगल्या नोकऱ्या मिळु शकतील. तसेच विद्यार्थ्यांना पुस्तके, सायकली इ. मिळावी अशाप्रकारे अपेक्षा व्यक्त करणारे एकूण १३(६.५%) उत्तरदाते आहेत. तर शासनाकडून कोणतीच अपेक्षा व्यक्त न करणारे, त्यांची नाराजी इतकी की शासनाच्या कोणत्याही योजनेने त्यांचे भले होत नाही, ते स्वत:च मेहनत करतात व नशीबात असेल तेवढेच कमवून खातात असे त्यांचे मत आहे असे एकूण २२ (११%) उत्तरदाते आहेत.

वरील अपेक्षा व्यक्त करणाऱ्यांच्या अपेक्षा म्हणजे आर्थिक मदत जसे घरकुल मिळावे, विहीर मिळावी, शेतीसाठी आर्थिक मदत मिळावी बैलबंडी मिळावी, कामधंदयासाठी आर्थिक मदत मिळावी, मुलांना नोकरी मिळावी, धान्यपिकाला भाव मिळावा, B.P.L. साठीची उत्पन्न मर्यादा वाढवावी, वर्षभर गावातच रोजगार मिळावा, घर दुरूस्त करण्यासाठी आर्थिक मदत मिळावी वीज मिळावी, शेतीसाठी इंजिन मिळावे, निराधार, योजनेची रक्कम वाढवावी, जमिनी मिळाव्या, हृदयाच्या ऑपरेशनसाठी आर्थिक मदत मिळावी, मोठ्या ऑपरेशनची व्यवस्था सरकारने मोफत करावी. तर सामाजिक अपेक्षा म्हणजे कागदपत्रे वेळेवर मिळावी गावात दवाखान्याची सोय करावी, शेतीसाठी योजना मिळाव्या, योजना सहज मिळाव्या, योजनांबाबत जागृती व्हावी, योजनांची किचकट प्रक्रिया सुलभ व्हावी, शेतीच्या सुविधा व्हाव्या, गावात पक्का रस्ता पाहिजे,

गावात मोटरगाडी पाहिजे, गावात पक्की सडक व नाल्या पाहिजे, शेततळे शासनाने बांधावे, जनावरांपासून शेताचे संरक्षण होण्यासाठी उपाययोजना करावी. जातप्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सोपी करावी, आदिवासी क्षेत्राचा विकास व्हावा, आदिवासींच्या कुटुंबातील एका व्यक्तिला नोकरी मिळावी, आदिवासींसाठीच्या आरक्षणात वाढ व्हावी, जमिनीचे पट्टे मिळावे, शैक्षणिक अपेक्षात व उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळावी, अभ्यासासाठी उपाययोजना करावी शहरात व शिक्षणाच्या सोयी असलेल्या जागी जास्तीत जास्त वसतीगृहे बांधून दयावी. अशाप्रकारे विविध परंतु अगदी लहान लहान अपेक्षा ज्या शासनाला पूर्ण करणे अवघड नाही अशा माना आदिवासींनी मुलाखतीदरम्यान व्यक्त केल्या आहेत.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की माना आदिवासींच्या अगदी किमान मागण्या आहेत. अपेक्षा आहेत व शासनाने त्या पूर्ण कराव्या असे त्यांचे मत आहे. परंतु त्याचबरोबर कोणतीच अपेक्षा न सांगणारे एकूण २२ (११%) उत्तरदाते आहेत ही संख्या लक्षात घेण्यासारखी आहे. यावरून माना आदिवासी हे अल्पसंतुष्ट आहेत असे म्हणायला जागा राहते.

आधुनिकीकरणाच्या युगात जेथे शहरीकरणाच्या झगमगाटात भारत देश विकसित झाला व लोकांचे राहणीमान उंचावले असे मॉल संस्कृतीच्या लोकांकडे पाहून सहजच वाटते. तेथे ग्रामीण व दुर्गम भागात राहणाऱ्या माना आदिवासींचे राहणीमान वाढविण्यात शासकिय योजनांचा फायदा झाला काय? हेही जाणून घेणे अगत्याचे आहे. कोणत्याही योजनेचा उद्देश लोकांना दर्जेदार राहणीमान दयावे. त्यांच्य भौतिक सुखसुवीधांत वाढ व्हावी असा असतो. त्याच उद्देशाने आदिवासी विकास कार्यक्रम राबविले जातात. यात दुमत नाही. परंतु या योजनांचा फायदा घेणारे घरे १२.५% माना आदिवासी आढळून आले. परंतु एवढयाशा योजनेच्या फायदयाने किंवा गावांतून आदिवासी विकास कार्यक्रम व रोजगार हमी योजना राबविली जाते व त्यांना काम दिले जाते. परंतु त्यामुळे खरोखरच त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला काय? हे जाणून

घेण्यासाठी ''शासकिय योजनांचा फायदा आपले राहणीमान उंचावण्यासाठी झाला. असे तुम्हाला वाटते काय?'' असाही प्रश्न संशोधिकेकडून विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. १०

## उत्तरदात्यांची शासकिय योजनांच्या लाभामुळे राहणीमान उंचावण्यासाठी झालेला लाभदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | नक्कीच झाला | ०९ | ४.५% |
| २. | अंशत: झाला | ८८ | ४४% |
| ३. | मूळीच झाला नाही. | ८७ | ४३.५% |
| ४. | सांगता येत नाही. | १६ | ०८% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीत असे निदर्शनास येते की जरी सर्व आदिवासींना शासकिय योजनांचा लाभ घेता आला नाही तरीपण जेवढया आदिवासींना त्यांचा लाभ घेता आला, त्यात वैयक्तिक अथवा संपूर्ण ग्रामीण पातळीवर सामुहिकरित्या जसे पूल बांधणे, रस्ते बांधणे, मोफत शिक्षण, त्यांच्यासाठी गणवेश, शिष्यवृत्ती, पुस्तके व आरक्षण इत्यादी शासनाची जी मदत झाली त्यामुळे शासकिय योजनांचा फायदा राहणीमान उंचावण्यात नक्कीच झाला असे एकूण ०९ (४.५%) उत्तरदात्यांचे मत आहे तर खूप नाही परंतु अंशत: फायदा झाला. असे म्हणणारे महत्तम ८८ (४४%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते एकूणच राहणीमान उंचावले नाही तरीपण थोडाफार फायदा झालेला आहे. तर मुळीच फायदा झाला नाही असेही म्हणणारे ८७ (४३.५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते जे राहणीमान उंचावले ते शासकिय योजनांनी नाही तर त्यांनी स्वत:च्या मेहनतीने उंचावले आहे. खरे तर त्यांच्या मते इतर समुहांशी (गैर आदिवासींशी) तुलना केली असता आदिवासी समूदाय अजूनही त्यांचे राहणीमान न उंचावल्याने सर्वांहून

वेगळा ओळखूनच येतो. यावरूनच लक्षात येते की आदिवासींचे राहणीमान इतर समूहांच्या तुलनेत उंचावले नाही. याबाबतीत काहीही सांगता येत नाही अशी तटस्थ भूमिका १६(०८%) उत्तरदात्यांची आहे. त्यांचा त्यांची तुलनात्मक विचार केलेला नाही.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, माना आदिवासींचे राहणीमान थोडेफार उंचावले व ५०% आहे तसेच आहे. इतर समुदायाच्या तुलनेत त्यांच्यातील राहणीमान उंचावण्याची गती अतिशय मंद आहे असे म्हणायला हरकत नाही.

भारतातील आदिवासी विकास कार्यक्रमाअंतर्गत ‘‘शासकिय नोकऱ्यांत आरक्षण, एकूण जागांपैकी ७.५% जागा आदिवासींसाठी आरक्षित, वयाची शिथिलता, किमान गुणवत्ता, किमान सेवानुरूप, पदोन्नती इत्यादीबाबत विशेष सवलती, त्याचप्रमाणे, शैक्षणिक सवलती महाविद्यालयांत ७.५% जागा राखीव, शिष्यवृत्ती, वस्तीगृहे, मार्गदर्शक केंदे, राजकिय आरक्षण, लोकसभा, विधानसभेत त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ७.५% जागावर आरक्षण तसेच जिल्हापरिषद, महानगरपालिका, पंचायत समित्या, ग्रामपंचायत इत्यादीमध्येही आरक्षणाची व्यवस्था, आर्थिक विकास, शेती ०% दराने कर्जपुरवठा, कुटीरउद्योग, सहकारी संस्था, आर्थिक विकास महामंडळाची स्थापना, शेती सुधारणा संदर्भाने विविध योजना तसेच शेती हस्तांतरण संबंधाने विविध कायदे करण्यात आले आहेत.’’[८].

वरीलप्रमाणे भारतातील आदिवासींकरीता विविध विभागांमध्ये आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. परंतु आदिवासी जमातींना त्यांच्या या आरक्षणाच्या अधिकाराबाबत किती माहिती आहे ते किती जागृत आहेत हेही जाणून घेणेमहत्त्वाचे आहे. माना आदिवासींना त्यांच्यासाठी असलेल्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचे प्रमाण माहित आहे काय? हे जाणून घेण्यासाठी ‘‘आपल्याला आदिवासी (S.T.) म्हणजेच अनुसूचित जमातीसाठी असलेले आरक्षणाचे प्रमाण माहित आहे काय?’’ असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ११

## उत्तरदात्यांची अनुसूचित जमातीचे आरक्षणाबाबत माहितीदर्शन सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ०१ | ०.५% |
| २. | नही | १९८ | ९९% |
| ३. | योग्य प्रमाण सांगणारे | ०१ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीद्वारे असे निदर्शनास येते की, अनुसूचित जमातीमधील असणारे आरक्षणाचे प्रमाण केवळ होय म्हणणारे ०१(०.५%) व योग्य प्रमाण सांगणारे ०१ (०.५%) असे एकूण ०२ (०१%) उत्तरदाते आहेत. तर १९८ (९९%) उत्तरदात्यांना हे आरक्षणाचे प्रमाण माहिती नाही. त्यांना नोकऱ्या व शिक्षणासाठी आरक्षणाचे प्रमाण माहित नाही. फक्त पंचायत राज निवडणुकांसाठी ५०% आरक्षण एवढीच गोष्ट माहिती आहे आणि आरक्षणाचे प्रमाण माहित नसणाऱ्यांची ही संख्या फार मोठी आहे.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते कि माना आदिवासी समाज त्यांच्या अधिकारांच्या बाबतीत तितकासा जागृत नाही असे म्हणता येते.

भारतात सर्व योजनांसाठी जातीजमातींच्या प्रमाणपत्राची आवश्यकता असते. इथे जातीवर आधारित सर्व व्यवस्था असल्यामुळे कोणतीही सोय सवलत घेण्याचे ठरविल्यास जाती जमातीचे प्रमाणपत्र असावेच लागते. त्याशिवाय कोणतीही सवलत मिळत नाही. परंतु ते प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक दाखल्यांची प्रतिपुर्ती मात्र साधारण माणूस करता करता रडकुंडीस येतो. जुने दाखले उदा. P-1 मिळत नाहीत व दाखले मिळाले तर प्रमाणपत्र वेळेवर मिळत नाही. तेव्हा योजनांची तारीखही निघून जाते. त्यामुळे लोक योजनाच घेण्याचे टाळतात.

यासंदर्भाने माना आदिवासींच्या कुटुंबात व कुटुंबातील प्रमुखाकडे तरी निदान अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र आहे काय? हे जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधिकेने केला. त्यासाठी, '' अनुसूचित जमातीचे (माना) प्रमाणपत्र आपल्याकडे आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. १२**

**उत्तरदात्याकडे असलेल्या अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र स्थितीदर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | होय | ११३ | ५६.५% |
| २. | नही | ७५ | ३७.५% |
| ३. | बनवायला दिले | ०१ | ०.५% |
| ४. | माहित नाही. | ११ | ५.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र आहे असे 'होय' उत्तर देणारे एकूण ११३ (५६.५%) उत्तरदाते आहेत. तर 'नाही' असे उत्तर देणारे ७५ (३७.५%) उत्तरदाते आहेत व ही संख्या मोठी आहे. कोणतीही योजना जात प्रमाणपत्राशिवाय मिळत नाही. त्यामुळे कुटुंबात प्रत्येकालाच जात प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे असे म्हणावे लागेल व एवढया मोठ्या संख्येकडे ते नसणे म्हणजे मोठी खेदाची बाब समजावी लागले. बनवायला दिले असे ०१(०.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे तर माहित नाही असे ११(५.५%) उत्तरदाते सांगतात. त्यांच्यामध्ये वयोवृद्ध उत्तरदाते आहेत. ज्यांनी योजना घेण्याचा प्रयत्नही केला नाही. त्यामुळे त्यांना कधी जात प्रमाणपत्राची गरजच वाटली नाही. त्यांना घरात त्यांच्याकडे प्रमाणपत्र आहे किवा नाही हेही सांगता येत नाही.

वरील विवेचन वरून असे निदर्शनास येते की, जात प्रमाणपत्र प्रत्येकाजवळ असणे सद्यस्थितीत स्पर्धात्मक युगात अनिवार्य आहे. असे असतांना कुटुंबातील सदस्याच्या नाही तर स्वत: ३७.५% कुटुंबप्रमुखाकडे ही जातप्रमाणपत्र नाही यावरून त्यांच्या परिस्थितीची आपल्याला सहज कल्पना करता येते.

सारणी क्र. १२ ला अनुसरून ज्या उत्तरदात्यांकडे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र नाही तेव्हा त्यांच्याकडे ते का उपलब्ध नाही याचीही शहानिशा करणे संशोधिकेला रास्त वाटले. त्यामुळे त्या उत्तरदात्यांकडे जात– प्रमाणपत्र का नाही याची कारणे जाणून घेण्यासाठी, अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र नसल्यास का नाही याचे कारण सांगा.'' असाही एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. १३

## उत्तरदात्यांची जात प्रमाणपत्र नसल्याची कारणेदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | गरज वाटली नाही. | ३९ | १९.५% |
| २. | प्रमाणपत्र कसे तयार करतात याची माहिती नाही. | ०६ | ३% |
| ३. | प्रमाणपत्र तयार करण्यासाठी लागणारे दाखले मिळत नाही. | २४ | १२% |
| ४. | दाखले तयार करूनही प्रमाणपत्र मिळाले नाही | ०३ | १.५% |
| ५. | यापेक्षा वेगळे उत्तर | ०३ | १.५% |
| ६. | लागू पडत नाही | १२५ | ६२.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की संशोधन विश्वातील एकूण २०० उत्तरदात्यांपैकी ७५% उत्तरदात्यांजवळ जात प्रमाणपत्र नाही. त्याची कारणे देतांना गरज वाटली नाही असे एकूण महत्तम ३९ (१९.५%) उत्तरदात्यांनी उत्तर दिले. त्यांनी आजपर्यंत कोणतीही योजना घेण्याचा प्रयत्न केला नाही. व त्यांची मुलेही प्राथमिकच्यावर शिक्षण घेतलेली नाही. त्यामुळै त्यांना जात प्रमाणपत्राची गरज वाटली नाही. प्रमाणपत्र कसे तयार करतात हे माहित नाही म्हणणारे एकूण ०६ (३%) उत्तरदाते आहेत. यामध्ये विशेषत: स्त्रियांचा समावेश होतो. व काही अशिक्षित लोकांचा समावेश आहे त्यांना जात प्रमाणपत्रासाठी कोणते दाखले मिळवावे व कोठून मिळवावे हेच माहित नाही. प्रमाणपत्र तयार करण्यासाठी लागणारे दाखले मिळत नाही असे २४ (१२%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. ही समस्या जवळपास सर्वच जाती व जमातींची आहे. पुरावे म्हणून सादर करावयाचे दाखले मिळविणे फार कठिण काम असल्यामुळे बऱ्याच जणांजवळ जातप्रमाणपत्र नाही हे सिद्ध होते. दाखले सादर करूनही प्रमाणपत्र मिळत नाही असे मत ०३ (१.५%) उत्तरदात्यांनी व्यक्त केले. त्यांच्या दाखल्यांत काही त्रुटी असतील तर त्यांना ते कळवण्यात आले  नाही. यापेक्षा वेगळे उत्तर देणारे ०३ (१.५%) उत्तरदाते आहेत. ज्यांना जात प्रमाणपत्र बनविता आले नाही.

एकंदर वरील विवेचनावरून असे लक्षात येते की दाखल्यांअभावी व माहितीच्या अभावी माना जमातीतील आदिवासींजवळ जात प्रमाणपत्र नसल्याने प्रमाण मोठे आहे त्यामुळे ते सर्व योजनांपासून वंचित आहेत.

# संदर्भ सूची


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. आगलावे प्रदिप | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ. ०२ |
| | | — | साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती ऑगस्ट —२००४ | |
| २. | डॉ. आगलावे प्रदीप | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ.१९३ |
| | | — | कित्ता. | |
| ३. | डॉ. आगलावे प्रदीप | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ२०५, |
| | | — | कित्ता. | २०६ |
| ४. | महाराष्ट्र शासन | — | विकासाच्यावाटा—२०११ संपादकिय | |
| | | — | जिल्हा परिषद चंद्रपूर | |
| ५. | प्रा. देशपांडे विजय | — | सांस्कृतिक मानवशास्त्र | पृ.१५१ |
| | प्रा. बोबडे प्रकाश | — | श्रीपाद मुंजे, विद्या प्रकाशन, रूईकर मार्ग. | |
| | प्रा. आर बारबिंड भगवान | — | नागपूर प्रथमावृत्ती १५ जुलै. १९८१ | |
| ६. | डॉ. आगलावे प्रदीप | — | आदिवासी समाजचे समाजशास्त्र | पृ.१६४ |
| | | — | कित्ता. | |
| ७. | डॉ. गोखले शरदचंद्र | — | सामाजिक विकासाचे प्रश्न व धोरण | पृ.३५६ |
| | | — | व्हिनस प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती ऑक्टो.१९८९ | |
| ८. | Ghurye G.S. | – | The Scheduled Tribes | पृ.२८२ |
| | | – | Third Edition 1963 | |
| | | – | Popular Prakashan Bombay. | |
| ९. | डॉ. आगलावे प्रदीप | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ.२०७ |

# प्रकरण ६ वे

# सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, सद्यास्थिती व परिर्वतन आणि ऐतिहासिक जागृती आणि समस्या

## ६.१ सामाजिक स्थिती, संघटना, संघर्ष व परिवर्तन

कोणत्याही सामाजाचा अभ्यास करतांना मग तो आदिवासी असो वा इतर त्यांचा सामाजिक स्तर लक्षात घेणे, त्यांच्या सामाजिक व्यवस्था, सामाजिक संघटना, व इतर समुहांशी त्यांचे सामाजिक संबंध, स्थिती लक्षात घेणे, त्याचप्रमाणे त्या अनुषंगाने होणारे सामाजिक परिवर्तनही अभ्यासणे आवश्यक आहेत. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. तो समुहाने राहतो व समुहातच आपल्या गरजा पूर्ण करुन घेतो. आपण शालेय जीवनापासून 'माणसाचा इतिहास व त्याच्या प्रगतीचा इतिहास शिकत आलेलो आहोत 'मानवाच्या प्रगतीचा इतिहास म्हणजे काय? तर त्याच्या सामाजिक व भौतिक अंगाने त्याने करुन घेतलेले सकारात्मक बदल' त्यामुळे त्याचा काहीवेळा लाभ झाला तर काहीवेळा नुकसानही झाले परंतु तरीही मानवाची प्रगती थांबली नाही. त्याप्रमाणे निसर्गात परिवर्तन हा नियम आहे. त्याचप्रमाणे मानवाच्या सामाजिक जीवनातही परिवर्तन हा नियमच बनलेला आहे. एकमेकांची किंवा उच्च राहणीमान असणाऱ्या लोकांची, समूहांची नक्कल करुन स्वत:ला अपडेट करण्याकरीता प्रत्येक जण धडपडत असतो आणि त्यातूनच सामाजिक परिवर्तन घडून येते. फक्त त्याची गती कुठे मंद तर कुठे क्रांतिकारक रित्या शिघ्र असते.

या संदर्भातच रा.ज. – लोटे यांच्या मते'' कोणत्याही समाजाचे उदाहरण आपल्या डोळयांसमोर आणले तरी प्रत्येक समाजात थोडे तरी परिवर्तन होतच असते. प्रत्येक समाजात जुने सदस्य (वृद्ध व्यक्ती) जाऊन नवीन सदस्य येतात. एवढयाने देखील समाजात कळत नकळत परिवर्तन होतच असते. एकाच समाजात राहणाऱ्या दोन पिढीतील (वृद्ध पिढी व तरुण पिढी, आचार विचार, पोषाख इत्यादी बाबतीत असणारा फरक हा आपल्या सर्वांच्या अनुभवाचा विषय आहे. हा आपला अनुभव प्रत्येक समाज

गतिशील (Dynamic) असतो असे सुचित करतो समाजाचे गतिशल स्वरुप समजून घेण्यासाठी सामाजिक परिर्वनाची ओळख करुन घेणे आवश्यक ठरते''[१]

''गिन्सबर्ग यांच्या मते, सामाजाचा आकार, रचना तसेच समाजाच्या विविध भागातील संतुलन आणि सामाजिक संघटन यात होणारा बदल म्हणजे सामाजिक परिर्वन होय''[२] सामाजिक परिवर्तन हे गुणात्मक स्वरुपाचे परिर्वन आहे. म्हणूनच सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया ही गुंतागुंतीची असतो असे म्हटले जाते.

सामाजिक परिवर्तनाची सुरुवात विचारांनी होते व नंतर त्याचे परिवर्तन आचारात होते. त्यामुळे आदिवासींच्या संदर्भात इतर बिगर आदिवासींच्या विचारांमध्येही विविधता आढळते ते मुळात मुलनिवासी आहेत किंवा नाही यापासूनच त्यांच्याबद्दलच्या विचारांची सुरुवात होते.

शरदचंद्र यांच्या मते'' अनुसुचित जमाती शैक्षणिक आणि आर्थिक दृष्टया मागासलेल्या आहेत. आदिवासीच्या दारिद्रयाचा अज्ञानाचा, भोळेपणाचा, सरळपणाचा फायदा घेऊन पठारावरील पुढारलेल्या लोकांनी त्यांच्या जमीनीवर कब्जा केला, दमदाटी फसवणुक, अत्याचारी मार्गाचा अवलंब केला आदिवासींच्या जमीनी बळकावल्या ब्रिटीशांच्या जमीनी विषयक कायदयांमुळे आदिवासी जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया वेगाने सुरु झाली. या विरुद्ध – देशांत ठिकठिकाणी आदिवासींचे उठाव झाले ते निर्दयपणे चिरडण्यात आले. पण हा प्रश्न संवेदनशील आहे हे ब्रिटीशांनी जाणले. आदिवासींमधील असंतोष अंशत: शमविण्यासाठी आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरणास प्रतिबंध करणारे कायदे आदिवासी क्षेत्रांसाठी क्षेत्रांसाठी ब्रिटीश सरकाराने केले उदा. एजंसी ट्रॅक्ट इंटरेस्ट ॲन्ड लॅन्ड ट्रान्सफर ॲक्ट १९१७, छोटा नागपूर टेनुन्सीकानू १९०८, आसाम रेग्युलेशन पाच १८७३ आणि रेग्युलेशन एक १८८६ वगैरे आदिवासींचे कल्याण व्हावे म्हणूननाही तर तात्पुरती वेगळी लावून वेळ मारुन न्यायची या ब्रिटीश राजनितीचा हा भाग होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर जी राज्यघटना आपण स्विकारली त्या घटनेतील अनुच्छेद ४६ मध्ये वर्गीकृत जाती व जमाती यांचा आर्थिक,

सामाजिक विकास करणे आणि त्यांचे सामाजिक अन्यायापासून सर्व प्रकारच्या पिळवणुकीपासून संरक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य राहील असे नमुद केले आहे. या घटनात्मक तरतुदीप्रमाणे आदिवासींच्या जमीनी हस्तांतरणावर निर्बंध घलण्यासाठी आणि हस्तांतरीत झालेल्या त्यांच्या जमीनीचा कब्जा पुन्हा आदिवासींना देण्यासाठी भारतातील आंध्रप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश, गुजरात, ओरीसा, पश्चिम बंगाल, आसाम, त्रिपुरा, हिमाचलप्रदेश आणि मेघालय या राज्यांतून कायदे आले आहेत इतर राज्यातील विशेषत: बिहार, ओरीसा, राजस्थान आदिवासी कायदयातील वरील तरतुदींचा विचार केला तर त्या तुलनेत महाराष्ट्रातील आदिवासी कायदे खूप मागासलेले आहेत. त्यामुळे ते परिणामकारक ठरलेले नाहीत. तेव्हा भारतातील अन्य राज्यांच्या तुलनेत आदिवासींच्या आर्थिक हितसंबंधाचे रक्षण करण्यात, कल्याण साधन्यात, महाराष्ट्र राज्य कोणत्याही परिस्थितीत अग्रेसर तर नाहीच पण खूप पिछाडीला आहे ही वस्तुस्थिती नाकरता येत नाही.''[३] आदिवासींच्या संदर्भाने केलेले हे विवेचन जवळपास बहुतांश विचारवंतानी केलेले आहे त्यामुळे ते योग्य आहे असे वारंवार आपल्या निदर्शनास येते त्यामुळे आदिवासींच्या सामाजिक परिर्वनासाठी कायदे सुद्धा कारणीभूत आहेत व तेवढेच महत्वपूर्ण आहेत हे आपल्या लक्षात येते.

आदिवासींच्या 'आदिवासी' शब्दाचा अर्थ लावण्याच्या संदर्भाने विविध विचारवंत आपापली मते मांडतांना दिसतात. ''आदिवासी हा आदय संस्कृतीचा द्योतक आहे. आदय किंवा आधीचा रहिवासी असाही अर्थ त्यांत अभिप्रेत आहे.''[४] असे आदिवासी समाजाचे गाढे अभ्यासक डॉ. गोविंद गारे यांचे मत आहे. तर गुरुनाथ नाडगोंडे यांच्या मते'' ऐतिहासिक दृष्टीने पाहता इतर कोणत्याही सामाजाला जेवढा दिर्घकालीन इतिहास लाभलेला आहे तेवढाच आदिम समाजाच्याही वाटयाला आलेला आहे, तेव्हा आदिवासी समाज म्हणजे कोणत्याही देशातील आद्य रहिवासी नव्हेत.''[५] गोकुळदास मेश्राम यांच्या मते'' मराठी  विश्वकोषानुसार 'आदिवासी' म्हणजे आधीपासून किंवा पूर्वीपासून राहणारे लोक होत. नागर संस्कृतीपासून दूरव अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होय (Aboriginal primitive)[६]

आदिवासींच्या व्याख्येवरुन विचावंतांत विविध मते आढळतात. परंतु संयुक्त राष्ट्रसंघाने केलेल्या व्याख्येवरुनही कोणत्याही प्रदेशात इतर लोक जाण्यापूर्वी जे राहत ते आदिवासी' भारताच्या संदर्भात आदिवासी म्हणजे इतर लोक भारतात येण्यापूर्वी इथे मूळचे वास्तव्य करुन राहणारे या अर्थानेच त्यांना आदिवासी संबोधले जाते भारताच्या इतिहासात सिंधू संस्कृतीचा संबंध वारंवार द्रविडियन व आदिवासींशी जोडला गेलेला आहे. त्यानंतर भारतात येणारे लोक म्हणजे आर्य, मुघल, ब्रिटीश व इतर अनेक धर्माच्या लोकांनी इथे राज्यविस्तार केला व इथलेच रहिवासी घेऊन राहीले परंतु या सर्वापूर्वीपासून जे इथे राहत होते त्या अर्थानेच त्यांना आदिवासी किंवा मूलनिवासी म्हणजेच योग्य होईल असे संशोधिकेला वाटते. जरी मानववंशशास्त्रज्ञानांनी आदिवासी एवढी इतरांना आद्य संस्कृती लाभली आहे व ते त्यांनाही एवढाच इतिहास असल्याने आदिवासींना मूलनिवासी म्हणता येत नाही असे म्हटले आहे परंतु लोक ज्या ज्या स्वत:च्या प्रदेशात वास्तव्य करुन राहिले त्यांना आदिवासी किंवा मूलनिवासी म्हणावेच लागेल भारताच्या संदर्भात इथे इतर आलेल्या लोकांना जरी तेवढाच इतिहास असला तरी परंतु ते भारतात नंतर आले. 'त्यांच्या प्रदेशात' त्यांना मूलनिवासी संबोधले जाईल परंतु भारतातील ते पाहुणेच आले होते यात शंका घेण्यासाठी जागा नाही. त्यामुळे प्रथमपासूनच याच धर्तीवर ज्यांचे पूर्वज जन्माला आले. त्यांचे मूळ वास्तव इथले म्हणून ते मूलनिवासी किंवा आदिवासी होत ही नाकारणे योग्य होणार नाही असे संशोधिकेला वाटते.

याचसंदर्भात माना आदिवासीचें मूळ वास्तव्य भारतातील आहे. ते इथले मूळचे रहिवासी आहेत आणि जे जे मूळचे रहिवासी म्हणजेच आदिवासी आहेत त्यांचाच संपूर्ण हक्क येथील नैसर्गिक संपत्तीवर मुख्यत: असायला पाहिजे असे संशोधिकेला वाटते याबाबतीत स्वत: माना जमात काय विचार करते. हे जानून घेण्यासाठी संशोधिकेकडून त्यांना ''आदिवासी म्हणजे मुळनिवासी म्हणजे भारतीय जमीन व निसर्गावर आदिवासींचाच संपूर्ण हक्क असायला पाहिजे या मतीशी तुम्ही सहमत आहात काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणींत दर्शविलेल्या आहोत.

## सारणी क्र १

## उत्तरदात्यांची नैसर्गिक संपत्तीवर हक्काविषयी मतदर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पूर्णतः सहमत | १०५ | ५२.५% |
| २ | अंशतः सहमत | ५५ | २७.५% |
| ३ | सहमत नाही | ०४ | ०२% |
| ४ | नक्की सांगता येत नाही | ३६ | १८% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की भारतीय निसर्गावर व जमीनीवर आदिवासींचाच संपूर्ण हक्क असायला पाहिजे या अर्थाने पूर्णतः सहमत असे १०५ (५२.५%) उत्तरदात्यांचे मत आहे आपण एकटेच खाल्ले तर इतर लोक उपाशी मारतील म्हणून सर्वांचा यात वाटा आहे. परंतु आमचाही काही अधिकार असायलाच पाहिजे. या अर्थाने अंशतः सहमत असे उत्तर देणारे एकूण ५५ (२७.५%) उत्तरदाते आहेत तर आदिवासींचाच निव्वळ हक्क असावा म्हणजे इतरांनी निव्वळ पाहूणे म्हणून राहावे असे बरोबर नाही. सर्वांचाच त्यात समान वाटा असावा या अर्थाने सहमत नाही असे उत्तर देणारे एकूण ४ (२%) उत्तरदाते आहेत. या उत्तरदात्यांचा उदारपणा लक्षात येतो. याबाबतीत कोणताच निर्णय घेता येत नाही त्या अर्थाने 'सांगता येत नाही' असे उत्तर देणारे ३६ (१८%) उत्तरदाते आहेत आणि आदिवासींचा आल्पसंतुष्टी स्वभाव पासून निदर्शनास येतो.

वरील विवेचनावरुन सहमत असणाऱ्या महत्तम संख्या लक्षात घेता माना अदिवासी समाजही आता त्यांच्या अधिकारांविषयी विचार करु लागला आहे, जागृत होऊ लागला आहे हे निर्दशनास येते व ही एक सकारात्मक परंतु अतिशय मंद गतीने होणारे परिवर्तन आहे. असे म्हणावयास हरकत नाही याबाबतीत डॉ. प्रदिप आगलावे

म्हणतात, ''भारतातील संपूर्ण आदिवासी समाजात परिवर्तन घडू लागले असे म्हणता येणार नाही. परंतु काही प्रमाणात का होईना त्यांच्यात सामाजिक परिवर्तन झालेले आढळून येते.''[७] हे त्यांचे म्हणणे अगदी रास्त आहे असे वाटते.

आदिवासींच्या व्याख्येबद्दल किंवा त्यांच्या वास्तव्य दर्शक शब्दाबद्दल जरी विचारवंतांमध्ये अनेक भेद आहेत. तरी फार पूर्वीपासूनच आदिवासींवरर अनेक प्रकारे अन्याय व अत्याचार होत आहे याबाबतीत मात्र सर्व विचारवंत सहमत आहोत असे आपणास म्हणता येईल. एकेकाळी आदिवासी हे भारतावर राज्यकर्ते होते ठिकठिकाणी त्यांचे राज्य होते. त्यांचे स्वत:चे कायदे होते निसर्गाची जपणूक करत निसर्गात समतोल राखत निसर्गातूनच स्वत:च्या गरजांची पूर्ती आदिवासी करुन घेत आणि अगदी नृत्य, गाणे, गात आनंदी जीवन जगत. आताचे चित्र मात्र अगदी विरुद्ध दिसते. या संदर्भात गुरुनाथ नाडगोंडे यांच्या मते, ''ठक्करबाप्पा, म्हणतात आपण जर थोडासा गंभीरपणो विचार केला तर भारतातील आदिवासींची सामाजिक व आर्थिक किंवा भौतिक आाणि नैतिक सुधारणा करण्याचा प्रश्न किंवा बिकट आणि निकडीचा आहे हे आपल्याला समजून येईल. हरिजनांची परिस्थिती लक्षातच घेतल्यानंतर सुद्धा भारतीय जनतेतील आदिवासी हा सर्वात दारिद्री वर्ग आहे असे म्हटले तर त्यात मुळीच अतिशयोक्ती होणार नाही. आमच्या युगात मानवाची झालेली वैज्ञानिक प्रगती, विविध सुविधाची झालेली सोय इत्यादी लक्षात घेता भारतातील ७ टक्के आदिवासी अजूनही प्रारंभिक अवस्थेतील जीवन जगतात,''[८] नाडगोंडेंनी केलेले हे आदिवासींच्या समस्यांचे त्यांच्यावरील अत्याचाराचे विवेचन अगदी मार्मिक आहे. आदिवासीच्या परिस्थितीबद्दल असे विवेचन कोणत्याही विचारवंताद्वारे करण्यात आलेले आहे.

प्रत्यक्षात माना आदिवासींना त्यांच्यावरील झालेले अन्याय त्यांचे हिरावून घेतलेले हक्क यांबाबतीत काय वाटते हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. आतापर्यंत समाजशास्त्रांज्ञांनी जेवढया आदिवासींचा अभ्यास केला त्यात त्यांना आदिवासींबद्दल काय वाटले यालाच जास्त महत्व दिले परंतु स्वत: आदिवासी त्याबाबतीत काय विचार करतात, विचार करतात किंवा नाही, विचार करायला लागलेत किंवा नाही? हेही

तितकेच महत्त्वाचे आहे. त्यासंदर्भात वरील सारणी क्र १ ला अनुसरुन,'' जर तुम्ही सहमत असाल तर आदिवासींना त्यांच्या हक्कांपासून डावलले जात आहे; असे आपल्याला वाटते काय?'' असाही प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र २

## उत्तरदात्यांची त्यांच्या हक्काविषयक जाणीव जागृती दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पूर्णत: डवलले जात आहे. | ४९ | २४.५% |
| २ | अंशत: डवलले जात आहे | १०० | ५०% |
| ३ | मुळीच डावलेले जात नाही | ११ | ५.५% |
| ४ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| ५ | लागू पडत नाही | ४० | २०% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, सहमत व अंशत: सहमत असणाऱ्या वरुन १६० उत्तरदात्यांपैकी माना आदिवासींना त्यांच्या अधिकारापासून पूर्णत: डावलले जात आहे. असे एकूण ४९ (२४.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्यांना माहित आहे की पूर्वी माता ही राजे होते आता मात्र त्यांना अतिशय हलाखीचे जीवन जगावे लागत आहे. त्यांच्या मालकीच्या भुमितून निघणारे अन्नही त्यांना पोटभर खायला मिळत नाही. अंशत: डावलले जात आहे. उत्तरदेणारे एकूण १०० (५०%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते त्यांच्या जमीनीअसून सुद्धा त्या संबंधी कोणालाही विकण्याचा निर्णय घेऊ शकत नाही. त्यांना जगलात जाता येत नाही. जंगलातील त्यांची गावे स्थलांतरीत केली जातात. निसर्गाच्या दूर पाठवून  त्यांना बेघर केले जात आहे. शिवाय कार्यालयातून त्यांना जातप्रमाणपत्र व राशनकार्ड (शिधापत्रिका) तसेच इतर कागदपत्रासाठी खूप त्रास

दिला जातो त्यामुळे पूर्णपणे नाही तर बायाच प्रमाणात त्यांना त्यांच्या अधिकारांपासून डावलेले जात आहे असे महत्तम १०० (५०%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. मुळीच डावलले जात नाही. असे म्हणणारे एकूण ११ (५.५%) उत्तरदाते आहेत. त्यांना बदलणाऱ्या जगात त्यांच्या अधिकारांची विशेष कल्पना नाही. त्यांना वाटते जे पिकते, जे मिळते ते नशिबानेच म्हणून आपल्याला अधिकारांपासून कोणीच डावलले नाही असे ते उलट देतात वरील प्रश्न विचारतांना सर्वप्रथम उत्तरदात्यांना डावलले या शब्दाचा अर्थ समजावून सांगावा लागला.

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की एकूण १४९ (७४.५%) उत्तरदात्यांना असे वाटते की त्यांना त्यांच्या जमिनी व अधिकारापासून डावलेले जात आहे.

रा. ज. लोटे यांच्या मते ''मानवी समाजाच्या दृष्टीने संघर्ष प्रक्रिया ही विघटनात्मक प्रक्रिया आहे. म्हणून संघर्ष हा अहितकारक आहे असे समजले जाते''[९] संघर्षाच्या बाबतीत रा.ज. लोटे जरी संघर्ष अहितकारक आहे असे म्हणतात तरीपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मात्र आपल्या अधिकारांच्या प्राप्तीसाठी संघर्ष करा (न्यायमार्गाने) असेच म्हणतात. संघर्ष केल्याशिवाय कोणत्याही सजीवांना जीवंत राहणे कठीणच वाटते. कारण – निसर्गाचा नियमच आहे. जगण्यासाठी जेथे प्रत्येक सजीवाला संघर्ष करावाच लागतो. नाहीतर शक्तीमान घटक शक्तीहीन होत घटकांना जगू देत नाहीत. त्यामुळे संघर्ष हा अटळ आहे. फक्त संघर्ष करण्याचे मार्ग मात्र न्याय संमत असावे आपल्या मागण्या कितीही रास्त असल्या तरी त्या मान्य करुन घेण्याचे उपाय वा मार्ग जास्त महत्त्वाचे ठरतात माना आदिवासींचे जीवन इतर आदिवासींप्रमाणे संघर्षमय तर आहेच परंतु इतर आदिवासीपेक्षा जगण्यासाठी व स्वत:च्या अस्मितेसाठी व अस्तित्वासाठी ही त्यांना सतत संघर्ष करावा लागत आहे. या संदर्भाने पूर्वीच सविस्तर विवेचन करण्यात आलेले आहे. कधी गोंडासारख्या आदिवासी बांधवांशी तर कधी शासनाशी असा त्यांचा सतत संघर्ष सुरु आहे. सध्या त्यांना अनुसुचित जमातीच्या यादीत स्वतंत्र जमात गणल्या

जाऊन ही त्यांना – जगण्यासाठी व विकासासाठी अत्यावश्यक असणारे जात प्रमाणपत्र व जात पाडताळणी प्रमाणपत्रासाठी अतोनात संघर्ष करावा लागत आहे. त्यासाठी त्यांनी कधी नव्हे एवढा मोठा मोर्चा गडचिरोली येथे आयुक्तांच्या कार्यालयावर नेला. परंतु आयुक्तांनी त्यांच्याशी बोलचालदेखील केली नाही. तसेच संघर्षमय जीवन असले तरी ते शांतपणे सहन करणे व तक्रार न करता जगणे हे आदिवासींचे एक महत्त्वाचे वैशिष्टय आहे. त्याबाबतीत वैयक्तिक व सामुहिकरित्या झालेल्या अन्यायाविरोधात संघर्ष करण्याबाबत माना आदिवासींच्या प्रतिक्रिया जाणून घेणे आवश्यक होते. त्यामुळे '' आपल्या हक्कांसाठी आपण कधी संघर्ष केला आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र ३

## उत्तरदात्यांच्या हक्कांसाठी केलेल्या संघर्षविषयकक अनुभवदर्शाक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक संघर्ष केला | १० | ५% |
| २ | सामुहिक संघर्ष केला | १०० | ५०% |
| ३ | संघर्ष केला नाही | ८३ | ४१.५% |
| ४ | यापेक्षा वेगळे उत्तर | ७ | ३.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, वैयक्तिक अन्यायाविरुद्ध वैयक्तिक संघर्ष केला असे १० (५%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे. त्यांनी कागदपत्रे मिळविण्यासाठी व स्वत:च्या जमिनीविषयी काही अन्यायासाठी संघर्ष केला असे त्यांचे मत आहे तर सामुहिक संघर्ष केला असे महत्तम १०० (५०%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे. त्यांनी माना आदिवासींना अनुसूचित जमातीच्या यादीत स्वतंत्र नाव नमूद करण्यासाठी संघर्ष केला. व यामध्ये जातप्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र मिळावे यासाठीही सतत संघर्ष

केलेला आहे. 'तर संघर्ष केला नाही.' असे म्हणणारे एकूण ८३ (४१.५%) उत्तरदाते आहे. त्यांना शासनासोबत संघर्ष केला हे कदाचित समजत नाही किंवा ते त्यांना माहित नाही. त्यांना संघर्षाचा अर्थही कळत नाही व प्रत्यक्ष ते न्यायालयात गेले नाहीत. त्यांचे नेते न्यायालयात गेलेत व ते फक्त मोर्च्यात गेले. त्यांपैकी काही म्हातारे न्यायालयात व मोर्चात जाणे, लढाई करणे यालाच ते संघर्ष म्हणतात. म्हणून संघर्ष केला नाही असे म्हणणाऱ्यांनी उत्तरदात्यांची संख्या फार मोठी न्यायालयीन कार्यवाही किती मोठी असते हे त्यांना माहित आहे. परंतु सर्वच जणांनी न्यायालयात हजेरी लावली नाही. त्यामुळे त्यांना त्याचे महत्त्वही समजले नाही. यापेक्षा वेगळे उत्तर म्हणणारे एकूण ७ (३.५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते समाजासाठी नेत्यांनी संघर्ष केला. आम्ही फक्त मोर्चात गेलो त्याला संघर्ष म्हणता येणार नाही.

वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, संघर्ष केलेला नाही म्हणणाऱ्यांची संख्याही मोोठी आहे. तसेच महत्तम उत्तरदात्यांचे मत हे सामुहिक संघर्ष केलेला आहे असे आहे. आदिवासींच्या बहुतेक क्रिया सामुहिक असताना त्यांच्या वैयक्तिक जीवनापेक्षा ते सामुहिक जीवनाला अधिक महत्त्व देतात. त्यामुळे वैयक्तिक संघर्षापेक्षा सामुहिक संघर्षाला ते महत्त्व देतात. असे म्हणायला जागा राहते. तसे आदिवासींचा इतिहास पाहता अनेक वेळा त्यांनी अनेक राजवटींशी संघर्ष केलेला आहे. शहीद वीर बाबुराव शेडमाके हयांचे हौतात्म्य तर प्रसिद्धच आहे. त्यात माना हे संघर्षाला सामोरे जाणारे व लढाऊ वृत्तीचे बाणेदार आहेत. हे चांदा सेटलमेंट रिपोर्टनुसार सर्वांनी मान्य केलेले आहे. शिवाय स्वतःच्या अधिकारांठी संघर्ष करण्यासाठी ते आता जागृत होत आहेत. हे एक सकारात्मक परिवर्तन आहे असे म्हणायला हरकत नाही.

सारणी क्र. ३ ला अनुसरुन 'जर संर्घ केला असेल तर त्यात त्यांना यश मिळाले काय?'' असाही प्रश्न संशोधिकेकडून विचारण्यात आला त्याचा प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र ४

## उत्तरदात्यांची संघर्षाअंती मिळालेले यश/अपयश दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पूर्ण यश मिळाले | ५ | २.५०% |
| २ | काही प्रमाणात यश मिळाले | ९५ | ४७.५% |
| ३ | यश मिळाले नाही | ९ | ४.५% |
| ४ | यापेक्षा वेगळे उत्तर | १ | ०.५% |
| ५ | लागू पडत नाही | ९० | ४५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वैयक्तिक संघर्ष करणारे एकूण १० उत्तरदाते आहे. त्यापैकी ९ उत्तरदात्यांना यश मिळाले नाही. असे उत्तर दिले व यापेक्षा वेगळे उत्तर जे प्रसिद्ध करु इच्छित नाही असे १ (०.५%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे. वैयक्तिक संघर्ष करतांना कुणाही त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे त्यांना यश मिळाले नाही असे उत्तर त्यांनी दिले सामुहिक संघर्ष केला असे म्हणणारे एकूण १०० उत्तरदात्यांपैकी ५ (२.५%) उत्तरदाते म्हणतात. की त्यांना पूर्णपणे यश मिळाले, त्या गोष्टीकरीता त्यांनी संघर्ष केला ती गोष्ट पूर्ण झाली. तर कधी प्रमाणात त्यांना यश मिळाले असे महत्तम ९५ (४७.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. त्यांच्यामते शासनाशी संघर्ष करतांना माना आदिवासींना अनुसुचित जमातीच्या यादीत स्वतंत्र गणल्या गेले परंतु न्यायालयाने न्याय देऊन ही त्यांचेच आदिवासी बांधव त्यांच्या आरक्षणात सहभागीदार झाल्याने त्यांचे अधिकार नाकारत आहेत. काही अधिकारी त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळू नये म्हणून प्रयत्न करीत आहेत. त्यांना नोकऱ्या मिळू नये, आरक्षणाचा लाभ मिळू नये यासाठी त्यांना त्रास देत आहेत. जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्राशिवाय त्यांना काहीच करता येत नाही. त्यामुळे अंशत: यश मिळाले असे त्यांचे म्हणणे आहे.

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की संघर्ष जरी केला तरी कोणत्याना कोणत्या प्रकारे त्यांना त्रास देणे सुरुच आहे त्यामुळे माना आदिवासी अतिशय हताश व निराश झाल्याचे व प्रचलित व्यवस्थेविरुद्ध चिडून असल्याचे निदर्शनास येते.

समाजाचे नेते समाजाचे नेतृत्व करतात. माना समाजातही काही नेते मंडळी आहेत जे समाजाच्या कल्याणासाठी सतत प्रयत्नशील आहेत. आदिवासी समाजाचे एक मोठे वैशिष्टय आहे की त्यांच्यात कमालीची एकता 'एकी' दिसून येते. कोणतीही समस्या आली तरी सर्वजण मिळून सोडवतात. सर्वजण धावून येतात. किंवा कोणता कार्यक्रम असला तरी सामुहिक रित्या मदत केली जाते. ही एकी माना समाजातही दिसून येते. त्यामुळे समाजाच्या कल्याणासाठी नेतेही कार्यरत दिसतात. व नेत्यांचे म्हणणे इतर सर्व लोकही मान्य करतात.

या संदर्भात ''आपल्या संघर्षात आपल्याला कोणाची मदत झाली?'' असाही प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र ५**

**उत्तरदात्यांची समस्या विषयक मदत मिळविण्याची मनोवृत्ती दर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वत:ची | ६ | ३% |
| २ | जमातीची | ९७ | ४८.५% |
| ३ | इतर समुहांची | १ | ०.५% |
| ४ | शासनाची | ० | ०% |
| ५ | नेत्यांची | ३ | १.५% |
| ६ | वरील सर्वांची | ३ | १.५% |
| ७ | लागू पडत नाही | ९० | ४५% |

| | | | |
|---|---|---|---|
| | **एकूण** | २०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की स्वत:ची मदत केली. इतर कोणाचीही मदत घेतली नाही असे वैयक्तिक संघर्ष करणारे एकूण ६ (३%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. इतर समूहांची मदत झाली असे १ (०.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. समाजातील नेत्यांची मदत झाली असे एकूण ३ (१.५%) उत्तरदात्यांनी उततरे दिली. तर शासनाने कोणतीही मदत केलेली नाही. कारण शासनासोबतच संघर्ष केला गेला. असेही निदर्शनास येते संपूर्ण जमातीची जमातीच्या नेत्यांसह मदत झाली म्हणून संघर्ष करण्यात अंशत: का होईना यश प्राप्त झाले असे महत्तम ९७ (४८.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. त्यांची सामुहिक शक्तीची सहज कल्पना आपल्याला येऊ शकते. वरील सर्वांची मदत झाली असे एकूण ३ (१.५%) उत्तरदाते म्हणतात.

वरील विवचेनावरुन असे निदर्शनास येते की सामुहिक जीवन जगणे, सामुहिक संघर्ष करणे, व सामुहिक मदत करणे ही सर्व आदिवासींची लक्षणे माना आदिवासींमध्ये आढळतात. त्यामुळे त्यांना खोटे आदिवासी म्हणण्यात 'तथ्य' नाही असे संशोधिकेला वाटते. परंतु त्यांच्याच देशात त्यांच्याच अधिकारांना डावलले गेले. व त्यांना सतत संघर्ष करावा लागत आहे ही बाब तेवढीच स्पष्ट आहे असे म्हणायला जागा उरते.

आदिवासींच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघाने सांगितलेल्या वैशिष्टयापैकी चौथे वैशिष्टय म्हणजे स्वत:ला आदिवासी म्हणून ओळखणाऱ्या मानवसमुहाचे वंशज, छळ व दडपणाचे बळी ठरलेले लोक यांचा समावेश होतो. (हा संदर्भ यापूर्वीच आलेला आहे.) जंगल ठेकेदार, जंगलाचे अधिकारी, ग्रामसेवक, पटवारी व इतर अधिकारी, पदाधिकारी सतत आदिवासींना लहानसहान कामासाठी त्रास देतांना व त्यांच्याकडून पैसे लुटतांना दिसतात. त्यांच्याकडून कमीपैशात भरपूर मेहनत करुन घेणे, राज्याने ठरविलेल्या मजूरीपेक्षा कमी मजूरी देणे इत्यादीबाबतीतही त्यांचे अनेक प्रकारे शोषण केले जाते. आदिवासींचे शोषण अनेक वर्षापासून पूर्वीपसूनच सुरु आहे आणि सतत सुरु आहे. असे अनेक समाजशास्त्रात व विचारवंतानी मान्य केले आहे. शासनही कायदे

करुनसुद्धा त्यांच्या शोषणाला आडकाठी करण्यात बऱ्याच प्रमाणात अपयशी ठरले आहे असे ही अनेक विचारवंतांनी सिद्ध केलेले आहे माना आदिवासीं विषयीही याशिवाय वेगळी परिस्थिती नाही असे निरिक्षणाअंती निदर्शनास आलेले आहे.

परंतु स्वत: माना आदिवासींचे याबाबत काय मत आहे हे जाणून घेण्यासाठी ''इतर समाजापासून सदैव आदिवासींचे शोषण होत आहे. या मताशी आपण सहमत आहात काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र ६**

**उत्तरदात्यांची इतर समाजापासून होणाऱ्या शोषणाबाबत माहितीदर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुर्णत: सहमत | ४१ | २०.५% |
| २ | अंशत: सहमत | ८६ | ४३% |
| ३ | सहमत नाही | २१ | १०.५% |
| ४ | सांगता येत नाही | ५२ | २६% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, इतर समाजापासून आदिवासींचे सदैव शोषण होत आहे. या मताशी पूर्णत‘ सहमत असणारे एकूण ४१ (२०.५%) उत्तरदाते आहेत. तर अंशत: सहमत असणारे महत्तम ८६ (४३%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते इतर समाज जसे अधिकारी, मोठे शेतकरी, पदाधिकारी ठेकेदार हे ‘आदिवासींना काहीच समजत नाही’ म्हणून त्यांच्या जमिनी बळकावून घेतल्या. त्यांच्या योजनाही तेच खाऊन टाकतात व कमी पैशात ढोर मेहनत करवून घेतात. त्यामुळे अहोरात्र मेहनत करुनही त्यांना इतरांप्रमाणे चांगले जीवन जगता येत नाही. सहमत नाही असे म्हणणारे एकूण २१ (१०.५%) उत्तरदाते आहेत. त्यांना वाटते

इतर लोक त्यांचे शोषण करीत नाही. आम्ही काम करतो व जगतो असे ते उत्तर देतात. ज्यांच्या अपेक्षा मोठया नाहीत त्यामुळे त्यांचे शोषण केले जाते. हे त्यांना समजत नाही. तर याबाबतीत कधीच सांगता येत नाही असे म्हणणारे एकूण ५२(२६%) उत्तरदाते आहेत. ते इतके साधेभोळे व सरळ आहेत की, त्यांना शोषण, पिळवणूक म्हणजे काय हेही समजत नाही व त्यांचे शोषण केले जाते किंवा नाही हेही समजत नाही.

वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की महत्तम १२७ (६३.५%) उत्तरदाते हे शोषण केले जाते. या मताशी पूर्णत: व अंशत: सहमत आहेत. यावरुन माना आदिवासींचे शोषण व होत आहे असे म्हणायला हरकत नाही.

सारणी ६ ला अनुसरुनच जर ‘‘सहमत असाल तर होत असलेल्या शोषणाचे स्वरुप कोणते? असाही प्रश्न विचारण्यात आला त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र ७

## उत्तरदात्यांची इतर समाजाकडून होत असलेल्या शोषणाचे स्वरुप दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शाब्दिक मन:स्ताप | ३६ | १८% |
| २ | वेठबिगारी | ०० | ००% |
| ३ | लौंगिक शोषण | ०० | ००% |
| ४ | आर्थिक शोषण | ८९ | ४४.५% |
| ५ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०२ | १% |
| ६ | लागू पडत नाही | ७३ | ३६.५% |
|  | **एकूण** | **२००** | **१००%** |

शोषणााच्या बाबतीत सूक्ष्मपणे अध्ययन करण्यासाठी त्याच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे. त्यामुळे संशोधिकेने अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की वेठबिगारी किंवा लैंगिक शोषण कुणीही केलेले नाही असे उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. तर यापेक्षा वेगळे उत्तर म्हणजे सांगू न शकणारे २ (१%) उत्तरदाते आहेत ही त्यांची वैयक्तिक बाब असल्याने ते प्रसिद्ध करु इच्छित नाही. शाब्दिक मनःस्ताप म्हणजे आदिवासी संबंधाने वाईट शब्दांत बोलणे, शिव्या देणे, इत्यादी प्रकार झाल्याचे एकूण ३६ (१८%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. त्यांच्यामते, सततच आम्हाला आदिवासी म्हणून हिणवणे चिडविणे व शिव्यागाळी ही सुरुच असते. आमच्या मुलाबाळांनाही वाईट शब्दांतूनच बोलल्या जाते. तर आर्थिक शोषण केले असे महत्तम ८९ (४४.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. कोणतीही योजना घेण्यासाठी, कागदपत्रे मिळविण्यासाठी पैसेच दयावे लागतात. आमची दिवसभराची मजूरीही जाते. शिवाय आमची मजूरीही कमी आहे. आमच्या निर्मित केलेल्या वस्तूंना कवडी मोलाने ठेकेदार विकत घेतात. व बाजारपेठांत, शहरात जास्त नफा कमावतात असेही त्यांचे मत आहे.

वरील विवेचनावरुनच असे लक्षात येते की, माना आदिवासी हा शाब्दिक मनःस्ताप व आर्थिक शोषण यांनी अतिशय ग्रस्त झालेला आहे. सर्वच वर्गातून हयाबाबतीत त्यांचे शोषण होत आहे.

वरील प्रमाणे शोषणाचे स्वरुप निश्चित झाले. परंतु अशाप्रकारे शोषण करणारे लोक कोणकोणते आहेत. हेही जाणून घेणे आवश्यक ठरते. त्यासंदर्भात अशाप्रकारचे शोषण नेमके कोणाकडून होतो?'' असा एक प्रश्न शोषणकर्त्यांच्याबाबत जाणून घेण्यासाठी विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेला आहेत.

## सारणी क्र ८

## उत्तररदात्यांच्या शोषणकर्त्यांच्या संदर्भाने माहितीदर्शक सारणी

| **अ. क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | इतर समाजाकडून | ९ | ४.५% |
| २ | ठेकेदारांकडून | १ | ०.५% |
| ३ | शासकिय अधिकाऱ्यांकडून | २७ | १३.५% |
| ४ | सर्वांकडून | ९० | ४५% |
| ५ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| ६ | लागू पडत नाही | ७३ | ३६.५त्र% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीद्वारे असे निदर्शनास येते की, एकूण १२७ उत्तरदाते जे शोषण होते असे म्हणतात त्यांपैकी ग्रामीण व शहरी भागात इतर समाजाकडून ज्यांच्याकडे आम्ही कामाला जातो त्यांच्याकडून शोषण होते. असे एकूण ९ (४.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. कोणतेही काम जसे जंगलातील बांबुकाम वा शहरातील वा ग्रामीण भागातील घरे बांधण्याचे, वीटभट्टीचे इत्यादी कामावरील ठेकेदारांकडून शोषण होते. असे एकूण १ (०.५%) उत्तरदाते सांगतात. तर शासकिय अधिकाऱ्यांकडून आर्थिक शोषण होते. असे एकूण ९ (४.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर वरील सर्वांकडून आर्थिक व शाब्दिक ही शोषण होत असते असे एकूण ९० (४५%) उत्तरदात्यांचे मत आहे पुर्वी सावकारी पद्धती होती त्यामुळे सावकारांनी तर पैशाने लुबाडलेच परंतु आत्ताही बँका व सोसायटयांतर्फे कर्ज पुरवठा केला जातो. परंतु तो वेळेवर व कागदपत्राअभावी वेळेवर मिळत नाही. जेवढे पैसे शेतीवर शेती करण्यासाठी कर्ज दिले जाते ते पुरे पडत नाही. त्यामुळे गावातील महिला व पुरुष बचत गटांतर्फे कर्जे घ्यावे लागते. व तेही आता सावकारी करु पाहतात. बँकेच्या नियमापेक्षा खूप जास्त

व्याजाने कर्ज देतात. अशाप्रकारे सर्वांकडूनच आदिवासींचे शोषण केले जाते असे मत व्यक्त करतांना आढळतात.

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की इतर आदिवासीप्रमाणे माना आदिवासींचे शोषणही इतर समाज, शासकिय अधिकारी, ठेकेदार, बचतगट इत्यादींमार्फत होत आहे असे म्हणायला हरकत नाही.

माना आदिवासी ग्रामीण वस्तीत राहतात. त्या वस्ती जंगलाच्या शेजारी किंवा जगलातच आहेत. त्यामुळे शेती व जंगलावर आधारित कामे त्याचप्रमाणे माती टाकणे, पशुपालन इत्यादी कामेही माना आदिवासी करतांना दिसतात. स्वतःची शेती नसल्यास इतरांच्या शेतावर मजुरीने जाण्याचेही काम करतात. तेव्हा शोषणासंदर्भात त्यांची मते जाणून घेतल्यावर त्यांचे अनुभवही जाणून घ्यावे असे संशोधिकेने ठरविले. त्यासंदर्भात ''अशा शोषणाचे आपण कधी शिकार झाला असल्यास अशा प्रकारचा एखादा अनुभव विशद करा'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्यासंदर्भात एकूण ८५ उत्तरदात्यांनी आपले अनुभव व आपण पाहिलेले अनुभव भीतभीतच सांगितले तर ११५ उत्तरदात्यांनी मात्र याबाबतीत मौन पाळले अनुभव व्यक्त करणाऱ्यांनी आपले नाव कुठेही प्रसिद्ध करणार नाही या अटींवर आपले अनुभव सांगितले. तर त्याबाबतीत काहींना त्यांना न्याय मिळवून दयावा अशी अपेक्षा ही व्यक्त केली. त्यामध्ये शेतीची आराजी पटवाऱ्याने कमी केली, बैलबंडीसाठी केस करुनही मिळत नाही, शाब्दिक अपमान केला घरकुलासाठी फार्म भरला पण रद्द झाले. एका महिलेचा प्रसुती खर्च मिळाला नाही. जातप्रमाणपत्रासाठी विशेषत्रास झाला वडीलाने जमिनीसाठी फसविले जमीन रोडमध्ये गेली परंतु पैसे मिळाले नाही, शासनाने जमिन वापरली व पैसे दिले नाही, फॉरेस्टमध्ये डेलीविजेसवर असतांना अन्यायमाला, घरकुललासाठी पैसे दयावे लागले, BPL लिस्ट मध्ये नाव असूनही राशन कार्ड मिळत नाही, याने म्हणून शाब्दिक अपमान केला, मुळके वल्याने १० रु कमी दिले, गार्डासोबत भांडण झाले, त्याला सोडून मला उत्तरदात्याला दंड भरावा लागला, इंजिन देत नाही, नर्स नियमित सेवा देत

नाही, आंगणवाडी शिक्षिकेची पात्रता असूनही नियुक्ती रद्द केली, जमिनीच्या पट्टासाठी प्रयत्न करुनही मिळत नाही, कोणत्याही बाबतीत माहिती समजू देत नाही, स्वस्त दुकानदाराने साखर न देता दुकान बंद केले, अधिकारी शेतीसाठी समान देत नाही, योजना आमच्यापर्यंत पोहोचू देत नाही, आदिवासींना समजत नाही म्हणून वाईट वागणूक दूतात, अशिक्षितपणाचा फायदा घेऊन जमिन बदकावली, मुलांना नीट शिकवत नाही, काम होतात वा पैसे कमी देतात, कोणतेही काम कागदपत्रे मागायला गेलो की पैसेच मागतात. अशाप्रकारे उत्तरदात्यांनी आपले अनुभव कथन केले.

वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, आदिवासी अडाणी व साधेभोळे समजून त्यांचे शोषण अधिकाअधिक करण्यात आले, शिक्षणाचे व आर्थिक पाठबळ पाठिशी नसल्याने त्यांची अधिकाधिक पिळवणुक करण्यात येते असे याबाबतीत म्हणायला हरकत नाही.

माना आदिवासींच्या मते त्यांच्या शोषणाची कारणे कोणती हे त्यांच्याकडूनच जाणून घेण्यासाठी ''आपण अशा शोषणाचे शिकार झाला असल्यास त्याची कारणे सांगा.'' असाही एक प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र ९**

**उत्तरदात्यांची शोषणाची कारणे दर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिकाराचे धैर्य नव्हते म्हणून | ३ | १.५% |
| २ | शोषकाने धमकी दिली म्हणून | ०० | ००% |
| ३ | तक्रार करुनही न्याय मिळत नाही म्हणून | ७१ | ३५.५% |
| ४ | यापेक्षा वेगळे उत्तर | ११ | ५.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | लागू पडत नाही | ११५ | ५७.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की एकूण ८५ उत्तरदात्यांनी अनुभव सांगितले. त्यांपैकी प्रतिकाराचे धैर्य नव्हते म्हणून शोषण केले गेले असे एकूण ३ (१.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर तक्रार करुनही न्याय मिळत नाही म्हणून आम्ही तक्रार करित नाही हे इतरांना माहित असल्याने शोषण झाले असे महत्तम ७१ (३५.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. यापेक्षा वेगळे उत्तर ११ (५.५%) उत्तरदात्यांनी दिले. त्यांच्यामते गावात आपसात काम करुन घेतात आदिवासींना काहीच कळत नाही म्हणून पैसे कमी देतात किंवा देतही नाही. इतर समाजांच्या शेतीवर आम्ही कामावर गेल्याशिवाय पर्याय नाही किंवा जंगलातील ठेकेदारांचे व अधिकाऱ्यांचे ऐकल्याशिवाय पर्याय नसल्याने त्यांनी शोषण केले.

वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की आदिवासी समाज सहनशिल आहे. त्याचप्रमाणे पोटाची गरज भागविण्यासाठी व त्यांचा स्थायीभाव असल्याने तो गाव सोडून कामाला फारसे इतरत्र जायला तयार नसल्यानेही त्यांचे शोषण होत असते. तर शोषण होऊनही ते तक्रार करीत नाही म्हणूनही त्यांच्या शोषणाला आणखी खत पाणी मिळते असे म्हणता येते.

सध्या शिक्षणाने आदिवासींना थोडी समज येत आहे. कायदयाचे ज्ञान होत आहे. त्यांच्या संघटनाही बनत आहेत. त्यामुळे सद्यास्थितीत त्यांना शोषण मुक्त होण्याचे अनेक मार्ग आहेत व उपायही आहेत. कायदयाचे संरक्षण त्यांच्या पाठीशी आहे. परंतु ते राबवणारी यंत्रण मात्र त्यांच्या शोषणाला जबाबदार असल्याचे निदर्शन येते.

माना आदिवसींच्या संदर्भात शोषणाला विरोध कितपत करण्यात येतो हेही जाणून घेणे अतिशय महत्त्वाचे ठरले. त्यावरुन त्यांच्या प्रतिकारांचे धैर्य व अन्यायविरोधी मन:स्थिती जाणून घेता येते. या संदर्भात त्यांच्या विचारांचे परिवर्तन होत आहे किंवा

नाही हे त्यांनी केलेल्या शोषणाविरुद्धच्या उपाययोजनांवरुन दिसून येते. त्यासाठी ‘‘अशाप्रकारच्या शोषणाला आडकाठी बसावी म्हणून आपण कोणती उपाययोजना केली आहे?’’ असा प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र १०**

**उत्तरदात्यांची शोषणाविरुद्ध केलेल्या प्रतिबंधक उपायदर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वत:च धैर्याने प्रतिकार केला | ३ | १.५% |
| २ | न्यायपंचायतीत तक्रार केली | २ | १% |
| ३ | पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली | ०० | ००% |
| ४ | वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार केली | ७ | ३.५% |
| ५ | तक्रार केली नाही | ७३ | ३६.५% |
| ६ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| ७ | लागू पडत नाही. | ११५ | ५७.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, स्वत:च धैर्याने प्रतिकार केला असे ०३ (१.५%) उत्तरदाते सांगतात. स्वत:च न्यायपंचायतीत तक्रार नोंदवली असे २ (१%) उत्तरदाते सांगतात. वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार केली असे ७ (३.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. पोलीसस्टेशन मध्ये कुणीही गेले नाही. तर तक्रार केली नाही असे महत्तम ७३ (३६.५%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे.

वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की भांडणतंटा झाल्यास न्याय मागणारे माना आदिवासी मात्र शोषणाविरुद्ध तक्रारच केली नाही असे महत्तम उत्तरदाते सांगतात. यावरुन त्यांची सहनशिलता व भित्रेपणा निदर्शनास येतो. तर एकूण १२ उत्तरदात्यांनी

वेगवेगळया ठिकाणी तक्रार नोंदवली असल्याने ही संख्या जरी कमी वाटत असली तरी आता माना आदिवासी शोषणाविरुद्ध तक्रार करु लागलेत हे लक्षात येते व हे त्यांच्यातील सकारात्मक परिवर्तन होय असे म्हणावेसे वाटते.

माना आदिवासींची २००६ पूर्वी ''विशेषमागास प्रवर्ग'' या अनुसूचित त्यांची गणना केली जात होती. त्यामुळे त्यांना आरक्षनाचा विशेष लाभ होत नव्हता. मोठया प्रयासाने त्यांनी न्यांयालयीन लढाई जिंकून घेतली व अनुसूचित जमातीच्या यादीत माना जमातीचे नाव पूर्ववत नोंदवून घेतले. त्यामुळे अनुसूचित जमातीसाठी असलेले आरक्षण व इतर सोयी सवलती कायदे त्यांना लागू झाले २००६ पूर्वीच्या माना आदिवासींना शिक्षण घेऊनही विशेष लाभ झाला नाही व २००६ नंतर शिकणाऱ्यांना आरक्षणाचा लाभ मोठया प्रमाणावर मिळायला वेळ लागेल. महत्प्रयासाने ही लढाई जिंकल्यावर माना आदिवासींना कोणता लाभ झाला याबद्दलची त्यांची मते जाणून घेण्यासाठी ''शासनाने माना आदिवासींना अनुसूचित जमातीच्या यादीत स्वतंत्र नाव दाखल केल्यामुळे आपल्याला कोणता लाभ झाला आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र ११**

**उत्तरदात्यांची अनुसूचित जमातीच्या यादीत नाव दाखल केल्यामुळे झालेला लाभविषयक मतदर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय पूर्णपणे झाला | ११ | ५.५% |
| २ | थोडया प्रमाणात झाला | १४१ | ७०.५% |
| ३ | अजिबात झाला नाही | ४५ | २२.५% |
| ४ | यापेक्षा वेगळे उत्तर | ३ | १.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, अनुसूचित जमातीच्या यादीत नाव दाखल केल्यामुळे पूर्णत: लाभ झाला असे एकूण ११ (५.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार आता अनुसूचित जमातीचे आरक्षण, शिष्यवृत्ती, योजनांचे अनेक लाभ त्यांना मिळायला लागले आहेत. थोडया प्रमाणात लाभ झाला असे महत्तम १४१ (७०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्यांच्या मतानुसार जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्राच्या प्राप्तीमध्ये अनेक अडचणी येत असल्याने जात प्रमाणपत्राशिवाय व जात पडताळणी प्रमाणपत्राशिवाय ते नोकऱ्या व योजनांचा तसेच राजकीय आरक्षणाचाही लाभ घेऊ शकत नाही. उच्च शिक्षण घेऊ शकत नाही त्यामुळे अनुसूचति जमातीच्या यादीत नाव दाखल करुनही त्यांना पूर्णपणे लाभ मिळू शकत नाही. परंतु मुलांच्या शिष्यवृत्यां त्यांना मिळू लागल्या आहेत. कोणताही फायदा झालेला नाही असे मत व्यक्त करणारे एकूण ४५ (२४.५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते फक्त लहान मुलांना शिष्यवृत्ती शिवाय त्यांना कोणताही लाभ झालेला नाही. ही संख्या लक्षात घेण्यासारखी आहे. यापेक्षा वेगळे उत्तर देणारे ३ (१.५%) उत्तरदाते आहेत. त्यांना हांय व नाही पेक्षा काही वेगळे वाटते.

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की अनुसूचचित जमातीच्या यादीत माना आदिवासींचे नाव नों दण्याचा त्यांना थोडाफार लाभ झालेला आहे. परंतु जोपर्यंत त्यांना जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र दिले जात नाही तोपर्यंत त्यांना कोणताही लाभ घेता येणार नाही. व विकासापासून ते असेच दूर राहतील असेच म्हणावयास हरकत नाही.

ग्रामीण भागात राहतांना जिथे इतर समूहातील लोक शिक्षण घेऊन नोकरी मिळवू लागले आहेत तिथे माना समाजातील मुले मात्र १० वी पर्यंतच शिक्षण घेऊन माघारी फिरतांना दिसतात. क्वचितच विद्यार्थी उच्च शिक्षण घेतांना दिसतात. जे माना आदिवासी थोडया सुधारित गावात राहतात किंवा त्यांचे आई—वडील शहरात व चांगल्या कामावर आहेत तीच मुले थोडया चांगल्या पद्धतीने शिक्षण घेतांना व नोकरी मिळवण्याची

आकांक्षा बाळगतांना दिसतात. परंतु ग्रामीण भागात मात्र शिक्षणाच्या बाबतीत फारच मागासलेपण दिसून येते. याबाबतीत स्वत: माना आदिवासींची काय मते आहेत हे जाणून घेण्याच्या उद्देशाने ''इतर समूहांच्या तुलनेत आपण शिक्षण व नोकऱ्या मध्ये मागे पडलोत असे आपणास वाटते काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र १२

## उत्तरदात्यांची शिक्षण व नोकरी संदर्भात इतर समुहांशील (बिगर आदिवासी) तुलनात्मक मतदर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निश्चितच मागे पडलो | २७ | १३.५% |
| २ | बरेच मागे पडलो | १६० | ८०% |
| ३ | मागे पडलो नाही | ३ | १.५% |
| ४ | नक्की सांगता येत नाही | १० | ५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

शिक्षणाच्या बाबतीत व त्यामुळे नोकऱ्यांच्या बाबतीत आदिवासींचे मागासलेपणासर्वश्रृतच आहे.

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की शिक्षण व नोकऱ्यांच्या बाबतीत इतर समूहांच्या तुलनेत निश्चितच मागे पडलो असे उत्तर देणारे एकूण २७.(१३.५%) उत्तरदाते आहेत तर बरेच मागे पडलो असे उत्तर देणारे महत्तम १६० (८०%) उत्तरदाते आहेत. या उत्तरदात्यांना मान्य करावेसे वाटते की माना समाजातील लोक शिक्षण व नोकऱ्यांमध्ये इतर कोणत्याही बिगर आदिवासी समुहांच्या तुलनेत मागासलेलेच आहेत. व वरील विवेचनावरुनही हे सिद्ध होते असे म्हणावयास हरकत नसावी.

ग्रामीण भागात राहतांना सर्वांना सामाजिक संबंध जपणे अतिशय महत्त्वाचे असते. प्रत्येक व्यक्तिचा धर्म, जाती–जमाती, कुलनुसार किंवा आर्थिक दर्जानुसार जरी स्वत:चा एक समूह असतो तरीसुद्धा अनेक कार्यक्रम व कामे अशी असतात की जिथे आंतर–सामुहिक क्रिया होणे महत्त्वाचे असते. आर्थिक क्रिया करतांना सुद्धा ते काम व्यक्तिला वाटत असते की आपण एकटेच करीत असतो, तरी परंतु ते समुहाच्या सहकार्याने व समुहाशी मिळूनच करावे लागते. मग ती शेती असो, मजुरी असो अथवा इतर कोणताही नोकरी व्यवसाय असे. सध्यातर या सर्व बाबी इतक्या गुंतागुंतीच्या झालेल्या आहेत की, निव्वळ स्वत:च्या समुहात वापरुन काम करतो म्हटले तर ते कदाचित शक्यच होणार नाही. त्यामुळे सर्वच समाजात एकमेकांशी जुळवून घेणे व एकमेकांची मदत घेणे अगत्याचे ठरलेले आहे. आदिवासी समाजाचा इतर गैर आदिवासी समाजाशी संबंध म्हटला तर तो पिळवणुक व शोषणाच्या व्यवस्थेशीच जोडला गेलेला लक्षात येतो. जरी आदिवासींचा संबंध गैरआदिवासींशी वाढू लागला आहे. जोडला गेलेला आहे. तरी त्या संबंधाचे स्वरुप कोणते? मैत्रीचे की मालक नोकराचे हाही प्रश्न अतिशय महत्त्वाचा असतो. इतर वेळी आपल्याला असे निदर्शनास येते की लोक आदिवासींशी मैत्री तर करतात. परंतु एखादा सामाजिक कार्यक्रम असला की, त्यावेळी मात्र ते त्यांना नोकराप्रमाणे वागवून घेतात. आणि साधेभोळे आदिवासी ते काम आनंदाने स्वत:चेच म्हणून करीत असतात.

ग्रामीण भागात असो किंवा शहरी भागात असो भारतीय समाज हा जातीव्यवस्थेने पछाडलेलाच आपल्याला दिसतो जात ही अशी व्यवस्था आहे की, जी प्रत्येक सुधारणेमध्ये अडथळा निर्माण करीत असते. त्याचा परिणाम भारतीय समाज हा स्थितीशील बनला. ‘‘कोणत्याही सामाजिक व्यवस्थेत काळानुसार सामाजिक नियमांमध्ये बदल होणे आवश्यक असते. परंतु जातीला पवित्र, दैवी, धार्मिक असल्याची मान्यता दिल्यामुळे जाती व्यवस्थेत कोणत्याच प्रकारचे परिवर्तन न होता ती अधिक मजबूत झाली आहे. त्यामुळे जाती व्यवस्थेला आज एक मूलभूत सामाजिक समस्येचे स्वरुप प्राप्त झाले आहे. जाती व्यवस्था ही मानवी मूल्यांच्या विरोधी आहे. त्यामुळे ती

सामाजिक विषमतेचा पुरस्कार करते. आणि जी व्यवस्था सामाजिक विषमतेचा पुरस्कार करते त्या व्यवस्थेकडून समता, बंधुत्व, स्वातंत्र्य आणि न्याय मिळेल ही अपेक्षा करणे चुकीचे आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत आहे.''[१०]

आदिवासींना जरी ते हिंदू धर्माचे आहेत असे वाटत असले तरी हिंदू धर्मातील जातींकडून विशेषत: स्वत:ला उच्च समजल्या जाणाऱ्या जातींकडून मात्र कशाप्रकारची वागणुक मिळते? हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न ठरतो. आदिवासी बाबत हिंदू धर्मातील इतर जाती अस्पृश्यता पाळीत नाहीत तरी परंतु ते आदिवासींना कोणता सामाजिक दर्जा देतात? त्यांच्याबद्दल गैरआदिवासींच्या मनात कोणती भावना आहे? हे जाणून घेणेही महत्वाचे ठरते. आजच्या आर्थिक वर्गवारीच्या काळात जिथे जातीची उच्च पकड अजुनही कायम आहे तिथे आदिवासी समुहाला कशा प्रकारे वागणूक देतात हे जाणून घेण्यासाठी संशोधिकेने ''गावांत किंवा इरतत्र आपल्याला इतर समाजापासून (गैर आदिवासी) कोणत्या प्रकारची वागणुक मिळते?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र १३**

**उत्तरदात्यांना इतर समाजांकडून (गैरआदिवासी) मिळणारी वागणुक विषयक मतदर्शक सारणी.**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | समान दर्जाची | १११ | ५५.५% |
| २ | उच्च दर्जाची | ०० | ००% |
| ३ | हीन दर्जाची | ४३ | २१.५% |
| ४ | सांगता येत नाही | ४६ | २३% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, आपल्याला समान दर्जाची वागणुक इतर समुहांकडून दिली जाते असे सांगणारे महत्तम १११ (५५.५%) उत्तरदाते आहेत. त्यांना एक गंमतीदार प्रश्न नंतर संशोधिकेकडून विचारण्यात आला की, शाळांमधून किंवा समाजामधून जेव्हा इतर समूहांसोबत तुम्ही असता तेव्हा स्वच्छता करुन घे, चहा आण, एखादी वस्तु नेऊन ठेव, उचलून ठेव, इत्यादी कामे गैरआदिवासींकडून कोणत्या समूहांकडून करुन घेतल्या जातात? असा प्रश्न विचारताच मात्र सर्व उत्तरदाते विचारात पडले. उच्च दर्जाची वाणगुक देतात असे कुणीही सांगू शकले नाही. इतर समूहांकडून आपल्याला नेहमीच आदिवासी म्हणून हीन दर्जाची वागणुक देतात असे एकूण ४३ (२१.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. ही संख्या लक्षात घेण्यासारखी मोठी आहे. शिक्षणाने सुसंस्कृत झालो म्हणणारे समूह मात्र अजूनही आदिवासींना त्यांच्या अर्थार्जनावरुन, त्यांच्या राहणीमानावरुन त्यांना होन सामाजिक दर्जा देतात असेच आढळून येते. तर याबाबतीत काहीच सांगता येत नाही अशी तटस्थतेची भूमिका घेणारे एकूण ४६ (२३%) उत्तरदाते आहेत. त्यांनी एवढा विचार केलेला नाही किंवा परिस्थितीनुसार त्यांच्याशी इतर समुहांची वागणुक सतत बदलत असते असे त्यांचे म्हणणे आहे.

सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात रामबिहारीसिंह तोमर लिहीतात,'' सामाजिक परिर्वन अवश्यम्भावी है। यह सदैव होता रहता है। यह एक सार्वभौमिक प्रक्रिया है। सामाजिक परिवर्तन एक ऐसी प्रक्रिया है। जिसे रोका नही, जा सकता.''[१७] यानुसार सामाजिक परिवर्तन ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. पूर्वी वर्गवारीचे अस्तित्व नव्हते असे म्हणता येत नाही. राजा व प्रजा, जमिनदारी, मोठे शेतकरी व मजूर वर्ग ही वर्गवारी आर्थिक आधारावरच होती. या सर्वांवर पुन्हा जातवार वर्गवारीचा पगडा होता. परंतु जातीचा जोर आर्थिक वर्गवगरीपेक्षा पूर्वीपासूनच जास्त आहे. खालच्या दर्जातील समजल्या जाणाऱ्या जातीत कितीही श्रीमंत असल्या तरी उच्च जातीचे समजले जाणारे गरीब लोकही त्यांना वाईट वागणुक देतांना दिसतात.

वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, माना आदिवासी जमातीला गैर आदिवासीकडून समान वागणूक देण्याचे प्रमाण वाढले असले तरी अजूनही हीन दर्जा देणाऱ्याचे प्रमाण कमी झालेले नाही. त्यामुळे हया संदर्भाने होणारे सामाजिक परिवर्तन अतिशय मंद गतीने सुरु आहे असे समजायला हरकत नाही.

# संदर्भ सूची


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | लोटे रा.ज. | — | सामाजिक व्यवस्था आणि सामाजिक परिवर्तन | पृ. १५७ |
| | | — | पिंपळापुरे अॅण्ड कंपनी प्रकाशन, नागपूर. | |
| | | — | प्रथमावृत्ती —१९८८ | |
| २. | लोटे रा.ज. | — | सामाजिक व्यवस्था आणि सामाजिक परिवर्तन | पृ. १५९ |
| | | — | कित्ता | |
| ३. | शरदचंद्र | — | भारत शासन आणि महाराष्ट्र शासनाचे नवीन कायदे —२००१ | पृ. २०,२१ |
| | | — | कन्हैया लाल गुप्ते, नवीन कायदे प्रकाशन उन्नाव कानपूर. | |
| ४. | डॉ. गोरे गोविंद | — | बदलाच्या उंबरठयावरील कोकणा आदिवासी | पृ. ०१ |
| | | — | श्री विद्या प्रकाशन पुणे. | |
| ५. | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. ०२ |
| | | — | कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे— २००३ | |
| ६. | मेश्राम गोकुळदास | — | आदिवासी सिंधू संस्कृतीचे वारसदार आणि त्यांचा धम्म. | पृ. १३ |
| | | — | गोकूळदास मेश्राम, चंद्रपूर—२००६. | |
| ७. | डॉ. आगलावे प्रदीप | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ. |
| | | — | साईनाथ प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती ऑगस्ट—२००४ | २१२ |
| ८. | नाडगोंडे गुरूनाथ | — | भारतीय आदिवासी | पृ. |
| | | — | कित्ता. | ३५१ |
| ९. | लोटे रा.ज. | — | सामाजिक व्यवस्था आणि सामाजिक परिवर्तन | पृ. १८९ |
| | | — | कित्ता | |
| १०. | डॉ. कऱ्हाडे बी.एम. | — | समाजशास्त्रीय विचार चिंतन | पृ.१२६ |
| | | — | अशोक पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर. | , १२७ |
| | | — | प्रथमावृत्ती ऑक्टो. २०१० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११. | तोमर रामबिहारी सिंह | – | सामाजिक परिवर्तन<br>– श्रीराम मेहरा ॲण्ड कंपनी– आगरा<br>– प्रथमावृत्ती – १९६९ | पृ. ०१ |

## ६.२ सांस्कृतिक सद्यस्थिती व परिवर्तन

प्रा. डॉ. श. गो. देवगावकर यांच्या मते, ''प्रत्येक समाजाला त्याची विशिष्ट संस्कृती असते. जगात विविध देशांमध्ये आणि देशातील विविध भागांमध्ये विस्कटलेल्या जनसमुहांची स्वत:ची अशी एक संस्कृती असते. संस्कृतीत सारखेपणा असतो तसाच वेगळेपणाही असतो''[१] 'संस्कृती' शब्द स्वत:मध्ये एक व्यापक शब्द आहे. संस्कृती शब्दात मानवाच्या संपूर्ण भौतिक व अभौतिक क्रिया सामावलेल्या आढळतात. संस्कृती ही मानवाची एक जीवनपद्धती आहे. आणि प्रत्येक मानवाचे किंवा तो राहत असलेल्या भूभागाचे अथवा त्या समूहाचे वेगळेपण त्याच्या संस्कृतीद्वारेच निदर्शनास येते. प्रत्येक मानवसमूह आपली संस्कृती जपत असतो. पुढील पिढीला हस्तांतरीत करीत असतो. व साधारणत: सहजासहजी तो त्यात आलेले वा येऊ घातलेले परिर्वन सहन करीत नाही. त्यामुळे मानवसमुहांनी कित्येक युगेनयुगे स्वत:ची संस्कृती जतन करुन ठेवली आहे आणि त्याप्रमाणेच तो आपले जीवन कार्य करीत असतो.

श्रीमती पॉलीन व्ही. यंग यांच्या मते,'' To the sociologist and cultural anthropologist the term culture means the sum total of 1) inherited artifacts, goods, technical processes and 2) social heritages, ideas, habits, custms, attitude values, morals, law and art which have meaning to the grarp cuture comprises all the material and the non-material products of common human activity culture may be viewed as an exhibit of human achievements in terms of language artifacts, ideas, ideals and technigues"[2] संस्कृतीची संपूर्ण आणि व्यापक अशी व्याख्या केल्यावर पुढे सांस्कृतिक समूहाच्या बाबतीत श्रीमती पॉलीन व्ही. यंग म्हणतात'' In a more general sense, any social group which mainterins social cohension and expresses and attains comman interests in its own unique manner is a culture of group"[3]

भारताचे मुख्य तीन खंड जे आदिवासी समाज, ग्रामीण समाज आणि नागरी समाज असे पडतात. व त्यांच्या प्रत्येकाच्या संस्कृतीत फार मोठी तफावत आढळते. शहरी समुदाय जो सध्या पाश्चात्य संस्कृतीकडे वळताना दिसतो परंतु मानसिक विचारांत मात्र अजूनही भारतीय संस्कृतीचा पगडा त्यांच्या मनावरुन गेलेला नाही असेच चित्र आपल्याला सर्वत्र दिसते. त्यामुळे वाढत्या आधुनिकीकरणासोबतच व पाश्चत्तीकरणासोबतच पुन्हा पुजा पाठ, धर्मविधी व कट्टर जातीयवाद फोफावत आहे. पुजापाठातील कर्मकांड अधिकाधिक वाढत चालल्याचे अनेक देवळांतून, धर्मविधीतून दिसत आहे. तसेच श्रद्धा व अंधश्रद्धांचेही पेव फुटलेले दिसतात. त्यामुळे गुप्त धनासाठी मानवी बळी देण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालल्याचे आपण सतत दूरदर्शनसारख्या प्रसारमध्यमातून पाहत आहोत. संस्कृतीचा असा विपर्यास होणे सुरु आहे. विवाहीतेनी कपाळावर कुंकू लावणे ही हिंदू धर्म पद्धती आता दूरदर्शनच्या धारावाहीकांतील स्त्रियांच्या कपाळावरील विचित्र टिकल्या पाहिल्यावर अगदी हास्यस्पद परिवर्तीत होत आहे काय असे वाटते. सगळयाच गोष्टींचा विपर्यास होतो आहे आणि भारतीय संस्कृतीही आता भारतीय व पाश्चात्य यांच्यामध्ये हेलकावे खात विकृतपणा धारण करत असल्याचे वारंवार निदर्शनास येत आहे.

अशा वेळी खरी भारतीय संस्कृतीची जपणूक केली असेल ती ग्रामीण भाग व आदिवासी समूहाने आदिवासी संस्कृतीच्या बाबतीत डॉ. गोविंद गारे श्री उत्तमराव सोनवाणे लिहितात;'' आदिवासी संस्कृती ही प्राचीन मानव आणि आधुनिक सुधारणा या प्रगतीच्या इतिहासातील महत्वाचा दुवा आहे.''[४] पुढे जाऊन आदिवासींच्या सांस्कृतिक कला परिवर्तनाच्या बाबतीत डॉ. गोविंद गारे व श्री उत्तमराव सोनवणे म्हणतात, ''आदिवासी जीवनात झपाटयाने बदल होतो आहे. सुधारणांच्याया हव्यासापाठी आदिवासी क्षेत्रांचा कायापालट होतो आहे. माणसांची जीवनपद्धतीच बदलली जात आहे. भारतात आसामखेरीज इतरत्र आदिवासी कला शिल्लक राहीलीच नाही असे डॉ. एल्विन यांचे मत आहे.''[५] असे जरी असले तरी अजूनही भारतीय आदिवासी समाजात जे अतिशय दुर्गम स्थळी, डोंगरकपाऱ्यात, जंगलाशेजारी राहतात त्यांच्यात पूर्णपणे नाही तरी

त्यांच्या पुजाविधी व धार्मिक, कलांतून, लग्न समारंभातून अजूनही दिसून येतात. काही समारंभापुरती तरी आदिवासी संस्कृती अजूनही जिवंत असल्याचे दिसून येते. मात्र सद्या त्यांच्या ते बदलणाऱ्या पेहरावांकडे पाहून परिवर्तनाचे काही अंदाज नक्कीच बांधता येतात. समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी मात्र कोणत्याही समूहाच्या अध्ययनासाठी त्या समूहाचे सांस्कृतिक अध्ययन म्हणजे त्या समूहाची संपूर्ण जीवनशैलीच होय. त्यात त्यांचा इतिहास व वर्तमान तर असतेच परंतु त्यांच्या भविष्याचा आरसाही दिसतो.

डॉ. श. गो. देवगावकर यांच्या मते, ''संस्कृतीमुळे दृष्टीकोन, विचार, समज, गैरसमज, अपसमज इत्यादी घडविले जातात. त्या समाजाचे गंड स्वाभिमान आणि सांस्कृतिक प्रतिके सांस्कृतिक आधारावर स्थिर असतात.[६]

माना आदिवासी समाजाचा सांस्कृतिक अभ्यास केल्याशिवाय त्यांचा संपूर्ण समाजशास्त्रीय अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे संशाधिकेने माना आदिवासी समाजाचा सांस्कृतिक अध्ययन व त्याच्यात झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास सूक्ष्मपणे करण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला आहे.

संस्कृतिचे दोन मुख्य अंग असे भौतिक व अभौतिक संस्कृती त्यात अभौतिक संस्कृती वहनाचे प्रमुख माध्यम म्हणजे भाषा आदिवासी समाजात लिपिचा अभाव आढळतो. त्यामुळे भाषेच्या आधारेच त्यांच्या परंपरा व रुढींचे जतन केले जाते व पुढील पिढीला ते हस्तांतरीत केले जाते. आदिवासींच्या लोककथांमधून, भाटांनी वर्णन केलेल्या त्यांच्या कथांमधून तर आदिवासींनी प्रत्येक समारंभासाठी जी गाणी वर्णनपरगीतांमधून तयार केलेली आहेत त्या लोकगीतांमधून वादयांच्या ठेक्यातून अभौतिक संस्कृतीचे वहन केले जाते. माणसामाणसांतील संवेदना जाणून घेण्याची व एकमेकांशी संवाद साधण्याचे माध्यम म्हणजे भाषा आणि मातृभाषा म्हणजे अतिशय जवळची, माणूस आपल्या मातृभाषेतून आपल्या भाव भावनांना जेवढया उत्कट पद्धतीने प्रकट करु शकतो त्यापेक्षा जास्त चांगल्या पद्धतीने कोणत्याही इतर भाषेत तो करु शकत नाही आणि आदिवासी समाजाला त्यांच्या मातृभाषेशिवाय इतर भाषेचा पर्याय

नाही. याचेकारण आदिवासींचे एक सिमीत जग आहे. ते आपल्या समूहापलीकडे जास्त लोकांशी मिसळत नाही किंवा व्यवहारही फारसे करत नाहीत. व्यवसाय संबंधाने जर इतर भाषिकांशी त्यांचा संबंध आलाच तर त्यांची मोाठी अडचण निर्माण होते. अलिप्तपणे जगणे हे त्यामागचे एक महत्त्वाचे कारण आहे आणि आदिवासींच्या संस्कृतीची जपणूक करण्यासाठी त्यांना अलिप्तपणे ठेवणे जास्त धोक्याचे ठरु शकते याबाबतीत डॉ. गोविंद गारे यांच्या मते,'' आज अनेक ठिकाणी वेगवेगळया मार्गानी प्रगट झालेली प्रादेशिक अलिप्तता ही आदिवासीच्या दृष्टीकोणातून जरी इष्ट, ग्राहय अगर परिहार्य मानली गेली असली तरी सदैव, सर्वथैव अलिप्त ठेवणे योग्यही नव्हते आणि हिताचेही नव्हे हे नाकारता येणार नाही यावरुन आदिवासींचा संबंध बाहय जगाशी येणे इष्टच नव्हे तर अपरिहार्यही आहे हे स्पष्ट आहे''[७]

याबाबतीत एम.जी. कुलकर्णी यांच्या मते, "IT is generally stressed in relation to the scheduled tribes in all dissussions and recommendations about their welfare that while every effort should be made to improve their economic condition equal athention should also be paid to preserve their culture." [8]

वरील विवेचनावरुन लक्षात येते की आदिवासींची स्वत:ची एक वेगळी संस्कृती आहे आणि त्यांच्या वेगळया संस्कृतीमुळेच त्यांचे वेगळेपण प्रकर्षाने दिसून येते. आणि त्यांची वेगळी संस्कृतीही समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी एक आव्हानच्या ठरते व स्वत:कडे विविध अभ्यासकांना आत्कृष्ठ ही करत असते असा सांस्कृतिक वारसा लाभलेल्या माना आदिवासींच्या संस्कृतीबाबतही जाणून घेण्याच्या दृष्टीने संशोधिकेने त्यांना अनेक प्रश्न विचारले व त्यांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

माना आदिवासी जे दुर्गम, जंगला शेजारील गावांत किंवा जंगलातील गावांत, ग्रामीण भागात राहताात त्यांची बोलीभाषा व मातृभाषा जाणून घेण्याच्या दृष्टीने

संशोधिकेकडून त्यांना ''आपली मातृभाषा कोणती?'' असा प्रश्न विचारला त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र १**

**उत्तरदात्यांची मातृभाषा विषयक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठी | २०० | १००% |
| २ | इतर भाषा | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की जसे इतर आदिवासींची स्वत:ची वेगळी भाषा आहे तशी माना आदिवासींची वेगळी मातृभाषा नाही. त्यांची मराठी मातृभाषा आहे असे एकूण २०० (१००%) उत्तरदात्यांनी सांगितले. याचा अर्थ माना आदिवासी हे मराठी भाषिक आहेत. याला कारण ते अनेक वर्षांपासून ग्रामीण भागात जरी ते दुर्गम जंगल व्याप्त असले तरी राहतात. त्यामुळे हिंदू संस्कृतीशी संपर्क आल्याने त्यांची मातृभाषा मराठी आहे. परंतु मराठी शिवाय इतर कोणतीही मातृभाषा नाही असे निदर्शनास येते. परंतु त्यातही त्यांची मराठी बोलीभाषा व मराठी भाषा बोलण्याची पद्धत मात्र शुद्ध व प्रमाण मराठी भाषेसारखी नाही. मराठीतही त्यांचे अनेक, स्वतंत्र शब्द आहेत. जसे ते काय करतात न म्हणतात का करतेस? अशाप्रकारे बोलीभाषेचा वापर करतात. मातृभाषा व बोलीभाषेचे महत्त्व असे की, मानव जन्मापासून जे शिक्षण घेतो ते मातृभाषा व बोलीभाषेतूनच योग्यरित्या घेऊ शकतो. याबाबतीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये विशेष तरतुदी केल्या गेल्या आहेत, जसे'' एक लाखापेक्षा जास्त लोकांची बोलीभाषा असणाऱ्या आदिवासी भाषांची १ ली व २ री ची प्राथमिक पुस्तके तयार करण्याचे काम सातव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत पूर्ण केले पाहिजे [१] यावरुन बोलीभाषा व मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण देण्यावर शासनाचा भर असल्याचे निदर्शनास येते.

वरील सारणी क्रमांक १ ला अनुसरुनच आधुनिकिकरणाच्या युगात जिथे कामानिमित्त  आदिवासींचे विविध ठिकाणी स्थलांतर झाले आहे तसेच शिक्षणाचा प्रभाव म्हणूनही माना आदिवासींनी इतरर कोणकोणत्या भाषा अवगत केल्या हेही जाणून घेण्याचा प्रयत्न केला त्याच प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र २

## उत्तरदात्यांची इतर भाषा अवगत असल्याविषयक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठी भाषेशिवाय इतर भाषा बोलता येणारे | ३६ | १८% |
| २ | मराठी शिवाय इतर कोणतीही भाषा बोलता न येणारे | १६४ | ८२% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की मराठी शिवाय इतर भाषा जसे हिंदी, इंग्रजी बोलता येणारे केवळ ३६ (१८%) उत्तरदाते आहेत. त्यातही क्वचितच इंग्रजी बोलता येणारे आहेत. बाकीचे इतर लोकांच्या संपर्काने व शिक्षणाने थोडीफार हिंदी भाषा बोलू शकतात. बाकी महत्तम १६४ (८२%) उत्तरदाते केवळ आणि केवळ मराठी भाषाच जाणतात. त्यात ग्रमीण समुदायाचाच समावेश होतो. त्यांना इतर भाषा शिकण्याची गरजही वाटली नाही. कारण त्यांचा संपर्क इतर कोणत्याच भाषिक समूहाशी अधिक आलाच नाही. त्यांची सकाळ शेतापासून सुरु होते आणि त्यांची संध्याकाळ शेतावरच संपते त्यांची स्वत:ची शेती किंवा इतरांच्या शेतावर राबता राबता त्यांचे संपूर्ण आयुष्यच जाते. त्यामुळे त्यांना मातीची, बैलांची भाषा समजते परंतु इतर भाषा शिकण्याची त्यांना संधिही मिळाली नाही व तशी गरजही वाटली नाही. मात्र दुरदर्शनच्या प्रभावामुळे आता बऱ्याच युवकांना व मुलांना हिंदी भाषा समजायला लागली आहे.

वरील विवेचनावरुन माना आदिवासीं हे मराठी भाषिक आहेत. असे म्हणावयास हरकत नाही बदलत्या युगात ज्यांच्या भाषेत म्हणावे तसे परिवर्तन झालेले नाही. कारण सुशिक्षित मंडळीही त्यांच्या बोलीभाषेचाच वापर करतांना आढळतात.

मानवाने भाषेची प्रगती करतांनाच त्याच्या पेहरावाबाबतही प्रगतीकेली अश्मयुगातील मानव हा आताचा मानव यांच्या पेहरावातील प्रगती पाहिल्यास आपल्याला अश्यमयुगातील मानव म्हणजे मानवाच्या अविकसित अवस्थेची कल्पना येते. त्यामुळे मानवाची मुलभूत गरज जी अन्न, वस्त्र, निवारा या तिन्हींचा विकास करतांना आदिवासी समाजाच्याही पेहरावात काही बदल झाला का हे जाणून घेणे आवश्यक ठरते. पूर्वी माना आदिवासी स्त्रिया उलटया पदराचे लुगडे घालत पदर करमेला खोचत. त्याचप्रमाणे पुरुष मंडळी धोतर व सदरा घालायचे परंतु सध्या माना आदिवासी स्त्रिया सरळ पदराचे लुगडे घालतात. व या पदर डोक्यावरुन घेतात. तर वयोवृद्ध पुरुष अजून धोतर व सदराच घालतात मात्र नवीन शिकलेली मुले, मुली तसेच अशिक्षित युवक वर्ग सुद्धा साडी घालतांना दिसतात व मुले पँट व शर्ट घालतांना दिसतात. प्रसार माध्यमांच्या विकासाने व दुरदर्शनच्या गावागावांतून आल्याने सर्वच समाजांचे पेहरराव बदलायला लागले त्यात माना आदिवासी समाजही मागे नाही लहानमुली फ्रॉक व सलवारसुट घालायला लागल्या हा बदल त्यांच्या पेहरावात इतर समाजांच्या व शहरीकरणाच्या झगमगाटानेही आलेला आहे तसेच शाळांमधून असणाऱ्या गणवेषाचाही परिणाम आहे. परंतु या परिवर्तनाला माना आदिवसी समाज कशाप्रकारे घेतो, या परिवर्तनाला तो योग्य मानतो की हे परिवर्तन त्यांच्या संस्कृतीला मारक आहे. असे त्यांना वाटते याबाबत जाणून घेण्यासाठी ''आपली मुले इतर उच्च समाजातील मुलांचे अनुकरण करुन पेहराव करतात असे तुम्हाला वाटते काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र ३

## उत्तरदात्यांची पेहराव परिवर्तन संबंधाने मनोवृत्तीदर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निश्चितच वाटते | १६ | ०८% |
| २ | असायला पाहिजे | १४२ | ७१% |
| ३ | असे वाटत नाही | ३३ | १६.५% |
| ४ | नक्की सांगता येत नाही | ९ | ४.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

इतर समाजांसोबत आदिवासी समाजातही मुल्ये बदलायला लागली आहेत. सामाजिक प्रतिष्ठेचे निकष व संकल्पना बदलायला लागल्या आहेत आणि प्रतिष्ठेचे दर्शक सर्वात प्रमुख माध्यम म्हणजे पेहराव त्यामुळे कदाचित पेहरावात बदल होणे गरजेचे व सद्यास्थितींत इष्टही आहे.

यासंदर्भात वरील सारणीचे अवलोकन केल्यास आपल्या असे लक्षात येते की उच्च भ्रू समाजातील मुलांचे अनुकरण करुन माना आदिवासींची मुले निश्चितच पेहराव करतात असे उत्तर देणारे एकूण १६ (८%) उत्तरदाते आहेत तर असे करायलाच पाहिजे असे महत्तम १४२ (७१%) उत्तरदात्यांचे मत आहे. ही संख्या फार मोठी असून वैचारिक परिवर्तनाचे हे घातकच आहे. असे म्हणायला हरकत नाही. आपली पारंपारिक पेहरावाबाबत संस्कृती बदलायला हे सर्व उत्तरदाते तयार आहेत असे प्रकर्षाने जाणवते. 'असे वाटत नाही' असे एकूण ३३ (१६.५%) उत्तरदाते म्हणतात. कारण त्यांना वाटते की शाळेत जाणाऱ्या मुलांचा हा गणवेश असल्यामुळे शर्टपँट घालणे किंवा सलवार घालणे म्हणजे बदल नव्हे तर नक्की सांगता येत नाही असे ०९(४.५%) उत्तरदाते म्हणतात. या उत्तरदात्यांना प्रश्नांच्या संदर्भाने अर्थ लक्षात येत नव्हता किंवा त्यांना कोणत्याच बाबतीत जास्त विचार करावासा वाटत नव्हता. त्यांना जे

दिसते ते चुपचाप पाहणे व विचार न करता चालू देणे अशी काही शी मन:स्थिती असल्याने 'ठिक आहे' असेच उत्तर त्यांच्या तोंडून निघते याला महत्वाचे कारण म्हणजे अशा वैचारिक पातळीवर उतरुन एखादया गोष्टीची शहानिशा करण्यापेक्षा चुपचाप आपले काम करणे व पोट भरणे एवढेच त्यांच्यासाठी महत्त्वाचे आहे.

परंतु 'निश्चित वाटते करायलाच पाहिजे' असे जे एकूण १५८ उत्तरदात्यांचे मत आहे. यावरुन माना आदिवासी भौतिक सांस्कृतीच्या बदलाच्या बाबतीत सकारात्मक भूमिका वठवित आहेत व त्यांना ते योग्यही वाटत आहे. त्यांच्या विचारातील व आचारातील हे मोठे व महत्त्वाचे परिवर्तन आहे असे म्हणायला जागा राहते.

आदिवासी समाज आणि गोंदण यांचा फार जुना व अतुट संबंध आहे. मानवाला पूर्वीपासूनच नटण्या मुरडण्याची आवड आहे आणि त्यासाठी श्रृंगार ही संकल्पना निर्माण झाली. विविध प्रकारांनी आपला देह सजविणे आणि सुंदर दिसतो हे सर्वच समाजातील स्त्रीपुरुषांना आवडते. आधुनिक काळात तर श्रृंगाराच्या साधनांची मोठमोठी व महागडी दुकाने सजलेली दिसात. काही शहरातून मोठमोठया बाजारपेठा निव्वळ श्रृंगाराच्या साधनांच्या दुकानांनी सजलेल्या दिसतात तर बाजार, जत्रा, पर्यटन स्थळे इत्यादी ठिकाणीही निव्वळ श्रृंगाराच्या साधनांची दुकानेच अधिक प्रमाणात आढळतात. मध्यम व उच्चवर्गिय स्त्रीया या सर्वात जास्त श्रृंगारावर पैसे खर्च करतात. तर पुरुषही त्यामध्ये कमी आहेत असे वाटत नाही. याच भावनेतून मेहंदी लावणे व अंगावर गोंदण करुन कायमचे श्रृंगार करणे या बाबी समाजात प्रचलित झाल्या परंतु इतर समाजात गोंदण्याची पद्धत व आदिवाासी समाजातील गोंदण्याची पद्धत व कारणे यामध्येही फार तफावत आढळते. काही आदिवासी समाजात इतर स्त्रियांच्या संपूर्ण चेहऱ्यावर, हातांवर व पाठीवर, छातीवर गोंदण करुन घेतात. सुंदर दिसण्यापेक्षा त्यांना अधिकच विद्रूप केले गेल्याचे आढळते त्यामागे सुंदर दिसणाऱ्या स्त्रियांचे परपुरुषांच्या वाईट नजरेपासून व वाईट व्यवहारापासून संरक्षण करणे असाही एक उद्देश असतो.

परंतु माना आदिवासी समाजात मात्र अशी परिस्थिती दिसत नाही तर कपाळावर गोंदणाची टिकली, डोळयांच्या दोन बाजूला व हातावर विंचू, चुंबळ व गहू याप्रमाणे थोडक्यात गोंदवलेले दिसते. त्यामागे मृत्यूनंतर गोंदणच आपल्यासोबत जातो असा त्यांचा विचार आहे. त्यामुळे स्त्रियांसाठी गोंदवणे पूर्वी आवश्यक मानले जाई. याबाबतीत डॉ. गोविंद गारे व श्री उत्तमराव सोनवाणे यांच्या मते,'' शरीर प्रसाधना मध्ये शरीर गोंदवून घेणे हे आदिवासींला फार प्रिय आहे. बहुतेक आदिवासी स्त्री पुरुषाांची ती ईच्छा असते. किमान कपाळावर तरी गोंदवून घेतातच. यात्रांच्या ठिकाणी आदिवासी हजारोंच्या संख्येने जमून यात्रेची मजा लुटतात. या यात्रांना गोंदणारेही मोठया संख्येने येतात. गोंदणारे आदिवासी समाजातील असतात यात्रांच्या ठिकाणी एखादया कोपऱ्याची जागा निवडून आपली साधने आणि गोंदण्याचे कागदावरील नमुने घेऊन गोंदणारे बसतात. या नमुन्यांत झाडे, पाने, फुले, पशु, पक्षी यांचे आकार असतात.''[१०] पुढे गोंदण्याच्या पद्धतीबाबत ते म्हणतात, ''काही गोंदणारांकडे विदयुत घट असतात. त्यातून तयार होणारी वीज गोंदण्याच्या यंत्राला पुरवून सुई मागेपुढे सरकती ठेवली जाते. गोंदण्यासाठी झाडाच्या सालीचा रंग वापरतात. आगरिया स्त्रियांचे गोंदणे खास आदिवासी धाटाचे असते. त्या साधा उपयोग करतात. वास्तविक पाहता ही स्त्रीयांचीच कला आहे. मुलगे आणि मुली यांचे गोंदण स्त्रियांच करतात. सुई, पिन अगर झाडांचा काटासुद्धा गोंदण्यासाठी चालतो. निवडलेल्या नमुन्याप्रमाणे गोंदवयाच्या अंगावर सुईच्या टोकाने टोचतात व गोंदण काजळाने किंवा विशिष्ट अशा मातीने तेवढा भाग चोळतात. या जखमा त्यात भरलेल्या सालीच्या रंगामुळे सुकल्यानंतर गोंदण होतात. ही तसे पाहू जाता वेदना देणारी कला आहे.''[११] गोंदण ही वेदना देणारी कला आदिवासींनी वेदना सहन करुन जतन केलेली आहे.

अशाप्रकारे आदिवासी समाजाची आवडती कला व संस्कृती म्हणजे गोंदण आणि जवळचास सर्वच आदिवसींमध्ये ही कला दिसून येते. माना आदिवासींमध्ये या गोंदण्याच्या कलेबद्दल गोंदण्याच्या पद्धतीबद्दल जाणून घेणे संशोधिकेला आवश्यक वाटले. आधुनिकीकरणाच्या युगात ही वेदना देणारी कला खरोखरच आवश्यक आहे

काय? माना आदिवासींची याबाबतीत काय मते आहेत हे जाणून घेण्यासाठी ''अंगावर गोंदविण्याची पद्धत आपल्याला कितपत योग्य वाटते?'' असा प्रश्न विचारण्यात आला त्यांच्या प्रक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र ४**

**उत्तरदात्यांची गोंदण कलेविषयी मनोवृत्ती दर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पूर्ण योग्य | २८ | १४% |
| २ | अंशत: योग्य | ३४ | १७% |
| ३ | अयोग्य | ११० | ५५% |
| ४ | सांगता येत नाही | २८ | १४% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे निरिक्षण केल्यास आपल्याला असे निदर्शनास येते की, अंगावर गोंदविण्याची पद्धत पूर्ण योग्य आहे असे २८ (१४%) उत्तरदात्यांचे मत आहे. यात उत्तरदात्यांचा परंपरावादी दृष्टीकोन दिसून येतो. त्यांना अंगावर गोंदवून घेणे आवश्यक वाटते त्याचे कारण गोंदण ही ओळख आपल्या मृत्युनंतर सोबत जाते. शिवाय अडचणीच्या वेळी गोंदण ही कायमस्वरुपी ओळखच आपल्या कामी येते. व रितीरिवाजाप्रमाणे गोंदण नसल्यास त्या स्त्रिचे लग्न जुळण्यासाठी अडचणी जाते. हातावर वडीलांचे नाव व लग्नानंतर पतीचे नाव गोंदवले जाते. त्यामुळे कपाळावर व हातावर गोंदवणे आवश्यकच आाहे असे त्यांचे मत आहे. त्यांच्यामते हातावर नाव व कपाळावर टिकली गोंदवावी त्याने आपली ओळख राहते. त्यामुळे कुणाला गोंदविण्याची सक्ती न करता त्याला आवड आहे त्याने गोंदविल्यास हरकत नाही. संपूर्ण अयोग्य असे म्हणणारे महत्तम ११०(५५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते ही अतिशय वेदना देणारी कला आहे. आणि याचा तसा फारसा काही उपयोगही नाही असा सजन्यासाठी अनेक प्रसाधने

उपलब्ध आहेत. त्यामुळे आता अंगावर गोंदण करुन चेहरा उलट विद्रुप होतो, त्याचप्रमाणे अंगावर जखमा करुन गोंदणे संपूर्णपणे अयोग्य आहे असे उत्तरदात्यांना वाटते व माना समाजाचे हे वैचारिक मोठे परिवर्तन आहे असे म्हणायला हरकत नाही सांगता येते नाही, असेही उत्तरदाते २८ (१४%) आहेत त्यांना अंगावर गोंदतात एवढेच समजते ते चांगले की वाईट याबाबत त्यांना डोक्याला ताण देऊन विचार करणे आवश्यक वाटत नाही. किंवा ते देऊन तेवढा विचार करत नाही.

वरील विवेचनावरुन गोंदण्याच्या पद्धतीला अयोग्य म्हणणाऱ्यांची महत्तम संख्या पाहता त्यांच्यात हळूहळू सांस्कृतिक परिवर्तन होत आहे व त्यासाठी त्यांची सकारात्मक मानसिक तयारी होत आहे. असे म्हणायला जागा राहते.

वरील सारणी क्र. ४ ला अनुसरुनच सद्याच्या परिस्थितीत अंगावर गोंदण्याची आवश्यकता पडताळून पाहणे गरजेचे वाटते. जसे आधुनिक समाजात प्रत्येकाजवळ त्यांचे ओळखपत्र असते व त्यावरुन कुठेही गेलो तरी त्यांची ओळख पटते. त्याचप्रमाणे हातावर गोंदवलेल्या नावावरुन आदिवासींची ओळख पटते. त्यामुळे गोंदण हे आदिवासींचे ओळखपत्रच आहे. धावपळीच्या जगात ओळखपत्राची आवश्यकता व ते सतत सोबत असण्याची आवश्यकता आहे. परंतु गोंदण म्हणजे निव्वळ हातावर नसून ते चेहऱ्यावरही असते व मुख्य म्हणजे गोंदण ही अतिशय वेदना देणारी पद्धत आहे. त्यामुळे आजच्या परिस्थितीत त्यांची आवश्यकता व त्यासंबंधाने माना आदिवसींची मते जाणून घेण्यासाठी ''आजच्या परिस्थितीत अंगावर गोंदविणे आपल्याला गरजेचे वाटते काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र ५

## उत्तरदात्यांची सद्यापरिस्थितीत अंगावर गोंदणविषयक गरज असण्याबाबतची मनोवृत्ती दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २४ | १२% |
| २ | नही | १५० | ७५% |
| ३ | गोंदविल्यास हरकत नाही | २६ | १३% |
| ४ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की अंगावर गोंदविण्याची गरज आहे या अर्थाने होय म्हणणारे २४ (१२%) उत्तरदाते आहेत. त्यांच्यामते आजच्या परिस्थितीतही गोंदणे आवश्यक आहे. कारण त्यांच्या जमातीत गोंदण्याला महत्त्व आहे. तो एक विशेषत: स्त्रियांचा दागिना व रिवाजच आहे. त्यामुळे स्त्रियांनी गोंदलेच पाहिजे. हे पारंपारिक विचारसरणीचे उत्तरदाते असून ते संस्कृती बदलायला तयार नाहीत. तर गोंदविल्यास हरकत नाही असे २६ (१३%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्यांच्या मते परंपरा आहे म्हणून गोंदवायचे  परंतु त्यासाठी कुणावरही सक्ती करु नये त्यांची ईच्छा असेल तर मनाई ही करु नये परंतु आजच्या परिस्थितीत इतर ओळख व श्रृंगाराची साधने उपलब्ध असतांना उगीच वेदना करुन जखमा करुन अंगावर गोंदवून विद्रुप करण्यात काही अर्थ नाही व गरजही नाही अशी उत्तरे देणारे महत्तम १५० (७५%) उत्तरदाते आहेत हे उत्तरदाते नवीन आधुनिक विचारसारणीचे आहेत व ते जुन्या संस्कृतीत सुधारणात्मक परिवर्तन करायला तयार आहेत.

यावरुन माना आदिवासींच्या मतांत परिवर्तन होत आहे व संस्कृतीतील चुकीच्या व वाईट परंपरा बदलायला ते तयार होत आहेत हे एक सकारात्मक परिवर्तन होय असे आपल्या निदर्शनास येते.

‘‘सामाजिक परिवर्तन सांस्कृतिक परिवर्तन का केवळ एक भाग है। सांस्कृतिक परिवर्तन सामाजिक परिवर्तन की अपेक्षा अधिक विस्तृत है।’’[१२] यावरुन आपल्या लक्षात येते की संस्कृती आणि सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया एकमेकांशी संबंधित व एकमेकांवर अवलंबन असते संस्कृतीत परिवर्तन झाले तर आपोआपच सामाजिक परिवर्तन घडले जाते सामाजिक परिवर्तनाचा अर्थ सामाजिक संस्था या संदर्भाने घेतला जातो. समाजात विविध संस्था जसे कुटूंब, विवाह, जात, धर्म ईत्यादी समाजाच्या संस्कृतीचे वाहक असतात. आणि संस्कृतीमध्ये परिवर्तन घडतांना साहजिकच या संस्थांचे स्वरुप हळूहळू बदलायला लागते किंवा या संस्थांच्या कार्यामध्ये, सरचनामध्ये सूक्ष्मपणे बदल व्हायला लागतात. इतर लोकांच्या आधुनिक विचारांच्या संपर्कात येऊन परंपरावादी विचार बदलायला लागतात आणि सोबतच पूर्वापार चालत आलेल्या परंपरा व रितीरिवाजही बदलायला लागतात. हा बदल एकाचवेळी घेत नाही. त्याला बराच कालावधी लोटावा लागतो कारण परिवर्तन हा जरी सृष्टीचा नियम असला तरी मानवी स्वभाव मात्र परिवर्तनाला नकारच देतो. मानसाचा ‘स्थायीभाव’ स्वभावामुळे त्याला आहे त्या परिस्थितीतच राहावेसे वाटते कारण त्याला परंपरेने तशीच जगण्याची सवय झालेली असते व त्याच चौकटीत त्याला सुरक्षितता वाटत असते. यासंदर्भात डॉ. भोई व डॉ. बोबडे म्हणतात,’’ सामाजिक संस्थामध्ये घेणारे परिवर्तन सर्वसाधारणपणे मंद गतीने होत असते. याचे कारण संस्थात्मक वर्तनाचे आकृतीबंध पूर्वापार चालत आलेले असतात. त्याची नैतिक युक्तता व व्यावहारिक उपयुक्तता गृहीत धरलेली असते. पूर्वापार चालत आलेल्या वर्तन प्रकारांप्रमाणे वागताना व्यक्तीच्या मनात एक प्रकारच्या सुरक्षिततेची भावना असते. या सर्व कारणांमुळे लोक संस्थामुळे वर्तनाचे आकृतीबंध बाजूला ठेवून इतर पद्धतीने वर्तन करण्याचे टाळतात त्यामुळे समाजाची संस्थात्मक चौकट तशीच टिकून राहते.’’[१३]

मान समाजाच्या संदर्भात जानबा चौधरींची मुलाखत होतांना असे निदर्शनास आले की, पूर्वी माना जमातीत लोक अस्पृश्यता पाळीत ते महारांच्या हातचे म्हणजे अनुसूचित जातीच्या हातचे जसे (मांग,सहार इ.) शिजलेले अन्न खात नव्हते. व कोणत्याही कार्यक्रमाच्या प्रसंगी महार त्यांना कोरडे अन्न देत. सद्यस्थितीतही संशोधिकेची भेट अशा दोन माना आदिवासींशी झाली. त्यातील एक वयस्कर पुरुष महार जातीच्या शेतकऱ्याकडे गडीमाणूस म्हणून कामाला होता तो दिवसभर त्यांच्या शेतावर व घरी काम करायचा परंतु त्यांच्या घरचे मात्र कोणतेही शिजलेले अन्न खात नव्हता. शिवाय एक वयोवृद्ध स्त्रीही महारांच्या घरी काम करायची परंतु ती त्यांच्या घरचे कोणातेही पदार्थ खात नसे पाणीसुद्धा पित नसे. परंतु आता अधिकाधिक माना आदिवासींच्या बाबतीत असे आढळून येत नाही. ज्या ज्या गावात माना महाराजांची एकत्र वस्ती आहे तेथे दोन्ही समाज एकमेकांच्या घरी जातांना जेवतांना व समारंभातही एकत्र खाता पितांना आढळतात.

माना समाजातील अस्पृश्यतेबद्दल व काही निर्बंधाबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधिकेने केला. त्यासाठी आपण इतर जाती वा जमातींच्या हातून शिजवलेले अन्न खाता काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र ६**

**उत्तरदात्यांची अस्पृश्यता पालन व खानपान विषयक निर्बंधाबाबत**

**मनोवृत्ती दर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सर्व जाती जमातीच्या हातून शिजविलेले खातो | १९९ | ९९.५% |
| २ | काही विशेष श्रेष्ठ जाती जमातींच्या हातून शिजविलेले खातो | १ | ०.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | काही विशेष कनिष्ठ जाती जमातीच्या हातून शिजविलेले खातो | ०० | ००% |
| ४ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की सर्व जाती जमातींच्या हातून शिजविलेले खातो असे १९९ (९९.५%) उत्तरदात्यांचे मत आहे व काही विशेष श्रेष्ठ जाती जमातीच्या हातून शिजविलेले खातो असे केवळ ०१ (०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. हे उत्तरदाते परंपरावादी विचारसारणीचे आहेत. तर १९९ (९९.५%) उत्तरदाते जे सर्व जाती जमातीच्या हातून शिजविलेले अन्न खातो असे उत्तर देतात हे आधुनिक सुधारणावादी विचारसरणीचे व त्यांनी सर्वांशी जुळवून घेतलेले आहे.

आधुनिक युगात हॉटेल व्यवसाय झपाटयाने वाढत आहे. आणि काही प्रमाणात अस्पृश्यता व खाणपान निर्बंध हटविण्याचे काम मुख्यत: या हॉटेल व्यवस्थेनेच केले आहे असे आढळून येते आदिवासी समाजात अस्पृश्यता व खाणपान निर्बंध आढळून येत नाही. परंतु माना आदिवासींमध्ये ते पूर्वी प्रचलित होते. असे अनेक पुरावे प्रत्यक्ष संशोधिकेला आढळले.

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, माना आदिवासींत सध्या अस्पृश्यता पालन किंवा खाणपानाचे निर्बंध दिसून येत नाही हे एक सकारात्मक परिवर्तन आहे.

हिंदू धर्मात अनेक जाती आहेत आणि धर्म एकच असला तरी जातीजातींत अनेक निर्बंध आहेत खाणपानापासून स्पृश्य अस्पृश्येतेपासून तर रोटीबेटी व्यवहारा पर्यत सर्वकाही जातीतच करायचे असते. इतर जातींशी संबंध स्थापित करणे म्हणजे कामानिमित्त किंवा एखादया सार्वजनिक कामापुरतेच असते आधुनिक काळातही ही परिस्थिती फारशी बदलली असे म्हणता येणार नाही. स्वत: उच्चशिक्षित म्हणणारेही या चाकोरीच्या बाहेर जाऊन विचार करतांना आढळत नाहीत आणि एखादयाने असा विचार केला तर त्याचा आदर्श न मानता त्याला विद्रोही ठरविले जाते. त्यातही

आदिवासी जमात म्हणजे सुरुवातीपासूनच अलिप्त राहणारी आहे. त्यांचे सर्व व्यवहार त्यांच्या समूहातच केले जातात. परंतु वाढत्या संपर्क साधनाने व वाढत्या गरजांमुळे आदिवासी समुदाय सुद्धा आता इतर जातीजमातींमध्ये मिसळतांना आढळतात. त्यांचे परस्पर संबंध व्यवहारापूरते उरले नसून मैत्रिपर्यंत गेलेले आहेत. याला एक महत्वाचे कारण म्हणजे शाळा व महाविद्यालये होत जेथे सर्व जातीधर्माच्या मुलामुलींना समान शिक्षणाची संधी दिली जाते. तसेच कारखाने व उद्योगधंदे जेथे काम करण्यासाठी कुण्याही जातीधर्माची बंदी नसते त्यामुळे शाळांमध्ये लहानपणापासूनच एकत्र मिसळल्याने साहजिकच आता अलिप्तपणाची भावना कमी होत आहे गावातूनही शेताांवर मिळूनकामे करता करता आता सर्वांना मिळून राहण्याची सवय झाल्याचे दिसते. त्यामुळे पूर्वी प्रमाणे कट्टर जातीयवाद, खाणपान किंवा कार्यक्रम, समारंभ या दृष्टीने आढळून येत नाही.

या संदर्भाने माना समाज जो दुर्गम ग्रामीण भागात वास्तव्यास आहे त्यांचे गावातील व इतरत्र इतर जाती जमातीच्या लोकांसोबत कसेसंबंध आहेत हे जाणून घेण्यासाठी की, अजूनही ते अलिप्तच राहतात हे माहित करुन घेण्यासाठी, ‘‘इतर समूहांशी आपले संबंध कसे आहेत?’’ असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र. ७**

**उत्तरदात्यांची इतर समूहांशी असलेले संबंधदर्शक सारणी**

| **अ. क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | सलोख्याचे | १०१ | ५०.५% |
| २ | साधारण | ९९ | ४९.५% |
| ३ | संबंध नाहीत | ०० | ००% |
| ४ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |

| | | | |
|---|---|---|---|
| | **एकूण** | २०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, इतर समूहांशी सलोख्याचे संबंध आहेत. असे महत्तम १०१ (५०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्यांच्या मते सलोख्याचे म्हणजे चांगले मैत्रिपूर्ण संबंध आहेत व शेजारील इतर समूहांच्या विवाहादी समारंभात ते सक्रिय सहभाग घेतात व आपल्याही कार्यक्रमात इतर समूहाना सहभागी करुन घेतात तर साधारण संबंध आहे असे एकूण ९९ (४९.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. त्यांचे साधारण म्हणजे कामापूरते व्यवहारापूरते कामानिमित्त एकमेकांशी मिळून वागणे. इतर वेळी मात्र ते सर्व कार्यक्रम समारंभ आपल्या समूहातच साजरे करतात. किंवा समारंभात इतर समूहांना ते जेवणासाठी आमंत्रित करतात परंतु फार मैत्री करत नाही. परंतु तरीही गावांमध्ये राहणारे व इतर समूहांशी ते चांगले वागतात.

यावरुन असे निदर्शनास येते की, सद्यास्थितीत माना आदिवासी फार अलिप्त पणे आपल्याच समूहात राहत नाही तर इतर समूहांशी मिळून मिसळून वागतात व आता त्यांच्यात कोणतेही खाणपानाचे निर्बंध नाहीत.

कोणत्याही समाजात कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या व्यवसायाचा संबंध असतो. कोणत्या समाजात मद्यपान करण्याची प्रथा जास्त असते. तर कोणत्या समाजात निव्वळ तंबाखू खाणारेच अधिक असतात. काही समाजात पान खाणारेच दिसतात. तर काही समाजात बिडी पिणारेच जास्त दिसतात. एकमेकांचे अनुकरण व ज्या परिस्थितीत ते राहतात. ज्या प्रकारची कामे करतात त्यांचाही त्यांच्या व्यसनावर प्रभाव पडतो. काही समाजात पुरुषच नाही तर स्त्रियांनाही व्यसने असतात व त्यांना त्याचे वावगे वाटत नाही. ते ती गोष्ट सहज घेत असतात. आधुनिकीकरणाच्या नावाखाली तर आता सुरक्षित व उच्च आर्थिक स्तर असणारांमध्येही वाढते मद्यपानाचे प्रमाण आपल्याला आढळून येऊ लागले आहे आणि जणू काही ते प्रतिष्ठेचे मानण्यात येऊ लागल्याचे आपल्या निदर्शनास येते.

दुर्गम भागात राहणारे, शेतीची कामे मजुरीची, मेहनतीची कामे करणारे माना आदिवासी कोणती व्यसने करतात हे जाणून घेणे महत्वाचे ठरते. एखादया कार्यक्रम, समारंभाप्रसंगी मद्यपान करणे व नेहमीच पिणे, यात तफावत आहे. नेहमीच एखादी गोष्ट केल्याशिवाय चैनच पडत नाही त्याला व्यसन असे म्हणतात येईल माना आदिवासींतील व्यसनाबाबत जाणून घेण्याकरीता ''आपल्याला कोणकोणती व्यसने आहेत?'' असा प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. ८**

**उत्तरदात्यांच्या व्यसनविषयक स्थितीदर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पान | ०३ | १.५% |
| २ | तंबाखू | १०० | ५०% |
| ३ | सिगारेट — बिडी | ०२ | ०१% |
| ४ | मद्यपान | ०४ | ०२% |
| ५ | ठतर | ०२ | ०१% |
| ६ | तंबाखू, मद्यपान | ०० | ००% |
| ७ | तंबाखू, मद्यपान, सिगारेट बिडी | ०१ | ०.५% |
| ८ | सर्व | ०० | ००% |
| ९ | व्यसन नाही | ६५ | ३२.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, निव्वळ पान खाणारे एकूण ०३ (१.५%) उत्तरदाते आहेत निव्वळ सिगारेट बिडी पिणारे एकूण ०२ (१%) उत्तरदाते आहेत

निव्वळ मद्यपान करणारे ४ (२%) उत्तरदाते आहेत, याशिवाय इतर व्यसन करणारे ०२ (१%) उत्तरदाते आहेत तर तंबाखू मद्यपान व सिगारेट बिडी सर्वच व्यसन असणारे एकूण ०१ (०.५%) उत्तरदाते आहेत. परंतु सर्वाधिक तंबाखू खाणारे महत्तम १०० (५०%) उत्तरदाते आहेत तंबाखू हे स्वस्त व फार पुरातन मादक पदार्थ आहे आणि तो सहजासहजी आपल्याला उपलब्ध होऊ शकतो. शिवाय तंबाखूमुळे मित्र परिवारात झपाटयाने वाढ होते. स्त्रियांमध्येही तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ खाण्याचे प्रमाण मोठे आहे. आणि तंबाखू खाणे हे स्त्रियांनाही गैर वाटत नाही त्यामुळे तंबाखूचे व्यसन सर्वाधिक उत्तरदात्यांना आहे असे निदर्शनास येते. व्यसन नाही. असे म्हणणारे एकूण ६५ (३२.५%) उत्तरदाते आहेत. त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे.

यावरुन असे निदर्शनास येते की, माना आदिवासींमध्ये तंबाखू हा पुरातन मादक पदार्थ खाणारांचे प्रमाण अधिक आहे. जे कुठेही सहज उपलब्ध होते व वाहून नेता येते परंतु सध्याच्या युगात मात्र मद्यपान करणारांचेही प्रमाण वाढायला लागले आहे. त्यात आदिवासी आणि मद्यपान हा सहसंबंध जरी कित्येकांनी जोडला असला तरी देखील माना समाजाच्या बाबतीत हा अनुभव येत नाही असे वाटते मात्र समारंभ व कार्यक्रमप्रसंगीच मद्यपान करतांना अधिक लोक दिसतात. परंतु रोजच हे व्यसन म्हणून मद्यपान करण्यापेक्षा काम करता करता व इतरही वेळेला पटकन तंबाखू खाणे ते जास्त पसंत करतात.

# संदर्भ सूची


१. डॉ. देवगावकर श.गो. — राजकीय समाजशास्त्र पृ. १२
— मंगेश प्रकाशन नागपूर
प्रथमावृत्ती—१९९०

२. Young Pouline V. — Scientific Social Surverys and Research Fourth Edition. पृ.४९३
— Prentice Hall of India – Private Ltd. New Delhi.

३. Young Pouline V. — Scientific Social Survery and Research Fourth Edition. पृ.४९३
— कित्ता.

४. डॉ. गारे गोविंद — आदिवासी कलाविश्व पृ. ०५
चि. सोनवाणे उत्तमराव — महाराष्ट्र शासन आदिवासी संशोधन
— व प्रशिक्षण संस्था, पुणे.

५. डॉ. गारे गोविंद — आदिवासी कलाविश्व पृ. २०
श्री. सोनवाणे उत्तमराव — कित्ता

६. डॉ. देवगावकर श.गो. — राजकीय समाजशास्त्र पृ. १३
— मंगेश प्रकाशन नागपूर. १९९०

७. डॉ.गारे गोंविद — बदलांच्या उंबरठयावरील कोकणा आदिवासी पृ.३२९
— श्री विद्या प्रकाशन पुणे.

८. Kulkarni M.G. — Problems of of Tribal Development a Case study. पृ.३३५
— Parimal Prakashan Aurangabad.
— First published 1974.

९. महाराष्ट्र शासन — राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ शैक्षणिक आव्हानाकडून कृती कार्यक्रमाकडे पृ.३३३
— व.रा. नागपुर महाराष्ट्र राज्य शैक्षणिक
— संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे—३०

१०. डॉ. गोरे गोविंद — आदिवासी कलाविश्व पृ. ८१
श्री सोनवाणे उत्तमराव — कित्ता

११. डॉ. गोरे गोविंद — आदिवासी कलाविश्व पृ. ८१
श्री सोनवाणे उत्तमराव — कित्ता

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | तोमर रामबिहारी सिंह | — | सामाजिक परिवर्तन | पृ. ०६ |
| | | — | श्रीराम मेहरा ॲण्ड कंपनी आगरा | |
| | | — | प्रथमावृत्ती — १९६९ | |
| १३. | डॉ. भोईटे | — | सामाजिक संस्था | पृ. ११ |
| | डॉ. बोबडे | — | पिंपळापुरे प्रकाशन नागपूर | |
| | | — | प्रथमावृत्ती जून —१९९० | |

## ६.३ राजकीय संरचना व परिवर्तन

आदिवासी समाजजीवन व त्यांच्यातील होणाऱ्या परिवर्तनाचा विचार करतांना एक महत्त्वाची सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था म्हणून आपण राज्यसंस्थेचा व त्या संदर्भात सत्तापरिवर्तनाचा विचार करीत असतो. माणसाच्या संरचनात्मक गरजेच्या पूर्तीसाठी राज्यसंस्थेचा जन्म झाला. हर्बट स्पेन्सरने तर असे म्हटले आहे की, ''मनुष्याला आपल्या मानव बांधवाबद्दल वाटणारी भीती आणि त्या भितीपासून आपले संरक्षण करण्याची गरज यातूनच राज्यसंस्था मानव समाजात विकास पावली आहे.''[१]

आधुनिक काळात राजकारण हा सर्वांच्याच आवडीचा विषय आहे. व्यक्ति राजकारणी नेत्यावर जेवढा बोलतो तेवढा इतर विषयावर क्वाचित बोलतो. भारत हे सार्वभौमिक लोकसत्ताक व प्रजासत्ताक राज्य घेऊन आज ६५ वर्षे पूर्ण झालीत. न्याय, समता, बंधुता यावर अधिष्ठीत भारतीय समाजरचना निर्मितीसाठी देश कटिबद्ध आहे. गुरुनाथ नाडगोंडे यांच्या मते, ''दर पाच वर्षांनी प्रत्येक राजकीय पक्ष आपण या स्वप्नपूर्तीसाठी प्रयत्नशील राहू अशी वचने जाहिररित्या उगवत्या व मावळत्या सूर्याच्या साक्षीने देत असतो. पण सर्वसामान्यांच्या जीवनात फार काही स्वागतार्ह बदल होत नाही. उलट जीवनांच्या सर्वच आघाडयावर पराभूतांचे जिणे भारतीयांच्या वाटयाला आलेले आहे''[२] हे जरी खरे असले तरी आधुनिक काळात होणाऱ्या सततच्या निवडणुका, विविध राजकीय पक्षांच्या पक्षबांधणी इत्यादीमुळे राजकीयदृष्टया व्यक्तींचे विचारही परिवर्तीत होतांना दिसून येतात.

भारतात ब्रिटिशांचे राज्य प्रस्तापित होण्यापूर्वी बहुतांश खेडयामध्ये ग्रामपंचायती अस्तित्वात होत्या. खेडयातील शांतता व सुव्यवस्था टिकविणे, स्थानिक रहिवासी असणाऱ्या व्यक्तीमधील भांडणांच्या खटल्यामध्ये न्याय देण्याचे कार्य करणे इत्यादी विविध गोष्टींची जबाबदारी ग्रामपंचायतीवर होती. बहुतांश ग्रामपंचायती आपले कार्य अथवा जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडत होत्या अशाप्रकारे ग्रामीण समुदायाच्या जीवनात ग्रामपंचायतीची भुमिका अतिशय महत्त्वाची होती. परिणामी अनेक खेडयामध्ये

स्थानिक स्वरुपाच्या अनेक गोष्टी करण्याबाबत कोणतीही राजकीय यंत्रणा उपलब्ध नव्हती. म्हणूनच भारतीय राज्यघटनेत, ''स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण केल्या जातील असे नमूद केल्याप्रमाणे स्थानिक स्वराज्यसंस्था निर्माण करण्यासाठी व लोकशाही तत्त्वावर सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी पंचायतराज व्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय शासनसंस्थेने घेतला. त्यानुसार जिल्हापातळीवर जिल्हापरीषद, तालुका पातळीवर पंचायत समिती, व ग्रामपातळीवर ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय पंचायतराज योजना निर्माण करण्यात आली. लोकशाही विकेंद्रीकरण, जिल्हा तालुका स्तरावर स्थानिक स्वराज्य आणि लोकांची राज्यकारभाराशी अधिक जवळीकता या दृष्टीने पंचायत राज हे यथोचित पुढचे पाऊल आहे. तथापि पंचायत राज्य हे स्थानिक प्रतिनिधी राज्य आहे.''[३]

सन १९५७ मध्ये सामूदानिक विकास योजनेच्या कार्याचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी भारत सरकारने एक समिती नियुक्त केली. या समितीचे अध्यक्ष बलवंतराय मेहता बलवंतराय मेहता समितीने या योजनेच्या कार्याचा अभ्यास करुन शासनाला अहवाल सादर केला, ''जोपर्यंत स्थानिक ग्रामीण जनतेची योग्य अशी प्रतिनिधीक संस्था निर्माण करुन त्या संस्थेला द्रव्यबळ व अधिकार दिले जात नाही, तो पर्यंत विकास कार्यक्रमाबाबत स्थानिक जनतेत आस्था निर्माण होऊ शकत नाही.[४] अशी नोंद समितीने आपल्या अहवालात केली. स्थानिक संस्थांनी, लोकांनी समाज विकास कार्यक्रमात सहभागी व्हावे यात सामाजिक विकास कार्यक्रमातील उद्दीष्टात पंचायत राज हे पुढचे पाऊल आहे. यासंदर्भात व्ही. बी. पाटील लिहितात की,'' स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मुख्यत्वे करुन स्थानिक लोकांचाच सहभाग असतो. त्यांचा कारभार किंवा प्रशासन स्थानिक लोकांमार्फतच चालविले जाते. स्थानिक लोकांच्या प्रशासनातील सहभागामुळे या संस्थांच्या कारभारात कार्यक्षमता व पारदर्शकता येण्यात मदत होते.''[५]

खरे तर आधुनिक काळात यानिमित्ताने होणाऱ्या सततच्या निवडणुकामुळे राजकीय दृष्टया व्यक्तींचे विचार परिपक्व होतांना दिसतात. जसे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद, विधानसभा, लोकसभा व इतर संस्था संघटनांच्या निवडणुका ही नित्याचिच बाब झाली आहे. त्यातूनच राजकीय जागृती व राजकीय विचार प्रगल्भ

होतांना दिसतात. या बाबीला आदिवासी माना जमातसुद्धा अपवाद नाही हे नमुद करणे अगत्याचे आहे.

असे म्हटले जाते की,'' कोणत्याही देशामध्ये निर्माण होणारे सामाजिक, धार्मिक आणि राजकीय नेतेच त्या देशांना प्रगतीच्या मार्गावर नेणारे असतात. जर नेते चांगले असतील तर देश प्रगती करतो आणि नेता स्वार्थी असेल तर देश प्रगती करु शकत नाही.''[६] यावरुन समाजाच्या शक्तीसंरचनेत नेतृत्वाचे प्रमुख स्थान आहे. ''नेता हाच राजकीय संघटना आणि शक्तीसंरचनेला नवीन दिशा नि प्रवाह देत असतो. नेत्याची योग्यता व क्षमतेवरच शक्तीचा सदुपयोग व दुरुपयोग अवलंबून असतो. प्रत्येक समाजाच्या शक्तीसंरचनेत काही अशा व्यक्ति असतात की ज्या लोकांना प्रोत्साहीत करतात, प्रेरणा देतात, मार्गदर्शन करतात. अशा क्रियेला आपण नेतृत्व आणि अशा व्यक्तिंना 'नेता' शक्ती धारण करणारे, शक्तीमानव, शक्तीकेंद्र आणि, अभिजात' म्हणू शकतो.''[७] अशा व्यक्ति समूहामध्ये अन्य लोकांपेक्षा आपली भुमिका प्रभाव व सामाजिक शक्तीमुळेच वेगळया असतात. नेतृत्व ही सार्वभौमिक व विश्वव्यापी घटना आहे. जेथे जीवन आहे. तेथे समाज आहे जेथे समाज आहे तेथेच नेतृत्वही आहे. व्यकितची प्रतिभा आणि सामाजिक परिस्थिती मानवात नेतृत्वाची भावना जागृत करीत असते. प्रभाव आणि प्रभुत्वाने सुद्धा नेतृत्वाला जन्म दिला जाते. म्हणूनच वेबस्टरने नेत्याला एक मार्गदर्शक, एक चालक, एक प्रमुख, एक आज्ञादेणारा एक दल अथवा सर्व दलाचा प्रमुख व्यवहारात मत व कार्यात समोर जाणारा तथा दुसऱ्यांद्वारे अनुगमन करणारा इत्यादी रुपात परिभाषित केले आहे. तर लॅपीअर आणि फॅन्सीबर्थ यांच्या मते,'' नेतृत्व असे व्यवहार आहे की जे दुसऱ्या व्यक्तिंच्या व्यवहारांना त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रभावित करते की जे त्या दुसऱ्या लोकांचे व्यवहार नेत्याला प्रभावित करीत असते.''[८]

''एखादया व्यक्तिला इतर लोक आदर्श मानतात व म्हणून त्यांचे आदेश इतरांना मान्य होतात नेत्यांमध्ये असलेल्या गुणामुळे त्याला समुहातील लोकांची मान्यता मिळते व त्यांच्या सूचनांचा इतरांकडून स्विकार होतो. नेता व अनुयायी या दोघांचाही

एकमेकांच्या वर्तनावर परिणाम होत असतो. कारण दोघांचेही परस्पर संबंध लवचिक असतात. दोघांमध्ये परस्पर सहकार्य असते. अनुयायामध्ये नेत्याबद्दल आदर असतो. व नेताही आपल्या अनुयायांच्या विचारांची कदर करतो.''[९] याच पार्श्वभूमिवर माना या आदिवासी जमातीचा राजकीय आढावा प्रस्तुत शोधप्रबंधात घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. डॉ. देवगावकर लिहितात की, ''चंद्रपूर जिल्हयात गोंडाचा समावेश होण्यापूर्वीपासूनच माना हे राज्यकर्ते होते.''[१०] माना ही आदिवासी जमात असून वर उल्लेखील्या प्रमाणे या जमातीलासुद्धा राजकीय वारसा आहे हे जाणून घेण्यासाठी 'आपल्या जमातीचे एखादे संघटन आहे काय? असा एक प्रश्न राजकीय अभिवृत्ती जाणून घेण्यासाठी विचारण्यात आला. उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया पुढिल सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. १**

**उत्तरदात्यांच्या जमातीचे संघटन दर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११७ | ५८.५% |
| २ | नही | ४६ | २३% |
| ३ | माहित नाही | ३७ | १८.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन आपल्या जमातीचे संघटन आहे असे ११७ (५८.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. तर ४६ (२३%) उत्तरदाते नाही असे उत्तर देतात. नाही म्हणणाऱ्या उत्तरदात्यामध्ये बऱ्याच लोकांचा औपचारिक संघटना या दृष्टीने पाहण्याचा कल दिसतो, तर ३७ (१८.५%) उत्तरदाते याबाबतच तटस्थ आहेत. अर्थात राजकीय जाणीव जागृतीच्या संदर्भात बरीच मागे आहेत असे निदर्शनास येते. एकंदरीत वरील उत्तरदात्यांच्या एकंदरीत अभिप्रायावरुन माना जमातीची संघटना आहे आणि तिला

परंपरागत वारसा आहे व राजकीय पार्श्वभूमी आहे असे संशोधनकर्तीच्या निदर्शनास आले.

वरील सारणीक्रमांक १ नुसार आदिवासी माना जमातीत त्यांच्या जमातीचे संघटन आहे हे निष्पन्न झाले आहे. परंतु जामातीत एखादे संघटन उपलब्ध असणे व त्यासंघटनेचे सक्रीय सदस्यत्व स्विकारणे हया दोन गोष्टींमध्ये फरक आहे. अन्य फरक जाणून घेण्याच्या दृष्टीने' आपण या संघटनेचे सदस्य आहात काय? 'असा प्रश्न उत्तरदात्यांना विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. २

## उत्तरदात्यांचे माना जमातीच्या संघटनेच्या सदस्यत्वाचे स्विकारदर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ९४ | ४७% |
| २ | नही | ६३ | ३१.५% |
| ३ | सांगता येत नाही | ४३ | २१.५% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीत उत्तरदात्यांची माना जमातीच्या संघटनेच्या सदस्यत्वाचे प्रमाण दर्शविले आहे. संघटनेच्या सदस्यत्वाच्या स्विकाराला होय असे उत्तर देणारे ९४ (४७%) उत्तरदाते आहेत. तर नाही असे उत्तर देणारे ६३ (३१.५%) आहेत. अर्थात ही संख्यासुद्धा मोठी आहे. जमातींची संघटना ही एक अनौपचारीक संघटना असते व जवळपास सर्वच लोक हे त्या संघटनेचे सदस्य असतात. परंतु या संघटनांना सुद्धा औपचारिक स्वरुप प्राप्त होत आहे आणि औपचारीक संघटनेचे सदस्यत्व औपचारीकपणे स्विकारावे लागते. या औपचारीक स्विकाराची पूर्तता हेतु पुरस्स्सर उत्तरदात्यांकडून केल्या गेली नाही त्यामुळेच नकारात्मक उत्तरदात्यांची संख्या जास्त दिसते. याबाबत

आपल्याला काहीही सांगता येत नाही असे म्हणणारे ४३ (२१.५%) उत्तरदाते आहेत ही संख्या सुद्धा बरीच मोठी आहे.

वर उल्लेखिल्याप्रमाणे प्रत्यक्ष हेतुपुरस्पर जमाती संघटनेचे सदस्यत्व औपचारीकरित्या न स्विकारल्यामुळे नकारदर्शक उत्तर देणाऱ्यांची संख्या जास्त आहे. परंतु वास्तवात नकार दर्शविणारे सुद्धा अनौपचारीकरित्या त्या संघटनेचे सदस्य आहेत.

प्रस्तुत माना जमातीचे आणि त्यांच्या राजकीय सहभागाचे व आर्थिक विकासाचे अध्ययन करतांना पंचायत राज व्यवस्थेचाही विचार करणे आवश्यक ठरते. कारण माना जमातीला राजकीय वारसा लाभलेला आहे. ''पंचायत या शब्दाचा शब्दशः अर्थ पाच व्यक्तिचे मंडळ असा होतो. खेडयातील वयोवृद्ध आणि अनुभवी पाच व्यक्तीचे मंडळ खेडयांचा कारभार पाहत असतं आणि या व्यवस्थेला आदर्शाचे स्थान प्राप्त झाले होते. यावरुन पाचामुखी परमेश्वर असा वाक्प्रचार रुढ झाला. ग्रामीण पंचायत संस्था हया सामुहिक जीवनाचे केंद्र म्हणून कार्यरत होत्या''[११] लोकतांत्रिक सत्ता व शक्तीला सामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याचा पंचायत राज हा एकमेव मार्ग आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण याच योजनेत शक्य आहे. याशिवाय दिल्लीचे शासन गावागावात पोहोचू शकत नाही आणि ग्रामीण जनतेचा विकासही साधला जाऊ शकत नाही. माना जमातीची बहुल संख्या असणारी गावे विकासाच्या कोणत्या अवस्थेत आहेत हे पाहण्यासाठी संशोधिकेने गावात उपलब्ध असलेल्या नागरी सोयी सुविधावर लक्ष केंद्रीत केले. वारंवारीता पुढील सारणी दर्शविलेली आहे.

**सारणी क्र. ३**

**उत्तरदात्यांच्या गावातील नागरीसुविधादर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शासकीय नळयोजना (पाण्याची | १२ | ४६% |

| | | | |
|---|---|---|---|
| | टाकी) | | |
| २ | प्राथमिक शाळा | २६ | १००% |
| ३ | माध्यमिक शाळा | ७ | २६.९२% |
| ४ | महाविद्यालय | १ | ३.८४% |
| ५ | प्राथमिक दवाखाना | ६ | २३.७ % |
| ६ | गुरांचा दवाखाना | ५ | १९.२३% |
| ७ | इतर सोयी | १ | ३.८४% |
| | **एकूण** | **२६** | |

(**टिप :—** एकूण गावांतील उपलब्ध सोयींसाठी नागरीसुविधा गावांची संख्या वेगवेगळी आहे. त्यामुळे एकूण गावाच्या संख्येशी सोयींची टक्केवारी काढली आहे. त्यामुळे वारंवारीता व टक्केवारीची एकूण बेरीज जुळणार नाही.)

''प्रा. व्ही. बी. पाटील यांच्या मते,'' अशी बरीच क्षेत्रे आहेत. की जेथे पंचायत राज्याला अपेक्षित कामगिरी करता आलेली नाही. ग्रामीण जनतेला पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा महिलांना समान संधी, ग्रामीण जनतेच्या आरोग्याचे प्रश्न ग्रामीण स्वच्छता, ग्रामीण भागात चांगल्या वैद्यकिय सेवेची उपलब्धता, दर्जेदार शिक्षण, दुर्बल घटकांचा आर्थिक विकास इत्यादी बाबीचा या ठिकाणी आपणास उदाहरणा दाखल उल्लेख करता येईल. ग्रामीण जनतेचे वरील प्रश्न मार्गी लावण्यात पंचायत राज्याला फारसे यश मिळाले नाही असेच म्हणावे लागेल.''[१२]

वरील सारणीत निरनिराळया गावात उपलब्ध असलेल्या नागरी सुविधांची उपलब्धता दर्शविलेली आहे. पूर्वीसारखे आज प्रत्येक गाव स्वयंपूर्ण नाही. तर विकासाच्या दृष्टीने काही सुविधा हेतु पुरस्सर उपलब्ध करुन दयाव्या लागतात. त्या उपलब्ध सोयीवरुनच एखादे गाव विकासाच्या कोणत्या स्तरावर आहे हे लक्षात येते. पिण्याचे पाणी ही माणसाची आवश्यक गरज आहे. ती निसर्गाकडूनच पुरविली जात असली तरी त्यात बऱ्याच दोष अथवा त्रुटी आहेत ते दोष घालवण्यासाठी समाज व

शासन यांच्याद्वारे सुधारित पद्धतीने त्या सुविधा पुरविल्या जात आहेत. अध्ययनासाठी घेतलेल्या एकूण २६ गावांपैकी एकूण १२ (४६%) गावांमध्ये शासकीय नळयोजनेद्वारा पिण्याच्या पाण्याची सुविधा पुरविण्यात आली आहे. उर्वरित ५४% गावे ही नैसर्गिक संसाधनावरच अवलंबून आहेत. शिक्षण ही मानवाची आवश्यक गरज आहे आणि ते पुरविण्याची हमी शासनाने स्विकारली आहे. त्यानुसार प्राथमिक शाळा सर्वच २६ (१००%) गावांत असून प्राथमिक शाळांचे (इयत्ता ४ थी पर्यंत) हया केवळ ७ (२६. ९२%) गावांत उपलब्ध आहेत. त्यामुळे माध्यमिक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना इतर गावी जावे लागते. आदिवासींच्या महत्तम गावांमध्ये उच्च प्राथमिक (इयत्ता ५ ते ८)व माध्यमिक शिक्षणाची उपलब्धता नसल्यामुळे बाहेरगावी शिक्षणासाठी ये जा करण्यासाठी विद्यार्थी कंटाळतात त्यामुळे या समुदायात गळतीचे व स्थगितीचे प्रमाण हे अधिक आहे महाविवद्यालय हे अध्ययन क्षेत्रातील २६ गावांपैकी फक्त १ (३.८४%) गावात उपलब्ध आहे. आजचे देशपातळीवरील सर्वत्र उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध असतांनाही उच्च शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण केवळ ०६% आहे. त्या तुलनेत एवढया मोठया अध्ययन विश्व असलेल्या २६ गावांमध्ये केवळ १ महाविद्यालय असणे ही बाबसुद्धा या परिसरातील माना जमातीतील शैक्षणिक मागासलेपणाची साक्ष देते.

स्वास्थ सेवा ही सुद्धा माणसाची प्राथमिक गरज आहे. दवाखान्याच्या किमान सोयी ग्रामीण परिसरांपर्यंत पुरविता आल्या म्हणूनच भारतातील माणसांचे सरासरी आयुर्मान वाढलेले दिसते. त्यासाठीच या सुविधा पुरविणाऱ्या यंत्रण म्हणजचे प्राथमिक आरोग्य केंद्र ग्रामीण भागापर्यंत असणे गरजेचे झाले आहे. अध्ययन क्षेत्रातील २६ गावांपैकी केवळ ६ (२३.७%) गावांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा आहे. अर्थात ७७ % गावांमध्ये ही सुविधा आजही पुरविता आली नाही. ही बाबसुद्धा प्रस्तुत अध्ययन क्षेत्रातील माना जमातीच्या गावांचे मागासलेपण सिद्ध करते.

ग्रामीण परिसराचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. आजही आदिवासी लोक जनावरांच्या सहाय्यानेच शेती करतात. त्यामुळे जेवढे माणसांचे आरोग्य महत्त्वाचे आहे. तेवढेच जनावरांचेही आरोग्य महत्त्वाचे आहे. त्यासाठी ग्रामीण परिसरात गुरांच्या आरोग्य केंद्राचीही उपलब्धता असणे गरजेचे आहे. प्रस्तुत अध्ययन क्षेत्रातील केवळ ५ (१९.२३%) गावांमध्ये गुरांच्या दवाखान्याच्या सोयी उपलब्ध आहेत. उर्वरित ८१% गावांमध्ये हया सोयी उपलब्ध नाहीत. म्हणजेच आदिवासी माना जमातीची वस्ती असलेली गावे आजही शासनाच्या नजरेतून किती दुर्लक्षित आहेत याची साक्ष पटते. व माना जमातीचे मागासलेपण प्रत्ययास येते. त्याशिवाय अध्ययन क्षेत्राच्या निवडीत २६ गावांपैकी केवळ १ (३.८४%) गावात वरील सोयी व्यतिरिक्त इतर सुविधा उदाहरणार्थ बँक, विपणन केंद्रे इत्यादींची सुविधा उपलब्ध आहेत.

वरील सारणीद्वारे असे निदर्शनास येते की, आधुनिक तंत्रज्ञान आणि विशेषीकरणाच्या युगातही ज्या नागरी सुविधा अत्यावश्यक मानल्या जातात त्यांची किमान उपलब्धता सुद्धा आदिवासी मानांची बहुलता असलेल्या गावात दिसून येत नाही. ही बाब म्हणजे माना जमातीचे मागासलेपण विशद करणारी बाब ठरते.

संशोधन विश्वात माना जमातीचे नेतृत्त्व करणारे काही व्यक्ती आहेत काय याचा शोध घेण्याचा संशोधिकेने प्रयत्न केला. त्यात राज्यपातळीवर नेतृत्त्व करणारे डॉ. रमेश गजबे (माजी राज्यमंत्री), डॉ. मोहन गजभे, श्री वासुदेवराव धारणे (अध्यक्ष माना जमात मंडळ मुंबई), श्री अरविंद सांदेकर (समाजसेवक) स्थानिक पातळीवर नेतृत्व करणारे श्री. रामराव नन्नावरे (शिक्षक), श्री. भास्कर वाकडे (शिक्षक), श्री. भास्कर गायकवाड यांच्याविषयी अध्ययन विश्वातील उत्तरदात्यांच्या मनात अतिशय आदराची व नेतृत्वाची भावना आहे. ज्या लोकांकडे माना आदिवासी आदराने व विश्वासाच्या संदर्भात आशायुक्त नजरेने पाहताात. व त्यांना प्रतिनिधी म्हणून निवडून देतात. परंतु निवडून आल्यावर किंवा मानाचे स्थान प्राप्त झाल्यावर असे नेतृत्त्व अनुयायांसाठी काय करतात हा सुद्धा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. हे जाणून घेण्यासाठी, ‘‘आपल्या क्षेत्रात

निवडून आलेले अधिकारी निवडणुक झाल्यावरही कधी आपल्या अडचणी विषयी विचारणा करतात काय?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील प्रमाणे सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र. ४**

**उत्तरदात्यांचे राजकारणी पदाधिकाऱ्यांबाबत अनुभव दर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नेहमी | ०० | ००% |
| २ | कधी कधी | ४० | २०% |
| ३ | क्वचित | ५ | २.५% |
| ४ | कधीच नाही | १५५ | ७७.५% |
| ५ | यापेक्षा वेगळेउत्तर | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

स्वतंत्र भारतात १९५२ च्या सर्वात्रिक निवडणुका पहिल्यांदा जेव्हा झाल्या त्यावेळे लोकसमुदायाने लोकशाही पद्धतीने जनप्रतिनिधींना स्वतंत्र भारतात निवडून दिल्यानंतर नेत्यांची जी सामान्य जनांबद्दल कळकळीची व तळमळीची आस्था; आपुलकी, काळजी पाहायला त्यावेळी लोकांना मिळाली तिच तळमळ पुढील ६५ वर्षापर्यंत कमी कमी होत आल्याचे आपल्या लक्षात येते. विशेषत: जिथे आदिवासी आणि प्रामुख्याने संशोधन विश्व असलेल्या माना आदिवासी क्षेत्राचा विचार केला तर पदाधिकाऱ्यांना या आदिवासीबद्दल किती तळमळ आहे ही वरील सारणीवरुन आपल्या लक्षात येते.

वरील सारणीत दर्शविल्याप्रमाणे नेहमी असे उत्तर देणारे एकही उत्तरदाते सापडत नाहीत. म्हणजे कोणतेच पदाधिकारी नेहमी येऊन विचारपूस करीत नाही, अगदी गावपातळीवर गावात राहणारे व गावातून निवडून येणारे ग्रामपंचायत सदस्य सुद्धा

आपल्या छोटयाशा गावातील छोटयाशा वार्डातील लोकांची विचारपूस करीत नाही. उलट समस्या सांगितल्यावर अरेरावीने उलट उत्तर देतात किंवा बरेचदा टाळाटाळी करतात. असाही सुर उत्तरदात्यांकडून मुलाखती दरम्यान निघाला. ४० (२०%) उत्तरदात्यांनी कधी कधी येतात असे सांगितले ही संख्या पाहायला मोठी दिसत असली तरी पदाधिकाऱ्यांच्या येण्याची कारणे मात्र त्यांनी सांगितली की एखादा कार्यक्रम आयोजित करुन त्यांना निमंत्रित म्हणून बोलावले तरच येतात किंवा एखादी मोठी परिस्थिती उद्‌भवली तरच ते येतात व विचारपूस करतात क्वचितच येतात म्हणणाऱ्याची संख्या ०५ (२.५%) आहे. याचेही कारण वरीलप्रमाणेच आहे. तर 'कधीच नाही' असे म्हणणारे महत्तम १५५ (७७.५%) उत्तरदाते आहेत. ही संख्या फार मोठी आहे. निवडणुकी पूर्व सतत गावांमध्ये येरझारा घालणारे व हातजोडून नम्रपणे उभे असणाऱ्या लोकप्रितिनिधींना गावात कार्यक्रम करुन निमंत्रित करावे लागते किंवा एखादी मोठी घटना घडावी लागते तरच ते त्या क्षेत्रात येतात व लोकांची विचारपूस करतात ही बाब मोठया खेदाची व चिंतेची बाब आहे. असे निदर्शनास येते.

यावरुन सामान्य साध्याभोळया लोकांनी निवडून दिलेल्या नेत्यांचे व जनप्रतिनिधीचे निवडून येताच आदिवासी भागाकडे पाठ फिरवून स्वत:चाच विकास साधण्यासाठी शहराकडे जाण्याचा कल दिसतो असे म्हणावयास हरकत नाही.

सारणी क्र. ४ ला अनुसरुन आपण आपल्या गावातील अडचणी किंवा समस्या कोणाकडे सांगता? '' असा प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ५

## उत्तरदात्यांची अडचणी (समस्या) सोडविण्याविषयक मनोकृत्तीदर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतीकडे | १३० | ६५% |
| २ | पंचायत समितीकडे | ४ | २% |
| ३ | जिल्हापरिषदेकडे | १ | ०.५% |
| ४ | पदाधिकाऱ्यांना | ५ | २.५% |
| ५ | अधिकाऱ्यांना | ०६ | ३% |
| ६ | सांगतच नाही | ५४ | २७% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीद्वारे असे निदर्शनास येते की, आपल्या अडीअडचणी अथवा समस्या ग्रामपातळीवर ग्रामपंचायतकडे सांगतो असे एकूण १३० (६५%) उत्तरदात्यांचे मत आहे. यावरुन पूर्वापार चालत आलेल्या गावपातळीवरील पंचायतीचे महत्त्व आजही तसेच टिकून आहे असे लक्षात येते शिवाय लोकांना ग्रामपंचायत ही न्यायदानासाठी सर्वात जवळची संस्था आहे असेही वाटते. खरे म्हणजे ग्रामपंचायतीचे निवडून आलेले पदाधिकारी हे गावातूनच निवडलेले असल्याने लोकांना ते जवळचे वाटतात. त्याचप्रमाणे सध्या ग्रामपंचायतीला ग्रामविकासाकरिता अनेक अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे गावातील समस्या गावातच सोडवाव्या असे लोकांना वाटल्याने ते ग्रामपंचायतचा आधार घेतात. याशिवाय ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामसभेला विशेष अधिकार प्रदान केल्यामुळेही लोक ग्रामपंचयतीला अधिक महत्त्व देऊ लागले आहेत शिवाय गावातील आपल्याच सदस्यांसमोर समस्या मांडण्याची लोकांना भीती वाटत नाही हेही एक कारण आहे. त्यामुळेच ग्रामपंचायतीकडे समस्या सांगतो असे महत्तम उत्तरदाते म्हणतात. राजकारणाचा एक भाग म्हणून ''राबर्ट ढाल यानेही राजकारण समाजातील कोणत्याही

स्तरात आढळू शकते. केवळ राज्याच्याच स्तराला नव्हे असे म्हटले आहे. सत्ता कमी जास्त प्रमाणात सर्वच वापरित असतात.[१३] असे म्हटले आहे.

डॉ. श. गो. देवगावकरांच्या वरील म्हणण्यानुसार गावातही ग्रामसभेत निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांसोबत निवडून न आलेले परंतु गावातील वर्चस्ववादी व प्रतिष्ठीत लोकही तेवढयाच ताकदीने आपल्या मताचा वापर करीत असतात. व गावातील राजकारणात त्यांच्या अधिकाराचा वापर करतांना आपल्याला आढळतात. त्यामुळे ग्रामपातळीवर ग्रामपंचायतीकडे समस्या अथवा अडचणीचे निरसन करण्यासाठी धाव घेणाऱ्यांची संख्या जास्त दिसते. पंचायत समितीकडे सांगतो असे ४ (२%) उत्तरदाते म्हणतात. तर जिल्हापरिषदेकडे सांगतो असे १ (०.५%) उत्तरदाते सांगतात. याचे कारण अथवा त्या समस्या पंचायत समिती किंवा जिल्हापिरषद यांच्याच पातळीवरच्या असतील तर पंचायत समिती अथवा जिल्हापरिषदेकडे जाण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. आणि म्हणून त्यांना नाईलाजाने तिकडे जावे लागते.

पदाधिकाऱ्यांना समस्या सांगतो असे ५ (२.५%) व अधिकाऱ्यांना सांगतो असे ६ (३%) उत्तरदात्यांचे मत आहे. याचा अर्थ असा की निवडून येणाऱ्या पदाधिकाऱ्यांविषयी लोकांच्या मनात आशा व अपेक्षा आहेत व पदाधिकारी किंवा कार्यालयीन समस्या असेल तर अधिकारी मग ते पंचायत समितीचे असोत किंवा तहसिल वा जिल्हापरिषदेचे असो आपल्या समस्या सोडवतील अशी साध्याभोळया लोकांची आशा असते. त्यामुळे ते त्यांच्याकडे जाऊन अडचणी तोंडी अथवा लेखी स्वरुपात सांगतात. आदिवासीविषयी ठेविले तैसेची अनंते राहावे' अशी एक उक्ती प्रचलित आहे. त्यामुळे जे जे मिळाले ते ते नशिब म्हणून स्वीकारणे, जीवनाविषयी कमी अपेक्षा बाळगणे, पोटापुरताच विचार करणे व अपेक्षाच कमी असल्याने समस्यांना तोंड देतांना त्यांना तो जीवनाचा भागच आहे. असे वाटते त्याचा पुरावा म्हणून ५४ (२७%) उत्तरदाते कोणाकडेच समस्या सांगत नाही असे उत्तर देतात. खरे पाहता ही संख्या ही

काही कमी नाही. या उत्तरदात्यांमध्ये निराशावादी वृत्ती अथवा नैसर्गीक निमूटपणे जीवन जगण्याची वृत्ती दिसून येते.

यावरुन सर्व समस्यांना निमूटपणे नशिबावर हवाला देऊन सहन करण्याची दैववादी वृत्ती आदिवासींमध्ये उपजतपच दिसते व ती माना आदिवासीमध्येही आढळते असे निदर्शनास येते पंतु बदलत्या काळानुसार आता माना आदिवासी जागृत होऊ लागला आहे. भांडू लागला आहे व त्यासठी तो काही प्रमाणात समस्या सांगण्यासाठी धाडस करु लागला आहे. हे १३० उत्तरदाते ग्रामपंचायतीकडे समस्या सांगतात यावरुन निदर्शनास येते. हे एक सकारात्मक परिवर्तन माना आदिवासींमध्ये दिसून येत आहे.

सध्या गावागावांतून महात्मा गांधी तंटामुक्त समित्यांची स्थापना झालेली आहे. गावातील पूर्वापार चालत आलेली ग्रामपातळीवरील ग्रामपंचायत पद्धती लोकांना जवळची वाटते त्यामुळे लोकांना झटपट न्याय मिळतो व लोकांचा वेळ व पैसा ही वाचतो. त्यामुळे शासनाने तंटामुक्त समित्यांची स्थापना गावोगावी केली आहे. गावातील वैयक्तिक अथवा सामुहिक पातळीवरील भांडणतंटे सोडविण्यासाठी प्रत्येक वेळी पोलीस स्टेशनमध्ये लोक जात असत. त्यामुळे त्यांचा वेळ तर जाई परंतु त्यांना लांबलचक न्यायलयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागे तसेच पोलीसांच्या आर्थिक व मानसिक छळालाही सहन करावे लागे व भोळया भाबळया जनतेला अतोनात त्रास सहन करावा लागे त्यामुळे आता तंटामुक्त समिती म्हणजे पूर्वीची पंचायत पद्धतीच होय. परंतु आता तिला कायदयाचा आधार प्राप्त झालेला आहे.

याच पार्श्वभूमिवर माना आदिवासींची मते जाणून घेण्यासाठी ''घरी अथवा समूहात भांडण तंटा झाल्यास आपण कोणाकडे न्याय मागता?'' असाही एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ६

## उत्तरदात्यांची न्यायमागणी पद्धत दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | न्याय मागत नाही | ०५ | २.५% |
| २ | स्वत:च न्याय करतो | १५ | ७.५% |
| ३ | न्यायपंचायतीकडे जातो | ०० | ००% |
| ४ | जात पंचायतीकडे जातो | ५ | २.५% |
| ५ | तंटामुक्ती समितीकडे जातो | १६८ | ८४% |
| ६ | पोलीस स्टेशनमध्ये जातो | ७ | ३.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीद्वारे असे लक्षात येते की, गावातील न्यायपंचायती आता रद्दबातल ठरल्या आहेत. न्यायपंचातीकडे न्याय मागण्यासाठी जातो असे एकाही उत्तरदात्याने सांगितले नाही यावरुन गावपातळीवरील पूर्वी चालणाऱ्या न्यायपंचायती आता कालबाहय झाल्याचे निदर्शनास येते मात्र जात पातळीवर अजूनही जात पंचायती किरकोळ स्वरुपात अस्तित्वात आहेत. निदान आदिवासी समुदायात तरी त्यांचे अस्तित्व आहे असे निदर्शनास येते. त्याचे कारण असे की जात पंचायतीकडे न्याय मागण्यासाठी जातो असे एकूण ५ (२.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. आणि ही संख्या लक्षात घेण्यायोगी आहे. स्वत:च्या घरी न्याय करतो असे १५ (७.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. घरोघरी मातीच्या चुली या म्हणी प्रमाणे घर आहे तिथे भांडण तंटा होणारच त्यामुळे घराची बाजारी चव्हाटयावर जाऊ नये असे वाटून घरच्या वरीष्ट मंडळी किंवा इतर नातेवाईकांच्या मध्यस्तीने घरची वा समूहातील भांडणतंटेही घरीच सोडवतो व स्वत:च न्याय करतो असे या उत्तरदात्याचे म्हणणे आहे.

काहीवेळा घरी किंवा गावात न्याय मिळाला नाही किंवा न्याय मिळणार नाही असे वाटून पोलीस स्टेशन मध्ये जावेच लागते. त्यामुळे घरी अथवा समुहात भांडण तंटा झाल्यास पोलीसस्टेशनमध्ये जातो असे ७ (३.५%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. परंतु सध्या कोणत्याही केसेस तंटामुक्ती समितीच्या माध्यमातूनच पोलीसस्टेशनमध्ये येऊ दया किंवा तंटामुक्ती समितीत जर न्यायनिवाडा झाला नाही तर पोलीसस्टेशनमध्ये केस जाऊ दया असे नियम असल्यामुळे मोठया गुन्हांसाठी किंवा तंटामुक्ती समितीत न्यायनिवाडा न झाल्यास पोलीसस्टेशनमध्ये तक्रार नमुद केल्या जाते. परंतु वरील उत्तरदात्यांचा तंटामुक्ती समितीवर किंवा जात पंचायतीवर विश्वास नसावा व म्हणून ते पोलीसस्टेशनमध्ये जात असावे असे संशोधिकेला वाटते.

तंटामुक्ती समितीकडे जातो असे महत्तम १६८ (८४%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे व ही संख्या लक्षात घेण्यासारखी आहे त्यामुळे गावागावांतील महात्मा गांधी तंटामुक्ती समितीचे महत्त्व वाढत आहे. असे निदर्शनास येते. परंतु त्याहीपलीकडे जाऊन अल्पसंतुष्टी असणाऱ्या माना आदिवासी समुदायात विशेषत: भांडण तंटे जास्त प्रमाणात होत नाहीत असेच निदर्शनास येते, दिवसभर ढोर मेहनत करुन रात्री चटणीभाकर पोटभर खाल्यावर खाटेवर पडताच गाढ झोप घेणे व पुन्हा दुसऱ्या दिवशी कामावर जाणे हेच माना आदिवासींचे कार्य असल्यामुळे विनाकारणच्या भांडणतंटयांना वावच मिळत नाही असेही म्हणावयास जागा राहते. परंतु तरीही जातपंचायत व पोलीसस्टेशन पेक्षा तंटामुक्तीसमितीवर लोकांचा विश्वास बसायला लागला आहे आणि हे एक सकारात्मक परिवर्तन आहे असे जाणवते.

एकूण ५ (२.५%) उत्तरदाते न्याय मागत नाही असे म्हणतात त्यांचे म्हणणे असे की न्याय मागुनही आम्हाला न्याय मिळत नाही. त्यामुळे वेळ व पैसा वाया घालवण्यात अर्थ नाही. त्यापेक्षा भांडणतंटा करायचा नाही अथवा झाला तरी आपसी समझोता करायचा किंवा अन्याय झाला तरी निमूटपणे सहन करायचा व चुपचाप आपली कामे करायची त्यामुळे आम्ही न्याय मागत नाही असे त्यांचे म्हणणे आहे ही संख्या जरी

कमी असली तरी त्यामुळे लोकशाहीतील न्यायप्रक्रियेवर बोट ठेवण्यास जागा राहते व प्रश्नचिन्हही लागते त्याचप्रमाणे मुळातच इतर आदिवासींप्रमाणे माना आदिवासीही शांतता प्रिय आहेत व ते नैसर्गिक पद्धतीने जीवन जगणे पंसत करतात. परंतु आता ते बदलत्या काळानुसार भांडण तंटे करण्यास प्रवृत्त होतांना दिसतात व आपल्यावर झालेल्या अन्यायाची दाद मागण्यासाठी शासकिय यंत्रणेकडे धाव घेतांना दिसतात. माना आदिवासीमधील खरोखरच हे जागृतीचे लक्षण व सकारात्मक परिवर्तन आहे असे म्हणता येते.

''संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत १९४८ मध्ये जाहीरनामा घोषित केला. त्याचवेळी मानवी हक्क आयोगाला मानवी हक्कांचा करारनाम्याचा आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणेचा मसुदा अग्रहक्काची बाब समजून तयार करण्याची कामगिरी सांगितली.''[१४] भारतीय संविधाानात निवडणुकीचा वापर करुन लोकशाही पद्धतीवर आधारित राज्य चालविण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मतदानाचा अधिकार प्राप्त करण्याकरीता कुणालाही धर्म, वंश, जात, लिंग यावरुन नाकारता येणार नाही अशीही तरतूद करण्यात आली आहे. भारतीय संविधानात नमुद केल्यानुसार, ''३२६ लोकसभा व प्रत्येक राज्याच्या विधानसभेच्या निवडणूका प्रौढ माधिकारांच्या आधारे होतील. म्हणजे जी जी व्यक्ती भारताची नागरिक आहे आणि समुचित विधानमंडळाने केलेल्या कोणत्याही कायदयाद्वारे किंवा त्याखाली त्या संबंधात निश्चित करण्यात येईल अशा दिनांकास (अठरा वर्षाहुन) कमी वयाची नाही व या संविधानाखाली किंवा समुचित विधानमंडळाने केलेल्या कोणत्याही कायदयाखाली आदिवास, मनाची विकलत, गुन्हा अथवा भ्रष्ट किंवा अवैध आचरण या कारणावरुन अन्यथा अपात्र ठरलेली नाही, अशी प्रत्येक व्यक्ती अशा कोणत्याही निवडणुकीत मतदार म्हणून नोंदवली जाण्यास हक्कदार असेल''[१५] मतदान करणे हे सर्वश्रेष्ठ दान असून मतदान करणे म्हणजे मेल्यात जमा होणे अशीही एक म्हण आहे. त्यामुळे सुशिक्षित व मोठमोठया पदावर असलेल्या व्यक्तिपेक्षा साधारण, वयोवृद्ध निरक्षर लोकांमध्येच मतदानाचा अधिकार व कर्तव्य बजावण्याची वृत्ती आपल्याला सर्वत्र दिसून येते. मतदान करुन आपल्याला योग्य

वाटणाऱ्या उम्मेदवारांला आपला प्रतिनिधी बनवून कायदेमंडळात पाठविणे व स्वतःचे व देशाचे संरक्षण व विकास करणे हा महत्वपूर्ण उद्देश मतदानाचा आहे. त्यामुळे प्रत्येक स्तरावरील निवडणुकीत मग ती ग्रामपंचायत असो किंवा लोकसभेसाठीची निवडणुक असो प्रत्येक वेळी आपले अमुल्य मतदान करुन योग्य अशा प्रतिनिधीला निवडून देणे हे सर्व नागरिकाचे प्रथम कर्तव्य ठरते. त्याचप्रमाणे 'लोकशाहीच्या इमारतीच्या पायांचे दगड म्हणजे मतदान' अशीही व्याख्या मतदानाच्या संदर्भात करता येईल. म्हणून अशीही व्याख्या मतदानाच्या संदर्भात करता येईल. म्हणून मतदानाचे महत्त्व अनन्य साधारण आहे हे आपल्या लक्षात येते. योग्य मतदान योग्य निवड व योग्य निवड म्हणजे देशाचाच व पर्यायाने सर्वांचा विकास होय.

मान आदिवासीमध्ये मतदान करण्याच्या कर्तव्याबद्दल व अधिकाराबद्दल किती जागरुकता आहे. हे जाणून घेण्यासाठी ''आपण दर निवडणुकीत मतदान करता काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. लोकशाहीवर निष्ठा जाणून घेण्याचाही एक उद्देश त्यामागे होता. त्याच्या प्रतिक्रिया पुढिल सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ७

## उत्तरदात्यांचा मतदान विषयक दृष्टीकोन दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नेहमी मतदान करतो | २०० | १००% |
| २ | कधी कधी करतो | ०० | ००% |
| ३ | कधीच करत नाही | ०० | ००% |
| ४ | मतदानावर विश्वास नाही | ०० | ००% |
| ५ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

सुशिक्षित व उच्च जातीच्या वर्गात आदिवासींना निरक्षर म्हणून हिणवीले जाते. मागासलेले या अर्थी आदिवासी शब्दाचा वापर करुन त्यांची थटटा केली जाते परंतु जेव्हा मतदान करण्याची वेळ येते तेव्हा मतदानाचे कर्तव्य बजावण्यास हेच लोक टाळाटाळ करतांना आढळतात. मात्र वरील सारणीवरुन असे लक्षात येते की खरी लोकशाहीची धुरा या तळागाळातील लोकांवरच टिकून आहे. कारण मतदानाला अधिकार नाही तर कर्तव्य समजून काटेकोरपणे ते बजावणारे लोक हे सर्वसाधारण, मागसलेले, तळागाळातील लोक आहेत. आदिवासी समुदायही त्याला अपवाद नाही. नेहमी मतदान करतो असे संपूर्ण २०० (१००%) उत्तरदात्यांनी उत्तर दिले आणि त्यात खरोखरच कोणताही बनावटपणा आढळला नाही. कारण अगदी खाटेवर पडलेला म्हातारा किंवा म्हातारीलासुद्धा पाठीवर मांडून मतदान करायला नेतानाचे चित्र आपण टि.व्ही च्या माध्यमातून पाहत असतो. त्यामुळे मतदानाच्या कर्तव्याबाबत माना आदिवासी समाज जागृत आहे. असे निदर्शनास येते.

भारतीय लोकशाही पद्धतीमध्ये मतदानाचा अधिकार देतांना व्यक्तिच्या सुरक्षिततेची हमी देण्यासाठी 'गुप्त मतदान' कोणालाही कळू नये, त्याचप्रमाणे मतदाराची ईच्छा आपले मत गुप्त ठेवण्याची असली तर त्याने कोणला मतदान केले हे कोणालाही कळता कामा नये, तरच मतदार निर्भिडपणे मतदान करतील

तरीही भारतीय समाजात मग तो ग्रामीण असो वा शहरी, कुटुंबात मतदान कोणाला करायचे यावर चर्चा केली जाते. कारण प्रत्येक कुटुंबात घरचे प्रमुख व्यक्ति ज्याला सांगतील त्यालाच मतदान करण्याची पद्धत प्रचलित असल्याचे आपल्या नेहमीच निदर्शनास येते. घरातील प्रमुख व्यक्तिंचे काही आवडीचे राजकीय पक्ष असतात किंवा उमेदवार असतात. त्यांना मतदान करायचे असे ठरल्यावर आपल्या कुटुंबाचेही मतदान इतर कोणाला जाऊ नये असेही कुटुंबातील प्रमुख्यांना वाटत असते. शिवाय भारतीय समाजात साधारणत: सामाजिक निर्णय हे समूहाने घ्यायचे अशीही एक पद्धत प्रचलित झाल्याचे दिसते. विशेषत: ग्रामीण समुदायात व शहरातील सामान्य वस्त्यांमधून

ही पद्धत विशेषकरुन असते. त्यामुळे समुहाच्या पुढाऱ्यांना देखील आपल्या समूहाचे मत एका ठराविक उमेद्वारालाच जावे असे वाटत असते. त्यात त्या पुढाऱ्याचे राजकीय संबंध व कधीकधी सामाजिक तसेच वैयक्तिकही हित लपलेले असते सध्याच्या निवडणुक पद्धतीत तर ग्रामीण भागातून निवडणुकीपूर्वीच उमेदवारांसोबत जातीय समुहासाठी देऊळ, बांधणे, भांडे, लाऊडस्पीकर इत्यादी किरकोळ बाबी किंवा थोडीशी रोख रक्कम इत्यादी असते. आणि अशा अटींवर त्या उमेदवाराला मतदान करण्याचे ठरते. त्यामुळे मतदान करतांना कुटुंबातील इतर सदस्य कुटुंबप्रमुखाचा व कुटूंबप्रमुख हा समुह प्रमुखाचा सल्ला घेतांना निदर्शनास येतात.

मांना आदिवासीं हा ग्रामीण समाजाचे एक अंग आहे ते ही या प्रक्रियेत सामील आहेत की मतदानाचा १००% हक्क व कर्तव्य बजावतांना ते कोणाचा सल्ला घेतात? त्यांना गुप्त मतदान व मतदानाच्या स्वतंत्र्य अधिकाराची संकल्पना समजतात कामी किंवा त्यांच्या साध्याभोळेपणाचा फायदा राजकारणी व समाजातील पुढारलेल्या व्यक्ति किंवा इतर उच्च भ्रू समजल्या जाणाऱ्या जाती संस्था करुन घेतात काय? त्यांना भूलथाप देऊन त्यांची मते विकत घेतात काय? अशाप्रकारच्या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी व त्याबाबत माहिती जाणून घेण्यासाठी ''मतदान करतांना कोणाचा सल्ला घेता?'' असाही प्रश्न विचारण्यात आला. त्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

**सारणी क्र. ८**

**उत्तरदात्यांची गुप्तमतदान विषयक दृष्टीकोन दर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वत:चा | १३७ | ६८.५% |
| २ | कुटुंबातील सर्वांचा | २१ | १०.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | जमातीच्या नेत्यांचा | ३९ | १९.५% |
| ४ | ठतरांचा | ०३ | १.५% |
| ५ | सल्ला घेत नाही | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीचे निरिक्षण केल्यास असे लक्षात येते की, महत्तम एकूण १३७ (६८.५%) उत्तरदाते स्वत:च्या मताने मतदान करतांना आढळतात. यामध्ये कुटुंबप्रमुख, सुशिक्षित व्यक्ति व काही स्वनिर्णय घेणारे उत्तरदाते आहेत ही संख्या लक्षात घेण्यासारखी आहे. त्यांना गुप्त मतदानाचे महत्त्व कळलेले आहे. किंवा जे कोणाला मतदान करायचे याचा स्वत: निर्णय घेऊ शकतात यात विशेषत: पारंपारिक एकाच पक्षाच्या प्रभावाखाली असणारे बरेच जण आहेत. त्यांना वाटते की आमच्या जातीसाठी हा पक्ष आहे आणि त्याचे चिन्ह त्यांना माहित आहे. मग कोणताही उमेदवार उभा असो त्याच्याशी त्यांना घेणे देणे नसते त्यांचा एक ठराविक पक्ष असतो. कधी कधी ते उमेदवाराच्या प्रभावाखाली पैसे अथवा वस्तू देणारा उमेदवार निवडल्या जातो त्यामुळे त्यांना स्वत:च्या मताने मतदान करता येते व ते करतात.

कुटुंबातील सर्वांच्या सल्ल्याने मतदान करतो असे २१ (१०.५%) उत्तरदात्यांचे मत आहे यात विशेषकरुन स्त्रीमतदारांचा समावेश आहे. कारण कुटुंबप्रमुख सांगेल त्याला मतदान करणे त्या आपले कर्तव्य समजतात. कुटुंबप्रमुख जो निर्णय घेतो तोच योग्य व तोच उमेदवार निवडून येणार त्यामुळे आपले मत वाया जाऊ नये अशी त्यांची विचारसरणी बनलेली असते. म्हणून त्या स्त्रिया कुटुंबातील सर्वांच्या सल्ल्याने मतदान करतात. जमातीच्या नेत्यांचा सल्ला घेतो असे एकूण ३९ (१९.५%) उत्तरदाते सांगतात. यात विशेषत: कुटुंबातील तरुण मंडळी अधिक असतात. त्यांना समूहाचे भान असते व ते समूहासाठी एकत्र निर्णय घेतात. त्यामुळे जमातीच्या नेत्यांचा निर्णय जमातीच्या कल्याणासाठी योग्य आहे असे मानून ते त्यांच्या प्रभावाखाली मतदानाचा अधिकार बजावतात. या गोष्टीने विशेषत: जाती व जमातीच्या वर्ग भेदाला बळकटी

देण्याचे कार्य केले जाते. पंचायत राज व्यवस्थेच्या संदर्भात प्रा. व्ही. बी पाटील यांच्या मते'' ग्रामीण समाजातील पुढारलेल्या जातींनी आपल्या संख्याबळाच्या आणि आर्थिक शक्तीच्या जोरावर पंचायत राज्य संस्थांमध्ये प्रमुख सत्तस्थाने काबिज केली आहेत. पंचायत राज्याने या अर्थानेही ग्रामीण समाजातील जाती व्यवस्थेला बळकटी आणण्यास हातभार लावला,''[१६] त्यामुळे ३९ (१९.५%) उत्तरदाते हे जमातीच्या नेत्यांचा सल्ला घेतात ही बाब ही विचार करण्यासारखी आहे. इतरांच्या सल्ल्याने म्हणजे ज्यांच्या कुटुंबात कोणी प्रमुख कर्ता पुरुष नाही अशा लोकांना किंवा जे लोकांचे पाहून कामे करतात अशा उत्तरदात्यांत ०३(१.५%) उत्तरदात्यांनी आम्ही इतरांच्या सल्ल्याने मतदान करतो असे सांगितले त्यांना मतदान हा स्वत:चा अधिकार आहे हे समजत नाही किंवा कोणाला मतदान करायचे याबाबतीत ते अनभिज्ञ असतात. बरेचवेळा आदिवासी लोक शेतात पिकांच्या राखणीसाठी झोपडया बांधून राहतात. त्यामुळे गावाशी त्यांचा विशेष संबंध येत नाही. त्यामुळे मतदानाच्या दिवशी त्यांना कोणाला मतदान करावे यासाठी इतरांचा सल्ला घ्यावा लागतो.

वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की मतदान हा जरी गुप्त, स्वतंत्र अधिकार व कर्तव्य असले तरी त्याचा संबंध आपल्या समूहाशी व समूहाच्या हितासाठी जोडला जातो. त्यामुळे माना आदिवासींमध्ये स्वतंत्र हितापेक्षा समूहाच्या हिताला अधिक महत्व दिले जाते ही बाब प्रकर्षाने जाणवते.

सारणी क्र. ८ ला अनुसरुनच ''मतदान करतांना कोणते निकष ठेवता?'' म्हणजे उमेदवाराच्या बाबतीत आपली काय अपेक्षा असते हे माहित करुन घेण्यासाठी वरील प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ९

## उत्तरदात्यांच्या मतदानासाठी योग्य उमेदवार निवड विषयक मनोवृत्ती दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चांगला उमेदवार | १०७ | ५३.५% |
| २ | जमातीचा उमेदवार | २१ | १०.५% |
| ३ | पक्षाचा उमेदवार | ६१ | ३०.५% |
| ४ | यापेक्षा वेगळे उत्तर | ११ | ५.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, १०७ (५३.५%) उमेदवार चांगला उमेद्वार निवडतो म्हणून उत्तर देतात. त्यांच्या चांगल्या उमेदवाराची संकल्पना म्हणजे तो सामाजिक कार्यकर्ता असतो. लोकांच्या ओळखीचा असतो. त्याने लोकांना वारंवार मदत केलेली असते व जो हाक मारताच मदतीला धावून येईल अशी लोकांना खात्री असते. शिवाय तो समाजासाठी काही करेल याची त्यांना अपेक्षाच नव्हे तर शास्वती असते. त्यामुळे मतदान करतांना जात, पक्ष न पाहता चांगला उमेदवार निवडतो असे उत्तर देणाऱ्यांची संख्या महत्तम आहे. हीच संख्या लोकशाहीच्या बळकटीकरणाला आवश्यक महत्त्व देणारी आहे आणि आधुनिक विचारसरणीची दर्शक ही आहे. भारतीय राजकारण जिथे जातीवर आधारलेले असतांनाही असा निर्णय घेणे म्हणजेच वैचारिक पातळीवर होणारे सकारात्मक परिवर्तनच म्हणावे लागेल. जमातीचा उमेदवार पाहतो असे २१ (१०. ५%) उत्तरदाते सांगतात. त्यांच्यामध्ये जमातीविषयी कट्टरतेची भावना असणारे वयोवृद्ध मंडळीचा समावेश होतो व भारतीय समाजात जातीचे राजकारण व जातीवर अवलंबून असणारे राजकारण याचा प्रत्यय येतो. पक्षाचा उमेदवार निवडतो असे एकूण ६१ (३०. ५%) उत्तरदात्यांचे मत आहे. यात विशेषत: तरुण वर्गाचा अधिक समावेश आहे. कारण हाच तरुण वर्ग सध्या राजकिय पक्षांच्या प्रभावाखाली वावरत असल्याचे आढळते.

त्याला कारणही तसेच आहे. शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी, गरीबी व वाढती महागाई व आधुनिकीकरणामुळे शहरांतील झगमगाट यांनी आकर्षित झालेला तरुण पक्षाने दिलेल्या प्रलोभनाने त्यांच्या आहारी जात चाललेला आहे. काही जणांना पक्ष हा अगदी आपला जवळचा, आपल्या धर्माशी मिळणारा वाटतो. त्यांना पक्षाचे व आपले तत्त्व मिळतात असेही वाटते त्यामुळे तो राजकीय पक्ष व उमेदवार कोणतेही प्रलोभन देत नसेल तरी त्यालाच मतदान करायचे असाही एक आग्रही सूर पाहायला मिळतो. आपल्याच पक्षाचे सरकार निवडून आले तर आपलीच सत्ता येऊन आपणच राजे असणार व आपल्या समाजासाठी आपल्याला बरेच काही मिळेल यासाठी ते पक्षाला चिकटून असतात. म्हणून पक्षाचा उमेदवार पाहतो असे म्हणणाऱ्यांची संख्याही मोठी आहे व त्यांना डावलता येणार नाही. ही बाब प्रकर्षाने जाणवते. यापेक्षा वेगळे उत्तर देणारे ११ (५.५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्या मते ते कोणालाही मतदान करण्यासाठी बांधिल नाहीत. ते वळेवर त्यांना वाटेल त्यांना मतदान करतात. कुणाला मत दयायचे हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. व ते त्याबद्दल काहीही बोलायला तयार नाहीत. यामध्ये काही लोकशाहीचा खरा अर्थ कळलेले व गुप्त मतदान पद्धतीचा योग्य वापर करणारे उत्तरदाते आहेत. तर थोडेफार असे आहेत की जे उमेदवाराकडून काही आर्थिक मदतीची वाट पाहत असतात व त्यांना जो आर्थिक मदत करेल त्यालाच मतदान करतात.

वरील विचवेचनावरुन असे लक्षात येते की माना आदिवासी समाज जरी निरक्षर असला तरी सततच्या होणाऱ्या निवडणुका व मतदान यांचा दांडगा अनुभव पाठीशी असल्याने आता मतदानाचे महत्त्व त्यांना कळून आलेले आहे. त्यामुळे मतदानासारख्या अधिकाराचा योग्य वापर कसा करावा याची त्यांना जाण आलेली आहे, असे निदर्शनासयेते. त्यामुळे चांगला उमेदवार अशी महत्तम उत्तरदात्यांची प्रतिक्रिया आहे. परंतु चांगला उमेदवार पाहतांनाही त्यात जमातीचा विचार, समूहाचा विचार त्यांच्यासाठी महत्वाचा ठरतो. त्यामुळे कोणतेही कार्य करतांना वैयक्तिक हित न पाहता समूहाचे हित जोपासण्याकडे त्यांना कल झुकलेला आहे असे निदर्शनास येते.

पी के कुलकर्णी यांच्या मते, ''समाजाची राजकीय संघटना म्हणजेच राज्य किंवा राज्यसंस्था होय.[१७] ''भारतीय राजकारणात वर्चस्व पक्षापेक्षा जातीच्या हातात अधिक असते. भारतीय राजकारणात जात जरी महत्वाची भूमिका बजावत असली तरी प्रत्यक्ष सत्ता मात्र त्या जातीतील श्रीमंत किंवा आर्थिकदृष्टया संपन्न सक्तिच्याच हातात असते.''[१८] आणि या श्रीमंत वर्गांनी निर्माण केलेले पक्ष हे आपल्या प्रभावाखाली इतर लोकांवर राज्य करीत असतात. '' जे. बी. डी. मिलर यांच्या मते, ''समाजात लोकांमध्ये भेदाभेद आहेत. त्यातून स्वाभाविकपणे निर्माण होणारा संघर्ष म्हणजे राजकारण होय.''[१९] जेव्हा समाजाचा विचार होतो तेव्हा आणि कदाचित जेव्हापासून समाज निर्माण झाला तेव्हापासूनच या उच्चनिच भेदाभेदाची सुरुवात झाली असावी आणि तेव्हापासून राजकारणाची सुरुवातही, उच्च अकांक्षा बाळगणाऱ्या व्यक्ती इतर सामान्य लोकांवर त्यांचे वर्चस्व गाजवू पाहतात. ज्याला आपण नेतेगिरी म्हणतो, त्यांचा हेतु चांगला अथवा वाईट दोन्ही असू शकतो. परंतु असे नेते आपल्या भोवती चुंबकीय क्षेत्राप्रमाणे एक वर्तुळ बनवितात व त्याच्या अंतर्गत त्यांच्या विचारांना व त्यांना पुढे नेणारा लोकांचा समूह ज्याला आपण 'पक्ष' म्हणतो तयार करतात. आणि मग या पक्षाच्या कार्याप्रमाणे त्याचे अनुयायी जुळत जातात.

भारतात अनेक राजकीय व स्वतंत्र पक्षा आहेत आणि आणखी पक्षबांधणी सुरुच आहेत स्वातंत्र्या पुर्वीपासूनच तर आतापर्यंत अनेक पक्ष कार्यरत आहेत. आणि आपल्या कार्याने त्यांनी समाजात मान्यता मिळविली आहे. डॉ. श. गो. देवगावकर यांच्या मते,'' ''राजकीय पक्षाच्या कार्य आणि प्रभावामुळे जसे जनसामान्यांचे राजकीय सामाजिकरण होते तसेच पक्षाच्या सदस्यत्वामुळे पक्ष कार्याच्या अनुभवामुळेही राजकीय सामाजिकरणाचा स्तर अधिकाधिक वाढत जातो.''[२०]

अशा प्रकारे राजकारणाचा आणि राजकीय सामाजिकरणााचा संबंध आपल्या निदर्शनास येतो आणि या पक्षांच्या प्रभावातून सामान्यच नाही तर उच्चभ्रू म्हणवणारा वर्गही अलिप्त राहीलेला नाही. इथे प्रत्येक व्यक्तिवर कोणत्या ना कोणत्या पक्षाचा प्रभाव जाणवतो अगदी लहान मुलांना विचारले तरी ते त्यांचे आईवडील

कोणत्या पक्षाला मतदान करतात हे सहज सांगतात कारण त्यांना तो पक्ष घरच्या सदस्याप्रमाणेच आपुलकीचा वाटतो.

याच संदर्भात माना आदिवासींवर कोणत्या पक्षाचा प्रभाव आहे हे जाणून घेण्याकरीता आपण कोणत्या प्रादेशिक किंवा राष्ट्रीय पक्षाशी बांधिल आहात काय? असा प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. १०**

**उत्तरदात्यांची राजकारणातील पक्ष आवड दर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५३ | २६.५% |
| २ | नही | १४७ | ७३.५% |
| ३ | सांगता येत नाही | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, स्वत:च्या असा पक्ष आहे जो हक्काचा आहे. त्यांचे तत्त्व आपल्याला पटतात व तो आपल्या विकासासाठीच कार्य करतो अशा प्रकारे ठामपणे एकाच पक्षाला बांधील असणारे व ‘होय’ म्हणणारे एकूण ५३ (२६. ५%) उत्तरदाते आहेत. तर नाही असे उत्तर देणारे महत्तम १४७ (७३.५%) उत्तरदाते आहेत. त्यांच्या मते, त्यांचा कोणताही ठराविक पक्ष नाही. जो चांगले कार्य करील त्यांनाच ते मत देतात. हे उत्तरदाते कधी पक्ष पाहून, कधी उमेदवार पाहून तर कधी इतर बाबींना महत्त्व देऊन वेळेवर निर्णय घेतात व मतदान करतात परंतु होय म्हणणारे उत्तरदाते मात्र त्यांच्या पक्षाशी एकनिष्ठ आहेत.

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की, नाही म्हणणारे महत्तम उत्तरदाते आहेत. पूर्वीपासूनच आदिवासींना साधेभोळे समजून त्यांच्या मतांचा भरपूर

उपयोग करुन घेतला जात असे त्यामुळे अमुक पक्ष आपल्या धर्माचा पक्ष अशी त्यांच्यात विचारांची एक रुजवणुकच करुन टाकली गेली होती. परंतु माना आदिवासींना आता कोणताही पक्ष बांधून ठेवू शकत नाही व चांगले वाईट उमेदवार पाहण्याचा त्यांच्यात दृष्टीकोण विकसित होत आहे. हे आपल्या निदर्शनास येते व हे एक सकारात्मक परिवर्तन आहे, असे म्हणाण्यात हरकत नाही. शिवाय माना आदिवासी आता राजकीय क्षेत्रात जागृत होत आहे ही बाबही यावरुन निदर्शनास येते.

''पूर्व विदर्भावर राष्ट्रकूट व चालूक्याचा अंमल चालू असतांना वैनगंगेच्या पूर्वेस वैरागड येथे नागवंशीय माना जातीच्या राजांनी आपली सत्ता स्थापन केली होती''[२१]

वरील विधानावरुन व इतर अनेक पुराव्यावरुन इ.स. नवव्या शतकात वैरागड येथे माना जमातीचे राज्य होते व इ.स. १२ व्या शतकात गोंड राजांनी त्यांची सत्ता काबीज केली. राजकारण हे मानांना स्वस्थ बसू देत नाही. त्यांची सत्ता गेली तरी राजकीय ईच्छाशक्ती त्यांच्यात प्रबळ आहे आणि वारंवार ती निवडणूकीच्या माध्यमाने उफाळून आल्याचे जाणावते त्यामुळे मुळातच राज्य करण्याची ईच्छा आसणाऱ्या माना आदिवासींना स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुक तसेच विधानसभा, लोकसभेची निवडणूकही अत्यंत जवळची वाटते. त्यांची हीच राजकीय ईच्छाशक्ती जाणून घेण्याच्या दृष्टीने ''आपण किंवा आपल्या कुटुंबातील एखादया व्यक्तिने निवडणूक लढविली आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ११

## उत्तरदात्यांची राजकारणातील सत्ता काबीज करण्याविषयीची मनोवृत्तीदर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एकदा | ३२ | १६% |
| २ | दोनदा | ८ | ४% |
| ३ | दोन पेक्षा जास्त वेळा | ४ | २% |
| ४ | नाही | १५६ | ७८% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

माना आदिवासींबाबत सांगायचे म्हणजे पूर्वी माना आदिवासी अनुसूचित जमातीच्या यादीत गोंडांची उपजमात म्हणून नोंदविल्या गेले होते. परंतु त्यानंतर त्यांना विशेष मागास प्रवर्गाच्या यादीत समाविष्ट करण्यात आले व प्रदीर्घ न्यायालयीन संघर्षानंतर पुन्हा अनुसूचित जमातीच्या यादीत स्वतंत्र जमात म्हणून समाविष्ठ करण्यात आले. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर आरक्षणा अंतर्गत त्यांना स्थानिक व इतर संस्थांच्या निवडणुका लढणे शक्य झाले परंतु त्यांना जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यात अतोनात अडचणी येत असल्यामुळे ही संधी सुद्धा त्यांच्याकडून हिरावल्या जात असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

तरीपण वरील सारणीचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की एवढया त्रासानंतरही एकदा निवडणुक लढविलेल्या उत्तरदात्यांची संख्या ३२ (१६%) तर दोनदा निवडणुक लढलेल्या उत्तरदात्यांची संख्या ८ (४%) आहे. दोनपेक्षा जास्त वेळा निवडणुक लढविलेल्या उत्तरदात्यांची संख्या ४ (२%) आहे. तर एकदाही निवडणाुक लढविली नाही असे महत्तम १५६(७८%) उत्तरदाते सांगतात. म्हणजे एकूण ४४ (२२%) उत्तरदात्यांनी विविध वेळा निवडणुक लढविली आहे. ही संख्या लक्षात

घेण्यासारखी आहे. यावरुन माना जामातीची राज्यसत्ता काबीज करण्याची प्रबळ इच्छाशक्ती दिसून येते. तसेच त्यांच्यात घेत असलेली राजकीय जागृतीही लक्षात येते.

सारणी क्र. ११ ला अनुसरुनच त्या उत्तरदात्यांनी निवडणुक लढविली त्यांनी कोणत्या स्वरुपाची निवडणुक लढविली हे जाणून घेण्यासाठी त्यांना ''निवडणुक लढविली असल्यास निवडणुकीचे स्वरुप कसे होते?'' असा प्रश्न विचारण्यात आल.

माना आदिवासींची सत्ता काबीज करण्याची इच्छा जरी असली तरी त्यांच्या राजकारणाचे क्षेत्र कुठपर्यंत मर्यादित आहे हे जाणून घेणे आवश्यक असल्याने त्यांना वरील प्रश्न विचारण्यात आला. त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. १२

## उत्तरदात्यांची राजकारणाचे क्षेत्र दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत | ४० | २०% |
| २ | पंचायत समिती | ०२ | १% |
| ३ | जिल्हापरिषद | १ | ०.५% |
| ४ | संस्था | १ | ०.५% |
| ५ | विधानसभा | ०० | ००% |
| ६ | लोकसभा | ०० | ००% |
| ७ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| ८ | लागू पडत नाही | १५६ | ७८% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

''त्र्याहत्तराव्या घटना दुरुस्तीने ग्रामसभा, ग्रामपंचायती निवडुकीसाठी प्रौढ मताधिकाराच्या तत्वास अवलंब, महिलांसाठी राखीव जागा, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींसाठी राखीव जागा, वित्त अयोगाची स्थापना, निवडणुका घेण्यासाठी राज्य निर्वाचन आयोगाची स्थापना इत्यादी गोष्टींची तरतूद केली आहे.''[२२] त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत स्थानिक लोक मोठया हिरीरीने सहभाग घेतात. लोकसभा, विधानसभेची निवडणुक जितकी चुरसीची होत नाही तेवढी स्थानिक पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थांची व इतर संस्था जसे जिल्हा बँक, जिल्हा सोसायटी इत्यादींच्या निवडणुका चुरसीच्या होतात. आदिवासी माना जमात ज्या ज्या ठिकाणी वास्तव्यास आहे तिथे तिथे स्थानिक पातळीवर त्यांनी निवडणक लढविल्याचे चित्र वरील सारणीद्वारे स्पष्ट होते.

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की एकूण ४४ उत्तरदात्यांनी निवडणुक लढविली आहे. त्यांपैकी महत्तम ४० (२०%) उत्तरदात्यांनी स्थानिक पातळीवर ग्रामपंचायतीची निवडणुक लढविल्याचे सांगितले तर पंचायत समिती स्तरावर २ (१%) उत्तरदात्यांनी, जिल्हापरिषद स्तरावर १ (०.५%) उत्तरदात्यांनी व इतर संस्थांमध्ये १(०.५%) उत्तरदात्यांनी निवडणुक लढविण्याचे सांगितले. माना जमातीतील डॉ. रमेश गजबे यांनी लोकसभेसाठी निवडणुक लढून ते निवडून आले होते व त्यांना मंत्रीपदाचा दर्जाही प्राप्त झाला होता. परंतु महत्तम ४०(२०%) लोकांनी मात्र ग्रामपंचाायतची निवडणुक लढविण्याचे सांगितले. हया संख्येचा विचार करता जरी माना आदिवासी जमातीत राजकीय सत्तास्थाने काबीज करण्याची प्रबळ इच्छा शक्ती असली तरी त्यांचे राजकीय क्षेत्र मात्र सध्यातरी ग्रामपंचायत व फार तर पंचायत समितीपर्यंतच मर्यादित असल्याचे जाणवते.

वरील सारणी क्र. १२ ला अनुसरुन ''लढविलेल्या निवडणुकीत आपण किंवा आपल्या कुटुंबातील एखादी व्यक्ती निवडून आली आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. जरी निवडणुक लढविली तरी सुद्धा या राजकारणाच्या स्पर्धेत इच्छा

असली म्हणून निवडणुकीला उभे राहणे व निवडणून येणे या दोन वेगवेगळया गोष्टी आहेत. निवडून येण्यासाठी उमेदवाराच्या पाठीमागे पक्षाचे, आर्थिक व सामाजिक असे तीनही बळ असणे आवश्यक असते. कधी कधी आदिवासी जमातीत ‘‘जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र’’ उपलब्ध नसल्याने ज्या एखादया व्यक्तीजवळ ते उपलब्ध असते त्यालाच आरक्षीत जागेवर लोकांना बिनविरोध निवडून दयावे लागते. आरक्षणाचा फायदा आदिवासी जमातींना मिळाला आहे. परंतु त्याचबरोबर योग्य उमेदवार निवडून येईलच अशी शास्वती नसल्याने विकसाची कामे व सरकारी कामांवरील निमंत्रण या दोन्ही गोष्टी बऱ्याचदा साधल्या जात नाहीत. तरीपरंतु काही का होईन यामुळे राजकीय जागृती मात्र आदिवासींमध्ये निर्माण होत आहे.

माना जमातीची याबाबतीत काय स्थिती आहे हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**. सारणी क्र. १३**

**निवडणुक लढविलेल्या उत्तरदात्यांची सत्ता काबीज करण्याची शक्ती दर्शक सारणी**

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३८ | १९% |
| २ | नाही | ६ | ३% |
| ३ | सांगता येत नाही | ०० | ००% |
| ४ | लागू पडत नाही | १५६ | ७८% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण ४४ उत्तरदाते ज्यांनी निवडणुक लढविली, त्यापैकी महत्तम ३८ (१९%) उत्तरदातेहे निवडणुक जिंकण्यात यशस्वी झाले. ही संख्या लक्षात घेण्यासारखी आहे. माना आदिवासींचे स्थानिक पातळीवरील का होईना परंतु मोठे यश आहे असे म्हणावे लागेल. मुळातच राजवंशाचे

रक्त असणाऱ्या माना आदिवासी जमातीची ईच्छापूर्तीचे स्वप्न यामुळे साकार होण्याची चिन्हे दिसू शकतात. निवडणुक हरलो असे ६ (३%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्याला अनेक कारणे आहेत. परंतु तरीही निवडून येणाऱ्यांचे प्रमाण बरेच मोठे आहे.

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की, माना आदिवासींमध्ये राजकीय ईच्छाशक्ती प्रबळ असून राजकीय क्षेत्रात ते जागृत होत आहेत व हे एक सकारात्मक परिवर्तन आहे असे म्हणता येईल.

# संदर्भ सूची


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | प्रा. सौ. अनंतराम शरयू | — | सामाजिक संस्था | पृ.२०४ |
| | | — | महाराष्ट्र राज्य ग्रंथनिर्मिती मंडळ नागपूर.१९७६ | |
| २. | नाडगोंडे गुरूनाथ | — | सामाजिक आंदोलने | पृ.१३९ |
| | | — | कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे —३० प्र. आवृत्ती —१९८६ | |
| ३. | भारंदे बाळासाहेब | — | लोकशाही पंचायतराज आणि ग्रामस्वराज्य | पृ.३८९ |
| | | — | Government of Maharashtra Panchayatraj Institution Co- Memorative valume-1992 | |
| ४. | लोटे रा.ज. | — | सामाजिक समस्या | पृ.२१८ |
| | | — | पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लीशर्स नागपूर—१९८९ | |
| ५. | प्रा.पाटील व्ही.बी. | — | महाराष्ट्रातील पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्था | पृ. १४ |
| | | — | सागर प्रकाशन पुणे— प्रथमावृत्ती —२००५ | |
| ६. | डॉ. सिंह पी.बी. | — | सामाजिक संरचना प्रक्रिया एवं परिवर्तन | पृ.१०९ |
| | | — | राजीव प्रकाशन मेरठ | |
| ७. | गुप्ता एम.एल. | — | समाजशास्त्र | पृ.७४४ |
| | शर्मा डी. डी. | — | साहित्य भवन पब्लीकेशन आग्रा—१९९७ | |
| ८. | गुप्ता एम.एल. | — | समाजशास्त्र | पृ.७४४ |
| | शर्मा डी. डी. | — | कित्ता. | |
| ९. | तिजारे बाबा वि. | — | सामुदायिक विकास आणि विस्तार शिक्षण | पृ.३७५ |
| | | — | म.वि.ग्रं.नि.मंडळ विद्याबुक्स औरंगाबाद —१९८३ | |
| १०. | डॉ. देवगावकर एस.जी. | — | महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती | पृ.३०४ |
| | | — | श्री साईनाथ प्रकाशन नागपूर. डिसे. २००९. | |
| ११. | श्री. महाकारकर श्रीराम | — | आदिवासी स्त्री व राजकारण | पृ. १२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | महादेव | — | श्री. रा.शै.सां.व सामाजिक बहुउद्देशीय संस्था चामोर्शी—२००६ | |
| १२. | प्रा. पाटील व्ही. बी. | — | महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | पृ. ३१४ |
| | | — | सागर प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती —२००५ | |
| १३. | प्रा. देवगावकर श.गो. | — | राजकीय समाजशास्त्र | पृ. १० |
| | | — | मंगेश प्रकाशन नागपूर | |
| | | — | प्रथमावृत्ती —१९९०. | |
| १४. | क्रॅन्स्टन मॅगरिस | — | विसावे शतक आणि मूलभूत मानवी हक्क. | पृ. ३७ |
| | | — | शंकरराव देव समाज प्रबोधन | |
| | | — | संस्था पुणे. | |
| १५. | डॉ. आंबेडकर भीमराव | — | भारताचे संविधान | पृ.२०८ |
| | | — | मिलींद जुनघरे प्रकाशन वर्धा | |
| | | — | सहावी आवृत्ती —२००६. | |
| १६. | प्रा. पाटील व्ही. बी. | — | महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | पृ.३१३ |
| | | — | कित्ता. | |
| १७. | कुलकर्णी पी.के. | — | सामान्य समाजशास्त्र | पृ.२२९ |
| | | — | श्री. मंगेश प्रकाशन | |
| | | — | रामदासपेठ नागपूर—२००० | |
| १८. | कुलकर्णी पी.के. | — | सामान्य समाजशास्त्र | पृ.२४७ |
| | | — | कित्ता. | |
| १९. | डॉ. देवगावकर श.गो. | — | राजकीय समाजशास्त्र | पृ. ०४ |
| | | — | कित्ता. | |
| २०. | डॉ. देवगावकर श.गो. | — | राजकीय समाजशास्त्र | पृ. ३५ |
| | | — | कित्ता. | |
| २१ | राजूरकर अ.ज. | — | चंद्रपूरचा इतिहास | पृ. ८१ |
| | | — | महाकाली प्रकाशन चंद्रपूर | |
| | | — | प्रथमावृत्ती —१९८२ | |
| २२. | प्रा. पाटील व्ही. बी. | — | महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | पृ. ३३ |
| | | — | कित्ता. | |

## ६.४ ऐतिहासिक जागृती :

समाजशास्त्राच्या अभ्यासकांना कोणत्याही आदिवासी जमातीचा किंवा कोणत्याही मानवसमूहाचा व त्यांच्यातील होणाऱ्या परिवर्तनाचा अभ्यास करायचा असेल तर त्याची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी त्यांच्या इतिहासात डोकावणे अतिशय गरजेचे असते आणि आदिवासी समूहाच्या सद्यस्थितीचे जर अध्ययन करायचे असेल, त्यांच्यातील परिवर्तन झाले किंवा नाही याचा पडताळा घ्यायचा असेल तर त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे अनिवार्य ठरते. आधिच आदिवासी जंगला पहाडात, दुर्गम भागात, डोंगर दऱ्यात राहणारे आणि त्यातही विकासाची गंगा त्यांच्यापासून कोसोदूर राहिल्याने त्यांच्यात साक्षरतेचा अभावच दिसतो. त्यांच्या बोलीभाषेचे वेगळेपण आणि त्यांच्यातील लिपीचा अभाव त्यामुळे त्यांच्याबद्दल त्यांनी स्वत:तर लिखाण केल्याचे आढळत नाहीच परंतु इतरही लेखकांनी त्यांच्याबद्दल विशेष माहिती लिहू शकले नाही, परंतु काही इतिहासकारांनी त्यांच्या जिज्ञासेपोटी इतिहास शोधून काढण्याचा प्रयत्न केला आणि प्रयत्नपूर्वक आदिवासींच्या जीवनात डोकावून त्यांच्याबद्दल लिखाण केले. त्यांच्या जीवनशैलीचे वर्णन केले व वर्णन केले व त्यांच्या संस्कृती, धर्म, कला याबद्दल विवेचन केलेले आढळते. सध्याच्या काळात शिक्षणाचा थोडाफार प्रसार आदिवासींमध्येही झाला व त्यांच्यातील हुशार व होतकरू विद्यार्थी प्रयत्नपूर्वक चिकाटीने उच्चशिक्षित झाले. त्यांना त्यांच्या समाजाबद्दल कळकळ वाटून त्यांनी त्यांच्या संस्कृतीबद्दल, इतिहासाबद्दल लिखाण केल्याचे दिसते.

माना आदिवासी समाजाची स्थितीयापेक्षा वेगळी नाही. माना आदिवासींचे समाजशास्त्रीय अध्ययन करतांना त्यांची सद्यस्थिती व परिवर्तन जाणून घेण्यासाठी संशोधिकेला त्यांच्या इतिहासात डोकावणे अत्यावश्यक वाटले. त्यामुळे प्रथम व दुय्यम स्त्रोतांपासून संशोधिकेने त्यांच्या इतिहासाबद्दल बरीच माहिती मिळविली.

''नवव्या शतकात वैरागड येथे माना जातीच्या नागवंशीय राजांनी सत्ता स्थापन केली. पहिला राजा कुरूमप्रहोद होय. हयाने वैरागड, गडबोरी व राजोली येथे किल्ले बांधले दुसरा राजा सुर्जत बडवाईक यांने किल्ला बांधून त्यास आपल्या

नावावरून सुरजगड असे नाव दिले. शेवटच्या राजाचे नाव गहिलू असे होते. यानेच माणिगड हा प्रसिध्द किल्ला आणि भद्रावती येथील नागपुजेला वाहिलेले भद्रनाथ मंदिर बांधले. मानकादेवीच्या नावावरूनच हया किल्यास माणिकगड असे नाव ठेवण्यात आले. मानकादेवी ही वैरागडच्या राजघराण्यातील अधिष्ठात्री देवता होय. बस्तर संस्थानातील नागवंशीय राजांची देवता हीच होय. हया राजांनी इ.स. च्या ९ व्या शतकापासून १२ व्या शतकापर्यंत दक्षिणेस माणिकगड व भद्रावती या भागावर राज्य केले होते. नागवंशीय राजांचे हया प्रदेशावर प्राबल्य होते. त्यांचे स्वातंत्र्य १२ शतकापर्यत संपुष्टात आले आणि नंतरच्या काळात रतनपूरचे हैह्यवंशीय राजा जाज्वलदेव यांचे मांडलीकत्त्व पत्करून त्याला कारभार देऊ लागले असा इतिहास उल्लेख आढळतो. इ.स. १४५० मध्ये माना जातीच्या नागवंशीय राजांची सत्ता या भागावरून लोप पावल्याचे आढळून येते. या संधीचा फायदा घेऊन या राज्यावर गोंड राजांनी सत्ता स्थापन केली. पुढे भोसल्यांनी, इंग्रजांनी आणि स्वातंत्र्यापासून भारत सरकारची सत्ता या भागावर आहे.''[१] या विवेचनावरून माना आदिवासी जमातीच्या इतिहासाबद्दल थोडी पुसटशी कल्पना येऊ शकते. '' इ.स. १८६९ सालच्या मेजर ल्युसी स्मिथच्या चांदा सेटलमेंट रिपोटनुसार मानाची लोकसंख्या जवळपास ५०,००० इतकी होती. त्यांपैकी एकटया चांदा जिल्हयात ३४,००० इतकी होती. तर उरलेली १६,००० लोकसंख्या नागपूर, भंडारा, आणि बालाघाट या जिल्हयात पसरलेली होती.''[२] ''भारतीय घटनेच्या भाग आठ मध्ये (मध्यप्रदेशात) माना ही जात १६ व्या क्रमांकावर तसेच भाग १ (महाराष्ट्र राज्यात) १८ व्या क्रमांकावर एस.टी. च्या यादीत नोंदवलेली आहे. यावरून माना ही स्वतंत्र आदिवासी (scheduled tribes) जात असून ती कुणब्याची वा गोंडाची उपजात नाही हे सर्वोच्च न्यायालयाने ८ मार्च २००६ च्या माना विरूध्द महाराष्ट्र सरकारच्या निकालात सिध्द केले आहे.''[३]

सदर माहितीच्या आधारे माना आदिवासीच्या इतिहासाची आपल्याला माहिती मिळते की, माना आदिवासींचे पूर्वी चंद्रपूर व गडचिरोली या भागावर राज्य होते व ते नागवंशीय म्हणजे नागांची पुजा करणारे होते. तर हत्ती हे त्यांचे प्रतिक होते.

शिवाय माणकादेवी ही त्यांच्या घराण्याची अधिष्ठात्री होती. कुरूमप्रहोद, सूर्जतबळवाईक, गहीलू इत्यादी राजांची नावेही आपल्याला जाणून घेता आली आणि त्यांनी बांधलेले वैरागड, माणिकगड, सूरजगड इत्यादी किल्ल्यांबद्दलची माहिती मिळते. ही प्राथमिक इतिहासाची एवढीच माहिती वारंवार सर्व ग्रंथातून माना संदर्भाने आलेली दिसते. या व्यतिरिक्त फार मोठी माहिती मिळत नाही. भास्कर वाकडे या माना आदिवासी व्यक्तिने स्वत:च्या समाजाच्या इतिहासाविषयी बरेच अध्ययन करून माहिती प्राप्त केली व इतिहास शोधून काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. ते त्यात बऱ्याच प्रमाणात यशस्वीही झाले आहेत मात्र शैलजा देवगावकर, शं.गो. देवगावकर, अ.ज. राजूरकर, डॉ. रमेश गजबे इत्यादी इतिहासकारांनी व समाजशास्त्रज्ञांनी माना आदिवासींच्या इतिहासाबद्दल जे लिखाण केलेले चांदा सेटलमेंट रिपोर्ट मधील मेजर ल्यूसी स्मिथ यांच्या लिखाणाला अनुसरून केलेले आढळते.

माना आदिवसींच्या इतिहासाबाबत जाणून घ्यावे व वयोवृध्द व्यक्तिंना त्यांची योग्य माहिती असतेच असे गृहीत धरून संशोधिकेने एका ८० वर्षे वयोवृध्द व्यक्तिची चर्चात्मक मुलाखत घेऊन त्यांच्या इतिहासाबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांचे नाव श्री जानबा चौधरी, काम मजूरी त्यांच्या मते, ‘‘ बेचाळीसच्या दंग्यात तरूण होतो. गावात थोडे महार व माना होते. आकाशात चांदण्या दिसतात त्यातील म्हातारीची बाज तीन चोर त्यातील समोरचे दोन चोर म्हणजे गोंड व गोवारी. शेवटचा चोर म्हणजे माना तो नेहमी मागे राहिला त्याला काहीच मिळाले नाही. गड नावाचा कुणी राजा होता. तोही पळाला नागदेव मोठा साप गावशेजारी होता तो भद्रावतीला पळाला आता नकटोबा देव आहे. पूर्वीपासून त्याची पूजा करतात. पूर्वी मातीचा घोडा बनवत व त्याची गावातून यात्रा काढत घोडादेव आपोआपच दूरवर जात असे सध्याचे लोक घोडादेव करत नाही. घोडादेव मांडत नाही. पूर्वी माना बाया कमरेला पदर खोंचत गावातील तेली त्यांना रागावत कपाळाला कुंकू व डोक्यावर पदर ठेवायला सांगत. आता बाया सरळ लुगडे घालतात. आम्ही गावातील एका ब्राम्हणाकडे नोकरी करत होतो. त्याच्या घरीदारी वावरत होतो. ते आम्हाला हात लावत पण महारांना हात लावत नव्हते माना महारांच्याही घरी

शेतीची कामे करत परंतु महारांना हात लावत नव्हते. त्यांच्या घरचे खात नव्हते. समारंभात वेगळेच अन्न शिजवून खात महार त्यांना कोरडे अन्न देत पूर्वी आम्हाला आदिवासी म्हणत नव्हते. आदिवासी म्हटलेले मला आवडत नाही. तुकडोजी महाराजांनी आता सर्वांना एक केले. आता सर्वजण एकत्र खातात पितात एकमेकांना हात लावतात मी फार गरीब आहे. माझ्या बरोबरीचे आता कुणीही जिवंत नाही.''[४] सध्या सदर व्यक्तिही मृतपावली आहे. परंतु त्यांनी जे वास्तव सांगितले ते ऐकूण माना आदिवासींची पूर्वीची सामाजिक स्थिती व सध्याची सामाजिक स्थिती यात तुलना करणे शक्य आहे.

वरील विवेचनावरून पूर्वी माना ही स्पृश्यअस्पृश्यता पाळत होते परंतु ते स्वत: मात्र अस्पृश्य नव्हते हे आपल्या लक्षात येते. तसेच माना आदिवासींना त्यांच्या इतिहासाबद्दल कितपत माहित आहे याचाही अंदाज बांधता येतो.

माना आदिवासींना त्यांच्या इतिहासाबद्दल कितपत माहिती आहे व त्यांच्या अस्मितेबद्दल ते कितपत जागृत आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधिकेने केला. त्यासाठी ''माना जमातीचा मूळ पूर्वज कोण याबद्दल आपल्याला काही माहिती आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. १**

**उत्तरदात्यांची त्यांच्या पूर्वजांविषयी असलेली माहितीदर्शक सारणी**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **वारंवारिता** | **शेकडेवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ०२ | ०१% |
| २ | नही | १९० | ९५% |
| ३ | थोडीफार माहिती आहे | ०६ | ०३% |
| ४ | सांगता येत नाही | ०२ | ०१% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की, माना आदिवासींचा मूळ पूर्वज कोण ज्याच्यापासून माना वंशाची सुरूवात झाली हे माहीत आहे असे उत्तर देणारे ०२ (०१%) उत्तरदाते आहेत. तर त्यांच्याबद्दल थोडीफार माहिती आहे असे ०६ (०३%) उत्तरदाते सांगतात. म्हणजे एकूण ०८ (०४%) उत्तरदात्यांनाच त्यांच्या पूर्वजांविषयी माहिती आहे. तर ०२ (०१%) उत्तरदात्यांना नक्की सांगता येत नाही. ज्यांना ही माहिती आहे त्यांनी सध्या माना समाजाचे होणारे वार्षिक कार्यक्रम, समारंभ मुक्ताबाई, भद्रावती इत्यादी ठिकाणी होणारे मेळावे या कार्यक्रमांद्वारे काही जाणकार नेत्याद्वारे त्यांना प्राप्त झाली आहे. काही माना आदिवासी लेखकांनी छोटी छोटी पुस्तके लिहून माना आदिवासींचा इतिहास त्यात नमुद केलेला आहे. परंतु त्यांना वाचणारे माना आदिवासींचे प्रमाण अतिशय नगण्यच आहे. तर 'माहीत नाही' असे महत्तम १९०(९५%) उत्तरदात्यांनी सांगीतले याला कारण आता पूर्वीसारखे भाट गावोगाव फिरत नाही व ते त्यांच्या इतिहासही सांगत नाही. कुठे मेळावे झाले तर लोक जातात. परंतु त्यांना पुस्तके विकत घेऊन वाचायला वेळ नाही किंवा निरक्षरतेचे प्रमाण अधिक असल्यानेही ते वाचत नाही. नव्या पिढीच्या लोकांना ते वाचण्यात रस नाही व अगदीच खाणे व जगणे या पध्दतीने जीवन जगणाऱ्या माना आदिवासींना इतिहास जाणून घेण्यात फारसे स्वारस्य दिसत नाही.

सारणी क्र. १ ला अनुसरून माना राजांनी बांधलेल्या किल्ल्याबाबत जाणून घेण्यासाठी ''माना राजांनी विदर्भात किल्ले बांधले याबाबत आपल्याला काही माहिती आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. २

## उत्तरदात्यांची माना राजांनी बांधलेल्या किल्ल्याची माहिती दर्शक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ०५ | २.५% |
| २ | नही | १८१ | ९०.५% |
| ३ | थोडीफार माहिती आहे | १४ | ०७% |
| ४ | सांगता येत नाही | ०० | ००% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, माना राजांनी बांधलेल्या किल्ल्याबाबत माहित आहे असे उत्तर देणारे केवळ ०५(२.५%) उत्तरदाते आहेत. तर थोडीफार माहिती आहे असे म्हणणारे १४(०७%) उत्तरदाते आहेत. किल्ल्याबाबत काहीच माहित नाही असे म्हणणारे महत्तम १८१ (९०.५%) उत्तरदाते आहेत. माना राजांनी सूरजगड, वैरागड, माणिकगड इत्यादी किल्ले बांधले असे वांरवार इतिहासकांराच्या लिखाणात आलेले आहे. तरीसुध्दा सध्याच्या माना आदिवासींना किल्ल्यांबाबत माहिती नाही असे निदर्शनास येते.

वरील सारणी क्र. २ ला अनुसरूनच ''आपल्याला त्या किल्ल्यांची माहिती आहे काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ३

## उततरदात्यांची माना राजांनी बांधलेल्या किल्ल्यांची नावे माहित असल्याबाबतची सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | किल्ल्यांची नावे सांगणारे | १९ | ९.५% |
| २ | किल्ल्यांची नावे न सांगणारे | १८१ | ९०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की, सारणी क्र. २ मध्ये ज्या १९ उत्तरदात्यांची माना राजांनी बांधलेल्या किल्ल्यांविषयी माहिती आहे असे उत्तर दिले होते त्या १९ (९.५%) उत्तरदात्यांना एक किंवा दोन किल्ल्यांची नावे सांगता आली. उर्वरित १८१ (९०.५%) उत्तरदात्यांना ज्यांना माना राजांनी बांधलेल्या किल्ल्यांविषयी माहिती नाही त्यांना किल्ल्यांची नावे सांगता आली नाही.

कोणत्याही आदिवासींची पारंपारिक माहिती किंवा संस्कृतीचे वहन हे तोंडीच एकमेकांद्वारे पुढील पिढीकडे हस्तांतरित केल्या जाते. असे असतांना माना आदिवासींना कथांद्वारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने त्यांच्या राजांविषयी काही माहिती आहे काय? हे जाणून घेण्यासाठी ''आपल्याला माना जमातीच्या राजांची नावे माहित आहेत काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविल्या आहेत.

## सारणी क्र. ४

## उत्तरदात्यांची माना राजांच्या संदर्भाने माहिती विषयक सारणी

| अ. क्र. | तपशिल | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ०१ | ०.५% |
| २ | नही | १९९ | ९९.५% |
| ३ | सांगता येत नाही | ०० | ०० |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, जरी एककांची निवड करतांना विविध वयोगटांची निवड करण्यात आली व सर्व स्तरांचे प्रतिनिधीत्त्व करतील अशाही एककांची निवड करण्यात आली तरी सुध्दा केवळ ०१ (०.५%) उत्तरदात्यांनी माना राजांची नावे बरोबर सांगितली व महत्तम १९९ (९९.५%) उत्तरदात्यांना राजांची नावे सांगता आली नाही.

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की, माना आदिवासी त्यांच्या इतिहासाविषयी अनभिज्ञ आहेत व त्यांना त्यांच्या अस्मितेबद्दल विशेष जागरूकता आहे असे वाटत नाही.

# संदर्भ सूची



| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | जुलमे टी.टी. | — | गोंडवनातील ऐतिहासिक मुलचेरा | पृ. ११, |
| | | — | पुरातत्व बौद्ध संस्कृती सेवा संघ | १२ |
| | | | चंद्रपूर —१९९२ | |
| २. | वाकडे भास्कर | — | मूळनिवासी माना | पृ. १६ |
| | | — | वज्रंकुस प्रकाशन वरोरा—२००६ | |
| ३. | वाकडे भास्कर | — | मूळनिवासी माना | पृ. १८ |
| | | — | कित्ता. | |
| ४. | चौधरी जानबा | — | एक मुलाखत | |
| | वय ८० वर्षे | — | दि. १० मार्च २०१० | |

## ६.५ समस्या :

## वास्तव्य, आधुनिकीकरण, डि.एन.ए चाचणी व कायदेविषयक

''आदिवासींचे आयुष्य अन्न, निवारा, शोधण्यातच संपते. वस्त्र ही त्यांच्या मते फारशी गरज नाही लज्जा रक्षणासाठी कमरेभावेती लंगोटी हेच त्यांचे वस्त्र असते. ऊन वारा, पाऊस, कडाक्याची थंडी यांच्याशी संघर्ष करीत जगताजगता त्यांचे शरीर बळकट झालेले असते केवळ पोट भरण्यासाठी त्यांच्या जीवाची तगमग चाललेली असते.''[१] या वाक्यात आदिवासींच्या समस्या एकाच वाक्यात अतिशय मार्मिकपणे मांडले आहे. सध्या सर्वत्र विकासाची धडपड सुरू आहे. त्यात आदिवासी समाजाच्या समस्या अतिशय महत्त्वाच्या आहेत श्रीमती पी.व्ही. यंग यांच्या मते, "In the study of community problems , it is essential to obtain an accurate aieount of the nature of the problems, their extent, their sources, their changing patterns, their effects on persons."[2] एम.जी. कुलकर्णीचे या संदर्भीत असे मत आहे की, "The problems pertaining to the tribals all over India have been again and again reviewed and various recommendation have bean made towards their solutions."[3] आदिवासी विकासासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांच्या संदर्भात एम.जी. कुलकर्णी लिहितात.'' In the post indepence period starting with the Backward classes commission headed by Acharya Kelkar, we have the Balwant Rai Mehta committee Report. Forty Eight Report of the Estimates committee of 1958-59 the report of the scheduled Areas and scheduled tribes commission headed by Shri U.N. Dheber in 1961 and the Report of the multipurpose tribal Development Blocks by verrier Elwin among others. There are also Annual Reports of the commissions for scheduled casts and scheduled tribes. The problem pinpointed by there various commission and the recommendations made by them towards their solution have certain conncurrence."[4]

रमेश थापर आदिवासींच्या समस्यांच्या बाबतीत लिहीतात, "No doubt there were instances of individuals and small tribal groups being absorbed within the caste system of Hindu India but such cases of assimilation attracted little attention and did not give rise to any special problems"[5] डॉ. प्रदीप आगलावे यांच्या मते, '' आधुनिक काळात खाणी, कारखाने, इत्यादी औदयोगिक क्षेत्रातील श्रमिक म्हणून आदिवासींचा एक नवा वर्ग निर्माण झाला आहे. औदयोगिक श्रमिक म्हणून का होईना परंतु आदिवासींचा संबंध औदयोगिक क्षेत्रांशी आला आहे. औदयोगिक श्रमिक असलेल्या आदिवासींच्या विविध समस्या निर्माण झालेल्या आढळून येतात.''[६]

वरील सर्व विवेचनावरून असे लक्षात येते की, विविध समाजशास्त्रज्ञांनी व विचारवंतांनी आदिवासींच्या समस्यांच्या संदर्भात विविध विधाने प्रकारे विवेचन प्रस्तुत केलेले आहेत. ढोबळमानाने आदिवासींच्या समस्यांचे वर्गिकरण करावयाचे झाल्यास त्यांच्या वास्तवासंबंधी, त्यांच्या संस्कृतीसंबंधी, त्यांच्या भाषेसंबंधी त्यांची अर्थव्यवस्था, त्यांचे राहणीमान, त्यांच्यातील होऊ घातलेले सामाजिक परिवर्तन, त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि त्यांची शैक्षणिक इत्यादी गरजासंदर्भाने त्यांचे कायदे, अधिकार, इत्यादीबाबतीत अनभिज्ञता आणि आधुनिककीकरणाच्या संदर्भाने त्यांच्या जीवनशैलीत होत असलेले परिवर्तन तर सर्वच पातळयांवर समस्याग्रस्त आढळतात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे इतर समस्यांच्या तुलनेत आदिवासी समाजाचे मागासलेपण, साधेभोळेपणा, अशिक्षितपणा, अल्पसंतुष्टता स्वभाव, नशिबावर आधारित जीवनपध्दती श्रध्दा, अंधश्रध्दांनी बुरसटलेल्या रूढी, परंपरा, अविकसित अर्थव्यवस्था व माहितीचा अभाव ही सर्व कारणे त्यांच्या समस्यांना कारणीभूत आहेत.

यासर्व कारणांच्याही मूळाशी महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचे दुर्गम भागातील वास्तव्य, त्यामुळे विकासाची गंगा त्यांच्यापर्यंत पोहोचतच नाही.

माना आदिवासीच्या बाबतही काही वेगळी परिस्थिती आहे असे म्हणता येणार नाही. माना आदिवासी ज्या ठिकाणी वास्तव्यास आहेत ती गावे अतिशय

दुर्गमस्थळी वसलेली आहेत. काही गावे तर घनदाट जंगलाच्या मध्यभागी असल्यासारखी आहेत. अभयारण्यामुळे आता त्यांना तेथून उठवून इतर ठिकाणी हालविण्याचे कार्य सुरू आहे. त्यांच्याजागी मोठमोठे रिसोर्ट तयार करून अतोनात पैसा कमविण्याचे काम सुरू होणार आहे. आणि त्या बदल्यात आदिवासींच्या हातावर मात्र तुरी दिल्या जात आहेत असेही म्हणावयास हरकत नसावी. तोही पैसा आदिवासी दारूवर उडवत आहेत. त्यामुळे त्यांची परिस्थिती स्थलांतरानंतर आहे त्याहीपेक्षा वाईट होण्याची दाट शक्यता आहे. ज्या घोडाझरी प्रकल्पासाठी घोडाझरी गावाचे स्थलांतर करण्यात आले त्या घोडाझरी गावाला त्या प्रकल्पाचे थेंबभरही पाणी शेतीसाठी मिळत नाही. उलट जंगली जनावरांचा त्रास व भिती आणि मुख्य रस्त्यापासून खूप खोलवर गाव असल्याने गावात जाण्यासाठी पक्की सडक नाही किंवा शासकिय वा वैयक्तिक वाहनेही नाहीत अशी आणि अशाप्रकारची परिस्थिती बहुतेक आदिवसी गावांतून पहायला मिळेल.

या संदर्भात माना आदिवासी ज्या गावांतून वास्तव्यास आहेत त्या गावांतील अडीअडचणी व समस्या जाणून घेण्याच्या दृष्टीने, ''अति दुर्गम भागात वास्तव्य असल्यामुळे आपल्याला कोणकोणत्या अडचणी जाणवतात?'' असा एक प्रश्न विचारण्यात आला. त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. १

## उत्तरदात्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी असलेल्या मूलभूत सोयींचा अभावदर्शक सारणी

| अ. क्र | गावाचे नाव | रस्त्याची सोय नाही | वाहनांची सोय नाही | दवाखान्याची सोय नाही | वर्षभर रोजगारांची सोय नाही | प्राथमिकच्या वर शिक्षणाची सोय नाही | समस्याची नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजुरा | × | × | × | × | × | ✓ |
| २ | घोडेझरी | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| ३ | चिंधीचक | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | खरबी | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| ५ | मासळ | × | × | × | ✓ | ✓ | × |
| ६ | उसराळा | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| ७ | उसराळा(चक) | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × |
| ८ | कोकेवाडा | × | × | ✓ | ✓ | ✓ | × |
| ९ | रत्नापूर | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| १० | वडसी | × | ✓ | × | ✓ | ✓ | × |
| ११ | खातोडा | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| १२ | गोदेंडा | × | ✓ | ✓ | ✓ | × | × |
| १३ | वाघेडा | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| १४ | अडेगाव | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × | × |
| १५ | खांबाडा | × | × | ✓ | ✓ | × | × |
| १६ | विहिरगाव | × | × | ✓ | ✓ | ✓ | × |
| १७ | पळसगाव | × | × | ✓ | ✓ | × | × |
| १८ | मालेवाडा | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| १९ | महादवाडी | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| २० | डोमा | × | × | × | ✓ | × | × |
| २१ | आंबेनेरी | × | × | × | ✓ | × | × |
| २२ | कपर्ला | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| २३ | मानेमोहाडी | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| २४ | बेंबळा | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| २५ | वायगाव | × | ✓ | ✓ | × | ✓ | × |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | नलेवर मोहाडी | × | × | × | ✓ | × | × |
| | एकूण वारंवारिता | १० | १६ | २१ | २४ | १७ | ०१ |
| | टक्केवारी | ३८. ४६% | ६१. ५३% | ८०.७६% | ९२.३०% | ६५.३८% | ३.८४% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, संशोधन विश्वातील २६ गावांचा एकक म्हणून अध्ययनात समावेश करण्यात आला. त्यापैकी एकूण १० (३८.४६%) गावांमध्ये पक्या रस्यांची सोय नाही आणि ज्या उर्वरित १६ गावांमध्ये पक्के रस्त्ये आहेत त्यापैकी बहुतके गावांतील रस्ते फुटलेले आहे व रस्यावर मोठमोठे गड्डे पडलेले आहेत. क्वचितच गावांत चांगले पक्के रस्ते आहेत एकूण १६ (६१.५३%) गांवामध्ये वाहनांची सोय नाही. तेथे कोणते ही शासकिय वाहन (बस) इत्यादी जात नाही. एखादी वैयक्तिक गाडीयेते. परंतु काही गावांत तर त्यांचीही अजिबात सोय नाही. त्यांना सायकल किंवा बैलगाडीने इतर गावांना जाण्याशिवाय पर्याय नाही. एकूण २१ (८०.७६%) गावांमध्ये दवाखाण्याची सोय नाही. तेथे आजुबाजुच्या गावांतील R.M.P. किंवा BEMS झालेले डॉक्टर येतात व साध्याभोळया आदिवासींना औषधे देऊन खूप पैशांनी लुबाडतात, असे निदर्शनास येते. शेती हा व्यवसाय वर्षभर रोजगार देत नाही. त्यामुळे हंगामाशिवाय इतर रोजगारावर लहान शेतकऱ्यांना व मजुरांना अवलंबून राहावे लागते. शिवाय वारंवार ओला कोरडा दुष्काळ पडल्याने शेतकऱ्यांनाही रोजगारावर अवलंबून राहावे लागते. त्यासाठी वर्षभर पूर्णपणे रोजगार उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य ठरते त्यामुळे मानवी शक्तीचा पूर्ण उपयोग देशाच्या विकासात केल्या जाऊ शकतो परंतु २४ (९२. ३०%) गावांमधून वर्षभर रोजगार मिळत नाही. याचे कारण त्यांच्या गावात किंवा गावाशेजारी कोणताही कामधंदा, कारखाना नाही. कोणतेही शासनाचे प्रकल्प नाहीत. त्यामुळे त्यांना रोजगार मिळत नाही जंगलावर आधारित विविध व्यवसाय ते करतात. परंतु आता विविध वनकायदयाने त्यांना जंगलाची संबंधित व्यवसायांवरही आता निर्बंध आले आहेत. परंतु काही ठेकेदार, वनरक्षक स्वत:च्या कायदयासाठी त्यांना सूट देतात

परंतु त्यांनी निर्माण केलेल्या वस्तुंना अतिशय कमी भावात खरेदी करतात. भितीमुळे व पर्याय नसल्याने आदिवासी त्यांना ते देतील त्या भावाने विकतात. एकूण १७ (६५. ३८%) गावांमध्ये प्राथमिकच्या वर शिक्षणाची सोय नाही त्यांना इतर गावांमध्ये पाचवी किंवा आठवीनंतरचे शिक्षण घेण्यासाठी पायी चालत जावे लागते. कित्येक विद्यार्थी त्यांना रोज पायी चालत जाण्याचा कंटाळा आल्यामुळे शाळा सोडून देतात. किंवा शाळेत जातांना अर्ध्यारिस्त्यातच खेळत बसतात. ०१(३.८४%) राजुरा गाव असे आहे जे पंचायत समिती असून शहर आहे. जेथे वरील मूलभूत समस्याच नाहीत. परंतु तेथे माना आदिवासींचे प्रमाण नगण्यच आहे. निव्वळ कामधंदयाकरीता व नोकरीकरीता गेलेलेच माना आदिवासी तेथे राहतात.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, माना आदिवासींच्या बऱ्याच समस्या त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणाशी संबंधित आहेत. जोपर्यंत त्यांच्या वास्तवाच्या ठिकाणाचा विकास व सुधार होत नाही तोपर्यंत त्यांच्या विकास होण्याचा कोणताही पर्याय नाही. कारण योजनेद्वारे एखादया कुटुंबाचा विकास होईल परंतु संपूर्ण गावातील आदिवासींचा विकास करण्यासाठी त्या भूभागाचा विकास करणेच अपरिहार्य आहे असे म्हणायला हरकत नसावी.

''स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक प्रयत्न करून देखील आदिवासी समाजाचे नष्टचर्य संपलेले नाही. आजही अनेक समस्यांना ते तोंड देत आहेत.''[७] डॉ. देशपांडे, डॉ. बोबडे व डॉ. बारबिंड या संदर्भात लिहीतात,'' भारतात आदिवासींची संख्या बरीच मोठी आहे. भारताच्या प्रगतीच्या दृष्टीने समाजाच्या एवढया मोठया समूहास दूर्लक्षून न प्रगती साधने देखील अशक्य आहे. म्हणूनच आदिवासींच्या समस्यांचा राष्ट्रीय पातळीवर एक राष्ट्रीय समस्या म्हणून विचार व्हावयास पाहिजे.''[८] पुढे ते म्हणतात, ''प्रगत लोकांचा आदिम लोकांशी आलेल्या संपर्कामुळे आदिम लोकांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या.''[९] वरील सर्व विवेचनावरून आपण असे म्हणू शकतो की प्रगत समाज आणि अप्रगत समाज दोहोंच्या संपर्कातून विकासाकडे वाटचाल होण्याऐवजी समस्यांची निर्मिती

होत आहे. ही एक अधोगती समजली जाण्यास हरकत नाही. परंतु काही काळानंतर मात्र यातूनच उपाय शोधले जाऊन इतर प्रगत समाजांप्रमाणे आदिवासी समुदायसुद्धा प्रगत होईल असे गृहीत धरण्यास हरकत नाही.

परंतु सध्या सर्वत्र आधुनिकीकरणाचा वाढता प्रभाव आणि प्रसारमाध्यमांद्वारे दाखविण्यात येणारी झगमगाट यामुळे आदिवासींही प्रभावित झाल्याखेरीज राहणार नाही. पंरतु तसे राहण्यासाठी व वागण्यासाठी आर्थिक पाठबळ मात्र त्यांच्याजवळ नाही औदयोगिकरणाने विविध सोयी सवलतींना जन्म दिला. पंरतु त्या सोयी–सवलतींचा उपयोग घेण्यासाठी ही आर्थिक पाठबळ असणे गरजेचे आहे. बैलबंडी आणि सायकलचा उपयोग करणारे आता बस आणि आटोचा प्रवास करायला लागले प्रत्येकाच्या खिशात मोबाईल वाजायला लागले चुलीची जागा गॅस शेगडया घ्यायला लागल्या तर घरातील वस्तू व घरांच्या रचनेतच बदल होऊ लागले. अंगावरील कपडयांमध्ये तर फार मोठा बदल झाला पंरतु हे परिवर्तन सर्वामध्येच आले का? संपूर्ण आदिवासी समजच बदलला का? सर्वांच्याच घरी गॅसच्या शेगडया, पंखे आणि टि.व्ही. आले का? सगळयांच्याच खिशात मोबाईल वाजतो का? पेहराव बदल झाला तरी तो घेणे सर्वांनाच परवडते का? सगळयांनाच बसचा प्रवास परवडतो का? शिक्षणाची संधी उपलब्ध झाली तरी महागडया शिकवणी लावून उच्च शिक्षण घेणे व कॉलेजांची मनमानी फी भरणे सर्वांनाच परवडते का? विकास हा शब्द सर्वांशीच संबंधित असतो. जेवणाच्या पंक्तीत बसून चारच जण पोटभर जेवले तर सर्वच जवेले असे म्हणता येत नाही. परंतु इतरांची प्रगती पाहून मागासलेल्यांचे मन मात्र नक्किच विषण्ण होते हेही तेवढेच खरे आहे. प्रामाणिकपणे मेहनत केल्याने माणूस श्रीमंत होत नाही हे आदिवासींच्या बाबतीत १००% खरे आहे असे सांगता येते. त्यामुळे श्रीमंत होण्याचे मार्ग नक्कीच वेगळे असतील असाही कयास बांधायला हरकत नाही.

याच संदर्भाने माना आदिवासीवर आधुनिकीकरणाचा काय प्रभाव पडला? त्यांच्या जीवनपध्दतीत कोणते परिवर्तन झाले? झाले की नाही? इत्यादी बाबतीत जाणून घेण्यासाठी'' आधुनिकीकरणाने आदिवासीची जीवनपध्दती बदलत आहे असे आपल्याला

वाटते काय?'' असा प्रश्न विचारण्यात आला त्याच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

**सारणी क्र. २**

**उत्तरदात्यांची आधुनिकीकरणाने त्यांच्या जीवनपध्दतीत होणाऱ्या बदलांबाबत मतदर्शक सारणी.**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | आधुनिकीकरण म्हणजे काय माहित नाही | ९७ | ४८.५% |
| २ | आधुनिकीकरणाशी संबंध नाही | ०५ | २.५% |
| ३ | नक्कीच बदल आहे | ०७ | ३.५% |
| ४ | अंशतः बदलत आहे. | ७० | ३५% |
| ५ | कोणताही प्रभाव पडला नाही | २१ | १०.५% |
| ६ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, आधुनिकीकरणाचा प्रभाव सर्वत्र जाणवत असतांना आधुनिकीकरण म्हणजे काय ही संकल्पना मात्र बऱ्याच लोकांना माहित नाही. माना आदिवासींमध्ये याबाबत बरीच अनभिज्ञता दिसून येते. घर आणि वावर म्हणणाऱ्या लोकांना आधुनिकीकरण कशाशी खातात याचाही गंध नाही. त्यामुळेच आधुनिकीकरण म्हणजे काय हे माहित नाही असे महत्तम ९७ (४८.५%) उत्तरदात्यांचे मत आहे. वाढत्या महागाईने कंबर मोडली असतांना पोटाची भूक शमविण्यासाठी ज्यांचा सारा दिवस शेतात, जंगलात किंवा कामाच्या ठिकाणी जातो व तेथे दिवसभर मेहनत केल्यावर रात्री भाकरी चटणी खाऊन (कांदा महाग झाल्याने चटणीही येथे परवडत नाही) निवांत झोप घेणे येवढेच त्यांचे आयुष्य त्यांचा खरोखरच आधुकिकरणाशी काय संबंध

राहणार! आधुनिकिकरणाशी संबंध नाही असे एकूण ०५ (२.५%) उत्तरदात्यांचे उत्तर आहे. त्यांच्या मते त्यांना आधुनिकीकरणाने काहीच मिळत नाही. म्हणून त्यांचा आधुनिकिकरणाशी संबंध नाही. जेथे सुशिक्षितांचा संबंध आहे. तेथे एकूण ७ (३.५%) उत्तरदाते नक्कीच बदलत आहे. असे मत व्यक्त करतांना दिसतात. त्यांना आधुनिकिकरण म्हणजे काय हे माहित आहे व त्यामुळे माना आदिवासींच्या आयुष्यात थोडफार बदल होत आहेत. हे मान्य आहे. अंशत: बदल होत आहे. असे एकूण ७० (३५%) उत्तदात्यांचे मत आहे. त्यांच्या मते आधुनिकिकरणाने गावांत वीज आली, पंखे आले, शेतांमध्ये ट्रॅक्टर आले, बुलडोजर आले, धान मळणी यंत्र आले. त्यामुळे आता आमचे कष्ट कमी झाले परंतु त्याचबरोबर मजूरी मिळणेही आता बंद झाले. आता वर्षभर रोजगार मिळत नाही. पूर्वी माना आदिवासी स्वत:च्या व इतरांच्या शेतात काम करीत. मात्र आता यंत्राने कामे लवकर होतात. त्यामुळे कोणी फारसे कामाला बोलावत नाहीत. त्यामुळे पुन्हा पोटाचा प्रश्न उभा राहीला. इतर कामे आम्हाला येत नाही, शासनही वर्षभर रोजगार देत नाही. ऐन सुगीच्या दिवसांत रोजगार हमीची कामे येतात. त्यामुळे दोघांपैकी एकच कामावर जावे लागते. त्यामुळे रोजगार हमीच्या कामाचाही पाहीजे तेवढा फायदा होत नाही. त्यामुळे पायी जाण्यापेक्षा आता मोटारगाडीने जाणे व धोतर लुगडयाऐवजी पँट साडी घालणे एवढे बदल होत आहेत. पोरं शेतावर न जाता शाळेत जात आहेत परंतु आठवी नववीपासून शाळा सोडून देतात.त्यांना दहावीचे कठीण विषय समजत नाही. ते नापास होतात. खेडयात शिकवण्या नाहीत व शाळेत गुरुजी आदिवासी म्हणून चांगले शिकवित नाही' त्यामुळे अंशत: बदल होत आहेत असे म्हणणाऱ्यांची संख्या लक्षात घेणे योग्य आहे. अगदीच नाराजीच्या सुरात कोणताही प्रभाव पडला नाही असे म्हणणारे एकूण २१ (१०.५%) उत्तरदाते आहेत. त्यांना वाटते की त्यांची परिस्थिती चिघळत चालली आहे. हातचेही गेले व दुसरेही नाही मिळाले त्यामुळे काय करावे हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झालेला आहे.

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की आधुनिकीकरणाचा प्रभाव माना आदिवासींवर ही पडत आहे. व त्यांची जीवनपद्धती अंशत: बदलत आहे.

सतत संघर्षमय जीवन जगणाऱ्या माना आदिवासींना काही इतर आदिवासीही त्रास देऊ लागले आहेत. पूर्वीपासूनच गोंड गोवारी माना असे ब्रीद प्रचलित असले तरी आरक्षणात भागीदार म्हणून वारंवार माना आदिवासींवर अन्यायच करण्यात येत आहेत. त्यांना खोटे आदिवासी म्हणून इतर आदिवासींकडून वारंवार त्रास दिल्या जात आहे. निव्वळ आरक्षणाचे भागिदार होतात. एवढयासाठीच त्यांचे अस्तित्व वारंवार नाकारले जात आहे. माना आदिवासी मेहनती आहेत. प्रमाणिक आहेत. त्यामुळे ते स्वत: मेहनतीने शिक्षण घेऊ पाहतात. नोकऱ्या मिळवू पाहतात. विकास करु पाहतात. परंतु इतके दिवस त्यांना अनुसूचित जमातीच्या यादीबाहेर ठेवल्याने व गोंडाची उपजमात संबोधल्याने विशेष मागास प्रवर्गाचा दर्जा देण्यात आल्याने इतर जामतींना आरक्षणाचा अधिक फायदा मिळाला. परंतु आता माना आदिवासींना स्वतंत्र आदिवासी जमात म्हणून न्यायालयाने मान्यता दिल्याने पुन्हा एकवार त्यांच्या विरोधकांनी डोके वर काढले आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र चौकशीसाठी गडचिरोली कार्यालयातून त्यांच्यासाठी पोलीस पथके पाठवण्यात येतात. त्यामुळे आधिच भित्रे आदिवासी अधिकच घाबरलेले आढळतात. मध्येच त्यांच्या विरोधात काही जणांनी डि. एन. ए. चाचणी करा असा नारा उठवला याबाबत जाणून घेण्यासाठी खरोखरच या माना आदिवासींना डि.एन.ए. चाचणी म्हणजे काय? हे माहीत आहे काय? हयाबाबत जाणून घेण्यासाठी ''सध्या आदिवासींची डी.एन. ए. चाचणाी करावी अशी मागणी होत आहे. याबाबत तुम्हाला काय वाटते? असा प्रश्न विचारण्यात आला त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दर्शविलेल्या आहेत.

## सारणी क्र. ३

## उत्तरदात्यांची डि. एन. ए. चाचणीविषयक मतदर्शाक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | डी. एन. ए. चाचणी काय आहे हे माहित नाही | १७७ | ८८.५% |
| २ | चाचणी करणे आवश्यक आहे. | १३ | ६.५% |
| ३ | चाचणी करणे आवश्यक नाहे | १० | ५% |
| ४ | चाचणी करु नये | ०० | ००% |
| ५ | यापेक्षा वेगळे उत्तर | ०० | ००% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की डी. एन. ए. चाचणी काय आहे हे माहित नाही. म्हणणारे महत्तम १७७ (८८.५%) उत्तरदाते आहेत. ग्रामीण भागात वर्तमान पत्र क्वचित येते व ते आले तरी वाचकवर्ग कमी असतो आणि वर्तमानपत्र वाचले तरी डी.एन.ए. चाचणी सारखी शास्त्रीय भाषा किती लोकांना समजणार! त्यामुळे साध्या भोळया निरक्षर लोकांना डी.एन.ए. चाचणी माहित नसणे योग्यच आहे. काही सुशिक्षित उत्तरदाते आहेत त्यांनी डी.एन.ए. म्हणजे काय ते समजून घेतले आहे. हे १३(६.५%) उत्तरदाते चाचणी करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त करतात. चाचणी करणे आवश्यक नाही असे एकूण १० (५%) उत्तरदात्यांचे मत आहे. त्यांना वाटते की आम्ही आदिवासी आहोत. हे सर्वांना माहित आहे व स्वयंसिद्धच आहे. त्यामुळे अशाप्रकारची चाचणी करणे म्हणजे आदिवासींवर अन्याय करणेच आहे. चाचणी करु नये असे कोणत्याही उत्तरदात्याचे मत नाही.

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की डी. एन.ए. चाचणीविषयी माना आदिवासी अनभिज्ञ आहेत. त्यामुळे त्यांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन त्यांच्या डी. एन.

ए. चाचणीची मागणी करणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणेच होय असे म्हणायला हरकत नाही.

शरयु अनंतरराम व उमा बंडसे यांच्या मते, ''सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे कायदा हे एक महत्त्वाचे साधन आहे. कायदयाच्या आधारेच समाजात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचा राज्यघटनेचा मानस आहे.''[१०] प्रा. विजय देशपांडे, प्रा. प्रकाश बोबडे व प्रा. भगवान बारबिंड यांच्या मते, ''समाजातील लोकनिती देखील काही आवश्यक कृतींची आवश्यकता दाखवितात. म्हणून अनेक समाजातून आवश्यक अशा काही लोकनीतींचे रुपांतर प्रत्यक्ष कायदयात झालेले दिसून येते. त्यासंदर्भात विंग्जले डेव्हिस यांनी केलेली व्याख्या आपल्या विवेचनाशी जुळणारी अशीच आहे. ते म्हणतात, ''जेव्हा विशिष्ट संघटनेद्वारा लोकनीतींची अंमलबजावणी होते तेव्हा त्या लोकनीतींना कायदा म्हणतात.''[११] अशाच प्रकारे आदिवाासींच्या लोकनीतींचे त्यांच्या कायदयात रुपांतर झाले आणि स्वातंत्र्यापर्यंत आदिवासी समाज त्यांचेच कायदे पातळ आले. परंतु स्वतंत्र भारतात आता त्यांना भारतीय संविधानाने केलेल्या कायदयाप्रमाणे चालावे लागते. परंतु सध्या कायदयांमध्ये वारंवार दुरुस्त्या होत आहेत. त्यामुळे हे नवनवीन कायदे आदिवासींच्या स्वतंत्र व स्वच्छंदी जीवपद्धतीवर अनेक बंधने लादल्यासारखीच आहेत. आदिवासींचा जंगलावर प्रथम अधिकार, परंतु सध्या त्यांनाच जंगलात जाण्याची बंदी आहे आणि त्यासाठी जंगलाच्या संरक्षणाचे कारण पुढे केले जाते. त्यासंदर्भात श्रीमती शोभा फडणवीस यांचा संदर्भ आधीच आलेला आहे की, आदिवासींनी जंगले कधीच नासधूस केली नाहीत. परंतु १९८० च्या वनकायदयाने शेतकऱ्यांच्या, गावकऱ्यांच्या बांबूकामगारांच्या अधिकारावर गदा आली. सर्वांचे निस्तार हक्क रद्द झाले. शेतकऱ्यांपुढे शेती अवजारांचा, गावकऱ्यांपुढे जळाऊ लाकडांचा, बांबुकामगारांपुढे बांबूचा प्रश्न उभा राहिला. अशा प्रकारे कायदयाच्या बडग्यात आदिवासींसमोर आर्थिक समस्या निर्माण झाली. परंतु यासंदर्भात आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावीत म्हणतात,'' आदिवासी आणि परंपरागत वननिवासी यांना हक्काचे उदरनिर्वाहाचे साधन मिळावे यासाठी परंपरागत वननिवासी अधिकारांची मान्यता

अधिनियम कायदयाची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरु आहे या कायदयामुळे राज्यातील आदिवासींना आता हक्काची शेतजमीन मिळणार आहे. त्यामुळे त्यांना उपजिविकेसाठी निश्चित साधन उपलब्ध होईल. अनुसूचित जमातीचा इतर पारंपारिक वनावरील हक्क व वहीवाटीला मान्यता देण्यासाठी अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वननिवासी कायदा २००६ मंजूर करण्यात आला आहे. या कायदयाची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. वन जमिनीवरील अनुसूचित जमाती आणि इतर परंपरागत वननिवासींचा ताबा १३ डिसेंबर २००५ पूर्वी असायला हवा परंपरागत वननिवासींचा ताबा १३ डिसेंबर २००५ पूर्वी तीन पिढयांपासून म्हणजेच ७५ वर्षांपूर्वीपासून आवश्यक आहे. कायदयाच्या अंमलबजावणीमुळे आदिवासींना जमिन मिळेल त्यांना गौण वनोपजाचा वापर करणे त्याची विक्री करणे शक्य होईल. आदिवासींच्या हक्कांचा निर्णय होत नाही तोपर्यंत त्यांना वन जमिनीवरुन बेदखल करता येणार नाही. त्यांना विविध योजनांचा फायदा मिळणार आहे.''[१२] आदिवासींचे संरक्षणात्मक कायदयांच्या संदर्भात यापूर्वीचा योजनांच्या प्रकारणात सविस्तर चर्चा केलेली आहे. अशाप्रकारे आदिवासींच्या संदर्भात भारतीय संविधानात अनेक संरक्षणात्मक कायदे केलेले आहेत. त्यातील सर्वात महत्त्वपूर्ण कायदा म्हणजे अनुसूचित जाती जमातीसाठी असलेला ॲट्रासिटी ॲक्ट जी आदिवासींच्या अस्मितेची रक्षा करतो व आदिवासींना सन्मानाने जगण्याची हमी देतो. परंतु आदिवासींना या कायदयाच्या संदर्भात कितपत माहिती आहे हा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे.

माना आदिवासींना त्यांच्यासाठी असलेल्या कायदयात्मक तरतुदींची कितपत माहिती आहे? त्यांवर त्यांच्या अधिकारांविषयी कितपत माहिती आहे. न्याय मिळविण्यासाठी कायदे माहित असणे आवश्यक असते. त्यामुळे यासंदर्भात माना आदिवासींना कायदयाचा संदर्भात कितपत माहिती आहे हे जाणून घेण्यासाठी, ''आदिवासींसाठी संविधानात असलेल्या कोणकोणत्या सुरक्षात्मक कायदयांची आपल्याला माहिती आहे?'' असा प्रश्न विचारण्यात आला त्यांच्या प्रतिक्रिया पुढील सारणीत दिलेल्या आहेत.

## सारणी क्र. ४

## उत्तरदात्यांचे कायदयांच्या संदर्भात माहितीदर्शक सारणी

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | कायदयांविषयी माहिती असणारे (थोडेफार) | ६ | ३% |
| २ | कायदयांविषयी माहिती नसणारे | १९४ | ९७% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, कायदयांची थोडीफार माहिती असणारे फक्त ६ (३%) उत्तरदाते आहेत. त्यांना एवढेच माहिती आहे की, आदिवासींना शेती कुणासही विकता येत नाही व आदिवासींना जंगलातील वाळलेली लाकडे आणता येतात. अॅट्रासिटी अॅक्ट बद्दल जेवढे अनुसूचित जातीमध्ये जागृतता दिसून येते त्यांच्या थोडीही अनूसूचित जमातीत जागृतता दिसून येत नाही, असे निदर्शनास येते. कोणतेही कायदे माहित नसणारे महत्तम १९४ (९७%) उत्तरदाते आहेत आणि ही संख्या लक्षात घेण्यासारणी आहे.

वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, माना आदिवासी सुशिक्षित असोत की निरक्षर त्यांना कायदयाच्या बाबतीत विशेष ज्ञान नाही आणि ते जाणून घेण्यात त्यांना कोणताही रस नाही. कायदयाबद्दलची त्यांची अनभिज्ञता त्यांच्यावरील अन्यायाला पोषक ठरणारीच आहे असे म्हणावयास हरकत नाही.

माना आदिवसींच्या व जवळवास सर्वच आदिवासींच्या समस्यात व उपाययोजनांच्या संदर्भात वर्तमानपत्र व विविध मासिकांमधून विविध बातम्या व प्रतिक्रिया छापून येतात. परंतु इतर आदिवासींच्याप्रमाणेही वा त्यांच्यापेक्षा वेगळयाही ज्यादाच्या समस्या माना आदिवासींच्या बाबतीत आढळून येतात. त्यांच्या समस्यांच्या बाबतीत छापून येणाऱ्या काही प्रतिक्रिया व बातम्यांचे विवेचन संशोधिकेला प्रस्तूत करणे गरजेचे वाटले. त्यांचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे आहेत.

**समस्या :–**

१) आदिवासी युवक नोकरीपासून वंचित केंद्रीय राखीव पोलीस दलाची भरती नुकतीच गडचिरोली येथे पार पडली. शारीरीक सर्व योग्यता असतांना केवळ जात प्रमाणपत्र मराठीत असल्याने एका आदिवासी युवकाला नोकरीपासून वंचित राहावे लागले आहे. (लोकमत चंद्रपूर २४/५/११)

आदिवासींकडे असणारे इंग्रजीतील सर्व जात प्रमाणपत्र मराठीत करुन ह्या असा शासनाचा निर्णय आहे, आदेश आहे. मात्र हा उलटा निर्णय घेतला गेला असे संशोधिकेला म्हणावेसे वाटते.

२) पारंपारिक वननिवासी वनहक्काच्या प्रतीक्षेत शासनाने आदिवासी व पारंपारिक वननिवासी यांच्या उत्थानासाठी वनहक्क कायदा पारित केला असून त्याची अंमलबजावणी जोमात सुरु आहे. अनेकांना हक्काच्या वन जमिनीचे पट्टे वाटप करण्यास आले असताना मात्र राजोली परिसरातील एकाही लाभार्थ्यांना अजूनही याचा लाभ मिळाला नसून येथील वनहक्क समितीच्या उदासीनतेमुळे लाभार्थ्यांचे दावे धुळ खात पडले असल्याचे बोलले जात आहे. (लोकमत चंद्रपूर १३/२/२०१०)

राजोली परिसरात माना आदिवासींची बरीच मोठी वस्ती आहे.

३) आदिवासी विकास खात्यात कोटयावधीचा भ्रष्टाचार आदिवासी विकास खात्याच्या (नागपूर) येथील कार्यालयाने प्रकल्प अधिकारी केशव बावनकर यांनी कोटयावधींच्या खरेदीमध्ये केलेल्या भ्रष्ट्राचाराच्या चौकशीचे आदेश आदिवासी विकास राज्यमंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिले आहे. (लोकमत २३/१२/२००८)

४) आदिवासी विभागाला अधिकारच नाहीत फक्त निधीचे करणारा विभाग, अधिकार ह्य आदिवासी विकास विभाग हा केवळ निधीवाटय करणारा आहे. या विभागाला निधी असला तरी यंत्रणा नाही. ज्या कामांना निधी दिला त्यांना पुन्हा काम झाले की नाही, हे विचारण्याचा अधिकार नाही. अशी व्यथा आदिवासी कल्याणमंत्री बबनराव

पाचपुते यांनी विधान परिषदेत मांडली तर आपल्याला अधिकार द्या, नाहीतर निधाी देणे बंद करु, असा इशाराही त्यांनी जाहीरपणे दिला. (लोकमत २८/७/२०१०)

५) आदिवासी की बिगर आदिवासी ठरविण्यासाठी घेणार डी. एन. ए. चाचणी आपण आदिवासी असल्याचा दावा अनेकजण करतात. मात्र त्यासाठी आवश्यक असलेले कागदोपत्री पुरावे त्यांच्याजवळ नाहीत. यामुळे संबंधित व्यक्ती आदिवासी आहे की बिगर आदिवासी हे ठरविण्यासठी डी.एन.ए. चाचणी करण्याचा प्रस्ताव आदिवासी विभागाच्या विचाराधीन असून लवकरच त्यावर शिक्का मोर्तब होणार आहे. (लोकमत २०/१/२०१०)

६) जंगलात राबणाऱ्या आदिवासी मजुरांची लुट बारमाही जंगलात राहून पोट भरणाऱ्या आदिवासी मजुरांची एफ. डी. सी. एम. कर्मचाऱ्यांकडून लुट सुरु आहे एफ. डी.सी. एम. ची मोठया प्रमाणात रोपवनाची कामे कन्हाळगाव, झरण परिक्षेत्रात सुरु आहे. मात्र जंगलात धोका पत्करुन कामावर राबणाऱ्या मजुराचे आर्थिक शोषण केल्या जात असल्याची कॅफियत, चिवंडा येथेल मजूर नामदेव टेकाम, कालिदास आत्राम यांनी लोकमतपुढे मांडली. (लोकमत चंद्रपूर ११/७/२०११)

७) आदिवासी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांच्या नशिबी उपासमार शिकण्याची इच्छा मात्र कुटूंबाची हलाखीची परिस्थिती त्यामुळे शासकीय आदिवासी वस्तीगृहात राहून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याची धक्कादायक बाब भद्रावती येथील शासकीय आदिवासी वसतीगृहात उघडकीस आली. (लोकमत चंद्रपूर २०/१२/२००८)

८) आदिवासी आश्रमशाळेतील दहावी बारावीचा दर्जा खालावला आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर शासन लाखो रुपये खर्च करुनही आदिवासी आश्रम शाळेतील दहावी बारावीचा निकाल दरवर्षी खालावत आहे. यावर्षी आदिवासी आश्रमशाळेतील दहावीतील ११८७ विद्यार्थ्यांपैकी ६५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर ५३५ अनुत्तीर्ण

झाले. बारावीच्या ५०० विद्यार्थ्यांपैकी २१८ उत्तीर्ण तर २८२ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले असून केवळ ४३% निकाल लागला आहे. (देशोन्नती चंद्रपूर १/७/२०११)

.९) माना जमातीची शेकडो जात पडताळणी प्रकरणे प्रलंबित मानाही जमात अनुसूचित जमातीत समाविष्ठ असताना वैधता समिती गडचिरोली कडून जात वैधता प्रमाणपत्र दिले जात नसल्याने शेकडो प्रकरणे प्रलंबित आहेत. यासंबंधीचे निवेदन देण्यासाठी गडचिरोली कार्यालयात गेलेल्या शिष्ट मंडळाला शरद चव्हाण नामक अधिकाऱ्याने शिवीगाळ व अपमाना स्पद वागणूक दिली. (लोकमत चद्रपूर १५/६/२०१२)

१०) आदिवासी उपयोजनेची अपेक्षित कार्यपद्धती कागदावरच राज्याच्या एकूण ३ लाख ७ हजार ७१३ चौ. कीमी. भौगोलीक क्षेत्रापैकी १६.५ टक्के म्हणजे ५० हजार चौरस किमी क्षेत्राखाली राबविण्यात येणारी 'आदिवासी उपाययोजना' राज्यातील ८५ लाख ६६ हजार आदिवासींना अंधारातून उजेडाकडे नेणारी आहे. मात्र गेल्या दहा वर्षापासून आदिवासी उपयोजनेचा अपेक्षित कार्यपद्धतीला बगल देऊन चाणक्षपणे आकडयांचा खेळ मांडल्या जात असल्याने आदिवासीप्रती असलेल्या शासनाच्या उत्तरदायित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. (देशोन्नती ३/१२/२०१०)

**उपाययोजना:—**

१) आदिवासी जिल्हयांमध्ये ८२ इंग्रजी शाळांना मान्यता राज्यातल्या आदिवासी मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना इंग्रजीतून शालेय शिक्षण देण्याची महत्वाकांक्षी योजना आदिवासी विकास विभागाने आखली असून येत्या शैक्षणिक वर्षासाठी १६ आदिवासी जिल्हयांमध्ये ८२ शाळांना मान्यता दिली असल्याची माहिती आदिवासी विकासमंत्री बबनराव पाचपुते यांनी आज येथे दिली. (देशोन्नती ८/२/२०१०)

२) आदिवासींची सर्वकर्ष विकास हेच ध्येय देशाचा खऱ्या अर्थाने समन्यायी विकास करावयाचा असल्यास सर्व समाज घटकांना बरोबर घ्यावे लागणार आहे. उपेक्षितांना मुख्य प्रवाहात आणावे लागेल. त्याचाच एक भाग म्हणून आदिवासींच्या विकासावर अधिक लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. (म. शासन. लोकराज्य मासिक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई डिसेंबर २००९ प्र. क ३०)

वरील सर्व बाबींचा सखोल विचार केल्यास असे निदर्शनास येते की आदिवासींच्या समस्यांना वारंवार वाचा फोडली जाते. त्यांचा उहापोह केल्या जातो व नवीन योजना उपायात्मक आखल्या जातात परंतु पुन्हा त्या योजना राखडतात आदिवासींपर्यंत पोहोचत नाहीत व पुन्हा नव्याच समस्या निर्माण होतात. जोपर्यंत आदिवासींविषयी सर्वांनाच मनातून आपुलकी वाटणार नाही सर्वत घटक त्यांच्या उत्थानासाठी प्रेरित होणार नाही तो पर्यंत आदिवासींच्या समस्यांवर कदाचित तोडगा निघणार नाही. असेही संशोधिकेला म्हणावयास जागा उरते.

# संदर्भ सूची


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. प्रा.जांभुळे सरीता | — | सुगावा मासिक डिसें २००२ | पृ. १८ |
| | | — | सुगावा प्रकाशन — पुणे. | |
| २. | Young Pouline V. | — | Scientific Social Surreys and Research Fourth Edition. | पृ.५३७ |
| | | — | Prentice Hall of India – Private Ltd. New Delhi. | |
| ३. | Kulkarni M.G. | — | Problems of Tribal Development A case study. | पृ.३३३ |
| | | — | Parimal Prakashan Aurangabad | |
| | | — | First Published 1974- | |
| ४. | Kulkarni M.G. | — | Problems of Tribal Development A case study. | पृ.३३३ |
| | | — | कित्ता. | |
| ५. | Thapar Romesh | — | Tribe, caste and Religion in India. | पृ. ०२ |
| | | — | The macmillan Company, of India. | |
| | | — | Seminar publication Meerut. | |
| ६. | आगलावे प्रदीप | — | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र | पृ.१६४ |
| | | — | साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती ऑगस्ट —२००४ | |
| ७. | डॉ. देशपांडे विजय | — | सांस्कृतिक मानव शास्त्र | पृ.१७९ |
| | डॉ. बोबडे प्रकाश | — | श्रीपाद मुंजे विद्या प्रकाशन रूईकर मार्ग | |
| | डॉ. बारबिंड भगवान | | | |
| | | — | नागपूर प्रथमावृत्ती १५ जुलै १९८१. | |
| ८. | डॉ. देशपांडे विजय | — | सांस्कृतिक मानव शात्र | पृ.१७९ |
| | डॉ. बोबडे प्रकाश | — | कित्ता. | |
| | डॉ. बारबिंड भगवान | | | |
| ९. | डॉ. देशपांडे विजय | — | सांस्कृतिक मानव शात्र | पृ. २९ |
| | डॉ. बोबडे प्रकाश | — | कित्ता. | |
| | डॉ. बारबिंड भगवान | | | |
| १०. | अनुवादक अनंतराम | — | भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान | पृ. ०१ |
| | शरयू | — | पॉप्युलर प्रकाशन — मुंबई | |
| | बंडसे उमा | — | प्रथमावृत्ती —१९०९ | |
| ११. | डॉ. देशपांडे विजय | — | सांस्कृतिक मानव शास्त्र | पृ.१७३ |
| | डॉ. बोबडे प्रकाश | — | कित्ता. | |
| | डॉ. बारबिंड भगवान | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | डॉ. गावीत विजयकुमार<br>आदिवासी विकास मंत्री | — | एक मुलाखत 'लोकराज्य' मासिक<br>नोव्हे. २००८ | पृ. ३७ |
| | शब्दांकन विष्णु काकडे<br>मुंबई | — | माहिती व जनसंपर्क<br>महासंचलनालय मुंबई. | |

# प्रकरण ७ वे

# सारांश व निष्कर्ष

## ७.१ सारांश

### प्रस्तावना :

मानव हा सामाजिक प्राणी आहे आणि म्हणून इतर प्राण्यांपेक्षा वेगळा आहे. प्राण्यांना कोणत्याही जातीधर्माची वा संस्कृतीची गरज वाटली नाही. त्यांना पोटासाठी जगणे व पोटासाठीच लढणे समजते. परंतु मनुष्य हा विचारशील प्राणी आहे. त्याने विवाह, कुटुंब, समूह, जात, धर्म, वर्ग इत्यादी संस्थाची निर्मीती केली. त्यातूनच मग अनेक विकसित संस्था जसे सामाजिक, शैक्षणिक, राजनैतिक संस्था निर्माण झाल्या आणि मानवाने स्वत:ला विकसित म्हणणे सुरू केले. त्यात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारावर आधुनिकीकरणाची घोडदौड सुरू झाली आणि सर्वत्र औदयोगिकरणाने मानवाचे भौतिक जीवन उजळून निघाल्याचे चित्र आज सर्वत्र उभे केले जात आहे. आधुनिकीकरणाच्या युगात तंत्रज्ञानाचा मोठा गाजावाजासह वापर होतांना प्रत्येकाच्या घरोघरी तंत्रज्ञानाने जागा व्यापलेली दिसते. भारतदेशही आता विकसनशील म्हणत म्हणत बऱ्याच बाबतीत विकसित व स्वयंपूर्ण झालेला आहे आणि थोडयाच अवधित संपूर्ण विकसित होईल असे चित्र सध्या प्रसार माध्यमांकडे दृष्टीक्षेप टाकताच डोळयापुढे उभे केले जात आहे. परंतु खेडयापाडयांतून, दुर्गम भागांतून जंगलापहाडांतून, डोंगरदऱ्यांतून वास्तव्यास असलेला दुर्बल, मागासलेला, दारिद्रयरेषेखाली जगणारा, तळागाळातील माणूस मग तो अनुसूचित जातीतील असो वा अनुसूचित जमातीतील असो खरेच विकसित भारताच्या परिभाषेत मोडतो काय? असा प्रश्न संशोधिकेला पडला आणि तिच्या सभोवती असलेला 'माना' आदिवासी समाज नजरेसमोर आला. दिवसभर अन्नासाठी ढोरमेहनत करणारा व योजनांच्या अपेक्षेने स्वत:च्या मतांना मुठभर चिवडा व घुटभर दारूसाठी विकण्याला बळी पडणाऱ्या इतर आदिवासी व मागासवर्गीय समाजासारखा समस्यांचा विळख्यात उभा असलेला तरीही स्वत:तच आनंदी व संतुष्ट

असलेला. आदिवासी क्षेत्र म्हणजे अधिकारी व पदाधिकाऱ्यासाठी योजना आखणे व पैसाच पैसा कमविणे असा अलिखित नियमच बनला आहे असे वाटते. त्यामुळे अशा साध्याभोळया निरक्षर, अशिक्षित आदिवासींना लुबाडण्याचे काम अगदी सहज सोपे आहे असेच सर्वांना वाटत असावे असे निदर्शनास येते भ्रष्टाचाराचा कळस म्हणजे आता इतरही लोक आदिवासींच्या नावाने व आदिवासींना भूल देऊन त्यांच्या योजनांचा कायदा घेत असल्याचे आढळते.

गेली १८ वर्षे शिक्षिकेची नोकरी करतांना माना आदिवासी जमातीतील विद्यार्थी शैक्षणिक दृष्टया अतिशय मागासलेल्या स्थितीत आढळले. अभ्यास करणे, शिक्षणाची चिकाटी, विद्यार्थी व आईवडीलांची शिक्षणाच्या बाबतीतली महत्त्वाकांक्षा हया कोणत्याही बाबी त्यांच्यात दिसल्या नाहीत. पहाटे उठून अध्ययन करणे, पाठांतर करणे यापेक्षा त्यांना ध्यान करणे, फेरी काढणे अशाप्रकारे कार्य करणे जास्त महत्त्वाचे वाटते. जिथे एकीकडे माना जमातीच्या शेजारी घरे असणारी त्याच गावांतील इतर जातीचे लोक व मुले चिकाटीने व जिद्दीने शिक्षण घेतांना दिसतात व नोकऱ्या मिळवतांना किंवा नोकरी मिळण्याची अभिलाषा बाळगतांना दिसतात तिथे त्यांच्याच सोबत राहतांना माना आदिवासी समाज असा निरस का आहे? दहावीपर्यंत मोठया मुश्किलीने शिकणे, चुकून संपूर्ण गावातून एखादाच विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी बाहेरगावी जाणे व नोकरी मिळविणे हेच दृष्य सतत डोळयांपुढे असतांना वारंवार एकच प्रश्न पडला. असे का? याच्या मागे काय कारणे आहेत? आणि ही कारणे जाणून घेण्यासाठी उत्सूकतावश आणि त्याचप्रमाणे कुठेतरी या माना आदिवासी जमातीला न्यायमिळावा, त्यांच्याकडेही सर्वांचे लक्ष जावे त्यांनाही भारताच्या विकास प्रक्रियेत आणण्यासाठी प्रयत्न केले जावे यासाठी संशोधिकेने ''चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासीचे समाजशास्त्रीय अध्ययन'' करण्याचे ठरविले. यासाठी माना आदिवासींचा संपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, ऐतिहासिक इत्यादी बाबतीत सद्यस्थिती व परिवर्तन या सर्वांगाणे अध्ययन करण्याचे ठरविले. तसे माना जमातिबद्दल विविध ग्रंथातून फारसे लिखाण आढळत नाही. अगदी क्वचितच एखादया ठिकाणी माना जमातीचा उल्लेख आढळतो.

त्यामुळे माना आदिवासींचा अभ्यास करतांना दुय्यम स्त्रोतांपासून तथ्य गोळा करणे एक आव्हानात्मक कार्यच ठरले.

''महाराष्ट्र शासनाच्या अनुसूचित जमातीच्या (जनजाती) यादीत १८ व्या क्रमांकावर 'माना' आदिवासी जनजातीची नोंद आढळते.''[१] परंतू माना आदिवासींना स्वत:च्या अस्तित्वासाठी अनेकवेळा संघर्ष करावा लागला वा लागत आहे. त्यामूळे माना आदिवासींचे अध्ययन करणे खरोखरच एक मोठेच आव्हान ठरले. खरे पाहता संशोधन ही एक अत्यंत जटिल प्रक्रिया आहे. असे असले तरी संशोधन करणे ही ज्ञानप्राप्ती व जिज्ञासेपोटी मानवाची ज्ञानार्जनाची भूक भागविण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व आवश्यक कार्य आहे. सदर संशोधन करण्यापूर्वी संशोधिकेने संशोधन विषयाबाबत मार्गदर्शकांशी सांगोपांग चर्चा केली व त्यानंतर समस्येची निश्चिती केली. समस्या निश्चित करतांना संशोधिकेने समस्ये संदर्भात सविस्तर अध्ययन केले व संशोधन पूर्व अध्ययनाच्या आधारावर स्वत:ची कुवत लक्षात घेऊन विषय निश्चित केला. ''चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी माना जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन'' विषय निश्चिती व समस्या सूत्रगणानंतर त्या समस्येशी संबंधित संपूर्ण संशोधनातून आलेल्या शब्दांचे अर्थ व कार्यात्मक व्याख्यांचे अभ्यासपूर्ण व सविस्तर विवेचन पहिल्या प्रकरणात केलेले आहे, ते पुढीलप्रमाणे–

## १) भारतीय समाज :

रा.ज. लोटे यांच्या मते, ''समाज म्हणजे समूहात राहणाऱ्या व्यक्तिंच्या सामाजिक संबंधाची व्यवस्था होय.''[२] वास्तविकत: भारतीय समाजव्यवस्था अत्यंत गुंतागुंतीची व वास्तविक क्लिष्ट आहे आदिवासी जमातीतही उपजमाती आणि उपजमाती गटात देवकावरून पुन्हा वेगवेगळया गटात विभागणी झाल्याचे आढळते. त्यामुळे आदिवासी जमातीचे अध्ययन करतांना वेगवेगळया उपगटांनाही सूक्ष्मपणे तपासणे, अभ्यासणे आवश्यक ठरते अशाप्रकारे भारतीय समाजाविषयी सांगोपांग चर्चा करण्यात आली.

## २) आधुनिकीकरण :

पाश्चात्तीकरण संकल्पनेच्या मानाने आधुनिकीकरणाची संकल्पना व्यापक आहे. ''कार्ल मार्क्स यांच्या मते, 'आधुनिकता म्हणजे वस्तुकरण होय.' मॅक्स वेबर यांच्या मते, आधुनिकता म्हणजे बुध्दीप्रामाण्यवाद किंवा तार्किकता होय.''[३] आधुनिकीकरणाने औदयोगिकरणाला व औदयोगिकरणाने आधुनिकीकरणाला चालना दिल्याने या प्रक्रियेने अनेक समस्यांनाही जन्म दिला आहे. आदिवासी समाजातील भौतिक परिवर्तन ही आधुनिकीकरणाची देन असली तरी त्यांच्या अभौतिक संस्कृतित गोंधळ निर्माण झाल्याचे दिसते या संदर्भाने आधुनिकीकरणाची चर्चा करण्यात आली.

## ३) परिवर्तन :

परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. आदिवासींच्या परिवर्तनाच्या संबंधाने प्रा. माणिक चंद्रकांत माने म्हणतात, ''आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी विकास महामंडळ, रस्ते बांधणी, उदयोगधंदयांना प्रोत्साहन, वाहतूकीच्या व दळवळणाच्या साधनांचा प्रसार, जंगलतोड, आदिवासींना संरक्षण देण्यासाठी केलेले विविध कायदे इत्यादी कारणांमुळे आदिवासी समाजामध्ये हे परिवर्तन होत आहे.''[४] यासंदर्भाने परिवर्तनाची कार्यात्मक व्याख्या चर्चा केल्या गेलेली आहे.

## ४) आदिवासींचे वास्तव्य :

'आदिवासी' शब्दाची कार्यात्मक व्याख्या करतांना आदिवासींच्या संबंधाने येणारी संपूर्ण माहिती जसे आदिवासींचे वास्तव्य, आदिवासींची वैशिष्टये इत्यादीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रा. वक्काणीजींच्या मते, ''चंद्रपूर जिले मे सन १९३४ में एक लाख चौदहजार नौ सौ उन्तालीस वनवासी लोग थे। तेलंगाणा से लगे हुये चंद्रपूर जिले के कुछ प्रदेश में तेलगु संस्कृती की छाप है। गोण्डवाना तथा आदिवासी संस्कृती की विशेषताएँ चंद्रपूर, नागपूर, तथा भण्डारा जिले में दृष्टीगोचर होती है।[५] यावरून चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी समूह मोठया प्रमाणात वास्तव्यास होता व आहे हेच लक्षात आहे. याचे महत्त्वाचे कारण चंद्रपूर मधील जंगली प्रदेश हाही आहे.

## ५) अनुसूचित जमात :

आदिवासींच्या संबंधाने आपोआपच अनुसूचित जमातीची ही कार्यात्मक व्याख्या करणे क्रमप्राप्त ठरते '' डॉ. बी.आर. आम्बेडकर यांच्यामते, The word Adivasi is really a general term, which has no specific legal demure connotation where as the word scheduled tribes has a fixed meaning because it enumerates the tribes. In the event of the matter being taken to a court of low there should be a pracise definition as to who these Adivasis are. It was therefore decided to enumerate the Adivasis under the term to be called 'Scheduled tribes.[6] भारतीय संविधानाच्या अनुंच्छेद ३६६ चे खंड २५ मध्ये अनुसूचित जमातीच्या व्याख्या दिलेल्या आहेत. १९ (२) अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) या संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुच्छेद ३४२ अन्वये ज्यांना अनुसूचित जमाती म्हणून मानण्यात आले आहे अशा जमाती किंवा जमातीचे समूह अथवा अशा जमातीचे किंवा जमातीच्या समूहाचे भाग अथवा अशा जमातींमधील किंवा जमातींच्या समूहातील गट असा आहे. थोडक्यात सांगावयाचे तर अनुसूचित जमाती म्हणजे सुरूवातीपासून भारतात वास्तव्यास असलेल्याचे आढळून आलेल्यांची जमातीची यादी होय. अशाप्रकारे अनुसूचित जमातीविषयी चर्चा करण्यात आली.

## ६) संरचना :

या संदर्भाने माना तसेच इतर आदिवासींच्या बाबतीत विवरण देण्यात आले. आदिवासी समाजातील संरचना हया अगदी साध्या व सोप्या पध्दतीच्या असतात त्यांच्यात फार गुंतागुंत नसते कारण आदिवासी समाजात समाजिक संस्था हया अतिशय साध्या व सहज असतात परंतु आता आधुनिकीकरणाने आदिवासी समाजातील संस्थामध्ये व पर्यायाने संरचनांतही हळूहळू गतीने बदल जाणवायला लागले आहेत.

## ७) अध्ययनाचे महत्त्व :

गुरूनाथ नाडगोंडे यांच्या मते, ''आदिम समाजाच्या अभ्यासाचे महत्त्व सामाजिक मानव शास्त्रज्ञांच्या दृष्टीकोनातून समजून घेणे तर अगत्याचे आहेच पण त्याचबरोबर जीवनाच्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींना वाटत असलेल्या आदिमांच्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात घेतले पाहीजे. प्रशासक, सामाजिक कार्येकर्ते, शेती अधिकारी, धर्मप्रचारक, खाणमालक, मळेवाले, शैक्षणिक संस्था, आंतरराष्ट्रीय संघटना इत्यादी विविध थरातील व्यक्ती व संस्था आदिम जीवनाचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.''[७] आदिवासींच्या अध्ययनाचे महत्त्व वेगवेगळया दृष्टीने पुढीलप्रमाणे सांगता येतील. निव्वळ चिकित्सक म्हणून, इतिहास जाणून घेण्यासाठी, धर्मप्रसारासाठी, विकासात्मक योजना आखण्यासाठी. माना आदिवासींच्या संदर्भात या अध्ययनाचे महत्त्व असे की, माना आदिवासी समाज कित्येक वर्षापासून स्वत:च्या अस्तित्त्वसाठी संघर्षरत असलेला दिसून येतो. कधी तो गोंडराजासारख्या आदिवासी सोबत तर कधी स्वत:ला अनुसूचित जमातीच्या यादीत स्वतंत्र दर्जा मिळावा म्हणून शासनासोबत. त्यामुळे आजपर्यंत माना हे आदिवासीच आहेत हे अभ्यासकांनी आपल्या पुस्तकात लिहीले असूनसुध्दा त्यांना स्वत:ला अनुसूचित जमातीच्या यादीत स्थान मिळविण्यासाठी स्वत:चेच अस्तित्त्व वारंवार सिध्द करावे लागत आहे. आजही त्यांना जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मोठया दिव्यातून समोरे जावे लागत आहे. आदिवासी माना असूनही त्यांना जात वैधता पडताळणी प्रमाणपत्रासाठी (फक्त त्यांनाच इतर आदिवासी जमातींना नाही.) त्यांना पोलीस चौकशीला तोंड दयावे लागत आहे. त्यांच्या चौकशीसाठी पोलीस पथकाची नेमणुक करण्यात आली आहे. आधीच आपल्या इतिहासाविषयी अनाभिज्ञ असणाऱ्या माना समाजाला साध्या सरळ लोकांना विविध प्रकारांनी आदिवासी नसल्याचे ठरविण्यासाठी त्रास देण्यात येत आहे. त्यामुळे कित्येक मानांना जात वैधता प्रमाणपत्रा अभावी आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागत आहेत. तर विद्यार्थ्यांना अनेक शैक्षणिक अडचणी येत आहेत. त्यामुळेही माना आदिवासींचा समाजशास्त्रीय अभ्यास– एक आव्हानात्मक विषय ठरतो. माना आदिवासीची वैशिष्टयेच

नव्हे तर समस्याही इतर आदिवासीप्रमाणेच असल्याचे जाणवते. त्यामुळे विकासशील भारताच्या संदर्भात आदिवासींच्या अध्ययनाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

**अध्ययन क्षेत्राची रूपरेषा :**

महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हा तांडोबाअंधारी व्याघ्रप्रकल्प असलेला ज्याच्यात व्याघ्र प्रकल्प म्हणजे वाघांची अधिक संख्या आणि पर्यायाने जंगले अधिक असलेला जिल्हा आहे. अशा चंद्रपूर जिल्हयातील गोंड ही प्रमुख आदिवासी जमात आहे आणि त्यांच्याच नावाने त्या प्रदेशाला पूर्वीपासून 'गोंडवाना' असे संबोधिले जात आहे आणि त्याचबरोबर 'माना' ही सुध्दा एक प्रमुख जमात चंद्रपूर जिल्हयात आढळून येते. सदर संशोधनाकरीता 'माना' जमात आधिक्य असणाऱ्या चंद्रपूर जिल्हयाची निवड अध्ययन क्षेत्र म्हणून केलेली आहे.

**१) चंद्रपूर जिल्हयाची भौगोलिक माहिती :**

भौगोलिक परिस्थितीचा मानवाच्या राहणीमानावर व मानवाच्या भौगोलिक परिस्थितीवरही प्रभाव पडतो. त्यामुळे त्यांची 'संस्कृती' ही त्या भौगोलिक परिस्थितीनुरूप बनत जाते. त्यामुळे विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी समाजाचे समाजशास्त्रीय अध्ययन करतांना त्या भौगोलिक क्षेत्राचे सूक्ष्म अध्ययन अथवा पूरेपूर माहिती संशोधकाला असणे आवश्यक ठरते. म्हणून संशोधिकेने चंद्रपूर जिल्हयाचे विविध स्तरावरून अध्ययन केलेले आहे.

**२) भौगोलिक स्थान :**

''चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणपूर्व भागात १८.४ ते २०.५ या उत्तर अक्षांशावर व ७८.५ ते ८०.६ या पूर्व रेखांशावर या भौगोलिक पट्टयामध्ये वसला आहे. जिल्हयाच्या उत्तरेला नागपूर, भंडारा, वर्धा हे जिल्हे असून पूर्वेस गडचिरोली जिल्हा आहे. दक्षिणेस आंध्रप्रदेशातील आदिलाबाद जिल्हा असून पूर्व सीमा वैनगंगा नदीने मर्यादित करून पश्चिम व दक्षिण सीमांचे रेषांकन वर्धा व वैनगंगा नदया

व माणिगड टेकडयांनी केलेले आहे.''[८]

## ३) **खनिजे :**

भिन्न काळात तयार झालेल्या खडक प्रकारामधून उपलब्ध असलेली विविध प्रकारांची विपुल खजिन संपत्ती हे जिल्हयाचे वैशिष्टय होय. जिल्हयात दगडी कोळसा, लोखंड, चुनखडी, बॅराईटस् क्रोमाईट इत्यादी खनिजाचे फार मोठे साठे आहेत.

## ४) **वनसंपत्ती –**

विपुल आणि उत्कृष्ठ वनसंपत्ती हेही जिल्हयाचे वैशिष्टय आहे. जिल्हयात एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ४१.५० टक्के क्षेत्र वनाखाली आहे. जिल्हयात उत्कृष्ठ दर्जाचे सागवान लाकूड मोठया प्रमाणात उत्पादित होते. याशिवाय जळाऊ लाकूड व तेंदूपत्ता, बांबू डिंक, मोहफूल इत्यादी वनउपजही मोठया प्रमाणात मिळतात.

## ५) **वन व वन्यपशू पक्षी :**

''२००१ च्या माहितीनुसार जिल्हयातील ५०८४ चौ किमी क्षेत्र वनाखाली असून जिल्हयाच्या क्षेत्रफळाशी त्याचे प्रमाण ४७.५४: आहे.''[१८] वनांमध्ये हेन, बिवळा, धावना, हळदी, आवळा, बेहडा, गराडी, खैर, मोह, चार, टेमरू, अंजन, कुळा, बाहवा, माली व सर्वात महत्त्वाचे सागवान तथा बांबूचे उत्पादन मोठया प्रमाणावर आहे. त्यावर आधारित विविध उदयोग आहेत वनांतून डिंक, लाख, हिरडा, बेहडा, आवळा तसेच चार, मोहफुले फळे व तेंदुपत्ता इत्यादी प्राप्त होतो.

वन्यपशूंपक्षांमध्ये हरीण, रानमांजर, मोर, घोरपड, सरपटणारे प्राणी, निलकंठ, भारद्वाज, दोन शेपटयांचा लहान बलुबुल प्राणी व पक्षी प्रामुख्याने वनांतून आढळतात त्याचप्रमाणे जंगलामध्ये वाघ, सिंह, अस्वल हे प्राणी आढळतात. परंतु त्यांचे प्रमाण आता कमी होत आहे. जंगलात माकडे, लांडगे रानकुत्री, रानडुकर, ससा, पानकोंबडी, निलगाय इत्यादी प्राणी आढळतात.

## ६) हवामान, पर्जन्य, कृषी –

सर्वसाधारणपणे जिल्हयाचे हवामान विषम आहे. म्हणजेच उन्हाळयात अतिउष्ण व हिवाळयात अतिथंड असते. संपूर्ण राज्यात चंद्रपूर जिल्हयाचे उष्णतामान सर्वाधिक असते हे समजावयास हरकत नाही.

जिल्हयाचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान १२२५.६१ मिमी असून सर्वात जास्त सरासरी पाऊस सिंदेवाही १५०४.२ मिमी पडतो. तर सर्वात कमी पाऊस चिमूर या तालूक्यात ८९०.५ मिमी पडतो.

जिल्हयात विविध प्रकारची जमीन आढळते. जसे काळी, कन्हाळ, मोरांड, रेताड किंवा बरडी आणि पांढरी या स्थानिक नावाने ओळखल्या जातात. वर्धा नदीच्या खोऱ्यातील काळया कसदार जमिनीत कापूस, गहू, डाळी आणि ज्वारी अशाप्रकारची कोरडवाहू पिके तर वैनगंगा खोऱ्यातील काळसर जमिनीत प्रामुख्याने भाताचे पिक घेण्यात येते.

## ७) जिल्हापरिषद व पंचायत समित्या –

१०,६९५ चौ किमी क्षेत्रफळ असलेला चंद्रपूर जिल्हा आकारमानाने महाराष्ट्र राज्यात १४ व्या क्रमांकावर असून हे क्षेत्र राज्यात ३.५ टक्के आहे जिल्हयाचे मुख्यालय चंद्रपूर हे असून एकूण १५ पंचायत समित्या आहेत. त्यात चंद्रपूर, भद्रावती, वरोरा, चिमूर, नागभिड, ब्रम्हपूरी, सिंदेवाही, मूल, सावली, गोंडपिपरी, राजुरा, कोरपना, बल्लापूर, पोंभूर्णा व जिवती हया आहेत. सर्वात जास्त ओसाड खेडी चिमूर तालूक्यात एकूण ७५ आहेत व चिमुर मध्येच यांना आदिवासींची संख्या सर्वाधिक आहे.

## ८) लोकसंख्या :

जनगणना २००१ नुसार भारतातील अनूसूचित जमातीची लोकसंख्या ८.४३ करोड म्हणजे ८.२८ टक्के आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या ९६,८७८,६२७ असून अनुसूचित जमातीची लोकसंख्या ८५,७७,२७६ म्हणजे ८.९ टक्के आहे.[१०]

## ९) **व्यवसाय :**

जिल्हयातील ७९ टक्के लोक शेतीवरच आपली उपजिविका करतात जिल्हयातील चिमूर नागभिड, ब्रम्हपूरी, सिंदेवाही, मूल, या पूर्वेकडील भागात भात हे प्रमुख पिक असून इतर तालूक्यात ज्वारी व कापूस ही प्रमूख पिके आहेत. सध्या सोयाबिनचा प्रमुख पिकांत समावेश होतो.

जिल्हयातील आदिवासी साधारणपणे शेती तसेच जंगलाशी संबंधित व आधारित व्यवसायात गुंतलेले आहेत. लाकूड तोडणे, मोहफुले जमा करणे जंगलातील तेदूंपत्ता गोळा करणे, बांबूपासून डाल व ताटवे विणणे तसेच शेती करणे व शेतीवर मजूरीची कामे करणे इत्यादी कामे माना आदिवासी व इतर आदिवासी ही प्रामुख्याने करतांना आढळतात.

## १०) **औदयोगिकरण :**

च्द्रंपूर हा जिल्हा औदयोगिकदृष्टया मागासलेला आहे. जरी तेथे वनसंपत्ती व खनिजसंपत्ती विपुल प्रमाणात आहे. याची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन औदयोगिक विकास होण्याच्या दृष्टीने येथे नविन कारखाने सुरू व्हावे या उद्देशाने कारखाने सुरू करणाऱ्यांना गुंतवणुकीच्या १५ टक्के अनुदान व इतर सवलती जाहीर केल्या आहेत त्याशिवाय महाराष्ट्र शासनाकडून यंत्र व सामुग्री खरेदीकरीता एकूण गुंतवणुकीच्या ३५ टक्के अनुदान ही दिल्या जाते. महाराष्ट्र शासनाने पडोली येथे एक औदयोगिक क्षेत्र विकसित करून त्या ठिकाणी उदयोजकाला जमीन, वीज, पाणी यासारख्या मूलभूत सोयी सवलतीच्या दराने एक याप्रमाणे कागद, पोलाद, मॅगनीज, रेफ्रीजरेटर, निर्माण करण्याचे कारखाने आहेत. तसेच दोन औष्णिक विदयुत केंद्र आहेत. बल्लारशा, चंद्रपूर, भद्रावती हा औदयोगिक पट्टा असून तेथे पेपरमील, सिमेंट कारखाना, रेफ्रीजरेटर कारखाना, डिफेन्स कारखाना व इतर किरकोळ स्वरूपाचे उदयोग आहेत. जिल्हयात सर्वत्र भातगिरण्या, पोहे गिरण्या व शेती मासेमारी व यंत्रावर आधारित व्यवसाय सुरू आहेत.

## ११) आदिवासी समुदाय :

जिल्हयात २० टक्के लोक आदिवासी आहेत. महाराष्ट्रातील आदिवासीचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ९.८ टक्के आहे. जिल्हयातील आदिवासींमध्ये गोंड, कोलाम आणि पारधान या प्रमख जमाती आहेत. २००६ पासून माना जमातीचा समावेश महाराष्ट्र शासनाच्या अनुसूचित जनजातीच्या यादीत १८ व्या क्रमांकावर झालेला आहे. (सध्या १७ व्या क्रमांकावर)

## १२) जिल्हयातील अनुसूचित जाती / जमाती –

जिल्हयातील २००१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या

एकूण ३,७५,२५६

पुरूष १,९०,५५८

स्त्रिया १,८४,६९८

शहरी ५६,२८९

ग्रामीण ३,१८९६७

एकूण लोकसंख्येशी प्रमाण १९.७०%

१००० पुरूषांमागे स्त्रियांचे जिल्हयातील प्रमाण ९४८

ग्रामीण ९६७

शहरी ९०० जिल्हयातील अनुसूचित जातीची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार २,९९,५३३ आहे यापेक्षा अनुसूचित जमातीची लोकसंख्या जास्त आहे. त्यामुळेच जिल्हयात शासकिय आश्रमशाळा २३ व आश्रमशाळा (समजाकल्याण) १० आहेत.

## १३) चंद्रपूर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

चंद्रपूर जिल्हयाला ऐतिहासिक दृष्टया अतिशय महत्त्व आहे. 'गोंडवाना' म्हणून चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयाला स्वत:चा असा प्राचीन इतिहास आहे तर 'चिमूर क्रांतीमुळे' देशाच्या स्वातंत्र्य लढयात चंद्रपूर जिल्हयाला मोलाचे स्थान मिळाले आहे.

''मौर्य, गुप्त, सातवाहन, चाणक्य, यादव, गोंड, ब्रिटीश, नागपूरकर भोसले अशा अनेकांची कारकीर्द या प्रदेशांनी पाहीली आहे सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट, नागवंशीय माना यांच्याही राजवटी या प्रदेशाने अनुभवलेल्या आहेत. हिंदू आणि बौध्द राजांनी या प्रदेशावर बराच काळ राज्य केले. त्यानंतर माना राजांनी चंद्रपूरवर राज्य केले. त्यानंतर इ.स. नवव्या किंवा १२ व्या शतकात गोंड राजांनी त्यांच्याकडून सत्ता काबीज केली.''[११] गोंड राजांनी इ.स. १७५१ पर्यंत राज्य केले त्यानंतर मराठयांचे राज्य सुरू झाले. मराठयांचा शेवटचा राजा रघुजी भोसलेचा मृत्यू इ. स. १८५३ मध्ये झाला. त्यांच्या गादीला वारसा नसल्यामुळे नागपूर, आणि चंद्रपूर चे राज्य ब्रिटिश राज्याला जोडल्या गेले त्यानंतर इ.स. १८५४ पर्यंत चंद्रपूर स्वतंत्र जिल्हा होते आणि इ.स. १८७४ पर्यंत त्यात मूल, वरोरा आणि ब्रम्हपूरी अशा तीन तहसिली होत्या. इ.स. १९५६ च्या कायदयाप्रमाणे चंद्रपूर जिल्हयाचे मध्यप्रदेशातून बाम्बे राज्यात स्थानांतर झाले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मीतीपासून म्हणजेच इ.स. मे १९६० पासून चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्राचा भाग आहे. इ.स. १९८२ मध्ये चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन होऊन गडचिरोली या नव्या जिल्हयाची निर्मिती झाली''[१२]

''आज चंद्रपूर हे नाव प्रचलित असलेला जिल्हा प्राचीनकाळी 'लोकापूर' या नावाने ओळखला जात असे याचेच नामांतर काही काळानंतर 'इंद्रपूर' आणि त्यानंतर चंद्रपूर असे झाले ब्रिटीशांच्या कारकीर्दीत हा जिल्हा चांदा या नावाने ओळखल्या जाऊ लागला. सन १९६४ मध्ये चांदा हे नाव बदलून पुन्हा चंद्रपूर असे करण्यात आले..''[१३]

## १४) 'माना' जमातीचा इतिहास —

डॉ. सौ. शैलजा देवगावकर यांच्या मते, ''चंद्रपूर व आसपास माना

लोकानी सुमारे दोनशतके गोंडवाना भागात राज्य केले रसेल ॲण्ड हिरालाल 'माना लोकांना 'द्रविडीयन' म्हणतात. मुख्यतः शेतकरी आणि शेतमजूर असे हे लोक आहेत. मूळ वंशाबाबत (origin obscure) असे शब्द म्हणजे अस्पष्ट अव्यक्त असा शेरा देण्यात आलेला आहे. मात्र मेजर ल्यूसी स्मिथ (१८६९) यांनी त्यांच्या Chanda settlement Report मध्ये मानांच्या बाबत लिहीतांना म्हटले आहे की, गोंडाच्या पूर्वी अहेरीजवळ सूरजागड आणि माणिकगड पहाडीभागात माणिकगड येथे माना लोकांचे राज्य होते. दिसायला ते गोंडासारखे आहेत ते सुदृढ बांध्याचे असून स्वभावाने प्रमाणिक व उदयोगी आहेत. सैनिकी पेशाच्या योग्य बेरच गुण त्यांच्यात असले तरी आता त्यांनी त्यांच्या तलवारी म्यानात आणि ढाली भिंतीवर ठेवल्या आहेत. आणि शेती या व्यवसायात ते रमले आहेत. श्री हिस्लॉप (paper on the aboriginal tribes of the central provinces) आपल्या प्रस्तुतच्या लेखात म्हणतात गोंडाचे जे मंत्री होते (सरदार म्हणा) जे शकून वगैरे सांगत असत त्यांच्यात माना ओझा हे होते ते आपल्या पवित्रतेला अत्यंत जपत असत. कोणत्याही इतर जातींच्या हातचे खात नसत.''[१४] भास्कर वाकडे यांच्या मते, '' माना हे नागवंशियांचे वंशज आहेत.''[१५]

**संशोधन पध्दती :**

संशोधन ही एक जटील प्रक्रीया आहे हे माहित असूनही संशोधनकर्ता जेव्हा संशोधनाचे कार्य हाती तेव्हा नक्कीच त्याच्या समोर कोणतातरी उद्देश असतो किंवा कोणतीतरी समस्या असते. त्यासाठी तो संशोधन करण्यास प्रेरीत होतो आणि संपूर्ण संशोधन कार्य पूर्ण होईपर्यंत तो स्वतःला त्यात गुंतवून घेतो डॉ. सदा कऱ्हाडे यांच्या मते, ''एखादे तत्त्व अथवा वस्तुस्थिती शोधून काढतांना तसेच एखादया गोष्टीची निश्चिती करण्याकरीता केलेले परिक्षण पूर्वक अन्वेषण, काळजीपूर्वक, चिकित्सपूर्ण चौकशी अथ्वा तपासणी म्हणजे संशोधन.''[१६] अशा संशोधन कार्याची रूपरेषा ठरवितांना कोणत्या पध्दतीने संशोधन कार्य केले पाहीजे याची रूपरेषा ठरविणे व त्या पध्दतीने काम करणे महत्त्वाचे असते. या तत्त्वाला अनुसरूनच जेव्हा संशोधिकेने संशोधनाचे कार्य हाती घेतले तेव्हा सर्वप्रथम संशोधन पध्दतीचा विचार करणे व वैज्ञानिक दृष्टया

संशोधनाचे कार्य पायरीपायरीने यशस्वीरित्या पूर्ण करण्याची जबाबदारीही तिच्यावर आलीच त्यामुळे संशोधन कार्याच्या पध्दतीचा सूक्ष्म अभ्यास करून संशोधिकेने त्याप्रमाणे आपल्या कार्याची रूपरेषा आखली.

**१) संशोधन समस्या :**

संशोधिकेने स्वत:ची कुवत, खर्च, वेळ व आवड या सर्वाचा विचार करून मार्गदर्शकांशी चर्चा करून ''चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी माना जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन'' हा विषय संशोधनाकरीता निश्चित केला.

**२) अध्ययनाचा उद्देश :**

संशोधिकेने पुढीलप्रमाणे सैधांन्तिक उद्देश निश्चित केले.

१) माना जमातीच्या मूळ संरचनेचे व त्यात झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे तसेच माना जमातीतील सांस्कृतिक परिवर्तनाचे अध्ययन करणे.

२) माना जमातीचे ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक तसेच आर्थिक व राजकीय याबाबतील सद्यस्थितीचे अध्ययन करणे.

३) माना जमातीसाठी जिल्हयात उपलब्ध असलेल्या सोयी व सवलतीचा त्यांच्या विकासासाठी कितपत उपयोग झाला या विषयीचे अध्ययन करणे.

४) आधुनिकीकरणाचा माना जमातीवर किती प्रभाव पडला तो मानांना साधक आहे की बाधक आहे याबाबत सविस्तर मिमांसा करणे.

वरील उद्देश ठरवितांना संशोधिकेला पडलेल्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरे शोधणे अपेक्षित होते. त्यात एकूणच माना जमातीत इतर सममाजाच्या देखादेखी परिवर्तन होत आहे काय? आणि ते जर होत असेल तर ते इतर समाजांच्या तुलनेत संथ आहे काय? समान आहे काय? की जलद आहे? आणि त्याची दिशा उर्ध्व आहे की अधो आहे? या सर्वांची मिमांसा करणे, विवेचन करणे हे ही उद्दिष्ट या अध्ययनाचे आहे.

## ३) उपकल्पना/गृहीतके

संशोधिकेने संशोधन प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी समस्येशी संबंधित काही दुय्यम स्त्रोतांवरुन व प्राथमिक स्त्रोतांवरुन प्रारंभिक अध्ययन केले व त्यावरुन पुढील उपकल्पना/गृहीतके बांधलीत

१) माना जमात त्यांच्या इतिहासाविषयी अनभिज्ञ आहे. त्यांच्या अस्मितेविषयी माना जमात विशेष जागरुक नाही तसेच माना जमात कष्टाळू, अल्पसंतुष्टी व नशिबावर विश्वास ठेवणारी आहे.

२) माना जमात आर्थिक, शैक्षणिक, बाबतीत मागासलेली आहे असे निदर्शनास

येते तसेच माना जमात सद्यस्थितीत जुन्या रुढी, चालिरिती, परंपरा, श्रद्धा यांनी बुरसटलेली आहे. त्यांना त्यांच्या अधिकारांची विशेष जाणीव नाही असे वाटते.

३) शासनाच्या सोयी व सवलतींचा माना जमातीच्या विकासासाठी विशेष फायदा झालेला नाही असे निदर्शनास येते.

४) राजकीय क्षेत्रात माना जमात जागृत होत आहे. व राजकारणात सहभाग घेऊ लागली आहे.

५) माना जमातीतील अंतर्गत संरचनेत आधुनिकीकरणाचा प्रभाव जाणवत नाही.

संकलित माहितीच्या आधारावर वरील गृहीतकृत्ये पडताळून पाहणे ही संशोधिकेची संशोधनामागील मुळ भुमिका आहे.

## ४) संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधन केवळ माना आदिवासी समाजाच्या सद्यस्थिती व त्यांच्या जीवनशैलीत, समाजाच्या विविध अंगात, संस्थात झालेल्या किंवा न झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करून मिमांसा करणे एवढेच असल्याने संशोधिकेने फक्त वर्णनात्मक संशोधन आराखडयाचाच उपयोग केला.

## ५) नमुना निवड योजना –

संशोधिकेकडून प्रस्तुत संशोधनात समग्रातून दोन प्रकारचे नमुने निवडण्यात आले– १) तालुका नमुना २)उत्तरदात्यांचा नमुना

संशोधिकेकडून वरील दोन्ही प्रकारचे नमुने निवडण्यासाठी संभाव्यता व गैरसंभाव्यता अशा प्रकारची निवड करण्यात आली. तालुक्यांचा नमुना निवडण्यासाठी प्रयोजन व स्वनिर्णय नमुना पध्दतीचा, तर उत्तरदात्यांचा नमुना निवडण्यासाठी क्षेत्र नमुना पध्दतीचा उपयोग करण्यात आला.

### अ) तालुक्यांचा नमुना –

चंद्रपूर जिल्हयात एकूण १५ तालुके आहेत. त्यामुळे संशोधिकेने संपूर्ण जिल्हयातील सर्व तालूक्यांचे अध्ययन केले. सर्वेक्षण केले तेव्हा तिच्या असे लक्षात आले की माना आदिवासी हा संपूर्ण जिल्हयात पसरलेला नाही. तर काही ठराविक तालुक्यांतच त्यांची वस्ती एकवटलेली आहे व इतर तालुक्यांत नोकरी किंवा कामानिमित्तच ते गेलेले असून तिथे त्यांची संख्या नाममात्रच आहे. त्यामुळे ज्या तालुक्यात माना आदिवासींची दाट वस्ती आहे. अशा मूल, सिंदेवाही, नागभिड, चिमूर, वरोरा, भद्रावती व राजुरा इत्यादी तालुक्यांची निवड संशोधिकेने केली.

### ब) उत्तरदात्यांचा नमुना :

उत्तरदात्यांचा नमुना निवडतांना संशोधिकेने एकूण ०७ तालूक्यांतील २६ गावांची निवड केली. त्यात प्रत्येक गावातील किमान १ ते जास्तीत जास्त २० एककांची निवड नमुना म्हणून करण्यात आली. माना आदिवासींची चंद्रपूर जिल्हयातील लोकसंख्येचा विचार करता त्यांच्या प्रमाणात एकूण २०० एककांची नमुना म्हणून निवड करण्यात आली. त्यात सर्व वयोगटाचे, विविध शैक्षणिक, वैवाहिक, कौटुंबिक व आर्थिक स्तराच्या एकाकांचा समावेश करण्यात आला. जरी स्वनिर्णयाने एककांची निवड केली तरी संपूर्ण माना समाजाचे ते प्रतिनिधत्व करतील याची दखल घेण्यात आली.

माना जमात खेडयात, दुर्गम भागात व ग्रामीण किंवा कामधंदयासाठी शहरात राहतांना आढळतात. चंदूपर जिल्हयातील चिमूर तालूक्यातील 'भिसी' या गावाच्या परिसरात विशेषत: माना आदिवासींची संख्या अधिक प्रमाणात आढळते. त्यानंतर सिंदेवाही, वरोरा, भद्रावती तसेच मूल, नागभिड इत्यादी तालुक्यांतून विरळ प्रमाणात त्यांचे वास्तव्य आढळून येते. संशोधिकेने राजुरा, नागभिड, भद्रावती, मूल, सिंदेवाही, चिमूर, वरोरा इत्यादी एकूण ०७ तहसिलीतील राजुरा, खरबी, चिंधीचक, घोडाझरी, मासळ, चक, उसराळा, काकेवाडा, रत्नापूर, नलेश्वर मोहाडी, वडसी, खातोडा, गोंदोडा, वाघेडा, अडेगाव, खांबाडा, विहीरगाव, पळसगाव, मालेवाडा, महदवाडी, डोमा, आंबेनेरी, कपली, माने–मोहाडी, बेबंळा, वायगाव, इत्यादी एकूण २६ गावांतील एकूण २०० एककांचा समावेश संशोधनासाठी केलेला आहे. व त्यांच्या मुलाखती, निरिक्षण व मुलाखत अनुसूचि इत्यादी तंत्राद्वारे माहिती गोळा करून त्यांचे सुक्ष्मपणे अध्ययन केलेले आहे. त्यात १६१ (८०.५% ) पुरूष व ३९ (१९.५%) स्त्रियांचा समावेश केलेला आहे. त्याचप्रमाणे विविध वयोगटातील १८ वर्षे व त्यावरील उत्तरदात्यांचा समावेश केलेला आहे. त्यामुळे अध्ययनातील नमुन्यात विविधता आलेली आहे. सामाजिक स्तरावरील विविध वैवाहिक दर्जा असलेले तसेच विविध कौटुंबिक प्रकारातील वेगवेगळी अपत्य संख्या असलेले एकक  समाविष्ट करण्यात आले.

## ६) तथ्य संकलनाची पध्दती –

संशोधिकेचा अध्ययन विषय आदिवासी समाजाशी संबंधित असल्यामुळे प्रस्तुत अध्ययनात तथ्य संकलनासाठी संशोधिकेकडून मुलाखत , मुलाखत अनूसूची व निरिक्षण यादी प्राथमिक तथ्य सामग्रीचा तथ्य संकलनासाठी उपयोग केला त्याचप्रमाणे दुय्यम स्त्रोतांमध्ये प्रकाशित साहित्य, अप्रकाशित साहित्य कार्यालयीन कागदपत्रे, वर्तमानपत्र, मासिके इत्यादी लिखित साहित्याचा उपयोग करण्यात आला.

संशोधन विश्वातील आदिवासी हे अधिकतर अशिक्षित, निरक्षर आहेत. पण सुशिक्षित आदिवासी सुध्दा एखादा फार्म भरायला किंवा माहीती लिहून दयायला

हिम्मत करीत नाही. त्यामुळे त्यांच्या भावभावना, आचार–विचार, संस्कृती, जीवनशैली, जीवनपध्दती, राहणीमान या सर्व बाबींचा अभ्यास करण्याकरीता उपयुक्त असणारी मुलाखत अनुसूची तयार करतांना. १) आवृत्त प्रश्न व २) मुक्त प्रश्न अशा दोन्ही प्रकारच्या प्रश्नांचा उपयोग करण्यात आला. तर काही ठिकाणी मुक्त स्वरूपाची निव्वळ चर्चात्मक मुलाखत घेण्यात आली. मुलाखत अनुसूची भरतांना मुलाखत देणारा तसेच त्याच्या सोबत इतरही जमलेल्या लोकांचे विचार जाणून घेण्यात आले.

माना जमातीविषयी लिखित सामग्री अतिशय त्रोटक स्वरूपात आढळली त्यामूळे त्यांच्या ऐतिहासिक, शैक्षणिक बाबतीत जाणून घेण्यासाठी सध्या जे शिक्षित आहेत, सामाजिक कार्येकर्ते व राजकारणी आहेत. ज्यांनी थोडया प्रमाणात माना जमातीचा इतिहास शोधून काढण्याचा प्रयत्न केला त्याचप्रमाणे माना जमाती विषयी लिखाण केलेले आढळले त्यांच्या मुलाखती चर्चात्मक पध्दतीने घेण्यात आल्या.

दुय्यम स्त्रोतांद्वारे माना जमातीचा ऐतिहासिक व इतर सद्यस्थितीतील परिवर्तन जाणून घेतांना माना जमातीबद्दल ज्याज्या ठिकाणी लिखीत स्वरूपात सामग्री आढळली त्याचा उपयोग संशोधिकेने सदर संशोधनात केला. त्यात वर्तमान पत्रे, मासिके, जिल्हा वार्तारंग, वेबसाईट तसेच इतर ग्रंथामधून एकत्रित करण्यात आली तसेच समाजशास्त्रात एखादया समुहाचे निरिक्षण करतांना ते जसे आहे त्याच परिस्थितीत ते केले तर त्याचे विश्वसनीय व योग्य ज्ञान मिळते. त्यामुळे संशोधिकेने अनियंत्रित निरिक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे.

### ७) तथ्य प्रक्रियन (Data Processing)

तथ्य संकलनाच्या विविध पध्दतीचा उपयोग केल्यानंतर प्राप्त झालेल्या तथ्याचे तथ्य प्रक्रियन व सारणीकरण ही संशोधनातील पुढची पायरी समजली जाते. तथ्य प्रक्रियन सर्वसाधारणपणे दोन पध्दतीने केले जाते. एकंदर संपूर्ण काम हाताने केले जाते त्याला हस्तसारणीकरण म्हणतात. (Manual Tabulation) याउलट संगणकाचा उपयोग करून प्रक्रियन केल्या जात असेल त्याला यांत्रिकी सारणीकरण असे म्हणतात.

(mechanical tabulation).

तथ्यांचे संपादन करणे, संकेतिकरण करणे, वर्गिकरण करणे आणि सारणीकरण करणे हे संकलित तथ्यांवरील प्रक्रियनाचे प्रमुख टप्पे आहेत. संशोधिकेने सर्व एकत्रित केलेल्या तथ्यांवरील संस्करण वर्गिकरण, सांकेतीकरण आणि सारणीकरण ही संपूर्ण प्रक्रिया स्वत:च्या हातानेच केलेली आहे. त्याला कारण असे की अचुकरित्या केलेल्या हस्तसारणी करणातून गुणात्मकता वाढावी व स्वत: काम केल्याचे समाधान मिळावे.

संशोधिकेने विविध स्तरावर सारण्या तयार करून संकलित तथ्यांचे सारांश रूपात मांडण्यासाठी शेकडेवारी व आलेख इत्यादी मापाचा उपयोग करण्यात आला. तसेच सारणीकरणाचे काम पूर्ण झाल्यावर त्यात संमिलीत असलेल्या चलाच्या सहानुवर्ती संबंधाला आधारभूत मानून तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करण्यात येवून निष्कर्षाची मांडणी करण्यात आली.

## ८) अहवाललेखन –

श्रीमती सुशिला ओडवायर यांच्या मते, ''अहवाल लेखनही संशोधन कार्याची एक महत्त्वाची जबाबदारी मानावी लागेल.''[१७] यालाच अनुसरून अहवाल लेखनाचे किचकट परंतु महत्वपूर्ण कार्य संशोधिकेने केले. सदर अहवाल लेखनात दिलेली सांख्यिकी बऱ्याच ठिकाणाहून गोळा करण्यात आली. त्यात दुय्यम स्त्रोताचाही उपयोग करण्यात आला सदर संशोधन चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासी संबंधी असल्याने व माना आदिवासी संबंधाने लिखीत माहीती फार कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने मोठया प्रयत्नाने मिळवावी लागली. त्यामुळे दुय्यम स्त्रोतांत त्रुटी असल्यास त्या त्रुटी अहवाल लेखनात राहू नये म्हणून वारंवार दक्षता घेण्यात आली. अशाप्रकारे अहवाल लेखनाचे कार्य पूर्ण करण्यात आले.

## ९) संशोधनातील अडचणी :

सदर संशोधन आदिवासी माना संदर्भाने असल्याने संशोधिकेला संशोधन कार्य करीत असतांना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागले. याला कारण आदिवासी समाजाचे वास्तव्याचे ठिकाण जे दुर्गम भाग, जंगलव्याप्त किंवा डोंगरकपाऱ्यातील खेडी असल्याने तिथे जाण्यासाठी कधी सोय नव्हती तर कधी स्वत:च्या वाहनाने गेल्यासही अनेक अडचणी आल्या. त्याचप्रमाणे माना आदिवासीमधील भीडस्तपणा, कोण? कशासाठी आलेत? याची शहानिशा करण्यात येऊनही आपली माहीती सांगू की नको याबाबत त्यांना शंका होती. त्यामुळे त्यांना विश्वासात घेणे मोठे जिकीरीचे काम होते. काही ठिकाणी जंगली प्राण्यांची भिती असल्याने अंधार पडल्यावर त्या गावाला जाणे वा येणे हे कठिण होते तर काही ठिकाणी काही लोक दारूपिऊन त्यांना इतर शासकिय अधिकाऱ्यांकडून जो त्रास झाला त्याचा राग त्यांनी संशोधिकेवर काढण्याचा प्रयत्न केला. त्यातही माना आदिवासी समाजातील अशिक्षित व निरक्षरताही त्यांच्या भिडस्तपणाला अधिक कारणीभूत झाला. जास्तीत जास्त ठिकाणी मुलाखतीसाठी लागणारा बराचवेळ दयायला लोक तयार नव्हते. कारण त्यांना कामावर जायचे होते तर स्त्रियाही कामातून जास्त वेळ दयायला तयार नव्हता. बऱ्याच ठिकाणी लोकांना संशोधिका ही दारिद्रय रेषेखालील जनगणना अधिकारीच आहे असे समजून खरी माहीती दयायला लोक घाबरले तर काही ठिकाणी त्यांनी त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचे पुरावे म्हणून कागदपत्रे संशोधिकेला दाखवून संशोधिका त्यांना न्याय मिळवून देतील अशी अपेक्षा व्यक्त केली. दुय्यम प्रकारचे साहित्य मिळविणे सर्वात जिकीरीचे काम ठरले कारण माना आदिवासी संदर्भाने क्वचितच लिखाण केलेले अगदी मोजक्याच ग्रंथामध्ये आढळले. त्यामुळे अशा अनेक अडचणीवर मात करून संशोधिकेने संशोधनाचे कार्य पूर्ण केले.

## ७.२ निष्कर्ष

**सदर संशोधनाअंती संशोधिकेने काढलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.**

माना ही आदिवासी जमात चिमूर तालुक्यातील 'भीसी' या गावाच्या भोवतालच्या परिसरातील गावांमध्ये एकवटलेली आहे. इतरत्र ती तुरळक प्रमाणाम आढळते. त्यामुळे चंद्रपूर जिल्हयात माना आदिवासींची लोकसंख्या जवळपास १,००,००० ते १,५०,००० एवढी आहे.

ज्या चिमूर, वरोरा, भद्रावती, सिंदेवाही, नागभिड, मूल इत्यादी प्रमुख तालुक्यांत माना आदिवासी राहतात त्या भागांचा पुरेसा विकास झाल्याचे आढळत नाही. ताडोबा—अंधारी व्याघ्रप्रकल्प असल्याने बरीच गावे स्थलांतरीत झालीत व 'हुमन—प्रकल्प' प्रस्तावित असल्याने बरीच गावे स्थलांतरीत होण्याच्या मार्गावर आहेत. ती गावे सध्या माना आदिवासींची बहुल्य संख्या असलेली आहेत त्या गावांतून नागरी सुविधांचा अभाव आढळतो व विविध समस्यांनी ती गावे ग्रस्त असलेली दिसतात. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात सरकार ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या जनतेच्या हितेसंबंधांना विकास प्रक्रियेत अग्रक्रम देईल असे एक आश्वासन स्वातंत्र्य प्राप्तीच्या युद्धातच तत्कालिन नेत्यांनी ग्रामीण जनतेला दिले होते व त्या दिशेने प्रयत्नही सुरू केले. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ संमत करण्यात आला आला व पंचायत राजपद्धतीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. त्यांनतर ७३ व ७४ ची घटना दुरूस्ती करून ग्रामपंचायतीला व ग्रामसभेला अधिक सक्षम बनवण्यात आले. लोकशाहीचा विकास लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधी मार्फत ज्यांना त्यांच्या स्थानिक समस्येची अधिक जाण आहे, खेडयांचा कारभार चालावा व खेडी सक्षम व्हावी हा मुख्य उद्देश त्यामागे होता. मात्र औदयोगिकरणाने शहरीकरणाला चालना मिळाली व खेडी विशेषत: आदिवासी खेडी दुर्लक्षितच राहीली. शासनाने सध्या खेडयांचा विकास करण्यासाठी बऱ्याच

योजना आखल्या व अतोनात निधीही दिला तरी त्या योजना निव्वळ दाखविण्यापुरत्या राबविल्या जातात. भ्रष्टाचारामुळे जो निधी विकासकामाकरीता मंजूर होतो तो ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी, ठेकेदार, इंजिनियर व अधिकारी असे सर्व जण आपले कमिशन कापूनच पुढे चालवतात. त्यामुळे भरलेली घागर जरी मंत्रालयातून निघाली तरी तिथूनच ती रिक्त होत होत योजना राबवितांना निव्वळ ओलीच राहते असे म्हणावेस वाटते. त्यामुळे आदीवांसींचे वास्तव्य असलेल्या दुर्गम भागांचा, गावांचा जिथे कोणताही अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी स्वत: जाऊन विकास कामाचा आढावा घेऊन पाहात नाही अतिशय दुर्दम्य अवस्था झाल्याचे संशोधिकेच्या निदर्शनास आले.

संशोधन क्षेत्रातील ज्या २६ गावांचा त्यात एक गाव राजुरा तालुक्याचे ठिकाण सोडल्यास अध्ययन केले तेथील प्राथमिक शाळा सोडल्या तर महत्तम गावांमध्ये माध्यमिक शाळा नाही. कॉलेज नाही, पाण्याची व्यवस्था नाही, प्राथमिक दवाखान्याची सोय नाही, पक्की सडक नाही व शासकिय वाहनांची सुविधाही नाही. ह्यातील बरीच गावे मुख्य रस्त्यापासून अतिशय आत जंगलांत आहोत किंवा जंगलाशेजारीआहेत. त्यामुळे आजारपणात त्यांना दवाखान्यात जायची सोय नसल्यामुळे ते जवळच गावातच भगताकडे जातात, गंडे, दोरे बांधतात, अंध:श्रद्धेला बळी पडतात. प्राथमिकच्या वर शिक्षणाची सोय नसल्याने त्यांची मुले लवकरच शाळा सोडतात. अशाप्रकारे विविध समस्यांना तोडं देत माना आदिवासी कसेबसे आपले जीवन कंठीत आहेत.

२) माना आदिवासींमध्ये स्थलांतरांचे प्रमाण अत्यल्प आहे. 'ठेविले अनंते तैसेची राहावे' या उक्तीप्रमाणे माना आदिवासींचा स्वभाव दिसून येतो. त्यामुळे महत्तम माना आदिवासी हे वडिलोपार्जित आहे त्या गावातच व त्याच परिस्थितीत राहतांना दिसतात. सध्या शिक्षणाचा प्रभाव व रोजगाराच्या शोधात काही माना आदिवासी लोक शहरात राहायला गेलेले आढळतात. परंतु त्यांचे प्रमाण कमी आहे तरीही चांगले पैसे मिळाले तर गाव सोडण्यास बरेच जण तयार आहेत.

यावरून त्यांच्या स्थायीभावात बदल होत आहे व त्यांच्यात विकासाला पोषक अशी मनोवृत्ती तयार होतांना दिसते व हे एक मंदगीतने परंतु सकारात्मक परिवर्तन आहे असे म्हणता येते.

३) हिंदू धर्माप्रमाणे आदिवासी जमातींत बालविवाहाची पद्धती अस्तित्वात नाही असे अध्ययनादरम्यान आढळते. माना आदिवासी जमातही त्याला अपवाद नाही. त्यांच्यात विवाहाचे वय साधारणत: तरूणाचे २० ते २५ वर्ष व तरूणींचे १८ किंवा २० वर्ष असेच आढळते. शिवाय वधुवरांच्या विवाहाच्या दरम्यान वयातील अंतर जास्तीत जास्त दोन ते पाच वर्षे असते याचे कारण शिक्षणावर जास्त वेळ वाया न घालवता दहावी, बारावीपर्यंत शिक्षण झाले की लगेच मुले मुली अर्थार्जनाला लागतात. त्यामुळे त्यांच्यासमोर विवाहाचा प्रस्ताव ठेवला जातो. अतिशय अल्प प्रमाणात माना आदिवासी उच्च शिक्षण घेऊन नोकरीची वाट पाहतांना आढळतात. शहरातील मुलींचे अपवाद सोडता ग्रामीण भागात मात्र मुली जास्त वयांपर्यंत अविवाहीत राहत नाहीत.

भारतात बहुतेक सर्वच जाती जमातीत आपल्याच जाती–जमातीतील जोडीदार विवाहासाठी निवडण्याची प्रथा आहे व जाती–जमातीचे ते वैशिष्टये आहे. जाती–जमातीबाहेर विवाह करण्याला सर्वांकडूनच विरोध केल्या जातो. माना आदिवासींमध्ये महत्तम ९०% विवाह वडिलधाऱ्या मंडळींनी ठरविलेले व पंरपरागत पद्धतीने पार पडलेले आढळले. संशोधनादरम्यान २ प्रेमविवाह परंतु जमातीतच, तर जोडीदारांनी स्वत:च्या मनाने ठरविलेले ५% विवाह परंतु जमातीतच आढळले. १ विवाह जमातीबाहेर केल्या गेला. यावरून माना आदिवासींमध्ये जमातीतच विवाह करावा अशी सक्तीची परंपरा व अलिखित नियम आहे. व जमातीबाहेर विवाह करण्याची पद्धती नाही. शिवाय मुले व मुली आईवडीलांपासून शिक्षण किंवा नोकरीच्या

निमित्ताने फार दूर राहत नसल्यानेही त्यांच्या विवाहाचा ठराव आईवडीलच घेतांना आढळतात.

माना आदिवासींमध्ये परंपरागत पद्धतीने विवाह पार पडत असतात. तरीही संशोधनादरम्यान १ विवाह धार्मिक स्थळी व १ विवाह नोंदणी पद्धतीने झालेला आढळला. सर्वत्र सध्या विवाह मेळाव्यांचे आयोजन विविध संस्था, संघटना किंवा राजकिय नेत्यांद्वारे सर्वत्र केले जाते. तेथे लग्नाचा अतिशय किरकोळ खर्च येतो. शिवाय मेळावा आयोजित करणाऱ्यांकडून व शासनाकडूनही वधुवरास भेट वस्तू दिल्या जातात. त्यामुळे मेळाव्यात विवाह करण्याचे प्रमाण वाढत आहे.

४) विवाहाचा निर्णय कुणी घ्यावा याबाबत विविध समूहांत विविध प्रथा पडलेल्या आहेत. मात्र आदिवासी समूहांत विशेषत: तो आईवडीलच घेतात मात्र वराची निवड करतांना मुलीचे मत लक्षात घेतले जाते. माना आदिवासींमध्ये विवाहाच्या संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार आई वडिलांनी विशेषत: वडीलांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे. परंतु तरीही सर्वांच्या संगनमतानेच निर्णय घेतला जातो. मुलीची विवाहाची निवड करतांना वर पक्षाकडून मुलगी देखणी व काम करणारी या गुणांवरच अधिक भर दिल्या जातो. शिक्षणाला विशेष महत्त्व दिल्या जात नाही. तर मुलाची निवड करतांना वधुपक्षाकडून मुलगा सद्गुणी व कमावता म्हणजेच आर्थिकदृष्या सक्षम असा पाहिला जातो. नोकरी करणारा वर म्हणजे आपल्या मुलीचे आयुष्य सुखात जाणार असे सर्वांना वाटते. मात्र नोकरी करणाऱ्यांची संख्या अत्यल्प असल्याने माना आदिवासीमध्ये तीही अपेक्षा दिसून येत नाही त्यापेक्षा थोडीफार शेती असणाऱ्या मुलालाच प्राधान्य दिले जाते.

माना जमातीत सद्यस्थितीत तरी जमातींअंतर्गतच विवाह झालेले आढळतात. परंतु भविष्यात जर इतर जमाती सोबत मुलांमुलींनी लग्न केले तर दोघांनाही काही काळ (रागात असल्याने) मान्यता देणार नाही परंतु नंतर दयावीच लागेल असे मत महत्तम उत्तरदात्यांनी व्यक्त केले. याचा अर्थ बदलत्या

काळात अंतरजातीय विवाहासंबंधाने त्यांच्या मनोवृत्तीत परिवर्तन होत आहे व हे देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीने सकारात्मक विचार परिवर्तन आहे.

माना जमातीत विधवा पूर्नविवाहाला नि:संकोच मान्यता आहे. जेव्हा की हिंदू धर्मात विधवा पूनर्विवाहाच्या संदर्भात विविध बंधने आढळून येतात. याबाबतीत माना जमातीत पूर्वीपासूनच शिथिलता आहे.

५) हुंडापद्धती ही कोणत्याही समाजाला लागलेली वैचारिक किड आहे. त्यामुळे मुलींच्या विवाहात अडथळे निर्माण होतात व याच भितीमुळे स्त्रीभ्रुण हत्येचे प्रमाण वाढत आहे. कायदयाने हुंडा पद्धतीला प्रतिबंध आहे. हिंदू धर्मात हुंडयाचे प्रमाण बरेच आढळते. मात्र माना आदिवासींमध्ये हुंडा दिला व घेतल्याचे प्रमाण अगदीच नगण्य आहे. पूर्वी 'देज' म्हणून वधुपित्याला वराकडून वधूमूल्य दिले जात होते. आता ही पद्धती पूर्णपणे बंद झाल्याचे आढळते, मात्र हिंदू धर्माचे अनुकरण करून माना आदिवासींमध्ये मात्र सध्या १ तोळा सोन्याचा गोफ व अंगठी किंवा काही रोख रक्कम लग्न खर्चासाठी दिली व घेतली जात आहे. यात सक्ती नसली तरी परंतु हुंडापद्धतीची ही सुरूवात मानायला हरकत नाही. कारण एकूण १३% उत्तरदात्यांनी हुंडा पैशाच्या, सामानाच्या धान्याच्या व दागिन्याच्या स्वरूपात घेतल्याचे सांगितले यावरून माना जमातीमध्ये हुंडा पद्धतीचा शिरकाव हळूहळू होत असल्याचे जाणवले.

परंतु यापुढे मुलाने किंवा मुलीने हुंडा अथवा देज घेऊ अथवा देऊ नये असे ५७% उत्तरदात्यांचे मत आहे. त्यामुळे माना आदिवासी हे परंपरागत व मूलत: हुंडाविरोधी मताचेच आहेत. आधुनिक भौतिकवादाकडे झेपावणाऱ्या काळामध्ये सुद्धा माना आदिवासींना हुंडयाची फार मोठी अपेक्षा असल्याचे दिसून येत नाही.

६) कोणत्याही समाजात चरित्र व शीलाला अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण त्यांच्याशी व्यक्तीच्या संवेदना, व भावना जुळलेल्या असतात. आदिवासींमध्ये मात्र याबाबतीत थोडया वेगळया संकल्पना आहेत. बऱ्याच आदिवासी जमातीमध्ये विवाहपूर्व संबंधांना मूकसंमती असते. माना आदिवासीमध्येही विवाहपूर्व संबंधांना मूकसंमती आहे असे असले तरी विवाहबाहय शारीरिक संबंधाबाबत मात्र कठोर निर्बंध असून ती दंडास पात्र बाब समजल्या जाते.

अपत्यांच्या बाबतीत हिंदू धर्मात मुलाला वंशाचा दिवा, त्याचप्रमाणे संपत्तीचा वारस समजला गेल्याने मुलींपेक्षा मुलांना अनन्य साधारण महत्त्व दिल्या गेले आहे. त्यातूनच मुलामुलींत भेदभाव व स्त्री भ्रुणहत्या ही समस्याही निर्माण झाली आहे. मात्र याबाबतीत माना आदिवासी गैरआदिवासींपेक्षा बरेच सुधारित विचारांचे आहेत व ते मुलामुलींत भेदभाव करतांना आढळत नाहीत.

७) घटस्फोट म्हणजे विवाहित कुटुंबाला वेगळे करण्याचे शस्त्र आहे. त्याचे अनेक दुष्परिणाम समाजात दिसून येतात. माना जमातीत घटस्फोटाचे प्रमाण नाहीच्याच बरोबर आहे. याचे कारण त्यांच्यामधील जोडीदारांकडून अवास्तव अपेक्षांचा अभाव आहे. त्याचप्रमाणे कामाची विभागणी केलेली असल्याने ताणतणावाचे प्रसंग फारच कमी प्रमाणात दिसतात. तरीही घटस्फोट घेण्याची वेळ आलीच तर सध्या माना आदिवासी जातपंचायतीकडे जाऊन आपसात तंटा मिटविण्याचे प्रमाण कमी झालेले आढळते. तर गावोगावी स्थापन झालेल्या महत्मागांधी तंटामुक्त समितीकडे न्याय मागतात. त्यामुळे सध्या जातपंचायतीचे महत्त्व कमी होत आहे व तंटामुक्त समितीवर लोकांचा विश्वास बसून त्याचे महत्त्व वाढत आहे हे एक सामाजिक परिवर्तन घडून येतांना आढळले.

८) कुटुंबव्यवस्था ही समाजाचे लघुरूप आहे. माना आदिवासींमध्ये विभक्त व संयुक्त असे कुंटुंबाचे दोन्ही प्रकार समान आढळतात. पूर्वी अधिकतर कुटुंब संयुक्त कुटुंब असायचे. कारण शेतीव्यवसायासाठी लागणारी मानवी श्रमाची

गरज त्यातून भागवली जायची. मात्र सध्या शेतीचे झालेले तुकडे, वाढती महागाई व वाढत्या अपेक्षा तसेच रोजगारासाठी स्थलांतराचे वाढते प्रमाण यामुळे विभक्त कुटुंबाची संख्या वाढतांना दिसते. माना आदिवासीही त्याला अपवाद आढळत नाहीत. त्यांच्यातही विभक्त कुटुंबाचे प्रमाण वाढत आहे व हे एक बदलणाऱ्या कुटुंबाचे एक मोठे परिवर्तन आहे.

माना आदिवासींमध्ये कुटुंबातील कोणतेही महत्त्वाचे काम असो त्याबाबतीत निर्णय घेतांना पती व पत्नी दोघांत विचार विमर्श करून घेतले जातात. असे ९३% उत्तरदात्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांच्यातील हे सकारात्मक परिवर्तन कौतुकास्पद आहे. त्याचप्रमाणे कुटुंबात मुलांच्या संगोपणाची जबाबदारीही दोघांनी मिळून घ्यावी असे ९४.५% उत्तरदाते सांगातात. त्यामुळे स्त्रियांना माना आदिवासी जमातीत एक योग्य दर्जा देतात असे संशोधिकेला वाटते.

स्त्रीचे आरोग्य हे–ही कुटुंबाच्या व समाजाच्या आरोग्यासाठी व सुदृढतेसाठी आवश्यक घटक आहे परंतु माना आदिवासींची वस्ती दुर्गम भागात असल्याने त्यांच्या गावांमधून दवाखान्याच्या सोयी उपलब्ध नाही, त्यामुळे घरी कुटुंबातच बाळंतपण करण्याकडे त्यांचा कल असतो. ५७.५% माना आदिवासींनी स्त्रियांचे बाळंतपण घरीच सुईनद्वारे केलेले आहे. मात्र वाढत्या शासकिय सोयींचा फायदा घेऊन सध्या नवविवाहीत व तरूण जोडप्यांनी ग्रामीण रूग्णालयात २९% व खाजगी रूग्णालयात ४.५% बाळंतपण केले असे सांगितले. यावरून बाळंतपण ही एक जबाबदारीची व महत्त्वाची गोष्ट आहे असे ते आता मानायला लागले आहेत व घरीच बाळंतपण करण्यापेक्षा रूग्णालयांचा लाभ करून घेत आहेत व हे एक विचारांतील व आचारांतील मोठे परिवर्तन घडून येत आहे.

९) ‘‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते,‘‘शिक्षण ही शोषण मुक्तीची पायवाट आहे’’[१८] तर स्वामी विवेकानंद म्हणतात, ‘‘If the poor boy cannot come to education, Education must go to him.”[१९] वरील विधानावरून शिक्षणाचे महत्त्व लक्षात येते. शिक्षणातून सांस्कृतिक व सामाजिक सातत्य टिकत असते. त्याचप्रमाणे विविध सोयी व सवलतींद्वारे शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याचा शासनाचा प्रयत्न सुरू आहे.

आदिवासींच्या शिक्षणाच्या संदर्भात भारतीय शिक्षण आयोगानेही (कोठारी आयोग–१९६४–६६) विविध शिफारशी केलेल्या आहेत

१. अनुसूचित जमातीतील सर्व मुलांना पाच वर्षांचे उपयोग–क्षम शिक्षण देण्यात यावे.
२. आदिवासींसाठी माध्यमिक स्तरावर आश्रमशाळा योजनेचा शक्य तेवढा विस्तार करावा.
३. अनुसूचित जातीजमातीच्या मुलांना व्यवसायिक शिक्षणाच्या संस्थांतील प्रवेशासाठी खास प्रयत्न केले जावेत.
४. आदिवासी मुलांच्यासाठी जादा मार्गदर्शन, वसतिगृह सुविधा, शिष्यवृत्त्या दिल्या जाव्यात.
५. आदिवासी भागातील कार्यक्षम व्यक्तिची निवड करून त्याला या कामासंबंधीचे प्रशिक्षण दयावे. तसेच या क्षेत्रात काम करण्याची आवड असणाऱ्यांना अधिकाराच्या जागा द्याव्यात.’’[२०] भारतीय शिक्षणाच्या संदर्भात कोठारी आयोगाच्या शिफारशी प्रमाणेच महत्तम योजना राबविण्यात येत आहेत. शिक्षणासाठी भारत शासन व युनिसेफ तर्फे ही अतोनात पैसा खर्च करण्यात येत आहे. तरीही आदिवासी व मागासवर्गीयांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढलेली दिसून येत नाही.

इतर आदिवासीप्रमाणेच माना समाजाची शैक्षणिक प्रगती म्हणावी तशी झालेली नाही. सद्यस्थितीत माना जमातीत निरक्षरतेचे प्रमाण ३१.५% आहे. तर

३३% लोक प्राथमिक पर्यंतच शिक्षण घेतलेले आहेत. अवघे ४.५% इतके अत्यल्प प्रमाण पदवी व पदव्युत्तरांचे आहे. त्यांच्या वडीलांशी तुलना केली तर त्यांच्या पूर्वीच्या पिढीत ९१% निरक्षतेचे प्रमाण आढळते. ७.५% प्राथमिक पर्यंत शिक्षण घेतलेले व १.५% इतके अल्प प्रमाण माध्यमिकपर्यंत शिक्षण घेतलेले आढळतात. पदवीधरांचा तर पत्ताच नव्हता. त्यामुळे मागील पिढीत अधिकतम लोक निरक्षर होते. सद्यपरिस्थितीही इतर समाजाच्या तुलनेत फार चांगली नाही. सद्यपरिस्थितीही माना आदिवासींमध्ये साक्षरतेच्या प्रमाणात व शिक्षणाच्या दर्जात लक्षणीय वाढ झाल्याचे आढळून येत नाही. परंतु जिथे आधुनिकीकरणाच्या युगात स्पर्धेत टिकविण्यासाठी लागणारी उच्च शिक्षणाची गरज लक्षात घेता माना आदिवासी शैक्षणिक बाबतीत अजूनही मागासलेलेच आढळतात. व हे एक गृहितकृत्य सत्य ठरलेले आहे.

१०) माना जमात शिक्षणाच्या बाबतीत अद्यापही मागासलेली असली तरी त्यांतील काही लोकांनी इतर समाजांचे पाहून सद्या शिक्षणाची कास धरलेली आहे. शिक्षणामुळे विचारांत, राहणीमानात व आर्थिक बदल होतो या विचारांशी ५२% उत्तरदाते सहमत आहेत व हे प्रमाण जरी कमी असले तरी सुद्धा इतरांचे पाहून शिक्षणाबाबत एक सकारात्मक मतप्रवाह बनत आहे असेच म्हणावे लागेल. त्यांच्यात शिक्षणाविषयी जागृती होत आहे. हे जरी मंदगतीने होत असले तरी माना आदिवासी समाजातील हे एक महत्वपूर्ण विचार परिवर्तन आहे.

शिक्षणाबाबतही माना आदिवासी मुलांमुलींत भेदभाव करतांना दिसत नाही. जरी माना आदिवासींतील मुली फार शिकलेल्या नाहीत. कारण मुलेसुद्धा जास्त शिकलेले नाहीत. मात्र मुलींच्या शिक्षणाविषयी एक सकारात्मक दृष्टीकोन माना जमातीत आढळतो. मुलांप्रमाणे मुलींनासुद्धा शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे असे ९५% उत्तरदाते म्हणतात. तर मुलांप्रमाणे मुलींनी सुद्धा दूर शहरात जाऊन उच्च शिक्षण घेण्यास हरकत नाही व ते पाठवायला तयार आहेत असे ९६.५% उत्तरदाते म्हणतात.

यावरून माना आदिवासींमध्ये मुलींच्या शिक्षणाबाबतही विचारांत परिवर्तन होत आहे असे संशोधिकेच्या लक्षात आले.

११) श्रद्धा, अंध:श्रद्धा, रूढी, प्रथा, परंपरा, म्हणजे आदिवासी समाजाचा आत्मा. शिक्षणाने त्यावर गदा येईल असे पूर्वी लोकांना वाटत असे. मात्र सध्या शिकलेली मुले मुली त्यांच्या प्रथा, परंपरांना मानतात असे महत्तम उत्तरदाते म्हणतात. त्यामुळे शिक्षण घेऊनही माना आदिवासी हे त्यांच्या रूढी व परंपरांना चिकटून आहेत. ते परंपरावादी आहेत असे म्हणता येते. मुळात त्यांचे शिक्षणही फार झाले नाही, महत्तम लोक हे अल्प शिक्षित व निरक्षर आहेत त्यामुळे त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टीचा अभाव दिसून येतो. व माना आदिवासी हे रूढी व परंपरावादी आहेत हे एक प्रस्तुत अध्ययनाचे गृहितकृत्य होते व ते खरे ठरले आहे.

१२) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी या स्पर्धेच्या युगात शिक्षण व नोकरी संबंधाने आरक्षण व शिष्यवृत्तीचे महत्त्व अनन्य साधारण आहे. त्यामुळे शासनातर्फे त्यांना त्यांद्वारे विकासाच्या संधी राखून ठेवल्या जातात व उपलब्ध करून दिल्या जातात.

माना आदिवासी २००६ पूर्वी विशेष मागासप्रवर्गात मोडत असत. ८ मार्च २००६ पासून त्यांना अनुसूचित जमातीच्या यादीत नोंदल्या गेले व तेव्हापासूनच त्यांना अनुसूचित जमातीसाठीच्या आरक्षणाचा लाभ सुरू झाला. मात्र त्यांना अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी फार त्रास होत आहे. त्या अभावी त्यांना आरक्षणाचा लाभ घेता येत नाही. शिवाय पूर्वी जात प्रमाणपत्रही इंग्रजी भाषेतून होते सध्या ते मराठी भाषेतून करा असे शासनाचे आदेश असल्याने वारंवार त्यांना समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे आरक्षणाचा लाभ शिक्षणासाठी व नोकऱ्यांसाठी झालेला दिसत नाही. शिवाय माना आदिवासींना त्यांच्या अधिकारांपासून वंचित राहावे लागत आहे. त्यांना त्यांच्या अधिकारांपासून डावलले जात आहे असेच संशोधिकेच्या निदर्शनास आले.

आरक्षणाचा फायदा घेण्यासाठी कागदपत्रे मिळत नसल्याचे महत्तम उत्तरदात्यांचे मत आहे. त्यांच्यासाठी शिक्षणाचा महत्त्वाचा उद्देश नोकरी मिळवून आर्थिक दर्जा सुधारणे हा आहे. मात्र तो साध्य झाला नाही असे ६७.५% उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. अत्यल्प प्रमाणात (१.५%) उत्तरदात्यांना त्यांच्या कुटुंबात नोकरी व्यवसायासाठी आरक्षणाचा फायदा मिळालेला आहे. इतरांना गुणात्मक दर्जा चांगला असल्याने नोकरी लागली तर अंशत: आरक्षणाचा फायदा नोकरी व व्यवसायासाठी होतो असे सुधारित व आशावादी मतही ९३% उत्तरदात्यांनी व्यक्त केले. त्यामुळे जरी सध्या माना आदिवासींची शैक्षणिक परिस्थिती मागासलेली असली तरी परंतु आरक्षण व शैक्षणिक योजनांमुळे त्यांच्यात जागृती निर्माण होत आहे व आशा निर्माण होत आहेत व हे एक मंद गतीने परंतु सकारात्मक परिवर्तन आहे.

१३) ८८% माना आदिवासी स्वत:ला हिंदू धर्मिय सांगतात. तर ११.५% लोक धर्म सांगत नाहीत. त्यांना धर्म म्हणजे काय हे समजत नाही. ते धर्म म्हटले तरी 'माना' च म्हणतात. याचे मूळ कारण गोविंद गारे यांच्या वरील विधानात दिसून येते. माना आदिवासींही इतर आदिवासींप्रमाणे निसर्गपूजक आहेत. परंतु ग्रामीण भागात राहिल्याने सतत हिंदू धर्माशी संपर्क आल्याने ते स्वत:ला हिंदू धर्मिय सांगतात. मात्र म्हताऱ्या वृद्ध माना आदिवासींना धर्म सांगता येत नाही. माना जमातीत इतर कोणतीही पोटजमात नाही.

निसर्गातील विविध शक्ती व होणाऱ्या घडामोडींचे शास्त्रीय कारण माहित नसल्यामुळे अज्ञानी आदिवासी त्यांना चमत्कार मानतात व त्यामागे दैवी शक्तीचे कारण आहे असे समजून ते श्रद्धा पासून अंध:श्रद्धाकडे वळतात व त्या दैवी शक्तीला प्रसन्न करून निसर्गातील घडामोंडीवर नियंत्रण ठेवू पाहतात. शास्त्रीय कारणाच्या ज्ञानाचा अभाव असल्याने नशिब, जादू–टोणा, शगून, अपशगून अशा संकल्पना विकसित झालेल्या आहेत. व जगातील आदिवासी हे याबाबतीत फार संवेदनशील आहेत.

माना आदिवासीही याला अपवाद नाहीत ७७.५% माना आदिवासी हे नशिबावर पूर्ण विश्वास ठेवणारे ५.५% अंशत: विश्वास ठेवणारे आहेत. मात्र १४% का होईना लोक नशिबावर विश्वास ठेवत नाहीत हे त्यांच्या विचारवंतातील एक सकारात्मक परिवर्तन आहे. शगून–अपशगून जादुटोणा यावर महत्तम लोक विश्वास ठेवतात. तर ३५.५% लोक त्यातून स्वत:ची सुटका करून घेणारे आहेत हेही त्यांच्या विचारांतील एक परिवर्तन आहे. मात्र महत्तम लोक सध्याही नशीब, शगून, अपशगून व जादूटोणा यावर विश्वास ठेवणारेच आहेत.

महत्तम माना आदिवासींनी नवस केलेला नाही. ११% लोकांनी एकदाच नवस केलेला आहे.

माना आदिवासी जमातीत महत्तम लोकांचा भगतावर विश्वास आहे. आजारपणात महत्तम लोक दवाखान्यात व भगताकडे दोन्ही ठिकाणी जातात. २९.५% लोक भगतावर विश्वास ठेवत नाहीत फक्त दवाखान्यातच आजारी असल्यास जातात हे त्यांच्यातील एक महत्वाचे परिवर्तन आहे.

परंतु महत्तम माना आदिवासी हे नशिबावर विश्वास ठेवणारे, शगून–अपशगून, जादुटोना मानणारे, भगतावर विश्वास ठेवणारे व दवाखान्यात जाऊनही भगताकडे जाणारे आहेत. यावरून माना आदिवासी हे नशिबावर विश्वास ठेवणारे जुन्या रूढी, चालीरिती, पंरपरा, श्रद्धा यांनी बुरसटलेले आहेत हे एक गृहीत कृत्य होते व ते साध्य झाले असे संशोधिकेला वाटते.

१४) व्यसन ही देशाच्या विकासाला लागलेली किड आहे मात्र आदिवासी जमातीत कोणत्याही सण व उत्सवप्रसंगी मद्यपान करणे व आनंद साजरा करणे ही क्रिया ठरलेलीच असते. व त्यामुळे त्यांना त्यात फारसे वाईट वाटत नाही. माना आदिवासींत मात्र मद्यपान कधी कधी आवश्यक आहे असे म्हणणारांचे प्रमाण

अल्प आहे व कोणत्याही कार्यक्रमाप्रसंगी मद्यपान करणे आवश्यक नाही असेच महत्तम लोकांचे मत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी गोंदोडा परिसरात ध्यानसाधना केली. त्यांच्या शिकवणुकीच्या प्रभावाने गावोगावी 'गुरूदेव सेवा मंडळे' स्थापन झाली व विशेषत्वाने माना आदिवासी त्यात सामिल झाले. आजही माना आदिवासी हे राष्ट्रसंताची पुण्यतिथी व जयंती मोठया आनंदाने व सभ्येतेने साजरी करतांना आढळतात. राष्ट्रसंतांच्या विचाराने प्रेरित होऊनच मद्यपान आवश्यक नाही असे महत्तम लोकांचे विचारप्रवर्तन झालेले आहे व हे एक सकारात्मक परिवर्तन त्यांच्यात दिसून आले.

मात्र पुर्वीपासून तंबाखू खाणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. मद्यपान करणारांचे प्रमाण कमी असले तरी स्त्री असो अथवा पुरूष तंबाखू खाणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे ही सवय त्यांना व्यसनाच्या रूपात जडलेली आहे.

माना आदिवासींचा महत्त्वाचा सण आखाडी. त्या सणाला लग्न झालेल्या मुली माहेरी येतात. या सणाचे त्यांना फार महत्त्व आहे. त्यानंतर नागपंचमी, शिवरात्र व नागदिवाळी असे सण साजरे करतात. हिंदू धर्मियांचे सर्व सण माना आदिवासी साजरे करतात. माना आदिवासींमध्ये 'मूठपूजा' महत्त्वाची असते. जेवढे देव त्यांच्यात मानतात तेवढ्या मुठा तांदूळ ठेवून त्यांची पूजा केली जाते.

माना आदिवासींमध्ये प्रत्येक किंवा काही कुले मिळून त्यांच्या देवांची संख्या ठरलेली असते. त्यात चारदेवे, पाचदेवे, सहादेवे, सातदेवे, व नऊदेवे असे आढळतात. त्या कुलगटाची विशिष्ट आडनावे असतात. व त्या कुलगटाची कुलदेवता असते. माना आदिवासींमध्ये त्या प्रत्येक कुलगटाचे ठराविक भाट असतात. व प्रत्येक कुलाचे एक स्वतंत्र कुलप्रतीक असते. त्यात कोणतीही नैसर्गिक वस्तू अथवा झाड, प्राणी इत्यादी असते. त्याची ते पूजा करतात. त्याला तोडणे अथवा मारणे निशिद्ध समजतात.

त्याचबरोबर इतर सर्व सामुहिक कार्यक्रम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती व पुण्यतिथी व लग्न समारंभ इत्यादी कार्यक्रम समूहात साजरे केले जातात. हिंदू धर्माप्रमाणे गावागावांतून मारूतीचा पूजा केली जाते. तसेच गणेशोत्सव व शारदोत्सवही साजरे केले जातात.

बऱ्याच धर्मांमध्ये स्त्रियांना पूजा विधीपासून दूर ठेवले जाते. मात्र माना समाज याबाबतीत पुढारलेल्या विचारांचा आहे. महत्तम उत्तरदाते स्त्रिया नेहमीच पूजा विधी संपन्न करतात असे सांगातात. तर इतर लोक ते कधी कधी म्हणजे ऋतूस्नानाचा काळ सोडूनच इतर वेळी घरगुती पूजापाठ करतात असे म्हणतात.

अशाप्रकारे आधुनिकीकरण व औदयोगिकरणामुळे व शिक्षणाने धार्मिक विचारांत परिवर्तन होत आहे. मात्र आचारांमध्ये परिवर्तनाची गती अतिशय मंद आहे. उलट माना आदिवासी स्वतःचा धर्म सोडून हिंदू धर्मात मिसळून गेलेले आहेत व सध्या काही पुरोगामी विचाराचे लोक पुन्हा आदिवासी धर्माला जागे करण्याचा प्रयत्न करीत आहेत. हेही एक धार्मिक विचारांचे परिवर्तनच आहे.

१५) माना आदीवासी ही शेती व्यवसाय करणारी जमात आहे. सद्यस्थितीत ६५% माना आदिवासी हे कुटुंबासहीत शेती करणारे आहेत व ३५% हे मजूरीसहीत इतर व्यवसाय करतात. मात्र फक्त ३% इतके अल्पप्रमाण नोकरी करणारांचे आहे. या अगोदरच्या पिढीत ७७% लोक शेती करणारे होते. नोकरी करणारांचे प्रमाण फक्त ०.५%होते व सद्यस्थितीत त्यात केवळ २.५% इतक्या अल्पप्रमाणत वाढ झालेली आहे. मात्र शेती व्यवसाय करणाऱ्याच्या संख्येत घट होऊन मजूरी करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. याचे कारण औदयोगिकरणाने शहरातील आकर्षित करणारे जीवन वाढती लोकसंख्या व वाढती गरज हे आहे. शेती व्यवसाय परवडत नाही व शेतीचे कुटुंबामध्ये तुकडे वाटप झाल्याने शेतीवर अवलंबून राहणे कठीण झाले आहे. सतत नापिकी, मजूरी, खत, बि—बियाणे, किटकनाशके यांच्या वाढलेल्या किमती तसेच सिंचनाच्या सोयींचा अभाव यामुळे

आता दिवसेंदिवस शेतीवर अवलंबून राहणे आता कठिण झाले आहे. तसेच दर्जेदार शिक्षण न मिळाल्याने नोकरी लागण्याची शक्यता नाही. त्यामुळे मजूरी व इतर किरकोळ व्यवसाय करणे हाच मार्ग माना आदिवासी पत्करत आहेत. हेही आर्थिक पविर्तन माना जमातीत दिसून येत आहे.

शेतीसोबत पूर्वी पशूपालन व जंगलावर आधारित व्यवसाय माना आदिवासी करीत मात्र आता पशुंच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला व जंगलाच्या कायदयांमुळे विविध बंधने आल्याने ८५% लोक जोडधंदा करीत नाही. उर्वरीत १५% लोक इतर व्यवसाय व पारंपारिक शेती व्यवसाय करतात.

१६) कुटुंबाच्या राहणीमानाचा दर्जा व राष्ट्राचा विकास हे त्यांच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नावरून लक्षात येतो. समाजात सुद्धा कुटुंबाच्या उत्पन्नावरूनच त्या कुटुंबाचा सामाजिक दर्जा ठरविला जातो. मात्र माना आदिवासींमध्ये महत्तम कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (६४.५%) हे २० हजारांपेक्षा कमी आहे तर २९.५% लोकांचे वार्षिक उत्पन्न २० ते २५ हजार आहे. केवळ अत्यल्प प्रमाणात ६% उत्तरदात्यांनी त्यांचे उत्पन्न १ लाख ते वर सांगितले. यावरूनही माना जमातीचे आर्थिक मागासलेपणा लक्षात येते.

पूर्वी भारतात आदिवासींच्या शेतजमिनी होत्या. मात्र हळूहळू स्थलांतर विस्थापन व वाढती महागाई यामुळे त्यांच्या जमिनी गेल्या. सद्यपरिस्थितीत २३.५% माना आदिवासी हे भूमिहीन तर १९% अल्पभूधारक यांच्याजवळ फक्त १ एकर (०.४ हेक्टर) शेतजमिन आहे. तर १ ते ५ एकर (०.४ ते २ हेक्टर) शेतजमिनी असलेले अल्पभूधारक ४४% एवढे व्यस्त प्रमाणात आहेत. केवळ १३.५% लोकांजवळ ५ एकरापेक्षा जास्त शेतजमिन आहे. शेती व लोकसंख्येचे हे व्यस्त प्रमाण आहे. त्यातही शेतजमिनी खतांच्या वाढत्या प्रभावाने व सिंचनाच्या सोयींअभावी पिकीचे प्रमाण घटलेले आहे. त्यामुळे उत्पादनातही घट झालेली आढळते.

यावरून माना आदिवासी हे आर्थिक दृष्टया पाता अतिशय मागासलेले आहेत हेही एक गृहीतकृत्य इथे सत्य ठरले आहे.

१७) अशा आर्थिक हलाखीच्या परिस्थितीतही महत्तम (४५.५%) माना अदिवासी हे संपूर्ण समाधानी तर २७.५% अल्पसमाधानी आहेत. यावरून माना आदिवासींचा अल्पसंतुष्टी स्वभाव निदर्शनास येतो. माना आदिवासी हे कष्टाळू व अल्पसंतुष्टी आहेत हे एक गृहीतक होते व ते सिद्ध झाल्याचे निदर्शनास येते.

ज्या अल्पप्रमाणात (१८%) आदिवासींनी या व्यवसायात समाधनी नसल्याचे मत व्यक्त केलेले आहे. त्याचे कारण त्यांना प्रामुख्याने अर्थाजन कमी मिळते. खेडयात राहावे लागते व यापेक्षा ते जास्त चांगला व्यवसाय करू शकतात असे नोंदविले आहे. माना जमातीत स्थलांतराचे अत्यल्प प्रमाण असले व त्यांचा स्थायीभाव असला तरी सुद्धा ४३% उत्तरदाते जास्त पैसे मिळाले अथवा चांगला व्यवसाय मिळाला तर गाव सोडून इतरत्र जायला तयार आहेत. मात्र महत्तम लोक कितीही चांगला व्यवसाय असला व जास्त पैसे मिळाले तरीही त्यांचे गाव सोडायला तयार नाहीत. ८२.५% इतक्या महत्तम उत्तरदात्यांनी त्यांच्या हलाखीच्या परिस्थितीत व समास्या, अडचणी झेलूनही आपला वडिलोपार्जित शेती व्यवसाय सोडलेला नाही. ज्या अल्प प्रमाणात लोकांनी वडिलोपार्जित व्यवसाय सोडला त्यात शेतीचे तुकडे होऊन अथवा शेती विकल्यामुळे भूमिहीन झालेले तसेच शिक्षण नोकरी संबंधाने व मजूरीसाठी बाहेरगावी गेलेले लोक आहे. मात्र त्यातही बरेच जण पारंपारिक व्यवसायासोबतच आधुनिक पूरक व्यवसायही करतात. मात्र पारंपारिक व्यवसाय सोडण्याचे कारण अर्थाजन कमी प्रमाणात मिळणे हेच आहे. यावरून शेती व्यवसाय करणाऱ्यांची आर्थिक परिस्थिती आपल्या लक्षात येते.

जरी माना आदिवासी हे अल्पसंतुष्टी असले व सध्याच्या व्यवसायात समाधानी असले तरी सुद्धा इतर लोकांचे पाहून त्यांच्याही मनात यापेक्षा चांगले

उत्पन्न मिळवून देणारा कोणताही व्यवसाय जो त्यांना करता येईल किंवा मुलांना वा त्यांना स्वत: शिकून सरकारी किंवा खाजगी नोकरी करण्याची अभिलाषा जागृत झालेली आहे व हे त्यांच्या विचारातील एक सकारात्मक परिवर्तन आहे.

१८) कुटुंबाचे राहणीमान व त्यांचा आर्थिक दर्जा याचा आरसा म्हणजे त्यांचे राहते घर व घरातील भौतिक सुख सुविधेच्या वस्तु होत.

माना आदिवासींचे संशोधनादरम्यान महत्तम (७२%) लोकांचे घर मातीचे आहे. त्यातही कुडाच्या भिंती अर्ध्या पडलेल्या व कौलारू गळणारे छत आहे जे दर पावसाळ्यात दुरूस्त करूनही कौले महाग झाल्याने त्यांना घेता येत नाही तर २.५% लोकांचे घर म्हणजे निव्वळ गवती झोपडी आहे. २५.५% लोकांजवळ विटा सिमेंटचे १ मजली घर त्यातही बहुतेक शासनाने दिलेले घरकुल आहे.

विदयुत, वीज, इलेक्ट्रीसीटी ही आजच्या युगातील प्राथमिक गरज झालेली आहे व ती प्रत्येक घरी असणे गरजेचे आहे. सगळीकडे झगमगाट असतांना मात्र २७.५% एवढया मोठया प्रमाणात माना आदिवासींच्या घरी विदयुत नाही. रॉकेलचा मोठा यक्ष प्रश्न असतांना त्यामुळे झोपतांना लवकर दिवा मालवून अंधारातच राहण्यापलीकडे त्यांना गत्यंतर नाही. जंगलातील लाकूड फाटा पूर्वीप्रमाणे आता बैलबंडीने आणता येत नाही. यामुळे स्त्रिया लहान मुलांना घरी ठेवून वाघ आस्वलांच्या भीतीची पर्वा न करता कोसो दूर जंगलात जाऊन वाळलेल्या काडया जेवढया जास्त डोक्यावर भार सहन करता येईल तेवढी मोठी मोळी घेऊन लगबगीने घराकडे जातांना दिसतात. त्यांच्या घरी आवश्यक असणारा स्वयंपाकाचा गॅस महत्तम (८७.५%) लोकांकडे उपलब्ध नाही. ज्या अल्प प्रमाणात लोकांकडे गॅस आहे त्यांना नोकरी व्यवसायात आहेत किंवा काही भद्रावती तालुक्यातील मासळ गावात एकच माना स्त्री  जी पंचायत समिती सभापती आहे तिने तेथील रहीवाश्यांना शासकिय योजनेतून स्वयंपाकाच्या गॅसचे वाटप केलेले नाही.

घरातील उपलब्ध भौतिक सुख सुविधेच्या वस्तू देशाच्या विकासाचे निर्देशक असतात. भारतासारख्या महान देशात 'शायनिंग इंडिया' म्हणतांना किती कमालीची आर्थिक विषमता आहे हे आपल्याला आदिवासी व मागासवर्गीयांच्या झोपडीत गेल्यावर कळते. ३३.७% उत्तरदात्यांकडे पंखा आहे व तोही बहुतांश लोकांना लग्नात सप्रेम भेट मिळालेला आहे. रेडीओ हा लोकांचा आवडत विषय आहे. ग्रामीण भागातील मनोरंजनाचे ते फार जुने साधन आहे. अगदी थोडयाप्रमाणात लोकांकडे ते उपलब्ध आहे तर शहरातून घरोघरी दिसणारा टि. व्ही. टेपरिकॉर्डर व मोटर सायकल केवळ ०.५% इतक्या अल्प प्रमाणात उत्तरदात्यांकडे उपलब्ध आहे. बऱ्याच लोकांकडे विदयुत नाही. ५४.५% इतक्या मोठ्या प्रमाणात माना आदिवासींच्या घरात कोणतीही सुखसुविधेची बाब नाही. म्हणूनच उन्हाळयात बहुतांश माना पुरूष झाडाखाली अंगणात सदराकाढून असतात तर स्त्रिया आपल्या पदराने हवा घालतांना दिसतात.

सार्वजनिक आरोग्यासाठी शौचालयाची गरज सर्वांनी मान्य केलेली आहे. त्यासाठी शौचालयाचे बांधकाम व वापर करावा या उद्देशाने शासनाने विविध योजना राबविल्या परंतु थोडया लोकांनी शौचालय बांधले व अत्यल्प लोकच त्याचा वापर करीत आहेत. ५७.५% माना आदिवासींकडे अजूनही शौचालय नाही व ते उघड्यावरच शौचास जातात. दारिद्रय रेषेखालील कुटुंब चंद्रपूर जिल्हयात १,६९,५२६ आहेत. परंतु ज्यांना खरोखरच  दारिद्ररेषेखालील म्हणता येईल अशा बऱ्याच जणांना गणना अधिकाऱ्यांनी वगळले व पेसे घेऊन लाच घेऊन ज्यांचे उत्पन्न जास्त आहे त्यांना दारिद्रय रेषेखालील यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे बऱ्याच आदिवासी गरजूंना योजनेपासून वंचित राहावे लागते.

दारिद्रय रेषेखालील यादीत नाव समाविष्ट केल्यावर त्याचप्रकारे शिधपत्रिका तयार केली जाते व त्यांना महिण्याचे राशन स्वस्त दरात मिळते.

५५.५% माना आदिवासींजवळ पिवळी व फिक्कट पिवळी म्हणजे अंत्योदय व दारिद्रय रेषेखालील लोक आहे. विकासाच्या विरोध योजना राबवूनही त्यांचा आर्थिक दर्जा वाढत नाही. यावरूनही योजनांच्या यशस्वीतेचे मुल्यांकन करता येते. हे प्रमाण लक्षणीय आहे. ३५% लोकांजवळ केशरी शिधापत्रिका आहे तर ७.५% लोकांजवळ शिधापत्रिकाच नाही. संयुक्त कुटुंबातून वेगळे झाल्यावर जर त्यांच्या वडीलांची शिधापत्रिका दारिद्रय रेषेखालील व अंत्योदय असेल तरी त्यांचे कार्ड तसे न बनता केशरीच बनवून देण्यात येते. त्यामुळे त्यांना या योजनेखालील धान्य मिळत नाही. स्वस्त धान्य दुकानदार केशरी व पांढरे कार्ड (शिधापत्रिका) असणाऱ्यांच्या कार्डचे धान्य कधीच आणत नाही. तेल, साखर इत्यादी महाग वस्तू सणासुदीलाही आणत नाही. एखादया दिवाळीलाच फक्त आणतात. इतर धान्य महिनाभर वाटप न करता महिन्यातील काही दिवसच वाटप करतात. व त्या दिवसात पैसे नसल्यास त्यांचे धान्य व रॉकेल दोन्हींचा लाभ त्यांना मिळत नाही. तो माल ते ज्यादा दराने ईतरांना विकतात. अशी परिस्थिती सर्वत्र असली तरीसुद्धा महत्तम उत्तरदाते दर महिन्याला योग्य दराने संपूर्ण धान्य स्वस्त धान्य दुकानात मिळते असे उत्तर देतात. त्यामुळे त्यांच्यासाठी ही शासकिय समाधानाची योजना आहे असेही त्यांना वाटते.

१९) सदर संशोधनातील संशोधन विश्वातील ३.५% माना आदिवासींची शेतजमीन शासकिय प्रकल्पासाठी वापरली गेली. मात्र त्यांना अजूनही त्याचा पूर्ण मोबदला मिळालेला नाही. तर ७.५%माना आदिवासींनी जंगलतोडून शेती केली असे उत्तरदात्यांनी सांगितले व ५% भूमिहीनांना शासनाकडून मोफत जमीन मिळाली. मात्र त्यातील ७.५% लोकांना अजूनही त्या जमिनीचे पट्टे मिळाले नाही. त्यासाठी ते वारंवार तहसिल कार्यालयात जाऊन चकरा मारतांना आढळतात.

२०) वृक्ष संरक्षण अधिनियम १९७६ अनुसार वृक्ष तोडण्यावर बंदी आलेली आहे. परंतु आदिवासींना त्यांच्या उपजिवीकेसाठी व शेतीसाठी लागणारे लाकूड

आणण्यासाठी वनकायदयांमध्ये विविध अटीसहीत तरतुदी केलेल्या आहेत. परंतु आदिवासींना मात्र कायदयाचे ज्ञान नसल्याने त्यांची कुचंबना होत आहे. ७८.५% माना आदिवासी पर्याय नसल्याने जळाऊ लाकूड व १३.५% इमारती व शेती अवजारांसाठी जंगलातून लाकूड आणतात. मात्र महत्तम लोकांची समस्या ही आहे की त्यांना जंगलचे अधिकारी त्या वस्तू आणू देत नाहीत व आणू दिल्या तर त्यांना त्याबदलयात धान्य अथवा पैशाच्या स्वरूपात मोबदला दयावा लागतो. त्याचप्रमाणे जंगली प्राण्यांची भीतीतर नेहमीच पाठीशी असते. अशाप्रकारे जगण्यासाठी त्यांना अतिशय संघर्ष करावा लागतो.

२१) जवाहर रोजगार योजना व स्वयंरोजगार योजना यांमुळे आदिवासी व ग्रामीण भागाचा विकास होईल असे शासनास वाटते. मात्र किमान १०० दिवसांचा देखील रोजगार नेहमी उपलब्ध होत नाही असे महत्तम लोकांनी मत नोंदविले आहे. तर किमान वेतन जे अकुशल कामगाराला शासनाने ठरविले आहे तेही किती आहे हे महत्तम लोकांना माहित नाही. त्यामूळे मिळेल ती मजूरी घेऊन मिळेल त्या कामावर जाणे अन्यथा शेतीमधील छुपी बेरोजगारी ज्यांचा सामना करण्याशिवाय गत्यतर नसते. रोजगार हमीची योजनाही ग्रामसेवक ऐन शेतीच्या हंगामातच काढतात त्यामुळे त्यांना आणखीनच अडचण होते.

२२) आर्थिक मागासलेपणाचा व कर्जाचा जवळचा संबंध आहे. कर्जामुळेही आर्थिक मागासलेपणा व आर्थिक मागासलेपणामुळे इतर कामांसाठी कर्ज असा सारखा पाठशिवणीचा खेळ सुरू असतो. त्यातही शेतकरी म्हटला तर सावरकी बंद झाल्या असल्या तरी सहकारी सोसायट्या व सहकारी बँका, ग्रामीण बँका व इतरही बँका शेतकऱ्यांना कर्जबाजारी बनवत चालल्या. ७/१२ चा उतारा व बँकेचे कर्ज नसल्याचे प्रमाणपत्र नेले की शेती तारण ठेवून कर्ज मिळते. सध्या एक लाखापर्यंत शासन बिनव्याजी कर्ज किंवा आर्थिक मदत शेतकऱ्यांना देते. परंतु ज्यांच्याकडे कोणतीही शेती नाही त्यांना कर्ज घेण्याची सोय नाही. व्यवसाय करण्यासाठी शासन २५,०००रू चे कर्ज देते. परंतु त्यासाठीही

कागदपत्रे मिळत नाही अशी परिस्थिती असतांना महत्तम शेतकरी बँकेत व इतर माना आदिवासी बँकेच्या व नातेवाईकांच्या तसेच सावकारांच्या कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले आहेत. परंतु तरीही ५०% माना आदिवासी त्यांची साधी राहणी व अल्पसंतुष्टी स्वभाव यामुळे या झगमगाटाच्या दुनियेतही त्यांनी आपल्या गरजांवर नियंत्रण ठेवण्यात यश मिळविले आहे. आमच्यावर 'कर्जनाही' असे ते अभिमानाने सांगतात. हे त्यांच्यातील एक सकारात्मक परिवर्तन होय.

कर्ज हे विशेषत: महत्तम आदिवासींनी शेतीसाठी, थोडया प्रमाणात घरासाठी व दवाखान्यासाठी व विशेषत: लग्नासाठी घेतलेले आहे. मजुरांकडे तारण ठेवायला काहीही नसते. त्यामुळे त्यांना कर्ज मिळत नाही. शेतकऱ्यांकडे तारण ठेवायला शेती असते. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकरी कर्ज घेतात व कर्ज घेतल्या शिवाय त्यांचे भागत नाही. सध्या एक लाखापर्यंत शून्य व्याजदराने शेतकऱ्यांना कर्ज मिळत असल्याने बँकाकडून कर्ज घेणे सोयीचे वाटते असे महत्तम उत्तरदात्यांचे मत असले तरी कर्ज कोणाकडूनच घेणे सोयीचे वाटत नाही. हा ही विचार पुढे येत आहे. सावकारीला सर्वांनी दुरून हात जोडले आहेत. माना आदिवासींमधील हे एक सकारात्मक परिवर्तन आहे.

कर्ज देणे व वसूल करणे हया दोन्ही गोष्टी एकमेकांपासून वेगळया करता येत नाही. पूर्वी सावकार कर्ज देत व बळजबरीने शेतीमाल निघताच वसूल करत. मालमत्ता जप्त करत किंवा वेठबिगारी करवून घेत. सध्या मात्र आदिवासींकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोण बदलत आहे. परंतु सावकार व बँकांनी कर्ज वसुलीसाठी शाब्दिक अपमान केला असे ५.५% उत्तरदात्यांनी आपले मत नोंदविले ही संख्या जरी लहान असली तरी तिकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मात्र महत्तम आदिवासींना कोणीही कर्ज वसूलीसाठी बळजबरी केली नाही हेही एक समाजातील विचारांचे परिवर्तन आहे.

२३) कोणत्याही देशातील अर्थव्यवस्था त्या देशातील नागरिकांच्या क्रयशक्ती (खरेदी करण्याची शक्ती) व बचतीचे प्रमाण यावरच अवलंबून असते. बचत करण्यासाठी बँकाची निवड केली तर देशाच्या विकासात फार मोठा उपयोग होतो. बचत करणे ही एक मनोवृत्ती आहे. मात्र बचतीचे प्रमाण हे नागरिकांच्या उत्पन्नावर अवलंबून असते. माना आदिवासींमध्ये फक्त १५% लोकच थोडी बचत करतो असे म्हणतात. ते गावातील पोष्टात, बँकेत किंवा बचत गटांत बचत करतात. मात्र आदिवासी शिल्लक उरत नसल्यामुळे बचत करू शकत नाही.

एकंदर माना आदिवासींची आर्थिक स्थिती अत्यंत मागासलेली आहे हे गृहीतक साध्य होते.

२४) आदिवासींचा आर्थिक दर्जा सुधारावा व त्यांचा विकास व्हावा या उद्देशाने शासनाने विविध योजना आखल्या व राबविल्या आहेत. परंतु त्यासाठी आदिवासी या शब्दाचा वापर करून अनेक लोकांनी शासनाला फसविले आहे. आदिवासींनाही योजनेपुरतेच आदिवासी म्हणवून घेणे आवडते असे वाटत असले तरी पूर्वी आदिवासींना आदिवासी म्हणवून घेणे आवडत नव्हते. मात्र आता माना आदिवासींना त्यांच्यासाठी आदिवासी हा शब्द योग्य वाटतो.

२५) ७३ व्या घटनादुरूस्तीने ग्रामपंचायत व ग्रामसभांना अनेक अधिकार देऊन सक्षम केलेले आहे. त्यामुळे ग्रामसभा घेऊन योजनांची माहिती देणे व कामांना मंजूरी देणे हे ग्रामपंचायतीचे कर्तव्य व जबाबदारी आहे. त्या योजनांची ग्रामपंचायती मार्फत माहिती मिळाली असे ४८.५% तर शासनाच्या अधिकाऱ्यांनी, संस्थांनी, नेत्यांनी माहिती सांगितली असे महत्तम आदिवासींचे अनुभव आहेत. त्यामुळे शासकिय योजनांबाबत सध्या ७०.५% आदिवासींना संपूर्ण नाही परंतु थोडीफार माहिती आहे व ते माहिती करून घेत आहेत. मात्र ज्यांच्यासाठी योजना आहेत व त्यांच्यापर्यंत त्या पोहोचत नाहीत हे सर्वांनीच मान्य केलेले आहे. त्या आदिवासी व गैरआदिवासींनी मान्य केलेले आहे. त्यामुळे फक्त १२.५%

आदिवासींनेच या शासकिय वैयक्तिक लाभाच्या योजनांचा फायदा घेतलेला आहे व तो शेतीकामासाठी, व्यवसायासाठी, घरगुती व इतर साहित्य घेण्याकरीता घेतलेला आहे. आदिवासींचे कागदपत्र व नावे वापरून खोटे दस्ताऐवज सादर करून योजना लाटणारे भामटे समाजात अनेक आहेत व भोळया भाबळया आदिवासींना माहित असूनही ते काहीच करत नाही. ८६% आदिवासी योजनांपासून वंचित आहेत व ही बाब मोठी खेदाची आहे. फक्त शाळांमधून आदिवासी विद्यार्थ्यांना प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरांवर मिळणारी शिष्यवृत्ती, गणवेश, भोजन, पुस्तके, इत्यादी किरकोळ बाबी सोडल्या तर आर्थिक विकास साधण्यासाठी ज्या योजना राबविल्या जातात त्या मात्र त्यांना मिळत नाही. असे २४.५% लोक नाराजीच्या सुरात बोलतात. आदिवासींचा आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी त्यांना योजनेचा लाभ मिळवून देणे आवश्यक आहे. त्यामुळे शासकिय योजनांचा व सोयी सवलतींचा माना जमातीच्या विकासासाठी विशेष फायदा झालेला नाही हेही एक गृहित मांडले होते ते सिद्ध झालेले आहे.

ज्या अल्प प्रमाणात आदिवासींना किरकोळ योजनांचा फायदा झाला त्यांनाही भ्रष्टाचाराला तोंड दयावे लागले. शासकिय योजनांविषयी योजना असल्या तरी समाधानी नाही असे महत्तम (७९.५%) उत्तरदाते सांगतात. त्यामुळे योजनांची काय स्थिती आहे याची कल्पना करता येण्यासारखी आहे. आदिवासींचे राहणीमान, उंचावण्यासाठी या योजना राबविण्यात येतात. मात्र अगदी अल्प प्रमाणात त्यांचा फायदा राहणीमान उंचावण्यासाठी म्हणण्यापेक्षा मुलांना व मुलींना दहावीपर्यत शिक्षण घेण्यासाठी व गावांमध्ये दलित वस्तींतून सिमेंटचे रस्ते बांधणे व रस्त्यावर विदयुतीकरण करण्यासाठी झाला असे दिसते. माना आदिवासींच्या मते ५०% उत्तरदाते अंशत: फायदा झाला म्हणतात व ५०% उत्तरदाते फायदा झाला नाही असे म्हणतात. याचे कारण ज्यांना योजना मिळतात त्यांना फायदा झाला असे वाटते.

योजनांविषयी माना आदिवासींच्या शासनाकडून अनेक अपेक्षा आहेत. विशेषत्वाने आदिवासी समूहासाठी शासनाकडून स्थायी भौतिक सोयी सुविधा, पुरवाव्या, गावात रस्ते, शासकिय वाहणे, नाल्या, पाणी पुरवठा इत्यादी सोयी करणे, मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी उत्तम शिक्षक व यंत्रणा राबवावी त्याचप्रमाणे शेतीसाठी व इतर व्यवसायासाठी आर्थिक मदत व साधने पुरवावीत व त्यांच्या मुलाबाळांना नोकऱ्या मिळण्याची संधी दयावी अशा अपेक्षा आहेत व अगदी रास्त आहेत. इतर मोठे मोठे नेते मंडळी प्रमाणे मोठे बंगले, भव्य पैसा अथवा रेल्वे, विमानाचा प्रवास मिळावा अशा अवास्तव मागण्या हे करीत नाही. फक्त इतर सामान्य लोकांसारखे परंतु सुखाचे जीवन जगण्यासाठी अगदी थोडया मागण्या मागतात.

२६) संविधानाने अनुसूचित जमातीसाठी ७.५% आरक्षणाची तरतूद केलेली आहे. मात्र या बाबतीतही माना आदिवासी जागृत नाहीत. ९९% माना आदिवासींना किती आरक्षण आहे हे माहित नाही. ४४.५% माना आदिवासींजवळ जातप्रमाणपत्र नाही. कारण बऱ्याच जणांना गरज वाटली नाही व कित्येकांना ते कसे तयार करतात हे माहित नाही, दाखले व कागदपत्रे न मिळाल्यामुळेही जातप्रमाणपत्र नाही. ज्यांना नोकरी आहे अथवा उच्च शिक्षण घेत आहेत. त्यांचे जातपडताळणी प्रमाणपत्र मिळत नाही. त्यामुळे हातातील नोकरी गेलेली आहे असेही बरेच जण आहेत. ज्यांकडे जुने इंग्रजीतील जात प्रमाणपत्र आहे त्यांना मराठीतून करा असे आदेश आहेत. जात पडताळणीसाठी कार्यालयाकडून प्रत्यक्ष पोलीस पथकांना नियुक्त केलेले आहे. त्यामुळे एखादया गुन्हेगार असल्याप्रमाणे पोलीस पथके येतात व त्यांच्याशी वागतात. त्यामुळे साधे भोळे माना आदिवासी अतिशय घाबरलेले दिसतात. निवडणुकांतही सध्या त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्रा अभावी सहभाग घेता येत नाही आहे.

या सर्व बाबींचा विचार करता असे लक्षात येते की माना आदिवासी स्वत:च्या अधिकारांविषयी त्यांना जाणीव तर नाहीच परंतु सध्या तरूण शिक्षित लोक अल्पप्रमाणात का होईना अधिकाराविषयी माहिती करून घेतांना आढळतात व हे त्यांच्यातील एक सकारात्मक परिवर्तन होय.

२७) आदिवासींचा जो प्रथम अधिकार आदिवासी या अर्थाने येथील नैसर्गिक संपत्तीवर आहे. याबाबत ८०% आदिवासी सहमत आहेत. विविध वनकायदयांद्वारे त्यांच्यावर अनेक बंधने लादून त्यांना त्यांच्या अधिकारापासून पूर्णत: व अंशत: डावलले जात आहे याही मताशी ७५% एवढया मोठया प्रमाणात माना आदिवासी सहमत आहेत. त्यामुळे त्यांना आता अन्यायाची जाणीव घेऊ लागली आहे व ते विचार करू लागले आहेत असे संशोधिकेला वाटते. व हे एक महत्त्वाचे विचार परिवर्तन घडून येत आहे.

त्यामुळे आपल्या अधिकारांविषयी यापूर्वी माना आदिवासी जागृत नव्हता हे गृहीत जरी सत्य आढळले तरी सुद्धा सद्यस्थितीत त्यांच्या अधिकारांविषयी ते जागृत होत आहेत. विचार करू लागत आहे हे वैचारिक परिवर्तन होत आहे.

आपल्या अधिकारांसाठी वैयक्तिक व सामुहिक संघर्ष करणाऱ्यांची संख्याही ५०% असली तरी ५०% आदिवासींनी मात्र कोणत्याही प्रकार संघर्ष केलेला नाही असे त्यांना वाटते. माना आदिवासींचे नाव अनुसूचित जमातीच्या यादीत स्वतंत्रपणे नोंदण्यासाठी माना आदिवासींनी सामुहिक संघर्ष केला. त्यासाठी न्यायालयीन लढाई लढण्यात आली, शासनाशी संघर्ष करण्यात आला. गावागावांतून वर्गण्या गोळा केल्या गेल्या. मात्र न्यायालयात सुनावणीला फक्त नेतेच उभे राहिले. त्यामुळे बऱ्याच जणांना आपण काहीच केले नाही असे वाटते. यावरून त्यांच्यातील निरागस व साधेपणाचा अनुभव येतो. मात्र वैयक्तिक अन्यायाच्या बाबातीत संघर्ष करणाऱ्यांचे प्रमाण नगण्यच आहे सामुहिक संघर्ष केल्याने त्यांना अनुसूचित जमातीच्या यादीत नाव समाविष्ट झाले हे काही

प्रमाणात यश मिळाले मात्र जात पडताळणी प्रमाणपत्र मिळत नसल्याने त्यांना पूर्ण यश मिळू शकले नाही. त्यासाठी त्यांना स्वत:च्या जमातींचा व जमातीच्या नेत्यांची व अगदी अल्प प्रमाणात इतरांनी मदत केली.

२८) आदिवासींच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघाने सांगितलेल्या वैशिष्टयांपैकी चौथे वैशिष्टय म्हणजे स्वत:ला आदिवासी म्हणून ओळखणाऱ्या मानवसमुहाचे वंशज, छळ व दडपणाचे बळी ठरलेले लोक यांचा समावेश होतो. हया विधानाचा अनुभव जवळपास सर्वच आदिवासींच्या संदर्भात सर्वांनाच येतो. परंतु स्वत: आदिवासी मात्र याबाबतीत कित्येक वेळा – चूपचाप सहन करतात. तर कित्येक वेळा ते बंडही करून उठलेले आहेत. माना आदिवासींचा अनुभव यापेक्षा वेगळा नाही. एखादया वेळी माना आदिवासी व गैरआदिवासी एकत्र असल्यास कोणतेही मेहनतीचे काम करवून घ्यायचे असल्यास माना आदिवासींना ते सांगितले जाते व ते आनंदाने करतातही. बऱ्याच वेळा त्यांना कमी पैशात किंवा बिगर पैशातही राबवून घेतले जाते. इतर समाजाकडून किंवा गैरआदिवासींकडून माना आदिवासींचा शाब्दिक अपमान मन:स्ताप देऊन तसेच आर्थिक शोषण होते असे स्वत:च ७५% माना आदिवासी कबूल करतात. अशाप्रकारचे शोषण हे मोठे शेतकरी, ठेकेदार, शासकिय अधिकारी व इतर समाज या सर्वांकडूनच केले जाते. माना आदिवासी इतर आदिवासींप्रमाणेच अडाणी व साधेभोळे असून शिक्षणाचे व आर्थिक पाठबळ त्यांच्या पाठीशी नसल्याने व प्रबळ सत्ताधारी पाठीराखे नसल्यानेही त्यांचे शोषण होते.

अशाप्रकारचे शोषण होऊनही महत्तम आदिवासी तक्रार करूनही न्याय मिळत नाही, प्रतिकाराचे धैर्य नाही म्हणून तक्रारच केली नाही असे म्हणतात. यावरून त्यांची सहनशिलता लक्षात येते. मात्र ०५% आदिवासींनी वेगवेगळया ठिकाणी याबाबतीत तक्रार नोंदवली असल्याने हे त्यांच्यातील एक सकारात्मक विचार परिवर्तन होत आहे.

८ मार्च २००६ पासून माना आदिवासींना अनुसूचित जमातीचे सर्व अधिनियम लागू झाले. त्यामुळे त्यांना विविध योजना व सोयी सवलतींचा आदिवासी म्हणून लाभ मिळायला सुरूवात झाली. आदिवासी गरोदर महिलांना मिळणारे अनुदान, प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मिळणारे सर्व शिष्यवृत्ती व गणेश, पोषण आहार व इतर सवलती, शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, व्यवसायासाठी कर्ज  व मदत, राजकारणात निवडणुकांमध्ये आरक्षण, उच्च शिक्षणासाठी शिक्षणसंस्थांमध्ये आरक्षण व नोकरीमध्ये आरक्षण या सर्व बाबी त्यांना लागू झाल्या. त्यामुळे अनुससूचित जमातीच्या यादीत नाव दाखल झाल्यामुळे थोडयाफार प्रमाणात त्यांना लाभ होणे सुरू झालेले आहे. मात्र वारंवार एकच प्रश्न उपस्थित होतो. तो म्हणजे त्यांच्या जातप्रमाणपत्र व जातपडताळणी प्रमाणपत्र त्यांना मिळू दिले जात नाही. लहान सहान त्रुटी काढून पोलीस पथके तपासणीला पाठवून त्यांना त्रास देणे सुरू आहे. त्यामुळे राजकारण, उच्च शिक्षण व नोकऱ्यांतील आरक्षणापासून त्यांना वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे बऱ्याच जणांना आरक्षणाचा फायदा अजिबात मिळालेला नाही असे वाटते.

ग्रामीण भागात  माना आदिवासी इतर समाजांबरोबर (गैरआदिवासी) राहतात. मात्र इतर समाज, उदा. महार हे हयांची मुले जिद्दने शाळेत जाऊन अभ्यास करतांना व महत्तम लोक उच्च शिक्षण घेऊन नोकरी मिळविण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. मात्र एकत्र शिक्षण घेतलेले माना आदिवासी हे दहावीपर्यंत किंवा बारावी पर्यंत शिक्षण घेऊन परत शेतात किंवा मजुरीची कामे करतांना आढळतात. मुलीतर क्वचितच दहावीनंतर शिकतांना आढळतात. शहरातील अपवाद सोडले तर ग्रामीण भागात त्यांचे शिक्षण घेऊन उच्च आकांक्षा बाळगण्याचे चिन्ह दिसत नाही. याचे कारण हयांना स्वत:चा सार्वांगिण विकास करून घेण्याची प्रेरणा या जमातीमध्ये दिसून येत नाही. इतर समुहांच्या तुलनेत

शिक्षण व नोकरीमध्ये आम्ही निश्चितच व बरेच मागे पडलो असे महत्तम ८३% उत्तरदाते कबुल करतात.

यावरून त्यांचे शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणा लक्षात येते.

इतर समाजांकडून विशेषत: गैरआदिवासींकडून इतर वेळी समाजात वावरत असतांना २१.५% उत्तरदाते हीन दर्जाची वागणुक मिळते असे म्हणतात तर ५५.५% उत्तरदाते समान दर्जाची वागणुक मिळते असे उत्तर नोंदवितात. सध्या माना आदिवासी जमातीला गैर आदिवासींकडून समान दर्जाची वागणुक देण्याचे प्रमाण वाढले असले तेही विशेषत: ओ.बी.सी. गटातील जातींकडून फक्त. तरी सुद्धा हीन दर्जा देणाऱ्यांचे प्रमाण ही कमी झालेले नाही. त्यामुळे त्यांच्या सामाजिक स्थितीतील परिवर्तनाची गती अतिशय मंद आहे असे म्हणता येते.

२९) आदिवासी समाजाची त्यांची स्वतंत्र अशी व प्रगल्भ संस्कृती असल्याचे निदर्शनास येते. माना आदिवासी हे मराठी परंतु बोलीभाषा (शुद्ध व प्रमाणित मराठी नाही) भाषिक आहेत. त्यांना इतर भाषा म्हणजे हिंदी थोडीफार समजते. मात्र वापरता येत नाही. मराठी शिवाय इतर भाषा म्हणजे हिंदी किंवा इंग्रजी समजणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे व ते सुशिक्षीत किंवा शहरात राहणारे आहेत. सध्या शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना हिंदी व इंग्रजीचे ज्ञान देऊन देशाच्या विकासाच्या प्रवाहात आणण्याचा शासनाचा प्रयत्न सुरू आहे. तरीही दहावी बोर्डाच्या परिक्षेत गणित विज्ञान विषयांसोबतच हिंदी व इंग्रजी विषयात नापास होणारांचे प्रमाण अधिक आहे.

अंगावरचा पेहरावही सध्या मानवाच्या व्यक्तिमत्त्वाविषयी बरेच काही सांगून जातो. माना आदिवासी पूर्वी सदरा व धोतर घालायचे. स्त्रिया उलट पदराचे लुगडे घालून पदर कमरेला खोचत. आता मात्र प्राथमिक शिक्षणापासूनच मुलांना शर्ट पँट व मुलींना फ्रॉक, सलवारची सवय शासनाने लावून दिल्याने

आता त्यांच्या पेहरावात बराच फरक आलेला आहे. आता स्त्रिया सरळ पदराचे लुगडे, साडी व मुली सलवार घालतात. तर पुरूष शर्ट व पँट घालतांना आढळतात. त्यांच्यात पेहरावाच्या बाबतीत झपाट्याने परिवर्तन झालेले आहे. महत्तम माना आदिवासींना त्यांच्या मुलांनी इतर समाजाचे पाहून तसा आधुनिक पेहराव करावा असे वाटते.

आदिवासींमध्ये गोंदण ही श्रृंगाराची एक कला आहे. अतिशय वेदना देणारी ही कला असली तरी मात्र आदिवासींनी ती विकसित केली व तिची जपणुक केलेली आहे.मृत्युंतर गोंदण सोबत जाते अशी त्यांची धारणा आहे व ती एक व्यक्तिची ओळखच आहे. जत्रेच्या ठिकाणी असे गोंदवून देणारे व गोंदवून घेणारे बऱ्याच प्रमाणात आढळतात. काही आदिवासी जमातीत संपूर्ण चेहरा व अंगावर गोंदवून विकृत रूप केले जाते तर काही आदिवासींमध्ये केवळ हातावर व कपाळावर गोंदविले जाते. माना आदिवासीमध्ये कपाळावर टिकली व हातावर गोंदण केले जाते. मात्र एकाच सुईने सर्वांना गोंदवल्याने सद्यस्थितीतील एड्स सारख्या आजाराचा फैलाव होण्याची शक्यता असते. मात्र सद्यस्थितीत अंगावर गोंदणे हे अयोग्य आहे व दुकानांतून श्रृंगारांची विविध साधने उपलब्ध असतांना अंगावर गोंदवून घेण्याची आवश्यकता नाही असे महत्तम उत्तरदात्यांनी आपले मत व्यक्त केले. यावरून माना आदिवासींच्या मनांमध्ये परिवर्तन होत आहे. संस्कृतीतील चुकीच्या व वाईट परंपरा बदलायला ते तयार आहेत. हे एक सकारात्मक परिवर्तन आपल्याला पाहायला मिळते.

४० ते ५० वर्षापूर्वी माना आदिवासी हे अनुसूचित जातीच्या हातचे जसे मांग, महार, चांभार, इ. च्या हाताचे शिजवलेले अन्न खात नसत. व त्यांच्याघरी पाणीही पित नसत. सध्या मात्र धकाधकीच्या व आधुनिकीकरणाच्या युगात माना आदिवासींत खानपान निर्बंधाबाबत शिथिलता येऊन फक्त ०.५% लोकच आता हे निर्बंध पाळतात. तर इतर सर्वजण सर्वच जाती व जमातींच्या हातचे शिजवलेले अन्न व पाणी ग्रहण करतात. आधुनिकीकरणाचा व वाढत्या हॉटेल

व्यवसायाचा हा एक प्रभाव त्यांच्यावर दिसून येतो. व विचारांतीलच नव्हे तर आचारांतीलही परिवर्तन झालेले आहे.

ग्रामीण भागात पूर्वी कोणतेही सामाजिक कार्यक्रम एकटया समुहाने किंवा जमातीतच पार पाडले जात. मात्र सद्या सर्वच जण जातीजमातीचे लोक एकमेकांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतांना दिसतात. त्यामुळे माना आदिवासीही फार अलिप्तपणे आपलयाच समूहात राहत नाहीत. तर इतर समूहांशी मिळून मिसळून वागतात व आता त्यांच्यात कोणतेही खणपानाचे निर्बंध नाहीत.

इतर समाजांप्रमाणेच माना आदिवासी समाजामध्येही प्रसार माध्यमें, शिक्षण व आधुनिकीकरणाचा प्रभाव पडला आहे. व त्याचाच परिणाम म्हणून संयुक्त कुटुंबाऐवजी विभक्त व कुटुंब व्यवस्था, मेळाव्यांमध्ये लग्न लावणे, शेतीच्या परंपरागत साधनांऐवजी ट्रॅक्टर, थ्रेशन मशीन, इ. चा वापर , पारंपारिक दंडार, तमाशा इत्यादी सांस्कृतिक मनोरंजनाच्या कलांऐवजी, नाटक सिनेमा व नृत्यांचे आयोजन करणे, त्याचप्रमाणे संस्कृती परिवर्तन इत्यादी हळूहळू का होईना बदल जाणवायला लागलेत व उच्चवर्णियांच्या अनुकरणाचा प्रयत्न आता शिक्षित मुले करायला लागली आहे. त्यामुळे पेहरावांतही परिवर्तन व्हायला लागले आहेत. त्यामुळे 'माना जमातीतील अंतर्गत संरचनेत आधुनिकिकरणाचा प्रभाव जाणवत नाही' हे गृहीतक चुकिचे ठरलेले आहे. तर हळूहळू व मंदगतीने आधुनिकीकरणाचा त्यांच्या सर्वच क्षेत्रावर प्रभाव पडून बदल घडून यायला लागले आहेत. असे संशोधनकर्तीला वाटते.

मात्र आधुनिकीकरणाच्या सहाय्याने ज्या झपाटयाने इतर समाजांनी स्वत:चा विकास करून घेतला आहे त्याच्या तुलनेत कितीतरी पट मंदगतीने माना जमातीचा विकास व परिवर्तन सुरू असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे

आधुनिकीकीणाच्या प्रक्रियेत माना जमात बरीच मागे आहे 'हे गृहीतकृत्य' सिद्ध झालेले आहे.

३०) माना आदिवासींचे गावागावांतून संघटन आहे व महत्तम लोक त्या संघटनेचे औपचारिक व अनौपचारीक सदस्यही आहेत. कारण जाती—जमातीचे संघटन म्हटले की व्यक्ति अपोआपच त्या त्या संघटनेचा सदस्य गणल्या जातो.

संघटना म्हटले की नेता हा ओघाने आलाच. नेत्याविना संघटना असूच शकत नाही. त्यामूळे कोणत्याही जाती—जमातीत संघटनेच्या पुढाऱ्याला किंवा नेत्याला अनन्य साधारण महत्त्व असते. लोकांच्या वतीने तो समाजाच्या समस्या न्यायालयापुढे मांडण्याचा व सोडविण्याचा प्रयत्न करतो. माना जमातीमध्ये सुद्धा त्यांच्या संघटना तर आहेतच परंतु जमातीचे काही नेते सुद्धा आहेत. त्यांना जमातीतील लोकांनी नेते म्हणून मान्यता दिलेली आहे. ते समाजासाठी सतत कार्यरत असतात व समाजाच्या हितासाठी सतत झटत असतात. कधी कधी ते निवडणुकांमध्ये सहभाग घेतात. व समाजाच्या व राजकिय, पक्षाच्या वतीने निवडणुका लढवतात. अनुसूचित जमातीचे आरक्षण असल्यास इतर पक्षांतर्फे त्यांना प्राधान्य दिले जाते किंवा स्वतंत्रही ते निवडणुकीकरीता व पदाकरीता अर्ज करतात.

३१) निवडणुका आल्या की सर्वांना मायबाप म्हणणारे, हात जोडणारे, पुढारी नेते, राजकारणी मात्र निवडणुका होताच या आदिवासी क्षेत्रांकडे पाठ फिरवितात. त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी ते कधीच त्या गावांत जात नाही. तर स्वत:चाच सर्वांगीण विकास साधण्यासाठी शहराकडे त्यांचा कल असतो.

गावातील समस्या सोडविण्यासाठी व इतर वैयक्तिक समस्या सोडविण्यासाठी माना आदिवासींना ग्रामपंचायत सर्वांत जवळची वाटते. तर २७% लोकसमस्या सांगतच नाही असे म्हणतात. ग्रामपंचायत सदस्यही निवडून येताच सामान्य लोकांची गाऱ्हाणी ऐकून घेतांना दिसत नाहीत. गावांत भांडणतंटा

झाल्यास महात्मा गांधी तंटामुक्ती समितीकडे प्रकरणे न्यायासाठी नेली जातात. पूर्वीची न्यायपंचायत, जातपंचायत व पोलीसस्टेशनमध्ये जाण्याचे प्रमाण आता नाहीच्या बरोबर आहे. तर बरेच लोक स्वत:च्या घरीच न्याय करतो व वाद मिटवितो असेही उत्तर देतात. मुळातच आदिवासी हे शांतताप्रिय व नैसर्गिक पद्धतीने निसर्ग नियमाने जीवन जगणारे आहेत. मात्र गावांत व वैयक्तिक ठिकाणी वाद झालाच तर बदलत्या काळानुसार तंटामुक्त समितीकडे धाव घेतांना दिसतात. हे त्यांच्या अन्यायाविरूद्ध जागृतीचे लक्षण आहे असे संशोधनकर्तीला वाटते.

३२) मतदान करण्याविषयी माना आदिवासी अत्यंत जागरूक आहेत. जेथे सुशिक्षित व उच्चवर्णीय मतदान करण्याचे टाळतात तेथे माना आदिवासी १००% मतदान करतात. मरणासन्न अवस्थेतील व्यक्ती असली तरी तिला मतदानाला उचलून नेले जाते. मतदान न करणे म्हणजे मेल्यात जमा आहे. अशी त्यांची धारणा आहे. त्यामुळे मतदानाचा अर्थ जरी त्यांना अधिकार असा वाटत नसला तरीसुद्धा मतदान करणे हे आपले कर्तव्य ते समजतात. मात्र मतदान हे जरी गुप्त, स्वतंत्र अधिकार व कर्तव्य असले तरी त्याचा संबंध आपल्या समुहाशी व समुहाच्या हितासाठी जोडला जातो. त्यामुळे माना आदिवासींमध्ये स्वत:च्या कुटुंबाच्या व जमातींच्या नेत्यांच्या सल्ल्याने मतदान केले जाते व स्वतंत्र हितापेक्षा समुहाच्या हिताला अधिक महत्त्व दिले जाते.

भारतीय समाज हा जातीव्यवस्थेवर आधारलेला आहे व जातीची पाळेमुळे फार खोलवर गेलेली आहेत. निवडणुकांमध्ये जातीचा आणि राजकीय पक्षाचा फार जवळचा संबंध असतो. राजकिय पक्षांनी जणु जातींना वाटून घेतलेले आढळते. अशावेळी मतदान करतांना जमातीचा अथवा पक्षाचा उमेदवार पाहिला जातो. माना जमातीमध्ये मात्र ५३.५% उत्तरदात्यांनी मतदान करतांना चांगला उमेदवार पाहतो असे उत्तर नोंदविले आहे. बऱ्याच जणांनी जमातीचा व पक्षाचा

उमेदवार पाहतो असे उत्तर नोंदविले आहे. माना जमातीमध्ये लोक चांगला उमेदवार मतदान करतांना पाहात असले तरी सुद्धा त्यांच्यावर जमातीचा व राजकीय पक्षाचा प्रभाव असतो. व त्या प्रभावाखाली लोक मतदान करतात. २६. ५% लोक राजकीय पक्षाला  बांधील आहेत तर ७३.५% लोक कोणत्याही राजकीय पक्षाला बांधील नाही असे उत्तर नोंदविले तरी आमच्या जमातीचा हा पक्ष आहे असे लहान मुलेसुद्धा सांगतात. सद्य परिस्थितीत राजकारणी लोक वारंवार पक्ष बदलतात त्यामुळेसुद्धा सामान्य लोक मतदान करतांना राजकीय पक्ष न पाहाता चांगला उमेदवार पाहू लागले आहेत. निवडणुकांमध्ये राजकीय पक्षांकडून विविध प्रलोभाने दाखविण्यात येत असली तरीसुद्धा स्वतंत्र मतदान व चांगल्या उमेदवाराची निवड पक्ष व जमातीला डावलून करण्याचे वाढते प्रमाण हे त्यांच्यातील राजकारणाची समज व जागृती विषयक परिवर्तन दर्शविते.

तसे मुळातच माना आदिवासी हे गोंडापूर्वी विदर्भावर राज्य करणारे होते. इ.स. ९ व्या शतकापासून ते १२ व्या शतकापर्यंत त्यांचे इथे राज्य होते. हे अनेक इतिहासकारांनी सिद्ध केलेले आहे. त्यामुळे मुळातच राजकीय ईच्छाशक्ती व सत्ता काबीज करण्याची प्रबळ ईच्छा त्यांच्या बोलण्यातून वारंवार आढळते. त्यामुळे निवडणुका आल्या की आरक्षणावर किंवा आरक्षण नसेल तर स्वतंत्रही निवडणुक लढतांना ते आढळतात. याबाबतीत अध्ययनाद्वारे असे निदर्शनास आले की १६% माना आदिवासींनी एकदा ०४% लोकांनी दोनदा व ०२% लोकांनी दोनपेक्षा जास्त वेळा निवडणुका लढविल्या आहेत. इतकी कमी लोकसंख्या असतांना हे प्रमाण सहजच जास्त आहे असे म्हणता येते. मात्र निवडणुकीचे क्षेत्र त्यांची ग्रामपंचायत व पंचायत समितीपर्यंतच महत्तम लोकांनी मर्यादित आहे. अत्यल्प प्रमाणात जिल्हास्तरीय, इतर संस्था व विधानसभेत तसेच लोकसभेच्या निवडणुका लढविल्या जातात. व त्यात यश मिळविल्याचे प्रमाणही अत्यल्प आहे. मात्र ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर आरक्षणचा फायदा असतांना व २००६ पूर्वीही जेव्हा 'विशेष मागास प्रवर्गात' मोडत असतांनाही

त्यांनी निवडणुका लढवून त्यात १९% उत्तरदात्यांनी वा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तिंनी त्या जिंकण्यात यश मिळविले आहे. उत्तरदात्यांपैकी एक महिला पंचायत समिती सभापती देखील आहेत. तसेच एक माजी मंत्री डॉ. रमेश गजबे यांनीसुद्धा मुलाखत देऊन संशोधिकेस माना आदिवासी जमातीविषयी माहिती मिळवून देण्यात मदत केलेली आहे.

यावरून माना आदिवासींमध्ये सत्ताकाबीज करण्याची प्रबळ ईच्छाशक्ती असून ते राजकीय क्षेत्रात जागृत होत आहेत व राजकारणात सहभाग घेऊ लागले आहेत हे एक गृहीतक होते ते सिद्ध झालेले आहे. विशेषत: माना जमातीतील हे एक लोकतंत्रात्मक विकासासाठी सकारात्मक परिवर्तन आहे असेही म्हणावयास हवे.

३३) माना जमातीला एक समृद्ध इतिहास आढळतो. संशोधिकेने त्यांच्या इतिहासाबद्दल त्यांच्याकडून जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचा पूर्वज कोण? त्यांच्या इतिहास काय? त्यांच्या राजांची, किल्ल्यांची नावे माहित करून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र ९५% उत्तरदात्यांना त्यांच्या इतिहासाविषयी, मूळ पूर्वजाविषयी तर ९०% उत्तरदात्यांना त्यांचे राजे व किल्ल्यांविषयी काहीही माहिती नाही असे निदर्शनास आले.

यावरून माना आदिवासींना खरोखरच त्यांच्या इतिहासाविषयी काहीही माहिती नाही व ते इतिहासाबद्दल व अस्मितेबद्दल अनभिज्ञ आहेत. कदाचित ते सतत इतरांचा (हिंदू धर्माच्या) प्रभावाखाली राहील्याने त्यांनी त्याबाबत जाणून घेण्याचा फारसा प्रयत्न केला नाही.

'माना' जमात त्यांच्या इतिहासाविषयी अनभिज्ञ आहे. त्यांच्या अस्मितेविषयी माना जमात विशेष जागरूक नाही' हे एक गृहितक इथे सिद्ध झाल्याचे संशोधिकेला वाटते.

३४) आदिवासींचे आयुष्य अन्न, निवारा, शोधण्यातच संपते हया विधानाची सत्यता खरोखरच माना आदिवासींकडे पाहिले की पटते. जंगलात दुर्गम स्थळी निवास असल्याने त्यांना आधीच वास्तव्याच्या ठिकाणी अनेक समस्या आहेत. रस्त्यांची सोय नाही, वाहनांची सोय नाही, रोजगाराची सोय नाही, प्राथमिक स्तराच्यावर शिक्षणाची सोय नाही, दवाखाने नाही, गावांतून नाल्या नाहीत. अशा अनेक अडचणी आहेत. त्यातच जंगलव्याप्त गावांना अभयारण्य किंवा धरण बांधण्यासाठी विस्थापित करून इतर ठिकाणी हलविण्यात येते आहे. व त्यांच्या जमिनींची किंमतही शासकिय नियमाने कमी प्रमाणात दिली जाते. व तीही पुर्णपणे दिली जात नाही. इतर ठीकाणी शेतजमीनी उठविण्यासाठी जागा दिली जाते. परंतु तिचे पट्टे व त्या जमीनीची विल्हेवाट लावण्याचे हक्क त्यांना दिले जात नाही. मात्र त्यांचा गाव उठवून त्या जागी मोठमोठे हॉटेल्स व रीसोर्ट बांधून पर्यटकांकडून अतोनात पैसा कमविल्या जातो. त्यामूळे जो पर्यन्त आदीवासींच्या गावाचा विकास होणार नाहीत व त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणात सुधारणा होत नाही तो पर्यन्त त्यांचा विकास होणे शक्य नाही. कारण योजनांद्वारे एखादया कुटुंबाचा विकास होईल. परंतु संपूर्ण गावातील आदीवासींचा विकास करण्यासाठी त्या भूभागाचा विकास करणेच अपरिहार्यच आहे.

३५) कारखानदारीचा विकास करून विविध शहरे निर्माण झाली व त्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाचा विकास करून आधुनिक विश्व निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात तंत्रज्ञानामुळे ज्या भौतिक वस्तूंची निर्मीती होत आहे त्याचा प्रभाव पडून आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू आहे तेव्हा या आधुनिकीकरणाचा प्रभाव माना आदिवासींवर पडलेला आहे. त्यांच्या आचारविचारांत परिवर्तन होत आहे व त्यांच्यात जागृती निर्माण होत आहे. त्यांच्या आशा अपेक्षा वाढत आहेत. व त्याबद्दल संघर्ष करण्याची वृत्तीही वाढत आहे. मात्र आधुनिकीकरण म्हणजे काय? त्याची संकल्पना याचे ज्ञान मात्र माना आदिवासींना असलेले दिसून येत नाही. 'आधुनिकीकीणाने त्यांची जीवनपद्धती

बदलत आहे काय? या प्रश्नाच्या उत्तरादाखल ४८.५% उत्तरदाते आधुनिकीकरण म्हणजे काय हे माहिती नाही असे म्हणतात तर ३९% उत्तरदाते नक्कीच व अंशत: बदलत आहे असे म्हणतात. यावरून आधुनिकीकरणाने माना आदिवासींची जीवनपद्धती बदलत आहे व ही बाब बऱ्याच प्रमाणात माना आदिवासी कबूलही करतात. परंतु महत्तम आदिवासींना मात्र आधुनिकीकरणाची संकल्पना माहित नाही. आधुनिकीकरणाने त्यांच्या विचारांत व आचारांत, संस्कृतीत, भौतिक सुखसोयींच्या वस्तूंत, त्यांच्या अंतर्गत संरचनेत, आर्थिक क्रियांमध्ये सर्वच बाबतीत परिवर्तन घडून येत आहे. काही परिवर्तन त्यांच्यासाठी चांगले व सकारात्मक आहे मात्र शांतपणे व नैसर्गिक जीवन जगण्याऱ्या समाधानी लोकांसाठी हे परिवर्तन मात्र धावपळ, अनियंत्रित व जीवघेण्या इच्छा, अपेक्षा, स्पर्धा व त्यातून निर्माण होणाऱ्या अनेक मानसिक, शारीरिक व सामाजिक समस्या ताणतणाव निर्माण करणाऱ्याही आहेत. व त्यातून करावे लागणारे समायोजन म्हणजे त्यांच्यासाठी तारेवरची कसरत आहे. आधुनिकीकरणाने माना आदिवासींची जी जीवनपद्धती बदलत आहे त्याबदलाची गती अतिशय मंद आहे. ज्या गतीने त्यांच्यात इतर समूहांचा वा समाजांच्या तुलनेने बदल व्हायला हवा होता त्यागतीने त्यांच्यात परिवर्तन होतांना स्वातंत्र्याच्या ६५ वर्षानंतरही दिसून येत नाही. त्यामुळे इतर प्रगत समाज व माना आदिवासी समाज यांच्यामध्ये विषमतेची मोठी दरी निर्माण झालेली आहे. इंतर गैरआदिवासी समाजांच्या तुलनेत त्यांची शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती अजूनही मागासलेली आहे. अजूनही ते रूढी प्रथा व परंपरा, अंद्धश्रद्धांना चिकटूनच आहेत. भगताला बोलावणे, अंगात येणे, जादूटोण्यावर विश्वास, नशिबावर विश्वास, आजारपणात दवाखान्यात जाऊनही पुन्हा भगताकडे जाणे, राख, फूंक करून आजार दूर करण्याचा प्रयत्न करणे, बाळंतपण घरीच होईल याची वाट पाहणे किंवा घरीच करणे, परंपरागत शेती करणे व मिळेल त्या मजूरीवर काम करणे, उच्च शिक्षणाऐवजी दिवसभर कष्ट करून चटणी भाकरीत समाधान मानणे

हे सर्व पारंपारिक मागासलेपणाची लक्षणे त्यांच्यातील ''महत्तम'' ग्रामीण लोकांत दिसून येतात. त्यामुळे आधुनिकीकरणाच्या युगात जिथे इतर समाजातील मुले जीन्सपँन्ट व शर्ट घालून कॉलेजात जातात, व मुलांच्या बरोबरीने मुलीसुद्धा शिक्षण घेतात, तिथे माना आदिवासींच्या मुली साडी घालून बोहल्यावर चढतात व चूल व मूल सांभाळतात, संसार करतात. ह्या सर्व बाबी त्यांच्या मागासलेपणाच्या दर्शक आहेत. स्पर्धेच्या युगात जिंकण्यासाठी सतत संघर्षमय असणे व असमाधानी असणे महत्त्वाचे आहे. मात्र न्याय मिळत नाही म्हणून तक्रारच न करणे, चूपचाप अन्याय सहन करणे, ही पूर्वापर चालत आलेली गुलामगीरीची लक्षणे आहेत व त्यांचा प्रभाव अजुनही माना जमातीवर असल्याचे दिसते. त्यात परिवर्तन होतांना दिसते मात्र त्याची गती अतिशय मंद व प्रमाण अतिशय अल्प आहे असेच संशोधनाअंती संशोधिकेच्या निदर्शनास आले.

त्यामूळे 'आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत माना जमात बरीच मागे आहे' हेएक गृहीतक इथे सिद्ध होते.

**समस्या :**

८ मार्च २००६ ला सर्वोच्च न्यायालयाने माना ही स्वतंत्र आदिवासी जमात असून महाराष्ट्र शासनाच्या अनुसूचित यादीत १८ व्या क्रमांकावर (सध्या १७ व्या) त्यांचे  नाव नोंदण्याची मान्यता दिली. त्यापूर्वी ते विशेष मागास प्रवर्गाच्या यादीत व त्याहीपूर्वी ते गोंडाची उपजमात म्हणून गणल्या गेले होते. परंतु सुरवातीला मात्र आदिवासी म्हणून ते गणल्या गेले होते अतिशय महत्प्रयाने त्यांनी शासनाशी संघर्ष करून यश प्राप्त करून घेतले. तरीसूध्दा विविध भ्रष्टाचारामुळे व भोळेभाबळे असल्याने त्यांना समाजात विविध समस्यांशी सामना करावा लागत आहे. त्यातच त्यांना जातप्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे त्यांना शैक्षणिक, राजकीय व नोकरीसंदर्भात तसेच विविध शासकिय योजना प्राप्त करण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. त्यातही त्यांना खोटे

आदिवासी म्हणून आदिवासींची डी.एन.ए. चाचणी करावी अशाीही मागणी होत आहे.

माना आदिवासींच्या संबंधाने चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासींचा प्रयत्नपूर्वक अभ्यास करून संशोधिकेने त्याचे वरीलप्रमाणे निष्कर्ष काढलेले आहेत. सदर संशोधन अतिशय परिश्रमपूर्वक पूर्ण करून अहवाल तयार केलेला आहे.

## शिफारशी

चंद्रपूर जिल्हयातील माना आदिवासी जमात ही इतर आदिवासींप्रमाणेच आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागासलेली आहे. त्यांच्याविषयी इतिहासात फारशी माहिती उपलब्ध होत नाही. विदर्भातील काही जिल्हयांमध्येच त्यांचे वास्तव्य असून त्यांची संख्याही बरीच कमी आहे. सदर संशोधनात संशोधिकेने त्यांच्याविषयी व त्यांच्यात आढळलेल्या परिवर्तनाविषयी विविध अंगाने अभ्यासपूर्ण चर्चा केलेला आहे. व त्यांची सद्यपरिस्थिती मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु संशोधनासंदर्भाने इतर शिफारशी करणे संशोधिकेला महत्त्वाचे वाटले.

१) माना आदिवासी तसेच इतरही आदिवासीं विषयीच्या अभ्यासाला, संशोधनाला चालना देण्यात यावी. त्यांच्याबाबतीत अधिकाधिक संशोधन होवून माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जावा. त्यासाठी या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना शासनाकडून, संस्थांकडून प्रोत्साहन मिळावे असे संशोधिकेला वाटते.

२) कोणत्याही विकासात्मक योजना आखतांना संशोधनाचा आधार घेवूनच त्यांचा आराखडा तयार केला जावा, अन्यथा वेळ व पैसा यांचा दुरूपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही असेही संशोधिकेला वाटते.

३) आरक्षण व योजनांच्या लाभाकरीता जरी जातीचा निकष महत्त्वपूर्ण असला तरी त्यांना जात म्हणजे काय हेही समजत नाही व जातीचे नावही योग्य तऱ्हेने सांगता येत नाही अशा अतिमागासलेल्या लोकांना त्यांच्या घरापर्यंत जावून, सर्वेकरून त्याच ठिकाणी त्यांचे जात प्रमाणपत्र व इतर दाखले पुरविण्याची सुविधा शासनाने करावी, त्यामुळे त्यांना आपली जात सिद्ध करण्यासाठी वणवण भटकावे लागणार नाही. असे संशोधिकेला वाटते.

४) भारतामध्ये आरक्षण हे जातीवर आधारीत असल्याने अनेकजन त्या लाभापासून वंचित होत आहेत. याबाबतीत अधिक संशोधन होवून त्यांची कारणे पुढे यावी असे संशोधिकेला वाटते.

५) आरक्षण अथवा योजनांच्या लाभाचा निक**ष** हा जात न ठेवता आर्थिक बाब विचारात घेवूनच ठरवावा. तरच समाजात आर्थिक समानता येईल. त्यामुळे याबाबत अधिक विचार व चर्चा व्हावी असेही संशोधिकेला वाटते.

६) जात पडताळणी प्रमाणपत्राची अट ठेवतांना आदिवासींच्या मानसिक स्थिती व त्यांची आर्थिक स्थिती यांचा विचार केला जावा व सामाजिक स्तरावर सर्वेक्षण करून त्यांना ते गावातच ग्रामपंचायतीने पडताळणी करून देण्यावि**ष**यी विचार करण्यात यावा कारण गावस्तरावर कोणीही त्याची जात लपवू शकत नाही किंवा खोटी जातही सांगू शकत नाही. त्यासाठी ग्रामपंचायतीला विशे**ष** अधिकार देण्यात यावा असे संशोधिकेला वाटते.

७) विविध योजना राबवून विकास स्तर वाढविण्याबरोबरच विकासाच्या व रोजगाराच्या विविध व दर्जेदार संधी आदिवासींना उपलब्ध करून दिल्यास वैयक्तीक लाभच्या योजनांवर अवलंबून राहावे लागणार नाही असेही संशोधिकेला वाटते.

८) जो अभ्यासक्रम शहरी भागाला तोच ग्रामीण अथवा आदिवासी भागाला लागू न करता तो वेगवेगळया अथवा आदिवासींना, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावर त्यांच्या बोलीभा**षे**तून त्याचप्रमाणे त्यांच्या अनुभवाशी व जिवनाशी जवळीक साधणारा अभ्यासक्रम दिल्यास त्या लहान मुलांत अभ्यासाची गोडी निर्माण होवून शिक्षणाची गुणवत्ता व प्रमाण नक्कीच वाढविता येईल असेही संशोधिकेला सुचवावेसे वाटते.

९) अदिवासींजवळ त्यांचा अमुल्य असा सांस्कृतिक ठेवा आहे. त्यांचे तोंडी साहित्य लिखित करून जतन करून ठेवण्याचे कामही शासनाने हाती घ्यावे. त्यांच्या साहित्यांसाठी विशे**ष** संग्रहालयांची निर्मिती करावी.

१०) अभ्यासक्रमात बोजड वाटणारा इंग्रजी, गणित वि**ष**य आदिवासींसाठी अनिवार्य करावा मात्र त्यात पात्रतेची अट कमी करावी अथवा शिथिल करावी त्यामुळे गळतीचे प्रमाण कमी होवून शिक्षण व शाळेवि**ष**यीची आदिवासी विद्यार्थ्यांतील भिती कमी होईल. त्यामुळे शैक्षणिक व पर्यायाने आर्थिक विकासास मदत होईल असे संशोधिकेला वाटते. यासाठी यासंदर्भात आदिवासींमधील शिक्षणासंदर्भाने अधिक संशोधन केले जावे असे संशोधिकेला सूचवावेसे वाटते.

# संदर्भ सूची


१) महाराष्ट्र शासन –''पत्रक'' भारत सरकार गृहमंत्रालय
जनगणना निदेशालय महाराष्ट्र एक्सचेंज
बिल्डींग २ री मंजिल, सर शिवसागर
२ गुलाम मार्ग वेळार्ड इस्टेट १५ एप्रिल २०१०.

२) लोटे रा.ज. –सामाजिक व्यवस्था आणि सामाजिक परिवर्तन पृ.क्र. १७३
– पिंपळापुरे ॲण्ड कंपनी प्रकाशन नागपूर
– प्रथमावृत्ती १९८८

३) प्रा. कुलकर्णी पी.के.– समाजशास्त्रातील सैध्दांतिक दृष्टिकोण पृ.क्र.३७६
– मंगेश प्रकाशन नागपूर
– प्रथमावृत्ती २००६.

४) प्रा. माने माणिक चंद्रकांत–भारतीय समाज पृ.क्र.२७
– विद्या प्रकाशन नागपूर

५) प्रा. वक्काणीजी नि.आ– आधुनिक विदर्भ का इतिहास – पृ.क्र.३९९
– मंगेश प्रकाशन – नागपूर १९८५.

६) मेश्राम गोकुळदास – आदिवासी संस्कृतीचे वारसदार – पृ.क्र.१३०
आणि त्यांचा धम्म
– गोकुळदास मेश्राम चंद्रपूर २००६

७) नाडगोंडे गुरूनाथ – भारतीय आदिवासी – पृ.क्र.१८
– कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे – २००३

८) महाराष्ट्र शासन – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन
जि. चंद्रपूर २०००–२००१ पृ.क्र.०३
– जिल्हा सांख्यिकी कार्यालय अर्थ व सांख्यिकी
– संचलनालय महाराष्ट्र शासन चंद्रपूर.

९) महाराष्ट्र शासन – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – पृ.क्र.०८

— जि. चंद्रपूर — २०००— २००१

१०) Government of India – India 2007 –

- A Reference Annual 51th Edition

— Ministry of Information and broadcasting

११) Bhatt S.C. – The Encyclopaedic District – Page No. 385

Gazetteers of India Volume 7

- Gyan publishing house New
- Delhi - 1998

१२) Bhatt S.C. – The Encyclopaedic District –

Page No. 385

Gazetterrs of India Volume 07

१३) महाराष्ट्र शासन — जिल्हा सामाजिक आर्थिक — पृ.क्र.०१,०२

समालोचन जि. चंद्रपूर २०००—२००१

१४) डॉ. सौ. देवगावकर शैलजा—वैदर्भीय आदिवासी जीवन आणि संस्कृती

— मंगेश प्रकाशन नागपूर — २००६ पृ.क्र.७२

१५) वाकडे भास्कर — मूळनिवासी माना — पृ.क्र.७२

— वज्रकुंस प्रकाशन वरोरा — २००६

१६) डॉ. कऱ्हाडे सदा — संशोधन, सिध्दांत आणि पध्दती — पृ.क्र.१०

— प्रकाश विश्वासराव लोकवाङमय गृह

— मुंबई — २५.

१७) ओडवायर सुशिला — सामाजिक संशोधन — पृ.क्र.१८४

— अनिल मेहता, अजब पुस्तकालय कोल्हापूर

— प्रथमावृत्ती १९८१

१८) डॉ. सौ. पेंडके प्रतिभा सुधीर—जागतिक शिक्षणतज्ञ — पृ.क्र.१२४

— श्री प्रमोद मुंजे विद्या प्रकाशन रूईकर रोड महाल

— नागपूर प्रथमावृत्ती जाने २०१०

१९) डॉ. सौ. पेंडके प्रतिभा सुधीर – जागतिक शिक्षणतज्ञ – पृ.क्र.७१

– कित्ता

२०) डॉ. जाधव मोहन – भारतीय शिक्षणाचा विकास – पृ.क्र. २११

प्रा. भोसले आरती

प्रा. सरपोतदार प्राची

– फडके प्रकाशन दुधाळी कोल्हापूर

– सहावी आवृत्ती जून २०१०.

## 'टिळक महाराष्ट्र विद्यापिठ पुणे' च्या समाजविज्ञान शाखेतील समाजशास्त्र विषयाच्या 'विद्यावाचस्पती आचार्य' (पीएच.डी.) पदवीसाठी प्रस्तावित संशोधन अध्ययन

संशोधन विषयाचे नाव :- "चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी माना जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन"


-: मार्गदर्शक :-

प्रा.डॉ. बी.एम.कऱ्हाडे

समाजशास्त्र विभाग प्रमुख

कर्मवीर दादासाहेब देवतळे

-: संशोधक :-

सौ. लता धनराज मेश्राम

मु. पो. वडसी

ता. चिमूर जि. चंद्रपूर


---

## : मुलाखत अनुसूची :

१) उत्तरदात्यांचे संपूर्ण नाव : ..........................................................................

२) सध्याचा पत्ता: गाव:.........................ता. ....................... जि. ...................

३) मुळ गाव :......................... ता. ............................जि. .........................

४) वय: .......................... ५) लिंग: स्त्री/पुरूष

६) जमात: ........................../ पोटजमात ...........................धर्म .....................

७) देवक : .............................................. कुलदैवत ................................

८) वैवाहिक दर्जा : विवाहित/ अविवाहित/ घटस्फोटित/विधवा/ विधूर...................

९) अपत्यंची संख्या : मुले: .................. मुली: .......................

१०) कुटूंबाचा प्रकार: विभक्त/संयुक्त / इतर (विभक्तपण संयुक्त असल्यासारखे)
(टिप: विभक्त म्हणजे पती, पत्नी व मुले, संयुक्त म्हणजे पती, पत्नी, मुले व इतर)

११) शिक्षण : स्वत:चे ....................... वडीलांचे : ........................

१२) सध्या करीत असलेला व्यवसाय: ................... जोडधंदा: ............................
वडीलोपार्जीत व्यवसाय.

१३) मातृभाषा : ........ अवगत असणाऱ्या इतर भाषा: १)........२)...... ३) ..........

१४) आपल्या संपूर्ण कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न किती?

i) २० हजारापेक्षा कमी ii) २० हजार ते २५ हजार

iii) २५ हजार ते १ लाख iv) १ लाखापेक्षा जास्त

१५) आपल्याला आपल्या मालकीची शेतजमीनकिती आहे?

i) स्वत:च्या मालकिची भूमी नाही (भूमिहीन) ii) १ एकर

iii) १ ते ५ एकर iv) ५ एकरांपेक्षा जास्त

१६) या गावात आपले वास्तव्य कशामुळे आहे?

i) वडीलोपार्जीत ii) शेतीमुळे iii) व्यवसायामुळे

iv) मजूरी मिळते म्हणुन v) नोकरीमुळे vi) यापेक्षा वेगळे उत्तर

१७) आपण सध्या करीत असलेल्या व्यवसायात समाधानी आहात काय?

i) संपूर्ण समाधानी आहे. ii) अल्प समाधानी आहे.

iii) मुळीच समाधानी नाही iv)सांगता येत नाही

१८) जर समाधानी नसाल तर कारणे सांगा?

i) खेडयात राहावे लागते. ii)अर्थाजन कमी प्रमाणात मिळते.

iii) व्यवसाय करण्याची लाज वाटते iv) यापेक्षा चांगला व्यवसाय करू शकतो.

v)यापेक्षा वेगळे उत्तर

१९) आपण या व्यवसायाव्यतीरिक्त इतर ठिकाणी व्यवसाय करण्यास जाण्यासाठी तयार आहात काय?

i) चांगला असल्यास जाऊ ii) चांगला असला तरी गाव सोडणार नाही.

ii) जास्त पैसे मिळाले तर विचार करू iv) सांगता येत नाही.

२०) आपण पारंपारिक व्यवसाय सोडला आहे काय?

i) होय ii) नाही

iii) पारंपारिक व्यवसायासोबत आधुनिक पूरक व्यवसाय करतो.

iv) यापेक्षा वेगळे उत्तर

२१) जर होय असेल तर का सोडला? त्याची कारणे सांगा.

i) पारंपारीक व्यवसाय करणे कमीपणाचे वाटते.

ii) अर्थार्जन कमी प्रमाणात मिळते.

iii) घरातील सदस्यांच्या शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागते.

iv) नोकरीसाठी बाहेरगावी राहावे लागत असल्यामुळे v) यापेक्षा वेगळे उत्तर.

२२) या व्यवसायाव्यतीरिक्त आपण आणखी कोणता व्यवसाय करू इच्छिता?

i) सरकारी नोकरी ii) खाजगी नोकरी

iii) खाजगी व्यवसाय iv) यापेक्षा वेगळे उत्तर

२३) आपले घर कशाप्रकारे आहे?

i) मातीचे ii) विटा सिमेंटचे १ मजली

iii) विटा सिमेंटचे २ मजली iv) गवती झोपडी

२४) आपल्या घरात आधुनिक सुखसोयीच्या कोणकोणत्या वस्तू आहेत?

(लागू पडणारे सर्व पर्याय √ करा)

i) पंखा ii) टि.व्ही. iii) रेडीओ/टेपरेकार्डर

iv) मोटर सायकल v) इतर

२५) आपल्या घरात शौचालय बांधलेले आहेत कां?

i) होय ii) नाही iii) बांधले आहे पण वापरत नाही

iv) यापेक्षा वेगळे उत्तर

२६) आपल्या घरात वीज (इलेक्ट्रीक) आहे काय?

i) होय ii) नाही iii) होती पण बिल न भरल्यामुळे बंद आहे.

iv) गरज नाही v) यापेक्षा वेगळे उत्तर

२७) आपल्या घरात स्वयंपाकाचा गॅस आहे काय?

i) होय ii) नाही iii) गोबर गॅस आहे

iv) गॅस आहे परंतु पैशाअभावी सिलेंडर आणता येत नाही. v) लागू पडत नाही.

२८) सद्यस्थितीत आपण जंगल तोडून शेती तयार केली आहे काय?

i) होय ii) नाही iii) माहीत नाही

२९) आपली शेतजमीन किंवा राहती जमीन शासनाने विकास प्रकल्पासाठी वापरली आहे काय?

i) होय ii) नाही iii) माहीत नाही

३०) जर आपली जमीन शासनाने विकास प्रकल्पासाठी वापरली असेल तर तिचा योग्य मोबदला आपल्याला शासनाकडून मिळाला आहे काय?

i) पुर्ण मोबदला मिळाला ii) अपुर्ण मोबदला मिळाला

iii) मुळीच मिळाला नाही iv) मोबदल्याची गरज नाही v) यापेक्षा वेगळे उत्तर

३१) आपल्याला शासनाकडून मोफत जमीन मिळाली आहे काय?

i) होय ii) नाही iii) माहीत नाही

३२) आपल्याला शासनाकडून जमीनीचे 'पट्टे' मिळाले काय?

i) होय ii) नाही iii) लागू पडत नाही iv) सांगता येत नाही.

३३) आपल्या गावात आपल्याला वर्षभर रोजगार मिळतो काय?

i) होय ii) नाही iii) काही महिनेच मिळतो

iv) काही महिने कामासाठी बाहेरगावी जावे लागते. v) यापेक्षा वेगळे उत्तर

३४) आपल्याला शासनाने मंजूर केलेली मजूरी मिळते काय?

i) होय ii) नाही

iii) शासनाने किती मजूरी मंजूर केली ते माहित नाही

iv) यापेक्षा वेगळे उत्तर

३५) जंगलातील कोणकोणत्या वस्तू आपण आणता?

(लागू पडणारे सर्व पर्याय √ करा)

i) इमारती लाकूड ii) जळाऊ लाकूड

iii) वनोत्पादने उदा. मोहफुले, आवळा iv) शिकार करून प्राणी आणणे.

v) इतर

३६) जंगलातील वस्तू आणण्यासाठी आपल्याला कोणकोणत्या अडचणी येतात

i) जंगलचे अधिकारी आणू देत नाहीत.

ii) जंगलाच्या अधिकाऱ्यांना वस्तूंचामोबदला दयावा लागतो.

iii) जंगलातील प्राण्यांचीभिती वाटते. iv) वरील सर्वच

v) अडचण येत नाही

३७) रोजगार हमीची १०० दिवसांचा रोजगार देण्याची हमी शासनाने घेतली आहे. तेव्हा हंगामाशिवाय १०० दिवसांचे रोजगार हमीचे काम आपल्याला मिळते काय?

i) नेहमी मिळते ii) कधी कधी मिळते iii) मिळतच नाही

iv) फार्म भरता येत नाही. v) यापेक्षा वेगळे उत्तर

३८) आपल्याकडे कोणत्या रंगाचे शिधापत्रिका (राशन कार्ड) आहे?

i) पांढरे ii) पिवळे व फिकट पिवळे iii) केशरी iv) कार्डच नाही.

३९) स्वस्त धान्याचे दुकानात आपल्याला आपल्या वाटयाचे, महिन्याचे संपूर्ण धान्य योग्य दरात मिळते काय?

i) दर महिन्याला मिळते ii) कधी कधी मिळते iii) कधीच मिळत नाही

iv) महिन्यातूनच काही दिवसच वाटप होत असल्याने वेळेवर पैसे नसल्यास धान्य मिळत नाही. v) सनासुदीलाच मिळते.

vi) केशरी व पांढरे कार्ड असल्याने व कार्डच नसल्यामुळे मिळत नाही.

४०) आपण मुलांच्या भविष्यासाठी पैशांची बचत करता काय?

i) थोडी बचत करतो. ii) अधिक प्रमाणात करतो.

iii) शिल्लक उरत नसल्यामुळे बचत करीत नाही iv) गरजच वाटत नाही

४१) जर बचत करीत असाल तर ती कुठे करता?

i) घरीच ii) गावातील पोष्टात iii) बँकेत

iv) सावकाराकडे v) बचत गटात vi) इतर ठिकाणी

४२) आपल्यावर कोणाचे कर्ज आहे काय?

i) सावकाराचे आहे. ii) बँकेचे आहे iii) सावकार व बँक दोन्हीचे आहे.

iv) नातेवाईकांचे आहे. v) कर्ज नाही.

४३) जर कर्ज घेतले असेत तर ते कोणत्या कामासाठी वापरले?

i) लग्नासाठी ii) शिक्षणासाठी iii) दवाखान्यासाठी

iv) शेतीसाठी V) घरासाठी vi) नोकरीसाठी

vii) इतर कामासाठी

४४) आपल्याला कर्ज कोणाकडुन घेणे सोयीचे वाटते?

i) सावकाराकडून ii) बँकेकडून

iii) इतर लोकांकडून iv) कोणाकडूनच नाही.

४५) आपल्याला कर्ज वसुलीसाठी कोणी बळजबरी केली आहे काय?

i) सावकाराने केली. ii) बँकेने केली iii) व्यापाऱ्याने केली.

iv) इतर लोकांनी केली v) कोणीच केली नाही.

४५अ) कर्ज  वसुलीच्या बळजबरीचे स्वरूप कसे होते?

i) घरातील सामान जप्त केले.  ii) जमीन मालमत्ता जप्त केली.

iii) शाब्दिक अपमान केला  iv) शारीरिक त्रास दिला. v) इतर प्रकारे

४६) आपल्याला कोणती व्यसने आहेत?

i) पान  ii) तंबाखू iii) सिगारेट–विडी. iv) मद्यपान  v) इतर vi) कोणतेच नाही

४७) आपल्या विवाहाच्या वेळी आपले व आपल्या पत्नीचे/पतीचे वय काये होते?

i) स्वत:चे  ii) पत्नीचे/ पतीचे

४८) आपल्या विवाहाचे स्वरूप कसे होते?

i) वडीलधाऱ्यांनी ठरविलेले  ii) समूहाअंतर्गत जोडीदारांच्या संमतीने ठरविलेले

iii) अंतर धर्मिय  iv) आंतरजातीय  v) प्रेमविवाह

४९) आपला विवाहाविधी कोणत्या पद्धतीने पार पडला?

i) परंपरागत पद्धतीने  ii) विवाह मेळाव्यात  iii) ऐच्छिक पद्धतीने

iv) धार्मिक स्थळी किंवा अन्य ठिकाणी  v) नोंदणी पद्धतीने

५०) आपण आपल्या लग्नात वरमूल्य (हुंडा) किंवा वधुमूल्य घेतले होते काय?

i) वरमूल्य घेतले  ii) वधुमूल्य घेतले

iii) घेतले नाही  iv) माहित नाही  v) लागू पडत नाही.

५१) आपण आपल्या लग्नात वधुमूल्य (हुंडा) किंवा वधुमूल्य घेतले होते काय?

i) वरमूल्य दिले  ii) वधुमूल्य दिले

iii) दिले नाही  iv) माहित नाही  v) लागू पडत नाही.

५१अ) त्याचे स्वरूप कसे व किती होते?

i) पैशाच्या स्वरूपात  ii) सामानाच्या स्वरूपात

iii) धान्याच्या स्वरूपात  iv) दागीन्याच्या स्वरूपात  v) इतर

५२) आपल्या मुलाने किंवा मुलीने वरमूल्य किंवा वधुमूल्य घ्यावे अथवा घेऊ नये याबाबत आपले काय मत आहे?

i)मुलाने वरमूल्य घ्यावे ii) मुलीने वधुमूल्य घ्यावे

iii) दोघांनीही घ्यावे iv) दोघांनीही घेवू नये v) सांगता येत नाही.

५३) आपल्या मुलाने किंवा मुलीने इतर समूहांसोबत विवाह केल्यास आपण काय कराल?

i) फक्त मुलालाच मान्यता देऊ ii) फक्त मुलीलाच मान्यता देऊ

iii)दोघांनाही मान्यता देवू iv) मान्यता देणार नाही

v) काही काळ मान्यता देणार नाही vi) दंड करू

५४) आपल्या कुटूंबात मुलामुलींच्या विवाहाचा निर्णय कोण घेतात?

i) स्वतः मुले /स्वतः मुली ii) स्व:ता मुली iii) सर्वांच्या संगणमताने

iv) आई–वडील v) वडील फक्त vi) इतर मंडळी

५५) मुलाचे लग्न ठरवितांना आपण कोणते निकष लावता?

(प्राधान्य क्रम लावा)

i) मुलगी देखणी असावी ii) मुलगी शिकलेली असावी

iii) मुलगी काम करणारी असावी iv) वरील सर्वच

५६) मुलीचे लग्न ठरवितांना आपण कोणते निकष लावतात

i) मुलगा शिकला असावा ii) मुलगा देखणा असावा

iii) मुलगा कमावता असावा iv) मुलगा सद्‌गुणी असावा

v) वरील सर्वच

५७) विवाहपुर्वीच्या (शारीरिक) संबंधाबाबत आपले काय मत आहे?

i) दंडास पात्र आहे ii) असल्यास हरकत नाही

iii) काहीच मत नाही. iv) सांगता येत नाही.

५८) विवाहबाहय (शारिरीक) संबंधाबाबत आपले काय मत आहे?

i) दंडास पात्र आहे ii) असल्यास हरकत नाही

iii) घटस्फोट दयावा iv) सांगता येत नाही. v) काहीच मत नाही.

५९) आपल्या कुटूंबात आपण पहिले अपत्य म्हणून कोणाचा जन्म अधिक आनंददायी मानाल?

i) मुलगा ii) मुलगी

iii) मुलगा व मुगली सारखीच iv) सांगता येत नाही.

६०) घटस्फोट घ्यायचा असेल तर कोणती पद्धत वापरता?

i) न्यायपंचायतीकडे जाता (जात पंचायत) ii) तंटामुक्ती समितीकडे जाता

iii) कोर्टात जाता iv) घरीच घटस्फोट घेता. v) इतर पद्धत वापरता

६१) 'विधवा पूनर्विवाह' आपल्याला मान्य आहे काय?

i) होय ii) नाही iii) सांगता येत नाही.

६२) शिक्षण घेतल्यामुळे आपल्या आचार व विचारांत बदल होतो या मताशी आपण सहमत आहात काय?

i) पुर्णत: सहमत ii) अंशत: सहमत iii) असहमत iv) सांगता येत नाही.

६३) जर आपण शिक्षित असाल किंवा घरातील इतर व्यक्ती शिक्षित असल्यास शिक्षणामुळे कोणता बदल झाला?

ii) राहणीमान उंचावले ii) विचार सरणीत बदल झाला

iii) आर्थिक बाबतीत बदल झाला iv) वरील सर्वच बदल झाले

v) कोणताच बदल झाला नाही.

६४) आपण स्वत:साठी किंवा घरातील इतरांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती घेतली आहे काय?

i) होय ii) नाही iii) यापेक्षा वेगळे उत्तर

६५) आपल्याला स्वत: किंवा घरातील व्यक्तींच्या शिक्षणासाठी आरक्षणाचा फायदा झाला आहे काय?

i) होय ii) नाही iii) अंशत: मिळाला iv) सांगता येत नाही.

६६) आपल्या स्वत:साठी किंवा घरातील इतर सदस्यांसाठी शिक्षणाचा उपयोग नोकरी लागण्यासाठी झाला काय?

i) होय ii) नाही iii) यापेक्षा वेगळे उत्तर

६७) आपल्याला अथवा आपल्या कुटुंबातील सदस्याला नोकरी असल्यास नोकरी कशामुळे मिळाली.

i) गुणात्मक दर्जा चांगला असल्यामुळे ii) वशीला लावल्यामुळे iii) पैसे खर्च केल्यामुळे iv) अनुकंपामुळे v) यापेक्षा वेगळे उत्तर vi) लागू पडत नाही.

६८) आपल्या स्वत:साठी किंवा घरातील इतर व्यक्तींना व्यवसाय–नोकरीसाठी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा फायदा मिळाला काय?

i) होय ii) नाही iii) अंशत: मिळाला iv) आरक्षणाचा फायदा मिळूनही पैसे खर्च करावे लागले v) यापेक्षा वेगळे उत्तर

६९) मुलांना व मुलींना दोघांनाही शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे याबाबत आपले काय मत आहे?

i) समान संधी मिळाली पाहीजे ii) मुली शिकून वडीलांना उपयोग नाही

iii) मुली शिकल्यास त्यांना चांगलावर शोधने कठीण जाईल.

iv) यापेक्षा वेगळे उत्तर

७०) खेडयात उच्च शिक्षण नसल्यामुळे आपण आपल्या मुलींना उच्च शिक्षणासाठी दूरगावी शहरात पाठवाल काय?

i) पाठविण्यास हरकत नाही ii) मुलींनी दूर शहरात राहू नये

iii) मुलींनी गावातील अथवा गावाशेजारील शाळेत जेवढे मिळेल तेवढेच शिक्षण घ्यावे. iv) यापेक्षा वेगळे उत्तर

७१) शिकलेली मुले–मुली रूढी परंपरांना मानतात काय?

i) होय ii) नाही iii) कधी कधी मानतात iv) सांगता येत नाही.

७२) आपल्या कुटूंबात महत्वाचे निर्णय कोण घेतात?

i) स्वत: पती ii) स्वत:पत्नीने iii) दोघेही मिळून iv) मुले

v) इतरांच्या सल्ल्याने

७३) कुटूंबात मुलांच्या संगोपनाची जबाबदारी कुणी स्विकारावी असे तुम्हाला वाटते?

i) स्वत: पतीने ii) स्वत: पत्नी iii) दोघेही मिळून

iv) इतर दुसऱ्या कुणी

७४) अंगावर गोंदविण्याची पद्धत आपल्याला कितपत योग्य वाटते?

i) पूर्ण योग्य ii) अंशत: योग्य iii) अयोग्य

iv) सांगता येत नाही.

७५) आजच्या परिस्थितीत अंगावर गोंदविणे आपल्याला गरजेचे वाटते काय?

i) होय ii) नाही iii) गोंदविल्यास हरकत नाही

iv) यापेक्षा वेगळे उत्तर

७६) आपली मुले इतर उच्चभ्रू समाजातील मुलांचे अनुकरण करून पेहराव करतात असे तुम्हाला वाटते काय?

i) निश्चितच वाटते ii) करायला पाहिजे

iii) असे वाटत नाही iv) नक्की सांगता येत नाही.

७७) इतर समूहांशी आपले सबंध कसे आहेत?

i) सलोख्याचे ii) साधारण iii) संबंध नाहीत iv) यापेक्षा वेगळे उत्तर

७८) आपण इतर जाती वा जमातींच्या हातून शिजविलेले अन्न खाता काय?

i) सर्व जाती जमातीच्या हातून शिजविलेले खातो.

ii) काही विशेष श्रेष्ठ जाती–जमातीच्या हातून शिजविलेले खातो.

iii) काही विशेष कनिष्ठ जाती–जमातीच्या हातून शिजविलेलेच खातो.

iv) यापेक्षा वेगळे उत्तर

७९) आपल्या कुटूंबात स्त्रिया धार्मिक कार्यविधी करतात काय?

i) कधी कधी करतात ii) नेहमीच करतात

iii) विशिष्ट सणालाच करतात iv) यापेक्षा वेगळे उत्तर

८०) आपण आपल्या कुटूंबात कोणते सण साजरे करता?

(लागू पडणारे सर्व पर्याय √ करा)

i) आखाडी ii) नागदिवाळी

iii) नागपंचमी iv) हिन्दु धर्मियांचे सर्व सण

v) इतर

८१) आपण आपल्या समूहात एकत्र कोणते कार्यक्रम साजरे करता?

(लागू पडणारे सर्व पर्याय √ करा)

i) लग्नसमारंभ ii) धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम

iii) थोर पुरूषांच्या जयंती/पुण्यतिथी (सामाजिक कार्यक्रम)

iv) वरील सर्व v) इतर

८२) भगतावर आपला विश्वास आहे काय?

i) होय ii) अजिबात नाही iii) थोडाफार आहे

iv) सांगता येत नाही.

८३) आजारपणात आपण कोणाकडे जाता?

i) दवाखान्यात ii) भगताकडे iii) प्रथम दवाखान्यात व भगताकडे दोन्ही पाहतो.

iv) प्रथम भगताकडे व गुण न झाल्यास दवाखान्यात v) घरीच राहतो.

८४) आपल्या कुटूंबात स्त्रिचे बाळंतपण कुठे केले जाते?

i) घरीच सुईनद्वारे ii) ग्रामिण रूग्णालयात iii) खाजगी दवाखान्यात

iv) घरीच नर्स किंवा डॉक्टरला बोलावतो v) वेळेवर सुचेल तिथे

vi) सांगता येत नाही.

८५) आदिवासी रितीरिवाजाप्रमाणे कोणत्याही धार्मिक कार्यात वा समारंभात मद्यपान करणे आवश्यक आहे असे आपणास वाटते काय?

i) होय तो रिवाजच आहे ii) कधी कधी आवश्यक

iii) नाही iv) सांगता येत नाही

८६) आपला नशीबावर विश्वास आहे काय?

i) पूर्ण विश्वास आहे ii) अंशत: विश्वास आहे.

iii) अजिबात विश्वास नाही iv) सांगता येत नाही

८७) आपण कधी नवस केला आहे काय?

i) एकदा केला ii) नेहमीच करतो iii) नवस केलेला नाही.

iv) नवस करण्यावर विश्वास नाही v) यापेक्षा वेगळे उत्तर

८८) शगून—अपशगून, जादू—टोणा यावर आपला विश्वास आहे काय?

i) पूर्ण विश्वास आहे ii) अंशत: विश्वास आहे

iii) अजिबात विश्वास नाही iv) सांगता येत नाही.

८९) माना जमातीचा मूळ पूर्वज कोण याबद्दल आपल्याला काही माहिती आहे काय?

i) होय ii) नाही iii) थोडीफार माहीती आहे. iv) सांगता येत नाही.

९०) माना राजांनी विदर्भात किल्ले बांधले याबाबत आपल्याला काही माहिती आहे काय?

i) होय ii) नाही iii) थोडीफार माहीती आहे. iv) सांगता येत नाही.

९१) आपल्याला त्या किल्यांची नावे माहिती असल्यास सांगा.

i) होय ii) नाही iii) सांगता येत नाही.

९२) आपल्याला माना जमातीच्या राजांची नावे माहित आहेत काय?

i) होय ii) नाही iii) सांगता येत नाही.

९३) आपल्याला 'आदिवासी' हा शब्द योग्य वाटतो काय?

i) योग्य वाटतो ii) योग्य वाटत नाही

iii) उपहासाने बोलल्या जातो. iv) यापेक्षा वेगळे उत्तर

९४) शासनाने आदिवासींना व्यवसाय करण्यासाठी व शेतीसाठी विविध सोयी सवलती उपलब्ध करून दिलेल्या आहेत याची तुम्हाला माहिती आहे काय?

i) होय पूर्ण माहिती आहे ii) थोडीफार माहीती आहे

iii) नाही iv) सांगता येत नाही.

९५) माहिती असल्यास या योजनांची माहिती आपल्याला कोणाकडून मिळाली?

i) ग्रामपंचायती मार्फत मिळाली ii) संस्थामार्फत मिळाली

iii) समूहाच्या नेत्यांकडून मिळाली iv) स्वत:च मिळवली

v) शासनाच्या अधिकाऱ्यांनी सांगितली.

९६) आपण कधी शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ घेतला आहे काय?

i) होय ii) नाही iii) आम्हाला योजना मिळतच नाही

iv) यापेक्षा वेगळे उत्तर

९७) घेतला असल्यास कोणकोणत्या योजनांचा लाभ घेतला?

i) शेती विकासासाठी लागणारी सामुग्री ii) व्यवसायाकरीता लागणारेसाहित्य
iii) घरगुती वापरासाठी लागणारे साहीत्य iv) इतर

९८) या शासकीय योजनांचा लाभ घेतांनाआपल्याला कोणकोणत्या अडचणी आल्या?

i) कागदपत्रे मिळवतांना त्रास झाला ii) अधिकाऱ्यांना पैसे दयावे लागले

iii) वशिला लावावा लागला iv) कोणत्याच अडचणी आल्या नाही.

९९) जर या योजनांचा लाभ घेण्यासाठी पैसे दयावे लागले तर ते कुणाकुणाला दयावे लागले?

i) ग्राम पंचायत सदस्य किवा ग्रामसेवक iv) इतर मध्यस्थींना किंवा नेत्यांना

ii) पंचायत समिती सदस्य, अधिकारी किंवा कारकुनाला v) यापेक्षा वेगळे उत्तर

iii) जिल्हा परिषद सदस्य, अधिकारी किंवा कारकुनांला

१००) अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र आपल्याकडे आहे काय ?

i) होय ii) नाही iii) बनवायला दिले iv) माहित नाही

१०१) अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र नसल्यास का नाही याचे कारण सांगा?

i) गरज वाटली नाही ii) प्रमाणपत्र कसे तयार करतात याची माहिती नाही

iii) प्रमाणपत्र तयार करण्यासाठी लागणारे दाखले मिळत नाही.

iv) दाखले सादर करूनही प्रमाणपत्र मिळाले नाही v) यापेक्षा वेगळे उत्तर

१०२) आपण किंवा आपल्या कुटूंबातील एखादया व्यक्तीने निवडणूक लढविली आहे काय?

i) एकदा ii) दोनदा iii) दोनपेक्षा जास्त वेळा iv) नाही

१०३) लढविली असल्यास निवडणुकीचे स्वरूप होते?

(लागू पडणारे सर्व पर्याय √ करा)

i) ग्रामपंचायत ii) पंचायत समिती iii) जिल्हा परिष्द iv) संस्था

v) विधानसभा vi) लोकसभा vii) यापेक्षा वेगळे उत्तर

१०४) लढविलेल्या निवडणुकीत आपण किंवा आपल्या कुटूंबातील एखादी व्यक्ती निवडून आली आहे काय?

i) होय ii) नाही iii) सांगता येत नाही

१०५) आपण दर निवडणुकीत मतदान करता काय?

i) नेहमी मतदान करतो ii) कधी कधी करतो iii) कधीच करत नाही

iv) मतदानावर विश्वास नाही v) यापेक्षा वेगळे उत्तर

१०६) मतदान करतांना कोणाचा सल्ला घेता?

i) स्वत:चा ii) कुटुंबातील सर्वांचा iii) जामातीच्या नेत्यांचा

iv) इतरांचा v) सल्ला घेत नाही.

१०७) मतदान करतांना कोणते निकष ठेवता?

i) चांगला उमेदवार ii) जमातीचा उमेदवार

iii) पक्षाचा उमेदवार iv) यापेक्षा वेगळे उत्तर

१०८) आपण कोणत्या प्रादेशिक किंवा राष्ट्रीय पक्षाशी बांधील आहात काय?

i) होय ii) नाही iii) सांगता येत नाही

१०९) शासनाने आदिवासींसाठी केलेल्या उपायात्मक तरतुदींमुळे आपण समाधानी आहात काय?

i) पूर्ण समाधानी ii) अंशत: समाधानी iii) समाधानी नाही

iv) योजना असल्या तरी त्यांचा लाभ मिळत नाही म्हणून समाधानी नाही.

v) यापेक्षा वेगळे उत्तर

११०) जर समाधानी नसाल तर शासनाकडून आपल्या कोणत्या अपेक्षा आहेत.

i) ii) iii) iv)

१११) शासकीय योजनांचा फायदा आपले राहणीमान उंचावण्यासाठी झाला असे तुम्हाला वाटते काय?

i) नक्कीच झाला ii) अंशत: झाला

iii) मुळीच झाला नाही iv) सांगता येत नाही.

११२) आपल्या आदिवासींसाठी म्हणजेच अनुसूचित जमातीसाठी असलेले आरक्षणाचे प्रमाण माहित आहे काय?

i) होय ii) नाही iii) ☐ टक्के

११३) आपल्या क्षेत्रातील निवडून आलेले पदाधिकारी निवडणुक झाल्यावरही कधी आपल्या गावात येऊन आपल्या अडचणी विचारतात काय?

i) नेहमी ii) कधी कधी iii) क्वचित

iv ) कधीच नाही v) यापेक्षा वेगळे उत्तर

११४) आपण आपल्या गावातील अडचणी किंवा समस्या कोणाकडे सांगता?

i) ग्रामपंचायतीकडे ii ) पंचायत समितीकडे iii) जिल्हापरिषदेकडे

iv) पदाधिकाऱ्यांना v) अधिकाऱ्यांना vi) सांगतच नाही

११५) घरी अथवा समूहात भांडण –तंटा झाल्यास आपण कोणाकडे न्याय मागता?

i) न्याय मागत नाही ii) स्वत:च न्याय करता iii) न्याय पंचायतीकडे जाता

iv) जात पंचायतीकडे जाता v) तंटामुक्ती समितीकडे जाता

vi) पोलीस स्टेशनमध्ये जाता

११६) आपल्या गावात कोणकोणत्या सोयी आहेत?

(लागू पडणारे सर्व पर्याय √ करा)

i) शासकिय नळ योजना ii) प्राथमिक शाळा iii) माध्यमिक शाळा

iv) महाविद्यालय v) प्राथममिक दवाखाना vi) गुरांचा दवाखाना

vii) इतर सोयी

११७) 'आदिवासी' म्हणजेच 'मूळनिवासी' म्हणजे भारतीय जमीनीवर व निसर्गावर आदिवासींचाच संपूर्ण हक्क असायला पाहिजे या मताशी तुम्ही सहमत आहात काय?

i) पूर्णत: सहमत ii) अंशत: सहमत iii) सहमत नाही

iv) नक्की सांगता येत नाही

११८) जर तुम्ही सहमत असाल तर, 'आदिवासींना त्यांच्या हक्कापासून डावलले जात आहे' असे आपल्याला वाटते काय?

i) पूर्णत: डावलले जात आहे ii) अंशत: डावलले जात आहे.

iii) मुळीच डावलले जात नाही iv) यापेक्षा वेगळे उत्तर

११९) आपल्या हक्कांसाठी आपण कधी संघर्ष केला आहे काय?

i) वैयक्तिक संघर्ष केला ii) सामूहिक संघर्ष केला

iii) संघर्ष केला नाही. iv) यापेक्षा वेगळे उत्तर

१२०) जर संघर्ष केला असेल तर त्यात यश मिळाले काय?

i) पूर्ण यश मिळले ii) काही प्रमाणात यश मिळाले

iii) यश मिळाले नाही iv) यापेक्षा वेगळे उत्तर

१२१) आपल्या संघर्षात आपल्याला कोणाची मदत झाली?

i) स्वत:ची ii) जमातीची iii) इतर समूहांची

iv) शासनाची v) नेत्यांची vi) वरील सर्वांची

१२२) आपल्या जमातीचे एखादे संघटन आहे काय?

i) होय ii) नाही iii) माहीत नाही

१२३) आपण या संघटनेचे सदस्य आहात काय?

i) होय ii) नाही iii) सांगता येत नाही

१२४) शासनाने माना आदिवासींना 'अनुसूचित जमातीच्या यादीत स्वतंत्र नाव दाखल केल्यामुळे' आपल्याला कोणता लाभ झाला आहे काय?

i) होय ii) थोडया प्रमाणात iii) नाही

iv) यापेक्षा वेगळे उत्तर

१२५) इतर समूहांच्या तुलनेत आपण शिक्षण व नोकऱ्यांमध्ये मागे पडलोत असे आपणास वाटते काय?

i) निश्चितच मागे पडलो ii) बरेच मागे पडलो

iii) मागे पडलो नाही iv) नक्की सांगता येत नाही

१२६) गावात किंवा इतरत्र आपल्याला इतर समाजांपासून (गैर आदीवासी) कोणत्या प्रकारची वागणुक मिळते?

i) समान दर्जाची ii) उच्च दर्जाची

iii) हीन दर्जाची iv) सांगता येत नाही

१२७) 'इतर समाजापासून सदैव आदिवासींचे शोधण होत आहे' या मताशी आपण सहमत आहात काय?

i) पूर्णत: सहमत ii) अंशत: सहमत

iii) सहमत नाही iv) सांगता येत नाही

१२८) जर सहमत असाल तर होत असलेल्या शोषणाचे स्वरूप कोणते?

i) शाब्दिक मन:स्ताप ii) वेठबिगारी iii) लैंगिक शोषण

iv) आर्थिक शोषण v) यापेक्षा वेगळे

१२९) अशाप्रकाचे शोषण नेमके कोााकडून होते?

i) इतर समाजाकडून ii) ठेकेदाराकडून

iii) शासकीय अधिकाऱ्याकडून iv) सर्वांकडून v) यापेक्षा वगळे उत्तर

१३०) अशा शोषणाचे आपण कधी शिकार झाला असल्यास अशा प्रकारचा एखादा अनुभव विशद करा.

i) ii) iii) iv)

१३१) आपण अशा शोषणाचे शिकार झाला असल्यास त्याची कारणे सांगा.

i) प्रतिकाराचे धैर्य नव्हते म्हणून ii) शोषकाने धमकी दिली म्हणून

iii) तक्रार करूनही न्याय मिळत नाही म्हणून iv) यापेक्षा वेगळे उत्तर

१३२) अशाप्रकारच्या शोषणाला आडकाठी बसावी म्हणून आपण कोणती उपाययोजना केली आहे?

i) स्वत:च धैर्याने प्रतिकार केला ii) न्यायपंचायतीत तक्रार नोंदवली

iii) पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली iv) वरीष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार केली

v) तक्ररच केली नाही vi) यापेक्षा वेगळे उत्तर

१३३) अति दुर्गम भागात वास्त्व्य असल्यामुळे आपल्याला कोणकोणत्या अडचणी

जाणवतात?

(लागू पडणारे सर्व पर्याय √ करा)

i) रस्तयांची सोय नाही ii) वाहनांची सोय नाही

iii) दवाखान्याची सोय नाही iv) वर्षभर रोजगाराची सोय नाही

v) प्राथमिकच्या वर शिक्षणाची सोय नाही vi) समस्याच नाही

१३४) आधुनिकीकरणाने आदिवासींची जीवनपद्धती बदलत आहे असे आपल्याला वाटते काय?

i) आधुनिकीकरण म्हणजे काय माहित नाही ii) आधुनिकीकरणाचा संबंध नाही

iii) नक्कीच बदलत आहे iv) अंशत: बदलत आहे.

v) कोणताही प्रभाव पडला नाही vi) यापेक्षा वेगळे उत्तर

१३५) सध्या आदिवासींची डि.एन.ए. चाचणी करावी अशी मागणी होत आहे. याबाबत तुम्हाला काय वाटते?

i) डी.एन.ए. चाचणी काय आहे हे माहित नाही

ii) चाचणी करणे आवश्यक आहे iii) चाचणी करणे आवश्यक नाही

iv) चाचणी करू नये. v) यापेक्षा वेगळे उत्तर

१३६) आदिवासींसाठी संविधानात असलेल्या कोणकोणत्या सुरक्षात्मक कायदयांची आपल्याला माहिती आहे?

i) ii) iii) iv)

# संदर्भ ग्रंथ सूची


| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. सौ. अनंतराम शरयू | 'सामाजिक संस्था'<br>महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर १९७६ |
| २) | डॉ. अनंतराम शरयू | 'सामाजिक संस्था'<br>महाराष्ट्र राज्यग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर १९८१ |
| ३) | अजीत, प्रशांत | 'चंद्रपूर व गडचिरोलीचा इतिहास'<br>महाकाली प्रकाशन चंद्रपूर सुधारित आवृत्ती २००८ |
| ४) | अनुवादक – अनंतराम शरयू उमा बंडसे | 'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान 'स्टेटस् ऑफ वुमेन इन इंडिया' राष्ट्रीय– अभ्यास समितीच्या अहवालाची संक्षिप्त आवृत्ती'<br>पॉप्यूलर प्रकाशन मुंबई प्रथमावृत्ती १९०९ |
| ५) | डॉ. आगलावे प्रदीप | 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे'<br>विद्या प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती जाने २००० |
| ६) | डॉ. आगलावे प्रदीप | 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र'<br>साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती ऑगस्ट २००४ |
| ७) | आहुजा राम | 'भारतीय सामाजिक व्यवस्था'<br>रावत पब्लीकेशन जवाहर नगर जयपूर २००४ |
| ८) | डॉ. आकरे बी. एन | 'आदिवासींच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम'<br>अशोक पिंपळापूरे प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती १७ ऑक्टो २००९ |
| ९) | डॉ. आंबेडकर भीमराव | 'भारताचे संविधान'<br>मिलींद जुनघरे प्रकाशन वर्धा सहावी आवृत्ती २००६ |
| १०) | Dr. Ambedkar Bhimrao | 'Who were the shudras<br>अनुवाद चांगदेव खैरमोडे प्रदिप रागडे प्रकाशन नागपूर २००६ |
| ११) | डॉ. आंबेडकर भीमराव | 'भारताचे संविधान'<br>मिलींद प्रकाशन मिलींद जुनघरे भीमनगर सावंगी मेघे वर्धा आवृत्ती ६/५/२०१२ |
| १२) | बन्सोड पँथर प्रकाश | 'धम्मचक्रप्रवर्तन दिनविशेषांक २००५'<br>संपादक भाऊराव शेंडे गणेशपेठ नागपूर |
| १३) | डॉ. बेहेरे सूमन | 'सामाजिक संशोधन पद्धती'<br>विद्या प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती १९९८ |
| १४) | डॉ. बोबडे प्रकाश | 'भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक'<br>श्री मंगेश प्रकाशन नागपूर १९९४ |
| १५) | Bhatt S.C. | 'The Encyclopaedic district Gazetteers of India volume vestern Zone Gyan Publishing house new Delhi 1998 |
| १६) | श्री भालेराव श्रीनिवास | 'नागवंशियांनो तुमची अस्तिमा गेली कुठे'?<br>सिद्धार्थ प्रकाशन पुणे तृतीय आवृत्ती ९८ |

| | | |
|---|---|---|
| १७) | डॉ. भांडारकर पु. ल. | 'सामाजिक संशोधन पद्धती'<br>दत्तसन प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती १९७६ |
| १८) | डॉ. भांडारकर पु.ल. डॉ. वैद्य नि.स. | 'भारतातील सामाजिक समस्या' संपादक विलास संगवे पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९९७ |
| १९) | भारंदे बाळासाहेब | 'लोकशाही पंचायतराज आणि ग्रामस्वराज्य'<br>Gov of maharshtra panchayat raj institution co-memorative volume 1992 |
| २०) | डॉ. भोइटे, डॉ. बोबडे | 'सामाजिक संस्था' पिंपळापूरे प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती जून १९९० |
| २१) | चौधरी नारायण, जोशी विरोचन | 'सामाजिक परिवर्तन, प्रक्रिया व घटक'<br>यशवंतराव चव्हाणा महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ नाशिक २००९ |
| २२) | डॉ. देवगावकर शैलजा | 'वैदर्भीय आदिवासी जीवन आणि संस्कृती'<br>मंगेश प्रकाशन नागपूर २००६ |
| २३) | डॉ. देवगावकर शैलजा | 'महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य' श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर |
| २४) | Dr- Devgaokar S.G. | 'The madia of Bhamragad' M.C. Mittal Inter India Publication Delhi 1982 |
| २५) | डॉ. देवगावकर श. गो. | राजकीय समाजशास्त्र'<br>मंगेश प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती १९९० |
| २६) | डॉ. देवगावकर एस. जी. | 'महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती'<br>श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथावृत्ती २५ डिसें. २००९ |
| २७) | डॉ. देवगावकर श. गो. | 'राजकीय समाजशास्त्र'<br>मंगेश प्रकाशन नागपूर १९९० |
| २८) | प्रा. देवरे श्रावण | स्टेटस् अ‍ॅण्ड मायनॉशिरिज' सत्यशोधक छत्रपती ज्ञानपीठ पूणे रोड, नाशिक ११ |
| २९) | डॉ. देशपांडे चंद्रशेखर आणि इतर | 'कुटुंब आणि वैवाहिक समायोजन'<br>यशवंतराव चव्हाणा मुक्त विद्यापिठ नाशिक ऑगस्ट २००२ |
| ३०) | प्रा. देशपांडे विजय<br>प्रा. बोबडे प्रकाश<br>प्रा. बारबिंड भगवान | 'सांस्कृतिक मानवशास्त्र'<br>श्रीपाद मुंजे, विद्या प्रकाशन रुईकर मार्ग नागपूर प्रथमावृत्ती १५ जूलै १९८१ |
| ३१) | दोषी एस एल. | 'भारतीय समाजिक विचारक'<br>रावत पब्लीकेशन जयपूर |
| ३२) | दोषी एस.एल. जैन पी. सी. | 'भारतीय समाजसंरचना और परिवर्तन'<br>नॅशनल पब्लीसींग हाऊस जयपूर २००२ |
| ३३) | दुबे शामचरण | 'भारतीय समाज'<br>नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नवी दिल्ली दुसरी आवृत्ती २००३ |
| ३४) | डॉ. गजबे रमेशकुमार | 'Mana scheduled Tribe'<br>आनंद प्रकाशन नागपूर २००५ |

३५) डॉ. गजबे रमेशकुमार 'माना अनुसूचित जनजाती संकलित अध्ययन' आनंद प्रकाशन नागपूर २००५

३६) डॉ. गद्रे प्रभाकर 'नागपूर राज्याचा उदय आणि आस्थापना' मंगेश प्रकाशन नागपूर

३७) गरमडे एस. व्ही. 'स्मरणिका २००९' गरमडे भद्रावती २००९

३८) डॉ. गारे गोविंद 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' कॉन्टीननेन्टस प्रकाशन पुणे २००२

३९) डॉ. गारे गोविंद 'बदलाच्या उंबरठयावरील कोकणा आदिवासी' श्री विद्या प्रकाशन पुणे.

४०) डॉ. गारे गोविंद श्री. सोनवणे उत्तमराव 'आदिवासी कलाविश्व' महाराष्ट्र शासन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे.

४१) म. गांधी मो.क. 'सत्याचे प्रयोग' अनुवाद सीताराम पटवर्धन नवजीवन प्रकाशन अहमदाबाद

४२) गायकवाड व्ही. एम. 'आडकुजी पाटील नन्नावरे' व्ही. एम. गायकवाड चंद्रपूर २००८

४३) Galtung Jhon Theory and methods of social research. S. Chand and Co.ltd Ram Nagar New Delhi First Published 1967. First Indian Reprint 1980

४४) डॉ. गोखले शरदचंद्र 'सामाजिक विकासाचे प्रश्न व धोरण' व्हिनस प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती ऑक्टो १९८९

४५) गोडबोले वि.ज. 'समस्या शंभर कोटींची जनगणना २००१' दास्ताने रामचंद्र आणि के. पुणे प्रथमावृत्ती २००२

४६) गुप्ता एम. एल. शर्मा डी. डी. 'समाजशास्त्र' साहित्यभवन पब्लीकेशन आग्रा. १९९७

४७) Dr. Ghurye G.S. The Mahadev Kolis popular prakashan Bombay

४८) Dr. Ghurye G.S. 'The scheduled Tribes' Third Edition 1963 Popular Prakashan Bombay.

४९) जुलमे टी. टी. 'गोंडवनातील ऐतिहासिक मुलचेरा' पुरातत्त्व बौद्ध संस्कृती सेवा संघ चंद्रपूर १९९२

५०) जांभुळे म. सि. 'माना जामातीचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास' श्री. माणिकादेवी मंदीर बाांधकाम समिती नागपूर २००७

५१) जॉन्सन हेन्री एन 'सामाजशास्त्र एक विधिवत विवेचन' अनुवादक योगेश अटल कल्याणी पब्लीकेशन नवी दिल्ली १९९१

५२) डॉ. जाधव मोहन डॉ. भोसले आरती प्रा. सरपोतदार प्राची 'भारतीय शिक्षणाचा विकास' सौ. भाग्यश्री मोरेश्वर फडके फडके प्रकाशन दुधाळी कोल्हापूर सहावी आवृत्ती जून २०१०

५३) जैमिनी शारदा भाऊराव 'कुणबी समाज', स्वरुप, संस्कृती सभ्यता संघर्ष प्रकाशन नागपूर तृतीय आवृत्ती २००१

५४) John Harries 'Rural Development' Theories sf peasant economy and agrarian change Hatchinson & Co. Ltd Londan

First Published 1982
५५) डॉ. कऱ्हाडे बी. एम. 'शास्त्रीय संशोधन पद्धती' मनोहर पिंपळापूरे प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती जाने २००७
५६) डॉ. कऱ्हाडे सदा 'संशोधन सिद्धान्त आणि पद्धती' प्रकाश विश्वासराव लोकवाङमय गृह मुंबई २५.
५७) क्रन्स्टन मॅगरिस 'विसावे शतक आणि मूलभूत मानवी हक्क' शंकरराव देव समाज प्रबोधन संस्था पुणे
५८) डॉ. कऱ्हाडे बी. एम. 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' मानवता सांस्कृतिक विकास व शोध केंद्र चामोर्शी नोव्हें २००४
५९) डॉ. कऱ्हाडे बी.एम 'समाजशास्त्रीय विचार चिंतन' अशोक पिंपळापूरे प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती ऑक्टो २०१०
६०) डॉ. कऱ्हाडे बी. एम. 'भारतीय समाज प्रश्न आणि समस्या' पिंपळापूरे ॲण्ड कं पब्लीशर्स नागपूर २००९
६१) डॉ. कामडी गोकूल 'कृतिसंशोधन व नवोपक्रम' श्री विद्या प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती २००८
६२) डॉ. सौ. काळदाते सुधा 'भारतीय समाजरचना' महाराष्ट्र विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ औरंगाबाद विद्यापिठ १९७६
६३) कश्यप सुभाष सी 'आपली संसद' अनुवादक पाटील नं. ब. संचालक नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नवी दिल्ली चौथी आवृत्ती २०११
६४) Kapadia K.M. 'Marriage and Family in India' oxford university Press Bombay 1955
६५) Ketkar S. V. 'History of Cast in India' Ithaca New York 1909
६६) Kulkarni M.G. 'Problems of Tribal Development a case study' Parimal Prakashan Aurangabad First Published 1974
६७) प्रा. कुलकर्णी पी. के. 'समाजशास्त्रातील सैद्धांन्तिक दृष्टिकोन' मंगेश प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती २००६
६८) कुलकर्णी पी. के. गंदेवार एम. एन 'संस्थाचे समाजशास्त्र' विद्या प्रकाशन नागपूर
६९) डॉ. कुलकर्णी शौनक 'महाराष्ट्रातील आदिवासी' डायमंड पब्लीकेशन पुणे प्र. आवृत्ती ऑक्टो २००९
७०) डॉ. कुलकर्णी अनिल 'प्रौढ शिक्षण एक दृष्टिक्षेप' साकेत प्रकाशन औरंगाबाद
७१) कुलकर्णी पी. के. 'सामान्य समाजशास्त्र' श्री. मंगेश प्रकाशन रामदासपेठ नागपूर २०००
७२) डॉ. खडसे भा. कि. 'सामाजिक मानवशास्त्र' मंगेश प्रकाशन नागपर तृतीय आवृत्ती १९८९
७३) डॉ. खडसे भा. कि. 'मांगजात' मंगेश प्रकाशन नागपूर १९९०

७४) डॉ. लांजेवार ज्योती 'भारतीय समाज आणि स्त्री'
सुगावा प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती २००५

७५) लोटे रा. ज. 'सामाजिक समस्या'
मनोहर पिंपळापुरे प्रकाशन नागपूर प्र. आवृत्ती जुलै १९८९

७६) लोटे रा. ज. 'सामाजिक व्यवस्था आणि सामाजिक परिवर्तन'
पिंपळापुरे अॅण्ड कंपनी प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती १९८८

७७) महाश्वेता देवी 'इतवा मुंडाने लढाई जिंकली'
अनुवाद सुधा नरवणे नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नवी दिल्ली.

७८) महाकरकार श्रीराम महादेव 'आदिवासी स्त्री व राजकारण'
श्री. राजराजेश्वर शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक बहुउद्देशीय संस्था चामोर्शी जि. गडचिरोली प्रथमावृत्ती ७ जाने २००६

७९) महिपाल 'हिंदू और हिंदू'
आर बी. एस. ए. पब्लीशर्स जयपूर २००३

८०) प्रा. माने माणिक चंद्रकांत 'भारतीय समाज'
विद्या प्रकाशन नागपूर

८१) मांडे प्रभाकर 'मांग आणि त्यांचे मागते'
गोदावरी प्रकाशन औरंगाबाद दुसरी आवृत्ती १५ ऑग. २००९

८२) Dr. Mehta B.H. Gonds of the central Indian high lands volume two concept publishing company New Delhi

८३) मेश्राम गोकुळदास 'आदिवासी संस्कृतीचे वारसदार आणि त्यांचा धम्म
गोकूळदास मेश्राम, चंद्रपूर २००६

८४) मुकर्जी रविंद्रनाथ 'भारतीय समाज व संस्कृती'
विवेक प्रकाशन नविनतम् संस्करण २००८

८५) मुकर्जी रविंद्रनाथ 'भारतीय सामाजिक संस्थाएँ विवेक प्रकाशन जवाहरनगर दिल्ली १९९५

८६) मुकर्जी रविंद्रनाथ 'सामाजिक मानवशास्त्र की रुपरखा' विवेक प्रकाशन जवाहरनगर न्यू दिल्ली २००८

८७) नाडगोंडे गुरुनाथ 'भारतीय आदिवासी'
कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे २००३

८८) नाडगोंडे गुरुनाथ 'सामाजिक आंदोलने'
कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे ३० प्रथम आवृत्ती १९८६

८९) नाटाणी पी. एन 'भारत में विवाह व्यवस्था'
बुक एनक्लेव जयपूर २००९

९०) नाटाणी शोभा 'भारतीय समाज और नारी, दशा और दिशा'
मार्क पब्लीशर्स जयपूर २०१०

९१) श्रीमती ओडवायर सुशिला 'सामाजिक संशोधन'
अनिल मेहता अजब पुस्तकालय कोल्हापूर प्रथमावृत्ती

१९८१

९२) प्रा. पाटील व्ही. बी. 'महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज संस्था'
सागर प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती २००५

९३) डॉ. सौ. पेंडके प्रतिभा सुधीर 'जागतिक शिक्षणतज्ञ'
श्री. प्रमोद मुंजे विद्या प्रकाशन रुईकर रोड, महाल नागपूर प्रथमावृत्ती जाने. २०१०

९४) फडणवीस शोभा 'प्रत्यंचा'
भावनाखरे प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती ९ जाने २०१०

९५) रानडे प्रतिभा 'स्त्री प्रश्नांची चर्चा एकोणिसवे शतक'
पॉप्युलर प्रकाशन मुंबई द्वितीय आवृत्ती १९१४

९६) राजूरकर अ. ज. 'चंद्रपूरचा इतिहास'
महाकाली प्रकाशन चंद्रपूर प्रथमावृत्ती १९८२

९७) प्रा. राऊत किशोर 'पारधी जमात बदल व समस्या'
गौरव प्रकाशन अमरावती प्रथमावृत्ती १४ जाने. २०१०

९८) Rao Shankar C.N. 'Socilogy' S. Chand and comp. Ltd New Delhi 1995

९९) सचदेव विद्याभूषण डी. आर. 'समाजशास्त्र के सिद्धांत'
किताबमहाल इलाहाबाद २००९

१००) डॉ. संत दु. का. 'संशोधन पद्धती प्रक्रिया व अंतरंग'
पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती १९८८

१०१) ॲड. साळवे एकनाथ 'भगवान बिरसा मुंडा'
फुले आंबेडकर स्टडी ग्रुप प्रकाशन चंद्रपूर २००२

१०२) साठे रविंद्र 'मूलनिवास एक खोटी संकल्पना'
भारतीय विचार सव्हाना पुणे.

१०३) सांस्कृत्यायन राहूल 'मानव समाज'
लोकभारती प्रकाशन इलाहाबाद पांचवी आवृत्ती १९७७

१०४) डॉ. सिंह विरेंद्रनाथ 'ग्रामीण समाजशास्त्र' विवेक प्रकाशन दिल्ली प्रथमावृत्ती १९८८

१०५) डॉ. सिंह पी. बी. 'सामाजिक संरचना प्रक्रिया एवं परिवर्तन'
राजीव प्रकाशन मेरठ १९८८

१०६ Sing Yogendra Social stratification and social change in India Manohar publication New Delhi 1977

१०७) Dr. Swai 'Education and ocupation mobility in vidarbha', Editor Bhole Nagpur University teacher jurnal 1995-96

१०८) शर्मा रामनाथ शर्मा राजेंद्रनाथ 'शैक्षणिक समाजशास्त्र'
अटलांटिक पब्लीशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स नवी दिल्ली. १९९७

१०९) शरदचंद्र 'भारत शासन आणि महाराष्ट्र शासनाचे नवीन कायदे २००१'
कन्हैया लालगुप्ते नवीन कायदे प्रकाशन १३/२९ मिश्रा

कॉलोनी रोड शुक्लागंज उन्नाव कानपूर

११०) श्रीनिवास एम. एन. ‘आधुनिक भारत में सामाजिक परिवर्तन’ राजकमल प्रकाशन प्रा. लि. नई दिल्ली.

१११) Thapar Romesh 'Tribe, caste and Religion in India' The Macmillan company of India seminar publication meerut.

११२) तिजारे बाबा वि. ‘सामाजिक विकास आणि विस्तार शिक्षण’ म. वि. ग्रं. नि. मंडळ विद्याबुक्स औरंगाबाद १९८३

११३) तोमर रामबिहारी सिंह ‘सामाजिक परिवर्तन’ श्रीराम मेहरा अॅण्ड कंपनी आगरा प्रथमावृत्ती १९६९

११४) डॉ. वक्काणीजी नि. आ. ‘आधुनिक विदर्भ का इतिहास’ मंगेश प्रकाशन नागपूर १९८५

११५) डॉ. वैद्य नी. स. ‘समाजशास्त्र’ विद्या प्रकाशन, नागपूर

११६) डॉ. वैद्य नी. स. ‘मानवशास्त्र तु.’ पडगिलवार, प्रोप्रायटर पडगिलवार प्रकाशन टिळक रोड महाल नागपूर प्रथमावृत्ती १८ ऑक्टों. १९६७

११७) वाकडे भास्कर ‘मुळनिवासी माना’ वज्रंकुस प्रकाशन वरोरा २००६

११८) Young pouline v. 'Scientific social Surveys and Research Fourth Edition' Prentice Hall of India Private Ltd New Delhi. July 1988

११९) Government of India India 2007 A Reffernce Annual 51th Edition Ministry of information and broad casting.

१२०) Government of India Scheduled casts and scheduled Tribes (prevention of Atrocities Act 1989) sixteenth Edition 2003 Eastern book company Lucknow

१२१) Gov. of Maharashtra Bombay 'Central Probinces District Gazetteers chanda district vol. A.' The Executive Editor and secretory Gazetteer department.

१२२) महाराष्ट्र शासन ‘अनुसूचित जाती–जमातीच्या मुलांकरीता शासनाच्या कल्याणकारी योजना’ महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई.

१२३) महाराष्ट्र शासन ‘निश्चयाचे बळ’ महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई प्रथमावृत्ती २०११

१२४) महाराष्ट्र शासन ‘विकासाच्या वाटा २०११’ जिल्हापरिषद चंद्रपूर

१२५) महाराष्ट्र शासन ‘बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मार्गदर्शिका’ महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद विद्या परिषद पुणे ३०

१२६) महाराष्ट्र शासन ‘जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०००–२००१ जिल्हा चंद्रपूर’ जिल्हा सांख्यिकी कार्यालय अर्थ व सांख्यिकी

संचालनालय महाराष्ट्र शासन चंद्रपूर
१२७) महाराष्ट्र शासन — ‘राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६’
व. रा. नागपुरे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे ३०
१२८) महाराष्ट्र शासन — ‘लोकराज्य (मासिक) नोव्हें २००८’
लोकराज्य (मासिक) माहिती व जनसंपर्क महासंचलनालय मुंबई
१२९) माना आदिम जमात मंडळ मुंबई — ‘त्रैवार्षिक अहवाल’ माणिकादेवी समिती नागपूर २००७
१३०) संपादक — ‘सुगावा (मासिक)’ आदिवासी विशेषांक डिसेंबर २००२ सुगावा प्रकाशन पुणे
१३१) दैनिक लोकमत — वर्तमानपत्र लोकमत भवन रामदासपेठ नागपूर
१३२) दैनिक देशोन्नती — वर्तमानपत्र देशोन्नती कार्यालय धंतोली नागपूर
१३३) संपादक — जिल्हा लोकमत वातरिंग गजानन जानभोर
१३४) महाराष्ट्र शासन — सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका भाग ३ महाराष्ट्र राज्य शैक्षणिाक संशोधन प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे ३० प्रथमाआवृत्ती २०१२
१३५) महाराष्ट्र शासन — राज्यातील शेतकरी भुमिहीनांना ताठ मानेने जगण्यास मदत करणारे महाराष्ट्र शासनाचे निर्णय.
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन रंगनाथ मुद्रण वडाळा मुंबई नोव्हें. १९८८



















